

# શ્રીદાસરામગાથા

# ॥ श्रीदासराम गाथा ॥

प्रकाशिका –
सौ. श्यामला कृष्णाजी पटवर्धन
'स्नेहदीप', डॉ. आंबेडकर रोड,
सांगली. ४१६ ४१६

प्रकाशन दिन –
फाल्गुन शुद्ध दशमी, शके १९०९
शनिवार दि. २७ फेब्रुवारी १९८८

© सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

मुखपृष्ठ – डिझाईन सजावट
राघवेन्द्र विष्णुपंत कुलकर्णी

मुद्रक –
प. म. महाबळ
प्रभा प्रेस,
६५६, गणपती पेठ, सांगली. ४१६ ४१६

मूल्य रुपये १०० /–


श्रीरामचंद्रावमहाराज यरगट्टीकर
चिमड


सद्गुरु रघुनाथप्रिय साधुमहाराज


श्रीसद्गुरुनारायणराव भाऊसाहेबमहाराज
निंबरगीकर


श्रीसद्गुरू मामामहाराज केळकर


श्रीसद्गुरू तात्यासाहेब कोटणीसमहाराज

# अनुक्रम

| | |
|---|---|
| आशिर्वाद | |
| प्रकाशिकेचे मनोगत | |
| प्रास्ताविक | |
| नमन! | १ |
| १) सद्गुरू | २–६ |
| २) तत्वज्ञान | ७–३० |
| ३) नाम | ३१–४६ |
| ४) साधन | ४७-५३ |
| ५) अनुभव | ५४–७७ |
| ६) कूट | ७८–८८ |
| ७) उपदे | ८९–११२ |
| ८) प्रणव | ११३–११६ |
| ९) देव | ११७–१२६ |
| १०) संत | १२७–१३९ |
| ११) पहाण्याचे अभंग | १४०–१४६ |
| १२) आत्मसुधा | १४७–१५४ |

| | |
|---|---|
| १३) आत्मपर } | १५५–१७३ |
| १४) स्वात्मतरंग } | |
| १५) चिमड संप्रदायावरील अभंग पदे | १७४–१९४ |
| १६) प्रासंगिक | १९५–१९८ |
| १७) ती. प. पू. मामांचेवरील अभंग | १९९-२३० |
| १८) कल्याणस्वामी आख्यान | २३१–२३२ |
| १९) तात्यासाहेबमहाराज जन्माख्यान | २३३–२३६ |
| २०) चोखोबा आख्यान | २३७–२३८ |
| २१) सण | २३९–२४१ |
| २२) तीर्थ | २४२–२४३ |
| २३) धर्म | २४४–२४५ |
| २४) नेचर | २४६ |
| २५) संकीर्ण | २४७–२६३ |
| २६) साक्षात्कारपंचकपाठ | २६४- २६५ |
| २७) सहजानंदलहरी | २६६ |
| २८) स्वानंदलहरी | २६७–२६८ |
| २९) नामानंदलहरी | २६९ |
| ३०) अद्वयानंदलहरी | २७० |
| ३१) स्वरूपलहरी | २७१–२७२ |
| ३२) वायुलहरी | २७३–२९३ |
| ३३) स्मरणपंचक | २९४–२९५ |
| ३४) दीनदयाळ पाठ | २९६–३०० |
| ३५) हरिपाठ–महात्म्य | ३०१–३०३ |
| ३६) सांप्रदायबोध | ३०४–३०६ |
| ३७।१ श्रीगुरुपाठ | ३०७–३०९ |
| ३७।२ गुरुपाठ | ३१०–३१३ |
| ३८) संजीवनपाठ | ३१४–३१९ |
| ३९) निवृत्तीपाठ | ३२०–३२५ |

| | | |
|---|---|---|
| ४०) | श्रुतिपाठ | ३२६–३३२ |
| ४१) | स्तुतिपाठ | ३३३–३३७ |
| ४२) | सिद्धपाठ | ३३८–३४२ |
| ४३) | संतचरित्रपाठ | ३४३–३५१ |
| ४४) | चैतन्यपाठ | ३५२–३५७ |
| ४५) | चिन्मय सिद्धांत दर्शन | ३५८–३६४ |
| ४६) | अलख निरंजन दर्शन | ३६५–३६८ |
| ४७) | साधनाचे अभंग | ३६९–३७२ |
| ४८) | प्रसादाचे अभंग | ३७३–३७५ |
| ४९) | सद्बोधदशक | ३७६–३७९ |
| ५०) | हरिपाठ-१ | ३८०–३८८ |
| ५१) | हरिपाठ-२ | ३८९–३९२ |
| ५२) | स्वधर्मपाठ | ३९३–४०० |
| ५३) | नित्यपाठ | ४०१–४०३ |
| ५४) | चिन्मयपाठ | ४०४–४०९ |
| ५५) | कैवल्यपाठ | ४१०–४१९ |
| ५६) | श्रीनामदीपसारपाठ | ४२०–४२९ |
| ५७) | निरंजनपाठ | ४३०–४३६ |
| ५८) | चक्षुपाठ | ४३७–४४९ |
| ५९) | भावार्थ हरिपाठ | ४५०–४५६ |
| ६०) | सदानंदपाठ | ४५७–४६२ |
| ६१) | साधनपाठ | ४६३-४६७ |
| ६२) | रेवणसिद्धपाठ | ४६८–४७२ |
| ६३) | नारायणपाठ | ४७३–४७९ |
| ६४) | जीवनपाठ | ४८०–४८७ |
| ६५) | प्रार्थना / मागणे | ४८८–४९७ |
| ६६) | भक्तपर | ४९८–४९९ |
| ६७) | निर्याणाचे अभंग | ५००–५०६ |
| | सूची | ५०७–५३४ |
| | महात्मा गांधींवरील पद | ५३५ |

दिनांक: २८।१२।८

प्रिय चिरंजीव — ह. भ. प. रामराव गोविंद केळकर

ह. भ. प. रामराव गोविंद केळकर हे निरंतर सद्भावना-
युक्त, सांप्रदायिक थोर अधिकारी सत्पुरुष आहेत. त्यांच्यावर देवगडचे
काडसिद्ध, गगनगिरि, गुरुलिंग जंगमादि थोर सिद्ध महापुरुषांची
अपार कृपा आहे त्यामुळे त्यांचे अंतरंग साधनाने व नित्य
कीर्तनाने आत्मानंदात रंगून गेलेले आहे. नित्य नामस्मरणाने पूर्णता
पूर्ण प्रसन्न होतो, आत्मबोध प्रगट होतो, स्वरूपाचा आनंद होतो
येतो हेच तत्त्वज्ञान सर्व साधुसंत सांगत आले आहेत
श्री दासरामांनी हा अमृतानुभव घेतला, अनुभवला व सद्गुरु
कृपेने ते निरंतर त्यात स्थिरावले आहेत असे प्रत्यंतर या श्रीदासराम
गाथेतील समग्र अभंगांतून जागोजागी दिसून येते. प्रत्यक्ष स्वानुभव
नसेल तर हे सर्व अभंग श्रेष्ठ अनुभवाच्या लावण्याने सजले आहेत
त्यांचा आनंद तुकाराम तेव्हा ज्ञानेश्वरांचे तत्त्व. ज्ञानेश्वरीगाथेचे सार-
सार या गाथेत आलेले आहे. थोर संतांचा सहवास, साधुसंतांचा
बोध व सद्गुरुंचा अंतरंगीचा आनंद हे सर्व या अभंगांत
साठवलेले आहे. हे अभंग म्हणजे सद्गुरु कृपेचीच उत्कट रचने
आहेत. ओतप्रोत भक्तिरसात न्हाऊन निघालेले आहे

परमार्थसाधकांस हा अभंगग्रंथ अत्यंत उपयुक्त
ठरणार वाटेल, यात शंका नाही. आम्हांस हे अभंग वाचून
आनंद समाधान झाले श्री. दासराम केळकर महाराज
यांच्या हातून असेच जे ईश्वरीय कार्य चालले आहे त्यात
उत्तरोत्तर उत्कर्ष होत जावो अशी स्वामी स्वरूपानंद चरणी
प्रार्थना आशीर्वाद

आपला स्नेहांकित

(स्वाक्षरी)

॥ श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न ॥

# प्रकाशिकेचे मनोगत

प. प. सद्‌गुरू श्री. राम गोविंद केळकर तथा श्रीदासराममहाराज तथा श्रीदादा यांच्या अभंगांची ही गाथा परमार्थप्रेमी वाचकांच्या हाती देताना मला अतीव आनंद होत आहे.

श्रीदासराममहाराजांचा पारमार्थिक अधिकार फार मोठा आहे. भगवद्‌-भक्तीची व गुरूसेवेची परंपरा लाभलेल्या केळकर घराण्यात अखंडनामसंकीर्तन-योगी, परमाधिकारसंपन्न अशा श्री. गोविंद अनंत तथा बापूराव उर्फ मामा केळकर यांचे पोटी त्यांचा जन्म झाला. श्रीमामामहाराज केळकर हे वैराग्यशील वृत्तीचे होते. बालपणापासूनच त्यांची अध्यात्मिक ओढ आगळी होती. परंतु ते एकुलते एक असल्याने त्यांचा लवकर विवाह होऊन वंशवेल वाढावी अशी त्यांचे वडील अंताजीपंत यांची इच्छा होती. श्रीमामानी याबाबतीत आळंदीला जाऊन श्रीज्ञानेश्वरमाऊलीचा कौल अखेरचा मानायचा असे ठरविले. श्रीज्ञानेश्वरमाऊलीचे साक्षात दर्शन होऊन 'तुझा प्रपंच परमार्थरूप होईल' असा आदेश मिळाला. त्यावेळी दर्शन झालेले श्रीज्ञानेश्वरांचे चित्र श्रीमामांनी स्वहस्ते काढून ठेवले आहे. नामनिष्ठ मामानी नाममात्र प्रपंच करून आपले आयुष्यच साधनीभूत केले. सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे आज्ञेने अखंड अडतीस वर्षे कीर्तन करून गुरुसेवेचा आदर्श जगापुढे ठेवला. भक्तीची भरभराट दाखविली. 'तबला ना पेटी टाळ ना मृदंग' रंग तो श्रीरंग । आपण झाला ॥' असे श्रीमामांचे कीर्तन सहजावस्थेत असायचे. 'देवासाठी कीर्तन करणारे एक बापूराव केळकरच' असे उद्‌गार त्यांचे कीर्तन ऐकून गुरूदेव रानडेनी काढले. आपल्या अखंड कीर्तन-सेवेने व नामसाधनेने श्रीमामानी श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्री हनुमंतराय ही दैवते प्रसन्न करून घेतली व घराचे मंदिर बनविले. त्यामुळे शहरी लखलखाटापासून अलिप्त असलेले रामनिकेतन हे थकल्याभागल्या सांसारिक जीवाचे खरेखुरे विश्रांतिस्थान बनले आहे. श्रीनिळकंठमहाराज भारती म्हणत की 'हा निगूढ

मठ असून सर्व तीर्थक्षेत्रे या ठिकाणी आहेत.' श्रीमामानी लिहिलेले १) श्रीहनुमद् गुरूचरित्रबोधसार २) श्रीरामपाठ व ३) अमृतवाणी (अभंग गाथा) हे ग्रंथ त्यांच्या साक्षात्कारी जीवनाची साक्ष देतात.

श्रीमामा इ. स. १९६२ साली त्या दिवशीचे कीर्तन करून स्वरूपाकार झाल्यावर दुसरेच दिवशी श्रीदादानी वडिलांची कीर्तन सेवा पुढे चालविली. त्या गोष्टीला मागील वर्षीच २५ वर्षे पुरी झाली. अशा प्रकारे रामनिकेतन या वास्तूमध्ये एकही दिवस खंड न होता चौसष्ट वर्षे अखंड कीर्तन सुरू आहे, व ते सद्गुरूकृपेनें शतकानुशतके पुढे चालू राहील, असा मला विश्वास आहे. याबाबतीत श्रीदासराममहाराजांचे जेष्ठ व श्रेष्ठ चिरंजीव श्री. चंद्रशेखरआण्णा यांचा मला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. श्री. आण्णा म्हणजे अंतर्बाह्य निर्मळ व्यक्तिमत्व. 'आत्मयाचे अंग। पारदर्शक जैसे भिंग' असे मला त्यांच्या बाबतीत म्हणावेसे वाटते. कीर्तन, प्रवचन, निरूपण यात त्यांचा हातखंडा आहे. आज T. V. कडे धावणाऱ्या तरूण मंडळीनासुद्धा आकर्षून घेण्याचे सामर्थ्य त्यांच्या कीर्तनात आहे. त्यानाही अगदो लहान वयात श्रीज्ञानेश्वरमाऊलीवर उत्कृष्ट अभंग स्फुरला आहे. तो असा–

सद्गुरू सावळा। धरोनिया सोवळा ॥
बापरखुमादेवीवरू सद्गुरू सावळा ॥१॥
पाहिला म्या डोळा। पाहिला म्या डोळा।
घननीळ सावळा। पाहिला म्या डोळा ॥२॥
चंद्रशेखरला आनंद मनाला। न ये सांगायला। ज्याचा त्यासी ॥३॥

या अभंगाचे निरूपण त्यांच्याच तोंडून ऐकले पाहिजे. अशाप्रकारे काव्यस्फूर्ती व अखंड कीर्तनभक्ती यांचे वरदानच भगवान सद्गुरू श्रीनिंबरगीमहाराज व श्रीतात्यासाहेबमहाराज यांच्या कृपेने केळकर घराण्याला लाभले आहे.

अशा या केळकर घराण्यात प. पू. श्रीमामा व सकल सौभाग्यसंपन्न इंदिरामाता यांचे पोटीं इ. स. १९२० साली श्रीदासराममहाराजांचा जन्म झाला. 'तैसी दशेची वाट न पाहता। वयसेचिया गावा न येता। बाळपणीच सर्वज्ञता। वरी तयाते ॥' असा त्यांचा अधिकार आहे. वयाच्या चौदाव्या दिवशी श्रीतात्या–साहेब कोटणीसमहाराजांचा दृष्टिद्वारा अनुग्रह होऊन त्यावेळी त्यानी दिलेल्या आशीर्वचनाप्रमाणे वयाच्या पाचव्या (५व्या) वर्षापासूनच ते कीर्तन करू लागले. श्रीरामानंदमहाराज खटावकर त्याना 'प्रल्हाद' म्हणत. ते एकदा म्हणाले,

प्रल्हादा तुझी कीर्तने फार चांगली होतात. तू संतवचनाचे हृद्गत सांगशील का?" श्रीदादानी घरी येऊन १६९ ओव्यांचे ' रामदासबोध ' हे दासबोधाच्या 'धर्तीवर प्रकरण लिहिले. यात उच्च आध्यात्मिक अनुभव ओवीबद्ध केले आहेत. त्यावेळी त्यांचे वय केवळ नऊ वर्षाचे होते.

श्रीदादाना श्रुत झालेली ' गुरूलिंगगीता ' हा २० व्या शतकातील एक चमत्कार आहे. ही ' गुरूलिंगगीता ' अभूतपूर्व आहे, असे म्हणावे लागेल. कारण पूर्वी भगवद्गीता, उद्धवगीता अशा गीता झाल्या आहेत. पण त्या भगवंतानी अर्जुन व उद्धव याना प्रत्यक्ष कथन केल्या आहेत. एकाच काळात, एकाच भूमीवर वावरणाऱ्या, एकच भाषा बोलणाऱ्या Divine Teaeher व human disciple यांच्यातील तो प्रत्यक्ष संवाद आहे. परंतु श्रीगुरूलिंगगीता ही चिमडसंप्रदायाचे मूळ सत्पुरुष भगवान सद्गुरू श्रीनारायणराव भाऊसाहेब उर्फ निंबर्गीकर महाराज यांचेकडून श्रीदादाना श्रुत झाली तेव्हा श्रीनिंबर्गीकर महाराजाना स्वरूपाकार होऊन ५२ वर्षे लोटली होती. त्यानी कानडी पदांद्वारे कन्नड भाषेत अनभिज्ञ असलेल्या श्रीदादाना बोध केला. त्यांच्या ' प्रल्हाद ' व ' दासराम ' या नांवांचा उल्लेख श्रीगुरूलिंगगीतेत आहे. श्रीदादानी विनंती केली की 'आपण आता माझ्या मुखातून कानडी पदे वदवा. ' त्याप्रमाणे श्रीगुरूलिंगगीतेतील काही पदे प्रल्हादाला स्फुरली आहेत. अशा प्रकारे श्रीगुरूलिंगगीता हा भिन्न कालखंडात वावरणाऱ्या, भिन्न लोकातील, भिन्न भाषा बोलणाऱ्या Divine Teacher व Divine Disciple यांच्यामधील प्रत्यक्ष संवाद आहे. गुरुदेव रानडे म्हणतात, ' साधकाला सद्गुरूकडून मिळालेल्या सबीज नामाला ध्यान साधनेमध्ये आणखी नामे होतात– ऐकू येतात. येथे तर नामाला पदेच्या पदे फुटली आहेत.

श्रीदादानी ज्ञानेश्वरीतील ६ वा अध्याय, श्रीज्ञानेश्वर मुद्रा, श्रीज्ञानेश्वर तेहेत्तिशी, अमृतानुभव इत्यादींवर टीका लिहिल्या आहेत. ' श्रीगीताकार हाच टीकाकार झाला असता ती टीका व्हावी तशीच होत असते,' असे वामन पंडित म्हणतात. म्हणजे श्रीभगवद्गीतेवर टीका लिहिणारे श्रीज्ञानेश्वर हे श्रीविष्णूच होत. मग श्रीज्ञानेश्वर तेहेत्तिशी, श्रीज्ञानेश्वरमुद्रा यासारख्या योगमार्गातील रहस्यपूर्ण ग्रंथावर टीका लिहिणारे श्रीदासराममहाराज कोण आहेत याविषयी वेगळे भाष्य करण्याची जरूरी नाही. श्रीटाकीमहाराज, मंगेश रामचंद्र टाकी, जोगेश्वरी (मुंबई), हे या ग्रंथाला लिहिलेल्या आशीर्वादपरपत्रा'त म्हणतात, 'आपल्या अभिनव ग्रंथाला आशीर्वाद देण्याचा माझा अधिकार नाही, हे उघड आहे. मला तर या ग्रंथाला वंदन करून मौनच धरावे असे वाटते." तर गुळवणीमहाराज ग्रंथ पाहून उद्गारले, " २४ तास साधनेत असल्याखेरीज हे लिहिता येणार नाही. "

श्रीदासराममहाराजांचे स्वतंत्र लेखन पुष्कळच आहे. त्यांचे सर्वच साहित्य 'अक्षर ' व ' स्वयंप्रकाशित ' आहे. वेदशास्त्रांचा मथितार्थ । झाला करतला-मलकवत । तैसाच ब्रह्मानंदे डुलत । कवि निश्चित या नाव।।' अशा सतत ब्रह्मा-नंदात डुलत असणाऱ्या अवधूताला स्फुरलेले हे अभंग आहेत. संतमुखातून स्त्रवलेले साहित्य 'अक्षर ' व ' अभंग ' असले तरी योग्य वेळी पुस्तकरूपाने प्रकाशित न झाल्यास कालौघात उपेक्षित राहून गहाळ होण्याचे व भावी पिढ्यातील साधक त्यापासून वंचित राहण्याचे भय असते.

अशा परिस्थितीत ही जबाबदारी शिष्यवर्गावर येऊन पडते. श्रीसद्गुरूंच्या अभंगांची गाथा प्रकाशित करावी अशी प्रेरणा मला झाली व मला वाटत होते त्यापेक्षा लवकरच म्हणजे श्रीमामांच्या जन्मशताब्दीचा अमृतसिद्धी योग साधून ती प्रकाशित होत आहे, ही आमच्या चिमडसंप्रदायाचे मूळ सत्पुरूष भगवान सद्गुरू श्रीनिंबर्गीकरमहाराज यांची सत्ता आहे, अशी माझी श्रद्धा आहे. ' सत्य संकल्पाचा दाता नारायण ' हेच खरे.

प. पू. श्रीमामामहाराज हे आमच्या चिमडसंप्रदायाचे भूषण आहेत. मात्र अत्यंतिक प्रसिद्धीपराङमुख वृत्तीमुळे व ' ब्रह्मचि एक एकले । असे कोंदले परिपूर्ण ।। ' अशा अवस्थेत असल्याने ते सदा सर्वदा नम्र होऊन असत. त्यामुळे त्यांच्याबद्दल आदर असलेले पुष्कळ लोक असले तरी त्यांचा अधिकार व योग्यता फारच थोड्याना माहीत आहे. नाम देण्याचा अधिकार इ. स १९३८ साली मिळूनही त्यानी अगदी शेवटी शेवटी फारच थोड्याना नाम दिले. याचे कारण-' गंगा शंभूचिया माथा । पावोनि संकोचे जेवि पार्था । तेवी मान्यपणे सर्वथा । लाजणे जे ।।' (ज्ञाने.) चिमडसंप्रदायाच्या शिरपेचात बसण्याची योग्यता व सर्वमान्य अधिकार असूनही श्रीमामानी संकोचाने त्याचा वापर केला नाही. अमानित्व ते हेच. श्रीतात्या व श्रीमामा यांच्या नुसत्या नामघोषाने आपण उद्धरून जाऊ अशी ही चिमडसंप्रदायातील गुरूशिष्य जोडी आहे. परंतु संतांचे महत्व जनसामान्याला कळायला काही शतके जावी लागतात. एक दिवस असा येईल की ' ग्यानबा-तुकाराम ' प्रमाणे ' श्रीतात्या-मामा ' यांचा जयजयकार पावलोपावली होतो आहे असे दृश्य आपल्याला दिसेल.

आज श्रीमामांच्या जन्मशताब्दी उत्सवानिमित्त होणारे हे प्रकाशन म्हणजे त्या जयघोषाची नांदीच आहे, असे मला वाटते. कारण सत्पुत्राच्या वा सत्-शिष्याच्या कर्तृत्वामुळे पित्याचे वा गुरूचे नाव जगात होते. विवेकानंदांसारख्या शिष्यामुळे श्रीरामकृष्ण परमहंसांचे महत्व जगाला कळले. तसेच श्रीदासराम महाराजांच्या या गाथेमुळे चिमड संप्रदाय व श्रीतात्या-मामा यांची कीर्तिध्वजा उंच फडकणार आहे. तसेच भगवान सदगुरू श्रीनिंबर्गीकर महाराज यांचे महत्त्व

जगाला कळणार आहे. श्री. निंबर्गीकर महाराज हे कोणत्या कोटीतील महापुरूष होते हे गुरूदेव रानडयानी विवेकानंदांच्या शद्बांत पुढीलप्रमाणे वर्णिले आहे- " The greatest men in the world have passed away unknown. The Buddhas and the Christs that we know are but second-rate heroes in comparison with the greatest men of whom the world knows nothing. Silently they live and silently they pass away, and in time, their thoughts find experessions in Buddhas and Christs and it ls these latter that become known . to us. " – (On Freedom)

ग्रंथ प्रकाशनाच्या माझ्या आंतरिक प्रेरणेस श्रीसद्गुरूनी संमती दिली हे मी माझे परमभाग्य समजते. त्यांच्या पत्नी प. पू. मातुःश्री सौ. सीतावहिनी केळकर यानी आपले श्वशुर श्रीमामा यांच्या जयंती दिवशी गुरूपुष्यामृत योग साधून महाप्रयाण केले. त्या अत्यंत समाधानी वृत्तीच्या होत्या. आपले श्वशुर श्रीमामा व पती श्रीदादा यांच्या परमार्थास पूरक होईल अशा जबाबदारीने व निष्ठेने त्यानी प्रपंचाची बाजू सांभाळली. पतिसेवेच्या बाबतीत तर त्या 'लोपामुद्रा' च होत्या. माझा व त्यांचा पुरता परिचय होण्यापूर्वीच त्या श्रीमामांचे पायाशी विसावल्या. त्यांची सेवा आपल्या हातून घडली नाही ही रूखरूख माझ्या मनाला लागली होती.देह ठेवल्यावरही त्यानी आपली स्नुषा सौ. रोहिणी हिच्याकडून 'श्रीमामांचा पुण्यतिथी महोत्सव' चांगल्या प्रकारे करीन व श्री दादांची काळजी घेईन' असे वचन घेतल्यावर काकस्पर्श झाला. यावरुन या दोघांची त्या किती काळजी घेत होत्या, हेच स्पष्ट होते. आज त्यांची ५वी पुण्यतिथी श्रीमामांच्या जन्मशताब्दीनिमित्त श्रीदादांची गाथा प्रकाशित व्हावी हीच सेवा प. पू मातुःश्रीनी माझ्याकडून स्वीकारली अशी माझी श्रद्धा आहे. व तसे समाधानही मला मिळाले आहे.

अनेक सुहृदांच्या मदतीमुळेच हे ग्रंथप्रकाशनाचे काम पार पडत आहे. ग्रंथपरिचयाचे अभ्यासपूर्ण व अतिशय कौशल्याचे काम डॉ. के. वा. आपटे, उप-प्राचार्य, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली यानी केले. मी त्यांच्या ऋणात राहू इच्छिते.

मुद्रिते तपासण्याचे अत्यंत परिश्रमाचे काम माझे गुरूबंधू श्री. यशवंत आपटे यानी स्वेच्छेने व आनंदाने करून दिले किंबहुना प्रकाशनाची सर्व जबाबदारी त्यानीच उचलली असे म्हणावे लागेल. त्यांचे आभार मानायला माझ्याजवळ शब्द नाहीत.

अभंगांची छाननी, विभागणी, वर्णक्रमानुसार सूची इत्यादी अनेक वेळ खाणारी कामे श्री. बाळासाहेब गोखले, श्री. हडदरेसाहेब, श्री. मुकुंदराव सहस्त्रबुद्धे, श्री. वामनराव सहस्त्रबुद्धे, श्री. काटकरसाहेब, श्री. शिगाडे यांनी महाराजांच्याबद्दलच्या प्रेमामुळे अत्यंत आपुलकीने, न कंटाळता केली. त्यांची मी कृतज्ञ आहे. त्याचप्रमाणे डॉ. के. वा. आपटे व श्री नारायण आपटे यांनी सूचीचे काम मनःपूर्वक केले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

श्री. राघवेंद्र कुलकर्णी यांनी मुखपृष्ठाचे सुबक काम केले. त्यांचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. त्याचप्रमाणे गाथा छपाईचे काम प्रभा प्रेसचे मालक श्री. प. म. महाबळ व प्रेसमधील कर्मचारी वर्ग यांनी अत्यंत सुबक व उत्कृष्ट प्रकारे केले आहे. त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. पुन्हा एकदा सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करून 'मनोगत' पुरे करते.

प. पू. सद्गुरु श्रीदासराममहाराज यांच्या कृपेने स्फुरलेले हे मनोगत आमच्या संप्रदायाचे मूळ सत्पुरुष भगवान श्री. निंबरगीकरमहाराज यांचे चरणी अर्पण करते.

श्रीसद्गुरूचरणरज

**सौ. श्यामला कृ. पटवर्धन**

# प्रास्ताविक

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी म्हटले आहे की काही पुरूष उपजताच ज्ञानी आणि साक्षात्कारी असतात. अशा पुरूषांमध्ये श्रीदासराममहाराज उर्फ श्रीरामराय गोविंद केळकर यांचा समावेश होतो. निष्कलंक केळकर कुळातील साधुपुरूष श्रीमामामहाराज ऊर्फ गोविंद अनंत केळकर आणि मातोश्री इंदिरा हे मातापिता श्रीदासरामांना लाभले. त्यामुळेच पुढे वयाच्या चौदाव्या दिवशीच त्यांना श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांचा दृष्टीद्वारा कृपानुग्रह लाभला. आणि कोटणीसमहाराजांच्या आशीर्वादानुसार श्रीदासराममहाराज हे वयाच्या पाचव्या वर्षापासून हरिकीर्तन करू लागले. वयाच्या सातव्या वर्षी त्यांना 'आत्मयाची काव्यस्फूर्ति' झाली, आणि 'गुरूचा पंखा असावा वरती' हा पहिला अभंग त्यांना स्फुरला. नंतरच्या काळात त्यांचे हातून श्लोक, भजन, ओवीबद्ध टीका, ओवीबद्ध प्रकरणे, गद्य निबंध व साहित्य, आरती, पदे आणि अभंग असे लेखन झाले. आजअखेर त्यांना स्फुरलेल्या पद-अभंगांचा एकत्रित संग्रह म्हणजे प्रस्तुतची 'श्रीदासराम गाथा' होय.

श्रीदासराम गाथा या ग्रंथात प्रारंभीचे क्रमांक नसलेले नमनाचे पद आणि अनुक्रमांक असणारे १८७५ अभंग मिळून एकूण १८७६ पदे-अभंग आहेत. जुन्या काळी आपल्या पद-अभंगांत स्वतःची नाममुद्रिका घालण्याची पद्धत होती. प्रस्तुत गाथ्यात कांही अभंग ( उदा. अ. क्र. ७९८, ८४६, इत्यादि ) हे मुद्रिकारहित आहेत. उरलेले सर्व नाममुद्रांकित आहेत. या अभंगात एकूण आठ मुद्रिकांचा उपयोग दिसून येतो. दास ही एक सामान्य मुद्रिका अ. क्र. १, २, ५, इत्यादींमध्ये आहे. राम, बाल राम, दासराम या मुद्रिका दासरामांच्या राम या नावावरून आलेल्या आहेत. ( उदा.- अ. क्र. ४, १६३, १६५, नमनाचे पद, १४, १६, १८ इत्यादि ). इंदिरातनय ( उदा. अ. क्र. १८४ इत्यादि ) व गोविंदतनय ( उदा. अ. क्र. ३, ८३, ६४, इत्यादि ) या दासरामांच्या मातापित्याच्या नावाधारे बनलेल्या मुद्रिका आहेत. गुरू आपल्या मुखे काव्य बोलवीत आहेत या भूमिकेतून गुरूराज ही मुद्रिका ( अ. क्र. ६२, ६३, ६४, इत्यादि ) वापरलेली दिसते. श्रीदासराममहाराजांना रामानंदमहाराज तसेच श्रीनागाप्पाण्णामहाराज हे प्रल्हाद या नावाने संबोधीत. ही प्रल्हाद मुद्रिका अ. क्र. ७०१ इत्यादींमध्ये आढळते.

श्रीदासराममहाराजांची मातृभाषा मराठी आहे. साहजिकच प्रस्तुत ग्रंथातील सर्व अभंग मराठीत आहेत. तथापि अपवादवजा अ. क्र. ९४२ हा मात्र हिंदी भाषेत आहे.

प्रस्तुत गाथ्यातील कांही अभंगांत ( उदा. अ. क्र. ७६० ) काही शब्दांचे पाठभेद आहेत. येथे हे लक्षात घ्यावे की हे प्रतकर्त्यांच्या प्रमादामुळे झालेले नसून ते मुळात श्रीदासराममहाराजांनीच नोंदलेले आहेत.

पूर्वकालीन संतांचे वाङमय श्रीदासराममहाराजांनी वाचलेलें असल्यामुळे त्यांच्या काव्यात कधी पूर्व संतवचनांची उद्धरणे आलेली आहेत. तर क्वचित् ' चणे खावे लोखंडाचे ' (३६७.४), ' पंचप्राण पंचारती ' (३७०.२), इत्यादी-सारखे काही शब्दप्रयोग पूर्वीच्या संतवचनांची स्मृति करून देणारे आहेत.

प्रस्तुत ग्रंथातील अभंगामध्ये तीन कडव्यांच्या अभंगापासून १०८ कडव्यां-पर्यंतचे अभंग आहेत. इथले पद-अभंग एकूण ६७ शीर्षकांखाली देण्यात आलेले आहेत. अर्थात् त्या त्या शीर्षकाखाली येणारे अभंग हे नेहमीच हवाबंद स्वरूपाचे आहेत असे नाही. काहीतील विषय हे अन्य शीर्षकाखालील विषयाशी जुळते असण्याची शक्यता आहे.

येथे उपयोजिलेल्या शीर्षकांपैकी बरीच शीर्षके श्रीदासराममहाराजांनीच त्या त्या अभंगसमूहाला दिलेली होती. उदा, ६, १२, १७–२०, आणि २६–६४, उर्वरित अभंगांचे त्यांनी विशिष्ट असे वर्गीकरण केलेले नव्हते. तेव्हा अभंगातील विषय पाहून ढोबळपणे १–५, ७–११, १३–१६, २१–२५, ६५ या क्रमांकांची शीर्षके दिलेली आहेत. त्यातील वायुलहरी, सांप्रदायबोध, गुरूपाठ ही शीर्षके असणारे अभंग यापूर्वी स्वतंत्र पुस्तकरूपाने प्रकाशित झालेले होते; त्यांचे येथे पुनर्मुद्रण आहे

श्रीदासराममहाराजांच्या काही अभंगांचा रचनाकाल माहीत आहे. पण अन्य अभंगांचा रचनाकाळ नोंदलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथात अभंगांची मांडणी कालानुक्रमाने करता आलेली नाही. या सामान्य माहितीनंतर या गाथ्यातील विषयांचा संक्षिप्त परिचय पुढे दिला आहे. तसे करताना योग्य तेथे शीर्षकांचे क्रमांक व अभंगचरणांचे क्रमांक कंसात ठेवले आहेत.

स्वधर्मपाठामध्ये (५२) खरा धर्म कोणता याचे विवरण आहे. स्वधर्म अथवा निजधर्म हा ' अढळ अखंड सत्यरूप धर्म ' (१४३९.४) आहे. धर्मावरील (२३) अभंगावरून ' आत्मा हाच स्वधर्म ' आहे हा बोध होतो. आणि ' देवाजीचे

नाम हृदयामाजी' (१४३२.५) हे या धर्माचे वर्म आहे. संकीर्ण अभंगांत (२५) संन्यासी, गीता, चहाचे रूपक, शरीरातील रासक्रीडा, वेदरूपी वेल, मन, हरिभक्त, सत्य, असत्य इत्यादींवरील स्फुट विचार आहेत. एका स्वातंत्र्यपूर्वकालीन अभंगात 'स्वातंत्र्य मिळो राष्ट्राला' (९५८.२) अशी अपेक्षा व्यक्त झालेली दिसते.

श्रीदासराममहाराजांचे कांहीं अभंग आत्मपर (१३) आहेत. त्यांमध्ये त्यांच्या ऐहिक जीवनातील तसेच पारमार्थिक जीवनातील काही प्रसंगांचा निर्देश आलेला आहे. उदा.– कोटणीसमहाराजांचा अनुग्रह, व आशीर्वाद, रामानंद-महाराजांनी केलेले कौतुक, नागाप्पाण्णामहाराजांनी दिलेली प्रल्हाद ही संज्ञा, सिद्धानंदांचा अवतार, श्रीगुरुलिंगगीतेची प्राप्ति, सद्‌गुरुकृपेने प्राप्त झालेली स्थिति, इत्यादि.

खटावचे रामानंदमहाराज हे श्रीदासमहाराजांच्या बालपणीच्या हरिकीर्तनाचे कौतुक करीत. त्यांच्या सांगण्यावरून श्रीदासरामांनी 'साधनाचे अभंग' (४७) रचले. त्यांमध्ये साधनाची काही वैशिष्टये आली आहेत.

श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या कृपेने श्रीदासराममहाराजांना जे काही विशिष्ट अभंग स्फुरले ते प्रसादाचे अभंग (४८) होत. तात्यासाहेबमहाराजांच्या भविष्यवाणीप्रमाणे श्रीदासरामांचा कीर्तनारंभ झाला. कीर्तनाला उपयोगी पडतील अशी आख्याने (१८-२०) मग श्रीदासराममहाराजांनी रचली. या आख्यानांत रामदासस्वामींचे शिष्य कल्याण व संत चोखोबा यांच्या जीवनातील एक प्रसंग आणि तात्यासाहेबमहाराजांचा जन्म हे आख्यानविषय आहेत.

श्रीदासरामांचे प. पू. पिताजी श्रीमामामहाराज केळकर हे १९६२ मध्ये निर्वाणास गेले. त्यांना दासराममहाराज केवळ पिता नव्हे तर परमेश्वर मानीत. त्यांच्या विरहाने झालेली दासरामांची मनःस्थिति, तसेच मामामहाराजांचे गुणवर्णन, त्यांच्या जीवनातील काही महत्वपूर्ण घटना, त्यांचे चमत्कार, त्यांचे नित्याचे हरिकीर्तन, इत्यादि विविध गोष्टींचा तपशील प. पू. मामामहाराजांवरील अभंग–पदे (१७) यात आढळतो.

नुकतेच काही दिवसांपूर्वी श्रीदासराममहाराजांना बंगालमधील सुप्रसिद्ध संत श्रीरामकृष्ण परमहंस यांचे दर्शन झाले. याप्रसंगी श्रीदासरामांना स्फुरलेले अभंग संजीवनपाठात (३८) आहेत.

ज्ञानेश्वरमहाराज इत्यादि काही पूर्व संतांचे हरिपाठ आहेत. त्याप्रमाणे श्रीदासराममहाराजांचे हरिपाठ १ (५०) व हरिपाठ २ (५१) असे दोन

हरिपाठ आहेत. त्यांमध्ये तात्त्विक विषय असून, हरिकीर्तन व हरिनाम यांचे महत्त्व गाइलेले आहे. हेच विषय नारायणपाठात (६३) आहेत. 'शब्दापैल नामोच्चार। संती सुपंथ साचार' (१७६०.४) असून, 'केवल स्मरणी ब्रह्माचे दर्शन' होते (१७७०.३), असे आश्वासन नारायणपाठामध्ये आहे. हरीपाठ महात्म्य (३५) हे प्रकरण ज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठाचे महत्त्व सांगते. तर ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील प्रत्येक अभंगाचा भावार्थ अभंगांतच सांगणारा 'भावार्थ हरिपाठ' (५९) आहे.

श्रीदासरामांचा सदानंदपाठ (६०) हा 'वेदशास्त्रपुराणांचे। सार हृद्गद संतांचे' (१७०२.१–२) सांगतो. 'नाम परमार्थाचे गूज' (१६८३.२) असून, 'नामकळी परब्रह्म। ऐसा परमार्थ सुगम' (१६८१.३), असे आश्वासन सदानंदपाठात आहे. श्रुतिपाठात (४०) श्रुति म्हणजे वेद म्हणजे काय हें सांगून, त्यांतील अहं ब्रह्मास्मि, तत्त्वमसि या महावाक्यांचे स्पष्टीकरण आहे. आणि 'हरिनामसार वेदाचे अक्षर' (१२१८-१), असा निर्णय आहे.

जड जीव जीवन, चित्कळा जीवन, तेजाचे जीवन, इत्यादि शब्दांचा वापर करून जीवनाचे स्वरूप जीवनपाठात (६४) सांगितले आहे. तर चैतन्यपाठ (४४) चैतन्याचे विवेचन करतो. कैवल्यपाठात (५५) काही अनुभव वर्णन करून, चार देहांचा तपशील सांगून, मग 'सोळा बारा मिळणी विश्रांती सुखास। गाईले सुरस कैवल्य ते' (१५२६.१), असे म्हटलेले आहे. सिद्धपाठात (४२) संकीर्ण विषय आहेत. आणि निवृत्तिपाठात (३९) प्रवृत्ति आणि निवृत्ति यांचे विवेचन आहे.

आत्मसुधा (१२) शीर्षकाखालील अभंगांत 'पहाणे' या विशिष्ट संकल्पनेचा खुलासा झालेला आहे. या 'पहाणे' संकल्पनेशी चक्षूचा संबंध आहे. या चक्षूविषयी चक्षूपाठात (५८) पुढीलप्रमाणे सांगितले आहे: 'परेचिया पैल शद्वातीत चक्षू' (१६४१.१). तसेच 'चक्षूरूप आत्मा भरला सर्वाठायी' (१६११.१), म्हणून 'चक्षूमाजी करी चत्वार निरास। उरे निराभास रूप तेथे' (१६२१.३), असे म्हटले आहे. ही पहाण्याची संकल्पनाच पहाण्याचे अभंग (११) यांमध्ये विवेचिली गेली आहे. तेथे, 'पहाणे ते साक्षी' (५९३.२) असून 'पहाण्यात परब्रह्म' आहे (५८५.३). तसेच, 'अवघा पहाण्याचा विस्तार'

(६२६.३) असून, 'पहाता पहाणे ब्रह्मरूप होणे' (५९६.२), अशी स्थिति आहे. तर अलख निरंजन दर्शन (४६) हे प्रकरण लक्ष्य व अलक्ष्य यांचे स्वरूप समजावून सांगते

स्मरणपंचकात (३३) साधनाचे गुह्य सांगितलेले आहे. तर शरीरातील साधनाची कळा साधनपाठ (६१) सांगतो आणि 'प्राणापानामाजी मनाचे मीलन। परमार्थ पूर्ण तया ठाया' (१७०६-३) असे आश्वासन देतो. निरजंनपाठ (५७) हाही साधनविषयक व तात्त्विक विचार मांडणारा आहे; त्यावरून 'साधनाच्या यत्ने देही अनुभव' (१५६८-४) घ्यावयाचा आहे हे कळून येते. साक्षात्कार-पंचकात (२६) साक्षात्काराचे वर्णन दिलेले आहे.

सहजानंदलहरी ते स्वरूपलहरी (२७-३१) या पाच लहरीत तत्त्वज्ञान, साक्षात्कार, नामाचा आनंद इत्यादि विषय येऊन जातात. चिन्मयसिद्धांतदर्शनात (४५) अनेक तात्त्विक विषय आलेले आहेत.

नित्यपाठ (५३) आणि चिन्मयपाठ (५४) या दोन पाठांत संकीर्णपणे तात्त्विक विचार आलेले असून, नाममाहात्म्य व अनुभव यांचे वर्णन आहे. 'नीलवर्ण बिंदूमाजी आहे मोती' (१४७२-१) अशासारखे अनुभव हे गुरूपुत्र व गुरूपुत्री यांनाच येणारे आहेत. वायुलहरीचे (३२) सार पुढीलप्रमाणे सांगता येते:— चिद्वायुस्वरूप अशा सद्गुरूंनी सांगितलेल्या वायु—अधिष्ठित साधनाच्या साहाय्याने वाऱ्यात वारे मिसळून टाकणे म्हणजेच परमार्थ आहे.

दीनदयाळपाठ (३४) हा दीनदयाळू असणारा देव, त्याचे नाम आणि कीर्तन यांचा विचार करतो. तर देवाची स्तुति या संदर्भात स्तुतिपाठ (४०) आहे. 'आम्ही स्तुतिपाठ देवा गाऊ गीती। जेणे हा श्रीपती तुष्टे सदा' (१२२४-१), असे स्तुतिपाठात म्हटले आहे. देव (९) या शीर्षकाखाली असणाऱ्या अभंगांत गणेश, श्रीराम, विठ्ठल, दत्तात्रय, विष्णु, कृष्ण, महेश्वर, मारूति इत्यादि देवांचे गुणवर्णन आले आहे. आणि तीर्थांवरील (२०) अभंगांवरून कळून येते की पंढरपुर, काशी, अयोध्या, इत्यादि तीर्थे ही आपल्या देहातच आहेत आणि सामान्यपणे 'देव' या संकल्पनेबाबत पुढील विचार प्रगट झाले आहेत:— सामान्य लोक नेचर (२४) (natare) म्हणजे स्वभाव वा निसर्ग याचे गोडवे गातात व त्याला महत्त्व देतात. पण ईश्वराविना नेचर फुकट आहे तसेच हा

ईश्वर वा देव कोठे लांब नाही. 'देवं काही दूर नाही । आहे आपुल्याच देही' (५३१-३). या विश्वात 'देवसत्ता ओतप्रोत' (५१९-१) भरलेली आहे. ईश्वराच्या सत्तेनेच ब्रह्मांड चालते (५१३-१). देव हा समर्थ आहे (५१०-१). खरे म्हणजे सर्व काही देवच करीत असतो (देव करी सर्व काही । ५०४-१). आणि जीव हा केवळ निमित्तमात्र आहे (निमित्ताचा धणी जीव । ५०४-३). अशा देवाजवळ अथवा ईश्वररूप सद्गुरूजवळ केलेली मागणी अथवा प्रार्थना ही प्रार्थना / मागणे (६५) या शीर्षकाखालील अभंगांत आलेली आहे. उदा— 'दासराम बोलें सद्गुरू समर्था । साधन सर्वथा नित्य घडो' (१२१४-४). आणि देवाजवळ 'तुझे नामी चित्त रंगो सर्व काळ' (१८०६-३), अशी याचना केलेली आहे.

श्रीदासरासमहाराज हे चिमडसंप्रदायातले. चिमडसंप्रदायाचे मूळ आहे रेवणसिद्ध. ते लिंगायतधर्मातील पंचमहासिद्धांपैकी एक आहेत. या रेवणसिद्धांचे स्थान, त्यांच्या जीवनात घडलेले काही अद्भुत प्रसंग इत्यादींचे वर्णन रेवणसिद्ध-पाठात (६२) आहे. अनेकदा रेवणसिद्ध म्हणजे साक्षात् भगवान शंकर असे म्हटले जाते. म्हणून 'जगाचा नियंता सर्वाठायी सत्ता । विश्वाचा जनिता रेवण-सिद्ध' (१७३३.१), असे येथे म्हटले आहे. या रेवणसिद्धापासून सुरू झालेली चिमडसंप्रदायाची गुरूशिष्यपरंपरा पुढीलप्रमाणे आहे. रेवणसिद्ध, मरुळसिद्ध, काडसिद्ध, गुरुलिंगजंगम उर्फ निंबरगीकरमहाराज लक्ष्मीबाई अक्का, रघुनाथप्रिय साधुमहाराज, चिमडमहाराज आणि तात्यासाहेब कोटणीस महाराज. तसेच या संप्रदायात नागाप्पाण्णामहाराज, मामामहाराज केळकर, इत्यादि सत्पुरूष होऊन गेले. त्यांचे गुणवर्णन चिमडसंप्रदायावरील अभंग पदे (१५) यांमध्ये आहे तसेच प्रासंगिक (१६) या शीर्षकाखालीही चिमड येथे होणारा साधुमहाराजांचा रथोत्सव, तात्यासाहेबमहाराजांचा प्रगट दिन गुरुतृतीया इत्यादींची वर्णने येतात. तसेच चिमडसंप्रदायातील काडसिद्ध, निंबरगीकरमहाराज, साधुमहाराज, चिमड-महाराज, तात्यासाहेबमहाराज, व मामामहाराज या संतांनी जो बोध केला, तो सद्बोधदशक (४९) मध्ये संक्षेपाने दासरामांनी दिलेला आहे. त्यातील 'विश्व-बंधुत्व समता । आवडे रे भगवंता' (१३६८.१), हे वचन लक्षणीय आहे.

आपला संप्रदाय व त्यातील संत श्रीदासरामांना प्रिय असल्यास नवल नाही. पण महत्वाची गोष्ट अशी की अन्य संप्रदायातील साधूंबद्दलही त्यांना आदर आहे. संतच संतांना ओळखतात हे खरे. त्यामुळे दासराममहाराजांनी स्वसंप्रदायेतर पंथातील संतांचे गुणवर्णन केलेले 'संत' (१०) या शीर्षकाखाली सापडते.

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, सावता माळी, चोखा मेळा, वजीरबाबा, गोंदवलेकर महाराज, महादूबुवा, टेंबेस्वामी, शंकरमहाराज मिरीकर, कुंभारस्वामी, स्वरूपानंद, इत्यादि जुन्या नव्या संतांचा गौरव दासराममहाराजांनी केलेला आहे. तसेच, संतचरित्रपाठात (४३) तिरूप-न्नवर, राका कुंभार, जनाबाई, वेणुअक्का, मुक्ताबाई, अक्कलकोट स्वामी, निंबरगीकरमहाराज, इत्यादि प्राचीन अर्वाचीन संतांच्या जीवनातील ठळक प्रसंग दासरामांनी वर्णिले आहेत. खेरीज निर्याणाचे अभंग (६७) या शीर्षकाखाली येणाऱ्या अभंगांमध्ये शेगावचे गजाननमहाराज, बुधगावचे गुंडूबुवा, रमणमहर्षि, सांगलीचे पांडुरंगमहाराज ताम्हनकर, धुंडिराजशास्त्री विनोद, श्रीधरस्वामी, पुण्याचे योगिराज गुळवणीमहाराज, गोविंदमहाराज उपळेकर, नीलकंठमहाराज, इत्यादि संतांच्या निर्याणाच्या घटना श्रीदासराममहाराजांनी नोंदलेल्या आहेत.

संतसाधूंच्याबद्दल दासराममहाराजांची भूमिका सामान्यपणे पुढीलप्रमाणे आहे :– संत हे स्वतःच्या देहातच मोक्षरूप होऊन रहातात (५४०-३) ते अद्वैतात समरस झालेले असतात (५५३-१) जगाला संतांचा आधार आहे (५३३-१). किंबहुना 'संत ब्रह्म ते सगुण' (५३९-२) आहेत. साहजिकच अशा 'संतांची निंदा करू नये कधी' (५३३-७), हे आपण लक्षात घ्यावयास हवे खेरीज संतांबद्दल दासराम आणखी सांगतात :– आपल्याकडील दिवाळी, दसरा, गुढीपाडवा, रंगपंचमी, संक्रांत, इत्यादि सणांना विशिष्ट असा आध्यात्मिक अर्थ आहे. तो अर्थ फक्त संतसज्जनांनाच समजून येतो. संतच हे सण साधतात ( संती साधिले हे सण (९०५-५) तसेच, ज्याच्यामुळे माणसाला ज्ञान व प्रेरणा मिळते अशा चित्तत्त्वाचा शोध संतांनी घेतला, असे सांप्रदायबोधात (३६) दासराम सांगतात.

श्रीदासराममहाराजांचा चिमडसंप्रदाय हा तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अद्वैतवादी आहे. साहजिकच श्रीदासरामांच्या अभंगात आढळणारे तत्त्वज्ञान अद्वैतावर भर देणारे आहे आत्मा / परमात्मा /ब्रह्म /परब्रह्म हे एकच अंतिम सत्य सतत्त्व आहे, (सत्य साच खरे ब्रह्म । ६५-३). आत्मा हा अपरिच्छिन्न आहे (८०-२). ब्रह्म हे अविभाज्य (९६-१), पूर्ण, निर्विकल्प (९६-२), सनातन, निःशब्द (११७-६) आहे. सत्य ब्रह्मात विकृति होत नाही (७४-२). म्हणून 'निश्चळ निःशब्द वस्तू पूर्ण सत्य' (२७-५) आहे. 'आत्मवस्तू सत् चिद् घन' (१०१-१०) अशी आहे. अंतिम तत्त्व ब्रह्म हे निर्गुण आहे आणि 'निर्गुणापासोनी जहाले सगुण' (५०-३), तथापि 'तूप थिजले विघुरले' (२२-१) याप्रमाणेच सगुण–निर्गुणाची कथा आहे (तैसे सगुण निर्गुण ।२२-२).

माया म्हणजे अज्ञान आहे (१९३-८) माया ही चंचळ आहे (३२-३). निश्चळ ते ब्रह्म चंचळ ते माया (४२-१), असा प्रकार आहे. मायेमुळे उपाधि निर्माण होऊन जीव–शिव ही भाषा येते (३९-१).

सदानंद अशा ब्रह्मात येणाऱ्या चंचळ गुणाने विश्वाचा खेळ होतो (सदानंद-रूपी चिद्घन चंचळ। विश्वाचा हा खेळ केला तेणे ॥ (४१-२). माया ही चंचळ आहे चंचळ मायेमुळे जग निर्माण होते (चंचळेची जाले बहुत आकार। ४१-३). चंचळाच्या गुणाने विश्वाची रचना होते (४२-२). परंतु मायेमुळे आकारास आलेले हे विश्व सत्य नसून, ते परब्रह्मावरचा भास आहे (विश्व परब्रह्मी भास। माये आले आकारास ॥ ४१२-१). शिंपेवर जसा रूप्याचा भास होतो, तद्वत् ब्रह्मावर विश्वाचा भास होतो (शिंपेवरी जैसा रूपियाचा भास। ७२-१). त्याप्रमाणे 'ब्रह्मचो असोन भासतसे विश्व' (७२-३). म्हणून 'तत्त्वता पहाता ब्रह्मरूप सृष्टी' (६४-१) आहे कारण 'आदि ब्रह्म अंती ब्रह्म' (९८-३) असल्याने, सर्व विश्व ब्रह्मच आहे (९८-३) तसेच उपाधीत सापडलेला जीव हाही 'जीव तत्त्वता केशव' (६०-३) आहे सर्व जीव तत्त्वतः ब्रह्मरूप आहेत (आपण आहो ब्रह्म। ८२-२) किंबहुना 'जीव तो पहाता ब्रह्मरूप जाण' (१६०-३, ही वस्तुस्थिती आहे याखेरीज दासराममहाराजांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानात पुढील दोन गोष्टी लक्षणीय आहेत; (१) नाम तेची पूर्ण ब्रह्म (३८-३) आहे. आणि २ ब्रह्म पहाता माया माया पहाता ब्रह्म (३९-५), असा प्रकार आहे

तत्त्वतः जीव ब्रह्म आहे हे खरे. पण व्यवहारात तो अज्ञानाने स्वतःला कर्ता, भोक्ता, इत्यादि काहीतरी वेगळेच मानत असतो. त्याचे लक्ष आत्म्याकडे वळविण्यास त्याला साधनसिद्धि होऊन आत्मसाक्षात्कार होण्यास, त्याला कांही गोष्टी सांगणे आवश्यक ठरतो. उपदेश (७) या शीर्षकाखालील अभंगांत श्रीदासराममहाराज म्हणतातः– देह हा अचेतन आहे. देहावरील प्रेम हे पाप आहे तर आपल्या मूळ रूपावरील प्रेम हे पुण्य आहे (४०६-१-२) अहंकार अथवा गर्व हा सर्वत्र घातक आहे; म्हणून त्याचा त्याग व्हावयास हवा (४१८-२). आशापाश तोडावयास हवेत (३७३-४] परमार्थात श्रद्धा आवश्यक आहे (३६६-१). थोडक्यात 'निंद्य माईक टाकुनी द्यावे सकळ' (३६९-४) तसेच आपले चित्त बाहेर फाकणार नाही इकडे लक्ष द्यावयास हवे (४६२-१). म्हणून 'भटकू देऊ नका मना' (४३५-४), असे सांगितले आहे. आता परमार्थ करायचा झाल्यास; प्रथम संत सद्गुरूंना शरण जावे (४४४-३). संतांच्या संगतीत अंतर्मुख होऊन (४७३-४), 'सर्व काही देही शोधोनिया पाही' (४५६-३). एकाच गुरूवर निष्ठा ठेऊन (३८४-२), 'जाई सद्गुरूपथान' (३६८-४). मग गुरूंनी सांगितल्याप्रमाणे 'जना माजी वनी मनी आणि ध्यानी। चित्त नारायणी जडवावे' ॥ (३७२-ध्रु). अशा

प्रकारे 'जावे भक्तीचिया पंथे' (३९९-४). सद्गुरू शरीरातील नाम दाखवून देतात. तेव्हा शरीरात जेथे 'सोहं सोहं ध्वनी उमटे। तेथे लक्ष लाव नेटें' (३९४-१), असे दासराममहाराज सांगतात.

सद्गुरू साधकाला साक्षात्काराचे साधन (४) सांगतात. साधनाने पवनसिद्धी व्हावयास हवी. 'प्राणाचा मनाचा एक लय होता। तत्त्वे तत्त्व सारिता पवनसिद्धी' होते (२१३.१). आणि 'पवनसिद्धी झालिया प्रगटे आत्माराम' (२१३.२). पवनसिद्धी होण्यास 'प्राणावरी राहे ठेवोनिया दृष्टी' (२ ४ २) असे दासराम सांगतात. प्राणाचे साधन हे नामाचेच साधन आहे. म्हणून 'नामघोष जेथे देही लक्ष ठेवी तेथे' (२१६.१) आणि 'सूत्र धरोनिया करी नामजप। पुढे आपे आप देव दिसे' १९७ १) या संदर्भात श्रीदासराममहाराजांनी वापरलेले सूत्र प्राणगती, उलटी गती, ऊर्ध्वगती, मूळ वाचा, हरिवाणी, अबोलाचा बोल इत्यादी शब्दांचा अर्थ गुरूपुत्रालाच कळणारा आहे (दास म्हणे गुरुपुत्र हे जाणेल) (२१४.५)

आत्मानुभव येण्यास नाम हेच साधन आहे. नामदीपसारपाठ (५६) हा प्रामुख्याने नामाचे महत्त्व वर्णन करून सांगतो. 'अध्यात्माचे गुह्य सार। उच्चार हा नामाचा' (१५३२-२) असे नामदीपसारपाठ सांगतो. आणि 'साधन ते नाम साध्य तेही नाम' (१५६३-१), असा प्रकार आहे. कारण नाम हेच देव आहे. (नाम देव नाम देव। १५३७-१), या नामाबद्दलच्या (३) अन्य अभंगांत श्रीदासराममहाराज सांगतात :-

नाम हेच ब्रह्म आहे (नामची ब्रह्म। ४८९-५). ब्रह्म असणारे नाम निर्विकल्प आहे (निर्विकल्प नाम। तेची जाणा परब्रह्म।। १४५-७) 'एक नाम तत्त्व स्वतःसिद्ध परम। अविनाश ब्रह्म मूळरूप' (१८९-२). म्हणून 'नामाच्या साधने नाम पडे गाठी' (१८९-१). म्हणजे 'नामामाजी प्रगटे राम' (१४२-३), किंवा 'राम प्रगटे नाम गाता' (१५९-४) असे होते. अशा प्रकारे 'रामनामाचे गायन' 'हेची मोक्षाचे साधन' आहे (१२९-ध्रु). आत्मसाक्षात्कारास 'नामगान हे साधन' आहे (१०३-२२). नामातच आत्म्याचा अपरोक्ष अनुभव येतो (नामी अपरोक्ष अनुभव। २८८-२). अशाप्रकारे, 'नाम नेई मोक्षधामा' (१२८-३). किंबहुना 'नामी सर्व काही सोय' (१७०-३). म्हणूनच 'नामाचा महिमा अवर्णनीय जाणा' (१६९-३) तेव्हा जे नामामध्ये रमतात, त्यांना खरा परमार्थ प्राप्त होतो (नामी जे रमत। खरा परमार्थ साध्य तया।। ३५-५) हे नाम गतिरूप असून (गतिरूप नाम। १८६-५), ते, श्रोत्र वाणी चक्षू याचे पैल नाम' असे आहे (१७८-१). हे नाम सद्गुरू दाखवून देतात

नामसाधन साधल्यावर नाद व प्रकाशरूपाने परमात्म्याचे अनुभव येऊ लागतात. अनुभव (५) या शीर्षकाखालील अभंगांत नाना प्रकारचे अनुभव दासराममहाराजांनी सांगितले आहेत. लख् प्रकाशात नीळ बिंदु, विजांचा झगझगाट, नाना रंग, तारांची चकाकी (२२३), तेज पुंज लाली (२२९-३), तेजाचा बंबाळा वा तेजोमेरू (२३०-२ , नीलप्रभा (२३५-१), लल्लाटी अर्धमात्रा (२४०-६), महानाद (३१५-३), नादरूप राम (२८१-१), अपरंपार निळे तेज (२८४-३) इत्यादी अनुभव हे गुरूपुत्र वा गुरूपुत्री यांनाच येणार असे अनुभव आल्यावर, त्यांचा व्यवहारात दिसून येणारा परिणाम असा आहे:– साक्षात्कारी साधक सुखदु:खाच्या द्वंद्वांतून सुटतो (२६७-३) आणि आनंदाने संसारसागर तरून जातो (२६४-४) आणि अमर होऊन (२६७-३) अवर्णनीय आनंद प्राप्त करून घेतो ३११-३).

श्रीदासराममहाराज हे सुप्रसिद्ध अशा चिमडसंप्रदायातले संत आहेत. चिमडसंप्रदाय हा स्वरुप साक्षात्कारावर भर देणारा असून, तो गुरूसंप्रदाय आहे गुरुसंप्रदायात गुरूला वा सद्‌गुरूला अनन्यसाधारण स्थान आहे. हे महत्त्व श्रीदासरामांनी दोन गुरूपाठ (३७ लिहून सांगितले आहे. त्यांपैकी गुरूपाठ २ मध्ये भूमितीच्या संकल्पनाधारे गुरूची संकल्पना मांडलेली आहे आणि ती अत्यंत अभिनव आहे. गुरुपाठ १ मध्ये तसेच सद्‌गुरु (१) या शीर्षकाखालील अभंगात श्रीदासराममहाराजांनी परंपरेने दिलेले सद्‌गुरूचे महत्त्व सांगितले आहे ते असे:–

सद्‌गुरु हा जरी व्यवहारात देहधारी असला, तरी त्याचे खरे स्वरूप वेगळे आहे. ‘सद्‌गुरू देव’ आहे (५ १), ‘देवांचाही थोर देव’ आहे (५ १); ‘कर्ता धर्ता हर्ता नियंता सद्‌गुरू आहे’ (६ १) परमार्थाला गुरूची अत्यंत आवश्यकता आहे कारण ‘देव तो नाकळे गुरूविना’ (३ ३); गुरूकृपेविना रामपद मिळत नाही (९.२) गुरूकृपेनेच देव पहावयास मिळतो (१३.४) सद्‌गुरूशिवाय देवाचे दर्शन होऊ शकत नाही (७.३) जीवाचे ‘अज्ञान काढून गुरू ज्ञान देतो’ (१५.३–४) सद्‌गुरूशिवाय देवाकडे जाण्याचा मार्ग उमगत नाही (७ १ आत्मसाक्षात्काराची सोपी वाट गुरू दाखवितात (१२.४) शरीरात कंठाच्या वर देवाकडे जाण्याचा जो निरालंब मार्ग आहे तो गुरूकृपेने कळतो (२२१-४) देवदर्शन होण्याची ‘अनुपम हातोटी गुरूविना’ (१९-१). समजतच नाही आत्मदर्शनाचे साधन गुरूकृपेविना समजून येत नाही (७-२) देवदर्शन होण्यास उपयोगी पडणारा नाममंत्र गुरू सांगतात (२०-३). जे विशिष्ट नाम साधकाला ब्रह्मरूप करते, ते ‘रामकृष्णहरी नाम गुरूकृपेआ कले’ १०७.४) अशा प्रकारे ‘गुरूराजे कृपा केली’ (२०.१), आणि ‘आत्मरूप प्रगट केले’ (२०-४) असे घडते एवं, ‘गुरूकृपा झाल्या सोपे होय सर्व’ (१९.४) आणि ही सद्‌गुरूकृपा कशी साध्य होते याचे उत्तर आहे: सद्‌गुरूकृपेसी नामची कारण (१८०.४)

अशा प्रकारे श्रीदासराम गाथा या ग्रंथात नाना विषय आले आहेत. त्यांच्या मांडणीत पुढीलसारखी काही सुभाषितवजा वाक्येही दिसून येतात: देव लहरी श्रेष्ठ लहरी (८७२.१); नाही कोणाचा आधार। त्यासी नामची मूलाधार (८७४.१); देव नाही सोपा देव नाही सोपा (१३७०.८); दास म्हणे केल्या मनावरी मात। खरा परमार्थ दूर नसे (२७५.३), इत्यादि.

अशा प्रकारे साधक– मुमुक्षूंना मार्गदर्शक ठरणारी ही श्रीदासराम–गाथा सौ. श्यामला कृष्णाजी पटवर्धन यांनी प्रकाशित करून फार मोठे कार्य केले आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत.

प्रस्तुत ग्रंथाला प्रास्ताविक लिहिण्याचे काम मजवर सोपविण्यात आले होते. ते पार पाडताना, कालमर्यादा व पृष्ठमर्यादा लक्षात घेऊन, हे काम यथाशक्ति व यथामति संक्षिप्तपणे करण्याचा प्रयत्न केला आहे.

विश्रामबाग, सांगली — के. वा. आपटे

दि. १८-२-८८

## साधकोपयोगी ग्रंथ

१) हनुमद् गुरुचरित्रबोधसार
२) श्रीरामपाठ आवृती १-२
३) गोविंद कीर्तन गुणगान
४) श्रीगुरूतृतिया कथा
५) गोविंदचरितमानस
६) गोविंदस्मृती
७) श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराज यांची चिन्मय यशोगाथा
८) श्रीदासराम गौरव ग्रंथ
९) अमृतवाणी
१०) चिन्मय नित्यपाठ
११) निंबरगीकरमहाराज चरित्र
१२) मामामहाराज केळकर चरित्र
१३) चिमडमहाराज चरित्र
१४) महानिर्वाण
१५) अमृतकुंभ
१६) महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का चरित्र
१७) गीत-गोविंदायन
१८) अखंड कीर्तनानंद (मुद्रण चालू)



अखंड कीर्तनपरंपरा पितयाची चालविली
चिमडपीठाची कीर्तिध्वजाही गगनावरि नेली
वटवृक्षापरि भक्तांवरती धरी कृपासावली
धन्य श्यामला सद्गुरूचरणी रज होऊनि ठेली

– सौ. श्यामला कृष्णाजी पटवर्धन

# नमन

रेवणसिद्ध मरुळसिद्ध काडसिद्ध प्रभू शिवसदया ।
गुरुलिंगजंगम आक्का माऊली साधुराज रघुनाथप्रिया ।। धृ ।।

रामचंद्र प्रभू हनुमंत सद्गुरु नागाप्पाते नारायणया ।
रघुनाथ गोविंद गुरुजनाते कीर्तनकाळी मनी नमूया ।।१।।

बालराम हा मागे निरंतर कीर्तनी मती द्या गुण गाया ।
हीच विनंती संतसज्जना आशिर्वाद द्या दासाया ।।२।।

# सद्गुरु : १

१

गुरुचा पंखा असावा वरती। डंका गाजे त्रिजगती ॥१॥
गुरुकृपेचे असावे छत्र। श्रीराम हालवितो सूत्र ॥२॥
रामनामे रंगलिये वाणी । हीच लावण्याची खाणी ॥३॥
दास म्हणे नका धरू शंका । एक हलवा गुरुपंखा ॥४॥

२

गुरुचा चटका । हा प्रपंच अवघा लटका ॥१॥
ज्याला कळला गुरुचा चटका । तो म्हणे अवघा प्रपंच लटका ।
कशासि करिता मजा घटका घटका घटका । घ्या नामरसाचा घुटका ॥२॥
घेता नामाचा घुटका । होईल प्रपंचातून सुटका ।
८४ लक्ष योनि सुटका सुटका सुटका । हा दासाचा ऐका फटका ॥३॥

३

सद्गुरुराजाने मंथिला सागर । नामामृत थोर काढियेले ॥१॥
अमृतप्राशने मुक्त नोहे नर । न कळे भक्तिसार उगाउगी ॥२॥
नामामृत पाही गुरुविना नाकळे । देव तो नाकळे गुरुविना ॥३॥
सद्गुरुराजाने पाजिता नामामृत । देव भेटे सत्य साच खरा ॥४॥
गोविंदतनय सांगतो महिमा । जिव्हाळयाचा प्रेमा हृदयस्था ॥५॥

४

गुरुचे नाम घेता वाचे । कैवल्य मुक्ती तेथे नाचे ॥ध्रु॥
हेचि कडु का म्हणावे । तेचि तेथे गोड व्हावे ॥१॥
हेचि रामनाम घ्याया । दुधसाखरे पिआया ॥२॥
राम म्हणे बुद्धिबाई । राही सद्गुरुचे पाई ॥३॥

५

सद्‌गुरु देव सद्‌गुरु देव । देवांचाही थोर देव ॥१॥
तये ठाई काय उणे । सर्व जयांचे अधीन ॥२॥
त्यांची पाऊले धरावी । तेथे याचना करावी ॥३॥
सर्वाधार ऐसे संत । ज्यांचा झाला भगवंत ॥४॥
दास म्हणे जाता शरण । नर होय नारायण ॥५॥

६

सद्‌गुरु सद्‌गुरु गाता निरंतर । भेटे महेश्वर तयालागी ॥ध्रु॥
कर्ता धर्ता हर्ता नियंता सद्‌गुरु । जयाचे आधारु जग चाले ॥१॥
आत्मा तो रे पाही सकळ जीवांचा । महादि देवांचा असे प्राण ॥२॥
दास म्हणे थोर सद्‌गुरु पाऊले । तीही लोकी भले थोर संत ॥३॥

७

सद्‌गुरुवाचोनी उमजेना वाट । उगीच बोभाट का करावा ॥१॥
सद्‌गुरुवाचोनि कळेना साधन । उगीच का शीण करुनि घ्यावा ॥२॥
सद्‌गुरुवाचोनि नोहे ते दर्शन । का करावी जाण खटपट ॥३॥
दास म्हणे यासी एकचि उपाव । एक सद्‌गुरुराव आळवावा ॥४॥

८

सद्‌गुरुंचे स्थान किती रम्य जाण । प्रत्यक्ष भुवन वैकुंठचि ॥१॥
सद्‌गुरुंचे ते घर हे माझे माहेर । किती हो सुंदर काय वर्णूं ॥२॥
सद्‌गुरु हे माझे खरे मायबाप । हरविती ताप संसारीचे ॥३॥
सद्‌गुरुंचे तीर्थ हे माझे औषध । तोडी भवबंध महारोग ॥४॥
पवित्र ती गंगा सद्‌गुरु स्मरण । तयांचे दर्शने देव भेटे ॥५॥
सद्‌गुरुंचा वारा चुकवील फेरा । तयांचा अंगारा गोड करी ॥६॥
आम्ही गुरुनाथपंथी दास म्हणे । तयांचे स्मरणे काळ पळे ॥७॥

९

एक दिस मन लागेल हो जेव्हा । त्याग होईल तेव्हा संसाराचा ॥१॥
गुरुकृपेविना रामपद नाही । संग धरी पाही सद्गुरुंचा ॥२॥
गुरुकृपा झाली काय फळा आली । दास म्हणे बोली राम वाचा ॥३॥

१०

कशी मोहनी घातली गुरूनी । मज दावी देव नयनी ॥१॥
देही प्रगटले ज्ञान । दिसे परमात्मा प्रसन्न ॥२॥
करी नामाचा गजर । दासा दिधला सुखकर ॥३॥

११

गुरु माझा सखा गुरु माझा सखा । दुसरा सलोखा न करी मी ॥१॥
त्यासी पामर मी नोहे उतराई । नमस्कार पाही शतशः ॥२॥
दीन पामराचा केलासे उद्धार । त्याचे वारंवार स्मरी नाम ॥३॥
दास म्हणे थोर सद्गुरुपाऊले । मज सोडविले बंदीखानी ॥४॥

१२

फिरली गुरुकिल्ली । आता हो दुसरी नाही वल्ली ॥१॥
शास्त्र पुराण धर्म सज्जन । वेद कृष्ण बोली ॥२॥
सुलभ उत्तम सकळ सार । ते रामनाम बोली ॥३॥
गुरुने सोपी वाट दाविली । दासे आक्रमिली ॥४॥

१३

मोठे संत चित्रकार । देव दाविती साकार ॥१॥
मोठे होत चित्रकार । परी देव निराकार ॥२॥
शुद्ध बीजाचा आरसा । देव उमटतो कसा ॥३॥
दास म्हणे नाम गाई । गुरुकृपे देव पाही ॥४॥

## १४

गुरुनाथ ध्यान गुरुनाथ मन । गुरुनाथ स्मरण वैखरीचे ॥१॥
सर्व झाला माझा एक गुरुनाथ । सत्य हित नीत सद्गुरुनाथ ॥२॥
मार्गशीर्ष वद्य पंचमी शनिवार । बोधामृत सार गुरुनाथ ॥३॥
दासराम लोळे सद्गुरुचरणी । स्वयेचि भेटोनी अभय दिले ॥४॥

## १५

गुरुरायाचा रायाचा मी दास । त्याने रक्षावे रक्षावे आम्हास ।
मी तो हजर हजर सेवेस । त्यांचे उपकार काय बोलू वाणी ॥१॥
त्यांचे उपकार कधी न फिटती । किती अनंत केलिया हो भक्ती ।
परी ते नामाने संतुष्ट पै होती । त्यांचे उपकार काय बोलू वाणी ॥२॥
त्यानी मजला मार्गासी आणिले । परब्रह्म ते हाती आणूनी दिले ।
अज्ञानाचे हो मालिन्य धुतले । त्यांचे उपकार काय बोलू वाणी ॥३॥
त्यानी ज्ञान हे हृदयी जागृत केले । आपरुप ते मजला दाविले ।
गोविंदतनये चरण वंदिले । त्यांचे उपकार काय बोलू वाणी ॥४॥

## १६

आत्मबोध कैसा प्रत्ययासी आला । आम्हांवरी वोळला सद्गुरुराज ॥१॥
धन्य हनुमंत पांडुरंगसुत । जगामाजी मात केली ज्यांनी ॥२॥
हनुमंतकृपे वश झाला राम । होता जो दुर्गम ब्रह्मादिका ॥३॥
दासराम लीन गुरुचरणासी । प्रेमे आनंदेसी सर्वकाळ ॥४॥

## १७

गुरुनाम सर्वामाजी थोर पुण्य । संती धन्य धन्य म्हणितले ॥१॥
गुरुकृपा गुरुनाम उच्चारण । लाविले निशाण वैकुंठासी ॥२॥
साधुमहाराजांच्या दर्शनासी गेला । जगी मान्य झाला हरिभक्त ॥३॥
ऐसा गुरुपुत्र अद्वैती निमाला । गोविंदतनय झाला शरण त्यासी ॥४॥

## १८

श्रीगुरू माऊली सद्गुरु माऊली । जय जय गुरु माऊली गुरु माऊली ॥१॥
निर्वासिन मम करूनी टाकिसी । करिसी कृपा साऊली साऊली ॥२॥
हरिभक्तीने प्रेरित होऊनी । कीर्तन गुण गाउली गाउली ॥३॥
पान्हावली प्रभु प्रेमरसाते । पाहुनी मम तान्हुली तान्हुली ॥४॥
बहु अपराधा पोटी घेण्या । वायुगती धावली धावली ॥५॥
दासराम हे बाळ नमितसे । ठेवुनी शिर पाउली पाउली ॥६॥

## १९

अनुपम हातोटी गुरुविना कळेना । जरी झाले ज्ञाना साधनाच्या ॥१॥
अनुभव येई घडता साधन । साधन हे पुण्य थोर बहू ॥२॥
प्रक्रियेचे रूप उगाउगी न कळे । जव हा न गळे अहंभाव ॥३॥
गुरुकृपा झाल्या सोपे होय सर्व । दासरामा देव येई हाता ॥४॥

## २०

गुरुराजे कृपा केली । वृत्ती आनंदित झाली ॥१॥
खरे खोटे दाखविले । बरे डोळे उघडिले ॥२॥
नाममंत्र सांगितला । सोपा मार्ग दावियेला ॥३॥
आत्मरूप प्रगट केले । बोल अबोल सरले ॥४॥
दास स्वरूपी मिळाला । जगी होवोनी मोकळा ॥५॥

# तत्त्वज्ञान : २

## २१

केला चटका देहाचा । त्यात घुमारा नामाचा ।।१।।
शुद्ध सत्वाचा कापूस आणीला । सोहं-सुता पीळ दिला ।।२।।
जीव शिव पीळ बसला । एकाकाररूपी झाला ।।३।।
जीवशिवाची ऐक्यता । दास म्हणे मुक्त आता ।।४।।

## २२

तूप थिजले विघुरले । तया काय ते बोलिले ।।१।।
तैसे सगुण निर्गुण । व्यक्ताव्यक्त स्थिती जाण ।।२।।
सगुणा माजी या निर्गुण । सगुण गुरूरूप जाण ।।३।।
निर्गुण निर्विकार । संत देवाचे अवतार ।।४।।
जैसी जळीचे कमळ । तैसे संत हे केवळ ।।५।।
त्यांचा जन्म हे भूषण । कुळाग्रामा देशा जाण ।।६।।
दास म्हणे ऐसे संत । मूर्तिमंत भगवंत ।।७।।

## २३

गगनाचे होनी व्यापकू ते नाम । जेथे निजब्रह्म ठसावले ।।१।।
आदि परब्रह्म अंती परब्रह्म । आगम निगम मध्य स्थिती ।।२।।
निर्वासिन बुद्धी स्मरणाची सिद्धी । सहज समाधी संतजनी ।।३।।
दासराम तेथे घाली लोटांगण । सद्‌भावेसी पूर्ण गाय हाते ।।४।।

## २४

जागृती स्वप्न सुषुप्ती तुरिया । कारण ऐसीया जीव स्थिती ।।१।।
प्रकृतात्मसंगे परिणामी मन । स्थिती निरंजन चिद्‌गुणातु ।।२।।
जड सूक्ष्म दोनी मनाची मिळणी । तयाते ग्रासूनी नामी आलो ।।३।।
दासरामी सुखी आपणू आपण । जेथे जाणपण ज्ञानाज्ञाना ।।४।।

२५

आरसा दृष्टीचा करोनी आपणा । देखतो देखणा दृश्यघनू ॥१॥
चंचळ देखणे व्यापिला चिद्‌गुणे । लेईला हे लेणे आकारीचे ॥२॥
निश्चळी आकार नाही निराकार । निःशब्द प्रकार गुणातीत ॥३॥
दासराम जेव्हा वस्तुसी मिळाला । आकारू नासिला एकाएकी ॥४॥

२६

गगनाचा गाभा । तो हा विटेवरी उभा ॥१॥
चिदानंद घनू । सद्रूपाचे हे देखणू ॥२॥
दिपविले नभा । कैंची नवल हे प्रभा ॥३॥
दासराम देखे शोभा । निजत्वाची पसरे आभा ॥४॥

२७

आकार हा कैंचा वस्तूबरोबरी । नाशिवंत परी वस्तु झाके ॥१॥
चंचळे आकार आकारेचि गुण । चिद्‌गुणे हे भिन्न भाव दावी ॥२॥
भूल घाली मना उभवी वासना । वस्तू आकळेना निजत्वाची ॥३॥
निज ते अपार अपार ते निज । गुरुकृपा गूज गुरुभक्ता ॥४॥
निश्चळ निश्चळ निःशब्द वस्तू पूर्ण सत्य । नासिता हे द्वैत दासरामी ॥५॥

२८

आत्मा तो निवांत । चलित माया दावी द्वैत ॥१॥
आपणासी विसरता । बैसे चुकोनिया स्वता ॥२॥
दासरामी येरझार । चुकलिया सुख फार ॥३॥

२९

विरोधेचि झाला दृष्टीचा आभास । समता सर्वेश सर्वांघटी ॥१॥
चचळेची कैंचा विरोध अनेकू । सहाय्य ते एकू निश्चळेची ॥२॥
द्वैत तेचि भास अद्वय अविनाश । दासराम हरीस भजे सदा ॥३॥

३०

वेगू ठायी कैचे स्थिर ते अस्थिर । फिरे चराचर दृश्य घनू ॥१॥
स्थिर घनदाट पूर्ण सदानंद । व्यापिला गोविंद चिदाकाशी ॥२॥
निश्चळ निःशब्द आतु परमात्मा । देखे दासरामा याचि देही ॥३॥

३१

आपुलिया आपण भेटो रातंदिन । कोठे भगवान वेगळाला ॥१॥
विश्वाचिये भेटी आपुलिये दृष्टी । आत्मता त्रिपुटी उरली नाही ॥२॥
आपुलेची पूर्ण रुप नारायण । जेथे पहाणे हे आपणी आले ॥३॥
दासराम जेथे निजत्व लक्षिले । तेचि हाती आले निःशब्दातु ॥४॥

३२

निराकारू तेचि जहाले आकारू । निर्गुण व्यवहारू सगुणी आले ॥१॥
सगुण निर्गुण शब्दे जाले दोन । परी ते अभिन्न निःशब्दातु ॥२॥
चंचळू ते माया व्यवहारू ते कर्म । द्वैताचे जे वर्म अनामीया ॥३॥
कर्म ओखंडोनि द्वैती निज पहाता । दासराम स्वता भोगी सुखे ॥४॥

३३

कोऱ्यावरी काळे लिहिले अक्षर । अर्थ कोटी थोर भरली ज्यात ॥१॥
पुराण पुरुष सांगतो पुराण । चुके जन्ममरण ऐकताची ॥२॥
अक्षरात साठविला परमार्थ । वाचिता यथार्थ मुक्त दास ॥३॥

३४

हकार विज्ञानी सकारे करावा । समत्वे भरावा दोहीकडे ॥१॥
भकारी विरावी जनेंद्रियवृत्ती । भजन बोलती याचीलागी ॥२॥
एकचि अक्षर एकत्व भजन । अखंड स्मरण भगवंतो ॥३॥
तेथे देव उभा तीन चरणावरी । दास अहोरात्र वदी त्यासी ॥४॥

३५

चिदचिदग्रंथी विराम पावती । तये ठायी भक्ती उपजो लागे ॥१॥
भक्ती प्रेमभाव अखंडित धारा । चरणाविण थारा नाही दूजा ॥२॥
अखंडित धारा अमृतवाहिनी । जियेवीण प्राणी जगेचिना ॥३॥
भृंगी सेवे ऐसे बहू गोड अमृत । सद्‌गुरुंची मात भक्त जाणे ॥४॥
दासराम म्हणे नामी जे रमत । खरा परमार्थ साध्य तया ॥५॥

३६

समकृती साधावया ते कठीण । प्रकृतीत पूर्ण ज्ञान देखे ॥१॥
उपाधीचा लय होता सम नाम । देखे परब्रह्म निज अंगे ॥२॥
विटेवरी देखे समचरण दृष्टी । हृदयसंपुष्टी शुद्ध भावे ॥३॥
सद्‌गुरू हनुमंतराय कृपा मात । दासरामा समर्थ पाठीराखे ॥४॥

३७

जन्म मरणाचे पैल । एक आत्मा घननीळ ॥१॥
जन्म मरण देखे देही । तरीच होशील विदेही ॥२॥
नरक स्वर्ग ओलांडूनी । राहो सकळाते गिळोनी ॥३॥
धारणा हे कंठस्थानी । साधावी हे उत्तमकरणी ॥४॥
देहामाजी अनासक्त । दासराम म्हणे संत ॥५॥

३८

आहे नाही लटिके दोनी । सारिखे जे असुनी नसुनी ॥१॥
परमात्मा तो निःशब्द । शब्दाशब्दी जीव बद्ध ॥२॥
शब्दाशब्दातीत नाम । नाम तेची पूर्ण ब्रह्म ॥३॥
आहे नाही ते दवडोनी । दासराम निरंजनी ॥४॥

३९

मायेचे उदरी ब्रह्म ते जन्मले । जीव शिव नाम पावले वो ॥१॥
माया सेवी ब्रह्म ब्रह्म सेवी माया । कैची रंग छाया श्रीरंगाची ॥२॥
चाले लपंडाव सापडेना कोणी । अंधाच्या नयनी उजेड जाला ॥३॥
लपे ते प्रगट प्रगट ते लपे । संतांचिया कृपे अढळ होय ॥४॥
ब्रह्म पहाता माया माया पहाता ब्रह्म । कोण दासराम वेगळाला ॥५॥

४०

एक होते परी जहाले वो दोन । अभिन्न ते भिन्न दिसो आले ॥१॥
कैसी हे माया ब्रह्म दावी लिलया । वाचेपैल काया भाव कोठे ॥२॥
मायेमुळे आले ब्रह्मा ब्रह्मपण । सगुणे निर्गुण प्रगट केले ॥३॥
ब्रह्माची हे माता धन्य आदिशक्ती । ब्रह्मासी विश्रांती आपुलेपणी ॥४॥
दासराम प्रार्थी माय आदिशक्ती । जिने ब्रह्मज्योती प्रगट केली ॥५॥

४१

स्वसुख चाखाया श्रीहरी अनंत । जाला देव भक्त होवोनिया ॥१॥
सदानंदरुपी चिद्‌गुण चंचळ । विश्वाचा हा खेळ केला तेणे ॥२॥
चंचळेची जाले बहुत आकार । गुणांचे प्रकार शक्ती होय ॥३॥
शक्तीठायी ब्रम्ह ओतिले अचळ । देखे घननीळ आपणू आपणा ॥४॥
आपणा देखता सुखावले सुख । नवल कौतुक दासरामी ॥५॥

४२

निश्चळ ते ब्रह्म चंचळ ते माया । जाईजे विलया पूर्ण ब्रह्मी ॥१॥
ब्रह्मा ब्रह्मपण दाविले शक्तीने । चंचळाचे गुणे विश्व रचिले ॥२॥
शक्तीसी भोगुनी ब्रह्म ब्रह्मचारी । आले तिचे उदरी विमलपणे ॥३॥
चंचळेची हरिस्वरूपी उदय । परी केला जय ब्रह्मावरी ॥४॥
ब्रह्माचे स्वरूप ब्रह्मासी दाविले । लक्ष्य भेटविले अलक्ष्यासी ॥५॥
लक्ष्य ते चंचळ अलक्ष्य ते ब्रह्म । तेथे दासराम शून्यरूप ॥६॥

## ४३

शून्याचे शेवटी बिंब ते अव्यक्त । जहाले जे व्यक्त चंचळगुणे ॥१॥
चिद्‌गुणेची जाले लक्ष्य ते अपार । बहुत आकार बहुगुणी ॥२॥
निश्चळ पहाणे निश्चळीच धाले । समरस जाले निश्चळ ब्रह्म ॥३॥
सगुण आकार शक्तीचेनी देव । अनेक लाघव मौजे करी ॥४॥
निःशब्द अभेद पूर्ण स्वतःसिद्ध । नाम ते आनंद दासरामी ॥५॥

## ४४

शक्ती भेटवीते निजासी हे निज । दर्शनाचे गूज दावीतसे ॥१॥
ब्रह्म ते दावोनी ब्रह्मरूप होते । वाच्य ते सरते चत्वारीचे ॥२॥
शक्ती ते वेगळी नोहे बा आणिक । दावी आत्मसुख दुजे पहाणे ॥३॥
अलक्ष्य लक्षोनी निजत्व दर्शन । ब्रह्म शक्ती पूर्ण ब्रह्मरूप ॥४॥
अद्वय जे सिद्धी सहज समाधी । निरंजनपदी व्यक्ताव्यक्त ॥५॥
हनुमंतकृपा गूज हे लाधले । दासरामे धरिले चरणनिके ॥६॥

## ४५

हरी हा फुकाचा सद्‌गुरू फुकाचा । भक्त हा फुकाचा भावयुक्त ॥१॥
आकार फुकाचा निराकार फुकाचा । सगुणी फुकाचा निर्गुण देव ॥२॥
दासराम लटिका साच तो फुकाचा । बाप समर्थांचा कृपायुक्त ॥३॥

## ४६

आहे ते खोटे नाही ते मोठे । ऐसे उफराटे संताघरी ॥१॥
नाही तेची झाले आहे ते लपाले । अखंड व्यापोले नाहीपणे ॥२॥
नाही नाही दोनी गेलिया छेदोनी । घनू निरंजनी परमात्मा ॥३॥
दासरामी अवघा नामीच आनंद । श्रीहरी गोविंद वासुदेव ॥४॥

## ४७

तीनीने बांधिले हो चारी बाजूनी । जहाली करणी विश्वाची ॥१॥
तीनीने प्रगट झाला विश्वभाव । पैल बडा देव निरंजन ॥२॥
शून्यासी हो जेथे नाही ठावोठाव । शुद्ध अनुभव संताचित्ती ॥३॥
शून्याचिया गाठीवरी शून्य भेदन । दासराम शरण केशापरी ॥४॥

४८

शून्याचा हा खेळ विश्वाचा पसारा । अनुभव सारा शून्यामाजी ।।१।।
दृश्यादृश्य सृष्टी दृष्टीमाजी दोनी । मूळ निरंजनी पहाणे पे ।।२।।
पहाणे देखणे ठाव शून्यपणे । कैचे शून्याविणे चराचर ।।३।।
संत निर्विकार झाले शून्यापैल । दासरामा बोल त्यांचे पायी ।।४।।

४९

मीपणे तुजसी पहाताची ये ना । पहाता उरेना अहंकृती ।।१।।
नामात आपणा पहावे आपण । स्मरणातु स्मरण प्रगट होय ।।२।।
अखंड स्मरण शब्दाने कळेना । पैल ज्ञानाज्ञाना होता कळे ।।३।।
दासराम स्वामी कैसा हा चतुर । फिरे चराचर शून्यामाजी ।।४।।

५०

अढळ स्मरण शब्द गतिमान । शून्य हे सगुण शब्दरूप ।।१।।
शब्द हा चंचळ शब्द हा चंचळ । तयात निश्चळ काय आहे ।।२।।
निर्गुणापासोनी जहाले सगुण । सगुणी त्रिगुण संभवले । ३।।
शब्द हा सारिखा असोनी नसोनी । सगुणो निर्गुणी हरी एक ।।४।।
हरिरूप भक्त नामी अनुरक्त । तेथे विनटत दासराम ।।५।।

५१

शब्द कैचा उठे अशब्दाचे ठायी । त्याचे मूळ पाही स्मरण ते ।।१।।
शब्दाशब्द देखे प्रकृती ब्रह्माची । लीला भगवंताची चिंतनीय ।।२।।
शून्यापासोनिया शून्याचा विस्तार । द्वैताद्वैत पार लागेचिना ।।३।।
वैष्णवांचा धर्म रामनामगान । संताचे भूषण हरिकथा ।।४।।
देवदरबारी हरीचे कीर्तन । हरिभक्ता मान दासरामा ।।५।।

५२

दृष्टीमाजी वाहे प्रवाह शब्दांचा । पुढे ओघ कैचा भेद मूल ।।१।।
दृष्टी आत स्वरूप हाताने सारिले । नव्हे ते निराळे अभेदची ।।२।।
अर्थहीन प्रकृती अर्थरूप आत्मा । निःशब्द तो नामा ठायी देखे ।।३।।
नाम अर्थरूप तेथेची निःशब्द । तये ठायी शब्द अक्षर पुढे ।।४।।
आथिले नाथिले नाही ऐसे झाले । दासरामा भले ब्रह्मरूप ।।५।।

## ५३

दावी रूप नाम ऐसा देखे भ्रम । याचे मूळ काम पाचाठायी ॥१॥
पाचाठायी वाहे आगमनिगम । विस्मरण नाम अनामिया ॥२॥
काही नसताची मांडिलासे खेळ । धन्य बुद्धीबळ ईश्वराचे ॥३॥
स्मरणी झाला काम संकल्प तो शुद्ध । तेथेची अगाध रचना झाली ॥४॥
संकल्प ते शून्य शून्याचा विस्तार । विकल्प अनिवार शून्यरूप ॥५॥
विकल्प टाकोनी संकल्प ग्रासिता । दासरामा हाता स्मरण देव ॥६॥

## ५४

निःशब्द अशब्द शब्दांचे मिश्रण । तेथेची चैतन्य उदय झाला ॥१॥
सगुण निर्गुण प्रगट रूप होवोनी । स्वरूप झाकोनी ठेवियेले ॥२॥
मायेसवे रंग करी नानापरी । जाणिले चतुरी भक्तजनी ॥३॥
मायाब्रह्म दोनी पहाता तटस्थ । नवल ते येथ कैसे झाले ॥४॥
शून्यामाजी शून्य मिळाल्या सत्वर । शून्याचा विस्तार पुढे झाला ॥५॥
दासरामा आता आनंद मावेना । करिता शोधना मूळरूपा ॥६॥

## ५५

शब्द गतिमान सोडेना ठिकाण । पुनः परतोन मुळीच येई ॥१॥
ऐसी हे लहरी जेथोनी निघाली । पुनः कोठे आली पहा वेगी ॥२॥
हेतु अर्थ–शून्य तोचि झाला शब्द । वेग तो अगाध वर्णवेना ॥३॥
संत जे जडले श्रीहरिचरणी । दासराम स्मरणी संताचिया ॥४॥

## ५६

शब्दामाजी साठला वायू । चंचळगुणे करी कार्यू ॥१॥
शब्दामाजी शक्ती बहूत । त्याचे सामर्थ्य अव्यक्त ॥२॥
प्राणधारणा ते झाली । चित्ता विश्रांती साऊली ॥३॥
गती विगती तये ठायी । दासराम स्थिर होई ॥४॥

## ५७

मन ते जाणावे पंचभूत अंश । शून्याचा विशेष पसारा हा ॥१॥
गतिरूप वायू वहातो अंबरी । चंचळत्व भारी काय वानू ॥२॥
शब्दरूप जीव चंचळ स्वभाव । आकाशाचा भाव अभेद जो ॥३॥
अर्थरूप शिव जाणिजे अदृश्य । ब्रह्मयाचा अंश बिंदुमात्र ॥४॥
निःशब्दातु नामब्रह्म ते गहन । दासरामा स्मरण अविनाश ॥५॥

## ५८

आल्हादचक्र स्थानी उठती नानारंग । परी ते भासांग प्रकृतीचे ॥१॥
महामाया आदी नारी नीलवर्ण । रंग हे तेथून प्रगट झाले ॥२॥
डोळियाचे खेळ चंचळत्व अंग । कारण श्रीरंग नाना रंगा ॥३॥
साधकासी रंग देताती आनंद । पैल ब्रह्मानंद शून्याचिया ॥४॥
दासराम स्वामी लुटे नामरंग । मायेसी श्रीरंग रंगवितो ॥५॥

## ५९

अहं निरहं दोनी । तरंग हे निरंजनी ॥१॥
अवघाची नारायण । तेथे कैचे दुजेपण ॥२॥
कर्ता धर्ता भोक्ता हर्ता । हरि कारण सर्वथा ॥३॥
संती समाधान । दिले दान मोक्षाचे ॥४॥
नामी परब्रह्म । मौनावला दासराम ॥५॥

## ६०

शब्दब्रह्म प्रगट करी नारायण । अक्षरी निधान निजानंद ॥१॥
दृश्यातु सद्रूप अदृश्यी चिद्रूप । निरंजन दीप शून्यामाजी ॥२॥
धन्य गुरूनाम अनिर्वाच्य ब्रह्म । महिमा परम सगुण बोले ॥३॥
भूमीचे वाचोनी बीजाची पेरणी । केली सद्‌गुरुनी दासरामी ॥४॥

## ६१

संगमातु श्वासोच्छवास । गुरुनामी हा सर्वेश ॥१॥
सद्‌गुरुंची नवलकळा । जाणे गुरुपुत्र विरळा ॥२॥
कर्म अखंड अखंड । देवा देवाची आवड ॥३॥
दासरामा नामी मौन । तदाकारे समाधान ॥४॥

६२

पाण्यावरील शेवाळ । आकाशीचे अभ्रपटल ॥१॥
आरशावरील काजळ । शुभ्रावरी जैसा मळ ॥२॥
ऐसे ब्रह्मी आहे जग । ऐसे गुरुराज सांगे ॥३॥

६३

ब्रह्मावरी झाली माया । मायेमाजी पडली छाया ॥१॥
उपाधीत जे पातले । त्यासी जीव बोलिले ॥२॥
जीव तत्त्वता केशव । माये धरिले क्षुद्रत्व ॥३॥
माया आहे स्वप्न । गुरुराज सांगे खूण ॥४॥

६४

तत्त्वता पहाता ब्रह्मरुप सृष्टी । मायाभासे दृष्टी विभागली ॥१॥
जरी जीव राहे यातोनी अलिप्त । तरी होय प्राप्त आत्मरूप ॥२॥
द्वैतात गुंतता दुःखची पदरी । केलिया चाकरी शरीराची ॥३॥
गुरुराज माझा सकळासी सांगे । अनुभव अंगे पहा पहा ॥४॥

६५

ऐसे कैसे हे विश्वसार । थांबे नसता सूत्रधार ॥१॥
सगळेची मातीमोल । आत नसता ब्रह्मगोळ ॥२॥
त्याचे सत्ते गरगरा फिरे । सत्य साच ब्रह्म खरे ॥३॥
गुरुराज म्हणे जरा । आत घेई या विचारा ॥४॥

६६

कार्य मोहे कर्त्याविण । ही तो जाणा उत्तम खूण ॥१॥
हे तो नाशिवंत स्वप्न । आत्मा याचे अधिष्ठान ॥२॥
तोचि सर्व भूती । नाचवी धरोनिया हाती ॥३॥
त्याचेवीण काही न चले । मग हे विश्व कैसे झाले ॥४॥
गुरुराज म्हणे ज्ञान । घालविते हे अज्ञान ॥५॥

६७

जरी काय भाव उडे । तरी काया कोलमडे ॥१॥
असत्याची एक खूण । तेणे योगे होय शीण ॥२॥
तेथे भरले अज्ञान । ते तो मातीमोल जाण ॥३॥
गुरुराज म्हणे । येथे गुंतती शहाणे ॥४॥

६८

आपण असोनी ब्रह्मांश । म्हणे दावा हृषीकेश ॥१॥
मागे पुढे भरला देव । नाही तोच आणी आव ॥२॥
देवावीण काही नाही । ऐशी वेद देती ग्वाही ॥३॥
राम भरला जगभर । काय रडते शरीर ॥४॥
गुरुराज म्हणे प्राण्या । बांधू नको खोट्या नाण्या ॥५॥

६९

परमेश्वर कळो येई त्याचे सत्ते । कोण चालविते जगालागी ॥१ ॥
जग ते असार चालक ईश्वर । जग निरीश्वर नोहे नोहे ॥२॥
ऐसे कैसे होय आपोआप विश्व । काहीच सत्यत्व नाही तया ॥३॥
गुरुराज म्हणे अनुभव घ्यावा । आत्मा तो पहावा जीव नृप ॥४॥

७०

विश्व हे असार । त्यासी आहे आकार ॥१॥
हे तो घडले यदृच्छेने । सर्व निर्मिले मायेने ॥२॥
इच्छा केली आत्मरूपे । सूत्रे चालिले अपापे ॥३॥
गुरूराज म्हणे । सर्व निर्मियेले तेणे ॥४॥

७१

आकाशातून कधी काय खाली पडले पोर । उगे हे अपार झाले म्हणती ॥१॥
लोकमतावरी नाही खरे खोटे । ज्याचे मोल मोठे ते न कमी ॥२॥
गुरुराज म्हणे असोनीया हीण । तया मोठेपण नोहे नोहे ॥३॥

७२

शिंपेवरी जैसा रूपियाचा भास । रज्जू आपणास सर्प भासे ॥१॥
वृक्षची असोन चोर भासमान । व्हावा परी जाण येथे आहे ॥२॥
ब्रह्माची असोन भासतसे विश्व । ब्रह्माचे सत्यत्व गुप्त झाले ॥३॥
गुरूराज म्हणे सत्यासी जो जाणे । त्याचे धन्य जिणे जगामाजी ॥४॥

७३

स्वप्न जैसे वाटे खरे । परी ते असत्यची सारे ॥१॥
तयेपरी येथे आहे । दृश्य खरे वाटताहे ॥२॥
धन्य धन्य आत्मरूप । तेची सत्याचे स्वरूप ॥३॥
गुरूराज म्हणे । सत्य राम नाम जाणे ॥४॥

७४

सत्यावरी जे का भासाची विकृती । तयासी म्हणती जन्म बापा ॥१॥
असत्यात होते केव्हाहि विकृती । सत्यात विकृती नाही नाही ॥२॥
सत्यनित्य जेथे आहे नाशिवंत । कैचा आदी अंत जावे तेथे ॥३॥
गुरुराज म्हणे सकळ जनासी । नाहीच सत्यासी जन्ममरण ॥४॥

७५

सत्यावरी होय भास । तयालागी आहे नाश ॥१॥
तया म्हणती असत्य । जे का विकृत नाशिवंत ॥२॥
तेची जाणावे नश्वर । जयालागी षड्‌विकार ॥३॥
असत्यासी जन्ममरण । बोले गुरुराज जाण ॥४॥

७६

सधनासी दरिद्रपण । कधी संभवेल जाण ॥१॥
सत्य करिता याचना । सदानंद रूपी जाणा ॥२॥
सत्य तुम्हासी पोशिते । तेची चालवी विश्वाते ॥३॥
तृप्तपणी कै पोषण । गुरूराज सांगे खूण ॥४॥

७७

जीवाजवळी असोनी सुख । वेडा जीव मागे भीक ॥१॥
जीव अंतरी वळेना । आत्मरूपी प्रवेशेना ॥२॥
गुरूराज म्हणे । मुक्त होता धन्य जिणे ॥३॥

७८

मी तू पण भास । करती जडजीवांचा नाश ॥१॥
मी तू पण बेडी । द्वंद्व प्राण्यासी जखडी ॥२॥
कोणासीच नाही थारा । अवघा लटक्याचा पसारा ॥३॥
गुरूराज म्हणे । येथे गुंतती शहाणे ॥४॥

७९

पहा ब्रह्म हे रोकडे । अनुभवे उलगडे ॥१॥
सर्व झाले ब्रह्म । तेथे कैचे उरले कर्म ॥२॥
तेथे एकची अभेद । गुरूराज म्हणे आनंद ॥३॥

८०

नामरूप भिन्न । परी आत्मा तो अभिन्न ॥१॥
आत्मा अपरिछिन्न । परी रूप परिछिन्न ॥२॥
गुरुराज सांगे खूण । ऐसे आहे तत्वज्ञान ॥३॥

८१

म्हणताती विश्व सार । ते तो खोटेची असार ॥१॥
ऐकताना वाटेल बरे । करी जन्माचे खोबरे ॥२॥
पदार्थ व शक्ती । पृथकत्वे ये प्रचीती ॥३॥
हे तो दोनी भिन्न । पाहो जाता कळे जाण ॥४॥
शक्ती हालवी पदार्था । कळेल पहाता पहाता ॥५॥
देही दिसे भिन्न । जाणावा तो सत्य प्राण ॥६॥
तैसे जगी आहे भिन्न ।एक परब्रह्म जाण ॥७॥
कैसे जहाले अपरंपार । नसता सत्याचा आधार ॥८॥
गुरुराज सांगे खूण । अनुभवे व्हावे पूर्ण ॥९॥

८२

पहावे आपण कोण । नीट विचार करुन ॥१॥
आपण आहो ब्रह्म । प्रकृतीसी आहे कर्म ॥२॥
तरी का जीवे बद्ध व्हावे । त्रिगुणात गोवुनी घ्यावे ॥३॥
याला मायाची कारण । गुरुराज सांगे खूण ॥४॥

८३

देहाचिये मध्ये भरले चैतन्य । ओतप्रोत जाण जगी आहे ॥१॥
तयाठाई करी मानवा तू प्रेम । जाळोनिया कर्म बहुत हे ॥२॥
निमित्तासी प्राणी नाचवितो पाहे । निराळाची राहे आपण गा ॥३॥
तेची मुक्त रूप मूळ आत्मरुप । दिसे आपेआप गुरूकृपे ॥४॥
गोविंदतनय म्हणे तया ठाई । प्रेम करूनी राहे तरीच बरे ॥५॥

८४

सोहंसूत्र बीज मूळ । त्यात ब्रह्म ते अढळ ॥१॥
ते जाणावे केवळ ब्रह्म । जेथे नुरे समविषम ॥२॥
तेथे नाही येणे जाणे । नुरे जाणणे नेणणे ॥३॥
निर्विकल्प नाम साधी । पावे सहज समाधी ॥४॥
दासराम संतापायी । हेची मागे नित्य देही ॥५॥

८५

ब्रह्माचा तो भास असे बिंबाकार । बिंबाचे ते सार परब्रह्म ॥१॥
भासरूपामाजी सत्य तेज उजळे । गुरूकृपाबळे सत्य देखे ॥२॥
प्रतिबिंब देखोनी देखिजे निजांग । बोलियेले योग ज्ञानेश्वर ॥३॥
उफराटी कळा गुरुकृपे जाणिजे । तरीच लाहिजे मोक्षपद ॥४॥
तुरयीचे अंतरी नीलबिंब गाभा । लावण्याची शोभा पांडुरंग ॥५॥
चार देह शून्य सांडोनिया पैल । गुरूकृपे बोल ओळखावे ॥६॥
आत्म्याची प्रचीती शास्त्राची प्रचीती । सद्‌गुरू प्रचीती एक देखे ॥७॥
दासराम मागे श्रीसद्‌गुरूप्रती । आत्म्याची प्रचीती दावा वेगी ॥८॥

८६

ह्कार उद्भव धारणेत होता । भ्रांती पडे चित्ता जाणीवेची ॥१॥
शीर्षस्थानी वामभागी अनुताप । गतीसी संताप होत असे ॥२॥
ह्कार निवृत्ती त्रिगुण आटणी । नामगतो भरणी होता साधे ॥३॥
गणेशकृपेने मन लाधे शांती । दासराम प्रार्थी हेसी त्याची ॥४॥

८७

अचिदातू जीव । शून्यरूप ज्याचा भाव ॥१॥
कैचा चैतन्यातू उजळे । नवलावे खेळ खेळे ॥२॥
जया झाली भ्रांती । तया द्वैताची प्रचीती ॥३॥
द्वयाते सारोनी । दासराम निरंजनी ॥४॥

८८

चिदाचिद हे चंचळ । द्वैत भ्रांतीचे पडळ ॥१॥
आत्मकळा दावी दोनी । पूर्णपणे निरंजनी ॥२॥
शब्दाचा अनुभव । शब्दरूप त्याचा ठाव ॥३॥
निःशब्दातू आत्मज्योती । दासरामी कैची भ्रांती ॥४॥

८९

स्वये निर्मियेले द्वैत । सुख सेवाया निभ्रांत ॥१॥
कासयासी कष्टी व्हावे । आप आपणा मिळावे ॥२॥
दावी द्वैत हे अद्वैत । कासयासी व्हावे भ्रांत ॥३॥
निजतत्वाची जाल्या भेटी । दासरामी सुख सृष्टी ॥४॥

९०

मुळी शून्यरूप ठाव । तेथे स्फुरली नेणीव ॥१॥
प्रगट जाणीव । दावी तेची नवलाव ॥२॥
स्मरणे जीव शिव । खेळे द्वैताद्वैत भाव ॥३॥
दासरामी देव । नवल करी संतराव ॥४॥

## ९१

निःशब्दी या शून्य । जेथे जाले नेणपण ॥१॥
पुढे प्रगट जाणीव । वाढे संकल्प स्वभाव ॥२॥
विस्तरे विकल्प । निर्मियेले पुण्यपाप ॥३॥
अवघाची शब्द । तेणे केला सारा भेद ॥४॥
संकल्पाचा स्वामी । जगदीश दासरामी ॥५॥

## ९२

प्रत्यक्ष प्रमाण । आत्मा आत्मया निधान ॥१॥
जाण नेणपण । जया नाही वो ठिकाण ॥२॥
शून्याते ग्रासून । भरला आपणू आपण ॥३॥
नाही आधिक उणे । दासरामा हे देखणे ॥४॥

## ९३

अशब्द हा सिंधू । तेथे लहरी पैरा शब्दू ॥१॥
तया कारण ते शून्य । जे का चिद्‌गुणे गगन ॥२॥
शब्दाशब्द दृश्यादृश्य । शून्य दावी तो जगदीश ॥३॥
शब्दातीत ते निःशब्द । दासरामी घनानंद ॥४॥

## ९४

गुणतत्त्वांचा जो द्रष्टा । सुभट चोखटू चोहटा ॥१॥
शब्दातीत साक्षिपण । तयाआतू निरंजन ॥२॥
म्हणोनिया ते निःशब्द । नामरूप जे अभेद ॥३॥
बोध बोधिती सद्‌गुरु । दासराम परिसे स्थिरू ॥४॥

## ९५

जाले चिद्‌गुणे अचिद । घडे भेद संयोगे ॥१॥
निजस्मरणे अभेद गाठी । घनू भेटी पूर्णत्वे ॥२॥
घनू प्रगटे नामब्रह्म । कर्माकर्म जाळोनी ॥३॥
उरले तत्त्व जे सद्रूप । नुरे विकल्प दासरामी ॥४॥

९६

ब्रह्म ते अविभाज्य । भाज्य रूप द्वैत काज ॥१॥
भागले ते शद्वरूप । ब्रह्म पूर्ण निर्विकल्प ॥२॥
मूलतत्व ते समष्टी । अविकृत सत्य सृष्टी ॥३॥
मरण प्रकृती । तेथे जीवित विकृती ॥४॥
ते हे भाग दोनी । बोलवेना निरंजनी ॥५॥
दासरामी नाम । सर्व घटी आत्माराम ॥६॥

९७

सुख दुःखासी कारण । चिद्रूपात्मक विकृत जीवन ॥१॥
सहज रूपी सहजानंद । जेथे नुरे भेदाभेद ॥२॥
पूर्ण नामी नामा नाम । रूपारूप नुरला भ्रम ॥३॥
दासरामी अवघा हरी । स्मरणमात्रे कृपा करी ॥४॥

९८

विकृती ही पहाता नाही । परी ती दिसे चंचळ ठायी ॥१॥
चंचळ हे निश्चळातू । स्थिर होये पा निवांतू ॥२॥
आदी ब्रह्म अंती ब्रह्म । म्हणोनिया सर्व ब्रह्म ॥३॥
अवघाची आत्माराम । मौनावला दासराम ॥४॥

९९

पंच तत्त्वे निश्चळ झाली । जरी एकत्वी मिळाली ॥१॥
तरी विकृती घडेना । चिद्‌गुणेची पालट गुणा ॥२॥
संत दाविती सद्वस्तू । तेथे जडती ते सद्भक्तू ॥३॥
दासराम शरण गेला । हरीनामी या मिळाला ॥४॥

१००

जीवनातू जीव । कार्यकारणाचा भाव ॥१॥
अंतर्यामि स्थिती । बाहच धर्मे पालटती ॥२॥
ऐसे जाणावे जीवन । चिद्‌गुणाचे हे लक्षण ॥३॥
जीव शून्य तत्त्वी पूर्ण । विकासला शून्यातून ॥४॥
दावी चिद्‌गुण हा जीव । परमात्म्याचा शून्य भाव ॥५॥
पूर्ण जीवन परमात्मा । दासराम कै जीवात्मा ॥६॥

## १०१

विकास पूर्ण विकृतीचे । पूर्णत्व जे अचिदाचे ॥१॥
शद्वरूप ते प्रकृती । शद्वरूप अनुभूती ॥२॥
चिद्‌गुणत्वे अविकृत । चिदांश जो अपरिणत ॥३॥
तेची स्वरूप अचिदाचे । सूक्ष्म रुप जे शद्वाचे ॥४॥
विकासिली षड्‌ विकृती । अचिद्‌ शून्य अविकृती ॥५॥
जीव शिव द्रष्टे दोनी । पहाणे पे निरंजनी ॥६॥
शद्व बिंदू दोनी एक । चिदाकार वायू देख ॥७॥
वायू कैचा झाला सर्व । शद्वापैल आत्मठाव ॥८॥
शद्व म्हणुनी काही नाही । विश्व जाला अंतर्बाही ॥९॥
आत्मवस्तू सत्‌ चिद्‌ घन । दासरामी हरी संपूर्ण ॥१०॥

## १०२

आकार विकार । पालट चिद्धर्मी निर्धार ॥१॥
तेची पहाली प्रकृती । वायोतीत शद्वस्थिती ॥२॥
घनानंद चिद्‌गगन । शद्वे ग्रासिला चिद्‌गुण ॥३॥
चिद्‌गुणेची चंचळपणे । त्याला आकारीचे लेणे ॥४॥
शद्व पूर्ण घनू निःशद्व । चिदाकाशी भेदाभेद ॥५॥
भेदाभेद भेद दोनी । पहाता नसती निरंजनी ॥६॥
दासरामी सार । राम नारायण विचार ॥७॥

## १०३

शब्दगुणे गगन । दावी सगुण निर्गुण ॥१॥
जेथे जाले पहाणे । आकारीचे हे देखणे ॥२॥
न दाविजे नादा । ताल सूर रस छंदा ॥३॥
न करिता छेडन । तंतुवाद्य नादहीन ॥४॥
तैशी झाली परी । नाद न घडे ऐशा लहरी ॥५॥
पुढे वायूचा प्रकार । स्वर तार मंद्र घोर ॥६॥
महा-वायु लहरी उठे । तेथे महानाद प्रगटे ॥७॥
रामनाम जेथुनी वाणी । स्वरगती मिळवी मौनी ॥८॥
तेज नाद प्रकाशलहरी । निर्धारी या आधारी ॥९॥
मन वायूचे पूरक । जीविताचे जे चालक ॥१०॥
तेथे अनुकंपे सूर । नाद वायूचा उच्चार ॥११॥

उच्छवास हा अंतरी दाटे । प्राणापान हृदयी भेटे ॥१२॥
उचलोनी फासळी । वाढे अवकाश पोकळी ॥१३॥
आधारीची गती नेटे । दशमद्वारी नेटुनी दाटे ॥१४॥
कंठगत मार्गे । आज्ञाचक्री जाई वेगे ॥१५॥
घनु ठायी आटुनी नाद । चढे वसता केवल शब्द ॥१६॥
जावोनिया सहस्त्रदळी । पुनः परते नाभिकमळी ॥१७॥
शब्दामाजी शब्द मिळता । सहज पावे निश्चळता ॥१८॥
अधोगामी ऊर्ध्वगामी । शब्द आधारी विरामी ॥१९॥
तरी तो होतसे अशब्द । शून्याठायी सारूनी भेद ॥२०॥
महाशून्य गाठी । आतू निःशब्दाची मिठी ॥२१॥
अध ऊर्ध्व गतीमान । नामगान हे साधन ॥२२॥
रामकृष्ण हरी । दासराम गर्जे गजरी ॥२३॥

## १०४

एकाकालीच श्रीहरी संगे । चेतविली बहुतांची अंगे ॥१॥
नानागुणी जो म्हणुनी निर्गुण । सूत्रधार जो निश्चळ आपण ॥२॥
होऊनी नरनारी नटधारी । आपुली आपणू क्रीडा करी ॥३॥
चंचळी पहाता घन ते निश्चळ । दासरामी हा सद्गुरु घननीळ ॥४॥

## १०५

निश्चळी वर्तुळ चंचळ रेषा । पहाणे माया बहुगुण वेषा ॥१॥
विचार करिता मिळे सकळही । निज ते मिसळे अनादि पुरुषा ॥२॥
सातत्याने वाटे सत्यची । प्रकृतिहस्तक नाचवी आशा ॥३॥
द्वंद नाडळे ओखट म्हणुनी । आपुली आपण भोगवू मनीषा ॥४॥
निश्चळ वृत्ती निर्विकल्पता । हाची हरीचा निर्गुण आरिसा ॥५॥
गुरुकृपेचा हस्त मस्तकी । दासराम हा तोची दशदिशा ॥६॥

## १०६

राम कृष्ण हरी । श्रवणी नाम गाजे गजरी ॥१॥
राम द्रष्टा कृष्ण पहाणे । हरी विश्व गिळुनी रहाणे ॥२॥
हरी विश्व दावी प्रगट । भरे आकारी घनदाट ॥३॥
सुखावला सुखे । दासराम नाम घोके ॥४॥

१०७

राम निज कृष्ण शून्य । हरी शून्य शून्याचे ॥१॥
रामकृष्ण हरी नाम । सोपे सुगम फुकाचे ॥२॥
त्रिभुवना जे आगळे । दृश्यादृश्याही निराळे ॥३॥
गुरुकृपे जे आकळे । दासरामी या प्रेमळे ॥४॥

१०८

नसे तेची दिसो येते । खरे दावी वोखट ते ॥१॥
निश्चळची चंचळ झाले । घनू ठायी भासविले ॥२॥
अदृश्य ते दृश्या आले । ब्रह्मी दृश्य मावळले ॥३॥
दासरामी झाले मौन । तेथे तया समाधान ॥४॥

१०९

चिद्गुणी या मन । विचारेची ओळखण ॥१॥
अनुभवा जे भासवी । खूण बोलोची नेदावी ॥२॥
शून्याठायी चंचळ भास । आत्मा आकारिला दृश्य ॥३॥
घनू भेद हा देखणे । तेंची मन जाले पहाणे ॥४॥
आत्मरूपी शून्य मीलन । तेथे जहाले गगन ॥५॥
गगन आकारू देखणे । विरळपणे जाले लेणे ॥६॥
मन गिळुनी उन्मनी परता । दासराम तो हा स्वता ॥७॥

११०

लक्ष्य दावीते अलक्ष्य । आप आपणासी साक्ष ॥१॥
आकारिला बहुतापरी । निराकारू तो श्रीहरी ॥२॥
नाना भासवी जो गुण । चिदाकाशी जो निर्गुण ॥३॥
जेथे जाले चंचळ दृश्य । दासरामी निश्चळ पुरुष ॥४॥

## १११

बोलता चालता अवघाची देव । सत्य सर्व देव रामराजा ॥१॥
तयाचिये सत्ते सर्व निर्मियेले । सुसूत्र चालिले विश्वसार ॥२॥
उपाधीमाझारी प्रतीत जे झाले । जीव ते बोलिले रामरूप ॥३॥
विसरोनी रामा मीपणे गुंतले । दुःखात शिरले वाउगेची ॥४॥
गुरुकृपे ज्यांचा मीपणा निघाला । राम त्या बाणला दास म्हणे ॥५॥

## ११२

सर्व काही देव करी । परी तो झाकीला निर्धारी ॥१॥
मायेआड लपला देव । विसरला त्यासी जीव ॥२॥
याचे कारण अज्ञान । कवटाळिला अभिमान ॥३॥
दास म्हणे अभिमान । दुर्जनाहोनी दुर्जन ॥४॥

## ११३

जड पावे लय द्रवरूपी सहज । द्रवरूपी सहज स्थिर होय ॥१॥
रूप स्पर्शत्वात होतसे विलीन । शद्बामाजी जाण स्पर्श नुरे ॥२॥
निःशद्बाचे शद्बी शद्बगुण विरे । ऐक्य होय बा रे जिवात्म्याचे ॥३॥
जीवात्मा ऐक्यता होता सुखासुख । होतसे निःशंक दास म्हणे ॥४॥

## ११४

एकापासुनी झाले दोन । दोनीपासुनी झाले तीन ॥१॥
तीनीपासुनी जाहले चार । पुढे पाचाचा विस्तार ॥२॥
पाचापासोनी पंचवीस । सहापासोनी छत्तीस ॥३॥
पाचामाजी राहे शून्य । तया उंच नीच स्थान ॥४॥
एकामाजी शून्य मिळता । दासा झाली सार्थकता ॥५॥

## ११५

हरीने संसार मांडिला लटिका । परी झाला निका जडजीवा ॥१॥
लटक लागता कळेल लटिका । जरी होय सखा आत्माराम ॥२॥
भाव शुद्ध होता देव तो हृदयी । निवारली काही भ्रांती जरी ॥३॥
स्वरुपाचे सुख अखंड खंडेना । दुःखी असताना कळे दासा ॥४॥

## ११६

अवघा तूची गा श्रीहरी । तुझी कथा तूची करी ॥१॥
अहंकारे निरहंकारे । तूची नटलासी बडिवारे ॥२॥
जेवी उदकी तरंग । सिंधू नेणे तो अभंग ॥३॥
जाणोनी निवांत । दासराम पायी संथ ॥४॥

## ११७

निवांत बुद्धीचा विषयो श्रीहरी । दृष्टी शून्यविवरी पाहिजेसू ॥१॥
रामकृष्णभाव जीवाची ओवरी । महाशून्य पारी दशमद्वारी ॥२॥
द्विशून्य आटणी रामकृष्ण दोनी । बिंदुरुप झणी महाशून्य ॥३॥
समत्व धारणा आतू आत्मवाणी । शिवरूप वाणी बोलती त्या ॥४॥
तयात पीताग्नीपैल पूर्णानंद । हरी आत्मा गोविंद आत्मगाभा ॥५॥
दासरामी पहाता ब्रह्म सनातन । पूर्ण निरंजन निःशब्द ते ॥६॥

## ११८

परमात्मा निश्चळ पहाता सर्वांघटी । निःशद्बाची सारी अनुभूती ॥१॥
तेथे हरीरूप आनंद अद्वैत । निःशद्बाचा हेत पारखी या ॥२॥
पीत प्रकाशाची ओतियेली प्रभा । चैतन्याचा गाभा गतिमान ॥३॥
दासरामा बोध बोधिती सद्गुरु । हरिनामी अंतरु स्थिरावला ॥४॥

## ११९

पीताचे पासोनी श्वेत श्याम झाले । तीनी जे आटले अद्वैत ते ॥१॥
जीव शिव दोनी अद्वैती लहरी । मूळ पहाता हरी घनू ठायी ॥२॥
श्वेत श्याम आभा पसरली प्रभा । बुद्धीपैल गाभा जीवात्मा तो ॥३॥
चिदाभास साटी चिदाकाश सृष्टी । दासरामी सृष्टी चिद्घनाची ॥४॥

## १२०

असिपद तेची ब्रह्मविद्या मूर्ती । गण गुणपती गजानन ॥१॥
तेची सतरावी जीवनाची कळा । नेई सहस्त्रदळावरी भक्ता ॥२॥
असिपदामुळे प्राणाचे स्पंदन । होय गजस्थान आहे जेथे ॥३॥
प्राणाची चित्कळा तेची गुरुरुप । महाराणा अधिप वैकुंठीचा ॥४॥

गुणाचिय पैल निर्गुणाची खाण । साक्षात्कार पूर्ण स्वरुपाचा ।।५।।
जगड्व्याळ जेथे पावे लयोत्पत्ती । बिंदुल्यात होती घडामोडी ।।६।।
गजानन प्रभू हनुमंत सद्गुरु । प्रसन्न साचारु जया होती ।।७।।
दासराम म्हणे तोची गुरूचा बेटा । जाणेल चोरवटा राजमार्ग ।।८।।

## १२१

अग्निचिये पोटी शून्याचिये सृष्टी । शून्याचे शेवटी ठावो नाही ।।१।।
अग्निचिया दिठी हरी अद्वयात्मा । न दावी जे समा विषमा ते ।।२।।
पीताचे पासोनी श्वेत श्याम झाले । तीनी जे आटले तेची ब्रह्म ।।३।।
रामकृष्णी निर्गुण शून्यरुप वारा । महाशून्य पैरा श्वेताआतू ।।४।।
दासरामी नाम पूर्ण परमात्मा । आगमनिगमा लाही झाली ।।५।।

## १२२

निश्चळी चंचळ ते हे अंतराळ । आत्मा घननीळ गगनू झाला ।।१।।
आकाश वायूची पडली जै गाठी । आत्मा हृदयपुटी सामावला ।।२।।
निश्चळी चंचळ विरलियावरी । उपाधी हे तरी दुरावली ।।३।।
चंचळाचे गुणे उपाधी विस्तार । नाही येरझार हरिठायी ।।४।।
पवने गगन दाविले निराळे । निश्चळी उरले नाही गगन ।।५।।
म्हणोनी पवना गगना नाही भेटी । ऐक्यता त्रिपुटी उरली नाही ।।६।।
सहजबोधासी बोधिती सद्गुरु । दासराम अंतरु शरण झाला ।।७।।

## १२३

एक होते तेथे जाण दोन आले । संलग्न जहाले शून्यालागी ।।१।।
शून्यत्वे पहाले शून्ये शून्यालागी । शून्य ते सर्वांगी होऊनी ठेले ।।२।।
शून्याआड लपले एकपणे एक । वाढला निःशंक भ्रम सारा ।।३।।
शून्याचे परता पंगू होऊनी जाई । तरी होय काही लाभ तुज ।।४।।
दासराम सांगे अध्यात्माची मात । फोल ठरे प्रचीत नसता सारे ।।५।।

## १२४

अकारापासोनी आकाश उद्भव । अक्षराचा ठाव चंचळ भास ॥१॥
अकार ते शून्य दृश्या दृश्यपैल । तयातू तेजाळ ब्रह्मरूप ॥२॥
मकारी अक्षर नादाचा प्रकार । तेथोनी विस्तार ब्रह्मांडांचा ॥३॥
बाल भागवत दासराम नामी । देखतसे ऊर्मी चंचळाच्या ॥४॥



# नाम : ३

## १२५

जो का वदे एक रामनाम पाही । विष तया होई अमृतची ।।१।।
शस्त्राने तुटेना अग्नीने जळेना । काळाने हारेना साधक तो ।।२।।
सागरी बुडता तरेल हा थोर । अशक्य ते सार शक्य होय ।।३।।
नाम घेता पाही वाईट चांगले । दास म्हणे भले तेचि संत ।।४।।

## १२६

कलियुगी नामधर्म । जाणी सर्वात उत्तम ।।ध्रु।।
वेद शास्त्र नी पुराण । धर्म वदताती सज्जन ।।१।।
देवे बोलीचे परम । हितगुज सार नाम ।।२।।
दास म्हणे बंधमुक्त । नाम धर्म करी सत्य ।।३।।

## १२७

चतुर्थ अक्षरी जप ज्याचा न बोले ही वाचा ।
फुकट जाईल बा रे मनुजा नरदेह त्याचा ।।ध्रु।।
अबोलणे ते हे बोलावे
पांगुळ्याने चालावे
बहिऱ्याने ते ऐकावे
आंधळ्याने ते पहावे ।।१।।
इतुके कष्ट सोशिले जेव्हा राम पद तेव्हा ।
अखंड नाम गाता गाता मुक्त दास तेव्हा ।।२।।

## १२८

राम वदावा । हा भवसागर तरावा ।।ध्रु।।
रामनामाशी तुळणा । कलीमाजी नाही जाणा ।
हेचि कारक महान् पुण्या । मनी आळवावा ।।१।।

रामनाम ही अक्षरे । सर्व जगामाजी थोर ।
महान पापे हारवी सार । मनी स्मरावा ॥२॥
दास म्हणे नाममहिमा । जाणितो सज्जन शंकर उमा ।
नाम नेई मोक्षधामा । राम पहावा ॥३॥

## १२९

रामनामाचे गायन । हेचि मोक्षाचे साधन ॥ध्रु॥
नरदेह मुक्तिद्वार । येथे भेटे रघुवीर ॥१॥
धरु नको दंभ मान । करी अखंड साधन ॥२॥
दास म्हणे नाम गावे । देह-सार्थक करावे ॥३॥

## १३०

ज्याची चांग असे दृष्टी । तया चांग दिसे सृष्टी ॥१॥
ज्याची दृष्टी न चंचळ । तेथूनी काळ काढी पळ ॥२॥
अहो दृष्टी निर्विकार । तेथे कैचा तो विकार ॥३॥
दृष्टी चांग होण्या जाण । मन करावे सुमन ॥४॥
मन चांग होण्या जाण । दास म्हणे नाम खूण ॥५॥

## १३१

अहो जैसा का कृपण । अंतरी साठवितो धन ॥१॥
देह तिजोरी सुरेख । त्यात वय अमोलिक ॥२॥
ऐसे वय देई नामी । मग होसी तू निकामी ॥३॥
ऐसे नाम साठविता । होय देह-सार्थकता ॥४॥
येथे होसी तू कृपण । मग होसी जगी धन्य ॥५॥
नाम उपयोगी शेवटी । धन जैसे कृपणासाठी ॥६॥
नामी कृपण जो जहाला । दास म्हणे तोचि भला ॥७॥

## १३२

रामनाम तारू जो नर घेईल । जगी तो तरेल तरेलचि ॥१॥
रात्रंदिस मन वेखे गुरुपदी । काळाची उपाधी मग नाही ॥२॥
रामनाम घेई धन्य तो संसारी । काळ आज्ञाधारी दास म्हणे ॥३॥

## १३३

भक्ताचे पालन देवाचे भूषण । नाम हेचि जाण देवापुढे ॥१॥
भाव जो जो देई तो तो मुक्त होई । म्हणूनिया गाई हरिनाम ॥२॥
देवासी आवडे पान भाजीपाला । म्हणोनि तो घाला या देवासी ॥३॥
भाव हाचि जाण सर्वांचा पुढारी । दास म्हणे पंढरी जाई वेळा ॥४॥

## १३४

बारे नाम – रसातचि गुंग ॥ध्रु॥
न अभिमाने रघुपती स्मरणे । होईच मायाभंग ॥१॥
केशव हरी चिन्मय मूर्ती । पंढरीनाथ की दंग ॥२॥
भाव आवडे देवाला । दास लुटी हा रंग ॥३॥

## १३५

सद्गुरुराय ते सुखाचे निधान । म्हणोनिया गान मनी धरा ॥१॥
रामनाम गाता हरपली चिंता । म्हणोनिया आता तेचि धरा ॥२॥
संसाराचे वर्म एक रामनाम । जाल निजधाम दास म्हणे ॥३॥

## १३६

अघटित माया परमेश्वरी । त्याला ध्यावा निरंतरी ॥१॥
अखंड नाम हे माळिकाक्षरी । सद्गुरु आज्ञा निरंतरी ॥२॥
मोहक माया तू पैजारी । अवघड तरणे भवसागरी ॥३॥
राम दिसे दशमद्वारी । राम भजे निरंतरी ॥४॥

## १३७

फळे रसाळ नामाची । चोखील त्याचे कल्याणचि ॥१॥
अशाश्वत आहे जग । शाश्वत आहे साधुसंग ॥२॥
ज्यांची रसाळ झाली वाणी । देव दिसे चहू कोनी ॥३॥
राम म्हणे नामफळ । गुरुभक्ता तळमळ ॥४॥

## १३८

संत संतोषती जीवा । ऐशी काही करी सेवा ॥१॥
रामनाम खरी सेवा । संत संतोषती जीवा ॥२॥
अतिशय नको काही । मुखी रामनाम घेई ॥३॥
अतिशय सर्वा ठाई । नामी अतिशय नाही ॥४॥
नामी जो का अनुभवी । दास म्हणे थोर पदवी ॥५॥

## १३९

नमन गुरुवरा करीतसे । ब्रह्मादिक झाले पिसे ॥१॥
ब्रह्मादिकाना दुर्लभ । रामनामे हो सुलभ ॥२॥
हाडे न हाडे झिजविली । भेटेना ही गुरुमाऊली ॥३॥
नामे भेटे ही माऊली । दासा कृपेची साउली ॥४॥

## १४०

सलिलाचिये वेगळी । कैशी राहील मासोळी ॥१॥
बाहुलीचिये वेगळी । कैशी जाईल साऊली ॥२॥
सूर्यापासोनि वेगळी । न च होय किरण चाली ॥३॥
तैसे आत्म्यावाचोनिया । जीव न राहे, सखया ॥४॥
आत्मयाचे सुखे सुखी । जीव होतसे पारखी ॥५॥
भक्त होऊनी गाता नाम । आत्म्यालागी उपजे प्रेम ॥६॥
दासालागी एक नाम । करीतसे पूर्ण काम ॥७॥

## १४१

साखर गोडी नाही भिन्न । परी जाणावी अभिन्न ॥१॥
पाणी आणि पातळपण । दाविताचि नये दोन ॥२॥
सूर्य आणि त्याचे तेज । करिताची नये दूजे ॥३॥
तैसा शिव आणि जीव । एकरुप नान्य भाव ॥४॥
परी विस्मरण-योग । करी जाण पा वियोग ॥५॥
टाकी तोडुनी अज्ञान । पाही एक आत्मखूण ॥६॥
शिवरुपची आहेसी । नामी ब्रह्म तन्मय होसी ॥७॥
दास म्हणे नाम । करी संतोष परम ॥८॥

## १४२

वैराग्यावाचोनि । मिळेचिना प्रेमवाणी ॥१॥
वैराग्यात प्रगटे प्रेम । प्रेमामाजी उपजे नाम ॥२॥
प्रेमयुक्त नाम । नामामाजी प्रगटे राम ॥३॥
म्हणवोनि नाम स्मरा । राम म्हणे भव तरा ॥४॥

## १४३

सारासार विचार क (ध) रोनिया पाही । रामनाम काही गाता बरे ॥१॥
रामनाम गाता मग नाही चिंता । भवबाधा व्यथा नष्ट होय ॥२॥
रामनाम गाता खरे समाधान । कृपेचे अंजन दास म्हणे ॥३॥

## १४४

आम्ही जाणत हरीचे नाम । नामी देखू आत्माराम ॥१॥
नामी नाम नामे ऐकू । नादब्रह्म पाहु विवेकु ॥२॥
नामी लय पावे अनाम । नाममात्र होय सम ॥३॥
समदृष्टी दिव्य दृष्टी । देखू प्रगट जगजेठी ॥४॥
दासा अंतरी प्रकाश । वाव नाही जाणीवेस ॥५॥

## १४५

नाम देऊनी मारिली हाक । तेणे झाले बहू सुख ॥१॥
सर्व शद्ब मावळले । मौनवाचे नाम बोले ॥२॥
ओ ओ ऐसे देव वदला । एक शद्बची उरला ॥३॥
तेथे लागलीसे तंद्री । मुद्रा अलक्ष्य अगोचरी ॥४॥
तोही शद्ब मावळला । अवघा महाध्वनी झाला ॥५॥
जीवभाव दचकला । अवघा प्रेतरूप झाला ॥६॥
निर्विकल्प नाम । तेचि जाणा परब्रह्म ॥७॥
दासा तेथे भेटी झाली । स्वयंज्योत प्रगटली ॥८॥

## १४६

दृश्य ते चंचळ दृष्टी ते चंचळ । मन ते चंचळ चांचल्याने ॥१॥
कैसेनी पहाणे होईल निश्चळ । द्रष्टा हा निश्चळ कासयाने ॥२॥
हरिनामजपे साधते सकळ । ब्रह्म घननीळ निश्चळ दृष्टी ॥३॥
डोळिया फाडोनी नामजप साधिला । दासराम धाला नामब्रह्मी ॥४॥

## १४७

नामामाजी राम नामाचा महिमा । वानी विष्णू ब्रह्मा महादेव ॥१॥
नाम उच्चारण थोर महापुण्य । करवेना गणन चित्रगुप्ता ॥२॥
नामाचे स्मरण संत कृपादान । अनुग्रहे पूर्ण चोजविती ॥३॥
नाठविता चित्ता देती आठवण । सद्गुरू स्मरण साधकासी ॥४॥
द्वैताद्वैत कुसरी हरिस्मरण हरी । संतांची हे परी जाणती संत ॥५॥
सहज स्मरण सर्वा आदि कारण । करवी दर्शन भगवंताचे ॥६॥
सिद्ध जे स्मरण तेची ब्रह्म पूर्ण । अखंड दर्शन अखंडत्वे ॥७॥
ऐसे सिद्ध सद्गुरु दासरामा लाधले । स्मरण दाविले स्मरणाचे ॥८॥

## १४८

करणीत देव प्रगटे । जरी का मुखी नाम घोटे ॥१॥
नामी जडता बुद्धी । जळतील आधिव्याधी ॥२॥
तरीच होय चित्तशुद्धी । लागे सहज समाधी ॥३॥
गुरुराज म्हणे मुखी । नाम घेता चुके गिरकी ॥४॥

## १४९

नाम थोर हे साधन । येणे चुके जन्ममरण ॥१॥
येणे अभिमान उडे । विठ्ठलपद भक्ता जोडे ॥२॥
गुरुराज म्हणे नाम । नामामाजी डोले ब्रह्म ॥३॥

## १५०

रामरूप जगी नटले । पहाता तयासीच कळे ॥१॥
डोळे मिटोनी केवी दिसे । न लगता रामपिसे ॥२॥
गुरुराजे दावियेले । तरीच अज्ञानासी कळे ॥३॥
गुरुराज म्हणे नाम । घेता दिसे सर्व राम ॥४॥

१५१

सत्य हे खंबीर । त्यासी नलगे आधार ॥१॥
लटपटीत जे असार । तेचि आहे बा अपार ॥२॥
तया लागतो आधार । सत्य साच परमेश्वर ॥३॥
गुरुराज बोले । नामी महद्ब्रह्म डोले ॥४॥

१५२

जरी घ्याल झोप । तरी चुकेना ही खेप ॥१॥
जरी कराल जप । तरी सुटाल आपेआप ॥२॥
तरीच व्हाल आत्मरूप । दुःखाचो ही चुके धाप ॥३॥
गुरुराज म्हणे । मुक्त व्हाल नामगाने ॥४॥

१५३

मुक्त व्हावे तरी तोडावी बंधने । निजध्यासपणे रहावे की ॥१॥
निजध्यासी रहाता निजची प्रगटे । बंधन हे तुटे संसाराचे ॥२॥
गुरुराज म्हणे हरिनाम घ्यावे । तरीच पावावे मुक्तपद ॥३॥

१५४

अहो अनुभवाचे काम । वाचे स्मरा राम राम ॥१॥
बोलोनिया आहे हानी । मुख्य पाहिजे करणी ॥२॥
गुरुराज म्हणे आता । रामनामी ठेवा चित्ता ॥३॥

१५५

पाण्यामाजी पडल्यावीण । नोहे पोहण्यासी जाण ॥१॥
गादीवरी हो पोहून । नये पोहायासी जाण ॥२॥
ब्रह्मालागी तद्रूप होता । ब्रह्मसुख येई हाता ॥३॥
गुरुराज म्हणे । नामी अनुभव घेणे ॥४॥

१५६

नामी अंतरी कसावे । ब्रह्मरुप होऊनी रहावे ।।१।।
करुनी पहाता विचार । नाही नाही विश्वसार ।।२।।
गुरुराज म्हणे तुज । नामी कळे निज गुज ।।३।।

१५७

म्हणती माझे माझे । येथे कोण आहे दुजे ।।१।।
सर्वंची आपण । झाला असे नारायण ।।२।।
जैसा अलंकार । तैसे झाले जगदंबर ।।३।।
गुरुराज म्हणे । पहा नामी सुख चांदणे ।।४।।

१५८

मुक्तीचे चांदणे पहावे या डोळा । पहाण्याची कळा जाणावी गा ।।१।।
नामी मिसळावी प्रेमाची ते कळा । पहावा सावळा रामराय ।।२।।
नामातील गोडी चाखावे अमृत । नयनी सीताकांत पहावा गा ।।३।।
गुरुराज म्हणे सांडू नये वाट । करू नये तूट स्वरुपाची ।।४।।

१५९

देव आहे अन्नदाता । देव सकळाशी पोशिता ।।१।।
देवे घातले जन्मासी । म्हणवूनी शरण जावे त्यासी ।।२।।
जेणे घातले बंदीत । तोची करील आम्हा मुक्त ।।३।।
गुरुराज सांगे पथा । राम प्रगटे नाम गाता ।।४।।

१६०

कोठे बा राहिले पहा मी तू पण । गेलिया अज्ञान अंतरीचे ।।१।।
जेथे द्वंद्वपण तेथे मी तू पण । सत्याचे ठिकाण अद्वैतची ।।२।।
जीव तो पहाता ब्रह्मरुप जाण । परी हे अज्ञान आड आले ।।३।।
जीव तो पहाता अज्ञानी पातला । तद्रूपची झाला मायेमुळे ।।४।।
गुरुराज म्हणे नामयोगे जाण । तोडावे अज्ञान अंतरीचे ।।५।।

## १६१

टाकोनिया देहभाव । स्मरसी जरी राम देव ॥१॥
तरी तू तद्रूपची होसी । बंध तोडोनिया जासी ॥२॥
नव्हेसी तू देह मन । तू तो अनिर्वाच्य जाण ॥३॥
संत वेद देती ग्वाही । कोणी पाहेनाच काही ॥४॥
गुरूराज म्हणे । नामी जडा नम्रपणे ॥५॥

## १६२

संती सांगितले विश्वास तू धरी । अव्हेर न करी एक शब्द ॥१॥
संतांचे तू बोल मनामाजी घेई । अकल्याण काही नोहे नोहे ॥२॥
संतांचे वचन रामनाम जाण । गुरूराज खूण सांगतसे ॥३॥

## १६३

एकरुपची होतासी । परी वेगळा झालासी ॥१॥
उपाधीचेची कारण । सांगताती संतजन ॥२॥
उपाधी ही आहे खोटी । त्रासदायक ही मोठी ॥३॥
जो का यात सापडला । तो तो तद्रूपची झाला ॥४॥
ऐसा आहे अनुभव । सांगताती महानुभाव ॥५॥
टाकोनिया ही उपाधी । नामी धरी दृढ बुद्धी ॥६॥
राम म्हणे होसी मुक्त । रामनामी हे प्रचीत ॥७॥

## १६४

वेदानी संतांनी सांगितला धर्म । कळताची वर्म मुक्त होसी ॥१॥
नाहीतरी खासी फिरोनिया गोते । येथे काय जाते कोणाचे गा ॥२॥
तेथे नये कोणी सोडवाया तुला । एका घननीळावाचोनिया ॥३॥
गोविंदतनय सांगतसे वर्म । एक सार नाम राघोबाचे ॥४॥

## १६५

त्याचे होईल कल्याण । ज्याचे मुखी नारायण ॥१॥
मालकाचा न विसर । जो का सेवेसी तत्पर ॥२॥
सेवेमाजी झाला रत । तोची जाणा रामभक्त ॥३॥
तया नाही लांब मुक्ती । राम म्हणे आहे प्राप्ती ॥४॥

## १६६

मालकासी खूष ठेविल्याची जाण । बढतीच पूर्ण होत असे ॥१॥
मालक वाढवी तयाचा पगार । जरी का आदर दाखविला ॥२॥
रघुवीर खूष नामाचे योगाने । भक्तासी दयेने मुक्त करी ॥३॥
गोविन्दतनय सांगे तोची थोर । ज्याचा रघुवीर सखा झाला ॥४॥

## १६७

रामनाम गाणे हाची धर्माचार । ओळखा अपार धर्म पै गा ॥१॥
जाणोनिया घ्यावा तयाचा प्रकार । सदा रघुवीर पहावा गा ॥२॥
गोविंदतनय कळकळुनी सांगे । नाम अंतरंगे गावे सदा ॥३॥

## १६८

ज्याची आहे पहा विश्वावरी सत्ता । त्यावरी ममता करावी की ॥१॥
होऊनिया रघुवीरपायी लीन । करावे भजन भावयोगे ॥२॥
सोडावा तो ताठा अहंकार मोठा । अहंकारे तोटा आहे प्राण्या ॥३॥
गोविंदतनय सांगे सदाचार । चुकेल की फेर रामनामे ॥४॥

## १६९

रामनाम घेता जळतसे पाप । हरताती ताप त्रिविध पै ॥१॥
अग्नी लाविताची जळाया कापूर । तैसेची असार पाप जळे ॥२॥
नामाचा महिमा अवर्णनीय जाणा । बोलवेना कुणालागी पाही ॥३॥
गोविंदतनय सांगतो तुजसी । नामी मुक्त होसी अरे प्राण्या ॥४॥

१७०

नामी आले कर्म । तीर्थ व्रत सर्व नेम ॥१॥
नामी आला योग । तव याग थोर त्याग ॥२॥
म्हणे गोविंदतनय । नामी सर्व काही होय ॥३॥

१७१

नाम ते न घेता सर्व कर्म केले । तरी व्यर्थ गेले अरे प्राण्या ॥१॥
नाम ते न घेता तीर्थ व्रत केले । तरी व्यर्थ गेले अरे प्राण्या ॥२॥
नाम ते न घेता योगयाग केले । तरी व्यर्थ गेले अरे प्राण्या ॥३॥
काही न करोनी नामची घेतले । सार्थकची भले गोविंदतनया ॥४॥

१७२

तोचि जाणावा धार्मिक । ज्याचे मुखी नाम एक ॥१॥
ओळखी जो रामरूप । जो का होतसे तद्रूप ॥२॥
म्हणे गोविंदतनय । जो का जहाला अभय ॥३॥

१७३

नसते वाढवुनी ढंग । जरी का संपादिले सोंग ॥१॥
लोक भुलताती तया । लागताती त्याचे पाया ॥२॥
परी तो नव्हे नव्हे संत । तेथे नाही सीताकांत ॥३॥
मुखी नसता नाम । काही नोहे आपुले काम ॥४॥
म्हणे गोविंदतनय । नामी प्रगटे रामराय ॥५॥

१७४

अयोग्य तो परमार्थास । जो का जहाला उदास ॥१॥
नसे उत्कर्षाची आस । तरी सर्वची निरास ॥२॥
नीट न घडे व्यवहार । कैचा भेटावा ईश्वर ॥३॥
म्हणे गोविंदतनय । रामनामे तरणोपाय ॥४॥

## १७५

दरिद्र्यासी नोहे श्रीमंताची भेटी । न व्हावेची कष्टी उगाउगी ॥१॥
तैसा देव नोहे दुर्गुणी गृहस्था । अयोग्य परमार्था जाणावा तो ॥२॥
गोविंदतनय तुम्हा सांगतसे । नामी अनायासे देवप्राप्ती ॥३॥

## १७६

आतमरूप भोगी तोची जाणा भोगी । नातरी अभागी दुःखरूप ॥१॥
संसार भोगोनी जन्मवारी घडे । अभिमान जडे अंतरात ॥२॥
गोविंदतनय सांगतो सकळा । सुखाचा सोहळा रामनामी ॥३॥

## १७७

मन चित्त बुद्धी पर परमात्मा । घेता गुरूनामा उमज पडे ॥१॥
बुद्धीची हे शोभा कैवल्य निधान । गुरूकृपा पूर्ण होता लाधे ॥२॥
ज्ञानाचिये मुसे त्रिगुण आटणी । हुंकार नयनी सात्विकाचा ॥३॥
चिदानंद देखे सत्पदी मावळे । सद्रूप उजळे त्याचे पैल ॥४॥
दासराम जडला संतांचे पायासी । बोधिले मानसी बोधरूप ॥५॥

## १७८

श्रोत्र वाणी चक्षू याचे पैल नाम । जेथे नादब्रह्म अनिर्वाच्य ॥१॥
स्मरणाचा मार्ग संतांचा बरवा । सकळा विसावा अखंडित ॥२॥
आगम निगम वानितातो नाम । नाम परब्रह्म देखिजे पा ॥३॥
सद्गुरु दाविती दासरामा कळा । देखे अंतराळा गव्हारु हा ॥४॥

## १७९

नाम कर्म नाम वर्म । नाम उपासना नेम ॥१॥
नाम मंत्र नाम तंत्र । नाम यंत्र देहीचे या ॥२॥
नाम भक्ती नाम ज्ञान । नाम धन शाश्वतीचे ॥३॥
नाम ब्रह्माचे निजांग । दासरामा कळला वेग ॥४॥

## १८०

नाम हेची विद्या ब्रह्मासी देखची । अखंड हे दावी मोक्षरुप ॥१॥
नाम हाची छंद नामीच प्रसाद । नामीच गोविंद तुष्ट होय ॥२॥
नाम नादब्रह्म निःशब्दाचे पैल । दाखवी केवळ वस्तुरूप ॥३॥
सद्‌गुरुकृपेसी नामची कारण । दासराम चरण धरी त्यांचे ॥४॥

## १८१

वेदशास्त्र संतवचने । गाती हरिकीर्ती पुराणे ॥१॥
नवल नामाचा महिमा । प्रगट करी अंतरी ब्रह्मा ॥२॥
चित्ता मिळे शांती । सुप्रसन्न अभेद वृत्ती ॥३॥
जनांचा उत्साहो । दासरामी हरी हा देवो ॥४॥

## १८२

राम राम राम । म्हणता जाये भवश्रम ॥१॥
रामा व्यतिरिक्त । राहावेची अनासक्त ॥२॥
रामनामी प्रीती । दासरामा तेची मुक्ती ॥३॥

## १८३

काही नाही सुख तरी । हाव तुझी कोठवरी ॥१॥
दोनीकडोनिया मारा । गर्वे फुगसी का फुगारा ॥२॥
काही म्हणसी राम । प्राप्त होय मेघश्याम ॥३॥
दासा होय सुख । गाता वदनी नाम एक ॥४॥

## १८४

करी रामनाम स्मरणा । अंतरी धरुनी निजध्याना ॥ धृ ॥
भुललासी कसा रे जीवा । सांडोनिया शिवभावा ।
न कळोनी भ्रमाचा कावा । जहालासी दैन्यवाणा ॥१॥
तू ब्रह्मरूपची असूनी । तळमळसी सुख सांडोनी ।
मायेची ऐशी करणी । जागृत हो धरोनी बाणा ॥२॥
त्वद्रूपी माया नटली । ती स्वरुपी झाकण घाली ।
इजमुळेची पडली भूली । तोडी रे आता अज्ञाना ॥३॥

सुख असुनी अज्ञानाने । तुजलागी गोते खाणे ।
जीव होसी विस्मरणाने । म्हणुनिया गाई गुणगाना ॥४॥
इंदिरातनय तुज विनवी । सत्स्वरूपी चित्ता लावी ।
घे तद्रूपतेची पदवी । वंदुनिया श्रीगुरुचरणा ॥५॥

१८५

रामनामी लागो छंद । जेणे तुटती भवबंध ॥१॥
येर छंदे होय घात । दुःख होतसे नेमस्त ॥२॥
छंद लागो जरी । सत्संगती एक बरी ॥३॥
दास म्हणे सुख । नुरे नामी मना दुःख ॥४॥

१८६

इंद्रिया लगाम । ते हे एक रामनाम ॥१॥
मनो–निग्रहण । साधे, ऐसे महिमान ॥२॥
सहा जळूनी जाती । येई अद्वय प्रचीती ॥३॥
होतो जगाचे वेगळा । वंद्य होतो कळिकाळा ॥४॥
गतीरूप नाम । संधिकाळी घेई सम ॥५॥
दासराम बोले । नामी सर्व सुख आले ॥६॥

१८७

वाढता धारणा । दिसो येई रामराणा ॥१॥
संसार पालवी । आत्मपणे त्या टवटवी ॥२॥
वर्म ते जाणोन । सदा राहे समाधान ॥३॥
दासरामा नाम । आनंदाचे निजधाम ॥४॥

१८८

कंठगत नाम । बोले तुझा अंतर्याम ॥१॥
प्राण अपान घासणी । होता कंठाचेपासोनी ॥२॥
ठेवी अनुसंधान । पाही रूप न्यहाळून ॥३॥
दासराम म्हणे देव । तूची होसी स्वयमेव ॥४॥

## १८९

नामाच्या साधने नाम पडे गाठी । साधनाची कोटी नामी कळे ॥१॥
एकतत्त्व नाम स्वतःसिद्ध परम । अविनाश ब्रह्म मूळरूप ॥२॥
अनामी हे नाम नामी हे अनाम । पहाणेचे वर्म शून्याठायी ॥३॥
नामपरायण धन्य हरिभक्त । श्रोते उद्धरीत त्याचे संगे ॥४॥
दासरामी हरिकीर्तन कल्लोळ । धरितो मंजुळ ताल ठेका ॥५॥

## १९०

रामनाम संपत्ती साठविता चित्ती । अखंड विश्रांती देई स्वये ॥१॥
हंकाराचे थर पाच हे अपार । बावन्न प्रकार शद्वी झाले ॥२॥
शद्वाते विखोनी निजानंदस्थानी । पंचतत्त्वे सांडोनी निरहं केले ॥३॥
दासरामा रामनाम हे संपदा । नुरवी आपदा त्रिधा सत्य ॥४॥

## १९१

राम राम राम हे ब्रह्म गोविंदू । ओते ब्रह्मानंदू निजभक्ता ॥१॥
संत आणि भक्त येथेंची मिळाले । विश्व हे साठले नामामाजी ॥२॥
नाम परिपूर्ण विश्व परिपूर्ण । नामाचेपासून विश्व झाले ॥३॥
निःशद्व ते नाम शद्व ते प्रकृती । अक्षर अव्यक्ती कैसे झाले ॥४॥
शद्व शून्यापोटी चराचर सृष्टी । दासराम पाठी नामाचिये ॥५॥

## १९२

राम राम राम राम राम राम । हे वाटे परम गोड गाता ॥१॥
ऐकणे पहाणे बोलणे चालणे । देणे आणि घेणे एक झाले ॥२॥
साठणे टाकणे हासणे रडणे । भोगणे त्यागणे एक झाले ॥३॥
सुखी दुःखी एक संती समाधान । दासराम गान करी त्यांचे ॥४॥

## १९३

रमोनिया व्यवहारी । का रे झाला दुराचारी ॥१॥
विसरला मायबापा । हारवी जो त्रिविध तापा ॥२॥
सर्व जगाचा पालक । तारक तो देव एक ॥३॥
लाविली कसोटी । खरा लेक न करे तुटी ॥४॥

१९३

व्यवहारी तो जाणा ज्ञानी । तैसा पाहिजेची गुणी ॥५॥
तरी तो ठरेल शहाणा । सर्वा करी लाजिरवाणा ॥६॥
प्रेम जडले हरिपायी । त्या मुक्ती मिळे देही ॥७॥
माया हे अज्ञान । याने झाले जन्ममरण ॥८॥
अज्ञान नासाया । संतसंगी हो चांगया ॥९॥
दास बोले गुरूकृपे । बोला हरिनाम सोपे ॥१०॥

१९४

हेही नाही तेंही नाही । ऐसे करीसी वृथा कायी ॥१॥
साधावे ते एक । होय जेणे मना सुख ॥२॥
मायबाप देव । तेणे निर्मियेले सर्व ॥३॥
त्यासी जाणताची बरे । सत्य साच तेची खरे ॥४॥
दासराम बोले । नामे देव तो आकळे ॥५॥

१९५

आम्ही हरिनामपंथी । आम्हा हरिनामाची भक्ती ॥१॥
होऊ नामब्रह्माकार । नामरंगी तदाकार ॥२॥
हरिनामाची लहर । सद्‌गुरू हा तो साकार ॥३॥
दावियेली नवल परी । रामकृष्ण सार हरी ॥४॥
रामकृष्ण हरिनामी । दासराम शरण प्रेमी ॥५॥

# साधन : ४

१९६

कशी गत झाली । थोडीशी खूणची चुकली ।।ध्रु।।
परब्रह्म हे असुनी देही ।
वरी वरी वरी वरी वरी वरी पाही ।
ठिकाण चुकता । बुद्धी भ्रमावली ।।१।।
देहामाजी हंसावरती । बैसलासे बा श्रीपती ।
समदृष्टी ही नच तुज कळली ।।२।।
अलक्ष्य लक्षामाजी बघसी । ऐसे कैसे पाहू शकसी ।
आत्मा आत्मदृष्टी नच बघसी । दृष्टी बिघडली ।।३।।
प्रेमपीळ हा सूत्रा नसे ।
रामनाम हे तेथ न मीलसे ।
रामावरती दृष्टी न ठसे । झापड पडली ।।४।।
दास म्हणे हे सद्‌गुरूवाचूनी ।
न लागती तुजला रत्नखाणी ।
सद्‌गुरूला तू शरण जाऊनी ।
बोल माऊली ।।५।।

१९७

सूत्र धरोनिया करी नामजप । पुढे आपेआप देव दिसे ।।१।।
आत्मसूत्र पहा तुटेना फुटेना । व्यापिलेसे जाणा सर्वाभूती ।।२।।
सूत्राचे सामर्थ्य वर्णवेना काही । लक्षिताचि पाही भय नुरे ।।३।।
राम म्हणे कळे गुरुचिये कृपे । कठिण ते सोपे होय जाणा ।।४।।

१९८

ज्ञानोदय होता देही । जीव होतसे विदेही ।।१।।
तेथे नुरेची अज्ञान । राहे अखंड संधान ।।२।।
गुरूराज म्हणे । पहा पहा या साधने ।।३।।

१९९

संकल्प मारोनी होई निर्विचार । पावे निर्विकार मुद्रा तेची ॥१॥
नामाची घोकणी साधिलासे बंध । जेथे शद्धाशद्ध भेद नाही ॥२॥
स्थिरत्वे आसन साधो निरंजन । सदानंद घन निश्चळातू ॥३॥
निवांतीचा दीप होईजे निवांतू । दासराम चित्तू चिद्रूप होय ॥४॥

२००

प्राणगती धावे बाहेरी बाहेरी । प्रवेशता निर्धारी अंतर्यामी ॥१॥
तिचा ओघ जाय आधारचक्रासी । मिळता गतीसी वरुता होय ॥२॥
दशमद्वारी प्राणगतीसी रोधिता । चित्त येई हाता जीवात्म्याच्या ॥३॥
गिरकी घेऊनी फिरकी ओलांडुनी । निजात्मभुवनी वेगे जाय ॥४॥
चित्त हे विरेल चैतन्यामाझारी । चुकें येरझारी दासाची हे ॥५॥

२०१

वेलांटी धरोनी पातलो खालती । शीर्ष हो खालती पाय वरी ॥१॥
तेव्हा सद्‌गुरूनी दिली उलटी गती । गतिमाजी गती सामावली ॥२॥
उलट करिता सुलटाची झालो । स्वरूपी मिळालो आपुलिया ॥३॥
धारणा लाधली गती ऊर्ध्व झाली । स्थिरत्वे पावली मूळरूप ॥४॥
दासराम साधुबोधे आनंदला । लाभ तो जहाला हृद्‌गदाचा ॥५॥

२०२

सर्व तंतुजाल उकलोनी पहाता । एक तंत हाता येत असे ॥१॥
तया तंतामाजी तीन स्वर असती । लागतसे वृत्ती तये ठायी ॥२॥
तद्रूप होऊनी चढे वरी वरी । रामकृष्णहरी प्रगट दिसती ॥३॥
रामकृष्णहरी एकरूप कळता । स्वरूपी मिळता सुख दासा ॥४॥

२०३

आशा ती संपेना होऊनी जाणता । होऊनी नेणता स्वरूपी राही ॥ १॥
सूर्यस्वर जरी चंद्रस्वरी मिळेल । पदी परम चढेल योगिराज ॥२॥
साठ किंवा पासष्ट विकसित होती । तयेठायी वृत्ती जडता बरे ॥३॥
सोऽहंसूत्ररुपे चढे वरीवरी । प्रवेशे निर्धारी सहस्त्रदळी ॥४॥

तये ठायी कैचा वाजे अनाहत । नामघोष चित्त देऊनी ऐके ॥५॥
तये ठायी लय साधेल सहज । पडेल उमज आत्मयाचा ॥६॥
दासराम बोले राजयोग खूण । अंतरीचे ज्ञान सद्‌गुरूघरचे ॥७॥

२०४

सूर्यअस्त होता चंद्र उगवेल । लय तो पावेल अग्निमाजी ॥१॥
अग्निमंडलात चंद्र-लय होता । स्फुरेल तत्त्वता मूळ वाचा ॥२॥
मूळ वाचा लय आत्मरुपी होय । देती संतराय ग्वाही ऐसी ॥३॥
श्रुति उपनिषदे बोलताती खूण । दासराम लीन सद्‌गुरुचरणी ॥४॥

२०५

अवसानापाशी । हरिवाणी स्फुरे कैसी ॥१॥
कैचा वाजतो त्रिताल । स्वरामाजी एक मेळ ॥२॥
एकी एक मिळुनी जाता । एकमेव येई हाता ॥३॥
सांडोनी कल्लोळ । पाही अंतरी गोपाळ ॥४॥
ऐसा येथीचा अनुभव । दासरामा कळला ठाव ॥५॥

२०६

आसन घालुनी सतरावी जो जागृत करितो आधी ।
श्वास हा मिसळे नामी तधी ॥१॥
मनचक्षूची पाडुनी सृष्टी ब्रह्मकपाटी दृष्टी ।
लावी तो नर न होय कष्टी ॥२॥
स्थिर होऊनी आनंद सेवी आत्मस्वरूपाचा ।
बहुत तो दास म्हणे दैवाचा ॥३॥

२०७

एकांती साधन साधता साधेल । अनुभवा येईल आत्मरूप ॥१॥
दिसावया गोटा असावया मोठा । बाजारात खोटा कोण आहे ॥२॥
कळेल ते खूण अंगी बाणे गुण । नाद रुणझुण श्रवण होय ॥३॥
त्रिवेणी संगमी एक होय ऊर्मी । येर ती निकामी गुंडाळी गा ॥४॥
दासराम झाला अंतरी सावध । तोडोनिया बंध चिद्‌ग्रंथींचा ॥५॥

## २०८

नेत्र व उमाळा मिळोनिया डोळा । बोलती जिव्हाळा शास्त्रादिक ॥१॥
नेत्र असमर्थ पहावया देव । मायापाश भव निवाराया ॥२॥
उमाळा धरोनी ऊर्ध्वमुख होई । दृष्टी लवलाई ऊर्ध्व करी ॥३॥
तरी ज्ञाननेत्र विकसित होई । अवघा होऊनी राही ज्ञानचक्षू ॥४॥
मग पाही सर्व ब्रह्म अनुभवे । साधन हे बरवे साधी वेगी ॥५॥
ज्ञानेश्वरकृपे ज्ञान बोले बोल । दासरामा केले मूकरुप ॥६॥

## २०९

अंतरीचा काम गेला । मोक्ष दूर नाही त्याला ॥१॥
संती मांडिले सिद्धांत । केली जगावरी मात ॥२॥
जगा दाविला उपाय । कैसा भेटे देवराय ॥३॥
दासराम हात जोडे । गुरुपायी मुक्ती जोडे ॥४॥

## २१०

निष्क्रिय प्रक्रिया हे थोर साधन । करवेल दर्शन देवाजीचे ॥१॥
साधेल आसन साधेल ते मौन । नासिकाग्र खूण साधेल पा ॥२॥
साधेल धारणा निरसेल बंधन । चित्त हे चैतन्य होईल गा ॥३॥
दास म्हणे थोर पुण्याई असेल । तरीच कळेल वर्मखूण ॥४॥

## २११

आकाश मिळता आकाशामाझारी । शब्द होय दूरी निःशब्दची ॥१॥
निःशब्दामाझारी प्रवेशता मन । होतसे उन्मन सुखरूप ॥२॥
मिळणी साधोनी सर्व तत्त्वे सांडिता । होतो ओलांडिता जाणीवेसी ॥३॥
जाणीव नेणीव वृत्ती हारपली । अंतरी पेटली आत्मज्योती ॥४॥
ज्योतिरूपी ज्योत दासरामी रुपा । होता गुरुकृपा उमगेल ॥५॥

## २१२

पैल मेरु-शिखरी चढावे निर्धारी । ओलांडुनी ओवरी मध्यप्रांत ॥१॥
पाजळली उत्तुंग शिखरे अपार । लखलखाट थोर दिसतसे ॥२॥
मध्यशृंगावरी करिता आरोहण । होताती श्रवण नादघोष ॥३॥
ज्योतिरुप आत्मा जीवशिवसमा । विश्रामाचे धामा भेटी झाली ॥४॥
त्रयी स्थिर झालिया त्रिपदांची मिळणी । स्वरुपाची खाणी लाभे दासा ॥५॥

## २१३

प्राणाचा मनाचा एक लय होता । तत्त्वे तत्त्व सारिता पवनसिद्धी ॥१॥
पवनसिद्धी झालिया प्रगटे आत्माराम । येतसे निष्कर्म हातालागी ॥२॥
निष्कर्माचे कर्म अबोलाचा बोल । उकलेल खोळ प्रपंचाची ॥३॥
उपाधी निरसिता होतो त्यात खेळता । चैतन्य हे चित्ता मिळुनी राही ॥४॥
दासराम बोले अध्यात्माचे गुह्य । गुरूकृपा साह्य सकळासी ॥५॥

## २१४

प्राण हा ॐकारी रामी हा ॐकार । विरता साचार सौख्य जीवा ॥१॥
प्राणावरी राहे ठेवोनिया दृष्टी । आणिक ते गोष्टी नको करू ॥२॥
दृष्टीचे देखणे आटेल तेधवा । दूर होसी भवापासोनिया ॥३॥
आता दृष्टीपुढे एकी एक देखे । येर ते कौतुके नाही होय ॥४॥
दास म्हणे गुरूपुत्र हे जाणेल । येर ते नाठाळ स्वस्थ होती ॥५॥

## २१५

अकार स्थिरत्वे उकारी मिळता । उकार पहाता गतिरूप ॥१॥
उकार मिळता मकारामाझारी । पावेल निर्धारी जीव लय ॥२॥
जीवासी मारोनी जीवविले कैसे । अमोल हे ऐसे साधनगुह्य ॥३॥
त्रिपद जाणता मिळणी साधिता । सुखा सुख हाता येत असे ॥४॥
त्रिपदांचे ऐक्य त्रिपुटीचा लय । गुरुकृपा होय तरीच कळे ॥५॥
आकाशामाझारी ॐकार मिळता । निःशब्दत्व हाता येत असे ॥६॥
अद्वैताचे सुख पाहे निज डोळा । जाणोनी जिव्हाळा दास म्हणे ॥७॥

## २१६

नामघोष जेथे । देही, लक्ष्य ठेवी तेथे ॥१॥
नाद-पृथक्करण । करून, करी एक मन ॥२॥
नादघुमारा ऐकोनी । लक्ष्य लावी अलक्ष्यस्थानी ॥३॥
अलक्ष्य काय ते जाणावे । मूळ मुळीच शोधावे ॥४॥
दासराम म्हणे । तुटे प्रपंच धरणे ॥५॥

२१७

पवित्र स्वर्गंगा धरणीपासोनी । आकाशभुवनी वरी वाहे ॥१॥
सुमने वहाती फुलोनी सुवासे । उत्कर्षे उल्हासे जीव जाय ॥२॥
ओघ सतरावीचा उलट प्राणाचा । झरा अमृताचा उचंबळे ॥३॥
अघटित कैसी देवाजीची कळा । जाणे तो आगळा योगिराज ॥४॥
गंगेचा हा ओघ सागरी मिळता । मौक्तिके पहाता होय दास ॥५॥

२१८

शून्यामाजी शून्य दृष्टीमाजी दृष्टी । होता जगजेठी भेटी देई ॥१॥
योगाचे साधन राजयोग खूण । जेथे भक्ती ज्ञान एक होय ॥२॥
साधनी रहाता साध्य येई हाता । कळेवीण पहाता काय होय ॥३॥
अनुभवाच्या गोष्टी अनुभवी सांगेल । अनुभवी डोलेल दास म्हणे ॥४॥

२१९

वायूची घासणी । होता प्रगटे आत्मवन्ही ॥१॥
वायू जाय निसटोनी । झाली भात्याची करणी ॥२॥
नामी आत्मयज्ञ होता । प्राण सकारी मिळता ॥३॥
जोडे पद्मनाभ । दासा होय महालाभ ॥४॥

२२०

डोळियाचे श्रोत्र तेचि झाली वाणी । प्रणवाचा ध्वनि अग्निमाजी ॥१॥
निरालंबी येण्या आलंबाचा मार्ग । हाचि गुह्य भाग योगियांचा ॥२॥
संतजनी सिद्ध ऐसा राजयोग । मिळाले ते वेग जाणोनिया ॥३॥
अनंता जन्मीचे पुण्याईची जोडी । दासरामा गोडी सिद्धपदी ॥४॥

२२१

सहजाचे आसन नामाची ते मुद्रा । दावी अगोचरा ब्रह्मरुपा ॥१॥
खेचरी ते दृष्टी महाशब्द भेटी । तेथे आटाआटी चत्वारीची ॥२॥
अक्षराचे पैल निःशब्दाचे स्थानी । जीवनावाचोनि साधन सिद्ध ॥३॥
कंठाचे उपरी मार्ग निरालंब । होय महालाभ गुरुकृपे ॥४॥
मनावीण उन्मन परते निरंजन । दासरामा खूण सूक्ष्मरुप ॥५॥

## २२२

एक जाणा वायुमार्ग । एक जाणा हंसमार्ग ॥१॥
एक कुंडलिनी मार्ग । एक जाणा चक्रमार्ग ॥२॥
एक आकाशीचा मार्ग । एक ब्रह्मकपाटी मार्ग ॥३॥
एक सुषुम्नेचा मार्ग । एक सहजयोग मार्ग ॥४॥
हठयोग राजयोग । भक्ति ज्ञान सहजयोग ॥५॥
ऐसे बहुत प्रकार । बोलियेले की साचार ॥६॥
गुरुकृपा आत्मयोग । दास म्हणे त्याचा वेग ॥७॥



# अनुभव : ५

२२३

लख् प्रकाशात नीलबिंदु दिसे । प्रभा फाकलीसे चोहीकडे ॥१॥
एकदम रे पाही अंधकार झाला । बिंदु तो फुटला तयामाजी ॥२॥
बिंदु तो फुटला प्रभा ती पडली । तयात सावळी राममूर्ती ॥३॥
रामराय येता तेज ते दाटले । नेत्रात बिंदुले चकाकले ॥४॥
तये प्रभेमाजी विजा झगमगती । रंग उसळती नाना ज्योती ॥५॥
तारे चकाकती आनंद तोलीती । किरण फाकिती चोहीकडे ॥६॥
सूर्यचंद्र गोल हिरे रत्ननीळ । जडित विशाल किरीट ते ॥७॥
किरीटी सुवर्ण असे लखलखीत । ऐशी आकाशात दिव्य मूर्ती ॥८॥
हिरे रत्न मौक्तिकांचे अलंकार । वाद्यांचा गजर काय तेथे ॥९॥
तेजःपुंज रामप्रभू दिसे पाही । डोळा सर्वा ठाई भरलेसे ॥१०॥
हीन दासराम करितो नमन । घेई लोटांगण चरणावरी ॥११॥

२२४

स्वात्मसुखी रमले आजि मी । धन्य धन्य झाले ॥१॥
सद्‌गुरुबोध मनी धरले । देव प्रगटले ॥२॥
मायेकडे प्राणी भुलले । यमपाशी पडले ॥३॥
दास म्हणे बोध धरले । चित्त स्थिर जहाले ॥४॥

२२५

सहस्रदलकमळी स्थानी तो । शामवर्ण हा नीळ दिसतो ॥१॥
पश्चिम वाट ही दावियली । सुंदर नामी वृत्ति रंगली ॥२॥
ब्रह्मांडचक्रस्थानी जाता । मग वाटे शांत चित्ता ॥३॥
मग तेथे काळ कापतो । दासा गुरुकमली प्रेमा तो ॥४॥

२२६

कोठे गेला काम कोठे गेले प्रेम । काय केला नेम निशिदिनी ॥१॥
कोठे गेला क्रोध कोठे गेला बोध । कशात सावध अहो आम्ही ॥२॥
कोठे गेला लोभ कोठे गेला क्षोभ । दासाते स्वयंभ गवसले ॥३॥

## २२७

वायू निरोधिता अवसानापाशी । त्रिताल सुरासी मिळणी होय ॥१॥
पुरीषात चारी पुरापैल जाता । पुरुष तत्वता कळो येई ॥२॥
तेथे तुटे दोरी चत्वार देहाची । आकाशा आत्म्याची गाठ होय ॥३॥
अनाम निनाद निःशद्वाचा शद्व । शद्वाशद्व–भेद दूरी आहे ॥४॥
षड्सहस्त्र जपे करी नाडीशुद्धी । तरी होय बुद्धी दृढवृत्ती ॥५॥
बुद्धिगत आत्मा होता उफराटा । अधिष्ठान वैकुंठा सहजेची ॥६॥
अवसाना पोळ पाडोनी पहावा । ध्वनी आयकावा त्रितालीचा ॥७॥
अ उ म हा ध्वनी निःशद्व होवोनी । आयकावा कर्णी एकचित्ते ॥८॥
त्रिपद-मिळणी त्रिगुण आटणी । आटली त्रिवाणी बावन्नाची ॥९॥
इकार एंकार मात्रा गुप्त तेथे । तेथोनी सुपंथ ऊर्ध्वगामी ॥१०॥
निरालंब स्थान आलंबाचे मूळ । द्वयाद्वय केवळ ब्रह्मी नाही ॥११॥
हनुमंत सद्‌गुरु दाविती नवल । दासरामा अबोल वदविले ॥१२॥

## २२८

तेचि सत्य ज्ञान तेचि सत्य ज्ञान । होय समाधान जेणे योगे ॥१॥
सतरावी तेजोरूपाने प्रदीप्त । प्राणापान मुशीत करावी गा ॥२॥
मनोवृत्ती होम करोनिया तेथे । पहावे आपुले ते परब्रह्म ॥३॥
सर्वाठायी आत्मा आपणात सर्व । देखोनी हा जीव देव होय (स्वये) ॥४॥
दासराम ऐके संतकृपा खूण । सकळालागून मांडी पुढे ॥५॥

## २२९

कुंडलिनिचा पडदा बाजूसी सरता । प्राणापान भाता सरता (रिकामा) होय ॥१॥
ऊर्ध्वगामित्वाने सहस्त्रदलकमळा । जातसे आगळा प्राणवायू ॥२॥
अपानात प्राण हृदयकमळी । तेजःपुंज लाली दिसतसे ॥३॥
प्रत्ययाचे वर्म प्रत्यये देखणे । राजयोग खुणे ओळखावे ॥४॥
दासराम सांगे गुरुकृपा गुह्य । पूजितसे पाय त्रिकूटस्थानी ॥५॥

## २३०

कापुरीचा दर्प उडोनिया गेला । मीपणा बुडाला समनामी ॥१॥
तेजाचा बंबाळा धावोनिया आला । पश्चिमेसी ठाकला तेजोमेरू ॥२॥

तेज न समाये आकाशाचे पोटी । इतरा संसाटी करु नये ।।३।।
सूर्य चंद्र लोपे काळ जेथे कापे । सत्ते काळ मापे हरिभक्त ।।४।।
धारणा अढळ वृत्ती ते निश्चळ । भगवन्नाममाळ हाती मिळे । ५।।
दासराम गातो देवाजीची लीला । जाणे तो आगळा गुरुभक्त ।।६।।

२३१

ज्याचे चाले सत्य सहजसाधन । गुरुकृपा खूण लाधली ज्या ।।१।।
त्याचे कर्णी होय नादाचे श्रवण । नाडचा झणझण करती कर्णी ।।२।।
हा मार्ग मुक्याचा उलट प्राणाचा । अवघा गतीचा अनुभव ।।३।।
शीर्षस्थानी ओघ जावोनिया मिळे । जेथे न मिसळे परावृत्ती ।।४।।
धारणा तुटता संशय प्रवृत्ती । अनुतप्त होती त्रिविध ताप ।।५।।
शीर्षस्थानी उजू भागी अनुकंप । गतीसी संताप होत असे ।।६।।
दासराम करी प्रार्थना गुरुते । करोनिया द्या ते साधन देवा ।।७।।

२३२

कोणी करावे साधन । कोणी घालावे आसन ।।१।।
कोण व्हावे ते उन्मन । कैसे काय करू ध्यान ।।२।।
अवघा झाला प्रभू राम । दासा सुख कळता वर्म ।।३।।

२३३

त्रिभुवनी करी अवघा एक शब्द । तरी भेदाभेद दूरी राहे ।।१।।
सायंकाळी घेई आत्मदरुशन । सूर्य चंद्र दोन एके ठायी ।।२।।
अग्निमाजी लय सूर्य चंद्र होय । दिसती समपाय देवाजीचे ।।३।।
सूर्य परिपूर्ण चंद्र परिपूर्ण । सोळावीची खूण मिळणी जेथे ।।४।।
दासरामावरी बोळले वो संत । अध्यात्माची मात सांगताती ।।५।।

२३४

शेषावरी देह–महीची धारणा । तो तरी कळेना कोणालागी ।।१।।
शेषाचे मस्तकी असे बिंदुरूप । जो करी निष्पाप सकळाते ।।२।।
हरिभक्त जाती दर्शन ते घेती । इतर ते होती मतिमूढ ।।३।।
आधिभौतिकासी न कळे हे ज्ञान । दासरामा खूण संतसंगे ।।४।।

## २३५

आकाशाचा गाभा लावण्याची शोभा । ते हे नीलप्रभा आत्मयाची ॥१॥
जेथे होय चित्ता आनंदीआनंद । रामकृष्ण गोविंद मिळणी झाली ॥२॥
चित्तासी प्रसाद होय आत्मयाचा । किरण कृपेचा सद्‌गुरुंच्या ॥३॥
आशिर्वाद लाधे पूर्ण वडिलांचा । संतोष सर्वांचा लाभतसे । ४॥
दासरामा कल्याणाचे हे कल्याण । जरी ऐसी खूण होय त्यासी ॥५॥

## २३६

आकर्षणे प्रकर्ष प्रकर्षे आकर्ष । हृदय सौरस कार्य चाले ॥१॥
त्यातोनिया वाहे अमृतप्रवाह । उलट अपूर्व गगनासी ॥२॥
दशमद्वार छिद्र तेथोनी हे गतो । जावोनी मिळे ती ब्रह्मरंध्री ॥३॥
ब्रह्मस्थानापाशी जावोनिया मिळे । गुरुकृपे मिसळे तये ठायी ॥४॥
प्रवाह चालिला परी हे मिळणी । साधिली जयानी तेची धन्य ॥५॥
दशमद्वारापैल मिसळता प्राण । सहज होय पूर्ण ब्रह्मरूप ॥६॥
अपूर्व हे कळा सद्‌गुरु बोधिती । दासराम मतिमूढ ऐके ॥७॥

## २३७

आनंदाच्या भरामध्ये धुंद मातला । अष्ट देहभाव अंगी पूर्ण विसरला ॥१॥
डोळ्यातील बाहुली ही मोठी होऊनी । तेजरूप राहिले की पूर्ण व्यापूनी ॥२॥
हनुमंतसद्‌गुरुनी मौज दाविली । बोलताचि बोलताचि वाणी खुंटली ॥३॥
सारी दृष्टी भरली सृष्टी पुष्टी अंतरी । हृदयी देव प्रगट होय जो चराचरी ॥४॥
दासराम सांगे ऐसी सद्‌गुरुकळा । सद्‌गुरुच्या सहजकृपे लाभ चांगला ॥५॥

## २३८

विशुद्ध आणि बलवान । यांचेमध्ये छिद्र लहान ॥१॥
तेथोनिया वरुता होई । अनुभवाची कळेल सोई ॥२॥
ब्रह्म-कपाटीचा मार्ग । त्यासी बोलती सहजयोग ॥३॥
भृकुटी आणि आज्ञाचक्र । तेथोनिया जाई वर ॥४॥
ब्रह्मरंध्रस्थानातूनी । जाई नीट ब्रह्मस्थानी ॥५॥
दासरामा कळला डोळा । देवाजीची कैसी कळा ॥६॥

## २३९

वायु चक्राकार फिरे वरचेवर । वरी घन फार विरळ खाली ॥१॥
देही ऐसी ठेविली साधनाची कळा । जाणे तो आगळा योगिराव ॥२॥
सर्व शक्ती एकवटोनी जाय ब्रह्मांडासी । महाशब्द नादघोष तेथे परीयेसी ॥३॥
शून्यामाजी एक शब्दउच्चारण । एको एकपूर्ण अनुभवे ॥४॥
चत्वार देहांचे झाल्या निरसन । तेजामाजी पूर्ण तेज मिळे ॥५॥
ते तेज निराळे रवि-शशी-आगळे । आकाशात मिसळे एकाएकी ॥६॥
आकाशा ग्रासोनी अबोल होवोनी । राहे पूर्णपणी जैसे तैसे ॥७॥
दासरामावरी सद्‌गुरुंचे छत्र । म्हणोनिया सूत्र दावियेले ॥८॥

## २४०

नाभिचिया पैल आधाराचे स्थान । सांगितली खुण तुकारामे ॥१॥
मेरूचे जे मूळ चतुर्दले केवळ । चार मात्रा सोज्वळ एकवटल्या ॥२॥
अकार तो जाणा ॐकार शब्दाचा । उकार गतीचा अनुभव ॥३॥
मकार मस्तकी कळे तो साचार । धन्य ज्ञानेश्वर वर्णिताती ॥४॥
इकार एंकार गती गुप्त जेथे । जे का सद्‌गुरूनाथे दावियेली ॥५॥
अर्धमात्रा दिसे धन्य ते ललाटी । जेथे तो धूर्जटी गाठी पडे ॥६॥
ब्रह्मबिंदुस्थानी देखे बिंदुरूप । ॐकार स्वरूप ऐसे देही ॥७॥
दासरामावरी संतोषले संत । म्हणोनी हे मात दावियेली ॥८॥

## २४१

त्रिकुटी जो वाहे पवनाचा स्रोत । तेथे सिद्ध संत भेटताती ॥१॥
मन आणि पवन जेथे होय स्थिर । तेथे वाहे नीर त्रिवेणीचे ॥२॥
रज तम दोनी सारोनिया मागे । सत्संगतियोगे पुनीत होय ॥३॥
सद्‌गुरू हनुमंत श्रीराम समर्थ । वास करिती तेथे साधुराज ॥४॥
रघुनाथप्रियसाधुमहाराज । आक्का त्या सहज दिसती तेथे ॥५॥
धन्य भगवान गुरूलिंगजंगम । सद्‌गुरू परम काडसिद्ध ॥६॥
मरूळसिद्ध रेवणसिद्ध भगवान शंकर । प्रसिद्ध त्रिनेत्र दिसतसे ॥७॥
ब्रह्मरूप सद्‌गुरुंचा होतसे प्रसाद । लाधतो आनंद स्वरूपाचा ॥८॥
त्रिवेणीत जेथे होतसे मज्जन । संतसंग पूर्ण लाभतसे ॥९॥
भगवान ज्ञानेश्वर नामदेव थोर । एकनाथ साचार भेटताती ॥१०॥
तुकाराम सद्‌गुरू जेथे भेट देती । हरिभक्त किती होती गोळा ॥११॥
सद्‌गुरुप्रसाद सिद्ध आशिर्वाद । संतांचा आनंद लाभतसे ॥१२॥

भगवंताचे भक्त निळोबादि करून । बहुत सज्जन देखे तेथे ॥१३॥
भक्तावरी करी कृपा भगवान । दासराम दीन याचक तो ॥१४॥

## २४२

काकीमुखातोनी निघे जो उच्चार । नाद मंद्र स्वर बोलती ज्या ॥१॥
पंचम आलाप पंचम गुण वेद । वर्ण तो अभेद प्रत्यया ये ॥२॥
चंद्र सूर्य जेथे विरोनिया जाती । एकवीस रहाती स्वर्ग मागे ॥३॥
इंद्रादिक देवा जे सुख दुर्लभ । दासरामा सुलभ गुरुकृपे ॥४॥

## २४३

आकारेची पाहू गेलो निराकारा । आणिले आकारा निराकारे ॥१॥
लक्ष्य देखोनिया अलक्ष्य लक्षिले । अलक्ष्येची आले लक्ष्य झणी ॥२॥
शुद्ध जो चिद्‌गुण जाणावे निर्गुण । जाले बहुगुण चंचळाने ॥३॥
निर्गुणा भेटलो सगुणाचे संगे । दासराम अंगे निर्गुणचि ॥४॥

## २४४

आम्ही जावे कोठे सांग बा दातारा । न टाळी उदारा भक्तासी या ॥१॥
तुझे गुणगान तूचि करी आता । आम्ही ऐको स्वता बसोनिया ॥२॥
बोले काय हरी होवोनी प्रसन्न । ऐके रे कीर्तन राम हरी ॥३॥
स्वये बोले हरी अबोलाचा बोल । जाला नाद–घोळ कर्णी कैचा ॥४॥
डोळीया प्रकाश अवघा दाटला । श्रोता वक्ता झाला एकरूप ॥५॥
हनुमंतराय रघुनाथ गोविंद । दाविती आनंद श्रीहरीचा ॥६॥
अवघा पहाता नटला श्रीहरी । आता कुठे तरी दासराम ॥७॥

## २४५

जैसे तैसे आम्ही श्रीरंगाचे दास । जया आम्हा वास निरंजनी ॥१॥
पहाणे सरोनी सहज पाहू निज । दर्शनाचे गूज देखो सुखे ॥२॥
दर्शनेची येथ झाली प्रशस्ती । दासरामो संती खूण दिली ॥३॥

२४६

तबला ना पेटी झांज ना मृदंग । रंग तो श्रीरंग आपण झाला ॥१॥
स्वये हरी करी हरीचे कीर्तन । राम नारायण वासुदेव ॥२॥
श्रोता नाही कोणी निरंजनस्थानी । अवघा नयनी रंग भरे ॥३॥
कोण्यालागी कोणी वाखाणावे येथ । दासराम संथ हरिपायी ॥४॥

२४७

दृष्टीची बाहुली विस्तार पावली । संतानी देखिली आत्मकळा ॥१॥
प्रतिबिंब भास आभास आटले । सत्यानंत उजळे चहू ठायी ॥२॥
मन पवन जीवशिवाते ग्रासिता । सर्वाठायी सत्ता सहजेची ॥३॥
दासराम संतपदासी जडला । तेथे लटकला लटकेची ॥४॥

२४८

तत्त्वे तत्त्वाते सारावे । भाव अक्षरी विरवावे ॥१॥
पंचवर्गा पंचमात्री । राहे मिळवोनी निरंतरी ॥२॥
पंच मात्रा अशद्वातु । ठेऊनी पाहे आपणातु ॥३॥
निःशद्वाचे जे स्मरण । दासरामा निरंजन ॥४॥

२४९

चार मंडलाचे ध्यान । तेथे ब्रह्माचे दर्शन ॥१॥
सूर्य-मंडल प्रथम । दुजे शशीचे उत्तम ॥२॥
तिजे अग्नीचे मंडल । चतुर्थ ते गुरु मंडल ॥३॥
दासराम सद्गुरुबोधे । निजानंदी हरीचे छंदे ॥४॥

२५०

पूर्णस्वरुपी आपण । आपण ते निरंजन ॥१॥
ज्ञानकर्मी वाटे आला । परी तो उपाधीवेगळा ॥२॥
पाहू डोळा कवतूक । आपुलेची चाखू सुख ॥३॥
आत्मरूपी आत्मीयता । दासरामी अखंडता ॥४॥

## २५१

नाम रूप ऐक्यत्वाची अनुभूती । स्मरणाची स्थिती अती गुह्य ॥१॥
ज्याचेनी स्मरण जीवा जीवपण । चिद्‌गुणे जीवन चिदाकाशी ॥२॥
दासरामा हरिनामी समाधान । ब्रह्म सनातन अनिर्वाच्य ॥३॥

## २५२

मिळायाचे ते मिळाले । केले संकल्पानिराळे ॥१॥
कीर्ती जहाली अखंड । श्वेत श्याम मोडिले बंड ॥२॥
काळे डोळिया फासले । दृश्यादृश्य गिळुनी उरले ॥३॥
दासराम तो खेळिया । खेळे स्वरुपी धारि या ॥४॥

## २५३

विजेच्या प्रकाशे रेखिले अक्षर । देखिला सुस्वर नादघोष ॥१॥
ऐसी हे कमाई जहाली बा जेथे । दृश्यादृश्य तेथे उदया आले ॥२॥
देखिजे तमाशा अक्षराची ओळी । बिंदुमात्र जवळी आपुलेपण ॥३॥
आपुल्याच ठायी दासराम स्थिर । गुरुनाम सार एक सत्य ॥४॥

## २५४

काढिला निराळा । सकळापासोनिया डोळा ॥१॥
मनीचे मनपण गेले । शून्य अंधार राहिले ॥२॥
तयावरूता उच्चार । अनुभवाचा प्रकार ॥३॥
पाल बोले मुकेपणे । आत्मरूप दावी खुणे ॥४॥
निजत्वाचा उजेड झाला । दासराम स्वरुपी धाला ॥५॥

## २५५

गुरुराजे खूण दिधली । सर्व शंका निवारली ॥१॥
मजलागी मुक्त केले । आपण कोण निवेदिले ॥२॥
आपुला आपण घ्यावा शोध । गुरुराजे केला बोध ॥३॥

२५६

वृक्ष आणि छाया । तैसी ब्रह्म आणि माया ।।१।।
माया मृगजळ जाण । मिथ्या खोटी भासमान ।।२।।
येथे वादचो उरला नाही । संतजनी दिधली ग्वाही ।।३।।
गुरुराज म्हणे । सांगितले संतजने ।।४।।

२५७

आधी वंदू आद्य स्वामी गजानन । ज्याचे हाती मन दशेंद्रिये ।।१।।
ॐकाररुपाने प्रचीतीसी येई । ज्याचे कृपे पाही विघ्न नुरे ।।२।।
सगुणाचा शेवट निर्गुणाचा आरंभ । दासरामी स्वयंभ दिसो येई ।।३।।

२५८

कंठासी निरोध आकर्षण शक्ती । अंतर्मुख वृत्ती उर्ध्वमार्ग ।।१।।
इंद्रियदमन होईल बा जेथे । जे का सद्‌गुरुनाथे सांगितले ।।२।।
स्वप्नामाजी देखिला योगीपुरुष निर्धारी । ज्याचे कंठावरी अंगुली दिसे ।।३।।
देणे ही दाविली मात हे अंतरी । सद्‌गुरुंची परी जाणती तेची ।।४।।
मस्तकी तयाचे फुगूटी दिसली । तयात निमाली सकळ वृत्ती ।।५।।
दासराम तया योगिया शरण । दिले पाठवून सद्‌गुरुनी ।।६।।

२५९

चंचळत्वाची ओळख । तेची दावी निश्चळ एक ।।१।।
ऐसे निश्चळ होवोनी । पहाता पहाणे निरंजनी ।।२।।
त्रिपुटी ग्रासिली । हरिनामाचिये मेळी ।।३।।
धन्य तेची संतजन । दासराम धरी चरण ।।४।।

२६०

काही आता होवो आम्ही नाम गाऊ मुखी । श्रोतया वक्तया हरी करी स्वयें सुखी ।।१।।
कासयासी भीक मागे ईश्वराचे पोर । कासयासी चिंता जया सद्‌गुरु भर्तार ।।२।।
हरीच्या कीर्तनी रंगले वो हरिदास । वोसंडूनी कर्णी अद्‌भूत हा नामरस ।।३।।
ऐसे सुख कोठे श्रवणपुटी हरी दाटे । आकाशाचा गाभा दासराम नयनी उमटे ।।४।।

## २६१

पहाण्याची आटाआटी । स्वानुभव तेथे दृष्टी ॥१॥
दृष्टीमाजी भरले तेज । निज तेजामाजी निज ॥२॥
निज निःशब्द अभेद । आनंद तो आगळा शुद्ध ॥३॥
दृश्य पहाणे मन आटले । दासरामी मौन झाले ॥४॥

## २६२

घननीळ भरला दृष्टी । पहाण्याची आटाआटी ॥१॥
कैचा देखणा बुडाला । निश्चळ पहाणे पे पहाला ॥२॥
शुद्ध चैतन्य समरस । सदानंद घन सर्वेश ॥३॥
दासरामी समाधान । आत्मारामी निवेदन ॥४॥

## २६३

निमित्ते रचिले निमित्ते भासले । निमित्ते पातले त्यात काही ॥१॥
निमित्तेची केले निमित्ते नासले । निमित्तेची झाले सर्व काही ॥२॥
निमित्तेची हसे निमित्तेची रडे । निमित्तेची घडे दृश्य सारे ॥३॥
निमित्तेची गुरु भेटले सहज । निमित्ते सहज नामी आलो ॥४॥
निमित्तेची झाली दासावरी कृपा । निमित्तेची सोपा देव झाला ॥५॥

## २६४

सद्गुरु उदार माझा मायबाप । त्रिविध हे ताप जाळियेले ॥१॥
एकांती नेऊनी तेथे मेळविले । एकमेव केले अद्वितीय ॥२॥
नामघोष गाजे परिसला कानी । स्थिरची होऊनी ठेलो तेणे ॥३॥
राम हा मिळाला सुखाचे सागरी । तरोनी संसारी आनंदाने ॥४॥

## २६५

दाटला प्रकाश । हर्ष झाला आनंदास ॥१॥
तार चाले ऊर्ध्वगती । पावली ते निजस्थिती ॥२॥
मन झाले तदाकार । तेथे हरपले विचार ॥३॥
दास म्हणे कृपा झाली । जीवा मिळाली साऊली ॥४॥

२६६

वेडियाचा गाव वेडाची सांगेल । वेडाची जाईल वेड्यापाशी ॥१॥
वेडियाचे छंदे नाचू लागे वेडे । वदनी पोवाडे देवाजीचे ॥२॥
वेड मोठे सारे जगाच्या वेगळे । जनाच्या आगळे दावी काही ॥३॥
दासराम साधुसंगे वेडा झाला । अबोलाच्या बोला बोलोनिया ॥४॥

२६७

अमृताची धारा चाखिली निजगोडी । येर ती वावडी सर्व आम्हा ॥१॥
रामनामामृत दुर्लभ दुर्लभ । गुरुकृपे सुलभ सत्य सत्य ॥२॥
सुखदुःख द्वंद्वापासोनी सुटलो । अमरची झालो गुरुकृपे ॥३॥
आनंदसागरामाजी पै बुडालो । तद्रूपची झालो दास म्हणे ॥४॥

२६८

पूर्व पाट तो उलटुनी केला सपाट सद्गुरुनी ।
गतिकारणे प्रवाह बदले गेला वर तेथुनी ॥१॥
त्रिकूटस्थानी संगम झाला तीन प्रवाहांचा ।
तयात मज्जन करिता ठेवा हाती आला बहू साचा ॥२॥
सद्गुरुस्वरूप पहाता तल्लीन झाली असे वृत्ती ।
प्राणज्योती ते विरोनी गेली पावली आत्मस्थिती ॥३॥
आत्मस्थितीने जाता वरती पावले मूळ घर ।
मूळ घरी जाहली विश्रांती दासाचे माहेर ॥४॥

२६९

नेत्र मिटलिया अंधार तो दिसे । तेणे उमगतसे खरे खोटे ॥१॥
ज्याचे योगे घडती वरलिया गोष्टी । तोची पडता दृष्टी खरे सुख ॥२॥
बुद्धिसंवेदना होती ज्याचे योगे । तयाचा वियोग झाला असे ॥३॥
दासराम म्हणे गाता रामनाम । होय पूर्णकाम सहजेची ॥४॥

२७०

अंतरात नाद कसा घुमतसे पहा । नादमयी जहाल्या शिव कळतसे अहा ॥१॥
शिवस्वरूप गाठताची भेद तुटे हा । भेद जाता अभेदची नुरती सहा ॥२॥

सहा तरी मावळले उरती ना दहा । दहा नाश पावताची सुखरूप हा ॥३॥
ऐसो ग्वाही देती पाही चार आणि सहा । गुरूकृपे अहं जळुनी उरतो राम हा ॥४॥

## २७१

उत्पत्ती व लय दोनी मिथ्याभास । हरिभक्त डोळस न देखती ॥१॥
पतित जे जीव अनुभविती हे । आत्मरुप पाहे विसरोनी ॥२॥
सद्‌गुरूकृपेने नुरेचो विसर । अनहत गजर श्रवण होय ॥३॥
पातालापासुनी स्वर्गाचे वरती । कैसी हंसगती चाले देही ॥४॥
पाताल स्वर्गासी ओलांडुनी जाता । दासा येई हाता मूळब्रह्म॥५॥

## २७२

दशमद्वार ओलांडिता । सहजस्थिती येई हाता ॥१॥
सकार हकाराची स्थिती । प्राप्त होता पेटे ज्योती ॥२॥
लागताची उन्मनी ज्योती । आत्मरूप येई हाती ॥३॥
दासराम मौनावला । अबोलाच्या बोले बोला ॥४॥

## २७३

पोटापाठीमागे धावताती सर्व । पाठीचा अनुभव कोणी न घेती ॥१॥
ध्यानी मनी स्वप्नी एकरूप झाले । चतुर्दली दिसले हंसरूप ॥२॥
हंसावरी राम विराजीत दिसती । जन्ममरण पंगती नुरली दासा ॥३॥

## २७४

अभेद जाणुनी स्वस्थ असावे । काय घडे ते नेत्री पहावे ॥१॥
नेत्र होऊनी नेत्र पहावा । पाहणे सरे बोल सरावा ॥२॥
काय वर्णू या आत्मस्वरूपा । पापपुण्य ते जळुनी जाई पा ॥३॥
दासराम हा स्तब्ध जाहला । नुरली आशा सकळ उमगला ॥४॥

## २७५

शब्दाचा निःशब्द निःशब्दाचा शब्द । कळल्या आत्मबोध आन नसे ॥१॥
कंठी वाहे कैचा अमृतप्रवाह । सेविता अपूर्व कळो येई ॥२॥
दास म्हणे केल्या मनावरी मात । खरा परमार्थ दूर नसे ॥३॥

२७६

हृत्पटली देखिले चिन्ह आत्मयाचे । प्रकाशिले साचे दिव्य तेज ॥१॥
अंतःकरणी तेची ते जाणावे हृदय । जे का मनोमय असे सदा ॥२॥
जरी पराङ्मुख अंतर होईल । तयात भरेल स्वस्वरुप ॥३॥
मकार हकार काढुनी टाकिला । ॐकार उरला शब्दघोष ॥४॥
ॐकारी बिंबले स्वरूप आपुले । नाम घेता उगले कळो येई ॥५॥
अहंता टाकोनी स्वस्थ चित्ते पहाता । सर्व येई हाता राम म्हणे ॥६॥

२७७

चामड्याच्या मुखे बोलितो उत्तरे । वाहताती झरे अंतर्यामी ॥१॥
घेऊनी प्रत्यय देव बोलवितो । तोची तो साक्षी तो ओळखावा ॥२॥
जयाच्या शरीरी अहंभाव असे । जाणावा राक्षस हीन घाती ॥३॥
तयाते न कळे हिताहित काही । ओढवोनी घेई दुःख पदरी ॥४॥
सर्व भार ज्याचा देवावरी आहे । तयालागी साह्य देव करी ॥५॥
कृपेची पाखर सद्गुरूनी घातली । दासरामा लाधली आत्मकळा ॥६॥

२७८

आरक्ताचा लय श्वेतामाजी झाला । श्वेत तो निमाला पीतामाजी ॥१॥
पुढे नीलबिंदू लखलखाट होय । तेज न समाये गगनोदरी ॥२॥
अणुरूप ब्रह्म प्रचीतीसी येता । जीवात्म-ऐक्यता सहजेची ॥३॥
महद्ब्रह्मी दोनी समरस होती । साधन एकांती घडता दासा ॥४॥

२७९

गगनी भासले अंतरी ठसले । अवघेची झाले सर्व ब्रह्म ॥१॥
विहंगमासरिसा गेलो अंतराळी । दिला असे बळी जीवात्म्याचा ॥२॥
अनुभवे अनुभव अनुभवासी आला । आनंदासी झाला परमानंद ॥३॥
संता विचारोनी वाट चालियेली । गती आक्रमिली साधनयोगे ॥४॥
दासराम म्हणे पद्मनाभ जोडे । जरी काही घडे साधन बरवे ॥५॥

## २८०

दृष्टीबंधनाने साधे जो प्रकाश । नसे तो अविनाश निजत्वाचा ॥१॥
स्वयंप्रकाश तो नामाचे स्मरणी । निजत्वाचे स्थानी पहाण्यापैल ॥२॥
जेथे नाही दृश्यादृश्य शद्वाशद्व । निजत्व निःशद्व अखंडत्वे ॥३॥
त्रिपुटीचे पैल आत्म्याचा प्रकाश । ते वस्तू डोळयास व्यापियेली ॥४॥
दृष्टिये माझारी निजे तेज व्यापिले । पहाणे बुझाले पहाताची ॥५॥
पहाता येई तो प्रकाश सभेद । परत्र प्रसिद्ध परावीय ॥६॥
प्रकाश दृष्टीचा खेळ साधकाचा । निजस्मरणाचा केवल तो ॥७॥
दासरामा झाला अंधारी प्रकाश । अणु परमाणूस व्यापियेला ॥८॥

## २८१

समत्वाचे सुखी नादरुप राम । श्रवणी पडे परम हरिकथा ॥१॥
तेची तुकाराम मायबाप मूर्ती । सगुणरुपे दिसती भक्तालागी ॥२॥
तुकारामरुपी निवताहे मन । मनाचे उन्मन होत असे ॥३॥
तेथे नारायण होती अवतीर्ण । प्राणाचे स्पंदन तेजोरुप ॥४॥
हनुमंतकृपे पावे आत्मस्थिती । अंतरात प्रीती वाढो लागे ॥५॥
संतसंगे कैसा पावलो या ठाया । हरिभक्ता छाया केली त्यानी ॥६॥
दासराम झाला दासांचाही दास । न करिता सायास फळ लाभे ॥७॥

## २८२

त्रिकुटाची ताटी उघडे सद्‌गुरु चंद्रमौळी ।
ज्ञानदीप पाजळला तेथे आत्मस्वरुप उजळी ॥१॥
तेथील वर्णन बोलता नये साधनी रंगुनी पहावे ।
साधन केल्याविना उगाची ठेऊ नये नावे ॥२॥
सद्‌गुरुस्वरुप आत्मस्वरुप दोनी एकरुप ।
ऐसा प्रत्यय येईल तेथे होसी तू निष्पाप ॥३॥
दास म्हणे हा संशय तुटतो अंतर्यामीचा ।
चढता उतरता घुमो लागते रामकृष्ण वाचा ॥४॥

## २८३

हकार सकारी मावळे । सकार अंतरीचा गळे ॥१॥
झणझणाट ॐकाराचा । अद्वय शब्द घोष साचा ॥२॥
अद्वैताची भक्ती जडे । अभावना सर्व उडे ॥३॥
अनुभवी अनुभव । अनुभवे घे नवलाव ॥४॥

## २८४

आहे अहंकाराचे पाणी । झिरपे सदा दो नयनी ॥१॥
आता फुटता पाझर । काही होय साक्षात्कार ॥२॥
नेत्री बिंदुले झळाळे । तेज अपरंपार निळे ॥३॥
त्यात उमटे आत्मबिंब । प्रगट होय पद्मनाभ ॥४॥
त्रिपुटीचा ग्रास झाला । रामी राम तोची उरला ॥५॥

## २८५

न बोलावे काही खरे त्यात सुख । अनुभव एक घ्यावा याचा ॥१॥
अबोलाचे मेळी राम राम बोल । उकलोनी खोळ शब्दजाळ ॥२॥
नाम कोटी कोटी उच्चारिता कंठी । साक्षात्कार भेटी होय त्यासी ॥३॥
कोटिनामे येती कोटीने प्रचीती । समाधान चित्ती वाढो लागे ॥४॥
काय लोकापाशी बोलणे अनुभव । भावापरी देव भाविकासी ॥५॥
दासरामा कळली काही वर्मखूण । कृपेचे वचन बोलुनी गेलो ॥६॥

## २८६

हनुमंतराय कृपा जरी होय । वोळे रामराय तयावरी ॥१॥
मग काय उणे स्वरुप देखणे । पाहोनी पहाणे आत्मरुप ॥२॥
आत्मरुप झाले जनी आणि विजनी । लागता उन्मनी नामछंदी ॥३॥
छंदे साधू जाता काय होत नाही । दासरामा होई नामी तृप्ती ॥४॥

## २८७

बालकाचे दोष मातेसी न दिसती । तैसा तो श्रीपती पाहे मज ॥१॥
थोर त्याची कृपा थोर त्याची कृपा । म्हणोनी तो सोपा झाला मज ॥२॥
लाभ हाती दिला लाभ हाती दिला । घेवोनी सेवेला अज्ञानाच्या ॥३॥
भाव ओळखोनी फिरविले अंतर । दास म्हणे अपार दयासिंधू ॥४॥

## २८८

शद्ध ते सगुण अशद्ध निर्गुण । व्यक्ताव्यक्त शून्य प्रकृती ते ॥१॥
तयापैल पुरुष देखे जगदीश । नामी अपरोक्ष अनुभव ॥२॥
निरपेक्ष निर्विकल्प अनासक्त । व्यापक तो भक्त सर्वाभूती ॥३॥
हनुमंतराये सार ऐसी वाणी । वदविले वाणी भक्ताचिया ॥४॥
कृपेची हे वाणी हनुमंतचरणी । अर्पी लोटांगणी दासराम ॥५॥

## २८९

माझी तुझी एक गाठी । आरंभिली जइ सृष्टी ॥१॥
सकळही जन्मी तुझी भेटी । तूची माते शेवटी ॥२॥
म्हणूनी तुला विनवणी । मजला नेई निरंजनी ॥३॥
तूची माझे समाधान । दासरामाचे जीवन ॥४॥

## २९०

शशी आणि शशिकांत । मायबाप ते समर्थ ॥१॥
तेथ आमुचे जीवन । सर्वाआदी जीवपण ॥२॥
तेथिचिये आम्ही प्राणी । आम्हा जाणे निरंजनी ॥३॥
इये पहाता चिद्‌गगनू । दासरामी आत्मभानू ॥४॥

## २९१

विश्वी भरला नारायण । धरी अहंभाव कोण ॥१॥
माझा मी या मीच भेटे । पहाणे अंतरीचे दाटे ॥२॥
पहाण्याचा झाला अंत । दासरामी भगवंत ॥३॥

## २९२

तळमळ मना फार जाली । चित्ताची वृत्ती डहुळली ॥धृ॥
कधी हरी भासे कधी आभासे । कधी हा लपुनी छपुनीच असे ।
कधी हा आपणची दावी ऐसे । तेथची वृत्ती रिघाली ॥१॥
कधी हा द्वैती कधी अद्वैती । कधी बहुरंगी गुंतवी चित्ती ।
कधी हा सकळही लोपवी वृत्ती । दासरामी खूण आली ॥२॥

## २९३

लपसी छपसी कोठे देवा कळली तुझी खूण ।
किती वेळ घेसी पंचभूतांचे पांघरुण ॥१॥
नामरुप गुणातीत पाहू तुझे ध्यान ।
पहाता मीपण आटे जाऊ तेची होऊन ॥२॥
दासरामा हृदयी रामकृष्ण हरिगान ।
गाता गाता साधे सहज भक्तिसाधन ॥३॥

## २९४

अनंत आत्माराम जगी हा नटला एकला ॥ध्रु॥
सर्व पहाता तोंची असोनी पहाता कोणी न उरला ।
पहाता पहाणे मावळले आजी आपआपणा पहाला ॥१॥
चंचळ आत्मा सगुण वितरुनी निःशब्दची हा आथिला ।
दासराम हा पहाता पहाता आनंदीच रिघाला ॥२॥

## २९५

भेटू या रामा । आज मनी भेटू या रामा ॥ध्रु॥
मनाआधी चित्त चित्ताआधी बुद्धी । बुद्धीपैल परात्मा ॥
मन मारुनी तेची होऊ या । करुया पूर्णची कामा ॥१॥
हरिहरसंगे हरिहर होऊ । रामकृष्ण या नामा ।
काम सांडिता एक निरंजन । दासरामी निष्कामा ॥२॥

## २९६

अभ्र जै वितळे । तरी आकाश निवळे ॥१॥
तैसे आता माझे मन । शुद्ध करितो नारायण ॥२॥
हेची सहजस्थिती । चोखट हे आत्मवृत्ती ॥३॥
दासरामी कृपा करी । सहजची माझा हरी ॥४॥

## २९७

हरिकीर्तनी या रंग सुखाचा । संतजनी पहाला आजी या ॥१॥
भक्तिप्रेमा ओतप्रोतची । भजन लहरी ही स्वानंदाची ।
नादरुप ही वृत्ती मनाची । तोषविते सकळा ॥२॥

श्रोता वक्ता भान हरपले । ब्रह्मानंदे तनु ही डोले ।
समरस होवुनी नाचती मेळे । वानिती नामाला ॥३॥
हरिभक्त हा रंगी रंगला । नामब्रह्मी या तदाकारिला ।
निवांतपणी या पूर्णची धाला । दासरामी रमला ॥४॥

## २९८

आदळे कोठुनी लाट । पाहू या नीट ।
डहुळ ते सारूनी । हाते शोधूया वाट ॥१॥
लाट ही केवढी बाई काठोकाठ । जीवभाव दडपे माझा आडवाट ॥२॥
आडवाट शिरले पाणी दो नयनी कळि या साठ । कानीची वाट मुझाली जीवनपाट॥३॥
साठही रोधिल्या वाटा बिनबोभाट । बांध हे फोडुनी पाणी पहाले दाट ॥४॥
साठ हे सांडूनी शोधू एकसण्ट । निवळले जीवन पहाता जे निघोट ॥५॥
तेथची साधू या मनीची एकवट । हरिठायी दासराम हा विनट ॥६॥

## २९९

मीतूपणे बुझ । सांडोनिया आत्मनिज ॥१॥
अहंकाराची लहरी । दावी आत्म्याची कूसरी ॥२॥
सर्वत्र श्रीहरी । घनदाट चराचरी ॥३॥
तोची पहाणेपणा आला । चंचळगुणे सर्वो पहाला ॥४॥
दासराम शरण तेथे । कृपा केली सद्‌गुरुनाथे ॥५॥

## ३००

करील हरीच विचार मीतूपणे ॥ध्रु॥
तोची एक जगी असुनिया परी । दावी त्रिगुण असार ॥१॥
संत सांगती सर्व तोची करी । त्याविण न च भवपार ॥२॥
मीतूपण हे शोधुनी पहाता एकची । त्रिभुवन निसार ॥३॥
दासरामी गुरु सकल । हरिरुप हरिवाचे उच्चार ॥४॥

## ३०१

ज्याचा तोची करी विचार । जैसा तैसा अपरंपार ॥१॥
अनंत ते एकतत्त्व । निरुपाधी स्वयमेव ॥२॥
दावी अहं निरहंकार । साकार वा निराकार ॥३॥
दासरामा त्याचा छंद । कृष्ण विष्णू हरी गोविंद ॥४॥

३०२

अहंकार निरहंकार । साकार ते निराकार ॥१॥
लहरी ते अनंताची । दिठी नुरली मीपणाची ॥२॥
सर्व ब्रह्म ते निःशद्ब । दासरामी कैंचा शद्ब ॥३॥

३०३

कृष्ण विष्णू नारायण । हेची हरिनाम कीर्तन ॥१॥
तार मंद्र घोर स्वर । दशनादाचा प्रकार ॥२॥
शून्य वृत्ती बुका भाळी । दीपज्योती नामावळी ॥३॥
श्रोता वक्ता नारायण । दासरामी समाधान ॥४॥

३०४

नाही तबला पेटी नाद । नाही साद गोडीचा ॥१॥
नाही श्रोता नाही वक्ता । तूची अनंता एकला ॥२॥
नाही देव नाही भक्त । व्यक्ताव्यक्त असतेची ॥३॥
नाही गाव नाही ठाव । वासुदेव हरी एक ॥४॥
राम नारायण कीर्तन । दासरामी निरंजन ॥५॥

३०५

लटिका भक्त लटिक्या रीती । करी भक्ती लटिक्याची ॥१॥
करितो लटिके हे कीर्तन । कृष्ण विष्णू नारायण ॥२॥
लटिके गाये लटिके ध्याये । लटिके होये रुप नाम ॥३॥
पूर्णब्रह्म नारायण । तेथे दासराम कोण ॥४॥

३०६

करणीचा पाठ कैसा झाला डोळा । परियेसी मुळा प्रेमळू रे ॥१॥
करणी ते कृती त्याचा झाला कर्ण । स्मरणे गगन दिसो आले ॥२॥
तेथे मन श्रवणी त्याची झाली वाणी । पुढे कमावणी तोची डोळा ॥३॥
दासरामा देखे तेथे निजरूप । आनंद अमूप माधवाचा ॥४॥

३०७

कर्णीमाजो पंचशून्यांचे आवरण । तेथे पंचप्राण पहाणी रे ॥१॥
तयापैल पाहे नामाची करणी । तेची झाली वाणी चक्षुरुप ॥२॥
पंचभूता आत उमटली वाणी । सूक्ष्म निरंजनी वाट लाही ॥३॥
कर्णातूनी ब्रह्मरंध्रापैल जाई । दासरामा होई तृप्तिरूप ॥४॥

३०८

हनुमंतराय तोषले भगवान । जहाले प्रसन्न पूर्णत्वाने ॥१॥
ईश्वराचे देणे सिद्धांचा प्रसाद । कृपेचा आनंद सद्‌गुरुंच्या ॥२॥
आशिर्वाद थोरांचा संतोष सर्वांचा । आमोद मनाचा अमोलची ॥३॥
सकळांची भीक आली असे हाता । दासराम स्वता तेथे धाला ॥४॥

३०९

गगनाचे पाठी साक्षात्कार भेटी । निर्गुणाची सृष्टी गुह्यभाग ॥१॥
सगुण निर्गुण दृश्य आणि अदृश्य । त्यापैल सौरस परमात्मा ॥२॥
निरालंब आलंब सांडोनिया दोनी । पावे ब्रह्मखाणी ब्रह्मरूपे ॥३॥
आलंब ते खूण निरालंब मार्ग । पुढे आत्मयोग गुप्त कळा ॥४॥
संत ते पावली तेथे निजशांती । दासरामा बोधिती हनुमंत ॥५॥

३१०

आत्मयोग झाल्या पावे आत्माराम । आरामी आराम आरामासी ॥१॥
नाहीच साधन आसन बंधन । धारणाची ध्यान समाधी गा ॥२॥
अद्वयाची टाळी अखंड स्मरण । भजन कीर्तन निरंतर ॥३॥
गुरुलिंगजंगम बोधिती सुगम । आगम निगम मार्ग दावी ॥४॥
येणे जाणे जेथे नाहीच उरले । तेथे स्थिर केले तेणे आम्हा ॥५॥
दासराम म्हणे आता न बोलणे । हेची योग्य होणे सत्य सत्य ॥६॥

३११

आत्माराम धाला आत्माराम धाला । बरवा भेटला सुखठेवा ॥१॥
संतांनी टाकिला मोक्षासीही मागे । निर्गुणाचे संगी होऊन पुढे ॥२॥
ते सुख सांगता नये माये । कैवल्यपाठाचे कैवल्य ते ॥३॥
नारायण रघुनाथप्रिय राम । हनुमंत परम संत जेथे ॥४॥
दाविती हे मात अंतराअंतरी । दासरामे सत्वरी धरिले ॥५॥

## ३१२

बोधिती श्रीगुरु प्रेमाचे सागरू । ज्ञानाचे आगरू सिद्धराज ॥१॥
निःसंदेह केले संदेह निरसोनी । अघटित करणी अंतरीची ॥२॥
अंतरा अंतर कळे जैसे तैसे । दासरामा कैसे ज्ञान दिले ॥३॥

## ३१३

तुझाची प्रसाद देताहे आनंद । नको मज छंद येर देवा ॥१॥
प्रसादेची तृप्ती पावले अंतर । उघडे अंतर बोलो नये ॥२॥
मिळाले माझे हे तुजसी अंतर । तुमचा विचार तुमचे माथा ॥३॥
कवी होवोनिया यावे प्रसिद्धीसी । हे नाही मानसी हृषीकेशा ॥४॥
कोण बोले बोल कासयाकारणे । काय होणे जाणे कळेचिना ॥५॥
परी बोलताहे मुख सर्व काळ । तुमची केवळ करणी हे ॥६॥
आपुली हे कृती पाठवी संतोष । अंगी भक्तिरस दासरामा ॥७॥

## ३१४

पृथ्वी आप तेज बिंदुमात्र ग्रास । पंचभूत अंश सूक्ष्म देह ॥१॥
अमृताची धारा रत्नाकरी फुटता । कांती येई चित्ता प्रकाशाची ॥२॥
आनंदाची पुष्टी अंगी ते ब्रह्मांडी । सिद्धावस्था घडी शून्याकार ॥३॥
दासरामालागी सद्गुरू दाविती । सिद्धांची प्रचीती बोधियेली ॥४॥

## ३१५

चिदानंद वस्तू गगनी व्यापिली । निःशद्बे जाणिली संतानी या ॥१॥
निःशद्बी यावया करी शद्बग्रास । घेई श्रवणास एक शद्ब ॥२॥
शद्बाते ग्रासोनी जाय अलक्ष्यस्थानी । तेथे घेई श्रवणी महानाद ॥३॥
महानादी विरे जीव भावाभाव । देखे स्वयमेव आत्मगाभा ॥४॥
तेथे होय सर्व आघवाची डोळा । अवघाची झाला चिदानंद ॥५॥
दासराम प्रार्थी गुरूचरणासी । राहो हे मानसी बोधरूप ॥६॥

## ३१६

ताकाचेपासोनी दही अलग केले । मुळीच देखिले दुग्धरुप ॥१॥
सतरावी मंथोनी घेतले नवनीत । परब्रह्म हस्तगत केले ॥२॥
ब्रह्मा विष्णू महेश न पवती तेथे । मन बुद्धीपरते स्वरूप तिचे ॥३॥

सहज समाधी सहजेची दावी । नयनी दाखवी तेजोरुप ॥४॥
सद्गुरुचे नयनी अर्धमात्रेतोनी । चौदेह सांडोनी स्वरुप दावी ॥५॥
ब्रह्मरंध्रापैल सतरावीची कळा । जाणे तो आगळा योगिराज ॥६॥
ज्ञानेश्वर तुकाराम संतवचन खूण । बोधिती हनुमान दासरामा ॥७॥

## ३१७

बाहुलीचे माजी सद्गुरुचरण । नयनी नयन साठविले ॥१॥
नयनी नयन उफराटा होऊन । ठेविला हा प्राण हृदयस्पंदी ॥२॥
हकार विरता स्वामींचे चरण । देखिलेसे जाण उलट दृष्टी ॥३॥
उलट हे दृष्टी उलट हे गती । उफराटा चित्ती मंत्र साजे ॥४॥
उलट हा प्राण झाले मनोन्मन । वंदिले चरण दासरामे ॥५॥

## ३१८

सूर्य चंद्र दृष्टी रवि शशी पोटी । जडता उठाउठी सौख्य जीवा ॥१॥
जीव शिव तेज रामकृष्णी मिळे । ललाटी उजळे त्रिनेत्र हा ॥२॥
ज्ञानदृष्टी अनादी शिवाचे दर्शन । नाद ब्रह्मखूण अनुभवी का रे ॥३॥
दासराम सांगे साधनाची कळा । कवतूक डोळा देखावे हे ॥४॥

## ३१९

टाळूचिये उपरी विवरामाझारी । रेणू फिरे भारी अती सूक्ष्म ॥१॥
असे लखलखीत कैसा तेजोबिंदू । भेटवी अगाधू परमात्मा ॥२॥
आकाशीचा रेणू देखिला न कोणी । परी नित्य ज्ञानी पहाती त्याते ॥३॥
दृश्यादृश्याकारण असे सूक्ष्म रेणू । जेथे पंचप्राणू होती गोळा ॥४॥
जेथोनिया झाला विस्तार देहाचा । वायूचा मनाचा लय जेथे ॥५॥
कंठाचेपासोनी अर्धमात्रेपैल । फिरे जो सोज्वळ बीजरूप ॥६॥
आकाशाचे स्थानी खेचूनिया नेई । जीवभाव जाई पूर्ण विलया ॥७॥
दृष्टीचे देखणे वाचेचे बोलणे । आकाशाचा गुण ग्रासोनिया ॥८॥
आकाशाचे पोटी दावी ब्रह्मरूप । माया निर्विकल्प मुळीच दावी ॥९॥
माया ब्रह्म एक एकपणे दावी । मात हे ऐकावी रेणूची ते ॥१०॥
तारकरुपाचा असे रेणू अंश । जेथे अवकाश उदेले हे ॥११॥
तेजोबिंदुपोटी पंचभूत सृष्टी । देखणे हे दृष्टी नाममात्र ॥१२॥
दृष्टीचे देखणे दृश्य हे केवळ । अदृश्य निर्मळ शून्यरूप ॥१३॥
त्याचेपैल रेणू दावी आत्मरुप । मिळूनी अपाप जातो तेथे ॥१४॥

दृश्यादृश्य आत्मरूपी रेणू आहे । जगात्रयी पाहे दावीतसे ॥१५॥
रेणूमाजी भगवंत पहाती सिद्धसंत । गुरुकृपे भक्त जाणताती ॥१६॥
विज्ञानाचे सार वेदांताचे गुह्य । दावी गुरुमाय दासरामा ॥१७॥

३२०

झाला पहाण्याचा अंत । पहाणे बुडाले चित्तात ॥१॥
चिदाकाशी चित्त आले । चित्त चित्तासी भेटले ॥२॥
पृथ्वीमाजी उठला बोल । आला डोल आकाशी ॥३॥
धरणी आकाश भरली वीजू । झाला आवाजू घनघोर ॥४॥
सद्‌गुरु हनुमंतांचे देणे । सर्व लेणे मोत्याचे ॥५॥
दासराम याचक झाला । सेवुनी धाला गुरुबोधू ॥६॥

३२१

देखणा हा जेव्हा विसरला देखणे । तेथे आपुलेपणे भेटी झाली ॥१॥
आपुलिया आपण आपुलिये ठायी । भेटो आले देही निजत्वेसी ॥२॥
सद्‌गुरुंचे नवल सद्‌गुरु जाणती । गुरुभक्त घेती डोल याते ॥३॥
संत ब्रह्मानंद भारले या भरे । दासराम सत्वरे स्वये हासे ॥४॥

३२२

सूर्यचंद्र गिळुनी डोळा । दावीतसे घननीळा ॥१॥
धन्य धन्य हा त्रिनेत्र । तेथे घुमघुम करी मंत्र ॥२॥
दासरामा तेची धूम । जेथ जीवासी विश्राम ॥३॥

३२३

दावी ज्योतिचिये ज्योती । नामकिरण पडो चित्ती ॥१॥
निजत्वाचिये उजेडी । पर इच्छा मारी दडी ॥२॥
स्मरणाचे पूर्णरूप । चिदानंद सत्स्वरूप ॥३॥
दासराम वाट पाहे । विज्ञानेची होऊनी राहे ॥४॥

३२४

हरिनामाचा प्रकाश । ज्ञानाज्ञानाचा निरास ॥१॥
तेथे विज्ञानाचे काम । विज्ञानी तो भक्तोत्तम ॥२॥

कोटी कुळे ती पुनीत । शास्त्रवचन सिद्धांत ।।३।।
दासराम तया शरण । सेवा करी रातंदिन ।।४।।

## ३२५

वस्तू डोळियांचा ग्रास । करूनी राहिलो अविनाश ।।१।।
तरी हे निजत्वाचे पहाणे । भरुनी ठेले अखंडपणे ।।२।।
पहाणे पहाले आदिअंती । तेथे सरली दिनराती ।।३।।
पहाणे भरले सर्वाठायी । पहाण्याविना वस्तू नाही ।।४।।
जेथे खुंटले बोलणे । दासरामी सत्य पहाणे ।।५।।

## ३२६

आल्हादचक्रस्थानी उठती नाना रंग । परी ते भासांग प्रकृतीचे ।।१।।
सकळा कारण एक नामब्रह्म । येर ते अनाम शब्दरुप ।।२।।
शब्दाशब्द प्रकृती भावाभावस्थिती । दृश्यादृश्य चित्ती शून्यरुप ।।३।।
देखण्याचे खेळ देखोनी देखिजे । अलक्ष्योनी लक्षिजे निजरुप ।।४।।
दासरामा वस्तू अलक्ष्य लक्षवेना । देखणे उरेना नामाठायी ।।५।।

## ३२७

होऊनी लेक । पाहिले आपुले सुख ।।१।।
सासर सोडुनी गुरुघरी गेले । निजठायी मन मन स्थिरावले ।।
आपुले आपणा शोधिले । सरले दुःख ।।२।।
नामस्मरणे अंतरी गेले । श्वासोश्च्छवासी नाम साधले ।।
गुरुराये मम लाड पुरविले । हारली भूक ।।३।।
सद्गुरुलेक सांगते सकळा । एकची लेई आपुले डोळा ।।
दास म्हणे तू भोगी सोहळा । अंतरी देख ।।४।।



## कूट : ६

३२८

ऐसा मी देखिला प्राणी । गुरूचे नयनी ।।ध्रु।।
ज्यासी नाही एकही अवयव । परी नानाविध करी जो भाव ।।
आपणची अनेक होऊनी सर्व । बहू रंगानी ।।१।।
लटिके परी ते सत्य भासवी । भ्रम हा सारा उगाच नाचवी ।।
सर्व सूत्र हे कसे खेळवी । स्वकरी धरोनी ।।२।।
करुनी अकर्ता धरोनी अधर्ता । काळा हाटवी ऐसी सत्ता ।।
कर्माकर्मी दिसतो चित्ता । अलिप्तावाणी ।।३।।
गोडी चाखे रसनेवीण । सर्वही देखे चक्षूवीण ।।
कृपाळूपणे भक्तालागून । पाळितो जाणी ।।४।।
पायावीण त्रिभुवनी गमन । कराविण व्यवहारी पूर्ण ।।
माया अन्य साधनावीण । उभारिली ज्यानी ।।५।।
माया म्हणजे काहीच नसुनी । द्वैती गुंतवी जनालागुनी ।।
दासराम लागे चरणी । धरी भुजानी ।।६।।

३२९

पोहत्यावरी पोहे पाणी । मासा वाचवी त्यालागोनी ।।१।।
उलटा मासा बेडका ग्रासी । राहता नये भुजंगासी ।।२।।
भुजंगापोटी ते मांजर । कुत्री खाय ते साचार ।।३।।
संताघरी ऐसी खूण । दासरामा हे प्रमाण ।।४।।

३३०

सूर्यचंद्र पृथ्वीभोवती । एका काळी सम ते फिरती ।।१।।
पृथ्वी स्थाणुरूप स्थिर । त्याचे समभाग नीर ।।२।।
पृथ्वी बुडाली पाण्यात । त्याभोवती सागर सप्त ।।३।।
पाणी चढते आकाशी । खाये दिन आणि निशी ।।४।।
वायु-अग्नीची मिळणी । शद्ब ग्रासे निःशद्बेनी ।।५।।
आकाश ग्रासते शद्बासी । शद्ब ग्रासे आकाशासी ।।६।।
ऐसी असे देहीची शोभा । दासराम बोले गाभा ।।७।।

## ३३१

बैले व्यापिला बेडूक । बेडूक वाढला निःशंक ॥
बैलाएवढा विशेख । विस्तारला निजांगे ॥१॥
ऐसी अघटित कळा । जाणे तो योगी आगळा ॥
समत्वाचा झाला डोळा । घननीळा देखोनी ॥२॥
वाघ असूनी मेंढीपरी । राजा असूनी झाला भिकारी ॥
आपरुप न देखिले चतुरी । अंतरी ओळखी बुडाली ॥३॥
आपरूप साठले नयनी । ते देखिले उलट नयनी ॥
ब्रह्मरूप गुरुचे अंजनी । पहाता कळले अवघे एक ॥४॥
सुख झाले सुख झाले । न घडे ते घडो आले ॥
जेणे ऐसे निज दाविले । पाय धरिले दासरामे ॥५॥

## ३३२

द्विपाद तो दिसे पाहता त्रिपाद । तोची एकपाद पुढे दिसे ॥१॥
एका पायावरी कैचा हा अंगणी । नाचे चापपाणी घननीळ ॥२॥
दिन आणि निशी प्रसादाचे छंदे । नाचतो आनंदे प्रेमभरे ॥३॥
प्रेमाचे भरते कदा नोहे रिते । उतार चढ ते नाही नाही ॥४॥
आकर्षण कृष्ण राम हा उत्कर्ष । अंगी ब्रह्मरस ठसा उमटे ॥५॥
संत सद्गुरूंचे चरणी अनुभव । गुरू संतराव बोधिती माते ॥६॥
शद्बाचे पद पदाचा तो अर्थ । अर्थाचा सिद्धांत प्रसादू गा ॥७॥
प्रसादेचि उकले अनुभवाची मात । दासराम तृप्त अंतरी झाला ॥८॥

## ३३३

आकाशाचे पोटी चमकली बीज । तिचे आदीबीज मुंगीपाशी ॥१॥
मुंगी झाली घार घार झाली बिजली । सूर्यचंद्र गिळी नागासह ॥२॥
एवढ्या मुंगीने ब्रह्मांड ग्रासिले । अवघे दाविले सोहंरूप ॥३॥
मुंगी जाणे एक साखरेची गोडी । वाळवंटी काढी शोधोनिया ॥४॥
हनुमंत सद्गुरुराये ऐसे केले । स्वरूप दाविले मुंगीचे या ॥५॥
मुंगी ते साखर साखर ते मुंगी । दासराम उगी स्वस्थ झाला ॥६॥

## ३३४

पाण्यामाजी खेळे मासा । समाधान पावे कैसा ॥१॥
जीवन तयाचे जीवन । जगता नये जीवनेविण ॥२॥

त्याचे घशामध्ये छिद्र । उलट होता पावे नीर ॥३॥
दासराम बोले खुणे । कळे संतसंगष्टणे ॥४॥

## ३३५

एक प्राणी आढळला माते । नवल दाविले सद्गुरुमाते ॥
पहाता पहाणे अवघेची सरते । एकचि पहाणे उरते गा ॥१॥
पातालाहूनी स्वर्गावरी । त्याची उंची असे भारी ॥
तोंड खाली पोट वरी । पाय ते उपरी तयाचिया ॥२॥
दोनी भुजानी ब्रह्मांड कवळी । चारा खाय वेळोवेळी ॥
ज्याते देखता आवघी तृप्ती झाली । पाहता त्याची ओळखी बुडाली ॥३॥
त्याचे पोटी सुखाचे भांडार । ज्ञान विज्ञानाचे धान्यागार ॥
भक्तिप्रेमाचे आगर । योगक्षेमा अपार संपत्ती ते ॥४॥
तीन नेत्र एक पाय । पुरुष असुनी दिसते माय ॥
दोनी रूपे आटली जेथे माय । मूळरुप आदी बीज ॥५॥
दृश्यादृश्याचा भूपती । जेथे झाली शद्वाची उत्पत्ती ॥
गुण एकत्र पुरुष प्रकृती । मायबाप जगाचा ज्या बोलती ॥६॥
ज्याचे बेंब्रीचेपासोनी । झाली दृश्याची लावणी ॥
त्याचे वरूता होवोनी । पाहे सगुण निर्गुण आटणी गा ॥७॥
धन्य सद्गुरु हनुमंत । धणी माझे श्री.समर्थ ॥
पुरविले जीवीचे मनोरथ । दासराम चरणी विनटला गा ॥८॥

## ३३६

मोत्यावरी शिंपला आहे । शिंपल्यावरी सागर पाहे ॥१॥
पाणबुड्याचे संगती । हाता येईल हे मोती ॥२॥
सप्तसिंधू ओलांडोनी । नीट जाय मेरूस्थानी ॥३॥
तेथे मोत्याचा सागर । बुडी देऊनी काढी वर ॥५॥
त्याचे चाखिताची पाणी । मुक्तरूप दिसे नयनी ॥६॥
आदीबीज मंत्र मूळ । दासरामा ते सोज्वळ ॥७॥

## ३३७

पती हा जन्मला बायकोचे उदरी । ठेला ब्रह्मचारी भोगूनी ते ॥१॥
शून्य ते चंचळ शून्याचा विस्तार । शून्य ते आकार निराकारी ॥२॥
शून्य तेचि लक्ष्य ब्रह्म ते अलक्ष्य । गुरुराव साक्ष स्मरणरूप ॥३॥
अलक्ष्ये ते कैचे चोजविले सार । लक्ष्येची अपार दासरामी ॥४॥

३३८

ससा देखुनी वाघ पळे । गाई मस्तकी फणिवर डुले ॥१॥
तेथे खेळतो हा नाग । मुरली-रवे होतो दंग ॥२॥
मुरली वाजवी श्रीकृष्ण । तयाआतु ब्रह्मखूण ॥३॥
खुणा कळता निजानंद । गुरुभक्तांचा अभेद ॥४॥
जया उमगले हे ज्ञान । दासराम करी नमन ॥५॥

३३९

नागाचे हे विष गाईसी भिनले । अमृतची झाले अंगी रसी ॥१॥
गाईचे उदरी नाग तो जन्मला । भासे भास झाला त्याचे हृदयी ॥२॥
भासे हा आभास आभासे हा भास । जन्मापरी नाश साधी वेगी ॥३॥
आत्मा करी शून्य तरी देहशून्य । पूर्ण समाधान दोनीपैल ॥४॥
दासरामा ऐसा सद्गुरुंचा बोध । तेणे ब्रह्मानंद तोषलासे ॥५॥

३४०

पाल लागली माझ्या हाता । शुभ शकुन झाला चित्ता ॥१॥
डाव्या अंगावरी पडली । ज्योत उजळी द्वयनाशा ॥२॥
पाप सरले पुण्य सरले । मुखी रसाळे रसी रसू ॥३॥
दासरामा समाधान । संतठेवा परम धन । ४॥

३४१

मांजरी ते बसली ताटी । तिने खादली बाई वाटी ॥१॥
वाटी खाऊनी ठेविले दूध । स्तनी धार गे अगाध ॥२॥
चकचक चकचक भात खाल्ला । चट्टामट्टा करूनी ठेला ॥३॥
आपुले दुग्ध आपणची प्याली । आपणा आपण गिळुनी ठेली ॥४॥
चांदणीचा केला ग्रास । सूर्यचंद्र भ्याले तीस ॥५॥
ऐसे गुरूरायाचे नवल । गुरूपुत्रा कळे अकळ ॥६॥
दासराम झाला शरण । सर्वाठायी घडो स्मरण ॥७॥

३४२

पाण्यामाजी बुडला बांधोनी दगड । तरिला तो उघड उघडपणे ॥१॥
प्राण ज्याचा चालिला तो जाणा जिवंत । बसकणे मुक्त आपुले ठायी ॥२॥
चाले तो बसला बसला तो चाले । दासरामा उगले वर्म देही ॥३॥

## ३४३

मासोळीचे पोटी दश रत्ने साठिली । मासोळी धरिली बेडकाने ॥१॥
स्वतः मरोनी धरियेली मुखी । काढियेली शेखी डबक्यातोनी ॥२॥
अमृतप्रवाही सोडोनिया दिली । अखंड पावली तृप्ती तिसी ॥३॥
वाढता मासोळी जहालीसे मोठी । विस्तारोनी पोटी फुटलीसे ॥४॥
दहा (रत्ने) झाली द्रवरूप सागरी । पुढे काय परी झाली देखा ॥५॥
स्वताते सांडोनी हकार दवडोनी । वस्तुरूप होऊनी ठेली माशी ॥६॥
जन्म मृत्यू कैसे अवघी विसरली । बेडकासी दिधली मुक्ती तेथे ॥७॥
वेडूकही तेथे दिसेचीना पाही । नवल हे देही कैसी करणी ॥८॥
अमृताची धारा तेथे देखे वस्तू । जेथे नुरे किंतू सत्य सत्य ॥९॥
सद्गुरुनाथाने केली ऐसी कळा । देवोनिया डोळा निजत्वाचा ॥१०॥
दासराम त्यांचे पायीचा पायीक । मागे हेची भीक विज्ञानाची ॥११॥

## ३४४

दिन आणि निशी खाय मासोळीसी । मासोळी हे ग्रासी बेडुकाते ॥१॥
दिन आणि निशी पोचती आधारी । तेथोनिया वरी होती पुढे ॥२॥
तारकबिंदूचे स्वरूपामाझारी । लोपती सत्वरी सूर्यचंद्र ॥३॥
समुद्रासारिखे स्वरुप उजळे । अभिन्नत्व जळे लाटांचे ते ॥४॥
दृष्टीचा पालट ब्रह्म साठवण । गुरुभक्त पूर्ण जाणती हे ॥५॥
दृष्टीची बाहुली विस्तार पावुनी । ओते जनी विजनी ब्रह्मरूप ॥६॥
दृष्टीत भरले बाहेर वोसंडे । कळे जरी घडे सत्संग हा ॥७॥
स्वरुपाचे पंथी स्वरूप रोकडे । गुरुकृपे आतुडे गुरुभक्ता ॥८॥
दासराम गुरुचरणी विनटला । लाधला प्रसादाचा लाभ तो ॥९॥

## ३४५

मुंगीचे ये मुखी असे बा माणिक । गुरुकृपे निःशंक प्रत्यया ये ॥१॥
माणिकाचा प्रकाश पडे तिही लोकी । मुंगी हे विलोकी आश्चर्याने ॥२॥
मुंगीने देखता तृप्ती होय तिसी । शर्करा ते कैसी स्वये होय ॥३॥
साखर ते होता आत्मरूप लाही । भरे सर्वाठायी एकदाची ॥४॥
आकाश व्यापोनी राहियेली मुंगी । जहाली सर्वांगी निजवस्तू ॥५॥
जाणीव नेणीव वृत्ती मावळली । उपाधी सरली ज्ञानाज्ञान ॥६॥
दासराम सांगे मुंगीची हे मात । गुरुकृपे भक्त जाणताती ॥७॥

३४६

पिंजऱ्यात बैसुनी काय बोले राघू । जाईन मी वेगू आकाशासी ॥१॥
आकाशाचा ठाव घेईन मी वेगी । जाईन उगाउगी आकाशासी ॥२॥
होवोनी मोकळा भोगीन मी सुख । तोडोनिया देख प्रतिबंध ॥३॥
सताड मोकळे आहे सूक्ष्मद्वार । केलासे विचार मनामाजी ॥४॥
नेघेची तो अन्न चारा पाणी वारा । पडला चतुरा उमज देही ॥५॥
गिळोनिया तेज ठेविले अंतरी । न दावी बाहेरी येर न देखे ॥६॥
तोडियेले पंख झाला बहू रोड । पसरिले तोंड देवापाशी ॥७॥
उपाधीचा वेगू ठेविता बंधनी । पहाता नयनी कळो आले ॥८॥
नवद्वारातोनी जाता नये त्यासी । मोह माया त्यासी भुरळ पाडी ॥९॥
पंचभूत देह भ्रमाचा पसारा । न दावी विचारा अंतरी या ॥१०॥
रोड झाल्यावरी सूक्ष्म दसवे द्वार । उल्लंघोनी पार गेला पुढे ॥११॥
पंखाविण मारी भरारी चतुरा । देहामाजी थारा ठेविलासे ॥१२॥
मायेलागी याने चकविले निके । राहिला कौतुके छायारूप ॥१३॥
भरारी माराया निघाल्या साचार । होय दशमद्वार उघडे त्यासी ॥१४॥
नवद्वारी झाली आकाशाची भेटी । पडलीसे गाठी ब्रह्मांडासी ॥१५॥
वेळोवेळी जाई राघू हा उडोनी । येतसे मागोनी आधारासी ॥१६॥
पिंजरा मोडोनी टाकिला तयाने । तोडिली बंधने क्षुद्रभाव ॥१७॥
लटिका हा भाव येरा वाटे निका । परी तो लटिका केला याने ॥१८॥
पंचतत्त्वे ग्रासूनी पावलासे तृप्ती । समाधान चित्ती जहालेसे ॥१९॥
होऊनिया द्रष्टा देखतो बंधन । न पावेची शीण द्वैतभाव ॥२०॥
दासरामा वर्म दाविती सद्गुरू । बोधिती साचारु निजकृपे ॥२१॥

३४७

आधी होतो मी पाडस । पूर्वी होतो कुत्रा खास ॥१॥
पुढे जहालो पोपट । वदविला रेडा स्पष्ट ॥२॥
मागोनिया झालो गज । केली नक्रासवे झुंज ॥३॥
गज तेथे झाला मुंगी । स्वस्थ राहे उगाउगी ॥४॥
मुंगी जहाली गरूड । आणिले अमृताचे कुंड ॥५॥
गरुड झाला हंसरूप । तेथे लाधले स्वरूप ॥६॥
चरण लाधले मस्तकी । शर्करेची गोडी मुखी ॥७॥
दासरामा गुरूकृपा । देही चुकवी लक्ष खेपा ॥८॥

## ३४८

मेरूसी मुंगीने धरिले हो माथा । देखोनी तत्त्वता कृष्णरूप ॥१॥
करांगुळीवरी धरिला पर्वत । मुंगी ते चढत गगनासी ॥२॥
करांगुळीवरी देखोनिया मेरु । चढे ते आधाररुपासोनिया ॥३॥
कृष्ण आणि मुंगी रुपे नाही दोन । कळता जाणपण उरेची ना ॥४॥
गुरुप्रसादाची ऐसी आह मात । साधिता एकांत उमज पडे ॥५॥
दासराम लोळे सद्‍गुरुचरणी । गाय निशिदिनी नाम त्यांचे ॥६॥

## ३४९

मुंगी झाली मीन मीन झाला घार । आकाशीचा थोर मार्ग बरवा ॥१॥
पक्षी अंतराळी उडे वरच्यावरी । ज्याचे पाय वरी खाली मुख ॥२॥
पक्ष्याचिये मुखी रामनाम चारा । दिसतो चतुरा एक डोळा ॥३॥
ज्यासी नसती पंख वर्णाचे रहित । जयाचे शोभत पांगुळ पद ॥४॥
अढळपदासी नेवोनी बैसवी । समाधान दावी स्वरूपाचे ॥५॥
स्वरुपासी पहाता पक्षी नाही होय । उरती सम पाय देवाजीचे ॥६॥
दासरामा न कळे कोण बोले बोल । उकलोनी खोळ चौदेहाची ॥७॥

## ३५०

आधार-चक्राचे पैल राहे मुंगी । होवोनी पा उगी पहाता कळे ॥१॥
तिचे मुखातोनी ऊर्ध्व तीन धारा । तयात चतुरा तीन रुपे ॥२॥
अमृतवाहिनी मुखाचेपासोनी । जाय अलक्ष्यस्थानी ब्रह्मरंध्री ॥३॥
वाजतो त्रिताल स्वरामाजी मेळ । देखिजे सोज्वळ नामब्रह्म ॥४॥
आदी आणि अंती मुंगीचे स्वरूप । दासराम विकल्परहित होय ॥५॥

## ३५१

सहस्त्रदलकमळी मुंगीचे स्वरुप । पूर्ण निर्विकल्प परब्रह्म ॥१॥
निरंजनी जिचे देखिजे बा घर । सकळांचे माहेर सौख्य ठेवा ॥२॥
नाही नामरुप निर्गुण गे माये । बोलू आता काये वाचेने या ॥३॥
नुरे द्वैताद्वैत ऐसी जिची मात । दासराम स्वस्थचित्त झाला ॥४॥

३५२

मुळी ब्रह्मांतीले मैना । पाहे संतांची खुणा ।
निर्गुणीं बाणा । ज्ञान देहू आकळे ॥१॥
मैना आली भवातीं नाव । प्राणा गोकुळीं गेली पाहे ।
तेणें रंगिला हे । मुरली—नाद कृष्णाच्या ॥२॥
भावा राजवी संकुळ । पाहे अमृतीचे जळ ।
खेळती गोपाळ । वसती होती तल्लीन ॥३॥
त्यांचे घुरे देहभान । नाद भरली आत्मखुणा ।
नादब्रह्म रूप । मद्घोष उमटले ॥४॥
अंबरे वाहले अक्षर । ज्यात दिसे चराचर ।
दासराम सार सांगतसे ॥५॥

३५३

जाती मुनींचा मेळा । त्याची जहाली कोकिळा ॥१॥
उच्चारी जे मधुर स्वर । ज्याचे नाम असे नेह ॥२॥
मनायेत मुनी येई । मनोन्मन होऊनी जाई ॥३॥
जेथे दरवळे सुवास । देहबुद्धीचा निरास ॥४॥
कालपदेहींची हे कथा । जाणे भक्त तो आपदा ॥५॥
दासराम लीन झाला । संतपदासी कळला ॥६॥

३५४

मैना बोले ज्ञान शब्द । मुनी ते पावे अगाध ॥१॥
तेथे शोध झाला मुक्त । ब्रह्म पावे जेथे सुखा ॥२॥
धन्य धन्य स्वाधिष्ठान । तीन वाचेतीत मौन ॥३॥
दासराम बोले मुखे । कळे संतसंगतीने ॥४॥

३५५

मुंगीचिये घरीं गेलाची धारणा । ब्रह्मांडरचना दिसे मुंगी ॥१॥
मुंगीचेपायीसी गडबड झाले । पुढे विस्तारले रूपरूप ॥२॥
ॐकार उमटे जिचे मुखातोनी । मनरायीचे वाणी उगमस्थान ॥३॥
मुंगी करू शके आकाशाचा ग्रास । जिचे अविनाश स्वरूप देखे ॥४॥
मुंगीपासोनिया अवकाश झाले । आकाशी उदेले ॐ स्वरूप ॥५॥

ब्रह्मा विष्णू महेश सत्व रज तम । आगम निगम कार्य चाले ॥६॥
ऐशापरी पिंड ब्रह्मांड पसारा । गतो चराचरा लाधलीसे ॥७॥
बीजशक्तीवरी ब्रह्मांडाचा भास । कार्य कारणास मिळणी झाली ॥८॥
खोलोनिया कार्यकारण हे दोनी । पावे ब्रह्मस्थानी निजत्वेसी ॥९॥
मूलतत्त्वी झाला तत्वांचा पसारा । एकची चतुरा अनेक झाले ॥१०॥
नाम रुप दोनी जाणी नाशिवंत । कळे ते यथार्थ कळता मुंगी ॥११॥
सर्वा आदिबीज मुंगीचे स्वरुप । गजाचा प्रताप न चले तेथे ॥१२॥
कर्णी जावोनिया प्राण घेई त्याचा । मोक्ष देई साचा तयालागी ॥१३॥
नामदेवा मुंगी खेचरसंगे कळली । हनुमंते बोधिली दासरामा ॥१४॥

## ३५६

हत्तीचा चरण नक्राने धरिला । घेवोनी चालिला भवडोही ॥१॥
कमळ वाहिले देवासी हत्तीने । करोनिया मनी प्रार्थना ते ॥२॥
मुंगीवरी आरुढ झाले भगवान । आलेसे चालून तये ठायी ॥३॥
मुंगीने नक्रासी बळेचि चाविले । गजा मुक्त केले त्यापासोनी ॥४॥
हत्तीसी ग्रासोनी स्वरूपाकार केले । नक्राने विनविले भगवंता ॥५॥
तुझे मज सत्य जहाले दर्शन । तरी का बंधन सांग माते ॥६॥
देवाचे इच्छेने मुंगी काय करी । ग्रासिले साचारी नक्रासी त्या ॥७॥
करणे न करणे सारोनिया दोनी । जडजीवालागोनी मुक्त केले ॥८॥
धन्य धन्य माझे सद्‌गुरु समर्थ । पुरविती आर्त दासरामा ॥९॥

## ३५७

राघू पक्षियाचे झाले रुपांतर । जहाली साचार मैना तेची ॥१॥
मैना पुढे कैसी जहाली टिटवी । नवल हे दावी कवतूक ॥२॥
टिटवी पक्षी झाला मागोनी गरुड । अमृताचे कुंड आणियेले ॥३॥
भवसमुद्र हा तेधवा आटला । संशय फिटला अंतरीचा ॥४॥
शून्यामाजी वसे गरुडाचे रूप । असे जो अधिप पक्षियांचा ॥५॥
गरुडाची भरारी असे उंच भारी । पाप पुण्य सारी दोनी मागे ॥६॥
विज्ञानाचे योगे दृश्यादृश्य सारोनी । काय केली करणी गरूडाने ॥७॥
सर्पादिक प्राणी पंचत्व पावले । फणिवरे दाविले ब्रह्मरुप ॥८॥
दासराम गुरूबोधे आनंदला । पायी विनटला मतिमंद ॥९॥

## ३५८

नेत्रस्थानी पंचरंगी राघू पक्षी । होय सुखी दुःखी उपाधीने ॥१॥
मैना पक्षी देखे कंठाचिये स्थानी । संकल्प म्हणोनी उरती ना ॥२॥
कंठापैल गती नुरवी विकल्प । टिटवीचे रूप ठाव दावी ॥३॥
अर्धमात्रा स्थानी देखिजे गरुड । राखीतसे कुंड अमृताचे ॥४॥
नेत्रचिये अंती शून्याचिये पोटी । चैतन्याची भेटी गरुड करी ॥५॥
चौदेहाचे पैल आत्मा घननीळ । दाखवी केवळ हंसपक्षी ॥६॥
हंसावरी रामराय विराजीत । स्वामी सद्‌गुरुनाथ सांगताती ॥७॥
हनुमंतराय दासरामा बोधिती । अंतरीच तृप्ती झाली त्यासी ॥८॥

## ३५९

पंचवीस तत्त्वांची पंचवीस कोंबडी । अहंबुद्धी रेडी ठार केली ॥१॥
ज्ञानाग्नीमाझारी क्रोध हा बकरा । घातिला चतुरा संतांनी या ॥२॥
काम तूप तेथे ओतिले संतानी । संसाराचा ज्यानी होम केला ॥३॥
संसरण क्रिया झाली तेजोरूप । आत्मा शुद्धरूप प्रत्यया ये ॥४॥
दासराम संतपदासी जडला । म्हणोनी हा झाला बोध त्यासी ॥५॥

## ३६०

मुंगीचे स्वरूप होता आकलन । होय गजानन कृपा त्यासी ॥१॥
तेथे होय सत्य गणेश प्रसाद । लागे नामछंद अखंडित ॥२॥
ब्रह्मविद्या लाधे जोडे निजशांती । हकार–निवृत्ती होवोनिया ॥३॥
अ उ मची शुंडा ज्याची अनिवार । मागे कृपाकर दासराम ॥४॥

## ३६१

कैसी हे चांदणी सूर्यचंद्र गिळी । नीलिमा आभाळी फेकतसे ॥१॥
ज्योतीची हे ज्योती देखे उलट गती । नुरे परावृत्ती देखताची ॥२॥
जहाल्या परती नव्हेची आरती । गेली दिनराती एकाएकी ॥३॥
दिनरात ग्रासी, अग्नी तो दिनासी । चांदणी तीनीसी ग्रासतसे ॥४॥
शेषाचे मुखीचा लाल जेथे विरे । अर्थ पहा बरे देहामाजी ॥५॥
साधनाचा भाग देहीच शोधावा । नातरी पस्तावा होईल देखे ॥६॥
दासराम संतवचनी समाधान । हेची मागे दान बोधामृत ॥७॥

## ३६२

चांदणी लपाली ब्रह्मबिंदुस्थानी । अभ्रपटलानी आच्छादिली ॥१॥
चौदेहाचे आड आलेती पर्वत । दृष्टीआड होत देव भक्ता ॥२॥
नीर–दधि–क्षीरसमुद्राचे पैल । देखिजे सोज्वळ हंसपक्षी ॥३॥
त्याचा चक्षू जाण रेणूचे प्रमाण । ज्यात ठसा जाण आत्मयाचा ॥४॥
हंसगतीवरी आरूढ परमात्मा । होय दासरामा आनंदची ॥५॥

## ३६३

संकल्प विकल्प देखिजे पारडी । पंचतत्त्व घडी तराजू तो ॥१॥
मेरुचा तोवरी देखे बा काटा । बोलण्यासी फाटा दिला जेणे ॥२॥
दिले सुवर्णा ते लक्ष कोटि धन । भक्ति भाव पूर्ण शुद्ध सत्त्व ॥३॥
सुवर्णालागोनी गिऱ्हाईकासी विके । व्यापारी या देखे ठावे नाही ॥४॥
दासराम म्हणे ऐसा हा व्यवहार । सुफल संसार साधनाचा ॥५॥

## ३६४

आकाशी ते गंगा निळी । वाहे काळी धरणीवरी ॥१॥
मध्य नाडी शुभ्रोदक । थोर सुख निर्भेळ ॥२॥
शून्यावरी गंगा वाहे । अंग होये ब्रह्मची ॥३॥
तेथे संत करिती स्नान । नमितो चरण दासराम ॥४॥

## ३६५

नीच होय उंचा । उलटा अनुभव संताघरचा ॥१॥
मुंगी माथा ऐरावत । सहज धरी नेमस्त ॥२॥
राईएवढे बिंदुले । सारे ब्रह्मांड कवळे ॥३॥
संतांचे हे वर्म । सहज बोले दासराम ॥४॥

# उपदेश : ७

## ३६६

देव भेटे जोपर्यंत । श्रद्धा ठेवी तू निश्चित ॥१॥
देव आला देव आला । अहंपणे दूरी ठेला ॥२॥
देवपूजा तू करी ते । अहंपणे ते दुरी ते ॥३॥
होते होते काय होते । दास म्हणे निष्फळ ते ॥४॥

## ३६७

इतमाम ज्याचा त्याला । काय असे भलत्याला ॥१॥
आपणचि मेळवावे । मग सौख्य ते भोगावे ॥२॥
आधी कष्ट मग फळ । हे तो जाणावे केवळ ॥३॥
चणे खावे लोखंडाचे । मग ब्रह्मपदी नाचे ॥४॥
आधी घ्यावे गुरुज्ञान । मग वैभव ते जाण ॥५॥
हे तो संतची जाणती । दास चरणाची माती ॥६॥

## ३६८

जू घेई मानेवरी । व्यर्थ कष्टतो संसारी ॥१॥
मागेपुढे पाहे कोण । व्यर्थ चालिलेसे जन ॥२॥
हाल्या बारे जू जू बैला । हारी नामा घेई झोला ॥३॥
जाई सद्‌गुरुपथान । दास म्हणे नामगान ॥४॥

## ३६९

भक्तिपंथे चाल बा रे सुनीति पंथे चाल ।
अनीतिपंथे जाता पाही तुजला खाईल काळ ॥१॥
संतसंगे राहता पाही नासाचा सुकाळ ।
नामगजरे नाचताती वाजताती टाळ ॥२॥
प्रेमानंदे भक्त नाचता नाचे हा गोपाळ ।
भक्तालागी स्व-स्वरुप दावितो निर्मळ ॥३॥
दास म्हणे निंद्य माईक टाकुनी द्यावे सकळ ।
वंद्य नाम ते चित्तस्वरुप ते ठेवी मनी अढळ ॥४॥

## ३७०

ॐ शिवचरणी प्राण अर्पी तू ।।ध्रु।।
मन बेलपत्री करुनी देवा वाही तू ।।१।।
पंचप्राण पंचारती देवा ओवाळी तू ।।२।।
शिवचरणी शरण जाऊनी मुक्त होई तू ।।३।।

## ३७१

भूषण परमार्था स्मरण हे । संसारातुनी तरण्या पाहे ।।ध्रु।।
सत्संगतीने पुसोनी घेणे । नाम विवरणे अनुभव लाहे ।।१।।
दास म्हणे मग देवदर्शन । स्पर्शन ईक्षण भाषण लाहे ।।२।।

## ३७२

जनामाजी वनी मनी आणि ध्यानी । चित्त नारायणी जडवावे ।।ध्रु।।
सद्गुरुवचन पाळी निष्ठनेमे । अखंडित काम तेचि करी ।।१।।
गुरुदास राम प्रार्थितसे जना । नामसंकीर्तना सांडू नका ।।२।।

## ३७३

गुरुराया शरण जावे । येचि देही मुक्त व्हावे ।।१।।
तवा तप्त झाला तवरी । घ्यावी भाजून भाकरी ।।२।।
सुवर्णाच्या कोंदणात । जैसा हिरा चकाकत ।।३।।
दास म्हणे ऐसे व्हावे । आशापाश ते तोडावे ।।४।।

## ३७४

घ्यावी हाती कंथा । करावे भजन । विठोबाचे जाण प्रेमभावे ।।१।।
विठ्ठल विठ्ठल वदताची पाही । मानव तो होई भगवंत ।।२।।
विठ्ठल विठ्ठल करी जो स्मरण । तयासी शरण दास पाही ।।३।।

## ३७५

भाव धरी देवापाई । सर्व काही देवा देई ।।१।।
नको देवाला विसरू । नको मायेलागी धरू ।।२।।
देव स्मरे रात्रंदिनी । देव पाही तू नयनी ।।३।।
दास म्हणे त्या देवासी । शरण जाता मुक्त होसी ।।४।।

## ३७६

सोय ती धरी । सद्‌गुरु करी ।
पंथ आचरी । नीतिधर्माचा ।।१।।
पाऊले बरी । झडकरी धरी ।।
देही उद्धरी । थोर साधने ।।२।।
साधना करी । लवकरी परी ।
न वरी वरी । पहासी सर्वथा ।।३।।
पाय सुस्वरी । धरिला जरी ।
शरण जा तरी । होसी मुक्त लवकरी ।।४।।
दास म्हणे रे । तोडी बंधन ।
बीज हे जाण । नष्टिता बरे ।।५।।

## ३७७

परमेश्वर ओतप्रोत । त्याचे महिमान अघटित ।।१।।
म्हणुनि त्याला जावा भजत । याची सेवा अखंडित ।।२।।
ह्याला खंड पडो नेदी । रामकृष्ण आठवा आधी ।।३।।
दास म्हणे अहो देवा । घ्यावी अखंडित सेवा ।।४।।

## ३७८

ज्याची चांग दृष्टी आहे । तेथे काय उणे पाहे ।।१।।
सर्व सुख समाधान । परब्रह्माचे देखणे ।।२।।
चांग दृष्टी प्राप्त होता । देव भेटेल तत्त्वता ।।३।।
चांग दृष्टीचे देखणे । न कळे सद्‌गुरुवाचून ।।४।।
दास म्हणे ऐशी दृष्टी । दावी एक जगजेठी ।।५।।

## ३७९

चर्मचक्षूने हो पाही । खरा देव दिसत नाही ।।१।।
अंतरचक्षूचे सामर्थ्य । खरा देव दिसे सत्य ।।२।।
जो का डोळ्याचाहि डोळा । तोचि दावी घननीळा ।।३।।
दास म्हणे रे आंधळ्या । शरण जाता देती डोळा ।।४।।

## ३८०

साधी साधी साधी लवकर साधी । काळाची उपाधी नको मना ॥१॥
गुरुकृपा होता मग तू तरसी । मग तू तरसी रामनामे ॥२॥
८४ लक्ष योनि फेरा चुकवीसी । सत्य मुक्त होती कलिमाजी ॥३॥
दास म्हणे मग थोर तू होशील । पदी रहाशील देवाजीच्या ॥४॥

## ३८१

कृपणाचा ठेवा जन्मभरी राही । तैसे नाम घेई गुरुकृपे ॥१॥
अनुग्रह घेई नामगान गाई । रामरुप पाही डोळाभरी ॥२॥
दोचि अक्षरांचे आहे येथे काम । सकळा सुगम दास म्हणे ॥३॥

## ३८२

सोडू नको रामपाय । तुला लाधेल सुखठाय ॥१॥
मनी रामनाम धरा । चित्ती गुरुचरण धरा ॥२॥
मनी नाम ते साठवा । दीनदयाळू आठवा ॥३॥
अहो ऐका दास म्हणे । मुख्य कार्य देवा पहाणे ॥४॥

## ३८३

तुमारे रामरस प्यारा ।
अखंड नाम तारा ॥१॥
लाळेमध्ये नाम घोटुनी रामरस प्यारा ।
रामनाम हे भोजन करुनि रामरस प्यारा ॥२॥
घासाघासा नाम घोटुनि रामरस प्यारा ।
दास म्हणे कामधंदा करीता राम रस प्यारा ॥३॥

## ३८४

काया वाचा मनोभावे । रामनाम हे सेवावे ॥१॥
एकावरी निष्ठा धरी । भेटे वैकुंठ मुरारी ॥२॥
करिता नामाचा गजर । दासा होईल सुखकर ॥३॥

## ३८५

बा मना साधनाबिना काय वल्गना करु पहातोसी ।
या काय उपेगा येतील तुज कामासी ।।ध्रु।।
कांडण करूनी भुसाचे श्रम व्हायाचे फळ दमदमडीचे नाही बा तुजसी ।
कृती करी भेटे श्रीहरी स्मरी बा त्यासी ।।१।।
नास्तिकवाद फेकून घेई अनुभवून पाही चाखून विचार करिशी ।
हा जयद्रथ हा सूर्य अशापरी बघसी ।।२।।
साध्य हे साधनाविना प्राप्त न च कुणा जाण बा मना काय बडबडसी ।
हा अनुभव घेई निरंतर मानसी ।।३।।
नवनीत जैसे दुग्धात मंथिता सत्य येई हातासी ।
प्रक्रियेविना काय मिळे बा तुजसी ।।४।।
ईश हा आहे जगात दिसेना सत्य त्यावरी मात साधन करिसी ।
मग राहील तुजला रामराथ हा साक्षी ।।५।।

## ३८६

त्यजोनिया कनक कांता । नाम जडले ज्याचे चित्ता ।।१।।
तोचि जगामाजी भला । ओळखील परमेशाला ।।२।।
निरासक्तीने राहाता । भेटी होय भगवंता ।।३।।
राम म्हणे गुरुबोधे । बोधिल्याची जग वंदे ।।४।।

## ३८७

भ्रम ज्ञाने सारा । मिळा आनंदसागरा ।।१।।
भ्रम सातत्याने सत्य । वाटे परी आहे मिथ्य ।।२।।
भ्रमे होतसे घोटाळा । पहा अन्न व्हाल काळा ।।३।।
गुरुसंगती तत्त्वता । दासा करोनि ममता ।।४।।

## ३८८

मार भरारी हंसावरती बैसुनि जीवराया ।
रामरूप तू होऊनि जासी कुठे उरली मग माया ।।१।।
अहंभाव हा त्यजुनी जासी उलटगती सदया ।
दास म्हणे तो तूचि आहेसी पहाता लवलाया ।।२।।

## ३८९

गुरुकृपा सद्‌बुद्धी अंतरीची शुद्धी । एक्या परमानंदी समाधान ॥१॥
काय तुजलागी जगासी कारण । धरिजे की मौन अंतर्यामी ॥२॥
मुसळ कळते कुसळ कळेना । सांगितली खुणा संतजनी ॥३॥
ज्ञानदेवे जरी दिली निको खूण । सुख होय पूर्ण दासरामा ॥४॥

## ३९०

जन्माचे सार्थक कशाने होईल । जो लक्ष देईल त्यासी कळे ॥१॥
जन्माचे सार्थक नोहे श्रीमंतीने । वक्तृत्व भूषणे लेता नोहे ॥२॥
जन्माचे सार्थक नोहे अभिमाने । नोहे संगतीने विषयांच्या ॥३॥
जन्माचे सार्थक नोहे प्रतिष्ठेने । कलाकौशल्याने नोहे नोहे ॥४॥
जन्माचे सार्थक रहावे ब्रह्मपणे । गुरुराज म्हणे तुम्हालागी ॥५॥

## ३९१

असोनिया जीव जगाचा जीवन । करी अन्न अन्न दारोदारी ॥१॥
असोनिया जीव स्वये परब्रह्म । करी दाम दाम लोकापाशी ॥२॥
विसरोनी गेला आपुल्या आपणा । झाला असे जाणा कुडीरूप ॥३॥
गुरुराज म्हणे संगे बिघडसी । टाकी अज्ञानासी तोडोनिया ॥४॥

## ३९२

आम्ही नाही भिन्न । जाणा परब्रह्माहून ॥१॥
त्याचे अंश आम्ही आहो । संत फोडताती टाहो ॥२॥
त्याच्या इच्छे येथे आलो । तरी काय वेगळे झालो ॥३॥
आम्ही द्रष्टे जगताचे । दृश्य स्वप्नवत साचे ॥४॥
अहो गुरुराज म्हणे । माये गुंतती शहाणे ॥५॥

## ३९३

मूर्ख मूळ रुपा विसरोनी जाती । अखेरीसी होती मातीरुप ॥१॥
सुखी असोनिया दुःखात गुंतती । नाशिवंती प्रीती धरती भावे ॥२॥
जैसे आहे बीज तैसे ठेले फळ । सिद्धांत केवळ बोलियेला ॥३॥
गुरुराज म्हणे धन्य तो दिवस । सत्य आपणास जाणताची ॥४॥

## ३९४

सोऽहं सोऽहं ध्वनी उमटे । तेथे लक्ष लावी नेटे ॥१॥
मग तू होसी तदाकार । परब्रह्माची निर्धार ॥२॥
गुरुराज म्हणे एक । आठवावा राम देख ॥३॥

## ३९५

एक होता गुरुकृपा । मार्ग होय अती सोपा ॥१॥
गुरुविणा न कळे वर्म । कैंचे पकडावे धाम ॥२॥
कैंचे व्हावे ब्रह्मरूप । न कळे करोनिया तप ॥३॥
गुरुराज सांगे लोका । डोई घ्याव्या गुरुपादुका ॥४॥

## ३९६

कैसा गुंतलासी प्राण्या । तैसा मुक्त होई शहाण्या ॥१॥
जैसा येताना आलासी । तैसा मूळरूपी जासी ॥२॥
हित करी झडकरी । जोवरी आयुष्याची दोरी ॥३॥
नाही तरी गेले सारे । गुरूराज म्हणे बा रे ॥४॥

## ३९७

आपण असोनी मायेच्या निराळे । मायेचिये गळे बद्ध होतो ॥१॥
काय आहे पहा देवाची करणी । कुंठे वेदवाणी पाहोनिया ॥२॥
देवाचिये माया अघटित आहे । सोडविता पाहे तोचि आम्हा ॥३॥
गुरुराज म्हणे उठा झडकरी । करावी हो वारी आत्मरूपी ॥४॥

## ३९८

मुक्त असोनिया बद्ध का झालासी । तुज ऐशी कैसी भुरळली ॥१॥
मिथ्या मन माया त्यात नको गुंतू । सोडू नको तंतू आत्म–रूप ॥२॥
गुरुराज म्हणे खरे आणि खोटे । खरे ते गोमटे परब्रह्म ॥३॥

३९९

देही भरला नाद । तेंथे रंगला गोविंद ॥१॥
तेथे नामाचा गजर । काय आहें पंढरपुर ॥२॥
लखलखाट रामप्रभूचा । मेळा जमला सज्जनांचा ॥३॥
गुरुराज म्हणे तेथे । जावे भक्तीचिया पंथे ॥४॥

४००

संसार म्हणजें चक्रव्यूह आहे । फिरवितो पाहे गरागरा ॥१॥
सापडला प्राणी निघेना बाहेरी । फिरतसे चारी वाटे सदा ॥२॥
गुरुवीण कैसे यातोनी सुटावे । न कळेची पहावे काही केल्या ॥३॥
गुरुराज माझे सांगती सकळा । नामी प्रेमकळा धरा कंठी ॥४॥

४०१

तत्त्वता हे जग ब्रह्मरूप आहे । भ्रम तरी पाहे दिसे द्वैत ॥१॥
द्वैत उभारणी अद्वैताचा पाया । द्वैत हे सर्वदा नाशिवंत ॥२॥
सत्य ते अद्वैत असत्य ते द्वैत । सत्यामाजी चित्त जडता बरे ॥३॥
गुरूराज म्हणे सत्य मनी धरी । तरी मुक्ती चारी ओळंगती ॥४॥

४०२

अरे ज्याचे अन्न खासी । तयालागी तू नेणसी ॥१॥
तरी तयाहोनी घोर । आणिक पातक नाही थोर ॥२॥
ताठू नको गर्वे । पहा स्वरूप बरवे ॥३॥
गुरुराज म्हणे लोका । नाम घेता राहू नका ॥४॥

४०३

संतांचिया संगे तुझा नाही तोटा । होतोसी रे खोटा खोटयासंगे ॥१॥
जैसा धरसी संग तैसे तुज फळ । सिद्धांत केवळ जाण बापा ॥२॥
फुलाचिये माती घेई केवी बास । अनुभव सर्वांस आहे याचा ॥३॥
गुरुराज म्हणे संतसंगतीने । ब्रह्मरुप होणे कळेल गा ॥४॥

## ४०४

पदरी बांधूनी खोटे नाणे । राहे मातीमोलपणे ॥१॥
मनी धरोनिया काया । राम कैसा भेटे सखया ॥२॥
मनी गोड नाम घेसी । तरी ब्रह्मपदा पावसी ॥३॥
गुरुराज म्हणे आता । ध्यान लावी तुझ्या चित्ता ॥४॥

## ४०५

नाद हे मुक्तिद्वार । चुकवीता घेसी फेर ॥१॥
नरदेही आहे मुक्ती । अन्य देही नाही प्राप्ती ॥२॥
घेई अमृताचा घोट । जरा होऊनिया धीट ॥३॥
गुरुराज म्हणे बद्धा । अंतरी घेई संतबोधा ॥४॥

## ४०६

देही जे का प्रेम । तेची आहे पापकर्म ॥१॥
मूळरुपी जडता प्रेम । त्याचे नाव पुण्यकर्म ॥२॥
नसती तोंडाचिया गप्पा । इतका मार्ग नाही सोपा ॥३॥
येथे पाहिजे करणी । गुरुराज देव ऋणी ॥४॥

## ४०७

सर्व वेदातांचे सार । सोहंस्मरणाचा उच्चार ॥१॥
सर्व भक्तीमाजी भक्ती । रामरुपी धरणे प्रीती ॥२॥
सर्व धर्मामध्ये धर्म । छंदी रहाणे स्वधर्म ॥३॥
सर्व ज्ञानामाजी ज्ञान । ओळखणे आपण कोण ॥४॥
गुरुराज म्हणती जना । पहा अयोध्येचा राणा ॥५॥

## ४०८

ऐसे कैसे हे शरीर । पडे उलथे क्षितीवर ॥१॥
चालता चालता मटकन बसते । बोलता बोलता मुके होते ॥२॥
आपोआप होईना घर । कैसे जहाले अपार ॥३॥
गुरुराज म्हणे डोळा । पहा घननीळ सावळा ॥४॥

## ४०९

आपोआप येते का जेवायाचे ताट । कैसा झाला थाट जगताचा ॥१॥
कर्त्याविणे कार्य कुठे काय जहाले । द्यावेत दाखले आम्हालागी ॥२॥
गुरुराज म्हणे निवाडा हा खरा । मनी परमेश्वरा धरावे की ॥३॥

## ४१०

आधी होते सत्य । तयावरी उठले मिथ्य ॥१॥
यासी कारण ही माया । ऐक ऐक रे सखया ॥२॥
माया प्रभूची अगाध । काही रुचेना तो बोध ॥३॥
गुरुराज म्हणे बोध । मनी घेता होसी सिद्ध ॥४॥

## ४११

तोचि धन्य झाला । जेणे हाटविले काळाला ॥१॥
तोचि धन्य झाला । जेणे बांधिले मनाला ॥२॥
तोचि धन्य झाला । जेणे पाहिले देवाला ॥३॥
गुरुराज सांगे मात । जेणे योगे होय हित ॥४॥

## ४१२

विश्व परब्रह्मी भास । माये आले आकारास ॥१॥
हे तो केवळ आहे स्वप्न । होऊ नको येथे मग्न ॥२॥
येथे जे का प्रतिबिंबले । ते ते जीव ओळखले ॥३॥
गुरुराज म्हणे प्राण्या । भजे अखंडित धन्या ॥४॥

## ४१३

देहालागी कोण चालविते पाही । तरी बरे होई पहा तुझे ॥१॥
जयाचिये सत्ते सर्व हे चालिले । ओळखिता भले तयालागी ॥२॥
गुरुराज म्हणे ओळखोनी घ्यावे । तरीच पावावे मोक्षपद ॥३॥

## ४१४

स्वतालाची विसरसी । काय म्हणावे तुजसी ॥१॥
स्वये असोनी पूर्णकाम । मनी तुझ्या भरला दाम ॥२॥
तूच तुझ्या स्वरुपाला का । अरे झालासी पारखा ॥३॥
गुरुराज म्हणे शहाण्या । भरडू नको उगीच कण्या ॥४॥

## ४१५

पहाण्यालागी आत्मरूपा । आधी पाहिजे गुरुकृपा ॥१॥
तरीच तुज कळे मार्ग । कळे श्रीरंगाचा रंग ॥२॥
होऊ नको बा रे मूढ । शरण जाता कळे गूढ ॥३॥
गुरुराज म्हणे जीवा । भक्तिमार्ग तुज बरवा ॥४॥

## ४१६

होई होई रे मोकळा । भुलू नको मायाजाळा ॥१॥
जरे मायेत गुंतसी । तरी कधी न सुटसी ॥२॥
गुरूराज म्हणे जरी । नामी मुक्त होसी तरी ॥३॥

## ४१७

ऐसे कैसे हे शरीर । वैद्य लागे धुरंधर ॥१॥
जरी जहाले आपेआप । तरी कैचे त्रिविध ताप ॥२॥
तरी कैचे सुख दुःख । द्वंद्व निर्मियेले देख ॥३॥
गुरुराज म्हणे ध्यानी । माया टाकी झुगारोनी ॥४॥

## ४१८

धन्य तोचि दिन धन्य तोचि दिन । तुटता मीपण अहंकार ॥१॥
अहंकार आहे घातकी आपुला । नाहीसा तयाला करिता बरे ॥२॥
अहंकारे वाढे दैन्य दुःख त्रास । होत असे नाश स्वहिताचा ॥३॥
गुरुराज म्हणे तुम्हालागी आता । नाश हो पुरता करा त्याचा ॥४॥

४१९

अरे तुझे हे सर्वेश । कारे केली आधार ॥१॥
देव हालविती रचना । सर्व चाले त्याची सत्ता ॥२॥
ऐसी आपोआप आपली । कीती तुझी विश्व मांडणी ॥३॥
गुरुराज म्हणे । हरिभक्त असे जाणी ॥४॥

४२०

सर्व गुप्त ज्ञान । संती ठेविले उघडोन ॥१॥
इच्छा घेईल तितुके घ्यावे । मूक होऊनी बैसावे ॥२॥
गुरुराज म्हणे । लुटा लुटा ज्ञानीयांनी ॥३॥

४२१

माझा सखा हरी । नटला असे अभ्यंतरी ॥१॥
सर्व चाले त्याचेयोगे । पहा अनुभवाचे अंगे ॥२॥
बोलता नये अनुभव । जरी प्रगटला देव ॥३॥
गुरुराज म्हणे एक । धरा भक्तिमार्ग चोख ॥४॥

४२२

सकळ जगाचा मायबाप देव । तयेवीण ठाव नाही दुजा ॥१॥
त्याचा घेता ठाव मुक्त होय जीव । मनी घ्यावे नाव अखंडित ॥२॥
तोचि आहे सर्व विश्वाचा हो त्राता । तोचि आहे भक्ता आधार गा ॥३॥
गुरुराज सांगे सकळ लोकासी । वेगे त्या प्रभूसी ओळखावे ॥४॥

४२३

विश्वाचा जो मायबाप । काय असेल प्रताप ॥१॥
सर्वाभूती व्यापकता । काय असेल त्याची सत्ता ॥२॥
सर्वासंगे खेळ खेळे । चालविती जग लीले ॥३॥
गुरुराज म्हणे बा रे । तयालागी मनी घ्या रे ॥४॥

## ४२४

आम्ही नावाचे धणी । आम्हा हालवी चक्रपाणी ॥१॥
सूता ओवियेले मणी । सूत्र आहे चक्रपाणी ॥२॥
आम्ही त्याचेविण । राहू नेदी एक क्षण ॥३॥
गुरुराज म्हणे राम । जपा धरोनिया नेम ॥४॥

## ४२५

ज्याचे गावी रहासी । तयालागी नोळखीसी ॥१॥
ज्याचे खासी अन्न । त्याची नाही ओळखण ॥२॥
ज्याचे सत्तेने चालसी । तयालागी विस्मरसी ॥३॥
गुरुराज म्हणे । हे तो आहे लाजिरवाणे ॥४॥

## ४२६

आत्मरूप तेची बिंब । आम्ही त्याचे प्रतिबिंब ॥१॥
आम्हा नाही दुजेपणा । आम्ही आत्मरुप जाणा ॥२॥
टाकिता उपाधी । लागे सहज समाधी ॥३॥
गुरुराज म्हणे तेथे । घ्यावे सुख आपुल्या चित्ते ॥४॥

## ४२७

पराङमुख होता पिसे । लागताची बिंब दिसे ॥१॥
तेथे तद्रूपची व्हावे । जन्म मरण चुकवावे ॥२॥
गुरुराज म्हणे । सुखी व्हाल या स्मरणे ॥३॥

## ४२८

ब्रह्मरुपी मारा बुडी । दूर ठेवोनिया कुडी ॥१॥
तरी व्हाल सुखरुप । हारतील त्रिविध ताप ॥२॥
तेथे नाही तहान भूक । मग कैचे राहे दुःख ॥३॥
गुरुराज म्हणे आत । काय पहावे अनंत ॥४॥

## ४२९

कुडीतून प्राण जाता । देह धडपडे तत्त्वता ॥१॥
मग ते होत कासावीस । जरी लागला का सोस ॥२॥
शरीर न ये सोडवाया । येई जीवा गुंतवाया ॥३॥
गुरु म्हणती वारंवार । यासी मारावे ठोकर ॥४॥

## ४३०

प्राणियाची कांती । जोवरी आत्म्याची हो वस्ती ॥१॥
शरीर हे सोज्वळ । आता असता ब्रह्मगोळ ॥२॥
गुरु म्हणती शरीर । जीवालागी अहितकर ॥३॥

## ४३१

करा निवडानिवड । काढा निराळे दगड ॥१॥
आत्मरुप ते साठवा । तयालागी नेत्री ठेवा ॥२॥
तेथे ठेवा मन । गुंतवा हे पंचप्राण ॥३॥
गुरुराज बोले सार । व्यर्थ तितुके असार ॥४॥

## ४३२

संती बोलियेला भक्तिमार्ग चोख । जयामध्ये देख विघ्न नाही ॥१॥
जाण्यालागी सोपा लहान थोराना । राजमार्ग जाणा आखलासे ॥२॥
पहा जावोनिया आत्मरुप दृष्टी । आणिक त्रिपुटी लय करा ॥३॥
गुरुराज म्हणे व्हाल एकरूप । जीव आत्मरुप अभिन्नची ॥४॥

## ४३३

पदरी बांधुनी खोटे नाणे । कोण राहे अभिमाने ॥१॥
जे का निरुपयोगी अखेर । तेची जाणावे असार ॥२॥
देहबुद्धी ठेवोनिया । जीव अखेर जाय वाया ॥३॥
गुरुराज म्हणे बुद्धी । आत्मरुपी जडवा आधी ॥४॥

४३४

करी व्यवहार । द्रष्टेपणे निरंतर ॥१॥
निराळाची भवडोही । रहाता तरशील पाही ॥२॥
पाण्यावरील भोपळा । राहे न बुडता निराळा ॥३॥
तयेपरीच तू राहे । गुरूराज सांगे पाहे ॥४॥

४३५

गुंतागुंतीचे ते जाळे । द्यावे तोडोनी सगळे ॥१॥
जीवे करावा निर्धार । मनी ध्यावा परमेश्वर ॥२॥
मनीचे काढावे असार । भजे देवा निरंतर ॥३॥
गुरुराज म्हणे जना । भटकू देऊ नका मना ॥४॥

४३६

विश्वची झाला हरी । ज्याची भक्ती तोची करी ॥१॥
तोची बोले चाले । तेणे सर्व काही चाले ॥२॥
तोची सत्ताधीश । आम्ही झालो त्याचे दास ॥३॥
गुरूराज म्हणे । पहा देही मुक्तपणे ॥४॥

४३७

संतकृपा होता । गूज कळेल तत्त्वता ॥१॥
संतकृपा झाल्याविण । जीवालागी होय शीण ॥२॥
गुरूराजा जाता शरण । मना होय समाधान ॥३॥

४३८

सुवर्णपात्री जसे सोने । जसे वस्त्री तंतू जाणे ॥१॥
मृत्तिकेचे घटी माती । देव भरला तसे रीती ॥२॥
एकची झाले अनेक । गुरूराज म्हणे देख ॥३॥

### ४३९

विकृती आहे ज्यात । तया आहे आदी अंत ॥१॥
सत्य नोहे भास । कैंचे जन्ममरण त्यास ॥२॥
सत्य हे अढळ । तेणे निर्मिले सकळ ॥३॥
गुरुराज म्हणे । रुपी जडा मने प्राणे ॥४॥

### ४४०

सर्व दृश्य हे वोखटे । आत स्वरुप गोमटे ॥१॥
तेची सत्य साच सार । सर्व विश्वामाजी थोर ॥२॥
तोची आमुचा लाभ । देव देव पद्मनाभ ॥३॥
गुरु सांगती आम्हासी । काही झटा स्वहितासी ॥४॥

### ४४१

ओळखोनी वर्म । पदरी बांधा परब्रह्म ॥१॥
तेणे वाढेल महती । होय जगामाजी ख्याती ॥२॥
गुरुराज म्हणे जीव । होय वर्मे चिरंजीव ॥३॥

### ४४२

जवळ असोनिया देव । तळमळें का आपुला जीव ॥१॥
तेणे सोडोनिया ठाव । हिंडू लागला निर्दैव ॥२॥
हेची तयाचे कारण । मनी भरले अज्ञान ॥३॥
गुरुराज म्हणे । शुद्ध व्हावे अंत:करणे ॥४॥

### ४४३

पुरी तळताना चुरचुरे । तळल्यावरी थांबे बा रे ॥१॥
तयेपरीच साधक । अनुभवे होय मूक ॥२॥
गुरूराज म्हणे बोल । तयालागी नाही मोल ॥३॥

## ४४४

पोपटपंचीने वाहिला । तोचि नर वाया गेला ॥१॥
तेणें योगे नोहे काम । नोहे जीवासी विश्राम ॥२॥
संतालागी शरण जावे । अनुभवे मुक्त व्हावे ॥३॥
गुरुराज म्हणे । खरे हित केले तेणे ॥४॥

## ४४५

पोटावरी बांधुनी अन्न । नोहे नोहे समाधान ॥१॥
चरण टाकियेल्यावीण । नोहे देवाचे दर्शन ॥२॥
नुसत्या करोनिया कल्पना । कार्यसिद्धी नोहे जाणा ॥३॥
गुरुराज सांगे खुणा । लागा संतांच्या चरणा ॥४॥

## ४४६

वृक्ष देखोनिया न जाय तो शीण । नोहे समाधान काही केल्या ॥१॥
पाणी देखोनिया भागेनाची तहान । जोवरी प्राशन केले नाही ॥२॥
गुरुराज म्हणे पाहोनीया डोळा । अनुभव निराळा घ्यावा वेगी ॥३॥

## ४४७

गुरुने नवलाव केला । ज्ञानदीप पाजळला ॥१॥
पहा पहा थोर जन । मनी घ्यावे उमगोन ॥२॥
गुरुराजाचा प्रताप । चुकवील खास खेप ॥३॥
गुरुराज म्हणे तुला । होई होई रे मोकळा ॥४॥

## ४४८

मेल्यावीण स्वर्ग दिसेना । यत्नावीण न कळे खुणा ॥१॥
व्हावयासी ब्रह्मसुख । करी प्रयत्न सुरेख ॥२॥
शरण जाई रामराया । लागे सद्‌गुरूच्या पाया ॥३॥
गुरुराज म्हणे आता । यत्ने पहावे तत्त्वता ॥४॥

४४९

म्हणे खावे लोखंडाचे । तरी ब्रह्मपदी नाचे ॥१॥
चित्त सर्वावरूनी काढी । परमेश्वर चरणी जोडी ॥२॥
गुरु सांगती तुम्हासी । पहा पहा हृषीकेशी ॥३॥

४५०

दरिद्र्यासी नोहे थोरांचे दर्शन । सिद्धांत हा जाण सत्य आहे ॥१॥
ज्याचीया मनी वासना वावरी । खरा तो भिकारी जाण बापा ॥२॥
हाकेसरसी नोहे देवाचे दर्शन । असता अंतःकरण आशायुक्त ॥३॥
सांगतसे जीवा गोविंदतनय । धरा रामपाय आता वेगी ॥४॥

४५१

ज्याचे मनी आहे आशा । त्याची आहे बा निराशा ॥१॥
हे तो समजा अंतःकरणी । त्यासी नाही चक्रपाणी ॥२॥
गुरुराज सांगे खूण । करा अखंड स्मरण ॥३॥

४५२

मी तू आहे खोटे । सत्य साजिरे गोमटे ॥१॥
भासे विरोध तो वाटे । सत्यामाजी सर्व आटे ॥२॥
गुरु म्हणती हे तो स्वप्न । व्हावे जागृत आपण ॥३॥

४५३

संसाराचे बंध तोडा । ऐका नामाचा चौघडा ॥१॥
पहा मुक्तीचा सोहळा । संतसज्जनांचा मेळा ॥२॥
गुरुराज तो सावळा । पहा पहा आपुल्या डोळा ॥३॥

४५४

स्वता असोनी ब्रह्मज्ञ । का रे झालासी तू अज्ञ ॥१॥
अवलबंसी तू बाहेरी । ज्ञान आहे ते अंतरी ॥२॥
चुकली जाणण्याची परी । संत सांगती निर्धारी ॥३॥
सर्व काही मात । गुरू सांगती नेमस्त ॥४॥

४५५

हिरियाची कोठे दिसेचिना राश । कारण हे त्यास मोल आहे ॥१॥
मोलाची ये वस्तू न दिसे बाहेरी । पहाता अंतरी कळो येई ॥२॥
अंतरी अंतरी आत्मधन पाहे । पहाताची लाहे संतकृपे ॥३॥
गुरुराज म्हणे येथे लक्ष द्यावे । नंतरची घ्यावे आत्मधन ॥४॥

४५६

परमार्थ हा काही न दिसे बाहेर । सांगती निर्धार संतजन ॥१॥
जववरी नाही खोदले अंतर । तव हा विचार न कळेची ॥२॥
सर्व काही देही शोधोनिया पाही । अनुभवे लाही आत्मरूप ॥३॥
गुरुराज म्हणे संतासी शरण । जावोनिया खूण प्राप्त करी ॥४॥

४५७

भाताची परीक्षा होय शितावरून । नश्वराचे गुण कळती देही ॥१॥
पाचाचे बनले तत्त्वता शरीर । परी ते असार दिसतसे ॥२॥
तैसे हे असार आहे की अपार । करिता विचार कळो येई ॥३॥
गुरुराज म्हणे परीक्षा करणे । ओळखोनी घेणे आत्मरूप ॥४॥

४५८

घोटूनी मातीचा दिलासे मुलामा । तयावरी प्रेमा करितोसी ॥१॥
पापाचे बनले जाण हे शरीर । असत्य असार सांगितले ॥२॥
देहामध्ये आहे मुख्य आत्मा जाण । तेणेची पावन आहे देह ॥३॥
लक्ष ठेवोनिया आत्म्यावरी राही । प्रेमे नाम गाई अखंडीत ॥४॥
गोविंदतनय म्हणे या जगती । धरी अनासक्ती म्हणिजे बरे ॥५॥

४५९

ज्याचे गावी रहावे । तयालागी ओळखावे ॥१॥
ज्याचे गावी ज्याची सत्ता । तेथे करावी ममता ॥२॥
ज्याचे खावे अन्न । त्याची करावी आठवण ॥३॥
राम म्हणे हाची धर्म । येणे लाभे मोक्षधाम ॥४॥

४६०

धन्य मस्तकभूषण । जो का रामपायी लीन ॥१॥
धन्य नेत्राचे भूषण । रामप्रभुचे दर्शन ॥२॥
धन्य कर्णाचे भूषण । प्रभुलीला करिता श्रवण ॥३॥
धन्व नासिक भूषण । ओळखणे सोहं खूण ॥४॥
धन्य वाणीचे भूषण । मुखी नामउच्चारण ॥५॥
धन्य हातांचे भूषण । जे का करु अन्नदान ॥६॥
चरणांचे भूषण । देवालयामाजी जाणे ॥७॥
गोविंदतनय । सांगे अलंकार पाहे ॥८॥

४६१

सर्वची आहे खोटे । बद्ध झाल्या होती तोटे ॥१॥
होऊ नयेची आसक्त । देवा अर्पावे समस्त ॥२॥
देवाचेची देवा द्यावे । शरण जावोनिया भावे ॥३॥
गोविंदतनय म्हणे साचे । पहाता सर्व हे देवाचे ॥४॥

४६२

खटाटोप करोनिया । भक्तिवीण जाशी वाया ॥१॥
चित्त (लक्ष) फाकले बाहेरी । कैसा भेटेल श्रीहरी ॥२॥
जगाची ती उठाठेव । करोनी ना मिळे देव ॥३॥
म्हणे गोविंदतनय । ढोंगे नोहे रामराय ॥४॥

४६३

धरू नको ताठा । जो का घातुकची मोठा ॥१॥
येणे होतसे अहित । गुरुचरणी न घडे प्रीत ॥२॥
नसता प्रेम कंची सेवा । न घडे भेटी जीवशिवा ॥३॥
म्हणे गोविंदतनय । धरी सद्गुरुचरणी सोय ॥४॥

४६४

अहंकार त्यागी तोचि जाणा त्यागी । येर सर्व ढोंगी जाणावे ते ॥१॥
जयाचे पहाता अंतर निर्मळ । नुरलाची मळ काम क्रोध ॥२॥
गोविंदतनय म्हणे हाची खरा त्याग । जेथ होय भोग आत्मत्वाचा ॥३॥

४६५

धरूनी अभिमानाचे ओझे । म्हणतसे माझे माझे ॥१॥
कवटाळिला संसार । त्याने केले हो बेजार ॥२॥
आपणा आपण विसरला । तेणें सदा दुःखी झाला ॥३॥
दास म्हणे गुरुकृपे । मुक्त होशील अपापे ॥४॥

४६६

जन सर्व चाले सावली धरोनी । नोळखीती कोणी पुरुषासी ॥१॥
आत्मरुपी राहे आत्म्याची साऊली । इच्छे केवी आली उत्क्रांतीसी ॥२॥
भ्रमाची साऊली भ्रमे विस्तारली । आभासे भासली नानापरी ॥३॥
एक होते परी त्याचा नाही ठाव । अवघेची वाव सर्व झाली ॥४॥
दास म्हणे जरी उफराटा होशील । तरीच कळेल आत्मरूप ॥५॥

४६७

एकामाजी एक होऊनी मिळसी । जरी हे पंचविशी ग्रासशील ॥१॥
एकामाजी सुख अनेकात दुःख । नाम ते निःशंक मने स्मरी ॥२॥
मेळणी साधोनी उच्चारिता राम । वंदील तो यम पाय तुझे ॥३॥
दासराम म्हणे होता गुरुकृपा । मिळे श्रेष्ठ सोपा भक्तिपंथ ॥४॥

४६८

राम होवोनिया रामभक्ती करा । चुकवोनी फेरा गर्भवास ॥१॥
असत्य टाकाया सत्य उमगावे । आधी शरण जावे संतालागी ॥२॥
संता शरण जावे संत होवोनिया । दूरी सारोनिया काम क्रोध ॥३॥
संतकृपा होता होशील तू संत । राम–नामे सत्य कृपा होय ॥४॥
सर्वा आदी बीज नाम हे उमज । दासाचे ते काज याची मार्गे ॥५॥

४६९

चुकविजे जन्ममरण । ऐशा कर्मा नाव पुण्य ॥१॥
पापकर्म तेची जाण । जेणे चुकेना बंधन ॥२॥
द्वैताचे ज्वलन । करी थोर ते साधन ॥३॥
दासराम सांगे खूण । जेणे विकल्पनिरसन ॥४॥

४७०

कर्ममार्गे जाणा होय चित्तशुद्धी । उपासने बुद्धी दृढा होय ॥१॥
ज्ञाने तो आनंद निरभिमानी होय । धरिता गुरुपाय मार्ग कळे ॥२॥
गुरुभक्ती साधन योग्य आचरण । घडता दर्शन देवाजीचे ॥३॥
दर्शन स्पर्शन ईक्षण भाषण । होता मनोन्मन समाधी ते ॥४॥
आपणात सर्व सर्वात आपण । होताची अभिन्न राम उरे ॥५॥

४७१

गत ग मिळाला । म्हणुनी घोटाळा जाहला ॥१॥
गुकाराचा गकार घेई । ॐकारी तू मिळुनी राही ॥२॥
पिंड ब्रह्मांड ओळखी । राही एकपणे एकी ॥३॥
हृदयी घुमारा । करी साधनी चतुरा ॥४॥
दासराम म्हणे सोपा । मार्ग, येणे चुकती खेपा ॥५॥

४७२

मीपण सांडोनी ओळखी मीपण । तरी देवपण प्राप्त होय ॥१॥
लय साधी चित्त करुनी उफराटे । रसना ही घोटे नामरसी ॥२॥
हकारधारणा सकारी मावळे । चैतन्य उजळे तेजोरुप ॥३॥
तेची तुझे रुप स्वत्व कळे तेथे । येणे भक्तिपंथे द्वैत नुरे ॥४॥
सर्वाभूती समता संतपदी नमन । चौदेहकारण निरसती ॥५॥
देहाचे व्यवहार स्वभावेची चाले । अंतर्यामी डोले सुखे सदा ॥६॥
दासराम बोले गुरुकृपे बोल । गुरुभक्त डोल घेती यास ॥७॥

४७३

अद्वैताचे सुख द्वैती नोहे कल्पांती । अद्वैताची भक्ति अनिर्वाच्य ॥१॥
हरिवाचा धरुनी वाचेचे परता । होइजे निगुता नामपाठे ॥२॥
धरोनी समता सांडुनी विषमता । चैतन्य हे चित्ता भेटवी का रे ॥३॥
दासा म्हणे वृत्ती खेचुनिया राही । अंतर्मुख होई संतसंगे ॥४॥

४७४

शून्यामाजी शून्य मिळता साचार । भय भीती फार वाटे त्यासी ॥१॥
निर्धारिची जाता अमृताची खाण । उचंबळे जाण मुखामाजी ॥२॥
इतराते सुखी करी ऐसा होय । राहील हे काय भीती त्यासी ॥३॥
निरसेल भवभीती भ्रमबाधा । लागता या छंदा गोविंदाचे ॥४॥
दासराम बोले नामसंकीर्तन । रोविले निशाण वैकुंठीचे ॥५॥

४७५

समचरण पूजन । करिता नुरे अहंपण ॥१॥
समचरण नमन । करिता नुरे मनपण ॥२॥
समचरण भजन । करिता चुके जन्ममरण ॥३॥
समचरण कीर्तन । करिता शिव होय जाण ॥४॥
दासराम सांगे । राहे अंतरी ज्ञान जागे ॥५॥

४७६

आपण देवाची लेकुरे । आत्मस्वरुपाकार बा रे ॥
परी ग्रासू तम अंधारे । म्हणुनी नाम कर्तव्य ॥१॥
वंदू देवाचे चरण । गाऊ त्याचे गुणगान ॥
तोडू मायेचे बंधन । अभिमान देहाचा ॥२॥
विश्व देवाचा बंगला । वरी तयाचा मामला ॥
सर्व त्याचा जमीनजुमला । सर्व आम्ही भावंडे ॥३॥
आमुचे एकची अंतःकरण । सत्य अनुभवाचे ज्ञान ॥
जेणे होय समाधान । करू वंदन देवासी ॥४॥
होता मायेचे बंधन । सुटती न जन्ममरण ॥
आशा दुःखासी कारण । बोलें गीता भागवत ॥५॥

सर्व देवाचे देवाचे । येथे काय रे आमुचे ।।
आम्हीच तयाचे । झालो आता काय उणे ।।६।।
दासराम सांगे खूण । जावे संतासी शरण ।।
वर्म घ्यावे ओळखून । सत्य साच नेमस्त ।।७।।

४७७

येची देही मुक्त होसी । येची डोळयाने बहासी ।।१।।
परी करी तत्त्वझाडा । तरी होईल उलगडा ।।२।।
विचार करिता उघडा । तरी होईल निवाडा ।।३।।
गुरुराज म्हणे जाण । ब्रह्म आहो की आपण ।।४।।



# प्रणव : ८

### ४७८

प्रणव आदिबीज शून्य ते केवळ । अक्षर सोज्वळ उजळे जेथे ॥१॥
जीवनावाचोनी केवळ देखणे । जाणणे नेणणे उरेचिना ॥२॥
काही नाही जेथे शब्दाचेवाचोनी । त्यापैल करणी अघटित ॥३॥
त्याचे पैल देखे निरंजन वस्तू । जेथे नुरे मी तू शून्यभाव ॥४॥
दासरामा बोधिती अंतरी श्रीगुरु । जेणे परमेश्वरु भेटे स्वये ॥५॥

### ४७९

शब्द तेज मिळणी याचा होय बिंदू । प्रणवबीज सिद्ध गगनामाजी ॥१॥
माया ब्रह्मामाजी प्रणवबिंदु गहन । जेथोनी जीवनकळा वाहे ॥२॥
प्रस्फुट उच्चार नामब्रह्म गजर ।·उष्ण वायु साचार जेथे झाला ॥३॥
प्रकाश हा झाला द्रवरुप जेथुनी । अमृतवाहिनी झाली जेथे ॥४॥
चार पुरापैल गगनाची ठेव । त्याचे पैल अनुभव घ्यावा याचा ॥५॥
शून्यापैल देखे आत्मा घननीळ । शून्य हे सबळ शून्यालागी ॥६॥
आदिशून्यामाजी झाले प्रणवशून्य । चौशून्ये तेथून प्रसवली ॥७॥
अभावेची भासे शून्याची ही खोळ । दासरामा पैल वस्तुरुप ॥८॥

### ४८०

प्रणवाची वीज कैसी पाझरली । द्रवरूप झाली तेची पुढे ॥१॥
अनेक घटक घटोनिया मळी । तेची पृथ्वी झाली जडरूप ॥२॥
पंचतत्वयांची जहाली शरीरे । तयात विवरे गगनाची ॥३॥
तेथे व्यापोनिया राहिला परमात्मा । जेथे समविषमा लाही झाली ॥४॥
समविषमाचे पैल घननीळ । संतमार्ग सोज्वळ देखे तया ॥५॥
देहामाजी देखे परमार्थ खूण । भेटती आपण देव भक्त ॥६॥
अनिर्वाच्य वाणी ब्रह्मांडीचा ध्वनी । एकत्व मिळणी प्रणव गुह्य ॥७॥
हनुमंत रघुनाथ गोविंद आनंद । बोधिती हृद्गद दासरामा ॥८॥

## ४८१

महद्ब्रह्मी देखे धागा प्रणवाचा । आकर्षण-शक्तीचा अनुभव ॥१॥
याचे आहे सर्वाठायी नियंत्रण । शिव ब्रह्मा भगवान याचे ठायी ॥२॥
सिद्ध साधू संत बोलती सिद्धांत । अनुभवाची मात अनुभवी जाणे ॥३॥
प्रवाही स्वरुप ध्वनी तो प्रणव । सर्वाघटी प्रभाव स्थूलमान ॥४॥
सत्स्वरूप प्रणव शून्याचे भीतरी । अध्यात्माचे परी कळे सोय ॥५॥
आधिभौतिकासी न कळे हे ज्ञान । दासरामा खूण संतसंगे ॥६॥

## ४८२

प्रणव तो देव प्रणव तो देव । जो का सर्वभाव प्रगटरूप ॥१॥
अर्धमात्रेवरी देखे नीलबिंदू । चिदानंद सिंधू मिळणी जेथे ॥२॥
जया पाहताची जन्ममृत्यु नाही । देहीच विदेही झाले संत ॥३॥
दासराम लीन संतांचे चरणी । नित्य गातो मनी नाम त्यांचे ॥४॥

## ४८३

प्रणवाची गाठ उकलता निघोट । पावे औटपीठ अधिराज्य ॥१॥
साधन संपत्ती प्रणवाची गाठ । जेथोनी हा स्पष्ट द्वैतभाव ॥२॥
गुरूकृपे उकले अनुभवाची मात । जाणिजे सिद्धांत दासरामा ॥३॥

## ४८४

प्रणव उदेला कोठून । सांगा सांगा ते ठिकाण ॥१॥
परेपैल हरिवाणी । झाला उद्भव तेथोनी ॥२॥
शून्याचा हा देखे गुण । काही नसूनी दावी दोन ॥३॥
सर्व वेदांताचे गुह्य । दासरामा हरीचे पाय ॥४॥

## ४८५

मनामाजी ऐके शब्द यजुर्वेद । स्वर तो ऋग्वेद वायुमाजी ॥१॥
अथर्वण ऐके जीवाचिये स्थानी । साम तो गायनी शिवापाशी ॥२॥
अनिर्वाच्य वाचा चार वेद बोले । पैल नाद उसळे प्रणवाचा ॥३॥
प्रणवाचे स्थानी संशय निवृत्ती । महावाक्य निवृत्ती सहज होय ॥४॥
दासराम झाला संताते शरण । धरोनी चरण भक्तिभावे ॥५॥

## ४८६

प्रणवाचे आत देखिजे प्रणव । जया नाही नाव रूप काही ॥१॥
नाही आदि अंत दावीतसे द्वैत । चिद्गगनी संत शोभे बरवे ॥२॥
निर्गुणाचे तेज उजळले जेथे । क्षराक्षरापैल ते परब्रह्म ॥३॥
अनिर्वाच्य शद्बापैल ते सोज्ज्वळ । दासरामा निर्मळ निजवस्तू ॥४॥

## ४८७

निर्गुणीचा प्रणव बिंदू लखलखीत । आनंदची जेथ केवल तो ॥१॥
आनंद हा घन वायू विरळ पूर्ण । सत्य आणि चैतन्य अर्धमात्रा ॥२॥
चवथ्या गुणाचा निर्गुणी प्रणव । सत्त्वरुप ठाव लाधे जेथे ॥३॥
पंचप्राण जेथे सांडिती अवसान । आपणा आपण पहाणे ते ॥४॥
पंचप्राण अभाव हेची याच गुण । झाला एकवटून प्रणव तो ॥५॥
ऐसीयापरते सिद्ध साधुसंत । स्वये बुडी देत ब्रह्मरूप ॥६॥
अखंड समाधी न ढळे जे कधी । तयेठायी बुद्धी स्थिर झाली ॥७॥
बोल अबोलणे पहाणे न पहाणे । पैल सिद्धपणे निजवस्तू ॥८॥
निर्विकार पूर्णरूप निरंजन । दासराम सुमन अर्पी तेथे ॥९॥

## ४८८

निर्गुणाचे पोटी साठले गगन । उदेला जेथून प्रणव तो ॥१॥
प्रणवाभीतरी रवि शशी सृष्टी । ब्रह्मांड कपाटी वेग ज्याचा ॥२॥
आकाशाची केवढी अफाट पोकळी । जाणे ते वेल्हाळी शुद्ध माया ॥३॥
श्रमोनी श्रमोनी सांगतो सद्गुरु । दासराम गव्हारू ऐके स्वये ॥४॥

## ४८९

नामाचा बिंदू घडला गे माये । अंतर बाहेर प्रकाशे स्वये ॥१॥
जयाचे पोटी साठले ब्रह्म । ज्याने हो गिळिले आगमनिगम ॥२॥
हृदयात झाली वायूची वासणी । कंठात उदेला ॐकार वन्ही ॥३॥
कैसे ते उजळे ब्रह्माचे तेज । निजाते मिळुनी देखे बा गूज ॥४॥
नामची ब्रह्म नामची ब्रह्म । सद्गुरु दाविती प्रणवाचे वर्म ॥५॥
दासरामा ते लाधली भीक । अलख निरंजन हृदयीचे सुख ॥६॥

## ४९०

चार शून्याआत प्रणवाचे शून्य । तयापैल शून्य देखणेचे ॥१॥
अदृश्य देखणे त्याचेपरते शून्य । केवल ते शून्य त्याचेवरी ॥२॥
चार चार आठ सांडोनिया (ओलांडोनी) वाट । तयावरी निवोट मूळरूप ॥३॥
दासरामा गुरूभजनाची आवडी । म्हणोनि हे गोडी त्याचे अंगी ॥४॥

## ४९१

नेत्र कंठ गती जाण ओलांडिली । अर्धमात्रा देखिली श्रीगुरुकृपे ॥१॥
चौदेहाचे पैल शून्याचा शेवट । स्रवे जेथे नीट अमृतधारा ॥२॥
रक्त पीत श्याम ओलांडिले नीळ । बिंदुल्यात देखिले परब्रह्म ॥३॥
सकार हकार तुर्या ओलांडोनी । ऐकियेला ध्वनी ॐकारीचा ॥४॥
सहजाची गती सहज प्रचीती । सहजची चित्ती समाधान ॥५॥
शून्यातोनी झाले कैसे क्षराक्षर । जेथे चराचर फिरतसे ॥६॥
सूत्रामाजी कैसे चैतन्य ओतिले । प्रमाण अंगुळे बारा ज्याची ॥७॥
सहजाचा जप एकवीस हजार । बोलियेले सार तुकाराम ॥८॥
आधारासी झाली ब्रह्म्याची उत्पत्ती । रजोगुणस्थिती सत्य सत्य ॥९॥
तेथोनिया सूत्रगती उद्भवली । शून्याची हे झाली रचना सारी ॥१०॥
शून्यात बिंदुले बिंदुल्यात ब्रह्म । आगम निगम नाही जेथे ॥११॥
दृष्टीचिये अंती शून्याचे शेवटी । बिंबरुप भेटी आत्मयाची ॥१२॥
तुरीयेचे अंतरी मनाचे उन्मन । बोलियेले ज्ञानदेव सत्य ॥१३॥
संतांची वचने हनुमंतरायानी । अंतरी बोधोनी प्राप्त केली ॥१४॥
दासराम मागे संतांचिये पायी । हेची सूत्र देही अघवें दावा ॥१५॥

## ४९२

बिंदुठायी झाले शून्य । क्षरले अक्षरिया चैतन्य ॥१॥
क्षराक्षर शब्द ध्वनी । सदा उठे शून्यातोनी ॥२॥
चिद्रूपाची साटी । प्रणवाची जाली गाठी ॥३॥
वारियाचा खेळ । आत्मघन जो निश्चळ ॥४॥
पूर्ण आत्मा पूर्ण काम । तेथे कैचा दासराम ॥५॥

# देव : ९

४९३

श्रीगणेश पाही कल्याणकारक । विघ्नाचा हारक तोचि पाही ॥१॥
आनंददायक सुखाचा कंदक । उत्तम स्वादक जो का असे ॥२॥
मंगलकारक गणेश तो एक । इंद्रियनायक जो का असे ॥३॥
विद्येचा दायक फलाचा दायक । दुष्टांचा हारक जो का असे ॥४॥
शक्तीचा दायक युक्तीचा दायक । निर्बल हारक जो का असे ॥५॥
नामाचा गायक विसावा दायक । कवित्वदायक जो का असे ॥६॥
देवाचा दायक बोधाचा दायक । सुखाचा दायक जो का असे ॥७॥
दयेचा दायक क्षमेचा दायक । शांतीचा दायक आद्य पाही ॥८॥
ऐशा आद्यालागी दास हा शरण । धरूनी चरण लीन होई ॥९॥

४९४

रामा तूचि प्राण ॥ध्रु॥
स्थिरचर तोहि तूचि ।
जे जे दिसते ते ते तूचि ।
सोडू नको मज जाण ॥१॥
धनिकांचा धनिक तूचि ।
बलिष्ठांचा बलिष्ठ तूचि ।
तूची मला प्रिय जाण ॥२॥
सर्वाधिक थोर तूचि ।
राजांचाहि राजा तूचि ।
तूचि श्रेष्ठ जाण ॥३॥
देवांचाहि देव तूची ।
थोरांचाहि थोर तूची ।
टाकू नको मज जाण ॥४॥
पाठीराखा सज्जनांचा ।
संहारक दुर्जनांचा ।
दासा दयाळु जाण ॥५॥

४९५

आदिशक्ती सीताबाई । सर्व त्रैलोक्याची आई ।।ध्रु।।
सार्वभौम महाराणी । धन्य देवांची जननी ।।१।।
करी भक्तांचे पालन । करवी रामाचे दर्शन ।।२।।
दास लोळे तिचे चरणी । राम गाई ध्यानी मनी ।।३।।

४९६

विठोबासी शरण जावे । अवीट ते ऐसे व्हावे ।।१।।
अवीटची तो जाहला । तोचि जगामाजी भला ।।२।।
मायबाप पांडुरंग । सत्ताधीश जो अभंग ।।३।।
करी भक्तावरी माया । उभा ठेला वाचवाया ।।४।।
दास होऊनी अनन्य । तया घाली लोटांगण ।।५।।

४९७

स्मर मना गुरुदत्त । नको होऊ मनांकित ।।१।।
गुरूदत्त दाता थोर । नेई तुजला पैलपार ।।२।।
अहो तयाचे चरण । देवादिका दुर्घट जाण ।।३।।
ऐसे धरिता चरण । काळा हटविती जाण ।।४।।
दास म्हणे करी नमन । एक मनोभावे जाण ।।५।।

४९८

थोर आद्य गणपती । नमू तयासी जगती ।।१।।
जो का विद्येचा प्रणेता । ज्याची काळावरी सत्ता ।।२।।
अहो त्यांची कृपा होता । धन्य मानव तत्त्वता ।।३।।
दास वंदितसे जाण । अर्पी तन मन धन ।।४।।

४९९

विष्णु करी सर्व जीवांचे पालन । संकटी रक्षणा धाव घाली ।।१।।
भक्तासाठी आड घाली सुदर्शन । कंटकनिर्दळण करी पाही ।।२।।
सर्व त्रैलोक्याचा करितो सांभाळ । भक्ता मोकळील ऐसे नाही ।।३।।
दास वेगे जाई तयासी शरण । तोचि सखा जाण कळवळ्याचा ।।४।।

५००

राम सर्वत्र संचला । नाही आला आणि गेला ॥१॥
राम–महाराज थोर । त्यासी स्मरा वारंवार ॥२॥
राम असता आराम । म्हणोनिया स्मरा राम ॥३॥
दास म्हणे सांगो किती । चार सहा ते वानीती ॥४॥

५०१

जगी मार्गदर्शी पाही । गुरु दत्तराज भाई ॥१॥
झडकरी शरण जाई । तुज दावितातो सोई ॥२॥
संतामाजी अग्रगण्य । तीही लोकी जे का धन्य ॥३॥
काय वर्णू महिमान । एक झाले तीन गुण ॥४॥
उभा ठेला कृष्णाकाठी । जगा उद्धारायासाठी ॥५॥
दास म्हणे समाधान । तेथे कैचें भय जाण ॥६॥

५०२

गोपी सांगे गोपिकेसी । कृष्णे मात केली कैसी ।
खरोखरी हा हृषीकेशी । सर्वांतर्यामी ॥१॥
मुरलीरवाने मोहित करतो । नाना लीला करूनि दावितो ।
खोडकर हा बहुसा दिसतो । श्रीकृष्ण पाही ॥२॥
दुष्टांचे संहारण करितो । भक्तजनांचे पालन करितो ।
आपुल्या बळे जग चालवितो । शामवर्ण पाही ॥३॥
दुग्ध दधी नवनीत । प्रिय जया असे सत्य ।
दास म्हणे चांग नीत । जपा दावी तो ॥४॥

५०३

महेश्वर कोठे आहे । तोचि आकाशात आहे ॥१॥
अन्नपाणी तोचि देतो । प्रेमे सर्वा सांभाळितो ॥२॥
दास म्हणे अहो देवा । घ्यावी अखंडित सेवा ॥३॥

५०४

देव करी सर्व काही । तेणें निर्मियेली मही ॥१॥
जीवालागी केले धणी । ठेला आगळा चापपाणी ॥२॥
निमित्ताचा धणी जीव । येर पाहाता सर्व वाव ॥३॥
म्हणे गोविंदतनय । मनी धरा रामपाय ॥४॥

५०५

श्रीरामाचे असती दास बलभीम मारुती ।
रामनाम हे वाचे वदती जगामाजी ख्याति ॥१॥
हनुमंतचि हे फार प्रेमळें हरिनाम गाती ।
जीवशिवतंतु एकचि होऊनि देही विस्मृती ॥२॥
सोहंरुप वायुपुत्र हा असे जयापाठी ।
तया नाही पुनर्जन्म जोडी जगजेठी ॥३॥
हनुमंतांचे काय वर्णू मी तयांचे गुण ।
परोपकारी असे मारुती दासाचा प्राण ॥४॥

५०६

पांडवा रक्षिले । अर्जुनाचे सारथी झाले ॥१॥
ते हे आदी भगवान । धन्य धन्य रुक्मिणीरमण ॥२॥
द्रौपदीचा राखिला जोडा । होवोनिया आपण पुढा ॥३॥
अर्जुनासी उपदेशिले । स्वकर्मासी युक्त केले ॥४॥
पुराणीचा अनुभव । देहामाजी पहावा भाव ॥५॥
दासराम लागे चरणी । ज्यानी गाईले पुराणी ॥६॥

५०७

अठ्ठावीस युगे विटेवरी उभा । चैतन्याचा गाभा पांडुरंग ॥१॥
सोळा बारा यांची जेथे झाली मिळणी । कटी कर ठेऊनी राहिलासे ॥२॥
विभागोनी गती मुळा ते जडली । बरवी शोभली ऐसी मूर्ती ॥३॥
चतुर्दलावरी जयाचें चरण । जाणावी ते खूण संतसंगे ॥४॥
मस्तक जयाचे ब्रह्मांडाचे वरी । कटी दिसे बरी स्वर्गापाशी ॥५॥
सुखाची हे मूर्ती जीवाची विश्रांती । भावाभाव स्थिती लय पावे ॥६॥
ध्वनीपैल जाय लक्ष्याते सांडोनी । अलक्ष्याचे स्थानी पांडुरंग ॥७॥

प्रणव पंढरी क्षेत्र ते विख्यात । सिद्धसाधु संत गाठी होय ॥८॥
अर्धमात्रा जेथे वाहे चंद्रभागा । त्रिवेणी विभागा पातलीसे ॥९॥
हृदयकमळी शिव आणि विठ्ठल । एकत्व सोज्वळ रुप दिसे ॥१०॥
हृदय कळता सर्व कळे वेदांत । जेथे भगवंत भेटे स्वये ॥११॥
निःशद्वाची माळ देई पांडुरंग । देखे प्रेमयोग रुक्मिणी माता ॥१२॥
तेजोस्वरुपीणी असे ते रुक्मिणी । पुंडलीक मुनी भाव शुद्ध ॥१३॥
चंद्रभागेमाजी सिद्ध साधू संत । नित्य बुडी देत अद्वयत्वे ॥१४॥
गुरुकृपेवीण नुमगे ही मात । कळे जरी मात बोळे माझी ॥१५॥
ज्ञानेश्वर तुकाराम धन्य संत । बोलिले सिद्धांत शोधोनिया ॥१६॥
ऐसी ते करणी हनुमंतरायानी । सांगितली कानी दासरामा ॥१७॥

५०८

विठ्ठल विठ्ठल विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥१॥
उभा राहिलोसे द्वारी । तुझ्या भक्तीचा भिकारी ॥२॥
तुझी करितो चाकरी । घाल प्रेमाची भाकरी ॥३॥
गुरुकृपा बडिवारी । दासराम विठ्ठलगजरी ॥४॥

५०९

काही मौन धरी काही बोले परी । ऐसा तो श्रीहरी करी क्रीडा ॥१॥
इच्छेवरी करी सकळही खेळ । भक्तांचा कृपाळ समर्थ हा ॥२॥
सकळही सुख दुःख लाज तुला । मानामान गोपाळा सर्व भय ॥३॥
दासराम विनटला तुझे पायी । न करीच काही संकल्प हा ॥४॥

५१०

थोर देव आम्हा सकळा निर्मिता । तयासी निर्मिता कोणी नाही ॥१॥
थोर देव आम्हा सर्वांशी पोशिता । तयासी पोशिता कोणी नाही ॥२॥
थोर देव आम्हा सर्वांचा आधार । परी निराधार थोर देव ॥३॥
थोर देव आम्हा सकळांचा हर्ता । तयालागी हर्ता कोणी नाही ॥४॥
गुरुराज म्हणे देव तो समर्थ । तोची परमार्थ ओळखावा ॥५॥

## ५११

काय वर्णू आता देवाची थोरवी । देखवी ऐकवी एक देव ॥१॥
तयावीण जगी कोण आहे थोर । जेणे हे अपार निर्मियेले ॥२॥
उभारिला पहा आकाश मांडव । काय दीपोत्सव केला असे ॥३॥
तयामाजी स्तंभ दिला पवनाचा । पृथ्वीचा (भूमीचा) बगीचा केला असे ॥४॥
त्यात निर्मियेल्या बाहुल्या अनंत । नाचवी प्रचीत येत असे ॥५॥
गुरुराज म्हणे लीळा पाहो जाता । थक्क बुद्धिमत्ता होत असे ॥६॥

## ५१२

ब्रह्मस्वरुपाचा अंश । ऐसा शीव तू आहेस ॥१॥
ब्रह्मरुपी मिथ्या माया । जहाली जैशापरी छाया ॥२॥
ब्रह्माचिये सत्ते चाले । दासराम वर्म बोले ॥३॥

## ५१३

प्रभूचिये सत्ते चाले हे ब्रह्मांड । त्याचा आहे दंड सर्वावरी ॥१॥
त्याचिये भीतीने सर्व चालले हे । तयासीच लाहे गुरुकृपे ॥२॥
तयाचा झालिया गुरुकृपे दास । नेईल मोक्षास रामचन्द्र ॥३॥
अभक्ता न चुके पहाता जन्ममरण । सांगतसे खूण गोविंदतनय ॥४॥

## ५१४

रामाचिये सत्ते वागे सूर्य चंद्र । भीत असे इन्द्र महादेव ॥१॥
ऐसी ज्याची आहे सर्वावरी सत्ता । तयाचिया भक्ता काय उणे ॥२॥
काहीच न चले त्याचे सत्तेवीण । पहाताची जाण कळो येई ॥३॥
गोविंदतनय सांगे महिमान । अतर्क्य तो जाण वेदालागी ॥४॥

## ५१५

त्याचे सत्ते वारा वाहे । सूर्योदयास्त होता हे ॥१॥
भिवोनिया रामा । अग्नी करी त्याचे कामा ॥२॥
म्हणे गोविंदतनय । मृत्यू चुकेनाची पाहे ॥३॥

## ५१६

जरी का वायू खवळला । तरी तो उडवील विश्वाला ॥१॥
परी तो वहातो बेताते । रामप्रभूचिया सत्ते ॥२॥
जरी उसळले पाणी । सर्व टाकील थरारोनी ॥३॥
परी रामप्रभूचा दंड । म्हणोनिया सर्व थंड ॥४॥
अग्नी रहातो निवांत । ऐका देवाची हो मात ॥५॥
म्हणे गोविंदतनय । प्रभूची ये सत्ता पाहे ॥६॥

## ५१७

राम सर्वात वरिष्ठ । पहा अनुभवे स्पष्ट ॥१॥
सर्व ठिकाणी व्यापिला । जो का आधार विश्वाला ॥२॥
सर्वरूपाने नटला । चालवी जो जगताला ॥३॥
वंदी गोविंदतनय । त्रिकाळी हे रामपाय ॥४॥

## ५१८

सर्व पहाता अंतराळ । कैसे लटकले गोल ॥१॥
सर्व विश्व उभारिले । कोळी करी जैसे जाळे ॥२॥
काय तयाची करणी । थक्क होतसे मूढ प्राणी ॥३॥
राम म्हणें त्यासी शरण । जाता चुके दुःख जाण ॥४॥

## ५१९

देवसत्ता ओतप्रोत । पहाता येतसे प्रचीत ॥१॥
काही न चलें त्याचेवीण । हीं तो जाणा वर्मखूण ॥२॥
म्हणे गोविंदतनय । सर्वची करी रामराय ॥३॥

## ५२०

हरी गुरु जहाला । जगी करी गुणलीला ॥ध्रु॥
करी मंगला । गाई मंगला ॥१॥
जगती विराजे निर्भयवृत्ती । चित्ती दावी हरीला ॥२॥
तीर्थाटणी पदी रिघती दुर्जन । पाहोनिया तपाला ॥३॥
श्रीहरी सांगती अंध तुम्ही रे । जा मागें रे सुखाला ॥४॥
दासराम हा मागतसें हरी । देई ठाया मनाला ॥५॥

## ५२१

लिहिता देव लेखन देव । वाचक देव जाणावा ॥१॥
अद्वयाचा अभिप्राव । मनी सदैव घ्यावा हा ॥२॥
दासरामी महाराज । तोची एक देवराज ॥३॥

## ५२२

तुजवीण कोणा सांगावे गाऱ्हाणें । काय आहे उणे तुजपाशी ॥१॥
बोलसी ना चालसी रुसलासी काय । लाडके ते काय नामदेव ॥२॥
कोणाचे सामर्थ्य सोडवाया मजसी । कोण उपेगासी येईल माझ्या ॥३॥
एकादशीपाशी शिवरात्र गेली । उपाशी राहिली जैशापरी ॥४॥
तैसे नको व्हाया म्हणोनी तुला रे । आळवितो बा रे कमलापती ॥५॥
येवढे नामदेवा करा मजसाठी । जेणे जगजेठी बोले मजसी ॥६॥
दासराम बोले आता देवराया । ओळावे सदया मजवरी ॥७॥

## ५२३

माझ्या मायबापा हनुमंता रे । धन्य वायुपुत्रा गुणवंता रे ॥१॥
अहंकारा नासी भेद बुडवो रे । चित्त रामपदी नामी जडवी रे ॥२॥
नामामाजी राम कैचा साठला रे । तुझ्यासारिखा समर्थ मज भेटला रे ॥३॥
भक्ता पंथ मोठा सकळामाजी रे । करुणाकरे केली कृपा सहजी रे ॥४॥
दासराम विनटला पायी रे । हरिकीर्तनाचा मान दिला संती रे ॥५॥

## ५२४

बुद्धि शून्याआतू । रामकृष्ण हरी निवांतू ॥१॥
दावी अहंकार रुद्र । शून्य ब्रह्मा सृष्टीश्वर ॥२॥
निरहंता विष्णू आपण । करी भक्तासी तल्लीन ॥३॥
ब्रह्म पूर्ण आनंदघन । दासरामी निरंजन ॥४॥

## ५२५

पूर्ण ब्रह्म परमेश्वर । लावी हुरहुर जीवा लावी हुरहुर ॥१॥
पूर्ण ब्रह्म परमात्मा । जेथ विश्व चूर ॥२॥
जीवशिव हे काहूर । उचंबळे पूर ॥३॥
दासराम शरण त्यासी । गाई दिव्य सूर ॥४॥

५२६

दत्तात्रय माऊली ग माझी दत्तराज माऊली ॥१॥
आकाशमार्गी संचरताना भूलोकी या आली ॥२॥
भगवी कफनी पायी पादुका कीर्ती बहु गाजली ॥३॥
अवधूत मूर्ती सतेज सुंदर प्रभुनामी रंगली ॥४॥
दासराम हा पायी लोळता कडकडुनी भेटली ॥५॥

५२७

(पुरंदर विठ्ठल यांचे देव बंदा नम्म स्वामी बंदा या पदाचे मराठी रूपांतर)

देव आला माझा देव आला । देव देंव शिखामणी राजमणी आला ॥१॥
मंदरोद्धर आला महामनोहर आला । वृन्दावन व्रजवासी गोविंद आला ॥२॥
शेषशयन आला गरुडवहान आला । नरनारायण आला नारायण आला ॥३॥
नित्यतृप्तीसी आला निगमगोचर आला । सत्य श्रीदासरामी विठ्ठल हा आला ॥४॥

५२८

( चाल :- भुपाळी )

काय मागू मी तुला विठोबा काय मागू मी तुला ।
समाधान हे तुझ्याच नामी गुरुच्या अज्ञ मुला ॥१॥
कसाही असलो तरी गुरुंचा म्हणवुनी भार तुला ।
महाराजांची सत्ता तुजवरी ते म्हणती आपुला ॥२॥
डंका पिटिला या जगतासी ' जहालो गुरूचा खुळा ' ।
सुज्ञ लोक हे म्हणती जय गुरु जय गुरु म्हणतो खुळा ॥३॥
बारियाची भेटी करोनी बोध करी कानुला ।
मराठियासी कानडी बोध दाचियले अंगुळा ॥४॥
दासराम सानुला विठोबा दासराम सानुला ।
वासुदेव हरिनामी करिसी तृप्त सदा तान्हुला ॥५॥

५२९

मायबाप देव । येथें कैचा तो संदेह ॥१॥
मायबापांची ती सेवा । पोचतसे पंढरीरावा ॥२॥
मायबापांची ती आज्ञा । पुंडलीकें पाळली जाणा ॥३॥
विठुराय तयेसाठी । ठेला ठेऊनी कर कटी ॥४॥
दास म्हणे ऐसा महिमा । मायबाप जगदात्मा ॥५॥

५३०

आत राम बाहेर राम । अवघाची जाहला राम ॥१॥
सर्व व्यापिले रामाने । काय आहे रामाविणे ॥२॥
गुरुराज म्हणे राम । भक्तालागी नुरवी काम ॥३॥

५३१

साधिलिया कळ । मग नाही पहा वेळ ॥१॥
अंतरीचा गेल्या मळ । देव आपुल्याजवळ ॥२॥
देव काही दूर नाही । आहे आपुल्याच देही ॥३॥
गुरुराज सांगे खूण । जेणे होय समाधान ॥४॥



# संत : १०

५३२

जाता संतांच्या कीर्तना । होय ब्रह्मानंद मना ॥१॥
तेथे स्वर्येची आपण । प्रेमे नाचे नारायण ॥२॥
मग कैचा वर्णू थाट । पीतप्रभा लखलखाट ॥३॥
वास सुटला कस्तुरीचा । रंग भरला कीर्तनाचा ॥४॥
रामनाम गोड रस । संत वाटती जनास ॥५॥
ऐसा घेता हो प्रसाद । जीवा होय ब्रह्मानंद ॥६॥
दास म्हणे जाता शरण । होय हे वाचे दर्शन ॥७॥

५३३

संतांचा महिमा न कळे कोणासी । आधार जगासी या संतांचा ॥१॥
जोवरी हे संत तोवरी हा सूर्य । तोवरी हे राज्य धनधान्य ॥२॥
नातरी ना काही न टिके हे जग । काही नाही सांग संत नसता ॥३॥
संतांची परीक्षा कळली कोणाला । माशाच्या झोपेला मासा व्हावे ॥४॥
परमार्थाच्या बागी संसार कुंपण । देवाची राखण करिताती ॥५॥
देव लपविला अहो या संतांनी । संतसंगी जाणी धरिता बरे ॥६॥
संतांची ती निंदा करु नये कधी । देव पाहे तधी कोपो लागे ॥७॥
राहवे ते पहा संतांच्या आडोशी । वृक्षाखाली जैसी सावली हे ॥८॥
संतकृपा होता संत-गम्य कळे । गुरुकृपेबळे देव साह्च ॥९॥
गुरुकृपा होण्या करावे भजन । ऐकावे कीर्तन श्रवणमात्रे ॥१०॥
दास म्हणे जगी हनुमंत थोर । शांतीचे आगर नाम गाती ॥११॥

५३४

सद्गुरुंची थोर दया । जैसी पिलावरी माया ॥ ध्रु. ॥
संत उदार उदार । भक्ता देती ते भांडार ॥१॥
अहो भाग्यवंत संत । काय वानू भगवंत ॥२॥
दास म्हणे मी तो हीन । धरितो संतांचे चरण ॥३॥

## ५३५

काय वानू मी तो संतांची हो थोरी । वाणीच अपुरी होत असे ॥१॥
स्वरुप जाणता बोलणे ते नाही । मूकत्वचि होई जाण पाही ॥२॥
संतजन्मो हा थोर तुकाराम । ( संतांची जननी )
त्यांचे सरीसे कर्म करावे गा ॥३॥
राम म्हणे काही वर्णन घडेना । अनुभवे मना कळो येई ॥४॥

## ५३६

मायबापांच्या सेवेने । संता आले थोरपण ॥१॥
रामकृष्ण पुंडलीक । महा संतजन देख ॥२॥
पहा चरित्रे संतांची । व्यासादिक समर्थांची ॥३॥
कोटणीस हे विख्यात । एकनाथ मूर्तिमंत ॥४॥
मायबापा दास शरण । मनी करी गुरुस्मरण ॥५॥

## ५३७

संसारसागरी आम्ही आलो । यमपाशी सापडलो ॥१॥
जन्ममृत्यूचे चराट । सोडवील तोचि श्रेष्ठ ॥२॥
कोळीयाने जाळे । घट्टमुट्ट पसरीले ॥३॥
दास म्हणे थोर संत । करती कोळ्याचावरी मात ॥४॥

## ५३८

हरीचे भक्तांच्या दासांचा किंकर । परी केले अपार कवतूक ॥१॥
रेडियाचे मुखी वदविती वेद । तेथे काय अगाध सत्ता वानू ॥२॥
ज्ञानाईने दिला आनंदीआनंद । वदविले हृद्गद हनुमंते ॥३॥
कार्तिक वद्याची त्रयोदशी सुफळ । शुद्धता केवळ आशिर्वादे ॥४॥
सिद्ध संतपद कमलाची धूळी । दासराम लोळी महाद्वारी ॥५॥

## ५३९

संत विश्रांतीचे स्थान । संत अध्यात्म जीवन ॥१॥
संत आत्मानंद घन । संत ब्रह्म ते सगुण ॥२॥
संत जागृत स्मरण । ज्ञान पूर्ण दासरामा ॥३॥

५४०

असंगाशी संग प्राणासवे गाठी । अनुभव गोष्टी संतजनी ॥१॥
देवे धरिता नरडे अभयत्व जोडे । मरणांती घडे लाभ बरवा ॥२॥
आपुले मरण देखिले संतांनी । देही ठेले होऊनी मोक्षरुप ॥३॥
संतांनी भरली मोक्षांची पोतडी । रामनाम रूपडी संपत्ती ते ॥४॥
दासराम म्हणे अक्षयाचे सुख । मेळविले विशेष संतांनी या ॥५॥

५४१

रेडियाचे मुखे वेद वदविले । धन्य ते हे झाले ज्ञानदेव ॥१॥
ज्ञानियांचे राजे संतासी अग्रणी । धन्य चक्रपाणी सगुणमूर्ती ॥२॥
तयानी दाविले नवल कौतुक । दासराम मशक वदविला ॥३॥
हनुमंत सद्गुरु बोळले त्यावरी । ज्ञान अभ्यंतरी प्रगटविले ॥४॥
दासराम लोळे ज्ञानदेवचरणी । देखतो नयनी त्यांची लीळा ॥५॥

५४२

रामकृष्णहरी मार्ग वैकुंठीचा । सुलभ संतांचा भाविकासी ॥१॥
स्वानंदसाम्राज्य छत्रपती संत । संतोष पावत भक्त तेथे ॥२॥
संतांचिये गावी उरेना भिकारी । ब्रह्मानंद पदरी घालिती ते ॥३॥
धन्य धन्य माझे सद्गुरु समर्थ । झाले कृपावंत दासरामा ॥४॥

५४३

नभाचा हा गाभा । संतांचिये पुढे उभा ॥१॥
नानापरी कौतुक करी । वानिताती वेद चारी ॥२॥
हरिभक्त झाले मुके । पूर्ण धाले तया सुखे ॥३॥
दाविताती संत नभा । कैची नवल हे प्रभा ॥४॥
रस्त्यावरी रात्रीनी उभा । दासराम देखे शोभा ॥५॥

५४४

माऊली ते ज्ञानेश्वरू । नाथ नामदेव थोरू ॥१॥
तुका निळोबादी संत । जगी समर्थ विख्यात ॥२॥
त्यानी पेटविला दीप । परमार्थाचे ते अधिप ॥३॥
आचार्य ते जगद्गुरू । दासराम ते लेंकरू ॥४॥

## ५४५

हरिभक्तीचे मंदिर । आत शोभे विश्वंभर ॥१॥
तेथे वसती केली ज्यानी । धन्य धन्य त्रिभुवनी ॥२॥
तया पदा नाही नाश । जो का मिळाला वस्तूस ॥३॥
जगी राहिला व्यापोनी । दासराम त्याचे चरणी ॥४॥

## ५४६

जन्ममरणाचे बीज मूलस्थानी । शून्य दृष्टी ज्यानी स्थिर केली ॥१॥
धन्य धन्य संत साधू ते सज्जन । अलक्ष्य लक्षून पूर्ण झाले ॥२॥
दासराम घाली तया लोटांगण । मागे हेची दान सर्वकाळ ॥३॥

## ५४७

नामामाजी ज्यानी प्रगटविला देव । कळा ते अपूर्व साधोनिया ॥१॥
धन्य धन्य नामदेव संतराय । स्वयं तेजोमय नामब्रह्मी ॥२॥
हरिकीर्तनी जे नटनाच केला । सगुण देखिला पांडुरंग ॥३॥
नाम ब्रह्म शब्द ब्रह्मी व्यक्त केले । पूर्ण नाचविलें वाणीमाजी ॥४॥
ब्रह्मानंद ज्यांनी सुखे डोलविला । देहभाव नुरला श्रोतयांचा ॥५॥
श्रोता वक्ता एकरूपे नाचू लागे । पांडुरंग संगे दिव्य तेज ॥६॥
नवल ते प्रभा नवल ते प्रभा । दिपवीले आभा स्वप्रकाशे ॥७॥
दासरामा नामी नवल जहाले । नामया दाविले खेचरानी ॥८॥

## ५४८

जयाचिये पोटी व्याली आदिमाया सृष्टी ।
भक्ताचिये हृदयी बैसे स्वये जगजेठी ॥१॥
सावंता माळीयें देव लपविला पोटी ।
करी शुद्ध चित्तें साधुसंगे गुजगोष्टी ॥२॥
बागाइती काम करोनी नाम जपे वाणी ।
चिद्रूप स्मरणी साठविले आत्मनयनी ॥३॥
हृदय उमगोनी वायूचा कोंडमार केला ।
चंचळासी निश्चळ करुनी निश्चळ दडविला ॥४॥

जयालागी मिरची कोंथिबीर हरी झाला ।
जीवात्म्याचे पूर्ण स्वरूपी हरिनामी धाला ॥५॥
नामदेवा खूण तयांची सापडली निकी ।
शोधोनी विठ्ठल सख्य जोडीयले सुखी ॥६॥
तद्रूप होऊनी नामदेव नामी धाले ।
ऐसिया संतांचे दासरामे चरण धरिले ॥७॥

## ५४९

गोपाळबुवा मडगावकर । कीर्तनी जे तदाकार ॥१॥
स्वयंज्योती नाचविली । परती आरतीने नाशिली ॥२॥
कुतर्कता नाशियेली । जगा साक्ष हे दाविली ॥३॥
दासरामा वरदान । गातो सज्जनांचे गुण ॥४॥

## ५५०

चांगदेव योगियांचा जीवभाव । घेती ज्ञानदेव हिरावोनी ॥१॥
नवल हे करणी ज्ञानाईने केली । ज्ञानकळा दाविली मुक्ताईने ॥२॥
ज्ञानाचा सोपान निवृत्ती लाधली । निवृत्ती मुराली चित्त–वृत्ती ॥३॥
संतांचा आनंद निरुपम सेविला । हाती कैंचा आला वर्म ठेवा ॥४॥
आनंदाचा पूर चिदाकाशी झाला । सद्रूपी बुडाला चिदानंद ॥५॥
दासराम गाये नाचे तो सत्पदी । अढळ निःशद्बी अखंडता ॥६॥

## ५५१

हरिनाम ज्याचे वाणी । त्रिभुवने त्याचे चरणी ॥१॥
हरिनाम सुधा सेवीत । धन्य भगवंताचे भक्त ॥२॥
कैंचे जाले नामरूप । दग्ध केले पुण्यपाप ॥३॥
दासराम संतापायी । ठेवी वेळोवेळा डोई ॥४॥

## ५५२

नामी निवेदन । धन्य तेची संतजन ॥१॥
सदा जे संतोषी । डुल्लती जे नादघोषी ॥२॥
समबुद्धी भगवद्भाव । सर्वाघटी जया देव ॥३॥
दुःख देना कोणा जीवे । दासराम शरण भावे ॥४॥

## ५५३

संत तो अद्वैती समरस झाले । रंगोनिया गेले भक्तिरसी ॥१॥
नामसंकीर्तन उरले त्या ठाया । देहभाव लया गेला त्यांचा ॥२॥
त्रिपुटी ग्रासिली वृत्ती स्थिर झाली । ज्योतीसी मिळाली आत्मज्योती ॥३॥
दासराम ऐशा संतासी शरण । वंदितो चरण प्रेमभावे ॥४॥

## ५५४

देव गजानन रे मानव देव गजानन रे ॥ध्रु॥
मनशुद्धीने रामकृष्णी या होती दयाघन रे ॥१॥
हरिवृत्तीने साधनी रमुनी ।
हरी हर विठ्ठली रे ॥२॥
मायबाप तुम्ही संत हरिरुप ।
एकची हृदी वारे ॥३॥
दासराम हा चरणी विनटची बोलवी गुरुगुण रे ॥४॥

## ५५५

धन्य गोंदवलेकर । ईश्वराचे अवतार ॥१॥
रामनामी रंगुनी गेले । रामरूप होऊनी ठेले ॥२॥
रामराय उपासना । वाढविली जगती जाणा ॥३॥
संप्रदाया वाढविले । राम म्हणे मी वंदिले ॥४॥

## ५५६

आदिनाथे केला मच्छेंद्रासी बोध । वोपी जो हृद्गद गोरक्षासी ॥१॥
गोरक्ष बोळला गहिनीनाथावरी । गहिनी कृपाकरी निवृत्तीसी ॥२॥
निवृत्ती पूर्ण केला ज्ञानेश्वर । सोपान उदार ज्ञानदेव ॥३॥
सत्यामलकासी बोधिती सोपान । हरेश्वर जाण त्यांचा शिष्य ॥४॥
हरेश्वरे दिले गोविंदराजा गूज । गोपाळनाथ सहजपायी धाले ॥५॥
गोपालनाथांचे शिष्य गुंडकेनाथ । मुकुंदराज संत त्यांचेपायी ॥६॥
मुकुंदराजांचे मागे भगवंतराव । पुढे महाराज काशिनाथ ॥७॥
काशीनाथ कृपा करी तुळसीदासा । सदाशिवा पिसा केले तेणे ॥८॥
शिवाचा रघुनाथ पावे परमानंद । करी भीमानंद रामानंद ॥९॥
दासराम करी संतांचिये स्तुती । जेणे पावे मती विश्रामासी ॥१०॥

५५७

प्राणाचे जे नाथ तेची एकनाथ । ज्यावीण क्षणात रहाता नये ।।१।।
ब्रह्मगिरी नित्य हरीचे कीर्तन । पावे समाधान एकरूपी ।।२।।
सर्व हरविती ऐसे हे दयाळ । आत्मास्थिती केवळ हाती देती ।।३।।
निर्गुण ओतिले जयांचे कृपेने । दासराम खुणे स्थिर झाला ।।४।।

५५८

रामनामी तुकता तेची तुकाराम । स्वामी श्रीगुरु आनंदधाम ।
कीर्ती गाजे त्रिजगी परम । करा घोष तुकाराम तुकाराम ।।१।।
तुकाराम म्हणता वाचे । भय नाही कळिकाळाचे ।
बीजनाम प्रगटे साचे । हृदयी नाचे विठ्ठल ।।२।।
हरिकीर्तन गजर रंग । नादे घुमतो अभंग ।
तुकाराम होती दंग । भेटी चांग देती रामा ।।३।।

५५९

शब्दाचे उपरी निःशब्दाची गोष्टी । त्याचा स्वाद दृष्टी दाखवी जो ।।१।।
लावी दृष्टी चट कानाने चाखवी । वाचेने बोलवी निःशब्दाते ।।२।।
धन्य तोची संत तेणे केली मात । उभारोनी हात गूज सांगे ।।३।।
मनाते मारोनी निःशब्दा ऐकवी । तया साजे पदवी संतसिद्ध ।।४।।
रामी हनुमंत सद्गुरु समर्थ । संत भक्तांकित दासराम ।।५।।

५६०

केवी आले दासगणू । परिसाया हरिकीर्तनू ।।१।।
तव कीर्तन गोविंदाचे । नामगजरी सप्रेमाचे ।।२।।
होय सर्वांसी आनंद । परिपूर्ण सत्व शुद्ध ।।३।।
संत कवतूक करिती । दासरामा त्यांची प्रीती ।।४।।

५६१

व्यासाचिया मनी जाली तळमळ । उडाली खळबळ अंतरातू ।।१।।
धावोनिया आले नारद श्रीमुनी । आले लोटांगणी व्यास तया ।।२।।

संत

हरि-गुण वानी नारद सांगत । ओळखोनी हेत व्यासांचा हा ॥३॥
तयेवेळी व्यास वर्णी भागवत । समाधान चित्ता झाले त्यांचे ॥४॥
दासराम तया घाली लोटांगण । पूर्ण समाधान मूर्ती ज्यांची ॥५॥

५६२

एकनाथ वैष्णव वीर । करी षड्रिपुसी झुंजार ॥१॥
ज्यांचे दयार्द्र अंतर । हरिभक्तीचा बडिवार ॥२॥
महाराच्या पोरा । घालुनी दे अलंकारा ॥३॥
दासराम चरण धरी । मुखी हरिनाम गजरी ॥४॥

५६३

तुकाराम धन्य धन्य संत लोकी । अवघाची देखी पांडुरंग ॥१॥
तिळभरी काम क्रोध नाही ज्यासी । प्रसन्न मनासी पांडुरंग ॥२॥
एकची लुगडे पत्नीलागी होते । भिकारिया हाते स्वये दिले ॥३॥
तये घरी आली अक्षत बा जेव्हा । संकट हे तेव्हा देव वारी ॥४॥
रुक्मिणीमातेने दिला पीतांबर । भाग्य ते अपार तुकोबांचे ॥५॥
धन्य संतमाता धन्य संतमूर्ती । दासराम प्रीती लोळे तेथे ॥६॥

५६४

धन्य धन्य चोखामेळा । हीन याती परी सोवळा ॥१॥
पूर्ण शुद्ध अंतःकरण । मुखी चाले नामस्मरण ॥२॥
सकळासी वंद्य होई । थोर भक्तीची नवलाई ॥३॥
दासराम शुद्ध मती । गाई चोखामेळा गीती ॥४॥

५६५

ज्ञानेश्वर माऊली ग माय माझी ज्ञानराज माऊली ॥१॥
जगदोद्धारा अलंकापुरी येवुनिया राहिली ॥२॥
बालमूर्ती ही भगवंतासम लोकी या वाटली ॥३॥
हनुमत् सद्गुरुरायकृपेने दासरामी बोळली ॥४॥

५६६

पटवर्धन कुळी कुलदीपक जे जहाले हरभटजी ।
साधुसंतिया ख्याती केली ज्यावरी प्रभू राजी ॥१॥
धर्मनिष्ठ बहू निस्पृह ऐसे धीमत गंभीर ।
धैर्यवान जे शांतिरुप जगी भक्तिपथी वीर ॥२॥
दुर्वांकुररस प्राशन करुनी मुखी मंगलमूर्ती ।
नामी रंगता रसना रंगुनी जहाले तपमूर्ती ॥३॥
देव गजानन प्रसन्न जहाले माग काही म्हणती ।
निष्कामची जे अंतरी जहाले चरणांकित होती ॥४॥
मंगलनामे मंगलमय जे मंगलमूर्ती भले ।
मंगल करुनी मंगल भक्ता मंगलदान दिले ॥५॥
गणेश भक्ताग्रणी धन्य ते परमपूज्य सकळा ।
दासराम हा लीन प्रभुपदी गातो गुणलीला ॥६॥

५६७

करू उत्सव आजी सुखाचा । हरभट प्रभु पदकमलाचा ॥१॥
गाऊ गुणा या मन वाचा । गुंफूनिया ही मन वाचा ।
मनभावे प्रभुपदी जाऊ । श्रीहरीचे दर्शन घेऊ ।
दासरामी जडुनी राहू । करुनिया थाट पूजेचा ॥२॥

५६८

गेले गेले परी ते नाही गेले रे । ठेले ठेले अढळपदी ठेले रे ॥१॥
उरले उरले कीर्तिरुपे उरले रे । झाले झाले धन्य धन्य जगी रे ॥२॥
पहा पहा अमरची झाले रे । रामरुप जगी होऊनी ठेले रे ॥३॥
आत्मरुपे सारे दिसताती रे । दासरामी हनुमंत रामरुप रे ॥४॥

५६९

वजीरबाबांचिया कृपे जन्म झाला । वरदहस्त आला हनुमंतांचा ॥१॥
साधन चालिले कैसे ते रघुनाथे । मजलागी निरुते सांगीतले ॥२॥
नागाप्पाण्णा वचे गुरुलिंगजंगम । बोधीले परम प्रगटोनी ॥३॥
गोविंदनाथ आण्णा शंकरमामांचेनी । बोळले ते क्षणी हालसिद्ध ॥४॥
इंदिरा गोविंद माता पिता भले । रामासी लाभले पूर्वपुण्ये ॥५॥

५७०

तासगावी असे गणपतींचा रथ । तेथेचि बैसत महादूबुवा ॥१॥
गुंडुबुवा म्हणती महादुबुवा श्रेष्ठ । वझीरबाबा श्रेष्ठ म्हण गुंडा ॥२॥
कुपवाडकरांमुळे गणेश दर्शन । जाहले कीर्तन माझे तेथे ॥३॥
महादुबुवा मुक्तहास्य ते करीती । पाहोनीया चित्ती समाधान ॥४॥
गुंडुबुवा जेव्हा जाहले अदृश्य । तेव्हाचि अदृश्य महादूबुवा ॥५॥
दासरामा घडले संतांचे दर्शन । त्याची आठवण होत असे ॥६॥

५७१

ईश्वरपुरामाजी धोंडीराम सिद्ध । जाहले प्रसिद्ध सर्वत्रची ॥१॥
तहान भुकेची जया शुद्ध नाही । देहींच विदेही पूर्णपणे ॥२॥
गटारीचे पाणी पिवोनीया तृप्त । मेहेरबाबा चकीत पहाता झाले ॥३॥
पुण्यपत्तनेसी जाता येता सहज । गुळवणीमहाराज दर्शन घेती ॥४॥
पुण्याहुनी येता धोंडीराम चरण । धरोनी नमन केले रामे ॥५॥
धोंडीरामे आपुले हात वर धरुन । दिले आशीर्वचन हास्यमुखे ॥६॥
कधी नाहीं घडले ऐसे भक्त म्हणती । नवलाव चित्ती दासरामा ॥७॥

५७२

दर्शन हे झाले रामू माळीयाचे । समाधान साचे वाटे मज ॥१॥
भीलवडीमाझारी स्टेशनात जाता । नवल हे कथा घडो आली ॥२॥
माझे खिशातोनी एक आणा घेती । भक्त ते म्हणती भाग्य असे ॥३॥
जरी कोणी ठेवी रुपये हजार । नाहीं आण्यावर घेतलेसे ॥४॥
ज्याचा आणा घेती तयाचे कल्याण । निश्चये करुन होत असे ॥५॥
रामू माळीयाचा असाची लौकीक । विदेहींच एक आत्मज्ञानी ॥६॥
रामालागी गीता दिली असे कोणी । गणपतरावानी विचारीले ॥७॥
शंभूने दिधली ऐसे रामू बोले । रातीचिया वेळे म्हणा म्हणती ॥८॥
हृद्‌गद कळले गणपतराव यासी । आनंद मानसी दासरामा ॥९॥

५७३

राजयोगी असोनी सर्वदा विदेही । असोनी विदेही राजयोगी ॥१॥
पाटील महाराज ऐसे थोर संत । अंगारा लावीत कल्याणाचा ॥२॥

बोलावे ते होते ऐसा अनुभव । अनेकांचा भाव त्याचे पायी ॥३॥
आयुवरी वारी नृसींहवाडीची । तेथे विश्रांतीची जागा केली ॥४॥
चाफळकर योगे जाहले कीर्तन । जाहले प्रसन्न रामावरी ॥५॥
प्रल्हाद या नामे हाक दिली निकी । दोनी हाते शेखी कवटाळिले ॥६॥
रामानंदापरी मारताची हाक । वाटेल कौतुक दासरामा ॥७॥

५७४

शंकरमहाराज मिरीकर थोर । येती वारंवार आम्हा घरी ॥१॥
मामाना म्हणती तुम्ही एकनाथ । ऐकोनी चकीत होती लोक ॥२॥
दासरामाचेही कवतुक करीती । आनंद तो चित्ती वर्णवेना ॥३॥

५७५

कुंभारस्वामीनी घेतली सेवा । दिला असे मेवा प्रसादाचा ॥१॥
तेलीण बोलावी कराया कीर्तना । आनंद तो मना झाला असे ॥२॥
शेजघरी माझे जहाले कीर्तन । स्वामीही प्रसन्न नवल झाले ॥३॥
सुगंध सुटला सर्वा जाणवला । दासराम झाला शरणागत ॥४॥

५७६

कोल्हापूर ग्रामी । वसती दत्तगुरू स्वामी ॥१॥
दत्तमंदीर लहान । तेथे जहाले कीर्तन ॥२॥
महाराज कीर्लोस्कर । मुखी सदा दिगंबर ॥३॥
एका वेळी अंबालयी । आणि मठी दिसती पाही ॥४॥
ऐसा ज्यांचा अधिकार । संतोषले ते अपार ॥५॥
कीर्तनी आल्हाद । दासरामासी आनंद ॥६॥

## ५७७

दासगणू साधुवर । शंकरमहाराज मिरीकर ।।१।।

महाराज ताम्हनकर । नारायण मान्यवर ।।२।।

लक्ष्मणबुवा कीर्तनकार । ऐसे संत थोर थोर ।।३।।

नाथ म्हणती मामाना । ऐकोनीया आनंद मना ।।४।।

संत संता ओळखती । भय्यासाहेब बोलती ।।५।।

दासराम वंदी पदा । नामावली गाई सदा ।।६।।

## ५७८

गुरुदेव रानडे । ज्यांचे वाजती चौघडे ।।१।।

देवासाठीच कीर्तन । करीती बापूराव आपण ।।२।।

दादा देशपांडे लागून । गुरुदेव सांगे वचन ।।३।।

वारंवार मजला कथिती । रामभाऊ ते ऐकती ।।४।।

यात सर्व काही आले । दासराम म्हणे भले ।।५।।

## ५७९

टेंबेस्वामी तरी साक्षातची दत्त । वाडीसी समर्थ जगद्गुरु ।।१।।

तैसे योगीराज गुळवणीमहाराज । ओसंडेचि तेज मुखावरी ।।२।।

त्यानी मजवरी प्रेमाचा वर्षाव । केलासे सदैव आजवरी ।।३।।

दासरामा त्यांची सदा आठवण । नोहे विस्मरण कदाकाळी ।।४।।

## ५८०

पेण गावाहोनी आबामहाराज । पातले सहज गोविंदनवमी ।।१।।

दशमीसी त्यांचा होता मृत्युयोग । परी टळला योग वियोगाचा ।।२।।

नानांचियामुळे येथे आले होते । मामांचिया सत्ते वाचले ते ।।३।।

निंबरगीनाथांचे कृपेची वाचले । भक्तीचे सोहळे काय वानू ।।४।।

मृत्युवरी ऐसा जहाला विजय । ययापरी काय बोलो आता ।।५।।

नारळ नी शाल दिली तया वेळे । आबा ते भेटले दासरामा ।।६।।

५८१

स्वरुपाचा आनंद । तेची स्वामी स्वरुपानंद ॥१॥
आनंदाचे जे स्वरुप । अमलानंद निर्विकल्प ॥२॥
संतांचे संगती । दासरामा आनंद किती ॥३॥

५८२

भाऊसाहेब उमदीकर । धन्य गुरुभक्त थोर ॥१॥
थोर पुण्य म्हणोन । लाभले गुरुनारायण ॥धृ॥
साधनीं जे रंगुनी गेले । संप्रदाया वाढविले ॥२॥
करोनिया जगदोद्धार । झाले श्रीगुरुरुपाकार ॥३॥
धन्य शिष्य अंबुराम । थोर गुरुभक्त परम ॥४॥
आपुल्यासारिखेचीं केले । नाम लुटण्या बोधियेलें ॥५॥
दासराम संता शरण । मने घाली लोटांगण ॥६॥

५८३

पांडुरंग पांडुरंग । भजनाचे अंतरंग ॥
सदा चाले एक तार । अनुहताचा गजर ॥
जे का झाले पंतरुप । निरामय निर्विकार ॥
जया जीवनी आनंद । बालरामी या आमोद ॥



## पहाण्याचे अभंग : ११

५८४

पहाणे परतले लोचनी । हरी कोंदला ते नयनी ॥१॥
अवघेंची निरंजन । जिणे मरणे आनंदघन ॥२॥
दोही डोळा आत्माराम । तेथे कैचा दासराम ॥३॥

५८५

पहाणे आदी पहाणे अंती । मध्यस्थिती पहाणे ॥१॥
अवघे गगन पहाणे । देखत्याचे देखणे ॥२॥
पहाण्यातू परब्रह्म । आपणा आपणू पाहे सम ॥३॥
सुख चाखाया आपुले । दासरामी द्वैत केले ॥४॥

५८६

पहाणे पसरे जें गगनी । शद्बे ब्रह्मांडाची घडणी ॥१॥
पहाण्याचे मूळ बीज । निःशद्बातू ब्रह्म निज ॥२॥
पहाणे वोखटे । जेंथे द्वैत हे प्रगटे ॥३॥
निज ते पहाता । दासराम उरला स्वता ॥४॥

५८७

सर्वांगी देखे पहाणे । निजब्रह्माचे हे लेणे ॥१॥
येथे पाही कवणा कोण । आपणा ठायी ते आपण ॥२॥
जन्म मरण बोलणे । निजत्व ते परिपूर्ण ॥३॥
परवस्तु झाली नाही । दासराम नवल पाही ॥४॥

५८८

डोळयामाजी कैचा सामावला कान । आपणा ते आपण पहाणे झाले ॥१॥
आपणचि पहाणे झाले हे देखणे । चंचळाचे गुणे द्वैत झाले ॥२॥
निजत्वामाझारी पहाणे आपण । दासरामी मौन सारिखेंची ॥३॥

५८९

निजाचाही जो देखणा । तो हा राणा पंढरिये ॥१॥
पाहे आपणाचे आपणा । पहाणियाचा तो देखणा ॥२॥
पहाणे जहाले विचारा । पुढे आले जे आकारा ॥३॥
निजत्वासी चक्षू मिळता । दासराम उरला स्वता ॥४॥

५९०

ब्रह्म पहाता पहाता । आपणचि उरला स्वता ॥१॥
झाला पहाणिया वेगळा । स्वये भरला दोही डोळा ॥२॥
पहाणे पहाले आपणाप्रत । कैची माया कैचे द्वैत ॥३॥
दासरामाचा स्वानंद । कृष्ण विष्णू हरी गोविंद ॥४॥

५९१

मीतूपणा साक्षी । निज लक्ष्य स्वये लक्षी ॥१॥
तोचि आत्माराम माझा । पहाणें झाले आप तेजा ॥२॥
दावी प्रकाश विश्वासी । द्वैत पहाणी ते नासी ॥३॥
दासरामाचा स्वानंद । कृष्ण विष्णू हरी गोविंद ॥४॥

५९२

पहाणे पहाले आपणा । रूप व्यापिले लोचना ॥१॥
तो हा पंढरीचा राणा । पाहे पहाणी आपणा ॥२॥
प्राकृतेचि सुकृत जोडे । सत्य रोकडे उघडें ॥३॥
दासरामाचा स्वानंद । कृष्ण विष्णू हरी गोविंद ॥४॥

५९३

मीतूपण दृश्य साक्षी तोचि द्रष्टा । पहाणे सुभटा पहाता नाही ॥१॥
पहाणें ते साक्षी कैचा चक्षी लक्षी । अद्वय जें शेखी आपुलें ठायी ॥२॥
पहाणे सरता उरे तो देखणा । आपणू आपणा देखें स्वये ॥३॥
दृष्टीचे पहाणे नाशिवंत गोष्टी । सरले शेवटी घनूठायी ॥४॥
दासरामी ऐसे सिद्धांतांचे सार । एकचि विचार कृष्ण हरी ॥५॥

५९४

पहाणे पूर्णता परतले लोचनी । आत्माची गगनी भरे अवघा ॥१॥
सद्‌गुरुनाथाने सांगितली कळा । दाविले हे डोळा कवतूक ॥२॥
आवघेची माझे स्वरूप जहाले । पहाणे सरले अद्वयातु ॥३॥
त्रिपुटीचा नाश झाला निरंजनी । दासराम गान्ही नामाचिये ॥४॥

५९५

परमात्मरूपी देखणा देखणे । देखणिया पहाणे एक जाले ॥१॥
पहाणे लक्षिता आत्माराम साक्षी । तव तो अलक्षी स्वये देखे ॥२॥
त्रिपुटी लयासी जाता कोठे द्वैत । आवघा अनंत चिदाकाशी ॥३॥
दासराम यासी कृपेचा आनंद । श्रीहरी गोविंद कृष्ण विष्णू ॥४॥

५९६

लक्ष्य तेची शक्ती पहाणेची प्रचीती । चिदाकाश भूती साठविले ॥१॥
पहाता पहाणे ब्रह्मरुप होणे । अलक्ष्य ठेवणे लक्ष्याचे ते ॥ २॥
शक्तीचा उदय तेथे मनोदय । पैल तो विजय ब्रह्मत्वाचा ॥३॥
निश्चळ जे लक्ष्य त्यात ब्रह्म अलक्ष्य । शक्ती दावी साक्ष दासरामा ॥४॥

५९७

शीत उष्ण आभा पसरिली नभा । दिपवीले नभा नवलावे ॥१॥
चंचळेची पहाणेपणे हा आकार । शक्तिगुणे अपार व्यक्त झाले ॥२॥
नभाच्या परता दृष्टीच्या आतौता । पहाणे गिळिता आत्मराज ॥३॥
निज ते पहाणे अखंड निश्चळ । अद्वय विमल दासरामी ॥४॥

५९८

पहाणे केला चंचळ ठाव । तरी तो नासिता ये भाव ॥१॥
पहाणे ते ओखट पहाणे । करिता पहाणे ब्रह्मची होणे ॥२॥
मन ते उघडे उघडे । करुनी पहाता ब्रह्म उघडे ॥३॥
मन बुडवुनी सोहं धरी । दासरामी अवघा श्रीहरी ॥४॥

## ५९९

वृत्ती चांचल्ये पहाणे । जहाले जें चंचळाते ॥१॥
चंचळ पहाणे वोखट । तरे निश्चळी चोखट ॥२॥
निश्चळ नाम निर्विकल्प । दावी दृष्टी या स्वरूप ॥३॥
चंचळियातू निश्चळ । तयाआतू ब्रह्म सुनीळ ॥४॥
घनानंद हरी दयाळ । दासराम बोधे विमल ॥५॥

## ६००

पहाणे निश्चळ करूनी रहाता । द्रष्टा निश्चळ होये स्वता ॥१॥
मग जें पहावे ते ते ब्रह्म । जगदाकार माझा राम ॥२॥
दृश्यादृश्य जाली गती । केवी पावेल निवांती ॥३॥
चंचळ वृत्ती झाल्या शांत । पहाणे होयें ते निवृत्त ॥४॥
रामकृष्णहरि नाम । सुखीया स्थिरू दासराम ॥५॥

## ६०१

पहाणेची अनुभव । अर्थरुपी नवलाव ॥१॥
प्रतिमेने प्रतिमा उमटे । प्रतिमा ते घनू दाटे ॥२॥
ब्रह्मरूप घननीळ । बिंदू सुनीळ निश्चळ ॥३॥
निजत्वेसी पहाणे येता । दासराम उरला स्वता ॥४॥

## ६०२

जैसे पहावे तैसे उमटे । परी येथें आहे उलटें ॥१॥
उमटले घनदाट । ब्रह्म निघोट निधोट ॥२॥
जैसे उमटले ते पहाणे । निश्चळ होवोनी रहाणे ॥३॥
प्रतीमा भासे चंचळु विरळ । सर्वांघटी हरी हा निश्चळ ॥४॥
दासरामी सद्‌गुरु बोधू । आनंदची परमानंदू ॥५॥

## ६०३

पहाणे उलट होवोनी । पहाले निश्चळ आपणी ॥१॥
अलक्ष्य ते स्थिरावले । लक्ष्य कैचें हारपले ॥२॥
द्रष्टयाची पूर्ण भेटी । घनानंदू पडली गाठी ॥३॥
दासरामी हे दर्शन । तो हा स्वामी दयाघन ॥४॥

## ६०४

शून्य शून्ये निश्चळी पहाता । द्रष्टा देखे आपणू स्वता ॥१॥
नीलबिंदू चिद्दर्शन । वानिती जे साधुजन ॥२॥
अलक्ष्यासी अलक्ष्य मिनले । तेथे पहाणे लक्ष्य झाले ॥३॥
नवल चंचळाचा खेळ । दासरामी हरी दयाळ ॥४॥

## ६०५

ब्रह्म ते अलक्ष्य द्रष्टा हा अलक्ष्य । पहाणे अलक्ष्य निश्चळपणे ॥१॥
लक्ष्य दावी ऐसे अलक्ष्य पहाणे । प्रगट पे आपणे डोळियातू ॥२॥
साराचेही सार गुजाचेही गूज । नामब्रह्म निज निःशद्वातू ॥३॥
नामदास नामब्रह्मीच निवांत । दासराम जडत त्यांचे पायी ॥४॥

## ६०६

रामकृष्णी विस्तारले नामरुप । पहाणे अमूप अलक्ष्याचे ॥१॥
अद्वयाचे ऐल निर्गुणाची गोष्टी । शून्याचिया दिठी निर्गुण वाटा ॥२॥
पहाणे ओसंडले पहाणें ओसंडले । पहाणे पहाले पहाणियासी ॥३॥
हे कळ जाणोनी व्हावे आत्मरुप । गिळोनी संकल्प दासरामी ॥४॥

## ६०७

शून्यरुप पहाणे शून्याचिये दृष्टी । दृश्यादृश्य नुठी जये ठायी ॥१॥
नोहे जे साकार नोहे निराकार । गुणागुण प्रकार जेथे नाही ॥२॥
अशद्वाचे पैल जाला शून्यभाव । शून्यी अनुभव दासरामी ॥३॥

## ६०८

पहाण्यापासुनी जाले पहाणे । आकारिलें जे चिद्गुणे ॥१॥
सत्यवस्तू लपतू जेणे । द्वैतपण चंचळगुणे ॥२॥
मूळ पहाणे चोखट । द्वैत पहाणे वोखट ॥३॥
पहाणेची आकारिलें । तया पहाणे मन जाले ॥४॥
अद्वय पहाणे अभंग । जेथे दृश्यादृश्य तरंग ॥५॥
पहाणे वस्तू पहाणे गुण । पहाणे आकार पहाणे नयन ॥६॥
दासरामाचें पहाणे । घनानंद अखंडपणे ॥७॥

६०९

आनंदाच्या भरामध्ये मौज माजते । रंगनाथ नाचताहे श्रीहरिकथे ।।१।
पहाण्याचे अंती पहाणे पहाले । त्रिगुण सारिले पाचाउपरी ।।२।।
देही नामरंगी विसावाची झाला । शद्ब तो जोडिला निःशद्बासी ।।३।।
हनुमंतमाये नवलाव केला । पदो विनटला दासराम ।।४।।

६१०

देखणे हे आहे मुळी । आत्मबुद्धी त्या निराळी ।।१।।
धन्य शुद्धरूप माया । आत्मयाची अनादी काया ।।२।।
वास जिचा निरंजनी । स्वयंप्रकाशाची खाणी ।।३।।
तयामाजी ब्रह्म । गुरुवाणी गुरुनाम ।।४।।
दासराम लोळे तेथे । नवल केले सद्‌गुरुनाथे ।।५।।

६११

नीलबिंदूचिया पोटी । पहाणे विसावले दिठी ।।१।।
नवल ते अंगप्रभा । कैची लावण्याची शोभा ।।२।।
उजळली कांती । सूर्यचंद्राचिये दीप्ती ।।३।।
रामकृष्ण हरिनामी । दासराम शरण प्रेमी ।।४।।

६१२

क्षराक्षर दोनी पहाणे । चिद्रूपाचे हे देखणे ।।१।।
सारा शून्याचा पसारा । जया निरंजनी थारा ।।२।।
प्रकृतीसी आहे नाश । परी पहाता अविनाश ।।३।।
जैसा उदकी तरंग । भासे नासे जळी अभंग ।।४।।
जन्म मृत्यू दोनी । कैसा म्हणावे या कोणी ।।५।।
तैसा आदी अंती हरी । दासरामी सर्वातरी ।।६।।

६१३

शद्ब चंचळ । दानी सर्व दृश्य गोल ।।१।।
दृश्य रुप ते शद्बाचे । मूळ जाणावे तयाचे ।।२।।

संथरूप ते अशब्द । शून्याठायी भेदाभेद ॥३॥
शून्य आले पहाणेपणा । तया देखे तो देखणा ॥४॥
महाशून्य तत्त्वापैल । दासरामी घननीळ ॥५॥

## ६१४

आकाशीचा नीळिमा दृष्टीचे देखणे । पहाता मुळी पहाणे नसे काही ॥१॥
शून्याचिये पोटी चराचर सृष्टी । पहाता हे दृष्टी देखणेची ॥२॥
देखण्याचे पैल देखता केवळ । मीतूपण बोल ग्रास जेथे ॥३॥
पहावे कोणाला पहावे ते कोणी । कोणत्या नयनी ठेऊ त्यासी ॥४॥
दृष्टीचा खेळ सारी दृष्टीपैल । चौदेहाची खोळ निरसोनी ॥५॥
दृश्यादृश्य हे तो देखत्याचे देखणे । आत्मा पूर्णपणे त्याचे परता ॥६॥
आत्म्याचे देखणे हकार दवडोनी । सर्व दृष्टी होवोनी सहज देखे ॥७॥
जाणीव नेणीव नुरे अलक्ष्यस्थानी । तेथे संतजनी लाविली दृष्टी ॥८॥
दृश्य हे असत अदृश्य दृष्टांत । साक्षात्कार देत आदीशक्ती ॥९॥
देखण्याचे आटणे करोनी रहाणे । देखणा स्मरणे बुडवावा ॥१०॥
आत्म्याचे देखणे संतानी देखिले । चार शून्यापैल होवोनिया ॥११॥
मुक्ताबाई माता तिने खूण दाविली । माऊली बोळली ज्ञानराज ॥१२॥
उफराटी दृष्टी आत्मा दावी डोळा । गुह्य जाणे आगळा राजयोगी ॥१३॥
दासराम लोळे संतांचे चरणी । जयाचिया ध्यानी सद्‌गुरुदेव ॥१४॥



# आत्मसुधा : १२

६१५

हनुमंत सद्गुरुबोधे । निज दाविले अगाध ॥१॥
देखणिया देखें आपणू । कैंचा दृष्टीचा देखणू ॥२॥
चंचळेंचि हे देखणे । भरले आकारी चिद्गुणे ॥३॥
दासरामाचा स्वानंद । कृष्ण विष्णू हरी गोविंद ॥४॥

६१६

हरिनामी जे उन्मन । परिपूर्ण समधान ॥१॥
तो हा आत्माराम दीप । जेंथे नुरे पुण्य पाप ॥२॥
बुद्धिवंतांचे वैभव । निजप्रकाशाची ठेव ॥३॥
चिद्गुणेंचि स्मरणे सगुण । दासरामी नारायण ॥४॥

६१७

आत्मयाचे अंग । पारदर्शक जैसे भिंग ॥१॥
चोजवी जो आपणू आपणा । सर्व घटू महाराणा ॥२॥
अंगाही निराळा । निजापरौता आगळा ॥३॥
चंचळू हे दावी डोळा । आपरुप हा सावळा ॥४॥
दासरामी तो जगजेठी । गूजागूज नामी गाठी ॥५॥

६१८

आत्माराम हा सावळा । संतसज्जनी देखिला ॥१॥
तयांचिया पूर्ण कृपे । देखे प्रगट अनंतरुपे ॥२॥
दासराम पायी जडला । नामसुखे सुखावला ॥३॥

## ६१९

डोळियात स्वरूप वसे । परी ते अलक्ष्यचि प्रकाशें ॥१॥
पहाता पहाणे सरले । एकपणे मिळुनि गेले ॥२॥
चंचळेचि जाले पहाणे । दासरामाचे देखणे ॥३॥

## ६२०

पहाणे आले पहाणेपणा । देखें आपणू आपणा ॥१॥
दावी साकार चिद्‌गुण । सदानंद हरी घन ॥२॥
जाले आकारू चंचळे । मीतूपणे साक्षी खेळे ॥३॥
पहाणे दर्शन दर्शन । दासरामी निरंजन ॥४॥

## ६२१

पहाणे उरवोनि । पाहू लागलो लोचनी ॥१॥
विस्मृतया बुडविला । तव तो हरी प्रगटला ॥२॥
पहाणे प्रकृती । निजत्व ते आत्मस्थिती ॥३॥
निजामाजी पहाणे येता । दासराम उरला स्वता ॥४॥

## ६२२

द्वैत मीतूपण । तयाचे जे अधिष्ठान ॥१॥
ते तो निश्चळ पहाणे । हेलकावे चंचळ गुणे ॥२॥
तया देखे तो देखणा । निजत्वातु आत्मखुणा ॥३॥
निज ते निःशद्ब । दासरामी या अगाध ॥४॥

## ६२३

आकाश ते पहाणे । जेथे द्वैताचे देखणें ॥१॥
पहाण्यातु शद्बकळा । चंचळू हे दावी डोळा ॥२॥
काळे बुबुळ ते शून्य । जेथे नुरे ज्ञानाज्ञान ॥३॥
पहाण्याची साठवण । तो हा निःशब्द नयन ॥४॥
निःशब्दातु ब्रह्मकळा । साक्षी पाहे आपुला डोळा ॥५॥
दासरामी ब्रह्म निज । प्रगट झाला अधोक्षज ॥६॥

## ६२४

प्रासीलिया बुद्धी मन । कैंचे जहाले उन्मन ॥१॥
तेथे बुडाले गगन । निश्चळीच समाधान ॥२॥
पहाणे वेगळे न उरले । पहाणें पहाणेपणा आले ॥३॥
जाले अखंड पहाणे । दासराम अद्वय खुणे ॥४॥

## ६२५

द्वैत पहाणे ओखटे । घनानंदू आत्मा दाटे ॥१॥
चंचळेची विरळपणे । झाले आकारीचे लेणे ॥२॥
गुणधर्मी जाले द्वैत । पहाणे जे द्वैतयुक्त ॥३॥
निज ते पहाता । नुरे आकार तत्वता ॥४॥
आपणासी पहाणे आपण । दासरामाचे दर्शन ॥५॥

## ६२६

निराकाराचे दर्शन । जहाले आकारी या मन ॥१॥
म्हणुनि पहाणेची दर्शन । दोही डोळिया आपण ॥२॥
अवघा पहाण्याचा विस्तार । पहाणे पहाले चराचर ॥३॥
दासरामाचे हे गूज । पाहे आपणातु निज ॥४॥

## ६२७

पहाणे आकारिले विश्व । सर्वाघटी सम भाव ॥१॥
अवघे दर्शन दर्शन । निजत्वातु समाधान ॥२॥
नाना गुणाकार खोळ । अवघे खोलिजे चंचळ ॥३॥
निश्चळ ते चंचळातु । दासरामी श्रीअनंतु ॥३॥

## ६२८

जया अधिष्ठाने । घडले आकारीचे लेणे ॥१॥
पहाणेपण ते साचार । जाले पहाणेचि सार ॥२॥
पहाणे ते शून्य घनु । देखे आपणा आपणु ॥३॥
आत्मवस्तु सत् चिद् घन । दासरामी आनंद पूर्ण ॥४॥

## ६२९

नाही गुप्त ना प्रगट । परी हा निघोट भलतैसा ॥१॥
ऐसा आत्माराम माझा । पहाणे बुझाले निजतेजा ॥२॥
जीवभाव जेथे बुडे । उघडे हें अखंड ॥३॥
पूर्ण आनंदसागरू । दासरामी नामगजरू ॥४॥

## ६३०

घनूठायी हे पहाणे । भेद जाला चंचळगुणे ॥१॥
स्वसुखासी देखे दोन । देखणे हे दृश्यमान ॥२॥
पहाणे प्रगट प्रगट । भरला आकारी वैकुंठ ॥३॥
आकारातु लपविला । दासरामी निजे आला ॥४॥

## ६३१

दिसो आला जैसा तैसा । उघडा असा आत्मराज ॥१॥
नाही नाही झाकोळला । नाही प्रगट होऊनी ठेला ॥२॥
आकार हा ज्याचे लेणे । तो त्या लपवी वोखटपणे ॥३॥
आकाराचा करिता नाश । प्रगट कोण म्हणे त्यास ॥४॥
दासरामी निजानंद । घनदाट हा गोविंद ॥५॥

## ६३२

निजरूपा पडता मिठी । हरी भरला अवघा दृष्टी ॥१॥
देखणिया हे देखणे । देखियेले आत्मपणे ॥२॥
जैसे आटविता लेणें । एकतत्व पूर्णपणें ॥३॥
हरिस्वरूप देखणे । दासराम निश्चळ जेणे ॥४॥

## ६३३

द्रष्टचा हे पहाणे । भेटले वो आपुलेपणे ॥१॥
नासिले ये जेथे द्वैत । जाले आकारी जे व्यक्त ॥२॥
स्वसुखासी द्वंद्वपणे । पहाणेपणे जाले पहाणें ॥३॥
निज पहाणे पहाणेपण । चिद्‌गुणे जो जाला गुण ॥४॥
दासरामी हा निजात्मा । अधिष्ठान समविषमा ॥५॥

## ६३४

पहाणे जे वस्तुभाव । परमात्म्याचे वैभव ॥१॥
द्रष्टयापासोनी । नोहे वेगळे जे जाणी ॥२॥
द्वैतपणें जे निराळे । लक्ष–अलक्ष्या–वेगळे ॥३॥
दासरामी सदानंद । चिद्‌गुणेचि झाला भेद ॥४॥

## ६३५

पहाण्याचा जाला ग्रास । पहाणे पहाले तयास ॥१॥
पहाणे अलक्ष्य पहाले । तेचि पहाणेपणा आले ॥२॥
दासरामी हरी दयाळ । साक्षिरूप सर्व काळ ॥३॥

## ६३६

पहाण्यातु आत्मकळा । व्यक्त बिंदु नाद कला ॥१॥
निजत्वेची निजा भेटू । सुखे सदानंद घोटू ॥२॥
संतसंगे गाऊ राम । पावू नामेचि आराम ॥३॥
दासरामी या श्रीहरी । निजरंगे कृपा करी ॥४॥

## ६३७

डोळा आकारू गेलिया । पहाणे अखंड द्रष्टया ॥१॥
हे तो सद्‌गुरुंची कळा । भक्तिज्ञानाचा जिव्हाळा ॥२॥
रामकृष्णमाला परम । ध्याईजे हा दासराम ॥३॥

## ६३८

चेईलिया चेतविले । जितयासी जीवविले ॥१॥
स्मरणाने जागे केले । निजत्वेचि ऐक्य झाले ॥२॥
प्रकृतात्मा जन्मे मरे । भासे विस्मरणाचे वारे ॥३॥
निजस्मरणु अनंत । जीवविला साक्षी जेथ ॥४॥
दासरामी संतकृपा । चिन्मयाचा पंथ सोपा ॥५॥

## ६३९

जेथे सुषुप्तिया स्वप्न । निजत्वातु जागृत स्मरण ॥१॥
उन्मनीने येई भागा । जो तू निजत्वेचि जागा ॥२॥
साधु संतांचा प्रसाद । तोचि भक्तासी आनंद ॥३॥
प्रभूने अंगीकार केला । दासराम गाई त्याला ॥४॥

## ६४०

अवघें हरीचे दर्शन । शद्ब गिळुनी झाले मौन ॥१॥
पहाण्यातु शद्ब आटला । विश्वाकार चक्षू झाला ॥२॥
डोळा घनू हरीं पहाला । बुबुळिया आनंदला ॥३॥
पहाणे आकारिले मन । ओखटे जे तू दर्शन ॥४॥
दासरामी नामठसा । म्हणुनी राम हरी दशदिशा ॥५॥

## ६४१

डोळिया भाव पहाणे ओखट । आकारावाचुनी घनदाट ॥१॥
तयाठायी पहाणे प्रगट । आकारिले जे चोखट ॥२॥
पहाणेची केला डोळा । मध्यें बैसविले बुबुळा ॥३॥
लक्ष्ये अलक्ष्य ते लक्षी । अलक्ष्य ते सर्वा साक्षी ॥४॥
दासरामी अवघा डोळा । जेथे चैतन्य उमाळा ॥५॥

## ६४२

पहाण्यापासुनी जाला डोळा । डोळा पहाणेपणा आला ॥१॥
तयाआतु महाशून्य । नीलबिंदूचे आवरण ॥२॥
बिंदूमाजी भरले निज । चिद्‌गुण वैभवाचे तेज ॥३॥
जेथे जाले रवी शशी । आरंभिली दिननिशी ॥४॥
शीत उष्ण आभा । अरुप आकारिला नभा ॥५॥
नयनी चिन्मयाचा मार्ग । दासरामी निजयोग ॥६॥

## ६४३

श्रवणातोनि नयनी आलो । नयनी निजाते मिळालो ॥१॥
निजा भेटले तो निज । हेचि दर्शनाचे गूज ॥२॥
कैंची सद्‌गुरुंची कळा । हरिस्मरण भरले डोळा ॥३॥
नयनानंद परेपैल । दासरामी घननीळ ॥४॥

६४४

पाहे दृष्टी शून्यद्वारी । चराचर अथवा हरी ॥१॥
पूर्णतत्त्व हरी दयाळ । मूलभूत जे विमल ॥२॥
साधुसंत तेथे पूर्ण । दासरामा त्यांचे गान ॥३॥

६४५

पहाणे पे प्रगट प्रगट । दोही डोळा घनदाट ॥१॥
हरी माझा जैसा तैसा । करी भक्तालागी पिसा ॥२॥
पहाणे ते विसावले । निश्चळिया सुखावले ॥३॥
दासरामाचा स्वानंद । कृष्ण विष्णू हरी गोविंद ॥४॥

६४६

पहाणे जहालिया ओखट । पहाला अलक्ष्याचा पट ॥१॥
लक्ष्य तितुकेचि अलक्ष्य । लक्ष्या अलक्ष्य ते साक्ष्य ॥२॥
ते हें वस्तू परात्पर । हरिनामी या अपार ॥३॥
दासरामी जैसा तैसा । पहाला फुकाचा आरसा ॥४॥

६४७

हरिनामी अनुभूती । जेथे पावली विश्रांती ॥१॥
तो हा परमात्मा निश्चळ । मायबाप जो कृपाळ ॥२॥
स्मरणरूप जो सगुण । पहाणे व्यापिला लोचन ॥३॥
दावी बुद्धीचे कौतुक । घाली ब्रह्मानंद भीक ॥४॥
कैंचा केला अंगीकार । दासरामी करी व्यापार ॥५॥

६४८

ब्रह्मासी पहाणे । पहाता पहाणे तेचि होणे ॥१॥
नासिली त्रिपुटी । सहज आत्मारामी भेटी ॥२॥
पहाण्यातुनि निजाचे निज । ब्रह्मस्वरुप विश्वबीज ॥३॥
निजत्वातु हरीचे स्मरण । राम अपार दयाघन ॥४॥
रेड्यामुखे वेदोच्चारू । केला जैसा ज्ञानेश्वरू ॥५॥
तैसा अबोलाचा बोल । बोलविला हे नवल ॥६॥

धन्य धन्य सद्गुरुराज । सुप्रसन्न महाराज ॥७॥
अकळ ते त्यांची कळा । दासरामी हा जिव्हाळा ॥८॥

६४९

आम्ही जन्मा आलो फुका । नामी विठ्ठल मिळवू सखा ॥१॥
संकल्प ते हारपले । पाप अपार जे सरले ॥२॥
नाही पुण्यालागी ठाव । भक्तिसुखा नाही माव ॥३॥
कर्म उपासना ज्ञान । कृष्ण विष्णू नारायण ॥४॥
निजधर्म हा चोखडा । नाम गाये जिव्हे मूढा ॥५॥
रामकृष्णनामी जागा । दासरामी आली भागा ॥६॥

६५०

हरिनाम ते संपत्ती । हरिनाम ते सत्कीर्ती ॥१॥
हरिनाम तो श्रीपती । हरिनाम शुद्ध चित्ती ॥२॥
हरिनामी वाढे भक्ती । हरिनामी लाधे युक्ती ॥३॥
हरिनाम सुखसमाधी । हरिनाम निरिच्छ सिद्धी ॥४॥
हरिनाम सुधा सेवीत । धन्य भगवंताचे भक्त ॥५॥
उद्धरती कोटी कुळे । द्वंद्व दृष्टीसी नाडळे ॥६॥
हरिनाम ते सगुण । हरिनाम ते निर्गुण ॥७॥
रामकृष्ण हरिनाम । दासरामाचे निजधाम ॥८॥

६५१

हरिनाम बरवे गोड । नाही चाड लौकिकाची ॥१॥
सदा राहो समाधान । जडो मन या नामी ॥२॥
हरिनाम तेजोराशी । रविशशी ते लोपवी ॥३॥
संत भक्त सुखावले । वेडे केले हरिनामे ॥४॥
हरिनाम दासराम । दान उत्तम हे मागे ॥५॥

६२२

गुरुआज्ञा ते प्रमाण । ते हे हरिनाम कीर्तन ॥१॥
रामकृष्ण नारायण । वासुदेव संकर्षण ॥२॥
संती बोधिले वचन । ते हे गुरुतत्त्व गहन ॥३॥
केले कवतुक ममता । दासराम शरण संता ॥४॥

# आतमपर : १३

## ६५३

हनुमंतराय बोलिले वचन । करील कीर्तन बाळ राम ॥१॥
घेवोनिया मांडीवरी ते आपण । कृपाकर पूर्ण दिला माथा ॥२॥
काय वाटले त्या नयनी अश्रु आले । सद्गदित झाले अंतःकरण ॥३॥
आमुचाची आहे हा कृपा आहे पूर्ण । अंताजीना पाहून म्हणाले वो ॥४॥
बोधियेलें बोधा पेटविली ज्योती । गुरुनाथ चित्तीं ठसावला ॥५॥
म्हणोनि निर्लज्ज करितो कीर्तन । अभंग म्हणोन नाचतसे ॥६॥
कोणी काही म्हणो मना नये खंती । गुरुनाथ गीती गाय स्वये ॥७॥
चौदावे दिवशी जहालासे बोध । दासरामा आनंद प्रसादाचा ॥८॥

## ६५४

कीर्तनाची परंपरा । आली घरा माझिया ॥१॥
ते हे सद्गुरु हनुमंत । स्वयें देत गोविंदा ॥२॥
चिन्मयाचे स्थान । स्वयंज्योती निरंजन ॥३॥
रामचंद्रांचे हे गूज । कैचे हाता आले सहज ॥४॥
उद्धरती तिही लोक । लाधे सुख सर्वासी ॥५॥
सीताराम हनुमान । जेथे होती सुप्रसन्न ॥६॥
दिली सत्य प्रेमे भीक । झालो पायीक फुकाचे ॥७॥
नित्य हरीचे कीर्तन । जेंणे निवे तन मन ॥८॥
हरिभक्तीचा बडिवार । अधिकार कथेचा ॥९॥
सदा दिवाळी दसरा । सोयरा तो पांडुरंग ॥१०॥
संतभक्तांचा किंकर । दासराम सकळा पार ॥११॥

## ६५५

संतांचे घरीचा जरी हा भक्त मतिमंद । कवतुक करिती सिद्धानंद सानंद ॥१॥
बालाचे कीर्तनी डोल घेती रामानंद । प्रेम हाक देती कवतुकाने या प्रल्हाद ॥२॥
हनुमंत सद्गुरू संतोषले कृपाघन । बोलिले वचन बाळ राम करील कीर्तन ॥३॥
दासराम तनुमने पायी विनटला । हनुमंतराये स्वये अंगीकार केला ॥४॥

६५६

तुमच्या रस्त्यावरी उभा । दावा चैतन्याचा गाभा ॥१॥
करितो सेवा मागतो भिक्षा । गुरुकृपेची लाविली रक्षा ॥२॥
आलख नाम उच्चारितो । अलक्ष्याची भिक्षा घेतो ॥३॥
अरो जहालो भिकेचे । जाळे तोडिले ममतेचे ॥४॥
गुरुधन रक्षायासी । जागर करितो अर्हनिशी ॥५॥
झालो त्यांचा द्वारपाल । डोळा देखिला घननीळ ॥६॥
निरंजनी गुरुचे घर । दासराम सांगे सार ॥७॥

६५७

झालो हरिभक्तांचा दास । नाही राहिलो उदास ॥१॥
आमुची देवावरी सत्ता । आम्ही डोलवू समर्था ॥२॥
नाही नाही अभिमान । बोले माझा हनुमान ॥३॥
धन्य रघुनाथ गोविंद । दिला आनंदी आनंद ॥४॥
दासराम द्वारी उभा । पाहे समचरणाची शोभा ॥५॥

६५८

सद्‌गुरु आज्ञेने हनुमंतांचे धन । लुटितो हा पूर्ण तुम्हाप्रती ॥१॥
लक्षाची दलाली देवोनी मजसी । स्मरोनी मानसी रामनाम ॥२॥
आनंद हा घ्यावा आनंद हा द्यावा । आनंद लुटावा आनंदाचा ॥३॥
आनंद जहाला आनंदे आनंद । नाचतो आनंद आनंदात ॥४॥
धन मान चाड नाही या कीर्तनी । आनंदला मनी दासराम ॥५॥

६५९

कीर्तनाची परंपरा । आली घरा माझिया ॥१॥
तें हे सद्‌गुरु हनुमंत । स्वये देत गोविंदा ॥२॥
गुरुकृपेचा बडिवार । अधिकार कथेचा ॥३॥
संतसभा रंगद्वारी । गजर करी दासराम ॥४॥

६६०

सेवा करू हे कीर्तन । कृष्ण विष्णू नारायण ॥१॥
मनी समाधान वाटे । नवल हे तुमचे मोठे ॥२॥
तुम्ही संत दयाघन । दिला कीर्तनाचा मान ॥३॥
हेचि देई मज स्वामी । दासरामी जन्मोजन्मी ॥४॥

६६१

महाराजांची आम्हा लेकुरे । नाचू कीर्तनी बडिवारे ॥१॥
जाणोनिया अंतरभावा । आम्हा दिली कीर्तनसेवा ॥२॥
संत सभारंगद्वारी । नित्य नाचू हरीचे गजरी ॥३॥
दासरामा हे कीर्तन । नामब्रह्म समाधान ॥४॥

६६२

अपूर्व हा सेवालाभ । तुम्ही देतसा स्वयंभ ॥१॥
किती वानू उपकार । जन्मोजन्मी हा किंकर ॥२॥
मायबाप तुम्ही संत । सगुणची भगवंत ॥३॥
कवतुक तुम्हीच केले । दासरामाचे या भले ॥४॥

६६३

तुझे द्वारी उभा करितो कीर्तन । सखे संतजन वंदोनिया ॥१॥
गुरुकृपा वचन आज्ञा ते प्रमाण । गातो तुझे गुण प्रेमभरे ॥२॥
सदा सुप्रसन्न तू वा नारायण । तेणे निवे मन उल्हासा ये ॥३॥
तुझी नामस्तुती ऐके तू श्रीपती । दासराम प्रार्थी कृपाघना ॥४॥

६६४

आम्ही देवा तुझ्या नामाचे वो दास । सदा करू घोष राम हरी ॥१॥
नामाच्या गजरे अबोल ते बोलू । आनंदेची डोलू श्रवणसुखे ॥२॥
पाडू गुरुकृपे नामाचा प्रकाश । नुरवू आभास भेदभाव ॥३॥
तुझिया प्रसादे तुझ्यासवे खेळू । तुलाही कवळू नामबळे ॥४॥
दासरामा दुजा नाही वो आधार । पायी अधिकार म्हणुनी तुझ्या ॥५॥

## ६६५

हरिनामदास हरिनाम प्रेमी । भूषण हे रामी संती दिले ॥१॥
धन्य धन्य ऐसे संत सिद्धानंद । जेणे ब्रह्मानंद प्रगट केला ॥२॥
बाळाचे कीर्तनी पावोनी आनंद । म्हणितले प्रल्हाद कौतुकाने ॥३॥
धन्य धन्य संत रामानंद । जेणे ब्रह्मानंद प्रगट केला ॥४॥
हरिकीर्तनाचे ओपिले हृद्‌गद । होवोनी सद्‌गद निजकृपे ॥५॥
धन्य ते सद्‌गुरु हनुमंत सिद्ध । जेणे ब्रह्मानंद प्रगट केला ॥६॥
दासराम द्वारी ठाकला याचक । ब्रह्मानंद भीक घातलीसे ॥७॥

## ६६६

कीर्तनाचे रंगी । संतसंगी ठाकलो ॥१॥
तेथे लाधला प्रसाद । ब्रह्मानंद ताटीचा ॥२॥
दासरामा ठाव । झाला भाव त्रिकाल ॥३॥

## ६६७

हरिभक्तांकित हरिनामप्रेमी । भूषण हे रामी संती दिले ॥१॥
अजाण लेकरू अज्ञात पामरू । कथेचा बडिवारू संती दिला ॥२॥
हनुमंत सद्‌गुरु बोलिले वचन । करील कीर्तन बाळ राम ॥३॥
ववदावे दिवशी कैची कृपा केली । दृष्टीसी दिधली दृष्टी त्यानी ॥४॥
कीर्तन ऐकोनी रामानंद तोषिले । तया संबोधिले प्रल्हादची ॥५॥
बाल भागवताचे ऐकावे कीर्तन । रामानंद बोलून गेले सकळा ॥६॥
धन्य नागाप्पाण्णा नारायणराव । कवतूक अपूर्व केले त्यांनी ॥७॥
दासराम हनुमंत सद्‌गुरुंचा । बोले त्याची वाचा रघुपती ॥८॥

## ६६८

हरीचे कीर्तनी हरिभक्त । आम्ही तयांचे अंकित ॥१॥
धरु ध्रुपद करु साथ । गाऊ गीत आवडीने ॥२॥
हरिकीर्तन बडिवार । अधिकार कृपेचा ॥३॥
सद्‌गुरु निष्ठावंत भक्त । हरिकीर्तन आज्ञे लुटत ॥४॥
आम्ही नामधारक त्यांचे । गाऊ कीर्ती नाम वाचे ॥५॥
मुंगीवरी गज भूषण । संती दिली कीर्तनखूण ॥६॥
दासरामा घरी साठा । त्याचे भाग्या नाही तोटा ॥७॥

६६९

मुंगीवरी ओझे तैसे झाले मज । परी भाव-बीज बळकट ॥१॥
पाठिराखा झाला सद्गुरुनिधान । मारोनिया मन मिरविले ॥२॥
एक दोन ग्रासिले शून्याते गिळिले । निःशद्बा प्राशिले निरंजनी ॥३॥
निष्कामता कल्पद्रुम आला हाता । दासराम स्वता ठायी धाला ॥४॥

६७०

गुरु हृदयी प्रगटले । ज्ञानी ज्ञान जागृत केले ॥१॥
मजकरवी ते बोलविले । जे का न मिळेची मोले ॥२॥
माझी काय तीं योग्यता । त्यानी बोलविले तत्वता ॥३॥
एकशे बावीस (१२२) अभंग । करोनी नटविले ब्रह्मांग ॥४॥
हे तो जो कोणी वाचेल तो तो मुक्तची होईल ॥५॥
राम लोळे गुरुचे चरणी । पादत्राणची होऊनी ॥६॥

६७१

अनंत अपराधी मी द्वारा । आलो असे गुरु दातारा ॥१॥
पतित पावन आपण । मी तो दुर्बलची जाण ॥२॥
आपण उदार अतीं थोर । अनंत वैभव भांडार ॥३॥
म्हणोनि ध्या पदरी भक्ता । धन्य धन्य हनुमंता ॥४॥
बालक रामासी हनुमंता । तुम्ही दर्शन द्यावे आता ॥५॥

६७२

संतांचा आनंद तोची हा प्रसाद । अंतरीचा कंद सुख ठेवा ॥१॥
काय बोलू पुढे कळेचिना माते । सांगतो स्वामीते दास त्यांचा ॥२॥
दलाली घेवोनी संतोष पावलो । आनंदे पावलो आनंदात ॥३॥
देखिले लावण्य स्वरुप गोजिरे । कवतूक सारे सद्गुरुंचे ॥४॥
दासराम त्यांचे रस्त्यावरी उभा । पहातसे शोभा गगनाची ॥५॥

६७३

तुझे कुळामध्यें पूर्ण हरिभक्ती । आली ऐसी ख्याती संती झाली ॥१॥
हनुमंत सद्गुरु आज्ञा ते प्रमाण । कराया कीर्तन तव पितया ॥२॥
गोविंदराय कंठी प्रसादाची माळ । घातिली सोज्वळ पांडुरंगे ॥३॥
द्योतक तयाचे एक लक्ष अभंग । करावे ते वेग करोनिया ॥४॥

हरीचे कीर्तन नाम निरुपण । करी उद्धरण श्रोतयांचे ॥५॥
सिद्धानंद स्वप्नी प्रेमे आज्ञापीत । दासराम चित्त शुद्ध होय ॥६॥

६७४

पालटला कैचा बुद्धीचा हा ठसा । अवघा दशदिशा हरी झाला ॥१॥
आता उपदेश करी कोणा कोण । अनस्यूत स्मरण निजत्वाचे ॥२॥
येथें कोण शिष्य येथे कोण गुरु । वेदांत विचारु परिपूर्ण ॥३॥
येरझार झाली आम्हासी लौकिकी । जव निजसुखी गेलो नाही ॥४॥
निजसुख कोणी चाखेना लौकिकीं । स्थान अलौकिकी दासरामा ॥५॥

६७५

साधनाचे अभंग करी । रामानंद बोले कुसरी ॥१॥
राम सांगे तयाःप्रती । असो आशिर्वाद प्रीती ॥२॥
हनुमंत सद्गुरुकृपे । घडे अशक्य अपापे ॥३॥
हनुमंत कृपावाणी । बोल बोलिले वदनी ॥४॥
दासराम कर जोडून । लेई लेणे सद्गुरुवचन ॥५॥

६७६

प्रल्हादची ऐसा म्हणती रामानंद । गौरविला मंद हरिकीर्तनी ॥१॥
हरिनामदास म्हणती सिद्धानंद । पावोनी आनंद हरिकथे ॥२॥
नागाप्पाण्णा सद्गुरु बोलिले हा प्रल्हाद । जाहला आल्हाद वासुदेवरावा ॥३॥
काय जीवाची या पहाता पात्रता । आपुलाची स्वता संती केला ॥४॥
हनुमंत सद्गुरुरायांचे वचन । करील कीर्तन बाल राम ॥५॥
सद्गुरुसेवक संतांचे कौतुक । दासरामी भीक स्वानंदाची ॥६॥

६७७

संतांचा प्रसाद । तोची आत्मया आनंद ॥१॥
कवतुके रामानंद । मज म्हणितले प्रल्हाद ॥२॥
बालरामाची हरिकथा । प्रेमे ऐकुनी डोले स्वता ॥३॥
हरिनाम दासराम । म्हणती सिद्धानंद परम ॥४॥

धन्य हनुमंत सद्गुरू । कृपावंत परमेश्वरू ॥५॥
त्यानी केली स्वये कृपा । पेटविले आत्मदीपा ॥६॥
कैचे बोलविले सहज । दासरामी नामगूज ॥७॥

## ६७८

तुम्हा संतांचे दरबारी । नित्य नाचे महाद्वारी ॥१॥
संती सांगितली सेवा । पार नाही आमुच्या दैवा ॥२॥
कृष्ण विष्णू नारायण । कीर्तनी या समाधान ॥३॥
तुम्ही जनी जनार्दन । दासरामी दयाघन ॥४॥

## ६७९

काय स्वप्न वाड पडले काय स्वप्न वाड रे ॥ध्रु॥
मीच मला सांडुनी गेलो नटुनी नामरुपी भरलो ।
सुखीं दुःखी गुंतुनी पडलो । देखी नयनी दोन रे ॥१॥
दोन नयना एक होता । पार पळाली अहंता ।
पहाणे परतले स्वता । एकी उरलें एक रे ॥२॥
जागृतिया नवलाव । नाही रुप नाही नाव ।
सकळही स्वयमेव । दासरामी राम रे ॥३॥

## ६८०

जन्मा येऊनी धन्य झाली । गुरुचरणा संनिध आलो ॥१॥
झाले संतांचे दर्शन । आत प्रगटले कीर्तन ॥२॥
मुखी घडे प्रभूचे स्मरण । कळली साक्षात्कार खूण ॥३॥
स्वरुपाचे लागे वेडे । सोपे झालें अवघड ॥४॥
राम सद्गुरुचा लाडका । शुद्ध बोध झाला निका ॥५॥

## ६८१

नित्य करितो कीर्तन । घेतो साक्षात्कार खूण ॥१॥
पंथ सकळा वरिष्ठ । नामे न पडती कष्ट ॥२॥
अनासक्ती धरूनी जीवी । रहाता मिळे मोक्षपदवी ॥३॥
सुखे आनंदे राहीन । दृढ धरूनी सद्गुरुचरण ॥४॥
गुरूआज्ञा हे साधन । दासा नुरेची बंधन ॥५॥

## ६८२

नागाप्पाण्णा महाराज । मूळ पीठीचे अधिराज ॥१॥
भक्तिपंथ नीट । जगा दाविला चोखट ॥२॥
गुरुलिंगजंगम । महाराज सिद्ध परम ॥३॥
आजोबांची कृपा । भगवंत झाला सोपा ॥४॥
सांगती पुराण । डोले काडाप्पा भगवान ॥५॥
भाऊसाहेब उमदीकर । गुरू तोषले अपार ॥६॥
रामा बोलिले हृद्गद । काय आहेसी प्रल्हाद ॥७॥

## ६८३

संतांचा प्रसाद । तोची आत्मया आनंद ॥१॥
कवतुके रामानंद । मज म्हणितले प्रल्हाद ॥२॥
बालरामाची हरिकथा । प्रेमे ऐकुनी डोले स्वता ॥३॥
हरिनाम दासराम । म्हणती सिद्धानंद परम ॥४॥

## ६८४

हरिदासांचिये घरी । मज उपजवा जन्मांतरी ।
बोलती निर्धारी । संतराज तुकोबा ॥१॥
काय भाग्य मज जोडले । तेची सत्य आज झाले ।
भक्तराज भले । पितृदेव लाभले ॥२॥
प्रपंच करोनी परमार्थ । करूनी दाविती यथार्थ ।
चित्त अनासक्त । करोनिया राहिले ॥३॥
नोकरी ते लाथाडिली । परी भक्ती चालविली ।
जी जी विघ्ने आली । निर्दाळण केले ते ॥४॥
मोठे इंद्रियदमन । थोर मनोनिग्रहण ।
मृत्तिकेपरी परधन । आशिर्वाद गुरूंचा ॥५॥
गुरूआज्ञेने कीर्तन । निळोबानी केले जाण ।
तैसा अनुभव पूर्ण । मागुती पुनः आलासे ॥६॥
हनुमंत सद्गुरुराय । भक्तावरी वोळली माय ।
आज्ञा झाली पाहे । नित्य कीर्तन करण्यासी ॥७॥
तैसे नित्य करिती कीर्तन । त्यात कधी न पावती शीण ।
करिती स्मरण साधन । देहभान विसरोनी ॥८॥

थोर सत्संग जाहला । देव साक्षात्कारा आला ।
माझेवरी बोळला । देवराय हनुमंत ॥९॥
हनुमंत रामदूत । कोटणीस ते विख्यात ।
शिरी ठेवोनिया हस्त । चोखट मार्ग दाविला ॥१०॥
रघुनाथ भक्त थोर । करिती कीर्तनजागर ।
ठेविला कृपाकर। दीनाचिये मस्तकी ॥११॥
ऐसे सुख स्वर्गी नाही । डंका पिटूनी देतो ग्वाही ।
बोलियेले पाही । देव मुनी सज्जन ॥१२॥
दासराम लीन झाला । हरिभक्तांचे चरणाला ।
गातो त्यांच्या लीला । प्रेमभरे अंतरी ॥१३॥

६८५

हरिभक्त कीर्तनकार । धन्य आम्ही केळकर ॥१॥
साधुसंतांचे दरबारी । मान देताहे श्रीहरी ॥२॥
संतभूषण गोविंद । दिला हरीने ज्या प्रसाद ॥३॥
गुरुआज्ञेचे कीर्तन । ब्रह्मानंदाचे वतन ॥४॥
दासराम हा किंकर । करी साथ लावो स्वर ॥५॥

६८६

हरिभक्तांकित हरिनामप्रेमी । भूषण हे रामी संती दिले ॥१॥
अजाण लेकरू अज्ञान पामरू । कथेंचा बडिवारू संती दिला ॥२॥
गोविंदरायापोटी बहुता पुण्ये आलो । तेणेची लाधलो या कौतुका ॥३॥
हनुमंत सद्‌गुरु बोलिले वचन । करील कीर्तन बाळ राम ॥४॥
कीर्तन ऐकोनी रामानंद तोषले । तया संबोधिले प्रल्हादची ॥५॥
बाल भागवताचे ऐकावे कीर्तन । रामानंद बोलून गेले सकळा ॥६॥
कीर्तन ऐकोनी नागाप्पाण्णा तोषले । अभ्यंकरा बोलिले काय ऐका ॥७॥
प्रल्हादची आहे हा लाडका संतांचा । संतांची हे वाचा एक झाली ॥८॥
नारायणमहाराज करिती कवतूक । स्वकीर्तनी देख गौरविती ॥९॥
ऐसी या संतांनी पाठ थोपटिली । आशिर्वाद बोलिली साधुमाय ॥१०॥
माईसाहेबाना झाले समाधान । ऐकोनी कीर्तन बालाचे ते ॥११॥
दादासाहेबाना आनंद जहाला । संतांचा सोहळा अनूपम ॥१२॥
दासराम हनुमंत सद्‌गुरूचा । बोले त्याची वाचा रघुपती ॥१३॥

६८७

दासरामा रामानंद । म्हणती कवतुके प्रल्हाद ॥१॥
तेची नागाप्पाण्णा वदले । आशिर्वाद संतो दिधले ॥२॥
हनुमंत सद्गुरूराज । प्रगटविले त्यानी गूज ॥३॥
दासराम तेथे धाला । म्हणुनी चरणदास केला ॥४॥

६८८

संतो सांगितली सेवा । पार नाही आमुच्या देवा ॥१॥
म्हणोनिया तुझे द्वारी । देतो नामाची ललकारी ॥२॥
मुखे करितो कोर्तना । सभारंगी नारायणा ॥३॥
असो द्यावी आपली नजर । दीन दासरामावर ॥४॥

६८९

तुमचा हा आशिर्वाद । जन्मोजन्मीचा प्रसाद ।
म्हणोनी आनंद । हावो मज अखंड ॥१॥
तुम्हा संताचे वचन । केली आज्ञा ते प्रमाण ।
म्हणोनी कोर्तन । सभारंगी करीतसे ॥२॥
तुम्हा संतांची रजधूळी । सदा लावितो कपाळी ।
नामाचे कल्लोळी । केवी नाचे निर्लज्ज ॥३॥
हे तो कवतूक सद्गुरुंचे । बोल बोबडे प्रीतीचे ।
ललकारू भावाने । संतसभे हरिनाम ॥४॥
दासरामी द्यावी स्फूर्ती । प्रेम धरोनिया चित्ती ।
समाधान तृप्ती । मन पावे जेणे की ॥५॥

६९०

नागाप्पाण्णा बोलियेले । तैसे सिद्धानंदे केले ॥१॥
नेणो अधिकाराची थोरी । त्यानी केली नवलपरी ॥२॥
हनुमंत प्रभू बोळले । म्हणोनी हे घडों आले ॥३॥
चरणाचा दास केला । दासराम आनंदला ॥४॥

६९१

हेची सेवा जन्मोजन्मी । माझी घ्यावी तुम्ही स्वामी ॥१॥
आपुलिये ऐसे भजन । हेची साधन समाधान ॥२॥
द्वारी ठेवावे आम्हासी । करू कीर्तन सुखासी ॥३॥
आपुलिया सभाद्वारी । दासराम ललकारी ॥४॥

६९२

घालशील जरी का जन्मा । तरी हाची देई प्रेमा ॥१॥
हेचीं देई मायबाप । दावी हेची तुझे रूप ॥२॥
हेची लाभोत सद्‌गुरू । करिती जे भवापारू ॥३॥
घडो ऐसा संतसंग । आम्ही (नित्य) देखो कीर्तनरंग ॥४॥
सिद्धानंद भजनसेवा । दासरामा देई देवा ॥५॥

६९३

हरिभक्तीचे वतन । करितो मुखाने कीर्तन ॥१॥
गुरूसेवेचा बडिवार । होऊ नामब्रह्माकार ॥२॥
संत सभारंगी । आमुचे कवतूक हे जगी ॥३॥
गुरुवचनी सादर । दासराम करी गजर ॥४॥

६९४

केला महाराजानी माझा अंगिकार । जहालो पामर दास त्यांचा ॥१॥
अहंकार माझा घेतला काढोनी । अहंत्व होवोनी ठेले तेची ॥२॥
अहं निरहं दोनी दावी साक्षात्कार । लहरी साचार स्वरूपाची ॥३॥
सहज साधन प्रसादे लाधले । दासरामा केले समाधान ॥४॥

६९५

आम्हीं हरीचे कीर्तनकार । नाचू हरीचे समोर ॥१॥
करू हरीचा जयजयकार । हाची आमुचा बडिवार ॥२॥
काही न मागू कोणासी । गाऊ नामची सदाभ्यासी ॥३॥
हनुमंते दिधला वाटा । तोची गाजवू चोहाटा ॥४॥
जय जय रामकृष्ण हरी । दासराम हे ललकारी ॥५॥

## ६९६

गाऊ नाचू हरीचे नामी । नामदास नामप्रेमी ॥१॥
संती सांगितली सेवा । पार नाही आमुच्या दैवा ॥२॥
कृष्ण विष्णू नारायण । करू आनंदे कीर्तन ॥३॥
संतसभा रंगद्वारी । दासराम करी ललकारी ॥४॥

## ६९७

' स्वप्नामाजी तुज अभंगप्रसाद । दिलासे आनंद नित्य सेवी ' ॥१॥
तुकाराम वाणी बोलियेले वाणी । येवोनिया स्वप्नी पतिताचे ॥२॥
हनुमंतरायकृपेचा प्रसाद । तोची हा आनंद ऐतोब्याचा ॥३॥
आनंद लुटिला आनंद लुटिला । फुकटचा लाधला फुकटची ॥४॥
षडरस साधनसंपत्तीचा पाठ । अर्पीतो अवीट हनुमंता ॥५॥
दासराम लोळे हनुमंतचरणी । गातसे वदनी नाम त्यांचे ॥६॥

## ६९८

वंदन करी तुजला । श्रीगुरु वंदन करी तुजला ॥ध्रु॥
संतसभेच्या रंगद्वारी या । करितो सेवेला ॥१॥
कीर्तन करितो तव आज्ञेने । लेकरु दीन भोळा ॥२॥
तुझाची सारा बडिवार हा । आनंदची जहाला ॥३॥
तूची ही श्रोता वक्ता तूची ही । विश्रामची धाला ॥४॥
राम हरिनारायण कीर्तन । दासराम रमला ॥५॥

## ६९९

श्रोता वक्ता एकची जहाला काय करू कीर्तन । श्रीहरी वासुदेव नारायण ॥ध्रु॥
हरीच्या रंगी हरीचा रंगची कोठे हे मीपण । रामकृष्ण हरी जीवन ॥१॥
वाचेवीण बोले आणिक एक श्रवणेवीण । रंग राही दृष्टी भरुन ॥२॥
दासरामी या सद्‌गुरु दाविती कैचे स्थिर आसन । ठायीच घडले संकीर्तन ॥३॥

७००

तुझ्या नामाचे किंकर । करू नामाचा गजर ॥१॥
नामी करू समाधान । सदा नामाचे चिंतन ॥२॥
हरिनामे होऊ सुखी । उपेगासी येईल शेखी ॥३॥
दासराम शरणागत । नामदास नामभक्त ॥४॥

७०१

धन्य धन्य रामानंद । साधुसंती या प्रसिद्ध ॥१॥
झाले स्वयमेव आनंद । ग्रंथरूप दासबोध ॥२॥
रामी लुटला आनंद । सगुण हृदयी बोध ॥३॥
विश्वव्यापी रामानंद । प्रगट गुणगानी आनंद ॥४॥
हनुमत्सद्‌गुरु बालक मंद । गाई आनंदे प्रल्हाद ॥५॥

७०२

गुहेमाजी नारायणे । दिधाली अंतरीची वचने ॥१॥
केला कानडयाने बोध । झाला अभंगी प्रसाद ॥२॥
केवी चोरियेले मना । नादे भेदियले गगना ॥३॥
अवघाची नारायण । तेथे दासराम कोण ॥४॥

७०३

इडेमाजी कृष्ण पिंगळे श्रीराम । तेथे चित्त परम एक होता ॥१॥
एकी एक नाडी जाई मिसळती । सुषुम्ना जागृती होय तेव्हा ॥२॥
सुषुम्नेत हरी प्रगटे कुसरी । हरीनाम गजरी समाधान ॥३॥
रामकृष्णहरी ऐसीं नादस्थिती । चिद्वस्तु प्रचीती दासरामी ॥४॥

७०४

आत्माराम माझा कैचा प्रगटला । स्मरणातु आला सगुणरूपे ॥१॥
विस्मरण शून्य चंचळ परिघन । जेथे ज्ञानाज्ञान दृश्यादृश्य ॥२॥
विस्मरण स्थिती काढोनि टाकिता । निजतत्वासी येता स्वयं ब्रह्म ॥३॥
निजगूज ठायी नाठविता आठव । करी सद्‌गुरुराव एकसरा ॥४॥
दासरामी देखता डोळयाचा देखणा । भक्तीचा हा राणा अद्वयेची ॥५॥

७०५

चंचळी आकार । तेथे गुणांचा प्रकार ॥१॥
शून्यामाजी अणूरेणू । द्वैत दाविती जीवनू ॥२॥
मिथ्याभूत मन । द्वैत कल्पीं ते आपण ॥३॥
दासरामी निरंजन । भेदाभेदातीत पूर्ण ॥४॥

७०६

आत्मा जागो आत्महिता । हेची मागणे भगवंता ॥१॥
आत्महित मज दावी । निजवस्तू पाडी ठावी ॥२॥
नामीं आत्म्याचे दर्शन । परिपूर्ण समाधान ॥३॥
दासराम हा याचक । मागे भगवंतासी भीक ॥४॥

७०७

प्रेम देई नारायणा । करितो हा हरिकीर्तना ॥१॥
तुझे गातो गुणवाद । टाळ चिपळीं यांचा छंद ॥२॥
लाचावला प्रसादासी । प्रेम द्या या अहर्निशी ॥३॥
नामी प्रेम देसी तुझे । नाम मुखी वसो माझे ॥४॥
दासराम मागे दान । विनवितो करूनी नमन ॥५॥

७०८

अव्यक्त ते दावी । स्वयंब्रह्म करूनी ठेवी ॥१॥
व्यक्त नव्हे ते अव्यक्त । प्रपंच नव्हे तो परमार्थ ॥२॥
कळ दावी बा श्रीहरी । कृपा करोनी झडकरी ॥३॥
दासराम लागे पायी । वेळोवेळा ठेऊनी डोई ॥४॥

७०९

नामी दृश्यादृश्य नाही । देखणे हे केवल पाही ॥१॥
नामाठायी विमल ब्रह्म । नुरे उपाधीचा भ्रम ॥२॥
नामामाजी आपुले रूप । संतभक्त तेची रूप ॥३॥
दासराम हा स्वानंदे । हरिभक्तांच्या प्रसादे ॥४॥

७१०

ध्वनी आणि नाद तयापैल प्रणव । वरुते अपूर्व शब्दरूप ॥१॥
शब्दाचिये वरी अशब्दाची गोष्टी । अशब्द ते पोटी शून्याचिया ॥२॥
शून्याचे उपरी देखिजे निःशब्द । स्मरण अगाध तयावरी ॥३॥
स्मरणातु नाम ब्रह्म निरंजन । सगुण निर्गुण देखणे ते ॥४॥
आवडी पहावे स्वरूप आपुले । संतजनीं दिले ठाण जेथे ॥५॥
दासराम मागे संतजना दान । आवड सगुण भक्तींची ते ॥६॥

७११

नामी समाधान । सर्वांचे जे अधिष्ठान ॥१॥
तेथे शून्याचा व्यापार । दृश्यादृश्य हा संसार ॥२॥
दासराम संती । कैचा धाला शुद्ध चित्ती ॥३॥

७१२

हृदयस्थ परमेश्वरा । कृपा करी गा दातारा ॥१॥
हृदयातु तुझे रूप । निरामय निर्विकल्प ॥२॥
संकल्प ते होता नाम । सर्व पुरवी मनीचे काम ॥३॥
दासराम सदा प्रार्थी । तुज भावे सीतापती ॥४॥

७१३

नामी साधे खरे हित । नामी भक्त हा निवांत ॥१॥
नामाठायी काहीं नाही । चंचळ भास देखणे पाही ॥२॥
राहिलिया देखणेपणे । नामी मिळोनी रहाणे ॥३॥
दासराम नामी येता । लाभे तया सार्थकता ॥४॥

७१४

नाम हेची भक्ती प्रेम । पूजाभाव सर्वोत्तम ॥१॥
देव भक्तांचा संगम । पालटती मनोधर्म ॥२॥
थोर नामाचा महिमा । मौनावला स्वये ब्रह्मा ॥३॥
दासराम नामप्रेमी । साधु संत समागमी ॥४॥

७१५

अव्यक्त ते नाम । निरामय स्वयंब्रह्म ॥१॥
उपाधी हे नोहे ब्रह्म । निरुपाधी पूर्णकाम ॥२॥
नामी लय साधिलिया । ब्रह्मरूप त्याची काया ॥३॥
साधुसंत सगुण ब्रह्म । पाय सेवी दासराम ॥४॥

७१६

जे जे भक्तीसी मिळाले । ते ते तुझे भक्त जहाले ॥१॥
तुझे नाव उच्चारीन । शून्य करोनी राहीन ॥२॥
आवडी ते एकवटुनी । नाहीपणे जडलो चरणी ॥३॥
सगुणभक्तीची आवडी । पंढरिये परवडी ॥४॥
दासराम प्रभुपायी । स्थिरावला सत्वर ठायी ॥५॥

७१७

शब्दयोगे भासे दृश्य । तेणे चुकलो स्वतास ॥१॥
आप आपणा विभक्त । होता मांडियेले द्वैत ॥२॥
शून्यामाजी अहंकार । आत्मरूपाचा विसर ॥३॥
नवल परमात्म्याची करणी । दासराम लागे चरणी ॥४॥

७१८

नामाठायी सर्व शून्य । नामी भक्त ते अनन्य ॥१॥
नामब्रह्मी अकळ लीला । जाणे साधू तो आगळा ॥२॥
नवल चंचळाच्या गुणे । झाले विश्वाचे देखणे ॥३॥
स्मरणातु भगवान । दासरामी निरंजन ॥४॥

७१९

नामब्रह्मी धाले मन । ओपीतसे समाधान ॥१॥
तये ठायी चंचळ गुणे । झाले दृष्टीचे देखणे ॥२॥
आपणा ठायी आवण । धुंडियेले जन वन ॥३॥
हरिनाम दासराम । स्वात्मरूप परंधाम ॥४॥

७२०

कोठेही जावोनी धुंडोनी पाहिले । तव ते आपुले रूप तेथे ॥१॥
माझे मन गुरुकृपे सापडले । सर्वा आकर्षिले माझे रूपे ॥२॥
मायेची उपाधी असो ऐसे तैशी । मीची ममत्वासी व्यापियेले ॥३॥
दासरामा नामी आत्मरूपदर्शन । जेथे जीव प्राण मन नाही ॥४॥

७२१

अनेक जीवांचे मीतूपण भाव । जयांचा संभव उपाधीने ॥१॥
उपाधी हे झाली शून्याचिये गुणे । शब्दाशब्द देखणे विश्वात्म्याचे ॥२॥
सकळ जीवांचे जेथे आकर्षण । धन्य नारायण भगवान तो ॥३॥
दासराम धाला पायी संतसंगे । होवोनिया उगे नाहीपणे ॥४॥

७२२

सुख न मिळे इंद्रियासी । जरी ते भोगी परावियासी ॥१॥
सुख न मिळे या मनासी । जरी चिंतिते सुखासी ॥२॥
सुख न मिळे बुद्धीसी । जरी ते आरोपी स्वःतासी ॥३॥
सुखदुःख नव्हे प्राणा । जरी शरीरी या राणा ॥४॥
प्राणापैल अविनाश । स्वरूप व्यापिले सकळास ॥५॥
तेचि नटले मीतूपणे । दावी द्वैताची लक्षणे ॥६॥
सुख दुःख त्याचे त्यास । अभक्तासी हे सायास ॥७॥
संत आनंदाचे स्वामी । ठाय दिला दासरामी ॥८॥

७२३

नामी धाले मन । तेथे सदा समाधान ॥१॥
स्मरण शून्याचा व्यापार । तेथे विश्वाचा प्रकार ॥२॥
अहं निरहं स्मरणी दोनी । विसरावे जन्ममरणी ॥३॥
आहे नाहे नुरवोनी । दासराम निरंजनी ॥४॥

## ७२४

आवड ते एकवटली । आवड आवडी ते भेटली ॥१॥
नामामाजी आपुले रूप । तेथे संत हे तद्रूप ॥२॥
स्मरणी आवड गोड झाली । तेचि विश्वा प्रसवली ॥३॥
दासरामा नाम आवडी । नामी पुरती मनीची कोडी ॥४॥

## ७२५

नामाचिये ठायी पहाता हे विश्व । दिसे शून्यभाव त्याचे माथा ॥१॥
नामी नवलाव नाम हाची देव । नाम हाची ठाव श्रीसंतांचा ॥२॥
नाम ना सगुण निर्गुण ना शून्य । त्याचे ठायी लीन दृश्यरुप ॥३॥
तेथे लीन हरिनाम दासराम । स्वयंसिद्ध ब्रह्म उगमी जे ॥४॥

## ७२६

सार तो विचार रामकृष्णहरी । प्रणवाची कुसरी जेथे झाली ॥१॥
नाम ते स्मरणी स्मरण निःशद्बी । निःशद्ब आनंदी शून्याचिये ॥२॥
अशद्बाउपरी महाशून्य देखे । अशद्ब ते निके शद्बाउपरी ॥३॥
सकळा कारण सिद्ध नाम ब्रह्म । जेथे हे अनाम दृश्यादृश्य ॥४॥
दासराम संतकृपे नामानंदी । सुखे ठेऊनी बुद्धी प्रभुचरणी ॥५॥

## ७२७

राम राहो मुखी । रामी मन होवो सुखी ॥१॥
राम राहो श्रवणी । नये येर काही मनी ॥२॥
राम राहो नयनी । दासराम लागो चरणी ॥३॥

## ७२८

हरि राम कृष्ण । शिव विष्णू नारायण ॥१॥
मंत्र वदो माझी वाचा । घडो संग सज्जनांचा ॥२॥
उपाधीच्या संगे । जाण नेणे लाग वेगे ॥३॥
नामी हे अनाम । शद्बाशद्बाचा विभ्रम ॥४॥
दासराम जावो पैल । उरो आनंद केवळ ॥५॥

७२१

स्वात्मतरंग सार वाणी । हरीने पेरिली श्रवणी ॥१॥

हे तो कृपा सद्‌गुरूंची । हरिनाम समाधी कैची ॥२॥

नाम आसन बंधन । नाम मुद्रा नाम ध्यान ॥३॥

नाम ध्याता नाम गाता । नामधारणा तत्त्वता ॥४॥

सर्वाघटी नाम । हंकाराचा कोठे भ्रम ॥५॥

शद्ब आभासे चंचळ । नाम तयातु निश्चळ ॥६॥

कृपेची हे वाणी । सर्मापतो हनुमत्‌चरणी ॥७॥

दासराम नामी । सुखी संतसमागमी ॥८॥



# चिमड संप्रदायावरील अभंग पदे : १५

७३०

श्रीगुरूराया सद्‌गुरूराया राजा हनुमंता ।
दर्शन देई द्वारी तिष्ठलो दावी भक्तिपंथा ॥१॥
दर्शन नाही अजुनी घडले म्हणुनी भेटी दयाळा ।
तुझे स्वरूप मज पाहू दे रे अनादी गुणनाथा ॥२॥
चित्त धावते तुझ्याकडे रे तूची तारी मज आता ।
तुझ्याविण मज क्षणही गमेना पदी ठेवितो माथा ॥३॥
राम भुकेला तुझ्या दर्शना देई नाम कृपाळा ।
तुझे बाळ हे तुझ्याकडे रे धाव घेई आता ॥४॥

७३१

पेठ वसविली सांगली ग्रामी हरिगुण नामाची ।
काय मौज त्या पेठेमाजी गर्दी उतारूंची ॥ध्रु॥
एक लक्षका रुपया देता देती हिरे तेरा ।
तेरामाजी साठविला तो परमेश्वर सारा ॥१॥
माल लागला बंदराला अमोलिक पाही ।
जो तो येतो घेऊनी जातो लक्ष देवुनी पाही ॥२॥
ययाकारणे सवंग जाहला खरा माल पाही ।
लूटची करिती घ्या घ्या म्हणती जेवी तृप्ती होई ॥३॥
कितीहि लुटला तरी न संपे माल हा तो बरा ।
जो तो येतो घेऊनी जातो आनंदुनी घरा ॥४॥
पेठ वसविली सांगली ग्रामी हनुमंतरायांनी ।
छत्तीस वर्षे लुटुनी लुटले घ्या म्हणती कोणी ॥५॥
राम बाळ हा आनंदुनी नाचत हो गेला ।
मौक्तिकांचा चुरा पाहुनी अंतरी घेऊनी आला ॥६॥

७३२

हनुमंतराय रामाचा हो प्राण । सेवेसी अनन्य तत्परची ॥ध्रु॥
भक्ती मुक्ती बुद्धी तीन्ही जयेठायी । नीतीपंथ पाही साध्य जया ॥१॥
अखंड कीर्तन सत्य आचरण । जयांचा हो प्राण रामराय ॥२॥
दासराम तया हनुमंता शरण । धरितो चरण प्रेमभावे ॥३॥

७३३

कलियुगी कपिवर अवतरला ।
रामायणी जो रामदासची झळकुनिया ठेला ॥ध्रु॥
रामप्रभूची भक्ती करोनी ।
तनु मन धन हे सर्व अर्पुनी । ब्रह्मचारी ठेला ॥१॥
रामायणी जो झळकत ठेला ।
रामकृपेने अमरची जाहला । काय वानू त्याला ॥२॥
रामकार्य हें करूनी दाविले ।
रामरुपी जे समरस जाहले । धन्य धन्य झाला ॥३॥
द्वापारयुगी जो रामदासची ।
भक्ती करोनी रामप्रभूची । ब्रह्मचारी ठेला ॥४॥
महाराष्ट्री अवतार घेऊनी ।
भक्तिमार्ग हा चोखाळुनी । समर्थ झळकला ॥५॥
ब्रह्मचर्यव्रत आचरण करूनी ।
कृपा प्रभूची संपादोनी । धर्मपंथ आखला ॥६॥
मातृ आशा ती करण्या पूर्ण ।
कोटणीस–कुळी जन्म घेऊन । चिरंजीव जाहला ॥७॥
कृपा प्रभूची संपादूनी ।
नामाचा तो डंका पिटवुनी । रामनामी रमला ॥८॥
संसारी परमार्थ करोनी ।
कीर्तन झेंडा बळकट रोवूनी । फडकुनी फडकाविला ॥९॥
भक्तिमार्ग हा चोखाळोनी ।
अनंत जडजीवा तारोनी । स्वात्मसुखे रमला ॥१०॥
धन्य धन्य हनुमंत सद्‌गुरू ।
खरा खरा की परमेश्वरू । उद्धरी (दासाला) रामाला ॥११॥

## ७३४

सद्‌गुरूला स्तवू या कीर्तनी । सद्‌गुरूपदी जडू या ॥ध्रु॥
सद्‌गुरुराया स्वमनी वसुनी । स्फूर्ती दे सदया ॥१॥
अज्ञ मूढ मी जडलो तव पदी । आपुले गुण गाया ॥२॥
आपण रंगता रंगे जग हे । रंगवुनी दे या ॥३॥
श्रीहनुमंता करिसी दया रे । वाचविसी समया ॥४॥
राम बाळ हा घेई पदरी । मती दे गुण गाया ॥५॥

## ७३५

( नमनाचे पद्य )

जय रघुनाथा गुरु रघुनाथा नमितो तव कीर्तनी तुला ।
बुद्धी देई अल्पमतीला करितो कीर्तनसेवेला ॥ध्रु॥
निशिदिनी रमसी कीर्तनरंगी उधळुनी देसी रंगाला ।
प्रगटची करिता श्रीगुरुकृपे अंतरीच्या श्रीरंगाला ॥१॥
हनुमंताचे परी कीर्तनी प्रेमरसा पान्हा फुटला ।
सर्व भक्तगण अमर जाहला सेवुनिया तव नामाला ॥२॥
गुरुभक्ती अंतरी बाणली पार नसे तव भाग्याला ।
गुरुकृपेने अक्षयी डंका रामभक्तीचा गाजविला ॥३॥
बाल राम हा आपुले चरणी रत होवुनिया ठेला ।
मागतसे तव आशिर्वाद मज हरिगुणकीर्तनगानाला ॥४॥

## ७३६

हनुमंतराय उदार उदार । भक्ताना दिधले निज भांडार ॥ध्रु॥
धन्य रघुनाथा परमार्थ दिला । सारिखाची केला आपुलिया ॥१॥
गुरुभक्तिबीजारोपण तै केले । फळ चाखविले पुत्रालागी ॥२॥
नानासाहेबासी अंतरीचे प्रेम । दिलेसे उत्तम हृद्‌गदची ॥३॥
निजधामी गेल्यावरी पै येवोन । दिधलीसे खूण गोविंदासी ॥४॥
कीर्तनाचा ठेवा तयासी दिधला । आपुला म्हणविला दासालागी ॥५॥
पाहोनी भक्तांचे निर्मळ अंतर । दाविला ईश्वर कृपाबळे ॥६॥
माघ वद्य तृतिया दिन पाहुनिया । निशीत सखया प्रगटले ॥७॥
गोविंदरायानी करिता वंदन । आशिर्वाद जाण बोलियेले ॥८॥
तुझे रे कीर्तन चालेल अखंड । होशील उदंड जगामाजी ॥९॥
तयेपरी नित्य चालिले कीर्तन । धन्य धन्य जाण गुरु शिष्य ॥१०॥

सेवेचे निधान गंगाधरा दिले । आपुलेसे केले भक्तालागी ॥११॥
दिले सकळासी सोपे सुगम नाम । भेटतो परम देव जेणे ॥१२॥
धन्य ब्रह्मरुप गुरु हनुमंत । तया शरणागत दासराम ॥१३॥

७३७

( ती. गु. भ. प. बापूरावजी केळकर यांचेवरील पद्य )

गोविंदा तुम्ही अखंड रमता गुरु हरिगुणगानी ।
अनंता विघ्ना दूर करोनी तोषविता की धणी ॥ध्रु॥
रंगली तुमची अखंड वाणी रामनाम कीर्तनी ।
दयारूपी तुम्ही प्रगटविता तो राम हृदयभुवनी ॥१॥
पुरश्चरण गायत्रीचे केले बालपणी ।
भाकरी गोमूत्राची खाऊनी रमला गुरूध्यानी ॥२॥
देह ठेविल्यावरी गुरुनी समोर ठाकुनी ।
दासबोध तुम्ही वाचीत असता ऐकियला कानी ॥३॥
त्यांचे आज्ञेपरी कीर्तन दाबियले करूनी ।
द्रव्याचा हा लोभ सोडिला विरक्त होवोनी ॥४॥
कपिवर झाले प्रगट तव पुढे धन्य पुरश्चरणी ।
धन्य जाहला जगामाजी या सद्‌गुरू तुष्टवुनी ॥५॥
काय वर्णू तव भाग्यालागी पार नसे जाणी ।
द्रव्य सोडुनी देव जोडिला अभेद अंतःकरणी ॥६॥
तनय आपुला लीन जाहला राम धन्य चरणी ।
देव कसा भेटे संसारी दावियले स्मरणी ॥७॥

७३८

( चिन्मयवृक्ष वर्णन )

चिन्मय वृक्षाचे रोपडे । लावियेले जे रोकडे ॥१॥
धन्य नारायणराव । देखियेली स्वरूप ठेव ॥ध्रु॥
साधुराये निगा केली । धन्य धन्य ती माऊली ॥२॥
रामराये वाढविले । रामरुप होवुनी ठेले ॥३॥
हनुमंते धरूनी प्रेमा । वाढविलासे महिमा ॥४॥
धन्य रघुनाथ, गोविंद । भोगितातीं स्वरूपानंद ॥५॥
दासराम लीन झाला । सुखसोहळा देखियेला ॥६॥

७३९

( संतांचे छंद )

निंबरगीकराना एकविध छंद । आनंदाचा कंद लाभलासे ॥१॥
साधुमहाराजाना रामनाम छंद । आनंदाचा कंद लाभलासे ॥२॥
रामभाऊमहाराजाना गुरुसेवा छंद । आनंदाचा कंद लाभलासे ॥३॥
तात्यामहाराजांना कीर्तनाचा छंद । आनंदाचा कंद लाभलासे ॥४॥
दासरामा राम गुणगान छंद । आनंदाचा कंद लाभलासे ॥५॥

७४०

( गुरूपरंपरा स्तवन )

कीर्तनकाळी नमितो पाही । चिन्मय गुरूवर परंपरा ही ॥१॥
आद्य सद्‌गुरू रेवणसिद्ध । बिंदुस्वरूप जे शंभू प्रसिद्ध ॥२॥
मरूळप्रभू श्रीकाडसिद्ध । अर्धमातृका रूप अगाध ॥३॥
अकार जाणा नारायण । काडसिद्ध ज्या गुरुरूप जाण ॥४॥
उकार लक्ष्मी अक्का जाण । रघुनाथप्रिय बंधू प्रमाण ॥५॥
मकार साधुमहाराज । नारायण ज्या सद्‌गुरूराज ॥६॥
ईकार प्रभू रामराय । साधुराय ज्या श्रीगुरूराय ॥७॥
एकार प्रभू हनुमंत । धन्य सद्‌गुरू राम समर्थ ॥८॥
येथे झाला पूर्णोकार । गुरु नारायण नामोच्चार ॥९॥
गोविंदतनय प्रेमे कृपाकर । मागत मस्तकी असो निरंतर ॥१०॥

७४१

चिमडग्रामी राम राहिले । एकनाथप्रभू जगी अवतरले ॥१॥
सद्‌गुरुसेवे देह झिजवुनी । रामचंद्रप्रभू बहू डोलविले ॥२॥
जगदोद्धारास्तव अवतरले । रामनाम हे लुटूनी लुटले ॥३॥
धन्य शिष्य हनुमंत पाहुनी । साधन सांगुनी सुखरूप केले ॥४॥
दासराम हा शरणची येता । कृपा करूनी त्या मुक्तची केले ॥५॥

७४२

साधुराय ब्रह्मचारी गुरुरूप जाहले । सारासार शोधुनिया गुरुनामी रंगले ॥१॥
पूर्व पुण्य थोर म्हणुनी गुरुदेव लाभले । तुकाराम अवतार नारायण शोभले ॥२॥
घरदार मायबाप सकळही सोडिले । अंतरीचे मोहपाश तोडुनिया टाकिले ॥३॥
दासराम लीन होता आशिर्वाद बोलिले । नामबळे अंतरात्म्या अंतरांत दाविले ॥४॥

७४३

धन्य सद्‌गुरु तुकाराम ते भूतली अवतरले ।
नारायण गुरुलिंगजंगम प्रगट जन बोले ॥१॥
धन्य क्षेत्र ते गुरु नारायण अखंड जे रमले ।
जेथे त्यानी अखंड साधन करोनी दावियले ॥२॥
छत्तीस वर्षे अखंड साधन गुरुकृपे केले ।
गुरुकृपेने देवालागी पुढती नाचविले ॥३॥
गुरुआज्ञेने परमार्थाचे ज्ञान जगा दिधले ।
अवाढव्य हे भक्तिरसाचे ज्ञान जगी लुटिले ॥४॥
अज्ञ जनांचा छळ सोसोनी कष्ट बहू केले ।
फळ मिळवोनी सुखरूप होवुनी निजानंदी गेले ॥५॥
काडसिद्ध गुरु संतोषवोनी रामरूप झाले ।
गुरुसेवा ही खडतर करूनी अजरामर झाले ॥६॥
दासराम हा शरणची येता कृपाछत्र धरिले ।
जन्मभयाचे दुःख निवारूनी त्यासी मुक्त केले ॥७॥

७४४

धन्य आका लक्ष्मीबाई । जैशी मीरा मुक्ताबाई ॥१॥
साधन ते खडतर केले । गुरुराय तोषविले ॥२॥
संतसंग ज्या लाभला । रामचंद्र जोडियेला ॥३॥
थोर पुण्याई म्हणोन । लाभले ज्या नारायण ॥४॥
दासराम आला शरण । होवुनिया पायी लीन ॥५॥

७४५

शिवपिंडीपासुनिया रेवणसिद्ध जाहले । रामनामी रंगुनिया रामरुप जाहले ॥१॥
जीव कोण शिव कोण उकलोनी दाविले । अज्ञाणी अज्ञजन भक्तिमार्गी लाविले ॥२॥
निशिदिनी रामनाम महिमान गायिले । दासराम शरण येता अज्ञान काढिले ॥३॥

७४६

रेवणांचे करस्थळी मरूळसिद्ध जन्मले । चमत्कार झाला कैसा ब्रह्मरुप शोभले ॥१॥
ज्ञानस्वरुपी अगाध अज्ञान नासिले । भेदाभेद ग्रासुनिया दुःखासी छेदिले ॥२॥
धर्मकार्य करण्यासी अवतारा घेतले । दासराम शरण आला तन मन हे अर्पिले ॥३॥

## ७४७

मरुळसिद्ध करस्थळी काडसिद्ध जन्मले । धर्मकार्य करण्यासी भूतली या आले ॥१॥
रामनामी रंगुनिया रामरुप जाहले । दया क्षमा शांत वृत्ती अधिकारी शोभले ॥२॥
अधिकारी सद्‌गुणी जे नारायण शोधिले । पाहता या धन्य शिष्या अनुग्रहा दिधले ॥३॥
नारायणा आपुलेसे करुनिया ठेविले । जडजीवा उद्धराया सत्‌शिष्या बोधिले ॥४॥
रामकार्य करोनिया रामरुप जाहले । दासराम शरण येता आशिर्वाद बोलिले ॥५॥

## ७४८

नारायणा भेटी देई । करी सोई दासाची ॥१॥
कृपाछत्र धरी । स्मरवी रात्रंदिस हरी ॥२॥
अज्ञानासी काढुनिया । ज्ञान देई अज्ञाना या ॥३॥
राम मागे एक देवा । धन्य आपुली ते सेवा ॥४॥

## ७४९

धन्य नारायण उदार उदार । संतांनी दिधले निजभांडार ॥१॥
धन्य साधुराय दासा उद्धरिले । सारिखेची केले आपुलिया ॥२॥
पिढीसी परमार्थ दिला रामराया । रघुवीर राया दावुनी दासा ॥३॥
गुरु रामराये प्रसाद पादुका । दिधल्यासे देखा हनुमत् शिष्या ॥४॥
संसार परमार्थ होईल नेटका । आशिर्वाद देखा बोलियेले ॥५॥
धन्य हा हनुमंत थोर गुरुभक्त । तया शरणागत दासराम ॥६॥

## ७५०

श्रीराम जयराम जय जय राम । अक्षरे ही सुगम परम ॥१॥
तैसे चिन्मयसंप्रदायी । तेरा संत झाले पाही ॥२॥
पहिले ते रेवणसिद्ध । शंभुस्वरुपी अगाध ॥३॥
दुसरे जाणा मरुळसिद्ध । जेथे पाहता ब्रह्मानंद ॥४॥
तिसरे धन्य काडसिद्ध । ज्ञानस्वरूपी प्रसिद्ध ॥५॥
चवथे सद्‌गुरु नारायण । जे का स्वये नारायण ॥६॥
पाचव्या त्या लक्ष्मीबाई । देव प्रगटविला देही ॥७॥
सहावे ते साधुराज । भेटला ज्या रामराज ॥८॥
सातवे ते रामराय । नामी रंगले जे पाहे ॥९॥
आठवे ते उमदीकर । झाले सद्‌गुरुरुपाकार ॥१०॥

नववे जाणा हनुमंत । धन्य गुरुभक्त संत ॥११॥
कीर्तनी जे रंगुनी गेले । साधनी जे तन्मय झाले ॥१२॥
विरळा विरळा ऐसा संत । ज्यांचा झाला भगवंत ॥१३॥
दहावे जाणा अंबुराम । अंतरी ज्या भक्तिप्रेम ॥१४॥
अकरावे ते मुजुमदार । साधन केलें जै अपार ॥१५॥
सर्व संकटे सोसुनी । तोषविले सद्‌गुरुधणी ॥१६॥
बारावे ते रघुनाथ । धन्य धन्य गुरुभक्त ॥१७॥
धन्य तेरावे गोविंद । भोगिला जै स्वरूपानंद ॥१८॥
कीर्तनी जे रंगुनी गेले । धन्य गुरुभक्त झाले ॥१९॥
ऐसे गुरुभक्त संत । देव जाहला अंकित ॥२०॥
रामस्वरूपी धन्य संत । तया राम शरणागत ॥२१॥

७५१

ऐका गुरुपरंपरा ऐका गुरुपरंपरा । अवतरले जगदोद्धारा ॥१॥
आदिपीठ काडसिद्ध ते आदिपीठ काडसिद्ध ते ।
ब्रह्मस्वरुपीं एकरुप ते ब्रह्मस्वरुपी एकरुप ते ।
अवतरले जगदोद्धारा ॥२॥
तयांचे शिष्य निंबरगीकर । अवतरले गुरु दातार ।
रामनामी आनंद सारा ॥३॥
तयांचे शिष्य साधुमहाराज । जयासी वश हा रामराज ।
घेतले ब्रह्मअवतारा ॥४॥
तयांचे शिष्य रामभाऊमहाराज । अनंतकोटी राजाधीशराज ।
घेतले राम अवतारा ॥५॥
तयांचे शिष्य हनुमंतराज । जयांचे असे कीर्तनकाज ।
धन्य हनुमंत अवतारा ॥६॥
धन्य धन्य गुरू दातार । जे का असती उदार ।
वश केले परमेश्वरा ॥७॥
दया क्षमा शांतीचा पुतळा । जिंकू शकला कळिकाळाला ।
दासावरी ठेले कृपाकरा ॥८॥

७५२

संतकृपेचा लाभ झाला संतकृपेचा लाभ ॥धृ॥
गृहासी नेऊनी गृह दाऊनी
गृहात दाविसी राम ॥१॥
संसारातुनी उलट फिरवूनी परमार्थाची दृष्टी
देवूनी सांगतो मधुरची नाम ॥२॥
अंतर्मुख ही वृत्ति वळवूनी सोऽहंस्मरणी
जीव शिव जडवूनी नाहीच केला काम ॥३॥
अहंकार हा मारूनि तेथे अमृत पाजुनी
ने गुंगोते दाविती एकच राम ॥४॥
मनी चिंतनी जनी वनी व्यवहाराची दृष्टी
देऊनी देहीच केला राम ॥५॥
अर्धोन्मिलीत दृष्टी दाऊनी
आस नाही तेथे नेऊनी खरा हाती दे लाभ ॥६॥
धन्य धन्य हनुमंत सद्‌गुरू खरा खरा
की परमेश्वरू रामीच केला राम ॥७॥

७५३

हनुमंतरायासी नोहे उतराई । अपराध पाही क्षमा केले ॥१॥
दया क्षमा शांती पूर्ण ज्यांचे चित्ती । उद्धरोनी नेती भाविकासी ॥२॥
शरण आलिया देती पूर्ण ज्ञान । कृपाछत्र जाण दासालागी ॥३॥

७५४

कृपाघन कैचा प्रेमेचि वोळला । निजभक्ता दिला प्रसाद हा ॥१॥
धन्य धन्य माझे हनुमंत सद्‌गुरु । समर्थ श्रीहरू भगवान ॥२॥
सेवोन प्रसाद पहाता अंतरी । दाटला कुसरी ब्रह्मानंद ॥३॥
स्वयेंची घुमवू नाद हे त्रैलोकी । जेणे होय सुखी चराचर ॥४॥
दासराम उभा दोनी कर जोडून । सद्‌गुरुवचन लेणे लेई ॥५॥

७५५

सद्‌गुरुपदस्थ धन्य रघुनाथ । गुरूपरी शोभत सकळाते ॥१॥
तयांचे आज्ञेने पूर्ण आशिर्वादे । हनुमंतप्रसादे बोल येती ॥२॥
हनुमंतसद्‌गुरू कृपेचा प्रसाद । तोचि हा आनंद दासरामा ॥३॥

७५६

सीताराम सिद्धेश्वरू । सोमेश्वरू माऊलीये ॥१॥
धाव पाव माझे आई । प्रसन्न होई माऊलीये ॥२॥
रेवणसिद्ध मरूळसिद्ध । काडसिद्ध माऊलीये ॥३॥
गुरूलिंगजंगम माय । रघुनाथप्रिय माऊलीये ॥४॥
रामराय हनुमंत । सद्‌गुरू समर्थ माऊलीये ॥५॥
दासराम धरी चरण । हरिकीर्तन माऊलीये ॥६॥

७५७

रेणाई माऊली । पूर्ण कृपेची साऊली ॥१॥
तुझी अमृताची वाणी । ठसली नयनी सर्वस्वे ॥२॥
मरूळसिद्ध काडसिद्ध । तेही अगाध रूप तुझे ॥३॥
धन्य गुरूलिंगजंगम । निरंजन ज्योती ब्रह्म ॥४॥
रघुनाथप्रिय राम । निरंजनी स्वयं ब्रह्म ॥५॥
धन्य सद्‌गुरू हनुमंत । ब्रह्ममूर्ती भगवंत ॥६॥
धाव घेई जगदोद्धार । धर्मपालक दातार ॥७॥
सर्वश्रेष्ठ नामधर्म । बोले सद्‌गुरू ब्रह्म राम ॥८॥
भक्तांतरी प्रगट केले । सार धर्माचे बोधिले ॥९॥
दासराम नामी । पायी धाला समागमी ॥१०॥

७५८

गेले गेले परी ते नाही गेले रे । झळकती अढळ पहा वरी रे ॥१॥
हनुमंतराय रुप रामरुप झाले रे । धन्य धन्य चिरंजीव झाले रे ॥२॥
उरले उरले कीर्तिरुपे उरले । चरित्राचे रुपे दिसताती रे ॥३॥
रामनाम जगामाजी भरले रे । जडजीवा तरणोपाय दाविला रे ॥४॥
राम म्हणे काय वानू महिमा रे । भाग्यालागी त्यांच्या सीमा नाही रे ॥५॥

७५९

वंदन करितो सद्‌गुरुपदी मी भगवद्‌गुणगानी ।
अखंड कीर्तनी रंगुनी गेले गुरूकृपेकरूनी ॥१॥
धन्य धन्य हनुमंत सद्‌गुरू रामपदी ठेले ।
कीर्तनरंगी सद्‌गुरू रामा ज्यानी डोलविले ॥२॥

सुपुत्र रघुनाथ ज्यानी हरिभक्त केले ।
कीर्तनी रंगवुनी अंतरी ते निजसुख दावियले ॥३॥
परम शिष्य गोविंद साधनी तल्लीन जे झाले ।
नित्यकीर्तना आज्ञा देऊनी आपणापरी केले ॥४॥
दीन दास हा लीन जाहला हरिभक्तचरणी ।
मागतसे अंतर हे माझे रंगो गुरुवाणी ॥५॥

७६०

रामचंद्र / रामराय } सद्‌गुरु पहा हो राम राम सद्‌गुरू ।
निरंजनी जै वास केला तरोनी भवसागरू ॥१॥
तुम्हा आम्हा कारणे जयानी पाठविले तारू ।
फडकत फडकत कैसे आले करीत नामगजरू ॥२॥
दया क्षमा आणि शांतीचा हा भासे जो सागरू ।
परब्रह्म जो स्वयेंची झाला तया गुरुसी वरू ॥३॥
करू आदरू नमस्कारू तयासी निर्धारू ।
राम म्हणे त्या धन्य गुरुंचा जयजयकार करू ॥४॥

७६१

संतचरणरज थोर गुरूभक्त । जे का त्रैलोक्यात धन्य झाले ॥१॥
धन्य धन्य संत नाम हनुमंत । जे का दांडाईत होवुनी गेले ॥२॥
रामनाम डंका गाजविला ज्यांनी । देह तो साधनी रंगविला ॥३॥
धन मान कीर्ती ठेली गुंडाळोनी । अखंड कीर्तनी दंग झाले ॥४॥
सर्व रामरूप जयानी देखिले । संसारी साधिले परमार्थासी ॥५॥
जयानी मातेची इच्छा केली पूर्ण । सत्य आचरण करोनिया ॥६॥
जगासी दाविला स्वल्प राजमार्ग । होय जेणे योग जीवशिवा ॥७॥
हनुमंतराजा रामरूप झाले । दासरामे देखिले गुरूकृपे ॥८॥

७६२

मठ नाही बांधिला शिष्यवर्ग नाही केला । देव तो जोडिला संतसंगे ॥१॥
संतांचिये पायी जयांचा विश्वास । धन्य कोटणीस हनुमंत ॥२॥
कोटणीस वंश ज्यानी उद्धरिला । मार्ग दावियेला जगालागी ॥३॥
हनुमंत पांडुरंग कोटणीस । झाले सांगलीस भूषण गा ॥४॥
दासराम गुरूपायी लीन झाला । देखिला सोहळा अनुपम्य ॥५॥

## ७६३

नमो धन्य धन्य संत गुरु हनुमंत ।
रामरूप होऊनी केली जगामाजी मात ॥१॥
ध्यानी मनी स्वप्नी रामनाम वदनी ।
रंगले निशिदिनी अखंड कीर्तनी ॥२॥
पालखीत शोभले हनुमंतराय ।
दासराम वंदी पाय हर्षे गीत गाय ॥३॥

## ७६४

अबोलाचा बोल आत्मरूप वाणी । अमृताची खाणी देईल दिव्य ॥१॥
ऐसी वाणी कळली रेवणसिद्धासी । अद्वैत भक्तीसी अंत नाही ॥१अ॥
ऐसी वाणी कळली मरूळसिद्धासी । काडसिद्धा तैशी प्राप्त झाली ॥१ब॥
ऐसी वाणी कळली गुरुलिंगजंगमा । जीवा परब्रह्मा भेटी झाली ॥२॥
ऐसी वाणी कळली लक्ष्मी आक्कासी । जिचा निगमासी पार न लगे ॥३॥
ऐसी वाणी कळली साधुराजयासी । साधनाची कैसी केली करणी ॥४॥
ऐसी वाणी कळली भाऊरायालागी । अंबुरावा अंगी तेची प्राप्त ॥५॥
ऐसी वाणी कळली रामरायासी । बहू मुमुक्षूसी तारियेले ॥६॥
ऐसी वाणी कळली हनुमंतरायासी । धन्य सद्गुरूसी डोलविले ॥७॥
अखंड साधनी रंगोनिया गेले । देवा प्रगटविले कीर्तनात ॥८॥
ऐसी वाणी कळली गोविंदरायासी । कीर्तनरंगासी सीमा नाही ॥९॥
ऐसी वाणी कळली रघुनाथा निकी । तीच आली मुखी दासरामा ॥१०॥

## ७६५

गुरुलिंगजंगम धन्य धन्य धन्य झाले ।
जयांचे वाहाडे पांडुरंग भक्त झाले ॥१॥
धन्य लक्ष्मीआक्का शंकराची दिले अन्न ।
भुकेल्या म्हणोन महाराजांचे कृपेने ॥२॥
साधुमहाराज देव होऊनिया ठेले ।
काय साधन ते देव त्यासी बोले चाले ॥३॥
धन्य रामचंद्र देवा भूमंडळी आणिले । तेज ते पडले स्वरूपाचे ॥४॥
निंबरगीसी सद्गुरुचरणा पहाया हनुमंत ।
गेले तेव्हा सत्य मूर्ती ढाळी प्रेमाश्रू ॥५॥
दासराम लीन झाला संतांचे चरणी ।
राम निशिदिनी मनी स्वप्नी ध्यानी ॥६॥

७६६

हनुमंते तोषविला गुरूराव । वाढविले वैभव सद्‌गुरूंचे ॥१॥
केली गुरूभक्ती काया वाचा मने । अर्पूनिया प्राण धन सारे ॥२॥
आक्रमिता मने धन्य गुरूपंथ । भेटला भगवंत तयालागी ॥३॥
करोनिया पुढे सद्‌गुरूंची ढाल । थोर मायाजाळ हाटविले ॥४॥
हनुमंत झाले सद्‌गुरूंचे लाल । सारलासे काळ पाठीमागे ॥५॥
सद्‌गुरूआज्ञेने वर्णिला महिमा । कीर्तनी श्रीरामा प्रगटविले ॥६॥
धन्य परम गुरू जाण राजा राम । तया दासराम वंदीतसे ॥७॥

७६७

गुरु नारायणे कृपाछत्र धरिले । सर्वांसी रक्षिले धरूनी प्रेम ॥१॥
सद्‌गुरूआज्ञेने रहाता पै नित्य । करिती जीवन्मुक्त दासालागी ॥२॥
भक्तिप्रेमाचे पै देवूनी वतन । करविती दर्शन देवाजीचे ॥३॥
धन्य लक्ष्मीबाई लीन गुरुपायी । पाहियेला देही देवराय ॥४॥
धन्य साधुराज साधियेले काज । नामे देवराज जोडियेला ॥५॥
धन्य रामराय गुरूसेवा केली । देवरूप झाली ज्यांची काया ॥६॥
धन्य हनुमंत थोर गुरूभक्त । दांडाईत संत जे का झाले ॥७॥
नित्यकीर्तने पै देव जोडियेला । गुरू तोषविला रामराय ॥८॥
सद्‌गुरूवचने नित्यनेमे ठेले । धन्य धन्य झाले तिही लोकी ॥९॥
संसार नेटका करोनी दाविला । परमार्थ साधिला तयामाजी ॥१०॥
धन्य रघुनाथ धन्य पै गोविंद । कीर्तनी आनंद मेळविला ॥११॥
अखंड कीर्तन करिती गुर्वाज्ञेने । जोडिला साधने देव पै गा ॥१२॥
द्रव्या लाथाडिले सद्‌गुरू डोलविले । धन्य धन्य भले गुरुभक्त ॥१३॥
राम धन्य झाला करिता गुणगान । करिता स्मरण देवाजीचे ॥१४॥

७६८

थोर चिन्मय संप्रदायी । भक्त संत झाले पाही ॥ध्रु॥
पहिले ते रेवणसिद्ध । शंभूस्वरूपी अगाध ॥१॥
दुसरे जाणा मरूळसिद्ध । जेथे पहाता ब्रह्मानंद ॥२॥
तिसरे धन्य काडसिद्ध । ज्ञानस्वरूपी प्रसिद्ध ॥३॥
चवथे सद्‌गुरू नारायण । जे का स्वये नारायण ॥४॥
पाचव्या त्या लक्ष्मीबाई । देव प्रगटविला देही ॥५॥
सहावे ते साधराज । भेटला ज्या रामराज ॥६॥

सातवे ते रामराय । नामी रंगले जें पाहे ॥७॥
आठवे ते उमदीकर । झाले सद्‌गुरूरूपाकार ॥८॥
नववें जाणा हनुमंत । धन्य गुरुभक्त संत ॥९॥
कीर्तनी जे रंगुनी गेले । साधनी जे तन्मय झाले ॥१०॥
विरळा विरळा ऐसा संत । ज्यांचा झाला भगवंत ॥११॥
दहावे जाणा अंबूराम । अंतरी ज्या भक्तिप्रेम ॥१२॥
अकरावे ते मुजुमदार । साधन केले जै अपार ॥१३॥
बारावे ते नागाप्पाण्णा । तोषविला सद्‌गुरुराणा ॥१४॥
तेरावे ते नारायण । सदा स्मरती रघुनंदन ॥१५॥
चौदावे ते गोपालराय । साधनी जे रमले पाहे ॥१६॥
पधंरावे ते रघुनाथ । धन्य धन्य गुरुभक्त ॥१७॥
सर्व संकटे सोसुनी । तोषविला सद्‌गुरुधणी ॥१८॥
धन्य सोळावे गोविंद । भोगिला जै स्वरुपानंद ॥१९॥
कीर्तनी जे रंगुनी गेले । धन्य सद्‌गुरुभक्त भले ॥२०॥
ऐसे गुरुभक्त संत । देव जहाला अंकित ॥२१॥
रामस्वरूपो धन्य संत । तया राम शरणागत ॥२२॥

७६९

नागाप्पाण्णा गुरुभक्त । रामनामी जडले चित्त ॥१॥
ज्यांचे आजे नारायण । प्राप्त पूर्व पुण्ये जाण ॥२॥
जगदोद्धारासाठी । संत अवतरले हो सृष्टी ॥३॥
दासे वंदिले चरण । किती गाऊ महिमान ॥४॥

७७०

कीर्तन करिती महाराज । नारायण श्रीगुरुराज ॥१॥
गणपतराव करिती साथ । ठेका धरोनी यथार्थ ॥२॥
नाद घोषे रंग भरे । हरिनामाचे गजरे ॥३॥
नागाप्पाण्णा महाराज । प्रेमे डोलती दिसे मौज ॥४॥
माईसाहेब गुरुमाऊली । पुत्रावरी संतोषली ॥५॥
चिमडपीठाचा अधिप । कैसा शोभे कुलदीप ॥६॥
रामचंद्रप्रभूंची कृपा । साक्षात्कार झाला सोपा ॥७॥
दाविला सोपान । उघड करूनी ठेले ज्ञान ॥८॥

साधुमहाराजांचा कळस । पुरवी अर्भकाची आस ॥९॥
वामनभटजी करिती आरती । प्रेमे खिरापती देती ॥१०॥
बाळ राम हनुमंतांचा । रघुनाथ गोविंदांचा ॥११॥
दासरामा आज्ञा बरी । झाली कीर्तन तू करी ॥१२॥

## ७७१

हनुमंत समर्थ रघुनाथ सद्‌गुरु । ते बाप माहेरू गोविंदराय ॥१॥
हनुमंते दिधले स्वरूप जीवन । वोळले भगवान भक्तावरी ॥२॥
रघुनाथे दिधली साधनसंपत्ती । काय वर्णू महती सद्‌गुरूंची ॥३॥
गोविंदराये प्रेमे आपुले पुत्रासी । दिले आनंदासी कीर्तनाच्या ॥४॥
संतांनी दिधले प्रसादाचे कण । सेवुनिया अन्न तृप्ती झाली ॥५॥
ऐसे तिघेजण पाठीशी असता । कासयासी चिंता करणे लागे ॥६॥
बहुता जन्माची पुण्याई फळली । दासरामा पावली सुखस्थिती ॥७॥

## ७७२

कीर्तन करिती गुरु हनुमंत । डोले राम प्रभु समर्थ ॥१॥
रेवणसिद्ध उभे आपण । हास्यमुखे भगवान ॥२॥
तेज दाटोनिया गेले । भक्त तन्मय जहाले ॥३॥
सुवास दरवळे । होती कीर्तन सोहळे ॥४॥
शिवस्वरूप नाचे पुढे । ब्रह्मादिक होती वेड ॥५॥
रंग भरला अपूर्व । शेषा न कळे नवलाव ॥६॥
पुंडुकाका झांज धरी । जनार्दन सूर करी ॥७॥
नाना करिती साथ भारी । अप्पा बसती तबल्यावरी ॥८॥
अंतोबा ते ताल धरी । बसती दीक्षित पेटीवरी ॥९॥
गोपाळनाथ गायन गाती । पद अंताजी म्हणती ॥१०॥
नाम साधन कीर्तन गोडी । बापूराव चाखिती आवडी ॥११॥
हनुमंत सद्‌गुरुकृपा । साक्षात्कार झाला सोपा ॥१२॥
वामनरावजी स्तुती करिती । सर्व होती मूढमती ॥१३॥
प्रभू दासाचा पायीक । ठेलो होवोनी निःशंक ॥१४॥
दासराम द्वारी उभा । पाहे चैतन्याची शोभा ॥१५॥

७७३

कीर्तन करिती रघुनाथ । पाटणकर करिती साथ ॥१॥
दाणेकरी वाजवी झांज । कीर्तनाची झाली मौज ॥२॥
वामनभटजी तबल्यावरी । बाळ राम पेटीवरी ॥३॥
जनार्दन सूर धरी । जोग बोलती अभंग भारी ॥४॥
गुरुपुत्रांचे कीर्तन । काय वर्णावे महिमान ॥५॥
डोलती समर्थ । सद्गुरुराज हनुमंत ॥६॥
कैसा होय साक्षात्कार । रंग दाटतो अपार ॥७॥
नागाप्पाण्णा महाराज । प्रेमे रंगती सहज ॥८॥
गणपतराव लाविती बुक्का । हरिनाम येई मुखा ॥९॥
संतांचा हा दास । नाही राहिला उदास ॥१०॥
प्रेमे करिती आरती । भक्ति वाटती खिरापती ॥११॥
नानासाहेब चाखिती गोडी । दासरामासी आवडी ॥१२॥

७७४

धन्य हनुमंत सद्गुरु । कृपावंत परमेश्वरू ॥१॥
त्यानी केली स्वयें कृपा । पेटविले ज्ञानदीपा ॥२॥
रेड्यामुखे वेदोच्चारू । जैसा केला ज्ञानेश्वरू ॥३॥
तैसे बोलविले सहज । दासरामी नाम गूज ॥४॥

७७५

साधुराज माऊली ग माय माझी । साधुराज माऊली ॥ध्रु॥
जगदोद्धारास्तव अवतरली । चिमडमठी राहिली ॥१॥
आजानुबाहू भव्य अशी जी । गुरुमूर्ती शोभली ॥२॥
किती कनवाळू मवाळू गोजिरी । दासरामी पावली ॥३॥

७७६

हनुमंत गुरु कीर्तन करिता झाले श्रीरंग ।
रामनाम हे मुखी गर्जना होऊनी गेले दंग ॥ध्रु॥
अवघा बोले चाले देव ऐशी स्थिती झाली ।
प्रेमरंगे संतमंडळी डोलू लागली ॥१॥
ज्याचा महिमा गावयाचा तोची उभा ठेला ।
प्रगट होऊनी अंतरामध्ये दासरामी रमला ॥२॥

## ७७७

उभा साधुराज आम्हा तारण्या भवातुनी ॥ध्रु॥
आजानुबाहू भव्य मूर्ती । ब्रह्मचारी गाजे कीर्ती ।
अंगी शांती बहू विरक्ती । पूर्ण ब्रह्म जाणी ॥१॥
होऊनिया दीनवाणी । लागती तयांचे चरणी ।
पहावया रुप त्याचे । जाता चिमड स्थानी ॥२॥
कैक वर्षे ठेला उभा । तो हा चैतन्याचा गाभा ।
व्यापुनिया राहिला नभा । झाला चक्रपाणी ॥३॥
सिद्धसनकादिक येती । दर्शन घेवोनी जाती ।
द्वारी हरिभक्त रहाती । द्वारपाल होऊनी ॥४॥
पंचमीची वारी करी । त्याच्या पुण्या नाही थोरी ।
होय आत्मसाक्षात्कारी । मुक्त होय बंधनी ॥५॥
नित्य नियमे भजन करी । रंगे कीर्तनाचे गजरी ।
सत्य साधना आचरी । परधन स्त्री त्यागुनी ॥६॥
धन्य रघुनाथप्रिय । साधुराज देवराय ।
करूनी हृदय देवालय । स्थापी दासराम जाणी ॥७॥

## ७७८

यांत्रिक युगी जे अति दांडाईत संत जगी झाले ।
हनुमंत महाराष्ट्री जाणा झळकुनिया गेले ॥१॥
अति विरागी दयावंत जे भक्तिरसे भरले ।
अखंड कीर्तनी रंगुनी देवा अंतरी डोलविले ॥२॥
शिष्टाईने द्रव्य मिळवुनी प्रपंचासी केले ।
प्रपंच साधुनी निरासक्तीने परमार्थी झटले ॥३॥
तन मन धन हे ज्यानी पहाता ब्रह्मार्पण केले ।
गुरुभक्तीनें देह झिजवुनी श्रेष्ठ जगी झाले ॥४॥
निंदा आणि स्तुती मनी न आणुनी स्वहितकर्म केले ।
स्वहितालागी जागृत असता परहित साधियले ॥५॥
जगतावरी करूनी उपकारा स्वतत्त्वा लुटिले ।
सामाजिक हित साधुनी नीतिपंथा दावियले ॥६॥
गाऊनी वाढवुनी गुरुमहिमा रामरूप झाले ।
सत्कीर्ती ही जगती राखुनी अजरामर झाले ॥७॥

हरिगुणगाने ग्राम सांगली पावन ते केले ।
सत्पथ दावुनी जगतालागी सुविचारे भरले ॥८॥
दासराम हा शरणची येता कृपाछत्र धरिले ।
धन्य धन्य श्रीसद्गुरु माझे कृष्णातीरी ठेले ॥९॥

७७९

निळोबाचा अवतार । जया म्हणे रामचंद्र ॥१॥
खुळाची हा माझ्यासरिसा । म्हणे गुंडुबुवा पिसा ॥२॥
बापूराव केळकर । महाभक्त ऐसे थोर ॥३॥
हनुमंते कृपा केली । म्हणोनी हे मात झाली ॥४॥
दासराम तेथ लीन । संता वाटे आपुलेंपण ॥५॥

७८०

धन्य धन्य रघुनाथ । गुरूपुत्र जे विख्यात ॥१॥
सर्व श्रेष्ठ भाग्यवंत । पिता लाधले हनुमंत ॥२॥
गुरुभक्तीने श्रीमंत । मोक्षश्रीया अलंकृत ॥३॥
दासराम पायी लोळे । द्वारी नाचे कीर्तनवेळे ॥४॥

७८१

साधुराज माऊली करी पूर्ण तान्हुली । करोनिया पूर्ण कृपा विसाव्यासी साऊली ॥१॥
संतसभारंगी करितो कीर्तनाची चाकरी । बालकासी मान संती देई गुरु श्रीहरी । २॥
दासराम लीन तेथे गाई मुखे विठ्ठली । समाधानवृत्ती सुखे परिपूर्ण धाली ॥३॥

७८२

धन्य रघुनाथ । गुरुपुत्र आणि भक्त ॥१॥
पहाता भाग्यवंत । पिता जया हनुमंत ॥२॥
दासराम पायी लोळे । द्वारी नाचे कीर्तन मेळे ॥३॥

७८३

रेवणसिद्ध माऊली ग माय माझी रेवणसिद्ध माऊली ॥ध्रु॥
नवकोटी सिद्धांच्या वचनी । सोमेश्वरी प्रगटली ॥१॥
बल्लारीपासुनी उज्जयिनी । मरुळस्वरुप पाविली ॥२॥
काडसिद्धनामे सिद्धगिरी । माई मर्दुनी आली ॥३॥
अनेक सिद्धासह रेणागिरी । विश्रांती घेतली ॥४॥
सावित्रीच्या दुग्धप्राशना । घोसरवाडी पातली ॥५॥
जयरामा केशवी माणिकप्रभू । हनुमंता बोळली ॥६॥
नारायणी गोविंदा साऊली । गोविंदी संचली ॥७॥
भक्तजनांचे हेतु पुरविण्या । सप्रेमे धावली ॥८॥
दासराम हृदयी ही स्मरणी । सहज कशी / नाम जपत राहिली ॥९॥

७८४

रेवणसिद्ध माऊली ग माय माझी रेवणसिद्ध माऊली ॥ध्रु॥
नव कोटी सिद्धांच्या वचनी । सोमेश्वरी प्रगटली ॥१॥
बल्लारीपासुनी उज्जयिनी । महळस्वरूप पावली ॥२॥
काडसिद्धनामे सिद्धगिरी । माई मर्दुनी आली ॥३॥
चमसनारायण अंशरूपानें । रेवातिरी विलसली ॥४॥
अनेक सिद्धासह रेणागिरी । विश्रांति घेतली ॥५॥
एकोराम पंडीतजी विश्वा । मुप्पीनमुनी निर्मिली ॥६॥
गुरुलिंगजंगम रूप धरोनी । करी कृपा साऊली ॥७॥
सावित्रीच्या दुग्धप्राशना । घोसरवाडी पातली ॥८॥
रेवणसिद्धनाथे हालसिद्धे । मरुळा दिक्षा दिली ॥९॥
रामदास श्रीसमर्थप्रभूची । आरती स्वीकारली ॥१०॥
ज्योतिबाचे संग्रामाला । कैसी धाविन्नली ॥११॥
नाना अवतारीही एकचि । वाट जगा पटविली ॥१२॥
संत सज्जनी चिंतन करूनी । संगतीही साधिली ॥१३॥
जयरामा श्रीसद्गुरुघरची । वाट जिने दाविली ॥१४॥
केशवस्वामी प्रेमे । सुमने स्तविती । संतोषे साजली ॥१५॥
मीरासाहेब गिरी थाटे येता । दगडासह धावली ॥१६॥
माणिकप्रभूते रेणागिरिवरी । कडकडुनी भेटली ॥१७॥
सिद्धारूढ मुखी मंत्रमूर्तीने । अखंडित उमटली ॥१८॥

हनुमत्प्रभूचे कीर्तनरंगी । आपणही रंगली ॥१९॥
रामपाठपूर्तीस्तव स्फूर्ती । श्रीगोविंदा दिली ॥२०॥
नारायण पांडुरंग प्रार्थी । गोविंदी संचली ॥२१॥
भक्तजनांच्या हाकेसरशी । सप्रेमे धावली ॥२२॥
पंचमहासिद्धांची अग्रणी । नाथपंथी मिरविली ॥२३॥
दासराम हृदयी ही स्मरणी । नाम जपत राहिली ॥२४॥

७८५

रेवणसिद्ध माऊली ग माय माझी रेवणसिद्ध माऊली ॥ध्रु॥
नवकोटी सिद्धांच्या वचनी । सोमेश्वरी प्रगटली ॥१॥
बल्लारीपासुनी उज्जयिनी । मरूळस्वरूप पावली ॥२॥
काडसिद्धनामे सिद्धगिरी । माई मर्दुनी आली ॥३॥
चमसनारायण अंशरूपाने । रेवातीरी विलसली ॥४॥
ज्योतिबासह संग्रामासी । कैसी धाविन्नली ॥५॥
ऐकोराम पंडितजी विश्वा । मुप्पीनमुनि निर्मिली ॥६॥
अनेक सिद्धासह रेणागिरी । विश्रांती घेतली ॥७॥
गुरुलिंगजंगम रूप धरोनी । करी कृपासाऊली ॥८॥
सावित्रीच्या दुग्धप्राशना । घोसरवाडी पातली ॥९॥
रेवणसिद्धनाथ नि हालसिद्ध ही । मरूळावरी वोळली ॥१०॥
नाना अवतारीही एकचि । वाट जगा पटविली ॥११॥
संत सज्जनी चिंतन करूनी । संगतीहि साधिली ॥१२॥
रामदास श्रीसमर्थप्रभूची । आरती स्वीकारली ॥१३॥
स्वरूपसंप्रदायाची छाया । दासबोधी पसरली ॥१४॥
तुकोपानिषदी नाथपंथीही । छटा कशी विखुरली ॥१५॥
जयरामा श्रीसद्‌गुरुघरची । वाट जिने दाविली ॥१६॥
केशवस्वामी सुमने स्तविता । संतोषे साजली ॥१७॥
मीरासाहेब गिरी थाटे येता । शिळे बसुनी धावली ॥१८॥
माणिकप्रभूते रेणागिरीवरी । कडकडुनी भेटली ॥१९॥
सिद्धारुढ मुखी मंत्रमूर्तीने । अखंडित उमटली ॥२०॥
हनुमत्प्रभूचे कीर्तनरंगी । आपण स्वये रंगली ॥२१॥
रामपाठपूर्तीस्तव स्फूर्ती । श्रीगोविंदा दिली ॥२२॥
नारायण पांडुरंग प्रार्थी । गोविंदी संचली ॥२३॥
भक्तजनांच्या हाकेसरशी । सप्रेमे धावली ॥२४॥

पंचमहासिद्धांची अग्रणी । नाथपंथी मिरवली ॥२५॥
दासराम हृदयी ही स्मरणी । नाम जपत राहिली ॥२६॥

७८६

हनुमंत माऊली ।
ग गाय माझी । गुरुनाथ माऊली ॥१॥
वकिली करूनि ही परमार्थी या आत्मसिद्धी साधली ॥२॥
रामचंद्रप्रभु गुरुआज्ञेने कीर्तन गुण गाऊली ॥३॥
हरिभक्तीचा कळस करोनी आत्मरूपी शोभली ॥४॥
गोविंदराया पूर्ण कृपेची करी सदा साऊली ॥५॥
माघ कृष्णी या तृतीय तिथीसी परंपरा ते विली ॥६॥
दासराम हा पायी विनटला तृप्त करी तान्हुली ॥७॥

७८७

शुद्धं ब्रह्म परं । वंदे श्रीसीतारामं ॥ध्रु॥
श्रीरामेश्वर आद्य सद्गुरु रेवणसिद्धचरणं ॥१॥
मरूळप्रभु श्रीकाडसिद्ध गुरू नारायणचरणं ॥२॥
रघुनाथप्रिय रामचंद्र गुरू हनुमंत चरणं ॥३॥
कीर्तनकाळी नमी दास हा नारायण चरणं, रघुनाथचरणं ॥४॥

७८८

शुद्धं ब्रह्म परं । वंदे श्रीसीतारामं ॥१॥
श्रीरामेश्वर आद्य सद्गुरू रेवणसिद्ध चरणी ॥२॥
मरूळप्रभु श्रीकाडसिद्ध गुरूमहाराज चरणी ॥३॥
श्रीनारायण गुरुलिंगजंगम लक्ष्मीआक्का चरणी ॥४॥
रघुनाथप्रिय गुरुवर सद्गुरू रामचंद्र चरणी ॥५॥
धन्य सद्गुरू हनुमंत श्रीनारायण चरणी ॥६॥
कीर्तनकाळी नमी दास हा रघुनाथ चरणी (श्रीसद्गुरुचरणी) ॥७॥

# प्रासंगिक : १६

## ७८९

हृदयस्थ नारायणे । दिली गुहेमाजी वचनें ॥१॥
काय अभंगी प्रसाद । केला कानड्याने बोध ॥२॥
काय जाणोनी मराठी । कानडेची ठेवू ओठी ॥३॥
अवघाची महाराजा । दासरामी कोण दुजा ॥४॥

## ७९०

ह्याची आपुला प्रसादमेवा । द्या जी जन्मोजन्मी बरवा ॥१॥
हेची द्यावे सिद्धानंदा । समाधान वाढो सदा ॥२॥
हेची राहो माझे कंठी । नित्य नेमें नाचो ओठी ॥३॥
दासरामा सेवा घडो । द्वार मोक्षाचे उघडो ॥४॥

## ७९१

धन्य सद्‌गुरू हनुमंत । तेणे केली नवल मात ॥१॥
वद्य तृतीया फाल्गुनीची । चाखविली भजन रुची ॥२॥
शक अठराशे पासष्ठ (१८६५) । शनवारी या चोखट ॥३॥
सिद्धानंद भजनसेवा । जीवा दिधली सदैवा ॥४॥
दासरामा हेची घडो । दार मोक्षाचे उघडो ॥५॥

## ७९२

नागाप्पांचे वचनापरी । येवोनिया माझे घरी ॥१॥
आपुला हा प्रसादमेवा । दिला आम्हा जी बरवा ॥२॥
तोचि राहो माझें कंठी । नित्य नेमे नाचो ओठी ॥३॥
हींच सेवा जन्मोजन्मी । दासरामी देई स्वामी ॥४॥

## ७९३

हनुमंते कृपा केली । नवलाई ते दाविली ॥१॥
गुहेमाजी नारायणे । दिली अंतरीची वचने ॥२॥
नागाप्पाण्णांचिया बोला । चरणाचा दास केला ॥३॥
हीच सेवा दासरामी । जन्मोजन्मी घ्यावी स्वामी ॥४॥

## ७९४

कानडी अभंग योगियांचा प्रसाद । देताहे आनंद नारायण ॥१॥
नारायणराव सिद्ध ते समर्थ । पुरविती आर्त जीवीचे या ॥२॥
अभंग उमटला माझिये श्रवणी । दर्शन देवोनी पुनीत केले ॥३॥
कानडीचा नसता मजसी संस्कार । अंतरी विचार दाखविला ॥४॥
पौष शुद्ध नवमी सुवर्णाचा दिन । कानडा भरून राहिलासे ॥५॥
ईश्वर कानडा भक्तही कानडा । किंकर कानडा दासराम ॥६॥

## ७९५

जाऊ दिवाळीला गुरुघरी जाऊ दिवाळीला ॥ध्रु॥
दीपावलीचा सण हा मोठा । लुटू या मौजेला ॥१॥
गुरुमायेला आलिंगुनिया । करू या भजनाला ॥२॥
गुरुपुत्रांचा / गुरुभक्तांचा मेळा बहुतची । साधनी या रमला ॥३॥
साधुराज हा चिमडच्या मठी । करी वास्तव्याला ॥४॥
रथोत्सवाचा समारंभ हा । पुनीत करी सकळा ॥५॥
दासराम हा रथरजरेणु । लेई निजभाळा ॥६॥

## ७९६

सिद्धानंद बोधवचन । हेची आमुचे समाधान ॥१॥
दिधला जो भजनमेवा । तेची सदा घडो सेवा ॥२॥
काही न लगे आणिक । दासराम हा पायीक ॥३॥

७९७

करु उत्सव आजी सुखाचा । हनुमंत संतराजांचा ॥ध्रु॥
कीर्तनादि हरिभजनाचा । अर्पूनिया तन मन वाचा ।
भजनाराधन हे साधू । सेवू गुरु शेष प्रसादू ।
रंगुनिया राहू आनंदू । थाट करू गुरुभक्तांचा ॥१॥
पाचाची वेळ बहु छान । बोलिले सद्गुरू आपण ।
नानबासवे येऊन । हास्यमुखे अवलोकून ।
ते केले सत्यची वचन । गोविंदा देऊन खूण ।
सांगतो करी कीर्तनगान । नेम दिला प्रभुसेवेचा ॥२॥
अठराशे पंचेचाळीसाचा । शक माघ वद्य तृतीयेचा ।
दिन पावन संस्मरणाचा । प्रगटकाळ मध्यरात्रीचा ।
दासराम गोविंदाचा । सुत लंपट हरिभक्तांचा ।
रंग लुटे आनंदाचा । बडिवार सर्व सद्गुरुचा ॥३॥

७९८

गुरुतृतीया ही गोड किती होय सुखाची ।
जरी गाई कुणी गुणकीर्ती तृप्ती मनाची ॥१॥
हनुमत्प्रभू महाराज मंदिरी उभा ।
नवलप्रभा दिपवी नभा प्रगटली आभा ।
शोभा ही काय वानू आज येथीची ॥२॥

७९९

पावन दिन आजी सुदिन उगवला मना रे ॥ध्रु॥
हनुमत् गुरु प्रगट काल । तृतीया दिन हा रे ॥१॥
भय वारूनी करील कृपा । दृढ धरी पदा रे ॥२॥
दासरामी मंगल हे । मंगलमय सारे ॥३॥

## ८००

देहभाव लया जाता । लळीत होय गुरूभक्ता ॥१॥
जेथे नुरे अहंकार । देव प्रगटे साकार ॥२॥
गुरुसेवा अखंडित । जेथे घडेल नेमस्त ॥३॥
नाम साधे श्वासोच्छवासी । घडी घडी अहर्निशी ॥४॥
दास म्हणे हे लळीत । बोलियेले साधुसंत ॥५॥



# ती. प. पू. मामांचेवरील अभंग : १७

८०१

धन्य धन्य माझे पिताजी गोविंद । दिलासे आनंद ज्ञानराजे ।।१।।
आळंदीसी गेल्या झाला साक्षात्कार । ओसरले नीर नयनामाजी ।।२।।
प्रसाद अपार मिळालासे तेथे । कवतूक जेथे केले देवे ।।३।।
समाधीवरील बुक्क्याचा प्रसाद । भाळी प्रेमानंद लावियेला ।।४।।
गणपतराव होते गेले बरोबरी । समाधान परी झाली त्यासी ।।५।।
ज्ञानेश्वर माये केले कवतूक । दासरामा सुख लाधले ते ।।६।।

८०२

धन्य धन्य माझे पिताजी गोविंद । दाविला आनंद तुकारामे ।।१।।
देहूत लाधला प्रसाद नारळ । भंडाऱ्यासी सोज्वळ साक्षात्कार ।।२।।
भूक बहु होती लागली पितया । इच्छा झाली तया भुईमुगाची ।।३।।
पुसिलें पुजाऱ्या शेंगदाण्याविषयी । परी काही नाही बोलिला तो ।।४।।
देवाचा प्रसाद दिल्या शेंगा त्याने । काय नारायणे केले पुढे ।।५।।
एका बाईलागी पुसिले जावोन । विचित्र म्हणोन प्रख्यात जी ।।६।।
कधी नाही तिने कोणा काही दिलें । परी पालटले अंतर तिचे ।।७।।
तिने दिल्या शेंगा काढोनी बहुत । पैसा नाही घेत म्हणाली ते ।।८।।
बहुत कृपण असे ती माळीण । झाले वर्तमान ऐशापरी ।।९।।
पुजाऱ्याने शेंगा दिल्या पितयाना । काय बोले खुणा त्यांचेसवे ।।१०।।
कधी कोणा ने दे माळीण ही काही । परी घडले पाही आश्चर्य हे ।।११।।
तुकाराम देवे इच्छा पूर्ण केली । तोषली माऊली कृपाळू ते ।।१२।।
पिताजींचे सवे होते गणपतराव । समाधान अपूर्व वाटले त्या ।।१३।।
तुकोबारायानी केले कवतूक । दासराम देख लीन झाला ।।१४।।

८०३

धन्य धन्य माझे पिताजी गोविंद । कीर्तनी आनंद लुटविला ।।१।।
हरिपूरक्षेत्री विठ्ठल मंदिरी । कीर्तन गजरी रंगभरला ।।२।।
विठ्ठलाची मूर्ती सावळी सुंदर । रूप मनोहर रुक्मिणीचे ।।३।।

दोनी मूर्तीलागी बहू कांती आली । तेजस देखिली भाविकानी ।।४।।
लखलखीत कांती सकळा दिसली । गोविंदराया झाली सत्य भेटी ।।५।।
सुवास दरवळे कीर्तनामाझारी । काय वर्णू थोरी कीर्तनाची ।।६।।
दासराम लीन पितयांचे चरणी । पाहे निशिदिनी समचरण ।।७।।

८०४

नामदेव मंदिरात । कीर्तनाचा थाट होत ।।१।।
तेथे गवळ्यांची पोरे । भाविकपण दिसे खरे ।।२।।
सर्व उठोनी नाचू लागली । मागुनी पळोनिया गेली ।।३।।
देवभक्ता पडली गाठी । गोविंदरायांची भक्ती मोठी ।।४।।
कीर्तनात रंग भरला । भाग्यवंतानी देखिला ।।५।।
फार थोड्यासी अनुभव । दासरामा कळला भाव ।।६।।

८०५

कागवाड क्षेत्री माझे पिताजी गोविंद ।
देखावया गेले उत्सवात ब्रह्मानंद ।।१।।
कीर्तनामाझारी बहू रंग भरला ।
संतराजा ब्रह्मचैतन्य प्रेमे तोषला ।।२।।
सर्वाघटी एकची एक भरला आनंद ।
कागवाडकराला कीर्तनाचा छंद ।।३।।
अभ्यंकर दाणेकरी श्रीराम गोडबोले ।
दासराम रंगामाजी नामी या मिळाले ।।४।।

८०६

आम्ही हरिनामाचे दास । करू घोष नामाचा ।।१।।
श्रवणी सेवू नामानंद । धरू छंद गोविंदू ।।२।।
हरिनाम नाचवू मुखी । होऊ सुखी कीर्तनी ।।३।।
पाडू नामाचा प्रकाश । नुरवू द्वैताचा आभास ।।४।।
डोळियात नाम ठेवू । डोळा लावू आत्मया ।।५।।
दासराम नामब्रह्मी । धाला संत समागमी ।।६।।

८०७

उभे कीर्तना गोविंद । तेथ आले रामानंद ॥१॥
परिमळ अवघा भरला । आनंद हा संता जाला ॥२॥
काय वानू ते कीर्तन । दासराम करी श्रवण ॥३॥

८०८

गुंडुबुवा जेथे नाचे । ऐसे कीर्तन गोविंदाचे ॥१॥
प्रेमे पावला श्रीरंग । भरला कीर्तनाचा रंग ॥२॥
समाधिमंदिरी । नवलपरी कृष्णातीरी ॥३॥
दासराम हा सेवक । सद्‌गुरुनाथ घाली भीक ॥४॥

८०९

उभे कीर्तना गोविंद । प्रगटला ब्रह्मानंद ॥१॥
तव येती गुंडूबुवा । हाकारिती वासुदेवा ॥२॥
तोची पातला श्रीरंग । कीर्तनाचा भरला रंग ॥३॥
दासराम शरण तेथें । कृपा केली सद्‌गुरुनाथे ॥४॥

८१०

कीर्तन करिती बापूराव । एकविध पूर्ण भाव ॥१॥
माईसाहेब सद्‌गुरुमाता । कवतुके येई स्वता ॥२॥
गुरुमाय करी प्रश्न । येथ आणिता काय भगवान ॥३॥
कीर्तनाचा ऐसा रंग । दासराम तेथे दंग ॥४॥

८११

करी गोविंद कीर्तना । तेथे आले नागाप्पाण्णा ॥१॥
धन्य धन्य संतराज । कीर्तनाची जाली मौज ॥२॥
गुरुमाय प्रेमे डोले । नवल भक्तीचिया मेळे ॥३॥
दासराम लीन झाला । तया प्रसाद लाधला ॥४॥

## ८१२

समाधिमंदिरीं । नाचे गोविंद कीर्तनगजरी ॥१॥
हनुमंतप्रभूचे पुढे । वानी नामाचे पवाडे ॥२॥
पुण्यतिथी ते पावन । पौष वद्य षष्ठी दिन ॥३॥
अठराशे पासष्टी या । नवल जाले कीर्तनी या ॥४॥
आले नारायण सद्‌गुरु । जे का करिती भवापारू ॥५॥
सेवा ते पाहोनी । समाधान सद्‌गुरुमनी ॥६॥
रंग पाही कीर्तनाचा । दासराम गोविंदाचा ॥७॥

## ८१३

आजवरी होता जिथे । आता वसती केली तेथे ॥१॥
काही काळ दिसत होता । असोनीही परी नव्हता ॥२॥
आता जरी दिसत नाही । भरूनी गेला सर्व ठायी ॥३॥
आपुलाची राम बाळ । तेथे असो द्या सबळ ॥४॥

## ८१४

मामा तुम्हालागी कोठें धुंडू आता । तुम्ही माझ्या चित्ता ठाव दिला ॥१॥
आजवरी होता आपुलिये घरी । आता या शरीरी वास केला ॥२॥
हनुमंत तुम्ही तुम्ही हनुमंत । न कळेची मात ऐसी झाली ॥३॥
आपुला लडिवाळ बालक हा राम । तयासी विश्राम आपुल्या पायी ॥४॥

## ८१५

आपुले कीर्तन आज का कालचे । चाले अनादीचे युगायुगी ॥१॥
आमुची तुमची आजीची का गाठी । असता ही गोठी काय केली ॥२॥
काही काल जया कीर्तनश्रवण । तेही भाग्यवान सरते पुरते ॥३॥
बाळ राम तुमचा तुमच्या पायासी । असे निश्चयेसी हेची मनी ॥४॥

## ८१६

बेचाळीस वर्षे केलेसे जतन । कृपादृष्टी पूर्ण पितृप्रेम ॥१॥
माझिये मनीचे हट्ट पुरविले । चालविले लळे सर्व काही ॥२॥
मनी काही आले नाही म्हणितले । ऐसे नाही झाले एकदाही ॥३॥

चुकलिया रागा नच ही शिवले । ऐसे प्रेम मिळे कोठे आता ॥४॥
मामांचे प्रेमाचे शब्द या जीवनी । भरले व्यापुनी राम म्हणे ॥५॥

८१७

लाभावीण प्रीती प्रेमाचिये जाती । पितृदेव होती ऐसे मामा ॥१॥
ऐकुनी कीर्तन सदा समाधानी । सेवाही करोनी दिली नाही ॥२॥
आतील तो राम बाहेरी हा राम । ऐसा मनोधर्म ज्यांचा असे ॥३॥
ऐसे प्रेम कोठे आतुडेल आता । बाल राम माथा ठेवी पायी ॥४॥

८१८

नाही गाठी धन नव्हेची विज्ञान । अंगी नाही गुण सुदृढता ॥१॥
परी प्रेम करिती मामा बाळावरी । जपती परोपरी फुलाऐसे ॥२॥
गावी कोठे गेलो व्याकुळची व्हावे । ऐसे हे स्वभावे घडो येई ॥३॥
एक अंतःकरण मामांचे पायासी । सुख ते चित्तासी मामांचिया ॥४॥
आई आणि मामा आम्हासी लाभले । पूर ते लोटले परमार्थाचे ॥५॥
हेची घडो पुढती मागणे मामाना । बाल राम चरणा लोळिंगला ॥६॥

८१९

नित्य कीर्तनाची साथ ते करावी । आवडी हे जीवी जन्मोजन्मी ॥१॥
मामाना तयाचे कवतुकची वाटे । प्रेम कंठ दाटे सद्गदित ॥२॥
हनुमंतकृपे करिता कीर्तन । मामा समाधान श्रवणी होती ॥३॥
बाळावरी लोटे प्रेमाश्रूंचा पूर । तयाचा विसर केवी होय ॥४॥
कोठले हे शब्द बोलतसे राम । आईस सप्रेम म्हणती मामा ॥५॥
ऐसे मामा कोठे दिसतील आता । बाल राम माथा वंदीतसे ॥६॥

८२०

तुमच्या पादुका ठेवुनी सिंहासनी । रहावे पूजनी ऐसे वाटे ॥१॥
तुमचे कीर्तनी अंबर भरावे । श्रवण घडावे तेची आम्हा ॥२॥
मामा जरी तुम्ही सांगितला हेत । करावे उचित तेची तुम्ही ॥३॥
तुमचे कीर्तन तुम्ही चालवावे । बाल राम भावे वंदीतसे ॥४॥

## ८२१

रामाच्या साहाय्याने करितो कीर्तन । ऐसे हे वचन तुमचे असे ॥१॥
ऐसे काय मोठेपण दिले बाळकासी । न घेता सेवेसी चुकोनीही ॥२॥
सेवाभाग्य असे काही ना लाभले । बाल राम लोळे पायावरी ॥३॥

## ८२२

नित्य नैमित्तिक कोणी कीर्तन करिती । अखंड ते चित्ती नाही कोठे ॥१॥
सांडोनी लौकिक देह धन मान । केले तुम्ही कीर्तन जन्मवरी ॥२॥
हनुमंतरायांचा शेवटला भक्त । ऐसी वृत्ती जेथ सहजेची ॥३॥
ऐसे तुम्ही मामा नसे दुजे कोणी । बाल राम वाणी काय बोले ॥४॥

## ८२३

तुमचे कीर्तन तुम्हीं चालवावे । ऐसे मनोभावे प्रार्थीतसे ॥१॥
चंद्र सूर्य अनल अनिल तुमचे । पौत्र, कीर्तनाचे प्रेम तया ॥२॥
तुमचे अंतरी इच्छा ही जोवरी । कीर्तन गजरी नाचतसे ॥३॥
तुमचे कीर्तन आमुचे जीवन । ओवाळू हे प्राण तुम्हावरी ॥४॥
मामा आम्हा तुमचा एक आशिर्वाद । वियोगाचा खेद झाला तरीं ॥५॥
चरित्रासी कोणी प्रेमभावे गाती । पुनीतचीं होती सत्य सत्य ॥६॥
बाल राम राही गुण आठवोनी । आता काय वाणी बोलवेना ॥७॥

## ८२४

पुत्रापरी प्रेम असे पौत्रावरी । ऐसी चराचरी ख्याती तुमची ॥१॥
इष्ट मित्र गणगोत शत्रू तेही । प्रेमस्थान पाही तुमचे असे ॥२॥
प्रेमरूप झाला म्हणोनी ईश्वर । केलासे साकार मामा तुम्ही ॥३॥
चंद्रशेखर हा फोडीतसे टाहो । आशिर्वाद राहो तुमचा तया ॥४॥
ऐसिया प्रेमाचा न पडो विसर । मागे निरंतर बाल राम ॥५॥

## ८२५

कोणत्या पंथाचे आहा तुम्ही मामा । आश्चर्यची आम्हा वाटतसे ॥१॥
आकृती जी आली आपुल्यासमोर । कोण गुरूवर काय नाम ॥२॥
देहे ठेविल्याची कोठे नाम रूप । ब्रह्म ते अजाण आकारिलें ॥३॥
तुकारामापरी झाली हे घटना । बालराम चरणापाशी ठेला ॥४॥

## ८२६

आपण वर्णिले नाम जे सप्रेम । तयाचा उगम कोठे झाला ॥१॥
तेची कृपास्थान तेची आज्ञास्थान । तेची उपासन अखंडित ॥२॥
अखंडित होय नामाचा विस्तार । संप्रदाय थोर तोची आम्हा ॥३॥
जेणे योगे घडे नामाचा विचारू । संप्रदाय गुरु एक जगी ॥४॥
आम्हासी न कळे या वाचोनी काही । बाल राम पायी तुमचे मामा ॥५॥

## ८२७

नाम जे सप्रेम तेची निरुपण । चैतन्य परम सर्वाघटी ॥१॥
नाम ते चैतन्य चैतन्य ते नाम । आम्हा निजधाम तेची एक ॥२॥
तेची गुरूस्थान साक्षात्कार पूर्ण । ब्रह्म सनातन अखिल विधी ॥३॥
नामदेव प्राप्ती नामाच्या साधने । मामा तुमची खूण बाळ रामी ॥४॥

## ८२८

मामा तुम्ही गेला परी वाटे भ्रम । आहाची परम ऐसे वाटे ॥१॥
जेथोनिया आला तेथेची निमाला । साक्षात्कार झाला सदोदित ॥२॥
आम्हा ऐसे वाटे तव सर्व घडे । नाही म्हणता उडे मन माझे ॥३॥
मामा म्हणू जाता कोणी न दिसेची । तव विरहाची जाणीव होई ॥४॥
मामा तुमची आता अपार हे शक्ती । तेणेची हे भक्ती बाल रामी ॥५॥

## ८२९

मामा मामा मामा मामा । आता काय म्हणू तुम्हा ॥१॥
तुमचे नाम देवाऐसे । मना लागलें हे पिसे ॥२॥
नाम तुमचे हे गाता । समाधान वाटे चित्ता ॥३॥
तुम्ही गेला हो येथोनी । आम्ही धरिले ते मनी ॥४॥
तुमचे नाम गोड आम्हा । कीर्तन हे बाल रामा ॥५॥

## ८३०

कबीरासारखी झाली ऐसी परी । न कळेची सरी तुमची मामा ॥१॥
अनुग्रह झाला जरी चिमडाचा । घोष कीर्तनाचा अखंडित ॥२॥
हनुमंत आज्ञे कीर्तनाचा घोष । कोणी आपणास सामावेना ॥३॥

चिमडाचे म्हणतीं हे तो सांगलींचे । सांगलींचे वाचे म्हणती चिमडीं ॥४॥
परीं तुम्हीं केला आपुलासा देव । प्रेम भक्तिभाव वाढविला ॥५॥
माईसाहेबानीं केलासे गौरव । सेवा हे अपूर्व म्हणोनिया ॥६॥
गुरूदेव रानडे हेहीं प्रशंसितीं । जाणते जाणतीं जाणत्यासी ॥७॥
निंबरगीनाथांचे नागाप्पा हे पौत्र । अधिकारपात्र म्हणती तुम्हा ॥८॥
आत्मया रामाने आपणा गौरविले । कवतूकची केले तुमचे मामा ॥९॥
मेघवृष्टीनेचीं केला उपदेश । बोधिले नामास अखंडचीं ॥१०॥
सुंदर मिलाफ साधोनी अंतरी । अद्वय कुसरीं दावियेले ॥११॥
सर्वत्र अद्वैत उरेल गोविंद । तुमचा हा साद तेची तुम्ही ॥१२॥
जाणोनिया मनीं पायी जे लागले । धन्य धन्य झाले नामबळे ॥१३॥
प्रेम हे नामाचे रूजविले जनी । बाल राम चरणी राहिलासे ॥१४॥

## ८३१

मामा तुम्हीं गेला हनुमंतापाशी । त्यानी चिमडासी पाठविले ॥१॥
परीं प्रेम त्यांचे ऐसे तुम्हावरीं । झाले साक्षात्कारीं प्रगटची ॥२॥
आपुल्या अंतरीचे देवुनीं वोळले । कवतुके केले कृपादान ॥३॥
प्रेमाची माऊलीं केलीसे साऊली । चराचरी झाली कीर्ती ऐसी ॥४॥
चिमडीं नारायण आश्चर्य करिती । ऐकोनिया स्थिती कीर्तनाची ॥५॥
हनुमंतरूपी मिळोनिया ठेला । आसरा तो झाला बाल रामा ॥६॥

## ८३२

एकदा माझियें स्वप्नीं मामा आले । बहु परी झाले बोलणे त्यांचे ॥१॥
अण्णानी चरित्र लिहिले हे कथिले । तव ते म्हणाले ऐकिले की ॥२॥
नरहरीचे तसे आहेच म्हणोनी । रंगले कीर्तनी हनुमंतसेवे ॥३॥
बाल रामा नाही वाटले ते स्वप्न । मागुते कळोन आले त्यासी ॥४॥

## ८३३

चुकलिया माता जैसे होय बाळा । तैसे झाले डोळा मामा माझ्या ॥१॥
जे जे पहावे दिसताती मामा । तेथे वाटे प्रेमा मामा तुमचा ॥२॥
मामा तुम्ही आता सर्व ठायी भरला । पायी विनटला बाल राम ॥३॥

८३४

दिवस हे गेले कैसे ते न कळे । छत्र हे ते भले मामा तुमचे ॥१॥
एकेक दिवस मोजीत षणमास । काढिले प्रयासे मामा आता ॥२॥
मार्ग तो राहिला किती आयुष्याचा । परी तो लांबीचा वाटे मज ॥३॥
तुम्ही हनुमंत माझिये अंतरी । स्मरण हे तरी असो द्यावे ॥४॥
तुमचे स्मरण ते माझे जीवन । माझे विस्मरण तुम्हा नव्हे ॥५॥
हेची एक माझे आता समाधान । बाल रामी खूण आली हेची ॥६॥

८३५

तुमची आमुची तुटी शरीराची । परी जीवनाची भेटी आहे ॥१॥
अखंडित भेटी आहे मजलागी । म्हणोनी वियोगी योग झाला ॥२॥
ऐसा योग तरी असो अखंडित । मनेची प्रार्थीत बाल राम ॥३॥

८३६

तुमचे चिंतन हे आम्हा । आमुची चिंता मामा तुम्हा ॥१॥
आम्ही असोची निश्चिंत । नाम ठेवू अंतरात ॥२॥
ज्यांची आपुल्या ठायी भक्ती । ते ते माते करिती प्रीती ॥३॥
चाले तुमची सत्ता । बाल राम वंदी माथा ॥४॥

८३७

तुमचे प्रेमी जन । सर्व आपुल्या समान ॥१॥
धन्य धन्य ते भाग्याचे । थोर थोर ते मनाचे ॥२॥
बाल रामी समाधान । परमार्थी ऐसी खूण ॥३॥

८३८

त्रयोदशाक्षरी छंद हा जयासी । थोर पुण्यराशी गोविंदराय ॥१॥
ब्रह्मचैतन्य ते पाठीवरी हात । ममतेने फिरवीत गोविंदाचे ॥२॥
गोविंद चैतन्य श्रीब्रह्मचैतन्यी । झाले बालपणी समरस ॥३॥
जयालागी झाले ज्ञानेशदर्शन । दिला परिपूर्ण आशिर्वाद ॥४॥
हनुमंतरायांचे चरणी लागले । त्यानी दाखविले नारायण ॥५॥
नारायणे केला सत्य अनुग्रह । गोविंदाचा भाव हनुमंतपदी ॥६॥

अंतःकरणाची झाली ओळखण । दिलेसे दर्शन हनुमंते ॥७॥
प्रगट होवोनी सेवा सांगितली । आज्ञा ते दिधली कीर्तनाची ॥८॥
अखंडित सेवा घेतली जयानी । कृपेचीं करणी तैसी निष्ठा ॥९॥
त्रयोदश नामावळी अखंडित । वदनी यथार्थ तेची सदा ॥१०॥
कीर्तनी प्रबोध होय भाविकासी । नामेची पावसी गुरूकृपा ॥११॥
नामी गुरुशिष्य नामीं देवभक्त । नामची उचित सांप्रदाय ॥१२॥
तुझे हातोनिया नामाचा प्रसार । होईल उमदीकर बोलियेले ॥१३॥
नामाचे त्यापरी दाविती महत्व । नामेची गुरूत्व गाठी पडे ॥१४॥
नामाचे अभ्यासी सद्‌गुरूची गाठी । दावीयले दृष्टी वर्म ऐसे ॥१५॥
अट्टाहासे अंतर्बाह्यही साधीत । बाल राम नमीत सर्वकाळ ॥१६॥

## ८३९

नामची जीवन ज्यास । ऐशा नमितो पितृपदास ॥ध्रु॥
अधिव्याधीना तडक तोडुनी । अंतरी धरी नामास ॥१॥
नाममयची जे होवुनी ठेले । दुजे नयेची मनास ॥२॥
नामाच्या संकीर्तनी सांगतीं । नामाचा हव्यास ॥३॥
बाल राम हा नामकीर्तनी । अखंड पाही तयास ॥४॥

## ८४०

धन्य कीर्तनानंद । जय जय धन्य कीर्तनानंद ॥ध्रु॥
अखंड कीर्तन नेम जयांचा । कीर्तनी ज्यासी आनंद ॥१॥
तुकाराम जणू भूवरी आले । वाटती हे गोविंद ॥२॥
श्वासोच्छवासी नामोच्चारणी । प्रयाण करी स्वच्छंद ॥३॥
बाल राम पदी आमोद सेवीं । वदनी वसवीं गोविंद ॥४॥

## ८४१

गोविंदाचे रूप आकारासी आले । नाम हे ठेविले गोविंदची ॥१॥
गोविंदाची सेवा गोविंदाने केली । काया ते जहाली गोविंदची ॥२॥
गोविंदाचे गुरू गोविंद जहाले । आशिर्वाद झाले गोविंदची ॥३॥
गोविंदा नामाचे अखंड कीर्तन । आम्हासी प्रमाण गोविंदची ॥४॥
गोविंद गोविंदस्वरूपी मिळाले । शद्व ते राहिले गोविंदची ॥५॥
गोविंद नामाचा ठरला गजर । झाला तदाकार दासराम ॥६॥

## ८४२

हनुमंतपादुका ठेवूनी देव्हाऱ्यात । कीर्तन करीत मामा पुढे ॥१॥
आम्ही त्या पादुका घेवोनी मस्तकी । नित्य गाऊ मुखी हरिनाम ॥२॥
सेवा ही सादर असो आपुले पायी । कोणी म्हणो काही आवडे ते ॥३॥
आपुल्या नामाची आम्हासी आसक्ती । तेची आम्हागती पुरे देवा ॥४॥
सकळही तीर्थे आपुल्या पायासी । आणिका देवासी जाणे नाही ॥५॥
आम्हासी तो चाड आपुल्या नामाची । आशा हे मनीची पुरवावी ॥६॥
बाळ राम ठेवी पायीच मस्तक । घालती त्या भीक सद्गुरुनाथ ॥७॥

## ८४३

आपुले घर केले घर केले । घरीच अखंड ठेले ॥ध्रु॥
घरीच केली सेवा । घरी आणिले देवदेवा ॥१॥
घरीच आले गुरू । देती सेवेचा अधिकारू ॥२॥
ऐकती गुरु कीर्तन । मामा विसरती देहभान ॥३॥
अखंड कीर्तन करूनी । ज्योती झाल्या एकची दोनी ॥४॥
हरिनामाचा गजर । अनेक जीवांचा उद्धार ॥५॥
असंख्य जीव घर करिती । त्यांची न दिसे कोठे स्मृती ॥६॥
बाल राम पदी ठेला । नामपंथ तो सुलभची सकळा ॥७॥

## ८४४

सिंहासनावरी फिरवीता हात । मामा बसले येथ ऐसे वाटे ॥१॥
सिंहासना जरी होय काही स्पर्श । पातकांचा नाश तेच क्षणी ॥२॥
सूर्यवंशीयाने केले सिंहासन । तेथे विराजमान झाला तुम्ही ॥३॥
जिवाजीपंतांनी चित्र रेखाटिले । निर्गुण आणिले साकारासी ॥४॥
नरामध्ये हरी प्रगट नरहरी । चरित्र कुसरी कथिले तेणे ॥५॥
जाहलो सद्गद फुटेनाची शब्द । हे का तुम्हा विशद नाही मामा ॥६॥
नामसंकीर्तने धरिता पै धीर । होय आविष्कार बाल रामी ॥७॥

## ८४५

निर्माल्य घेईन तुझा । तो गंध तृप्ती देई ।
तव पायी वास माझा । आमोद सेवीत राही ॥१॥

तुझे लाहीन उच्छिष्ट । तेणे माझें भरे पोट ।
तव पाद तीर्थ मजला । बहू वाटते अवीट ॥२॥
तुझा नित्य जयजयकार । तोची माझा साक्षात्कार ।
त्रयोदश नाम वाचे । तोचीं कीर्तनगजर ॥३॥
कर्म उपासना ज्ञान । एक तुझेची चरण ।
तेची तीर्थ व्रत माझे । सत्य नित्य अनुष्ठान ॥४॥
गोविंद मायबापा । गुरुस्वरूप ब्रह्मरूपा ।
बाल राम कर्णी बोध । हरिकीर्तन ज्ञानदीपा ॥५॥

८४६

कृष्णातीरी ही सांगली । नामे जहाली चांगली ॥१॥
समर्थ आनंदमूर्ति चरण । स्पर्शे झाले तपोवन ॥२॥
अखंड कीर्तनी आनंद । सेविती हनुमंत गोविंद ॥३॥
जमला संतांचा मेळा । अध्यात्मासी रंग भरला ॥४॥

८४७

नमो मातृदेवा नमो पितृदेवा । इंदिरामाय गोविंद देवा ॥ध्रु॥
सतत कीर्तन स्वरूप थोर झाला तुम्ही । जन्मजन्मांतरीचाची ठेवा ।
श्रवणसंपुटी हरिनाम हे घुमवुनी । सुखविले अंतरी बहुत जीवा ॥१॥
हनुमंता प्रिय तुम्ही प्रिय हनुमंत तुम्हा । दासरामा जीवीचा विसावा ।
जे कुळी लाभली रामभक्ती भली । रामेश्वर प्रभु कृपा नाममेवा ॥२॥

८४८

हनुमंत माऊली गोविंदासी पावली ।
घरी येवोनिया स्वये अखंडित राहिली ॥१॥
करूनी कृपा साऊली सेवा नित्य घेतली ।
जयाचिये सत्ता नामी ओघवती चालिली ॥२॥
दासराम मस्तक ठेवी कर जोडुनी पाऊली ।
प्रेमे हाक देता भक्ता अंतरंगी धावली ॥३॥

८४९

नाही घेतले गुरूत्व । नाही वाढविले महत्व ॥१॥
नाही केला मठ । नाही स्थापिले की पीठ ॥२॥
आपण होवोनी लहान । सकळांचा केला मान ॥३॥
ज्याचा जो जो गुण । त्यासी दिले प्रोत्साहन ॥४॥
जन्मवरी कीर्तनसेवा । केली आवडते देवा ॥५॥
नाही पंथाचा अभिमान । सर्व पंथी आदर पूर्ण ॥६॥
अद्वैत जीवन । केले सेवेचे वतन ॥७॥
नाही दिला अनुग्रह । केला जपाचा आग्रह ॥८॥
ज्याला जे जे प्रिय । नाम घ्यावे हेची सोय ॥९॥
माईसाहेबांची अनुज्ञा । म्हणती देवनाम घ्याना ॥१०॥
आवडे ते नाम घ्यावे । ऐसे सांगती स्वभावे ॥११॥
कोणी मानीती गुरूस्थानी । त्याते देव मानिती मनी ॥१२॥
ऐसे तुम्ही एक मामा । खूण कळली दासरामा ॥१३॥

८५०

चिमडपंथाची सेवा कीर्तनाची । हनुमत् आज्ञे साची अखंडित ॥१॥
ते हे धन्य जगी पिताजी गोविंद । सेविती नामानंद नारायणी ॥२॥
ब्रह्मचैतन्याचा पाठीवरी कर । नामाचा गजर सहजेची ॥३॥
माईसाहेबानी सांगितले म्हणुनी । म्हणती म्हणा कोणी रामकृष्ण ॥४॥
गुरुमातेची ही इच्छा पुरविली । आशा न धरिली साधुत्वाची ॥५॥
नाही केला मठ नाही केले पीठ । सेवा ही चोखट केली खरी ॥६॥
दास्यत्व साधिले ऐसे झाले दास । दासरामी ध्यास पितृदेव ॥७॥

८५१

अनुग्रहाची जहाली पीडा । बंद जहाल्या पिंगळा इडा ॥१॥
आता कैसे घेसील नाम । गुरूपुत्रा सांगे वर्म ॥२॥
हे का झेपेल सकळाला । नाम पंथराज बोधिला ॥३॥
नाही अनुग्रह केला । नाममहिमा ठसविला ॥४॥
महाराज नाही झाले । परी जगासी उद्धरिले ॥५॥
जाहले भक्त शेवटले । कोणी नाही ओळखिले ॥६॥
ब्रह्मचैतन्यादी संत । नाम बोधी हे कथीत ॥७॥
ऐसे मामा एकची तुम्ही । दासराम गातो प्रेमी ॥८॥

८५२

हनुमंतचरित्र साधनाचा मार्ग । गाथा नामयोग ग्रंथराज ।।१।।
रामपाठ हा तो प्रगट आत्माराम । नित्य पाठ नेम उपासना ।।२।।
मामा तुम्ही अमर ऐसी तुमची कृती । येणे आम्ही क्षिती सुखरूप ।।३।।
नामपंथराज सुलभ हृद्‌गद । केलेसे विशद मामा तुम्ही ।।४।।
नित्य कीर्तनाची झडली नौबद । आनंदी आनंद दासरामी ।।५।।

८५३

केळकरांचे सदनी येऊनी बसले हनुमंत ।
यावच्चंद्र दिवाकर ऐसा आमुचा पवनसुत ।।१।।
कीर्तन आवडे ज्याला केले जन्मवरी म्हणुनी ।
अंतर्धानाचा होता करवी गोविंदाकडुनी ।।२।।
जन्मशताब्दी मंगलकाळी त्रिकाळ करू सेवा ।
दासराम हा चिंतन करिता विसावाची जीवा ।।३।।

८५४

मर्जी तुमची मर्जी तुमची मर्जी तुमची ।
कासयाने धाव आमुची मर्जी तुमची ।।ध्रु।।
आम्ही राहू आमुचे घरी । गुरूनाम वदू वैखरी ।
आम्हा नकोत मुक्ती चारी । शांती मनाची ।।१।।
आम्ही नामाचे धारक । आम्हा एक तेची तारक ।
आम्हा अखंड हेची भीक । या प्रेमाची ।।२।।
गुरूशिष्यांचे चरण । नित्य होय आम्हा दर्शन ।
जयजयकार कीर्तन खूण । भक्तिसुखाची ।।३।।
दासराम सन्निधी राहे । शोभा चैतन्याची पाहे ।
जेथ अमृतसरिता वाहे । गुरुनामाची ।।४।।

८५५

आता कोठे गंध लावू । सांगा कोठे बुका वाहू ।।१।।
सांगा सांगा गोविंदनाथा । हरिकीर्तन निष्ठावंता ।।२।।
कोठे फिरवू पंचारती । काही दिसेना पुढती ।।३।।
कोणा हाती देऊ फूल । कोण घेईल परिमळ ।।४।।

कोणा नावे हाक मारू । कोण सांगेल विचारू ॥५॥
कोण देईल प्रसाद । गाऊ चित्ती या गोविंद ॥६॥
कोठे ठेवू हे मस्तक । वाहू कोणाचा तो धाक ॥७॥
ऐकू कोणाचे वचन । कोणापुढे करू गान ॥८॥
अंतरीच्या पितृदेवा । दासरामी घ्यावी सेवा ॥९॥

### ८५६

आम्हा असे एकची स्थान ।
काय कशाचा विचार करावा । कसला मानामान ॥ध्रु॥
स्वर्ग मृत्यु पाताळ धुंडिले । नाही मांडिले ठाण ।
वायुसुताचे पायी विसावा । ज्याचे ऐक्य निशाण ॥१॥
वायुपुत्र जो दाखवि तोची । आम्हा एक ठिकाण ।
आमुची जागा आम्हापाशी । तिथेच आमुची ताण ॥२॥
जगरूढी ही काय करावी । फिरवी रानोरान ।
आत्मा अंतरी भक्तिही वरी । सारी दाणादाण ॥३॥
आम्ही जेथे भक्तिही तेथे । गर्जूनिया अस्मान ।
वाऱ्यामाजी मिळवुनी वारे । दासराम करी गान ॥४॥

### ८५७

गुरूनामाचे भक्त आम्ही गुरूनामी राहू ।
सद्‌गुरूसी जी आवडे सेवा गुरूचरणी वाहू ॥१॥
गुरूनामाचा गजर करोनी सोडीतसे प्राण ।
गुरूकृपेचे हेची आम्हा अखंड वरदान ॥२॥
सद्‌गुरूसी प्रिय तेची आम्हा प्रिय ।
आवडे ते अचारू ।
आवड ज्याची नाही त्याना केव्हाही न करू ॥३॥
घेती आवडी कीर्तनसेवा तेची घरी साधू ।
कीर्तनाचा थाट माजवुनी फड जगती बांधू ॥४॥
गोविंदाने आनंदाने आचरिला धर्म ।
संप्रदायही तोची आम्हा हरिकीर्तन वर्म ॥५॥
दासरामी या याविण काही मनी नये दुसरे ।
सकळ पंथ श्रीहरी गुरुभक्त वंद्य आम्हासी खरे ॥६॥

## ८५८

कीर्तनाचे पीठ गाजविले ज्यानी । धन्य ते करणी गोविंदाची ॥१॥
नामसंकीर्तन उभारिला झेंडा । ह्याची तो रोकडा साक्षात्कार ॥२॥
प्राणांतीही नेम अढळ राखिला । जगासी दाविला चमत्कार ॥३॥
वैखरी नामाचे महत्व दाविले । अंतरी राखिले साधन ते ॥४॥
ऐसे आमुचे मामा वोसंडला प्रेमा । झाले दासरामा समाधान ॥५॥

## ८५९

हनुमंत प्रभू प्रगटले जंथे । अधिष्ठान तेथे असे त्यांचे ॥१॥
तये ठायी जरी दृढ हा विश्वास । कळिकाळ आम्हास बाधिजे ना ॥२॥
जेथिचिया ठायी भाग्य हे शाश्वत । नसे लौकिकात कोठे काही ॥३॥
नसेची लौकिक असे अलौकिक । दासरामा भीक प्रेमाची ती ॥४॥

## ८६०

गुरूलिंगजंगम दैवत आपुले । परी नाही केले साधन ते ॥१॥
तरी जिणे व्यर्थ पहाता आपुले । नाही आराधिले आराध्य ते ॥२॥
ब्रह्मचैतन्य हें आमुचे दैवत । जप तो किंचीत नाही केला ॥३॥
एक म्हणती आमुचे पंत गुरूवर । भजनी अंतर पडले जरी ॥४॥
हनुमंत गोविंद आमुचे परमेश । कीर्तनी आळस जरी आला ॥५॥
ऐसी मनी निष्ठा ज्याचा संती प्रेमा । आवडे दासरामा जरी काही ॥६॥

## ८६१

लेकुरानी काय प्रपंच करावा । परमार्थ बोलावा काही नसता ॥१॥
पानावरी बैस म्हणता बसावे । सुखेची जेवावे पोटभरी ॥२॥
कीर्तनात ऐस म्हणता असावे । तन्मयची व्हावे तयामाजी ॥३॥
आम्हावीण काय अडला व्यवहार । ज्याचा कारभार त्याचे माथा ॥४॥
दासराम हेची एक खरी सोय । ध्यानी मनी पाय गोविंदाचे ॥५॥

## ८६२

मामा तुम्हासारिसा कोण । नाही आलें आढळोन ॥१॥
तुम्हासरिसे तुम्ही । हेची एक म्हणो आम्ही ॥२॥

श्रीगुरूलिंगजंगम ख्यात । कृपा पाठीशी समर्थ ॥३॥
दासराम विचार करी । पुढे थांबली वैखरी ॥४॥

८६३

जेथें पाहे तेथे माझा अवघा गोविंद ।
उरला नाही भेद तेथे भरला आनंद ॥१॥
अभेदाची स्थिती सदा चाले आरती ।
जरी का भेद मनी मागुती दिसेचिना ज्योती ॥२॥
ज्योतिमाजी ज्योत आम्ही मेळवुनी राहू ।
आणिक दुसरे ठायी डोळे उघडूनी न पाहू ॥३॥
हनुमंतस्वरूपी जो का पूर्ण आनंद ।
दासरामा चित्ती ठसावला गोविंद ॥४॥

८६४

नानापरी दिसे । म्हणुनी दृश्य म्हणती ॥१॥
क्रिय कर्म वेगळाले । तेची झाले व्यवहार ॥२॥
कमी जास्तपणें । कर्म करील अधिक उणे ॥३॥
समाधाना पुण्य आले । पापे नेले गडदरी ॥४॥
दासराम विचार करी । दोनी परी बंधची ॥५॥

८६५

येथ आपुली आठवण । साधन हे मोलाचे ॥१॥
तेथवरी गेली वृत्ती । तरी ते भक्ती सहजेची ॥२॥
दासरामी समाधान । चिंतन हे आत्म्याचे ॥३॥

८६६

तुमचा धर्म तुम्हापाशी । आमचा धर्म आम्हापाशी ॥१॥
आमुच्या धर्मे आम्ही राहू । आम्ही तुम्हा नये भेटू ॥२॥
धर्माठायी फळ । न चले देवाचे ते बळ ॥३॥
नामसंकीर्तन धर्म । त्याचे गुरूपाशी वर्म ॥४॥
निजधर्माचे हे बळ । दासरामी ऐसी कळ ॥५॥

८६७

कोणी कैसे का वागेना । आम्ही न यो मानामाना ॥१॥
आम्ही घरी जपू हरी । सुखे चालो दे वैखरी ॥२॥
कोणी काय आचरावे । आम्ही काय ठरवावे ॥३॥
आम्ही कैसे ते वागावे । हेची घ्यावे जीवे भावे ॥४॥
श्रेष्ठांच्या लहरीं । दासराम नमस्कारी ॥५॥

८६८

कोणा जीवा न हो त्रास । इतुका आमुचा उल्हास ॥१॥
सुख नाही तरी । दुःख न हो चराचरी ॥२॥
हीच एक आशा । दासरामी या परेशा ॥३॥

८६९

नामापाशी देव येतो । गुरु काय मागे रहातो ॥१॥
म्हणोनिया जपू नाम । सदा होवोनी निष्काम ॥२॥
नामे देव भक्त । नामे गुरु शिष्य होत ॥३॥
दासरामी जपता नाम । मार्गी अडविले ब्रह्म ॥४॥

८७०

गुरुनी शिष्या नाम दिले । तेची तेणे घट्ट केले ॥१॥
हेची थोर भक्ती । ज्ञान तेथेची विरक्ती ॥२॥
ज्ञानालागी मूळ अग्नी । नामे चेतला जीवनी ॥३॥
ऐशा गुरुभक्ता । दासराम तुकवी माथा ॥४॥

८७१

गुरू विसरे शिष्यासी । गुरूकृपा म्हणावी ऐसी ॥१॥
शिष्य न विसरे सद्‌गुरूसी । गुरूभक्त म्हणावे त्यासी ॥२॥
गुरूशिष्य अधिकारी । नामे मुक्त चराचरी ॥३॥
ज्योती ज्योत मिळाली । दासरामा पडली भूली ॥४॥

८७२

देव लहरी श्रेष्ठ लहरी । आम्ही काय करावें तरी ॥१॥
म्हणुनी नामची कवटाळिले । गुरूब्रह्म आकळिले ॥२॥
ऐसा नामाचा महिमा । दासरामी झाली सीमा ॥३॥

८७३

श्रेष्ठ वागती लहरी । कनिष्ठांची कैसी परी ॥१॥
दोनी झाले उपकारक । नाम राहिले सम्यक ॥२॥
नामाठायी चित्त जडता । विश्वी भरली चैतन्यता ॥३॥
समची विश्व धवळिले । दासरामी साम्य झाले ॥४॥

८७४

नाही कोणाचा आधार । त्यासी नामची मूलाधार ॥१॥
तारक प्रभुनाम आधार । गोविंदाचा सर्वाधार ॥२॥
जिही स्थापिले मंडळ । जमले साधुसंत गोपाळ ॥३॥
आचाराची उपदेश । नाही वाणीसी सायास ॥४॥
दासराम हा सेवक । वाहे गोविंदाचा धाक ॥५॥

८७५

तुमचिया नामाचा छंद जरी आग्हा । तरी विसर तुम्हा केवी घडे ॥१॥
असो द्या स्मरण आमुची आठवण । हेची कृपादान तुमचे मज ॥२॥
तुम्ही जरी आता निराकार झाला । उरस्फोट केला जयजयकारे ॥३॥
आठवी आठव झाला परमार्थ । दासरामी स्वार्थ ऐसा मामा ॥४॥

८७६

तुम्ही आम्हासी तारक । हनुमत्प्रभू प्राण एक ॥१॥
अंगुष्ठाहुनी सहस्रदळी । धावे प्रवाह निराळी ॥२॥
ऐसे मामा तुम्ही । भरूनी ठेला रोमरोमी ॥३॥
सामर्थ्य तुमचे । काम नाही आणिकाचे ॥४॥
दासराम माथा ठेवी । सदा आठवोनी आठवी ॥५॥

## ८७७

दुरूनी आलो येथवरी । नवल परी दिसतसे ॥१॥
येथीचे येथे तेथीचे तेथे । ऐसे निरूते कळले ॥२॥
आहे तोवरी हे आहे । परी काय पुढती ॥३॥
जेथे नाही पंगती भेद । सुख संवाद उगमी ॥४॥
दासराम तेथे रमला । तोची भला परमार्थ ॥५॥

## ८७८

पांडुरंग पंत पंत पांडुरंग । भजनाचा रंग सारिखाची ॥१॥
पंत पांडरंग गोविंदा भेटले । प्रेमाश्रू लोटले एकसरा ॥२॥
आनंदी आनंद गोविंदी गोविंद । सुखाचा संवाद काय बोलो ॥३॥
त्रिवेणीसंगमी आनंदाच्या ऊर्मी । दासराम प्रेमी आठवतो ॥४॥

## ८७९

धन्य समाधिमंदिर । धन्य धन्य औदुंबर ॥१॥
कृष्णातीरी रम्य स्थान । क्षेत्र सांगली पावन ॥२॥
थोर हनुमंत महिमा । भेटी गुरू शिष्योत्तमा ॥३॥
हनुमंतजी गोविंद । सेवित अखंड कीर्तनानंद ॥४॥
गुरूलिंगजंगम सत्ता । दासराम ठेवी माथा ॥५॥

## ८८०

औदुंबरी दत्तगुरू । तेथे वसे करुणाकरू ॥१॥
औदुंबरी केली वसती । धन्य धन्य गोविंदमूर्ती ॥२॥
काय घेतली समाधी । डोल सदा ब्रह्मानंदी ॥३॥
जरी मन हे थरारे । शांत होय सुटता वारे ॥४॥
धन्य वृक्ष औदुंबर । पहाता सर्वांचा विसर ॥५॥
औदुंबर तो गोविंद । पहाता होये मन सद्‌गद ॥६॥
थोर गंगाधर स्वामी । दासरामी ठेवी ऊर्मी ॥७॥

## ८८१

औदुंबर कल्पवृक्ष । याची आली आम्हा साक्ष ॥१॥
औदुंबराचे दर्शन । होता निवे तन मन ॥२॥
गंगा मिळाली सिंधूसी । तैसी मिळणी गुरुशिष्यासी ॥३॥
नेम गुरुदर्शनाचा । अखंड केला गुरूनी साचा ॥४॥
काय मामा तुमचा भाव । राखिती सदैव गुरुदेव ॥५॥
ब्रह्मा विष्णू त्रिनयन । येती भेटाया कारण ॥६॥
औदुंबराचे ते पान । दासरामासी जीवन ॥७॥

## ८८२

हनुमंत सद्‌गुरुराव । नवल तयाचे लाघव ॥१॥
त्यांचे त्यानीच करू जाणे । काय होय मानवाने ॥२॥
पूर्ण कोड कौतुक केले । सहज लीले दाखविले ॥३॥
दासरामाची मिरासी । सत्य सद्‌गुरुचरणापासी ॥४॥

## ८८३

असारीही सार ऐसा औदुंबर । शोधिला साचार मामा तुम्ही ॥१॥
ऐसे मामा तुम्ही कृतीने दाविलें । प्रत्यक्ष पाहिले औदुंबरी ॥२॥
पहाता हे ऐसे अलौकिक झाले । दासरामे ठेले मस्तक हे ॥३॥

## ८८४

आपुलिया घरी राहोनी निर्गुण । जाहला सगुण औदुंबरी ॥१॥
निर्गुणावाचोनी कैचे ते सगुण । दोहीचे महिमान सारिखेंची ॥२॥
औदुंबरी दिसे प्रत्यक्ष चैतन्य । म्हणोनी सगुण बोलियेले ॥३॥
काही असो मामा द्यावे समाधान । दासराम चरण वंदीतसे ॥४॥

## ८८५

सः अहं अहं सः । गुरुपादुका या महा ॥१॥
मामा तुम्ही सांगितले । तीच वंदितो पाऊले ॥२॥
दासराम आपुले पायी । तेची सौख्य सर्वदाही ॥३॥

## ८८६

औदुंबराचे ते पान । मज त्रैलोक्यासमान ॥१॥
तेथे दिसती त्रैमूर्ती । मामा कीर्तनी नाचती ॥२॥
काव्य नव्हे सत्यभाव । म्हणुनी वेडावतो जीव ॥३॥
दासरामी दत्तगुरू । कृपा करिती करुणाकरू ॥४॥

## ८८७

आश्विन शुद्ध एकादशी १८८१ । शकामाजी स्पष्ट साक्षात्कार ॥१॥
गोविंद पितयांचे रंगले कीर्तन । श्रीरामदर्शन जहालेसे ॥२॥
राम सीतामाई रंगल्या कीर्तनी । प्रगटले संतमणी ज्ञानेश्वर ॥३॥
विठ्ठल हनुमान गुरू हनुमंत । सद्‌गुरू समर्थ रंगूनी गेले ॥४॥
गुरूलिंगजंगम नारायणराव । ठाकले अपूर्व कीर्तनात ॥५॥
नुरले देहभान ते दिनी तयांचे । हरी बोले वाचे कीर्तन त्यांचे ॥६॥
येर भाग्यवंता प्रत्ययाचो खूण । कळसावरील निशाण हलते दिसे ॥७॥
निशाण ते हालो लागले उत्तम । दिसले परम गुह्य बहुता ॥८॥
राम सीतामूर्ती डोलल्याचा भास । आले अनुभवास नाचताती ॥९॥
नामदेव कीर्तन ज्यानी सार्थ केले । दासराम लोळे त्यांचे चरणी ॥१०॥

## ८८८

धन्य कैवल्याचे धाम ते परम । त्रैमूर्ती उत्तम वास करिती ॥१॥
धन्य नारायण गुरूलिंगजंगम । समर्थ श्रीराम हनुमंत ॥२॥
गोविंद पितयांचे झाले तेथें कीर्तन । त्रैमूर्ती लागून डोल आला ॥३॥
समाधीचा कळस डोलू लागलासे । बहुतासी ऐसे दिसो आले ॥४॥
काय रंग वानू भरला कीर्तनी । बाल राम चरणी विनटला ॥५॥

## ८८९

बापुराव केळकर । धन्य पिताजी मम थोर ॥१॥
जेव्हा पंढरीसी गेले । देवे कोडकौतुक केले ॥२॥
झालें होते बहुत दिवस । पंढरीनाथ दर्शनास ॥३॥
जहालीसे बहुत सेवा । समाधान पंढरीरावा ॥४॥
नामदेव मंदीरात । उतराया जागा देत ॥५॥
देवदर्शनासी दाटी । अधीक श्रावण यात्रा मोठी ॥६॥

( अभंग ८८९ चालू आहे )

लाखो लोकांचिये वाटी । दर्शन केवी होईल भारी ॥७॥
ऐसीं चिंता मनी करीती । परी आलीसे प्रचीती ॥८॥
नेल्या नव्हत्या नोटा । म्हणुनी विचार पडला मोठा ॥९॥
एकादशीचा तो दिन । मन जहाले उद्विग्न ॥१०॥
करिती विठ्ठलाचा धावा । देव भूललासे भावा ॥११॥
दाणेकरीं अभ्यंकर । पांडुरंग बरोबर ॥१२॥
बडव्या द्याया नाही काही । आता करावे ते काई ॥१३॥
आता पाहुनी कळस । जाऊ आपल्या घरांस ॥१४॥
ऐसा विचार येता मनी । नवल जहाली करणी ॥१५॥
दार होते झाकीयेले । कोणी पुरुषे उघडीले ॥१६॥
हाता धरूनी आत नेले । पाच जण आत गेले ॥१७॥
पाच जण आत जाता । दार झाकीले सर्वथा ॥१८॥
नरहरी त्याचे नाव । नव्हे नरहरी तो देव ॥१९॥
ज्याचे जवळीं मोठे धन । तया पुसती सर्वजण ॥२०॥
परी केवळ भावासाठी । देव करी आटाआटी ॥२१॥
पुनः दुपारी ते दिनीं । भेटलासे जगदानी ॥२२॥
सर्व बंद होती दारे । परी नवल झाले खरे ॥२३॥
होते पिताजी बहु दूर । देवे केला चमत्कार ॥२४॥
धरोनिया त्यांचे हाता । निकट आणिले सर्वथा ॥२५॥
तोची दार उघडीले । पाच जण आत गेले ॥२६॥
चाडवेळ देखीलीं मूर्ती । नयनीं प्रेमाश्रू पाझरती ॥२७॥
घडले त्रीवार दर्शन । काय वर्णावे महिमान ॥२८॥
येणे परि नित्य घडे । प्रसाद तो लाभे पुढे ॥२९॥
हार घालाया लागले । तव पिताजी बोलीले ॥३०॥
माझा नाही अधिकार । मी तो दीन पामर ॥३१॥
ऐसे बोलुनीं निघाले । गरुड पारापाशी आले ॥३२॥
तव पाठीं मागूनी कोणी । हार घातीला येवोनी ॥३३॥
मागुनी इतरांचे गळा । घातीयेल्या प्रसादमाळा ॥३४॥
नको नको म्हणता घडले । सर्वा आश्चर्य वाटलें ॥३५॥
ही तो भगवंताची करणी । वर्णवेना सहस्त्रफणी ॥३६॥
सकळांते लाभ झाला । भगवंते केली लीला ॥३७॥

( अभंग ८८९ चालू आहे )

प्रसादही दीला कोणी । न मागता येवोनीं ॥३८॥
ताक पीठी विठोबापुढे । नित्याचे कीर्तन घडे ॥३९॥
नित्य दोन दोन कीर्तने । झाली भरली भगवद्भुजने ॥४०॥
नामदेव मंदीरात । प्रथा सत्य असे तेथ ॥४१॥
ज्याचे गळा आहे माळ । वारकरी जो सोज्वळ ॥४२॥
त्याने बोलावे निरुपण । त्याने सांगावे प्रवचन ॥४३॥
इतरा नाही अधिकार । मोठा तेथीचा करार ॥४४॥
पिताजी तो चिमडपंथी । तेथे दाविलीं प्रचीती ॥४५॥
नामदेवांचे आले मना । पुढे कोणाचे चालेना ॥४६॥
मंदीराचे जे प्रमुख । पूर्ण अधीकारी देख ॥४७॥
फिरवीली त्यांची बुद्धी । केली अंतरीची शुद्धीं ॥४८॥
जाणियेली अंतरमाळ । मोठे घडले नवल ॥४९॥
सांगीतले पीताजीना । करण्या जागर हरीकीर्तना ॥५०॥
ज्ञानेश्वरीचे प्रवचन । करण्या विनवीले जाण ॥५१॥
बहुत लोटीयेले जन । बसले तटस्थ होऊन ॥५२॥
ऐसा जहाला प्रकार । सर्वा वाटे चमत्कार ॥५३॥
नामदेवे नवल केले । भक्तकाज पूर्ण केले ॥५४॥
ब्रह्मचैतन्य महाराज । त्यांचे मठी झालीं मौज ॥५५॥
तेथे जाहले कीर्तन । रंग दाटला संपूर्ण ॥५६॥
सुवास दरवळे अपार । दंग झाले नारी नर ॥५७॥
साक्षात्काराची प्रचीती । उजळली आत्मज्योती ॥५८॥
अहील्याबाई होळकर । त्यांचे मंदीर अपार ॥५९॥
तेथे जहाले कीर्तन । काय बोलावे महीमान ॥६०॥
गोपाळपुरी पौर्णिमेसी । रंग आला कीर्तनासी ॥६१॥
घडला नवल प्रकार । स्वरुपाचा साक्षात्कार ॥६२॥
भगवंतानी दर्शन दिले । बापुराया पुनीत केले ॥६३॥
वहातीं प्रेमाश्रू नयनी । नवल देवाची करणी ॥६४॥
येरा अलभ्य श्रीरंग । परी देखती कीर्तनरंग ॥६५॥
नाही देखिला सोहळा । आजवरी ऐसा डोळा ॥६६॥
बहुत लोक बोलीयेले । अनुभवे थक्क झाले ॥६७॥
सेवा घडलीया देख । देव करीतो कौतुक ॥६८॥

( अभंग ८८९ चालू आहे. )

पांडुरंग दाणेकर । अभ्यंकर ते साचार ॥६९॥
त्यानीं सोहळा देखीला । देखीली भगवंताची लीला ॥७०॥
तुळशी मंजिरीचा हार । आणियेलासे सत्वर ।
पिताजींचे गळा । घालण्यासी आणियेला ।
प्रसाद म्हणोनी घेतला । बरवा विठ्ठल बोळला ।
पिताजींचे कौतुक देवे । कंसे केले स्वभावे ॥७१॥
देखोनिया चमत्कार । आनंदले ते साचार ॥७२॥
अठराशे एकसष्टास । सर्व घडले अनायासे ॥७३॥
पांडुरंग प्रभू बोळला । पीताजींचेवरी भला ॥७४॥
दासराम वंदी पाय । तया लाधले अभय ॥७५॥
नामाबुवा होते तेथ । त्यानी पुसीले सुचित ॥७६॥
तुम्ही नाही माळकरी । नाही निरूपणा अधिकारी ॥७७॥
जेणे वारकरी व्हावे । तेणे निरूपण करावे ॥७८॥
तव पिताजी बोलिले । ऐका ऐका हो वहीले ॥७९॥
तुम्ही घातोली वरती माळ । आमुची अंतरी सोज्वळ ॥८०॥
माळ जरी नाही वरी । खरा तोन वारकरी ॥८१॥
पहावी प्रचीत । आता काय सांगू येथ ॥८२॥
द्वादशीचा दिवस । सत्य आले अनुभवास ॥८३॥
माळ घालू का म्हणोनी । पिताजीना पुसीले कोणी ॥८४॥
माझा अधिकार नाही । ऐसे बोलीयेले पाही ॥८५॥
तव ते नको नको म्हणाले । झटकून गरुड पारी आले ॥८६॥
तव पाठी मागुनी कोणी । हार घातीला येवोनी ॥८७॥
पाठीमागुनी घालुनी गेला । अकळ भगवंताची लीला ॥८८॥
कैसीयाची सत्य माळ । अंतरीची हे सोज्वळ ॥८९॥
देव प्रत्यक्ष दाविले । पहाता प्रचीतीसी आले ॥९०॥
झाला चमत्कार । काय सांगावा अपार ॥९१॥
कंठा तुळशीचा । भगवंताचे कंठीचा ॥९२॥
जया नाही मेरूमणी । दशांगुळें असे जाणी ॥९३॥
माळेमध्ये अडकवोनी । वाहीयेला देवा कोणी ॥९४॥
कोण असतील संत । त्यांचे पडेल गळ्यात ॥९५॥

( अभंग ८८९ चालू आहे )

ऐसा कंठा तो हेतूचा । आला प्रत्यय तो साचा ॥९६॥
तोची हार यांचे गळा । कोणी असे घातीयेला ॥९७॥
भगवंतांचे गळ्यातील । कंठा तुळशीमाळ ॥९८॥
नको नको म्हणत असता । सहज जेणे घातीली माथा ॥९९॥
घालुनी पळोनिया गेला । सत्य प्रसाद तो दिला ॥१००॥
भगवंतानी प्रसाद दीला । सर्वा अनुभव आणिला ॥१०१॥
भगवंताची लाधली माळ । धन्य धन्य घननीळ ॥१०२॥
धन्य हनुमंत सद्गुरू । ज्यांची कृपा झाली थोरू ॥१०३॥
म्हणुनी देवे घातीलीं माळ । प्रगट केली जे निर्मळ ॥१०४॥
तुमचे गळा नाही माळ । आता कोणता म्हणेल ॥१०५॥
भगवंतानी केले नवल । बोलेवेना जे अबोल ॥१०६॥
मामा दांडेकर प्रांजळ । म्हणती जाहले हे नवल ॥१०७॥
दासराम शरणागत । पांडुरंग आठवीत ॥१०८॥

८९०

धन्य धन्य माझे पीताजी गोविंद । नामकीर्तन छंद जयालागी ॥१॥
औदुंबर क्षेत्री दर्शनासी गेले । सेवा घ्यावी बोलीले गुरुदत्ता ॥२॥
माध्यानाचे काली तीनीचे पर्यंत । नीजती गुरुदत्त उष्णकाली ॥३॥
राजे महाराजे जरी तेथे आले । नाही उघडीले द्वार तेथे ॥४॥
उठोनी बैसले परी दत्तराज । केले पूर्ण काज भक्ताचे ते ॥५॥
दत्तराजे पुजाऱ्यासी स्फूर्ती दिली । कवाडे उघडली आज्ञेपरी ॥६॥
दोन वाजताची सुरु झाले कीर्तन । तोषले भगवान गुरुदत्त ॥७॥
नित्याचे कीर्तन गोविंदरायांचे । पुरवीले भक्ताचे मनोरथ ॥८॥
तबला ना पेटी झांज ना मृदंग । रंग तो श्रीरंग आपण झाला ॥९॥
भक्तीचा आनंद प्रसाद वाटला । प्रेमे ओवाळीला गुरुदत्त ॥१०॥
नारीकेल प्रसाद दीला पूजाऱ्यानी । श्रोतवृंद मनी आनंदला ॥११॥
दासराम लागे पीतयांचे चरणी । ऐसीया कीर्तनी मन रंगी ॥१२॥

## ८९१

ब्रह्मनाळक्षेत्री गोविंद पिताजी । गेलीया प्रभूजी संतोषले ।।१।।
संध्याकाळी सुरू जहाले कीर्तन । भरला रंग पूर्ण तयेठायी ।।२।।
कोणी वृद्ध पुरुष होता गाभाऱ्यात । तेजस्वी अत्यंत सिद्धपुरूष ।।३।।
रूद्राक्षाच्या माळा केल्या जे धारण । चालीले चिंतन राघोबाचे ।।४।।
अस्ताव्यस्त पाय सोडीयेले जेणे । आनंदमूर्ती चरण जये ठाई ।।५।।
सुरू होता कीर्तन तो सिद्धपुरुष । आला कीर्तनास तेथोनी ।।६।।
वेळ तीनीसांज तेथे न ये कोणी । माध्यानापासोनी साधनासी ।।७।।
आनंदमूर्तींचे चरित्र वर्णीता । रंगले तत्त्वता सिद्धपुरूष ।।८।।
कंठ दाटलासे नयनी अश्रू आले । नाही कळो आले नाम त्यांचे ।।९।।
कीर्तन संपता दीधलीसे खूण । भाग्याचे निधान हाता आले ।।१०।।
औदुंबरक्षेत्री प्रसाद मिळाला । तैसा व्हावा भला ऐसे वाटे ।।११।।
प्रसाद मिळावा ईच्छा झाली मनी । गोविंदराया कीर्तनी प्रेमभरे ।।१२।।
गावाचेपासून दूर देवस्थान । तेथे नव्हते कोण मठातील ।।१३।।
परि ईच्छा केली प्रभूराजे पूर्ण । आम्रफळ संपूर्ण सिद्धे दीले ।।१४।।
आनंदमूर्ती तोषले ईच्छा पूर्ण केली । स्वारी नाही कळली कोण होती ।।१५।।
गोविंदराये केला मने नमस्कार । आशीर्वाद थोर जहालासे ।।१६।।
परत येता सिद्ध दूर आले । एकाएकी गेले कोणीकडे ।।१७।।
आनंदमूर्ती जेथे आनंदले कीर्तनी । आनंद तो कोणी वर्णावा तो ।।१८।।
दासराम लागे पीतयांचे चरणी । आनंद हा मनी धावा तैसा ।।१९।।

## ८९२

कुरूंदवाड घाटावरी । गजाननाचे सामोरी ।
जहाले कीर्तन निर्धारी । गोविंदराय पितयांचे ।।१।।
गजानन हनुमान दत्तगुरू प्रगटले जाण ।
सुवास दरवळला पूर्ण कीर्तनी त्या सर्वत्र ।।२।।
गणपतीचे अंगावर । होती वस्त्रे अलंकार ।
नाना प्रकारचे हार । होते जाणा ते दिवसी ।।३।।
गणेश चतुर्थीचा दिवस । सायंकाळ समयास ।
दाटला प्रकाश देवालयी कीर्तनी ।।४।।

वस्त्रे अलंकार हार । फुले तैसे दुर्वांकुर ।
गळोनी पडलें थोर । एकाएकी कीर्तनी ॥५॥
उपडी दिसली सर्वा मूर्ती । गजानना अवलोकीती ।
प्रकाश न भरे चिती । नेत्र मीटले सर्वानी ॥६॥
श्रोते सर्व झाले चकीत । गोविंदराया केला प्रणिपात ।
काय जहाला वृत्तांत । पुसीले ज्या स्व ते वेळीं ॥७॥
गजानन बहू डोलीले । प्रेमे आनंदे भरले ।
म्हणोनी देखे हे पडले । हरीनाम कीर्तनी ॥८॥
हनुमंते हास्य केले दत्त आशीर्वाद बोलीले ।
सद्गुरू प्रगटले तात्यासाहेबमहाराज ॥९॥
नामदेवांचे कीर्तन । तैसे याचे महिमान ।
बाळ राम धरी चरण । प्रेमभावे पीतयांचे ॥१०॥

८९३

आषाढ शुद्ध चतुर्दशी । श्रीहरी मंदिरामाझारी ।
गोविंद पिताजींचे झाले कीर्तन निर्धारी ।
बालका वाटलेसे साक्षात्कार व्हावा भारी ॥१॥
कीर्तनी रंग भरला ब्रह्मचैतन्यासमोर ।
सुवास दरवळला तेधवा अपार ।
मना बहू हर्ष झाला होता नामाचा गजर ॥२॥
गुंडुमहाराज साधूमूर्ती । ब्रह्माकार ज्यांची वृत्ती ।
विदेहस्थीती पूर्ण । जगा रोकडी प्रचीती ।
कीर्तनी पंढरीनाथ । जयजयकार बोलती ॥३॥
पिताजींचेकडे पाहीले बहू वेळ आत्मदृष्टी ।
पिताजीनी नमन केले होता संताचिये भेटी ।
कीर्तनी परमानंद झाला गुंडूबूवापोटी ॥४॥
गुंडूबूवा नाचू लागले हर्षे हसू लागले ।

( अभंग ८९३ चालू आहे )

डोल घेवोनीया कैवा प्रेमोद्गार काढीले ।
नाममहीमा बोलताची नेत्रातूनी अश्रू आले ॥५॥
धन्य धन्य वहावा छान छान ऐसे उद्गार काढीले ।
भजनी सूर धरीला सूरामाजी मिळाले ।
करटाळी देवोनिया लोका आनंदीत केले ॥६॥
ब्रह्मचैतन्यांची गोष्ट सांगितली पीताजीनी ।
कैसी माया केली त्यानी आशीर्वाद बोलोनी ।
नामी जगा रंगविले चमत्कारा दावोनी ।
काशीचे प्रेंतालागी उठविले ऐसी करणी ॥७॥
गुंडूबुवा अधिकारी प्रेत जीवंत केले ।
जगा दीसे वेडी वृत्ती पूर्ण नामी रंगले ।
ज्ञानाचे सागर महासाधू शोभले ॥८॥
पिराजी गायक्याची पत्नी मरोनी पडली ।
कर्नाळ मुक्कामी तीजलागी उठविली ।
जगासी थोर प्रचीती आणोनीया दीधली ॥९॥
क्षणात प्रगट होती क्षणामध्ये कोठे जाती ।
जेथे जैसे असतील तेथे तैसेची असती ।
उन थंडी जया नाही । अन्नपाण्याची विस्मृती ॥१०॥
राजे राजवाडे जेथे घालीती लोटांगण ।
मनी नाही अभिलाष काय वानू त्यांचे गुण ।
शिव्या देती तया कोणी घालीता लोटांगण ।
चाड नाही कोणाची त्या राजा महाराजापासून ॥११॥
बोलती ते सत्य होय ऐसी मोठी त्यांची ख्याती ।
जयाते पहाताची समाधान होय चित्ती ।
येईल तैसा बोल रामकृष्ण बोलती ।
ऐसे धन्य गुंडूबुवा कीर्तनी नाचती ॥१२॥
संत देव नाहीं दोन ऐसे समर्थ बोलती ।
जेथे भक्तीभाव तेथे संत देव प्रेमे जाती ।
सत्य ते पीताजींच्या कीर्तनी ये प्रचीती ॥१३॥

( अभंग ८९३ चालू आहे )

गुंडूबुवा प्रेमे आलें येवढ्यावरी न भागले ।
कीर्तना देव आला गुंडूबुवा बोलीले ।
जय जया पंढरीनाथा आलास बाबा म्हणाले ॥१४॥
धन्य ते कीर्तन जेणे देव ये चालून ।
कीर्तनी विषय तोची सांगीतला संपूर्ण ।
दासराम लोळे चरणी । उमगता वर्म खूण ॥१५॥

८९४

गोविंदराय कीर्तनी प्रगट झाला ब्रह्मानंद ।
आनंद बोलता बोलता गती होय मंद ॥१॥
सीताराम धाऊनी आले हरिभक्तीसाठी ।
मारुतीराये दर्शन दीले केली कृपादृष्टी ॥२॥
मारूतीराय उभे ठाकले भक्ताचे घरीं ।
नामभक्तीसाठी जेव्हा सोडीली नोकरी ॥३॥
हनुमंत सद्‌गुरुराये पूर्ण कृपा केली ।
नित्यकीर्तना आज्ञापोनी विश्रांती घेतली ॥४॥
माईसाहेब रंगुनी गेल्या प्रेमे या कीर्तनी ।
नागाप्पाण्णा डोलु लागले तन्मयता पाऊनी ॥५॥
देव गणपती डोलू लागला आनंदे कीर्तनी ।
वस्त्राभरणे गंधाक्षता गेले गळोनी ॥६॥
रामानंदमहाराजे बहु केली स्तुती ।
निळोबांचा अवतार बोलीयेले गीती ॥७॥
गुंडामहाराज भगवंतासह तन्मय होऊनी ठेले ।
भजनी स्वर मिळवुनी आपुला भजनरूप झाले ॥८॥
तात्यासाहेबमहाराज प्रसन्न पै झाले ।
आशीर्वाद बोलीले भगवान सद्‌गुरू नारायण ॥९॥
काय वानू ऐशा कीर्तनाचा महिमा ।
लागे पादपद्मा दासराम मूढमती ॥१०॥

८९५

गोविंद पीताजींना नागाप्पाअण्णानी । आग्रह करोनी सांगीतले ॥१॥
पूर्ण परमार्थ गुरुकृपे झाला । लाभ हा जगाला द्यावा आता ॥२॥
जगदोद्धाराते आज्ञापिले जनी । माईसाहेब मातोश्रीनी काय सांगो ॥३॥
बहू जन शरण आले गोविंदराया । उपदेश तया नाही केला ॥४॥
माईसाहेबानी पाठविले जन । अनुग्रहाकारण धन्य धन्य ॥५॥
गोविंद पिताजीनी केले त्या उत्तर । होऊनीया नम्र सत्य साच ॥६॥
चिमडासी जावोनी तया शरण जावे । कृपेलागी व्हावे पात्र तेथे ॥७॥
गुरुमाऊलीने केले हे कौतुक । अधिकारी निःशंक पितृदेव माझा ॥८॥
सर्वा पाठविलें चिमडालागोनी । अघटित करणी काय वानू ॥९॥
परमार्थाचा मान चालोनीया आला । लोभ नाही सुटला मनामाजी ॥१०॥
काय गुरुभक्ती । वर्णावी मुखाने । जयावरी देवाने कृपा केली ॥११॥
कीर्तनाची गुरुआज्ञेवाचोनी हनुमंतरायानी ।
उपदेशीला कोणी नाही नाही ॥१२॥
कोणाही जीवाचा गुरुआज्ञे उद्धार । केलासे साचार धन्य धन्य ॥१३॥
श्रीरामआज्ञेने नित्य केले कीर्तन । जव कंठी प्राण राहीलासे ॥१४॥
तेची परंपरा गोविंदराया दिधली । त्यानी चालविली नित्यनेमे ॥१५॥
हनुमंतसद्गुरू आज्ञा ज्या प्रमाण । करिती कीर्तन नित्यनेमे ॥१६॥
परमार्थपीठाचे राजे रामचंद्र । पत्नी त्यांची थोर माईसाहेब ॥१७॥
हनुमंतरायांची धन्य गुरुमाऊली । कैसी वोळली गोविंदराया ॥१८॥
करा जगदोद्धार बोधीले साचार । साधन ते थोर जहाले तुमचे ॥१९॥
कौतुक हे तुमचे मी तो दीन पामर । नको मज भार ऐसा काही ॥२०॥
होऊनीया पूर्ण दीधले वचन । संतोषली पूर्ण गुरुमाता ॥२१॥
हनुमंतसद्गुरूपरी ज्यांचे वर्तन । गुरुआज्ञा प्रमाण ज्यांचे कंठी ॥२२॥
धन्य हनुमंत धन्य ते गोविंद । दासराम आनंद नित्य सेवी ॥२३॥

८९६

कीर्तन करिती गोविंदराज । पुढे उभे प्रभुराज ॥१॥
सीताराम उभे ठेले । मारुतीराय धाविन्नले ॥२॥
हनुमंत सद्गुरुराज । कीर्तनी डोलती प्रेमे सहज ॥३॥
काय झाली भारी मौज । दाणेकरी वाजवी झांज ॥४॥
अभ्यंकर धरिती सूर । तबल्यावरी दांडेकर ॥५॥

बाल राम पेटीवरी । बैसोनिया साथ करी ॥६॥
कीर्तनाचा भरला रंग । अभंग बोले पांडुरंग ॥७॥
बिडुबुवा दाणेकर । बोलतीं अभंग पाटणकर ॥८॥
नानासाहेब फडणीस । रंगतातीं गुरूचे दास ॥९॥
नागाप्पाण्णा रघुनाथ । नारायण गोपालनाथ ॥१०॥
संतसज्जनांची दाटी । काय सांगू गुजगोष्टी ॥११॥
गोविंदरायांचिये स्तुती । रामानंदमहाराज करिती ॥१२॥
प्रभु आज्ञेचे कीर्तन । काय सांगू महिमान ॥१३॥
माईसाहेब चिमडकर । माता डोले ती अपार ॥१४॥
साधुसंतांचा पायीक । ठेलो होवोनी निःशंक ॥१५॥
बुक्का लाविती गणपतराव । महिमा येथीचा अपूर्व ॥१६॥
कीर्तनासी खिरापती । प्रेम आनंदे वाटती ॥१७॥
दासराम आरती करी । वंदी माथा चरणावरी ॥१८॥



# कल्याणस्वामी आख्यान : १८

८९७

कल्याणची हा म्हणुनी आला जो साच करट चोखाया ।
येर अनुग्रही सारा आला सत्य साच जो खाया ।।
कल्याण पावला कल्याण । संबोधी गुरु ज्या कल्याण ।।१।।
जहाले तयाचे कल्याण । कल्याणी लाभले कल्याण ।।२।।
कल्याण स्वये करी कल्याण । भोवता सकळ करी कल्याण ।।३।।

समर्थगुरुची कृपा बहु जया जहाली पहा ।
अहा नवल दाविले सुजनी या सदा सेव्य हा ।
जया इतर लोक हा करी सदाची हेवा पहा ।
तसेची परी सेवुनी सुखविला महाराज हा ।।१।।

ऐकुनी वार्ता दुःसह गुरुची धाडी शिव वैद्याला ।
तळमळ मनो ही फारची जहाली चिंती क्षेम प्रभूला । रामा रामा हो ।।१।।
काळ रोग हाटतो केव्हा वाटे हे शिवबाला ।
नवस बोलतो आई भवानी उठवी झणी सद्‌गुरुला । रामा रामा हो ।।२।।
प्राणार्पण जरी करणे लागे तरी करील हा शिवबा ।
मम सद्‌गुरुसी दुःखपार करी जय जय हा शिवबा । रामा रामा हो ।।३।।

(ओव्या)

वैद्यराज येवोनी ठाकत । समर्थ सद्‌गुरू वंदित ।
मस्तक ठेवोनी चरणाप्रत । हस्त जोडोनी तैसेची ।।१।।
समर्थ सांगती हे करट । आले दावाया स्वर्गाची वाट ।
आता आम्हालागी स्पष्ट । जाणे लागे ।।२।।
काळ करटासी औषध । काय सांगतसा बुद्ध ।
मम हे ठाऊक प्रसिद्ध । तत्काळ सिद्ध पार करी ।।३।।

काळ करट जो चोखेल । तो क्षणार्धात मरेल ।
सुटका होईल तत्काळ । काळ करटापासुनी । ।।४।।
वैद्यराज सकळा सांगत । करट चोखता समस्त ।
तात्काळ उठतील समर्थ । वेदनारहित होऊनी ।।५।।
जो चाखेल तो मरेल । हेची औषध सोज्वळ ।
निरोप घेवोनी तात्काळ । जाते झाले निजसदनी ।।६।।

(कविता)

सर्व बाजूला होती याचवेळी । बहूत लोकासी कठिण वेळ आली ।
कुणा चिठ्ठी आली आईची सुवेळी ।
आई बेटयाची गतप्राण झाली ।।१।।

कुणा बापाचे सत्य पत्र आले । पुत्रविरहाने चित्त व्यग्र झाले ।
पितृभक्तीने हृदय भरून आले । तोची गाठोळे बांधुनी निघाले ।।२।।

कुणा गरिबाचे लग्न ते निघाले । कुणा नात्याचे बारसे निघाले ।
कुणा एकासी पित्त फार झाले । असे सर्वची हो लांब लांब गेले ।।३।।

समर्थ पुसती त्याते काय करता हे कळेचिना माते ।
प्राणार्पण तरी करूनी वाचविसी काय सांग रे माते ।।१।।

तव पायी हा मृत्यू मत्प्रिय मातेची सेव्य बहु झाले ।
सदैव माझे म्हणुनी माझे हे काम धावुनी आले ।।२।।

करट चोखता म्हणती गोडची लागे दुजे आहे काहो ।
कवतुक पाहुनी सद्‌गुरू करती त्या सत्य गुज लाहो ।।३।।

कुणा सांगू तरी सेवा सांगा हो सर्व शिष्यजन सारे ।
समर्थ म्हणती त्याना प्राणार्पी त्या कृपा न हो का रे ।।४।।

कल्याणस्वामी आख्यान पूर्ण

८९८

( निरुपणाचा अभंग )

जैसे बीज तैसे फळ । नाम गाई तू निर्मळ ॥१॥
नाम बीज पेरू जाता । साक्षात्कार फळ हाता ॥२॥
अन्य बीज पेरियेले । कर्मफळ हाता आले ॥३॥
तेणे बंधन तुटेना । दासा देव आतुडेना ॥४॥
बीज पेरावे (३) बीज पेरे सती (४)
पिकले तया खाणे किती (५) फळे रसाळ नामाची (६)
शुद्ध बीजापोटी (७) ऐसी जोडी करा । राम कंठी धरा । चुकेल हा फेरा ।
गर्भवास ॥१॥ नाशिवंत आहे प्रिया पुत्र धन । बीज ज्याचा शीण तेची फळ ॥२॥
(८) निंबाचिया झाडा साखरेचे आले

(आख्यान) [१]

बैसली सभा अंबरी । विचारा करी । कोण निर्धारी । धर्म रक्षील ।
हनुमंतराय हा दिसतो आमुचा सबळ ॥१॥
कलियुगी बंड वाढिले । अधर्मी भरले । सर्व बुडविले ।
दुष्ट बहू साल । झणी केले जाणा धर्माचे निर्मूळ ॥२॥
पाखांडी लोक जाहले । विचारी न उरले । भरकटुनी गेले ।
उठे कल्लोळ । कुणी जाणेना तो जगपालक गोपाळ ॥३॥
सुरवरी ठरविले आता । कपिवर त्राता । जडा उद्धरता ।
जाळुनी खळ । उत्पन्न करोनी विचार हा सोज्वळ ॥४॥
दास हा लीन जाहला । गुरु लाभला । आसरा भला ।
राखील कुळ । पाय हेची माझे त्याचे बुद्धिबळ ॥५॥

ठरविले आता धर्मरक्षणा । धाडणे बरे वायुनंदना ॥१॥
वचन ते दिले आईसी बरे । पूर्ण कामना होईल त्वरे ॥२॥
प्रपंचासीही साधुनी आता । गुरुभक्तीही साधी पूर्णता ॥३॥
रामदास हे नाम धरुनिया । धर्मभावना भरली जगती या ॥४॥

जाणुनी आता मातृकामना । सत्पथा जना लावी सज्जना ।।५।।
दास भाग्य ते उदया आले । म्हणवुनी खरे पाय लाभले ।।६।।

(डोहाळे)

हे ज्ञाननिधीचे भुजंग । अहो विषयदरीचे वाघ ।
किंवा भजनमार्गीचे मांग । मारक जे ।।१।।
ऐसी बोले ज्ञानेश्वरी । तेची मारोनिया वैरी ।
अजिंक्य परी मी जिंकोन हरीं । गुरूकृपे ।।२।।
देवा जाऊनी पाहीन । चरण त्याचे नेत्र भरून ।
मग मी एकरूप होईन । निजध्यासे ।।३।।
प्रपंच साधुनी परमार्थ । साधुनीं दावीन यथार्थ ।
जाळोनिया स्वार्थ । कीर्तनगजरे ।।४।।
ऐसे जाहले डोहाळे । माता पाही सुख सोहळे ।
पाहे भरूनी डोळे । स्वरूप दास ।।५।।

कोटणीस कुळ सोज्वळ पाहोनी । आले अवतरूनी हनुमंत ।।१।।
धन्य त्यांची माता धन्य त्यांचा पिता । सत्य सार्थकता प्राप्त झाली ।।२।।
धन्य सांगली ग्राम हे त्रिभुवनी । नामसंकीर्तनी भरूनी गेले ।।३।।
धन्य झाला दास उच्चारिता नाम । नाही भवश्रम गुरूकृपे ।।४।।

जैसे बीज तैसे फळ । हा शास्त्राचा न्याय कराया सबळ ।
म्हणोनी शोधिले हे कूळ । अवतार घ्याया कारणे ।।१।।
परंपरा चालणे कठिण । परी सत्कुळामध्येची आढळते जाण ।
ती परंपरा टिकवून । थोर दाविली या कुळी ।।२।।
पांडुरंगराव कोटणीस धन्य । मुधोळग्रामी नामपरायण ।
जेणे तुष्ट होय भगवान । ऐशी अनन्य भक्ती करोनी असती ।।३।।
काढोनी संसारातील मन । भगवत्पदी करिती लीन ।
सर्वही आचार देवाकारण । येणे रीती वर्तती ।।४।।
त्यांची भार्या रूक्मिणी सती । त्याना अनुकूल वर्तोनी रीती ।
पतिसमागमे भगवद्भक्ती । अनन्यभावे करोनी ।।५।।

असावे पतिसेवेसी रत । चालवावे कुळाचार व्रत ।
जेणे कुळपरंपरागत । वैभव जगती वाढेल ॥६॥
त्यांचे पोटी सद्‌गुरुवर । अवतरले करावया जगदोद्धार ।
कार्तिक शुद्ध अष्टमी शके १७७६ साचार । तेरदाळ ग्रामामाझारी ॥७॥

धन्य पांडुरंगराव । पोटी आला देवदेव ॥१॥
धन्य रुक्मिणी जननी । जें का पूर्वीची अंजनी ॥२॥
कार्तिक शुद्ध अष्टमीसी । बालक आलेसे जन्मासी ॥३॥
दासा काही बोलवेना । लागा हनुमंतचरणा ॥४॥

हनुमंत अवतार म्हणीतले । म्हणाल अनुमाने सांगितले ।
तरी त्यानी आपुले एके पदी असे लिहिले । स्वये अंजनीसुत ऐसे ॥१॥

( गुलाल श्लोक )

गुलाल उधळा आता महद्‌भाग्य जन्मा आले ।
प्रकाश पडला कसा कुणी असे कधी देखिले ।
चला झणी बघु आता रुक्मिणीसुताते बरे ।
मुखी वदू ही धन्य सत् गुरुनाम अत्यादरे ॥१॥
हनुमंत अवतार । होता आनंद दाटला थोर ।
झाला नवल चमत्कार । सखये बाई ॥१॥
ब्रह्मादिक सुरवर । आले दर्शना साचार ।
गंधर्व चारण किन्नर । सखये बाई ॥२॥
ऋषी मुनी संत सज्जन । आले दर्शनालागून ।
पाहती मदनमोहन । सखये बाई ॥३॥
सूतिकागृही सुटला सुवास । पडला अवर्णनीय प्रकाश ।
पार नसे आनंदास । सखये बाई ॥४॥
दीन दास वेडा झाला । पाहता त्या स्वरूपाला ।
करी आनंदे गायनाला । सखये बाई ॥५॥

( ओव्या )

पाहाता सुकुमार सुंदर । मदनमोहन बालक थोर ।
देहभावाचा पडला विसर । रूक्मिणी मातेसी त्या ठायी ॥१॥

म्हणती बालक हे निराळे । करील परमार्थाचे सोहळे ।
दावील आगळे । प्रचीतीसी आणोनी ॥२॥
सद्‌गुरुंची भक्ती करोनी । डंका गाजवेल त्रिभुवनी ।
परमार्थाची ती निशाणी । दाखवील जगासी ॥३॥

(न्हाणी)

न्हाणो न्हाणो या बालकाने न्हाणी । याते बाळ ऐसे कोण वदे वाणी ॥१॥
ही तो सर्व विश्वाची जननी । अवतारे आनंदली धरणी ॥२॥
निर्गुणची सगुणासीं आले । करावया भक्तीचे सोहळे ॥३॥

( पाळणा )

जो जो जो जो रे हनुमंता । कैवल्यामृत दाता ।
निद्रा करी बाळा वेल्हाळा । कुळभूषण मम त्राता ॥१॥
धन्य तू जगती हे कळले । पाहता तुज सम मेळे ।
अवतारिक पुरुषा जगदीशा । परात्परा सर्वेशा ॥२॥
रत्नजडित पाळणा । माजी निज मनमोहना ।
रामदूत तू यशमूर्ती । रुक्मिणीनंदना ॥३॥
दीन दास हा नव चरणी । झाला लीन निशिदिनी ।
प्रेमे पाळणा तो स्वमनी । गाईला उन्मनी ॥४॥

( अभंग )

गुरूलीला कोण । पूर्ण करेल वर्णन ॥१॥
गुरू देव नाही दोन । ऐसे बोलती साधुजन ॥२॥
घेऊनी बरोबरी सवंगडी । चाखे नामामृत गोडी ॥३॥
देव ठेवोनी पुढती । प्रेमे आनंदे डोलती ॥४॥
दीन दास बोले लीला । ऐकुनी सुख होय चित्ताला ॥५॥

हनुमंत बाळ माझे गुणवान गोजिरे । अतितर ही बुद्धी साजे साजिरे जे खरे ॥१॥
असुनिया बाल वय जे ज्ञानी गोमटे । सदैव अंतरी ज्या प्रभू राम प्रगटे ॥२॥

# चोखोबा आख्यान : २०

८९१

जगत्पिता गुरुमाय सखा जो पांडुरंग सकळाला ।
चोखोबाची पाहुनी भक्ती सेवी प्रभू अन्नाला ॥१॥
जेवुनिया जो ढेकर देई तृप्ती होवुनी त्याला ।
भक्तजनाही समाधान परी लौकिक ऐलची ठेला ॥२॥
धन्यची चोखा म्हणती संत परी लौकिकी काम जनाला ।
काय भुरळ ही देवा पडली म्हणती हरी बाटविला ॥३॥

भाव करी आपुला । हरीसी ॥ध्रु॥
द्वैतभाव वैषम्य सारुनी । करितो हरी लीला ॥१॥
चोखोबांचे संगे राहूनी । सांडी अहंतेला ॥२॥
मान विसरूनी ढोरे ओढी । होई भक्त खुळा ॥३॥

बळेची चोखोबासी हरीने घातियला हार ।
आणी पाचारिले काय तू जातीचा महार ॥१॥
ऐसा हा भगवंत झाला प्रेमाचा वेडा ।
विलयासी गेले सारे द्वैत हे पुढा ॥२॥
अभेद झाला अद्वय सारा संतांचा मेळा ।
भेदाभेद कोठे येती सर्वही राऊळा ॥३॥
विठ्ठलाचे गजरी भेटूनिया एकमेका ।
सुखाचिया गोष्टी सांगूनी भोगिती या सुखा ॥४॥

(श्लोक : दिंडी)

चोर म्हणूनी वेढिले या पहा ना । भक्तरायासी दुःख साहवेना ।
म्हणोनी तेणे भाकिता करूणा । येई धावूनिया पंढरीचा राणा ॥१॥

(ओव्या)

गळा बांधोनिया दोर । तुडवावे बैलाकरवी साचार ।
भक्त चोखोबालागी सत्वर । आज्ञापिले बडव्यानी ॥१॥

चोखोबांची पत्नी आपण । आली तेधवा धाऊन ।
सकळ ही वार्ता ऐकून । भाक देई विठ्ठला ।।२।।

(पदः) शिंगे धरूनी उभा विठोबा । शिंगे धरूनी उभा ।
बैल राहिले उभा तेधवा बैल राहिले उभा ।।१।।
काय ग रांडे चेटूक केले बडवे पुसताती ।
शिंगे धरूनी उभा विठोबा सांगे बाईल ती ।।२।।
नवल देखुनी शरण जाहले सारे ते बडवे ।
दासराम हा नमस्कारितो प्रेमाच्या भावे ।।३।।



# सण : २१

## १००

हीच एक हो एक हो दिवाळी । बुद्धी पणती ती पणती ती लाविली ॥१॥
हो मनाची मनाची वात केली । प्रेमस्नेहाने दीपिका भरीयेली ॥२॥
स्वयं ज्योत ही ज्योत प्रगटली । ज्ञानअग्नीने वात पेटविली ॥३॥
तेथे षड्रिपु षड्रिपु ही बळी । दासा अंतरी ज्योत प्रगटली ॥४॥

## १०१

पाडवा पाडवा षड्रिपु पाडवा । श्रीरंग आठवा बाईयानो ॥ध्रु॥
भक्तीची ही काठी नामाचा हा ध्वज । जेणे रामराज साह्य होय ॥१॥
बुद्धीची ही कुंची ज्ञानाची ही माळा । श्रीरंग सोहळा बाईयानो ॥२॥
नाम कडुलिंब खावा त्या दिवशी । प्रतिपदा ऐसी राम म्हणे ॥३॥

## १०२

साधुसंत येती घरा । हाचि दिवाळी दसरा ॥१॥
अहो साधुसंत चरण । खरोखरी आहे सण ॥२॥
देव पूजी साधुसंता । थोर सामर्थ्य तत्त्वता ॥३॥
साधुसंताचा प्रसाद । दासा वाटे ब्रह्मानंद ॥४॥

## १०३

रंगलासे आत्मा रंगवी सकळा । दावी नाना कळा प्राणियासी ॥१॥
बहूत रुपाने नटला ईश्वर । प्रेमरंगे थोर रंगलासे ॥२॥
नामबळाचेनी उडवावा रंग । जेथे होय दंग हरी माझा ॥३॥
रंगी व्हावे रंगरुप आपण गा । जाणावे श्रीरंगा भूतमात्री ॥४॥
पंचभूतामाजी मी म्हणे जो जीव । नामरंगी शिव होय जेव्हा ॥५॥
राम म्हणे तेव्हा रंगाची पंचमी । घडलीसे ऊर्मि नामी येता ॥६॥

## १०४

मायेतोनी पैलतीरा । जाणे हा जाणा दसरा ॥१॥
नाम सुवर्ण सुवर्ण । द्यावे घ्यावे अप्रमाण ॥२॥
देता घेता महालाभ । राम होय पद्मनाभ ॥३॥

## १०५

पौर्णिमेसी झाला होम । अमावास्या धूर परम ॥१॥
पाडव्यासी नामामृत । घ्यावे बैसोनी निवांत ॥२॥
दिवाळीचा उत्सव बरा । साधुसंत येती घरा ॥३॥
रंगपंचमी श्रीरंग । दसरा सुवर्णाचे अंग ॥४॥
संती साधिले हे सण । दासराम करी गान ॥५॥

## १०६

संक्रांतीचा तिळगूळ घ्या हो माझा तिळगूळ ।
तिळगुळापरी होऊनी आपण साधू ही वेळ ॥१॥
श्रीहरिपायी हेची इच्छूया जरी हा कटू काळ ।
चारी पुरुषार्थी ते साधुनी मिळवू पद अढळ ॥२॥
तिळासारिखे प्रेम राखुनी जतन करु शील ।
परसंस्कृती ही थोपवू विजये दावुनी मन विमल ॥३॥
गुळासारिखी गोडी राखू विसरु हळहळ ।
कलह मोडुनी हिंदुधर्मा घालूया माळ ॥४॥
परंपरा ही शुद्ध जगाची द्वैतरहित निखिल ।
अद्वैतावरी घाला घाली नुरवू त्यासी पळ ॥५॥
मिरवू कवतूक निजधर्माचे जगती या अखिल ।
समर्थ शिवबा धर्मधुरंधर शिकविती गुण अतुल ॥६॥

अनंत घाले सोसुनी टिकला धर्म बरा भूपाळ ।
वंदन करु त्या निजात्मभावे करु या श्रम सुफल ॥७॥

जगासी निववुनी अद्वय स्थापुनी करू आनंद सुकाळ ।
ज्ञानेश्वरवच सत्य करील हा दासरामी गोपाळ ॥८॥

१०७

माय पोकळीमा बाप तो हंकारू । तेथे जीवेश्वरू निर्मियेला ॥१॥
कुळाते ग्रासोनी मुळीच पहाता । सर्वापैल हाता ब्रह्म येई ॥२॥
मासामध्ये शीर्षू हा सर्वेश्वरू । जाणिजे गव्हारु गुरुमुखे ॥३॥
पंथ हा शीर्षाचा अंतरी चोखाळी । देव सहस्त्रदळी दासरामा ॥४॥



# तीर्थ : २२

९०८

चला काशीयात्रे जाऊ । काशी विश्वेश्वर पाहू ।।ध्रु।।
आमुच्याजवळीच आहे काशी । आमुची पातके अवघे नाशी ।।१।।
काशीवाट हे पश्चिम । तेथे धरी शिवनाम ।।२।।
तेथे गंगेचेही स्नान । दास म्हणे शिवगान ।।३।।

९०९

चला जाऊ पंढरपुरी । पंढरपुरीची यात्रा बरी । ।।१।।
काया आहे पंढरपुरी । आत्मा आहे विठ्ठल हरी ।।२।।
कशासी जाता दुरी दुरी । जवळी असता पंढरी ।।३।।
विठ्ठलाचे स्मरण करी । दासा विठ्ठल येई घरी ।।४।।

९१०

आम्ही जातो पंढरपुरी देही मुरारी ।।ध्रु।।
पंढरपुरीची एक वाट दशमाद्वारी उभा नीट ।
नाद भरलासे घनदाट पाही मुरारी ।।१।।
विठ्ठल हरी नाम सोहळा । जमला गोपाळांचा मेळा ।
हरिभक्तीचा उमाळा रंगची भारी ।।२।।
दास म्हणे थोर महिमा । झाली बोलण्याची सीमा ।
सज्जन वदती विठ्ठलनामा जयजयकारी ।।३।।

९११

चला अयोध्येसी जाऊ । सीताराम तेथे पाहू ।।१।।
आमुच्यापाशी ही अयोध्या । रामनामे होई साध्या ।।२।।
कणी न कणी आहे राम । म्हणुनी वाटतो आराम ।।३।।
ठायी ठायी स्मरी राम । दासा लाभे तो आराम ।।४।।

११२

चला जाऊ पंढरीसी । तेथे पाहू विठ्ठलासी ।।१।।
आमुच्या जवळी हा विठ्ठल । आम्ही सर्व त्याचे बाल ।।२।।
एक दीस घडे वारी । ठाई विठ्ठल नाम हरी ।।३।।
दास म्हणे अहो देवा । घ्यावी अखंडित सेवा ।।४।।



# धर्म : २३

### ९१३

विश्वसार म्हणोनी मानती आनंद । परी दिसे कंद दुःखाचाची ॥१॥
हा तो नव्हे धर्म सांगितले वर्म । यात असे मर्म भाईयानो ॥२॥
जितके दिसते तितुके नेचर (Nature) । अपार असार भाईयानो ॥३॥
त्या आत पहाता ईश्वर भरला । धर्म तो बोलिला गोविंदतनय ॥४॥

### ९१४

जेणे योगे होय कर्म । तोची जाणावा स्वधर्म ॥१॥
जेणे योगे देह चाले । त्यासी धर्म बोलियेले ॥२॥
ज्याची सत्ता ही अगाध । जेथे होय मतिमंद ॥३॥
गोविंदतनय म्हणे बरवा । धर्म जगी ओळखावा ॥४॥

### ९१५

सर्वांचे अंतरी धर्म तो सारखा । दुजा भाव देखा नाही तेथे ॥१॥
जो का दरिद्र्यात तोची श्रीमंतात । म्हणोनी अद्वैत बोलताती ॥२॥
आत्मा तोची धर्म नाम तो आचार । संत सदाचार बोलताती ॥३॥
गोविंदतनय सांगे सकळा अंतरी । भरला श्रीहरी सारिखाची ॥४॥

### ९१६

सर्व जाणावे परके । आपले आत्मरूप निके ॥१॥
तेथे करावे की प्रेम । तोची जाणावा स्वधर्म ॥२॥
स्वधर्मे चालावे । तेणे योगे सुखी व्हावे ॥३॥
म्हणे गोविंदतनय । संता वश रामराय ॥४॥

### ९१७

जेणे योगे नडे जीवा । तोचि धर्म पै जाणावा ॥१॥
धारण पोषण ज्याचेमी । जेणे जिवंत राहे प्राणी ॥२॥
म्हणे गोविंदतनय । खूण समजोनी राहे ॥३॥

११८

धर्मासी जाणोनी जो का होय लीन । धार्मिक तो जाण खरा खरा ॥१॥
वृत्ती बा रंगली ज्याची आत्मयात । चैतन्यची चित्त ज्याचे झाले ॥२॥
गोविंदतनय म्हणे या जगती । केलिया हो भक्ती धन्य होसी ॥३॥

११९

मिरवू कवतूक निजधर्माचे । जगती या अखिल ।
समर्थ शिवबा धर्म–धुरंधर शिकवी गुण अतुल ॥१॥
अनंत घाले सोसुनी टिकला धर्म बरा भूपाळ ।
वंदन करू त्या निजात्म भावे करु या-श्रम सुफल ॥२॥
जगासी निववुनी अद्वय स्थापुनी करू आनंद सकळ ।
ज्ञानेश्वरवच सत्य करील हा दासरामी गोपाळ ॥३॥



# नेचर : २४

## ९२०

आईबापाविण जन्मा आले पोर । तसेची नेचर (Nature) सुधारक हो ॥१॥
नेचर (Nature) म्हणोनी होताती खेचर । नामी सत्य सार कळो येई ॥२॥
नास्तीकपणाने होत असे हानी । म्हणोनिया मनी स्मरा राम ॥३॥
गुरूराज म्हणती उघडा हो डोळे । नामी प्रेमकळे पहा त्यासी ॥४॥

## ९२१

ऐसे कैसे हे शरीर । शोभिवंत जे बाहेर ॥१॥
आत उकलोनी पहाता । अमंगळ वाटे चित्ता ॥२॥
जे का आहे अपघातकी । न चले आत्म्यावीण परीकी ॥३॥
वरी दिसे बहू गोमटे । परी क्षणामाजी आटे ॥४॥
आत्म्यावीण राहे स्थिर । ऐसे कैसे हे नेचर (Nature) ॥५॥
गुरूराज बोले गूढ । येथे प्राणी होती मूढ ॥६॥

## ९२२

आत नसता परमेश्वर । होते बधिर शरीर ॥१॥
जे का स्वतःसिद्ध आपण । तया काय म्हणोन मरण ॥२॥
जे का सिद्धची नटलें । तरी का उपसाधन लागले ॥३॥
ऐसे कैसे हे नेचर ( Nature ) । भीक मागे निरंतर ॥४॥
गुरुराज म्हणे । वर्म जाणोनिया घेणे ॥५॥

## ९२३

ऐसे कैसे विश्वसार । लंगडे पडते अखेर ॥१॥
वरी वरी दिसे शोभा । आत आहे म्हणुनी गाभा ॥२॥
आत शक्ती असे जरी । दिसे निसर्ग कुसरी ॥३॥
गुरुराज म्हणे जीवा । भज भज रे माधवा ॥४॥

# संकीर्ण : २५

## १२४

दधिमाजी लोणी रवि घुसळेना । लोणी ते निघेना ते निघेना ॥१॥
देह ताक आहे देव लोणी आहे । नाम-रवी पाहे घुसळेना ॥२॥
वर्म ते चुकले वर्म ते चुकले । भाग्यवंत नरा प्राप्त झाले ॥३॥
सत्संग दुर्लभ सत्संग दुर्लभ । येचि देही सुलभ करी मना ॥४॥
दास म्हणे एक नरदेही दुर्लभ । गुरुकृपे सुलभ करी मना ॥५॥

## १२५

अहो हा काळ काळ टपुनी बसला । सोडवा यातुनी कुणी मजला ॥१॥
अहो उंदीरा उंदीरासी जै बोका । तैसा काळ खाई लोका ॥२॥
अहो हा काळ काळ करी ग्रास । करितो सर्वांचा नाश ॥३॥
चांग वाईट चांग तया काही । माझे तुझे सर्व काही ॥४॥
दास म्हणे थोर थोर सान । तयालागी नाही जाण ॥५॥

## १२६

करू या चहा चहा भावाचा । फुंकूया घुमारा श्रीचा ॥१॥
भक्तीचे पाणी पाणी घातियले । प्रेम उकळीने भरले ॥२॥
नामामृत अमृत टाकियले । उत्तम पेय ते जहाले ॥३॥
ऐसे पिता पिताची अमृत । दास म्हणे तोचि संत ॥४॥

## १२७

अज्ञान डोही बुडला नाही तो संन्यासी । एकतत्त्व धरूनि राही तो संन्यासी ॥१॥
निश्चळपणे गढूनि गेला तो संन्यासी । सोहंस्मरणी गढूनि गेला तो संन्यासी ॥२॥
दास म्हणे धामी नुरला तो संन्यासी । येची देही विदेही झाला तो संन्यासी ॥३॥

## ९२८

कलियुगे केले धर्माचे वाटोळे । डोळसा आंधळे केले पाही ॥१॥
धर्म म्हणजे काय नसेची ठाऊक । ऐसे झाले देख कलिमाजी ॥२॥
विषयाअधीन सर्व झाले जन । मद्याचे सेवन करिताती ॥३॥
धर्माची लालसा नसे हो कोणास । हरिभजनास कंटाळती ॥४॥
कर्म धर्म सांग न होती ते पाही । म्हणुनी नाम गाई देवाजीचे ॥५॥
सज्जन पुराणे प्रसिद्ध धर्मग्रंथ । चार सहा सत्य वानिताती ॥६॥
सकळांचे सार हा तो नामधर्म । बोलिती परम देवराय ॥७॥
दास म्हणे सोडा अधर्म हा असार । नाम गाता अमर होसी पाही ॥८॥

## ९२९

सद्‌गुरूचरणी ठेवूनी विश्वास । नाम अहर्निश गाता धन्य ॥१॥
नामावीण काही नेणे तीर्थव्रत । जगामाजी मुक्त धन्य खरा ॥२॥
दृढविश्वासाचे ऐसे आहे फळ । जाणिजे केवळ दास म्हणे ॥३॥

## ९३०

अहो रहस्याची गीता । संती बाणली तत्त्वता ॥१॥
गीता हाचि राजमार्ग । देवप्राप्तीचा सुयोग ॥२॥
गीता गीता वाचे वदता । खरी होय सार्थकता ॥३॥
याची पहावी प्रचीती । दास म्हणे खुंटे गती ॥४॥

## ९३१

विसरू नको गुरुराया ।
मजवरी करी बहू दया ॥१॥
मार्ग विसरूनी मी तो फसलो होती कष्ट जीवा या ।
न कळे मजला काही आता दावी मार्ग बा सदया ॥२॥
बहुतचि दुस्तर आहे गुरूजी प्रभुरायाची माया ।
तर्क कुतर्कचि मनी बहु उठती चित्त न लागे पाया ॥३॥
आपण दयाळु कृपाळु म्हणुनी शरण आलो तव पाया ।
आपुल्या पायी प्राण वित्त मन आणिक अर्पिली काया ॥४॥
राम विनति करी चरणापाशी मुक्त करी बद्धा या ।
तुजवीण कोणी नाही जगी मज भव हा पार कराया ॥५॥

## १३२

पराविया नारी माऊलीसमान । होवो परधन माती ऐसे ॥१॥
तरी तुझी कृपा मज झाली साची । कर्णी गोविंदाची कथा पडो ॥२॥
हरिदिनी मज घडो उपवास । दासरामी सहवास हरिदासांचा ॥३॥

## १३३

सहजासन सहज दृष्टी । सहज पदीं झाली भेटी ॥१॥
सहजगती सहज नाम । अवघे झाले सहज ब्रह्म ॥२॥
सहजकृपा सहज बोध । सहज गुरू परमानंद ॥३॥
सहज सहजी सहजा आले । सहज होवोनिया ठेले ॥४॥
सहजभक्ती सहज समाधी । सहज साक्षात्कारसिद्धी ॥५॥
दासराम सहजानंद । सेवी आनंदी आनंद ॥६॥

## १३४

काढले दिवाळे मुद्दल बुडाले । आम्हासी मोकळे ब्रह्मांड ते ॥१॥
सद्‌गुरू सावकार पांडुरंग सरदार । धन्य साक्षिदार हरीचे भक्त ॥२॥
काय घेती माझे ठेवोनी बंदीखानी । लाज नये मनी आता काही ॥३॥
जीवानुसंधाना देती पुरणपोळी । आम्हासी दिवाळी बंदीवासी ॥४॥
प्राण अर्पियेला सद्‌गुरु दातारा । जहाला सोयरा कुळाचा या ॥५॥
सावकार कुळा सोयरीक झाली । दासरामा लाधली सहज कळा ॥६॥

## १३५

करितो हमाली सद्‌गुरुघरची । नित्य खातो त्याची पुरणपोळी ॥१॥
एकेका कोटीसी लक्षाची दलाली । अघटित दिधली अमृतधारा ॥२॥
स्वस्थ राही ऐसी सांगितली सेवा । आवडते देवा भगवंता ॥३॥
संताच्या दासाच्या पायीचा पायीक । दासराम निःशंक द्वारी उभा ॥४॥

## १३६

भरिला सागर ज्ञानाचा । झोत वहातो वायूचा ॥१॥
विज्ञानाचा सूर्य उजळे । शब्दाचे ते ढग झाले ॥२॥
स्वाती नक्षत्र उच्चार । ऐसा योग आला थोर ॥३॥

गुरूकृपेचा पाऊस । वाहे नाम ते सुरस ॥४॥
नाम शद्व शिंपल्यात । थेंब पडता झाले मुक्त ॥५॥
नामाचे ते मोती घडले । अवघेचि पूर्ण झाले ॥६॥
नाम आदी नाम अंती । पूर्णत्व ते मुक्त स्थिती ॥७॥
झाला शद्बाचा निःशद्ब । झाला आनंदी आनंद ॥८॥
दासरामा सद्‌गुरूनी । बोध केला दाऊनी करणी ॥९॥

१३७

मारुतीने गिळीला सूर्य । देहामाजी अनुभव काय ॥१॥
रावणाने सीता नेली । हनुमंते शोधियेली ॥२॥
राम सीता एके ठायी । रामदूते आणिली पाही ॥३॥
रघुनंदनाचा प्राण । धन्य धन्य हनुमान ॥४॥
बलभीमाचे हृदयी । सीताराम मूर्ती पाही ॥५॥
भरत हा रामभक्त । काय देही याची मात ॥६॥
मेरुमांदार उचलिला । आणियेली जीवनकळा ॥७॥
हनुमंत देखोनिया । मही राक्षस जाय विलया ॥८॥
सीता पडली अग्निज्वाळी । तिने कायाशुद्धी केली ॥९॥
अयोध्येत सीताकांत । गेले असती आनंदात ॥१०॥
तेथे निर्गुणा मिळाले । आत्मरुपे एक झाले ॥११॥
काय देही या प्रचीत । घ्यावा विचार चित्तात ॥१२॥
हनुमंत सद्‌गुरुकृपा । होता साक्षात्कार सोपा ॥१३॥
पुराणीची गोष्ट जाणी । देही देखिली संतांनी ॥१४॥
दासरामा रामायण । गुरुनी बोधिले संपूर्ण ॥१५॥

१३८

कैसी रासक्रीडा चालिली या देही । सांग सांग माते यशवदे बाई ॥१॥
येशवदा म्हणे मी झाले मतिमंद । देवकी म्हणे मी आनंदाचा कंद ॥२॥
गौळणीसंगे खेळतो फुगडी । बाहेर ओढ घेता त्यांच्या वेण्या ओढी ॥३॥
फूः फूः करोनिया खेळतो फुगडी । मुरलीची ज्याने लावियेली गोडी ॥४॥
शेष जेथे डोले वेद मुके झाले । भान विसरले गौळणींचे ॥५॥

गाई गोळा करूनी बैसतो श्रीकृष्ण । दही दूध लोणी खातसे चोरून ॥६॥
भक्तिनाम गोपीने केले कवतूक । जिची हारपली देही तानभूक ॥७॥
सासूने बोधिले दिवा लावण्यासी । जावोनिया कृष्णाघरी परत येण्यासी ॥८॥
(वात) काकडा घेवोनि (या) कृष्णाघरी गेली । तेथे काय झाली चमत्कृती ॥९॥
वात ज्योती लागी न लावीच तेथे । पहाता कृष्णाते काय झाले ॥१०॥
आपआपणासी विसरोनी गेली । ज्योतिवरी धरली करांगुळी ॥११॥
भगवंते पोचविली आणुनिया घरी । करांगुळी ज्वलित होती नव्हती देहावरी ॥१२॥
सासूची आघवी दैनाची उडाली । सुनेजवळी येता ज्योतिरूप झाली ॥१३॥
ज्योतिरूप झाली सून आणि सासू । जेथे प्रेमरसू ओथंबला ॥१४॥
वात ते राहिली सत्य जैसी तैसी । सुनेपरी सासूसी वृत्ती झाली ॥१५॥
जे होती वैरीण भक्तिभावनेची । कैसी केली तिची स्थिती पहा ॥१६॥
अवघेची कृष्णे घर बुडविले । गोकुळहि नेले आपरूपे ॥१७॥
गोळणीची संगती जयासी जहाली । त्याने त्याने देखिली श्रीकृष्णमूर्ती ॥१८॥
चोरोनिया गोपी राहिली अंतरी । ठाव दिला सत्वरी भगवंते ॥१९॥
गोपीचे मुखात प्रकाश पाडिला । महाभूत लीला दावियेली ॥२०॥
संतसंगे दासराम गोपी गेली । कृष्णाची देखिली देही कळा ॥२१॥

## १३९

जया हाव तो भिकारी । संतोषी तो राज्यधारी ॥१॥
ऐसा संतांचा मामला । हरिभक्ता आकळिला ॥२॥
पापपुण्य जेथे नाही । धन्य धन्य ते विदेही ॥३॥
द्वैताद्वैत पैल । ब्रह्मानंदची केवळ ॥४॥
धन्य रघुनाथ गोविंद । भोगिताती स्वरूपानंद ॥५॥
दासराम झाला हीन । वर्णी हरिनामाचे गुण ॥६॥

## १४०

सहज चिंतन नवल साक्षात्कार । कृपेचा प्रकार सद्गुरूंच्या ॥१॥
गुरूपुत्रा ज्ञानाज्ञानापैल विभव । निरंजन ठाव शून्यामाजी ॥२॥
हरिभक्ति हरिनाम ते निघोट । उच्चार अवीट हरिकथा ॥३॥
नाना रंगातोनी नामरंग देखता । निश्चळ तत्त्वता दासराम ॥४॥

## १४१

एक स्वप्न साक्षात्कार । दुजा सगुणी निर्धार ॥१॥
तिजे जाणावे निर्गुण । चौथे प्रत्यक्ष प्रमाण ॥२॥
सगुण निर्गुण आटणी । लक्ष्य राहे अलक्ष्यपणी ॥३॥
हा तो पाचवा साक्षात्कार । सहावा अबोल प्रकार ॥४॥
बोला बोलाते सारूनी । दासराम निरंजनी ॥५॥

## १४२

चलो मछिंदर गोरख अय्या । कमावणी किया सो दिनमे छुपाया ॥१॥
इस तनमनमे नामका घुमारा । दिव्य दृष्टी देखो बिंदु रूपमे उबारा ॥२॥
बिजली नाद सुनो अच्छा रामा । हरी करो भला ।
तेरा मेरा छोड दिया तो पकड हरी अल्ला ॥३॥
अक्षरका उपर चढा निरक्षर उनकू पढा ।
पट मो गढा साहेब बडा होवे दडा भाई ॥४॥
देखे आलख ज्योती निर्गुणमे मोती ।
दास कहे प्रीती स्वपनोमे येही ॥५॥

## १४३

डोई घेवोनी आसन । खाली बैसावे आपण ॥१॥
तयेपरी देहा मान । देऊनि आपण होत हीन ॥२॥
आत्मरूप जगाधार । असुनी म्हणतो विश्वसार ॥३॥
गुरुराज म्हणे । तुमचे होते उलटे करणे ॥४॥

## १४४

असत्य भिकारी भिकारी । भीक मागे दारोदारी ॥१॥
त्याच्यामागे आहे व्याप । जीवा आणिते संताप ॥२॥
गुरुराज म्हणे । संगे रहासी दरिद्रपणे ॥३॥

१४५

योगी तोची जाणा भला । योग साधोनी राहिला ॥१॥
जीव शिवरुप झाला । दृष्टिकोन सम झाला ॥२॥
जेथे उरला आनंद । एक परमात्मा गोविंद ॥३॥
म्हणे गोविंदतनय । धन्य जगी तोची होय ॥४॥

१४६

सांगा सांगा गुरुदेवा । कैसे भजू या केशवा ॥१॥
कैसा धरु ताल ठेका । काय गाऊ कवणे मुखा ॥२॥
कैसी बोलू तुझी गीते । लावू कोणत्या सुराते ॥३॥
कैसा लाऊ आता वीणा । सांगा सांगा नारायणा ॥४॥
कैसा वाजवू मृदंग । कोणेपरी होऊ दंग ॥५॥
आपआपणा कैसी साथ । सांगा करू सद्‌गुरुनाथ ॥६॥
दासराम हेची मागे । गायें संतसंगे उगे ॥७॥

१४७

एकरूप सत् चिद् घन । गाठी पूर्ण आनंदू ॥१॥
घनत्वाचे नाही ओझे । निजो निज पूर्णत्वे ॥२॥
चैतन्य हे मिळे सत्या । नुरे मिथ्या संभ्रम ॥३॥
स्मरण पूर्ण नामब्रह्म । भावधर्म भक्ती कै ॥४॥
धन्य कैवल्याचे धाम । दासराम कवण तो ॥५॥

१४८

धन्य हरिनामाचे दास । भक्तिरस सर्वांगी ॥१॥
गुरु आज्ञेचा बडिवार । अधिकार कथेचा ॥२॥
समाधान चित्ती । नम्र संती सर्वदा ॥३॥
जया श्रीहरी प्रसन्न । घाली आपण माळ भक्ता ॥४॥
दिव्यमाला श्रीहरी आपण । होऊनी प्रसन्न घालीतसे ॥५॥
दासराम शरण शरण । रातंदिन करो सेवा ॥६॥

## १४९

पूर्व पश्चिम दिशा जयासी जाहल्या एक जगी ।
एकपणे एकला विराजे असा भक्तयोगी ॥१॥
व्यापक होता मलिन कल्पना मावळोनी गेल्या ।
आत्मतत्त्वी त्या कळा पहा रे विकसुनिया ठेल्या ॥२॥
संतोषाचा लाभ जाहला आशा ते सरली ।
जन्ममरण हे फिरूनी न येती वृत्ती शांत झाली ॥३॥
अबोलाचिये खूण तेधवा स्वानुभवे कळते ।
दासाचे बोलणे जनासी प्रत्ययासी येते ॥४॥

## १५०

स्वरुप संप्रदायी स्वरुप साक्षात्कार । साधन विचार गुह्य भाग ॥१॥
चैतन्याचे पंथी चैतन्य उजळे । भक्तीचे सोहळे अनिर्वाच्य ॥२॥
आनंदपंथीया आनंदाचा लाभ । होतसे स्वयंभू आनंद तो ॥३॥
श्रीसंप्रदायी जाण मुक्ती जोडे । बंधन उघडे नाही होय ॥४॥
साधन घडता सर्व काही लाभ । दास हा स्वयंभ राम होय ॥५॥

## १५१

वदनी एक मंगलनाम । हृदयी अखंडित प्रेम ॥१॥
आनंदी आनंद । पाहे भगवंत गोविंद ॥२॥
धन्य तेची हरीचे दास । धाक चाले कळिकाळास ॥३॥
दया क्षमा शांती । दास म्हणे वानू किती ॥४॥

## १५२

देव दाऊ डोळा । परी दिसो हे उमाळा ॥१॥
काय करावे चांडाळ । परमार्था देती बोल ॥२॥
कोणी नाही पुसता । म्हणूनी चालिली अहंता ॥३॥
दास म्हणे बरे नाही । ठेचाळल्या अनुभव येई ॥४॥

## १५३

महा नारदमुनी । सदा रंगले कीर्तनी ।
कृष्ण रंगले पूजनी । महामुनी नारदांचे ॥१॥
काय भक्तीचे महिमान । देवा आवड कीर्तन ।
हाती घेऊनी सुदर्शन । रक्षण करिती भक्ताचे ॥ध्रु॥
नामदेवे कीर्तन केले । पांडुरंग नाचे डोले ।
पीतांबर गळे । भान नुरे देवासी ॥२॥
एकनाथांचिये घरी । हरी कीर्तनी टाळ धरी ।
सर्व सेवा करी । देवपण विसरोनी ॥३॥
तुकारामांचे कीर्तनी । प्रगट होय जगदानी ।
आलिंगे भुजानी । तुकया दिसे विठ्ठल ॥४॥
सद्‌गुरू तुकारामवचनी । दृढ विश्वास ठेवोनी ।
केली अघटित करणी । निळोबानी कीर्तनी या ॥५॥
पांडुरंग प्रगट झाले । निळोबाना दर्शन दिले ।
कीर्तनी दंग झाले । निळोबाना दर्शन दिले ।
कीर्तनी दंग झाले । ऐका महिमा भक्तीचा ॥६॥
हनुमंतराये कीर्तन केले । रेवणसिद्ध प्रगटले ।
अहो हास्यमुखे केले । तेज भरले भोवती ॥७॥
शिवस्वरूप प्रगट व्हावे । हनुमंता दर्शन द्यावे ।
पाहोनी नाचावे । हनुमंतरायांनी ॥८॥
हनुमंतराय प्रसन्न । होऊनी सच्छिषालागून ।
आज्ञापिती जाण । ऐसे कीर्तन करण्यासी ॥९॥
धन्य धन्य ते गोविंद । भोगिताती स्वरूपानंद ।
लागलासे कीर्तनछंद । करिती सेवा अखंडित ॥१०॥
कीर्तनाचे महिमान । प्रगट झाले हनुमान ।
दत्त गजानन । गुरूराज हनुमंत ॥११॥
वाडीस्थानाते माझारी । गजाननाचे मंदिरी ।
थोर कीर्तनाचे गजरी । नवल गोष्ट जहाली ॥१२॥
तेज भरले अपरंपार । डोळे दिपले साचार ।
मूर्तीवरील हार । फुले तुळशी पडली हो ॥१३॥
मूर्तीवरचे वस्त्र गळाले । वाटे काय डोले ।
आश्चर्य वाटले । सर्व लोका ते वेळी ॥१४॥
ऐसे चार पाच दिवस । सुटे चारी दिशे सुवास ।

पाहोनिया प्रकारास । बापूराव पुसता ते ॥१५॥
बापूराव सद्गदित । अंतःकरण प्रेमभरित ।
कंठ दाटोनिया येत । आनंदाश्रू पुसताची ॥१६॥
बापूराव तये वेळे । म्हणती ' भाग्य ' फळले ।
सावळिया विठ्ठले । दरूशन दिले वो ॥१७॥
गजानन कीर्तनी डोले । देहभान त्या न उरले ।
शुभ आशिर्वाद बोले । प्रेमभरे आनंदे ॥१८॥
जगद्‌गुरू दत्त आले । कृपा कटाक्षे देखिले ।
आशिर्वाद बोले । कीर्तन चाले अखंड ॥१९॥
मारूतिराज प्रगट झाले । भक्ता आलिंगन दिले ।
सुवास दरवळे । चोहीकडे जाण पा ॥२०॥
लोका आलेती धावोन । करिती सद्भक्तवंदन ।
ऐकोनी कीर्तन । प्रेमे नाचती सर्वही ॥२१॥
माझे महाराज प्रगट झाले । त्यानी हास्यवदन केले ।
कृपाकटाक्ष उधळले । वात्सल्याचे ते वेळी ॥२२॥
सर्वाकरिता लोटांगण । आशिर्वाद लाभला पूर्ण ।
म्हणोनिया खूण । प्रगट दिसली तुम्हासी ॥२३॥
प्रकाश सुवास ऐशा खुणा । तुम्हा दिसो आल्या जाणा ।
नाही तुमच्या पुण्या । पारावर आजला ॥२४॥
नामदेवांचे कीर्तनी । नाचे विठ्ठल देवधणी ।
तैशीच करणी । दिसो आली सर्वासी ॥२५॥
दासराम म्हणे हे कीर्तन । न कळे सद्‌गुरूवाचून ।
म्हणोनिया चरण । हृदयी धरा संतांचे ॥२६॥
रघुनाथराज तल्लीन । होती करिता हे कीर्तन ।
गुरूवचन प्रमाण । अखंड भक्ती चालविली ॥२७॥
गुरू रघुनाथांचे कीर्तनी । तैसे गोविंद कीर्तनी ।
गुरूमूर्ती डोलली जाणी । नागाप्पाण्णामहाराज ॥२८॥
महाराजांचे सुपुत्र भक्त । ते हे धन्य रघुनाथ ।
चालवील परमार्थ । निष्कामची होऊनी ॥२९॥
सर्व वाहिले गुरुपायी । निष्ठा बोलवेना काही ।
ठेविता हे डोई । त्यांचे पायी आनंदे ॥३०॥
देव प्रगटे ऐसा गुण । कोणे वर्णावे कीर्तन ।
सुवास सुटे जाण । थोर लागतो वरणासी ॥३१॥

## १५४

आम्ही देवाची लेकुरे । परी पाहण्या खोटे खरे ।
कसोटीसी बरे । लावियेले देवाने ॥१॥
ऐसे बोलती साधुजन । तेणे निर्मिले अज्ञान ।
जयाचे न लिंपे मन । तोची धन्य जाणावा ॥२॥
अज्ञानेची जन्ममरण । जीवा होय दुःख शीण ।
गुरुकृपे खूण । घ्यावी ऐसे दास म्हणे ॥३॥

## १५५

करिती दासबोध समर्थ । तेथ दाविला परमार्थ ॥१॥
सुखे करावा संसार । काही करावा विचार ॥२॥
मुखी गावे हरिनाम । काही करा नेमधर्म ॥३॥
गुरुभक्त होवोनी रहाता । होय सत्य जन्माची सार्थकता ॥४॥
दासराम आला शरण । तोडूनि मायेचे बंधन ॥५॥

## १५६

मायबाप गणगोत । देव सद्‌गुरु श्रीहनुमंत ॥१॥
तेणे केले समाधान । जरी मी तो हीनदीन ॥२॥
सांगितली भजनसेवा । पार नाही माझ्या देवा ॥३॥
दासराम हा सादर । जन्मोजन्मीचा किंकर ॥४॥

## १५७

कोणे ठायी अहंकार । कोणे ठायी निरहंकार ॥१॥
जीव कोठे हा सादर । कोण स्फुरवी अंतर ॥२॥
कोण जाले चराचर । कोण चालवी व्यापार ॥३॥
पूर्ण ब्रह्म नारायण । तेथ दासराम कोण ॥४॥

## १५८

राष्ट्राचे करी कल्याण । अहा भगवान ॥१॥
स्वातंत्र्य मिळो राष्ट्राला । चाखो दे मोक्षसुखाला ।
पाहू दे विजय हिंदूला । सत्यासी वाहू दे प्राण ॥२॥

हिंदुधर्म जगती वाढो । विश्वधर्म जगी हा उघडो ।
द्वैत हे जायीचे उखडो । लागू दे जगा तव ध्यान ।।३।।
ज्ञानेश्वर वैष्णव वीर । धर्मास्तव करी झुंजार ।
धर्म हा भागवत प्रखर । लाभू दे जगी या मान ।।४।।
भारती पुष्प अंजूली ही । दासराम प्रेमे वाही ।
त्याकरवी घे सेवा ही । देइ त्या तुझेची ठिकाण ।।५।।

९५९

अभ्र जैं वितळे । तरी आकाश निवळे ।
पाणी ओंढाळ खळाळे । शुद्ध होये आघवेची ।।१।।
जरी दुःखाचा कळस । तरी भरती आनंदास ।
पहा अंधारी प्रकाश । क्रम कंचा बरवा हा ।।२।।
जगी दुष्काळे सुकाळ । अतिसुखे गदारोळ ।
उफराटा वाहे काळ । पाठ द्यावी तैसीची ।।३।।
जरी विघ्ने पाठोपाठ । जरी ठाकली चोहाट ।
पुढे मार्ग हा चोखट । दिसे पहाता वाटचाली ।।४।।
हरी दावी तैसीं भ्रांती । तयाआतू सहज स्थिती ।
परिपूर्ण आत्मवृत्ती । सकळाचे परती जे ।।५।।
वस्तुपाशी वस्तुरूप । संत होती निर्विकल्प ।
जया न बाधी संकल्प । आस किरणू दासरामी ।।६।।

९६०

कीर्तनकाळी वंदन करू या । सोमेश्वरप्रभूला आजी या ।।१ ।
रेवणप्रभू श्रीमरुळसिद्ध गुरु । काडसिद्ध नारायण सद्‌गुरु ।
रघुनाथप्रिय राम रघुवीरु । श्रीहनुमंताला ।।२।।
नागाप्पाते नारायणपदी । रघुनाथा गोविंद तत्पदी ।
संतसज्जना प्रेमानंदी । जडू या चरणाला ।।३।।
दासराम हा लीन गुरुजनी । मागे सुमती ही गुणगानी ।
आशिर्वाद द्या बालकासी । विनती पदकमला ।।४।।

१६१

ब्राह्मणांचे हे राज्य दिसे आज । तया पाहता श्रीहरी सत्य काज ।
जयालागी धरी छत्र महाराज । स्वामी मोक्षाचा गणाधिपराज ॥१॥
स्नानसंध्या गुरुधर्म चालवावा । आत्मप्राप्तीचा मार्ग वाढवावा ।
सुखे आनंदे लोक हा पहावा । असे केले या हरीनेच जीवा ॥२॥
काय पुण्याई असे ब्राह्मणांची । मूर्ती लाधली ही पूर्ण तपस्येची ।
पराक्रमी ही अशी परंपरा ज्याची । भाग्यशाली शीलवान संस्कृतीची ॥३॥
प्रजा नांदे सानंद छंदफंदी । चित्तवृत्ती ते हेलवी आनंदी ।
उच्चशिक्षण मनी परिपूर्ण शुद्धी । जयाकारण हे श्रीहरीच आधी ॥४॥
दासरामी हे समाधान झाले । हरिगुण हे गावोनी चित्त धाले ।
करु सोहाळे ऐसिया सुवेळे । पुण्यतिथीदिनी गुण वाणी या रसाळे ॥५॥

१६२

गुरुतृतीया ही गोड किती होय सुखाची ।
जरी गाई कुणी गुणकीर्ती तृप्ती मनाची ॥१॥
हनुमत्प्रभू महाराज मंदिरी उभा ।
नवल प्रभा दिपवी नभा प्रगटली आभा ।
शोभा ही काय वर्णू आज येथीची ॥२॥

१६३

उजळणी करु या हरिनामाची ॥ध्रु॥
श्रीहनुमंतप्रभु कृपामूर्ती ते कीर्तन प्रेमाची ॥१॥
श्रीगोविंदजी विनम्र प्रतिमा कीर्तननिष्ठेची ॥२॥
नामस्मरणी धमाल उडवू जयजयकाराची ॥३॥
दासरामी या खूणगाठ ही कीर्तनसेवेची ॥४॥

१६४

रामाच्या स्पर्शाने अहिल्या पावन ।
तो राम जीवन ऐसी बुद्धी ॥१॥
ऐसा ज्या बुद्धीचा जाहला निश्चय । तेथ उणे काय परमार्थी ॥२॥
बुद्धी आत्मारामी एकरूप झाली । सदा विलसली अभिन्नत्वे ॥३॥
दासरामी आत्माराम कृपाघन । वरुषे सगुण निर्गुण तो ॥४॥

## ९६५

वेदाचिये वेलो नामाचा भोपळा । घेता नाममाळा येई हाती ॥ध्रु॥
वेदाचा हा वेल आकाशासी गेला । ब्रह्मांड व्यापिला तीही लोक ॥१॥
नीलाकार रत्ने आकाशी फेकली । पर्णे ती शोभली वेदवेली ॥२॥
सूर्य चंद्र यासी दोन फुले असती । नाग ते करती सळसळ ॥३॥
चकमक बीजा करती सळसळ । इंद्रधनु सरळ आडवे पडे ॥४॥
येथा वेलावरी गंगेचा वर्षाव । आकाश मांडव अंतराळी ॥५॥
म्हणूनिया वाढे सपाट्याने वेल । नमन करी काळ जयापुढे ॥६॥
ब्रह्मा विष्णु शंकर बसताती पाही । वनभोजन पाही करताती ॥७॥
वेद तोचि पाही जाण कल्पवृक्ष । ऐसी येत साक्ष अंतरस्थी ॥८॥
नामाचा भोपळा गाभा परब्रह्म । फळ ते उत्तम तीही लोकी ॥९॥
गाभ्यातील पाही चोखिता अमृत । भेटे भगवंत मोक्ष तेथे ॥१०॥
फळाची ती प्रभा असे लखलखीत । मित्र इंदु सत्य फिके पडती ॥११॥
नीळ आकाशात दिसे नीलबिंदु । जी ब्रह्मानंदु गढुनी जाय ॥१२॥
बिंदु तो फुटता ईश साक्षात्कार । फळ हेंचि सार रामनाम ॥१३॥
प्रभा तेचि फळ बिंदु तोचि गाभा । फुटता स्वयंभा रस पाही ॥१४॥
परी या वेलाची असे ही गंमत । आदीचा तो अंत न लगेची ॥१५॥
वाढतो हा वेल अजुनिया पाही । अजरामर पाही भाग्यवंत ॥१६॥
दास म्हणे ऐशा वेलाचा महिमा । जाणे शंकर उमा संतजन ॥१७॥

## ९६६

जयालागी जैसे लाधे समाधान । तैसे त्याचे मन होय स्वये ॥१॥
कोणी साधे साधन भाऊरावापरी । कृपा केली खरी नारायणे ॥२॥
जैशा जैशा चवी तैसे तैसे अन्न । दासरामा लूण संतसंगे ॥३॥

## ९६७

धन्य धन्य गुरुराव । मज कथिले अपूर्व ॥१॥
तेचि तुम्हा सांगितले । तनमनचि निमाले ॥२॥
जे का कळले अंतरी । तेचि प्रगटले बाहेरी ॥३॥
गुरुराज म्हणे । पहा पहा तत्परतेने ॥४॥

१६८

मनाअधीन जो झाला । त्याचा कार्यभाग बुडाला ॥१॥
दुसऱ्यावरी अवलंबला । त्याचा कार्यभाग बुडाला ॥२॥
मन होताचि अधीन । सर्व कार्यसिद्धि जाण ॥३॥
मन अधीन हो होई । दासा प्रगटे देव हृदयी ॥४॥

१६९

मनाचि ये एकनिष्ठा । सांडी संसारस्थान भ्रष्टा ॥१॥
मन आहे तर सूत । नाही तर तेची भूत ॥२॥
मन ज्याला आवरेना । तोचि सांसारिक जाणा ॥३॥
मन ज्याच्या हाती आले । दासा चित्त स्थिर झाले ॥४॥

१७०

एक ध्यानी ज्याचे मन । तयाजवळी देव जाण ॥१॥
मन हिंडवी त्रिखंडे । देवालागी ते नावडे ॥२॥
मग कैचा भेटे देव । देवावरी नाही भाव ॥३॥
देवाकडे जाता मन । दासा देव भेटी जाण ॥४॥

१७१

तत्वमसि सोहंभाव । तोची सत्य गुरूदेव ॥१॥
नामोच्चारण ते भक्ती । लक्ष्य तेथे सहजस्थिती ॥२॥
श्रवण कीर्तन विष्णुस्मरण । पूजन अर्चन वंदन ॥३॥
सख्य आत्मनिवेदन । अखंडीत अनुसंधान ॥४॥
घडे ऐसी नवविध भक्ती । दासरामा त्याचो प्रीती ॥५॥

१७२

कीर्तनी या नाचू अखंड प्रसादू । लागोनिया छंदू गोविंदाचे ॥१॥
खिरापतीलागी चुरमुरे वाटती । जेणे हा श्रीपती तुष्ट होय ॥२॥
संत सनकादिक हरिभक्त भेटती । आनंद तो किती वर्णू याचा ॥३॥
दासराम लीन हनुमंतपदाला । सोहळा दाविला कीर्तनाचा ॥४॥

१७३

बाह्य साधने ती नामाची उपांगे । एका भक्तिरंगे रंगविली ॥१॥
भक्तीचेनी योगे प्रगट हा देव । फासोनिया काव अंगा नोहे ॥२॥
बाह्य साधने ही मदत करिती । असलीया भक्ती अंतरात ॥३॥
गोविंदतनय सांगे विनवोनी । मनी घ्या जाणोनी भक्तिमहिमा ॥४॥

१७४

आहे ते सांडितो नाही ते मांडितो । पाठलाग करितो नाही त्याचा ॥१॥
सुखासी सांडोनी दुःख कवटाळितो । दैन्यवाणा होतो जगापुढे ॥२॥
काय म्हणो यासी काहीच कळेना । उपाय योजना फलसिद्धी ॥३॥
दासराम झाला गुरूकृपे भक्त । उमजोनी युक्त आत्मखूण ॥४॥

१७५

करणी करी काम नाहीं येथें बोलायाचे ।
अबोल बोले कृतीं साधते कीर्तनरंगी नाचे ॥१॥
कीर्तनरंगीं देव नाचतो काय आणिकांचे ।
कीर्तन भक्ती वरिष्ठ सर्वा भाग्य मोठे साचे ॥२॥
श्रोते वक्ते उद्धरती त्या नित्य हरीकीर्तने ।
मार्ग सांपडे भाविक जना लाभ नामस्मरणे ॥३॥
दासराम लीन जाहला हरिभक्तांचे चरणीं ।
मागणे अंतर माझे रंगो श्रीहरी गुरुवाणी ॥४॥

१७६

कानडयानें बोध मराठयासी केला ।
हाता काय आला बोध त्याच्या ॥१॥
जरी हा मराठा होईल कानडा ।
तरीच तो धडा गिरवील ॥२॥
झाडोनिया अंग मोकळा तू होसी ।
आधी शरण जासी संतालागी ॥३॥

संसारी होईजे दगड पाषाण ।
अंतरी लवण होईजे का ॥४॥
तरी मेळशील सुखाचे सागरी । तरोनी संसारी आनंदाने ॥५॥
दासरामा बोध सद्गुरुनी केला । आनंद दाविला स्वरूपाचा ॥६॥

१७७

हरिभक्ता एकची जाण । सदा हरीचे कीर्तन ॥१॥
येर नावडे ज्या काम । मुखी विठ्ठलाचे नाम ॥२॥
चित्त जहाले निवांत । सदा वर्ते अनासक्त ॥३॥
मानामाना नाही धणी । गुरूनिष्ठा अंतःकरणी ॥४॥
नामसंकीर्तनी । उभा करिती चक्रपाणी ॥५॥
चाले हरिनामाचा घोष । बोलती अभंग सुरस ॥६॥
धन्य धन्य हरिभक्त । तया राम शरणागत ॥७॥

१७८

छंद लागला मला तुझा । वारियासी संग माझा ॥१॥
मीही वारा तूही वारा । म्हणुनी देही या उबारा ॥२॥
मी तू मिसळू एकात । सांडुनिया सारे द्वैत ॥३॥
मीही तो तू तूही तो मी । अवघाची दासरामी ॥४॥



# साक्षात्कार पंचक पाठ : २६

### १७९

अष्टधेचे ज्ञान स्थूल देही जाण । सूक्ष्म देही खूण नवभक्ती ॥१॥
कारण शरीरी देखे दसवे द्वार । महाकारणी घोर शून्य ज्ञान ॥२॥
निःशब्दानुभव ज्ञान तयाचे ल । शून्ये शून्ये बोल अबोल गेले ॥३॥
ब्रह्मशाचे ज्ञान तयाचे अंतरी । सद्‌गुरूंचे घरी सद्‌गुरु दृष्टी ॥४॥
सद्‌गुरूंचे घर देवदेवा नेणवे । साधुसंता ठावे गुरुकृपे ॥५॥
दासरामा मौन श्रीगुरुचरणी । चाले निशिदिन डोळ्याबीण ॥६॥

### १८०

डोळा उडाला निशीदिनी । देह प्राणाचे स्पंदनी ॥१॥
बरे वाईट म्हणा काही । शुभाशुभ हरीचे पायी ॥२॥
पाटापरी पाणी जाई । करी गा ऐसे सद्‌गुरुमाई ॥३॥
सिद्धेश्वरा हे जीवन । नेंतो सद्‌गुरूनिधान ॥४॥
हारवो वृत्ती सरयी भ्रांती । दासरामा घडो प्राप्ती ॥५॥

### १८१

डाव्या डोळ्यामाजी नादघोळ जाला । कल्लोळ उसळला एकाएकी ॥१॥
डाव्या बाहूमाजी पावले स्फुरण । तेथे डावा कान जडुनी गेला ॥२॥
डाव्याने उजवा साक्षात्कारा आला । तेणे ग्रासियेला डावा भाग ॥३॥
बिंदुमात्र ब्रह्मे ग्रासियेले दोनी । दासराम चरणी जडला माये ॥४॥

### १८२

वाऱ्याने उडविला ब्रह्मांड पसारा । मावळला चुरा सुवर्णाचा ॥१॥
सोळिपामाझारी प्रगट चार कळा । गुप्त बारा डोळा देखती संत ॥२॥
ऐसे गुह्य गुज गुरुनाथे दाविले । दासरामा झाले नवल देही ॥३॥

## ९८३

सद्गुरु सद्गुरु नामाचा उच्चारू । परमार्थ सारू बीजभूत ॥१॥
बीज हाती येता वृक्ष हाती येई । दोनी एक देही सिद्धांतू हा ॥२॥
साक्षात्कार पंचकपाठ झाला पूर्ण । सत्य समाधान सोळा पाठे ॥३॥
गुरुलिंगजंगम सिद्ध साधु सद्गुरु । दावी विश्वंभरू मार्ग सोपा ॥४॥
हनुमंत सद्गुरु बोधिती या शिष्या । चित्तातु प्रकाशा काय उणे ॥५॥
बुद्धीचे वैभव पूर्ण विकासले । फळालागीं आले गुरुबोधे ॥६॥
कृपेची हे वाणी हनुमंतचरणी । अर्पी लोटांगणी आदरेसी ॥७॥
आनंदले मन आनंदले मन । दासराम चिद्घन गुरुपदी ॥८॥



# सहजानंदलहरी : २७

१८४

बहू नामरूप धारी । तो हा परमात्मा श्रीहरी ॥१॥
स्वये होऊनी नर नारी । आप आपणू क्रीडा करी ॥२॥
आपरूपी पाहे आपणा । भिन्न रूपी भावो नाना ॥३॥
ब्रह्म पूर्णानंद सिंधू । दासराम लवणबिंदू ॥४॥

१८५

घन ते न दिसे विरळ ते नासे । आकारेची भासे नानापरी ॥१॥
आपुली आपण ओळख सांडोनी । स्वतालागी दोनी म्हणीतसो ॥२॥
दृष्टी आतवरी आत्माची विवरी । घनानंद कुसरी भरला माये ॥३॥
दासराम तेथे कोण त्यावेगळा । अवघाची डोळा आत्मारामी ॥४॥



# स्वानंदलहरी : २८

## ९८६

माझे मजसी हिरावले । तेथे माझे काय उरले ॥१॥
माझे मज खोटे झाले । खरे होते भासविले ॥२॥
विस्तारला कैंचा भ्रम । कंचे रूप कंचे नाम ॥३॥
वस्तु आहे वस्तूपणे । परी लटिके हे देखणे ॥४॥
शद्बाशद्बाचिये गुणे । झाले दृष्टीचे देखणे ॥५॥
देखणेते व्यक्त शद्ब । उगा दावी भेदाभेद ॥६॥
अवघाची नारायण । तेथे दासराम कवण ॥७॥

## ९८७

आहे नाही लटिके दोनी । सारिखे जे असुनी नसुनी ॥१॥
परमात्मा तो निःशब्द । जीव शब्दाशब्दी बद्ध ॥२॥
शद्बाशद्बातीत नाम । नाम तेची पूर्ण ब्रह्म ॥३॥
आहे नाही ते दवडोनी । दासराम निरंजनी ॥४॥

## ९८८

राम कृष्ण हरी । नाम गाजे हृन्मंदिरी ॥१॥
तेथे मिळोनी रहाता । समाधान येई हाता ॥२॥
ऊर्ध्वगामी ऊर्ध्वपंथू । बीजमंत्र येई हातू ॥३॥
बीजाचेही बीज । दासरामी ब्रह्म निज ॥४॥

## ९८९

डोळा नाही ठावे । आतवरी भरले सवे ॥१॥
ते हे स्वरूप अतिघन । परिपूर्ण निरंजन ॥२॥
चंचळत्वाचा प्रकार । नानारूपी हे आकार ॥३॥
झाले द्वैतपणी पहाणे । दासरामाचे देखणे ॥४॥

## १९०

वर्तुळ आकृती चंचळ हे फिरे । पुनः होय स्थिरे निश्चळात् ॥१॥
तेथोनिया पुनः उठती लहरी । परतोनी माघारी कैशा येती ॥२॥
पंचभूत वलये मनाचे विचार । परतोनी स्थिर होती ब्रह्मी ॥३॥
निश्चळ निःशब्द पूर्ण नामब्रह्म । चंचळ ते अनाम दृश्य शब्दी ॥४॥
दासराम एक हरीच विचार । अद्वय अपार अनिर्वाच्य ॥५॥

## १९१

तुझी माया हे चंचळ । करी विश्वाचा हा खेळ ॥१॥
तुझ्या दृष्टीचा विक्षेप । करी द्वैताचा संकल्प ॥२॥
बोखटे हे पहाणे । स्वता दृष्टीचे देखणे ॥३॥
आप आपणू नर नारी । दासरामी खेळे हरी ॥४॥



# नामानंद लहरी : २९

११२

निजस्मरणा विसरवोनी । दावी नाना रूपे अवनी ॥१॥
अद्वयात्मा लपवोनी । द्वैतभाव दावी जीवनी ॥२॥
निजस्मरण अंश जीव । पूर्णरूप ब्रह्मभाव ॥३॥
निःशब्द अभेद । निजत्व ते निजानंद ॥४॥
दासराम मायेपैल । आहे तरी स्वरूप विमल ॥५॥

११३

नामानंद भरला नयनी । कैची पहाणी अभेदा ॥१॥
ते हे हरि-नाम निश्चळ । दावी चंचळ मायेसी ॥२॥
नामी मिळाले लोचन । डोळियात ते आपण ॥३॥
आपण आपणा ते पहाले । दासरामी अद्वय जाले ॥४॥



# अद्वयानंदलहरी : ३०

११४

नाही मी तू पण । अवघेची समाधान ॥१॥
ब्रह्मी नाही अधिक उणे । पूर्ण दृष्टीचे देखणे ॥२॥
चंचळाचे गुणे । झाले उपाधीचे लेणे ॥३॥
जेथे सहजाचे स्मरण । तेथे दासराम कोण ॥४॥

११५

डोळा ते प्रकृती । अणु परमाणूची व्याप्ती ॥१॥
कोण कोणाते पहाले । डोळियात स्वरुप आपुले ॥२॥
कैची माया कैचे द्वैत । विस्मरणू कैचा हेत ॥३॥
दासराम निजस्मरणी । आपुले ठायी आपुलेपणी ॥४॥

११६

चाखावया आपुले सुख । ब्रह्म जहाले अनेक ॥१॥
चिद्रूप ते स्मरण । जाले सगुण निर्गुण ॥२॥
होवोनिया गुणी अवगुणी । आपुलेपणी पाही दोनी ॥३॥
कल्पनेची सुखी दुःखी । निजत्वातू एकची एको ॥४॥
आवड आवडीने गिळिली । दासरामी स्नये धाली ॥५॥

११७

पहाणेची दर्शन पहाणेची दर्शन । जेथे द्वैतपण उरले नाही ॥१॥
द्वैतीचे पहाणे बोलटे बोलणे । आत्मा आत्मपणे आपुले ठायी ॥२॥
चक्षुमय सृष्टी एकपणे भेटी । पळाली त्रिपुटी निजस्थानी ॥३॥
केवळ पहाणे अखंड दर्शन । सहज समाधान दासरामा ॥४॥

# स्वरूप लहरी : ३१

## ९९८

तूची देव तूची भक्त । तुझे हाती हिताहित ॥१॥
ऐसे कळले प्राणनाथा । आम्ही तुझेची समर्था ॥२॥
सर्व तुझे हे संकल्प । नामामाजी निजरूप ॥३॥
स्मरणमात्र अवघे जीव । पूर्णरूप तो तू ठाव ॥४॥
अवघाची गुरूस्वामी । कोण उरला दासरामी ॥५॥

## ९९९

रूप पहाले नयनी । स्वयंप्रकाशू स्मरणी ॥१॥
हे तो संती नवलकळा । होता त्रिपुटी वेगळा ॥२॥
अवघाची झाला चक्षू । आत्मा आत्मपणे लक्षू ॥३॥
जेथे जाऊ तेथे आपण । दासरामी सुखस्थान ॥४॥

## १०००

पूर्ण स्वरूपी आपण । आपण ते निरंजन ॥१॥
ज्ञान कर्मी वाटे आला । परी तो उपाधीवेगळा ॥२॥
पाहू डोळा कवतूक । आपुलेची चाखू सुख ॥३॥
आत्मरूपी आत्मीयता । दासरामी अखंडता ॥४॥

## १००१

स्वरूप विमल । जे का निश्चळ केवळ ॥१॥
स्मरणाचे पूर्ण रूप । पूर्ण आनंद सद्रूप ॥२॥
स्मरण चैतन्य । जे का जाले जीवपण ॥३॥
दृश्यादृश्य ते चंचळ । शब्दाशब्दाचे जंजाळ ॥४॥
शद्वाशद्वा भेदाभेद । शून्यापैल ते निःशद्व ॥५॥
निःशद्व सद्रूप । आत सिद्ध ब्रह्मरूप ॥६॥
दासराम नामब्रह्मी । धाला संतसमागमी ॥७॥

१००२

सिद्धांतपंचक । अबोलाचे बोल सुख ॥१॥

उपाधी अनेक । सर्वांघरी आत्मा एक ॥२॥

कोठे गेलो तरी । मीच सर्वत्र निर्धारी ॥३॥

माझेवाचुनी अनुभव नाही । इंद्रिय दृश्य असुनी कायी ॥४॥

संत आनंदाचे स्वामी । कृपा करितो भक्तप्रेमी ॥५॥

आत्मरुपी सर्वानंद । निरूपाधी स्वतःसिद्ध ॥६॥

कृपेची ही वाणी । समर्पितो हनुमंत चरणी ॥७॥

हरिनाम दासराम । संतपवी घे आराम ॥८॥



# वायुलहरी : ३२

१००३

वायुरूपा निरंजना । काय वानू तुझे ध्याना ॥१॥
नाही हालत चालत । नाही बोलत खेळत ॥२॥
नाहीं भासत नासत । घन निश्चळ पूर्णाव्यक्त ॥३॥
सर्वव्यापित्व निःशद्ध । घनदाट तू अभेद ॥४॥
गुण अगुण सगुण । तू पा नव्हेसी निर्गुण ॥५॥
अवघेचि निरंजन । तेथे दासराम कवण ॥६॥

१००४

विज्ञान आटले । तेथ निरंजन उरले ॥१॥
नाही गुप्त ना प्रगट । परी हा उघडाचि निघोट ॥२॥
आत्मा लक्षिता साक्षात । वेडावलीं पा प्रचित ॥३॥
दासरामी समाधान । डोळियातु परिपूर्ण ॥४॥

१००५

केवळ आनंद । सार हरी आत्मा गोविंद ॥१॥
निरंजनीची लहरी । जे का अव्यक्त अंतरी ॥२॥
मूळ सद्रूप निघोट । तेथे आनंदाची लाट ॥३॥
आत्मरूपाचा आनंद । शुद्ध निःष्काम निशद्ध ॥४॥
हरी आनंद निष्काम । तेथ कैचा दासराम ॥५॥

१००६

वायुघर्षणी या प्रभा । पीतरूप आत्मगाभा ॥१॥
तेचि अग्निरूप सोहं । जीवभाव नुरे कोहं ॥२॥
गुण निर्गुण नासिले । पाप पुण्य दहन झाले ॥३॥
दासरामी सोहं ध्यान । जीवभावा पडले मौन ॥४॥

१००७

पीत ब्रह्मीचे पहाणे । महत् ब्रह्मीचे देखणे ॥१॥
देखणे हा उंबरठा । दोनीं वाटेचा चव्हाटा ॥२॥
आत्मलहरीचे गुणे । जालें आकारीचे लेणे ॥३॥
बोलिजे त्या महाशून्य । विशुद्धात्म्याचे दर्शन ॥४॥
श्वेत कळेआतु । आत्मसंकल्प निवांतु ॥५॥
चार चार आठ । शून्याची ते एकवट ॥६॥
दासरामी मौन । सोहंनामी समाधान ॥७॥

१००८

पीत आत्मा शून्य गेही । पूर्णपणें अंतर्बाही ॥१॥
पीत लहरी ब्रह्माकार । पुढे शून्याचा विस्तार ॥२॥
तेथ आत्म्याचे स्फुरण । परिपूर्ण जे विज्ञान ॥३॥
तोचि शुद्ध आत्मा शिव । विकासला स्वयमेव ॥४॥
शिव आत्मा आत्मवाणीं । साक्षिरूप राम ध्यानी ॥५॥
चैतन्या विश्रांती । अवघी प्रकाशाची व्याप्ती ॥६॥
अवघाचि प्रकाश । उफाळला चिदाभास ॥७॥
वर्णवेना रूप रंग । दासरामी हरीचा भाग ॥८॥

१००९

शिव आत्मा तो निर्गुण । तेथ रामकृष्ण सगुण ॥१॥
जेथ वारे हे उफराटे । चिद्‌गुणाचा नाद प्रगटे ॥२॥
शिवरूपी जे लहरी । कोंदली जे शून्यावरी ॥३॥
चिदाचिदाचा पसारू । शून्या ऐलाडू व्यापारू ॥४॥
श्वेत श्याम उष्ण शीत । रूप जीवभाव व्यक्त ॥५॥
चिदाकाशी चिदाभास । दोनी जाले दृश्यादृश्य ॥६॥
दासरामी रामकृष्ण । जे का जहाले चिद्‌गुण ॥७॥

१०१०

रामकृष्णी मन बुद्धी । परिपूर्णता त्रिशुद्धी ।।१।।
संकल्प विकल्प । तेचि मनाचे स्वरूप ।।२।।
निश्चयी संकल्प । तेचि बुद्धीचे स्वरूप ।।३।।
दासरामी मन । हाती येता समाधान ।।४।।

१०११

रामकृष्णी शून्य । पहाणे आपणा आपण ।।१।।
गुण अगुण आटले । भेदाभेद जेथ सरले ।।२।।
शून्य जे पहाणे । दृष्टीपरते चंचळगुणे ।।३।।
पहाणे दृश्यादृश्य पहाले । दासरामी सर्व धाले ।।४।।

१०१२

शून्याची लहरी । शब्द अस्फुट निर्धारी ।।१।।
अदृश्य अःशब्द । पहाता पहाता जे अभेद ।।२।।
प्रस्फुटता शब्द । नुरवी वरियाचा नाद ।।३।।
नाद गिळे वारा । अवघा वाराचि चातुरा ।।४।।
वरियाते लाट उठे । तेणेचि ते एकवटे ।।५।।
दासरामी वारा । देही तेणेचि उबारा ।।६।।

१०१३

अशब्द हा सिंधू । तेथ लहरी पैरा शब्दू ।।१।।
न दावी जे नादा । ताल सूर रस छंदा ।।२।।
शब्द चंचळ चंचळ । शीत उष्णत्वे तेजाळ ।।३।।
वारियाने विश्व प्रगट । दासरामी या निघोट ।।४।।

१०१४

वारिया मिळाले । ते ते वारे होवुनि ठेले ।।१।।
धन्य तेचि भक्त । चित्ते जहाले निवांत ।।२।।
गुरूकृपेची हे खूण । मुक्तदशा नामस्मरण ।।३।।

मुक्तीपरती भक्ती । केवळ जे आत्मस्थिती ।।४।।
पहाण्याचा जाला अंत । पहाणे बुडाले चित्तात ।।५।।
विज्ञान चोखट । दासराम तेथे विनट ।।६।।

१०१५

उघडिया डोळा अंधार दडाला । दृष्टीपुढे आला झाकिलिया ।।१।।
शून्याचे माझारी संकल्प निमाला । तेथे तो लोपला सूर्य चंद्र ।।२।।
जाणीव नेणीव हारपली जेथे । प्रकाश ना तेथे अंधारू गा ।।३।।
ब्रह्माचे घनत्व अंतर्बाह्य दृष्टी । अभेद्या त्रिपुटी उरली नाही ।।४।।
शून्याचिये पैल निजत्व स्मरण । नुरे विस्मरण एकाएकी ।।५।।
मावळवी जो का विश्वाचा आभास । नवल प्रकाश निजत्वाचा ।।६।।
देखणा होवोनी देखता अलिप्ती । दासराम प्रीती करी तेथे ।।७।।

१०१६

शद्ध आकारिले विश्व । सर्व घटी समभाव ।।१।।
उष्ण शीत आभा । अरूप आकारिला नभा ।।२।।
वायु–आकाशीची गाठी । तेणे आत्मा हृदयपुटी ।।३।।
हृदयी हरीचे भजन । दासरामी समाधान ।।४।।

१०१७

हनुमंते कृपा केली । वायुलहरी बोलविली ।।१।।
मायबाप ते समर्थ । सर्व जाणती हे उचित ।।२।।
दासराम तया शरण । हेचि मागे वरदान ।।३।।

१०१८

वाऱ्यावरी लागली नजर । देहभानाचा पडला विसर ।।ध्रु।।
जेथे तेथे परमेश्वर । ठायी नुरला गुणहंकार ।।
वारिया पोटिया गगन । सगुणा दावी निर्गुण ।
निर्गुणी तुषारू सगुण । जगताची उठली लहर ।।१।।

वारियाची पावुनी सिद्धी । हरीभक्त हरी आनंदी ।
सद्‌गुणाढ्य सद्रूप धुंदी । सहजाची सहज समाधी ।
वारे हे करी झणकार । श्रीहरीचा जयजयकार ।
वाचा या सारूनी चार । हरिवाचे हरीचा गजर ॥२॥
सारूनी गुणागुणाते । गिळुनी शून्याआतीते ।
रामकृष्णरूप त्यापरते । शून्य हे पहाले जेथे ॥
शामिता देखणे चित्ते । श्रीरामकृष्णहरी रूप ते ।
निःशब्द ब्रह्म उमजे ते । दासराम हा किंकर ॥३॥

१०१९

लागला हृदयीच वारा । म्हणुनी जहाला अंगी उबारा ॥१॥
रामकृष्णी नभ तेज जाले । पीतप्रभेचा नील पसारा ॥२॥
चिदाकाश ते शून्य व्यापिले । शब्दाशब्द असारा सारा ॥३॥
पीत आत्मता रामकृष्णी या । केवी मिळाली गुण ॐकारा ॥४॥
जीवदशे प्रकृती साधिली । दासरामी रूप नाम चातुरा ॥५॥

१०२०

वारियाची मौज किती न्यारी रे । वाऱ्यावरी माझी बहू प्रीती रे ॥१॥
वारा दावी सगुण निर्गुण रे । आत्मवस्तू दावी कशी प्यारी रे ॥२॥
वारियाच्या हाती जीव तारे रे । वारा हा जीवाचा जीवन रे ॥३॥
शुद्ध जे निरंजन वारे रे । चातुरा मनाचा साक्षी रे ॥४॥
आत बाहेर खेळे वारे रे । वारेची आवघे जाले रे ॥५॥
वारियाने आकाशा गिळिले रे । वारियाने आकाशा फोडले रे ॥६॥
आकाशात वारे हे भरले रे । नामरूप गुणाने नटले रे ॥७॥
संतासी अंकिले वारे रे । दासराम त्याचे पायी लोळे रे ॥८॥

१०२१

हा प्राण आटला वाऱ्यामाजी संगम किती हा गोड ॥ध्रु॥
शांत हरीच्या नामी काया । सर्व मन हे जाय विलया ।
वायुलहरी वायुसागरी मिनली । जेणे हरीची जोड ॥१॥

लाट उसळे वारियाची । वृत्ती हेले या मनाची ।
ते ठायीच रमली विराम पावुनी । हरिनामाचे कोड ॥२॥
नवल नभी या पहाली आभा । दृष्टी भरली दिव्य शोभा ।
वायुसंगे घर्षण होऊनी भरले । तेज कसे बिनतोड ॥३॥
वायुरूपे भक्त नटला । वायुरूपाकार झाला ।
दासराम ग्रासुनी चिदाकाशीया । निःशब्दाची जोड ॥४॥

१०२२

वारा डोळुला कसा वारा डोळुला ।
वारियाने जगामाजी उजेड केला ॥१॥
फार धूर्वी पहाता काय वायूचा गोळा ।
वारियाने पहाणे केले उघडे डोळा ॥२॥
वारा पहाता अवघा जगती तोचि आथिला ।
निश्चळपणे नाथिलाची होवुनिया ठेला ॥३॥
जीवदशा त्याचे ठायी तेजे प्रगटला ।
उष्ण शीत श्वेत श्याम रूपे व्यापिला ॥४॥
आधी पहाता पीताकार श्वेत पुढे जहाला ।
श्यामरूप शून्याठायी तोची पहाला ॥५॥
चैतन्याचा गुण ऐसा व्योमी शोभला ।
व्योमापासुनी व्योमची जाले नामरूपे नटला ॥६॥
वायु हरी ऐसा पहाता पहाता वाटला ।
दासराम निवांतपणे तटस्थची जाला ॥७॥

१०२३

आदी वारे अंतीही म्हणुनिया ते गगनात ॥ध्रु॥
गगनीची लहर । शब्दाची बहर ।
शांततेने पाहता हरिनाद कसा पवनात ॥१॥
हरी आला हरी आला श्रवणात या ।
या हो नयनात या । नयनाचा विज्ञान डोहो पहा ।
दासरामी एक ते हरिनाम अहा गगनात ॥२॥

१०२४

वारा हा प्राणदाता श्रीरामकृष्णी या ।
पीतात्मा अग्निरूपा आनंदू डोळिया ।
निःशब्दू श्रीहरी तो आत्मा हा आत्मया ।
निश्चळी या सद्घनू तो पहाताची रामी या ।।१।।

१०२५

वाराची देव आमुचा । वारा हा भक्त तयाचा ।।ध्रु।।
वारा हा मायबाप । हरवी जो त्रिविध ताप ।
विश्वाचा करी संकल्प । तो आत्मा या जगताचा ।।१।।
हा सांगातीचा धर्म । हा संप्रदाय बहू सुगम ।
निःशब्द रूप आणि नाम । हा दासराम ज्याचा ।।२।।

१०२६

ज्ञानदेवादी वारिया मिळाले वारेची होवुनी ठेले रे ।
नाथिले जे तेची आथिले निराकारू साकार रे ।।१।।
सकाम भक्ता सकाम होवुनी सकाम इच्छा पुरवी रे ।
निष्कामे जो भजन मांडी संतासी त्या प्रसन्न रे ।।२।।
सर्वाठायी निश्चळपणे देखे तो निःशब्द रे ।
मुक्याची भेटी मूकपणाने वेडा सांगे खुणा रे ।।३।।
वाऱ्यासंगे हनुमंत नाचे दासराम त्या चरणी रे ।
वायुलहरींची खूण बोधिली प्रसन्नता ये मना रे ।।४।।

१०२७

वायो प्रसन्न होई । साधे स्वहित काही ।
आम्हा उपाय दावी । दे आत्मता स्थिती ही ।।१।।
दावी निजस्वरूपा । ये ठायी अग्निरूपा ।
जाळोनी पुण्यपापा । करी धर्मनिष्ठ पाही ।।२।।
तू एक धर्म आमुचा । तू एक मार्ग आमुचा ।
आत्माची तू जगाचा । तू साह्य नित्य होई ।।३।।
हनुमंतराय संत । त्वद्रूप गुरु समर्थ ।
दासराम पायी संथ । तव पायी राहो डोई ।।४।।

## १०२८

वारियाने वारा उडविला तव तो राहे शद्ब ।
शद्बाचिया ग्रासे अग्नी आनंदू निःशद्ब ॥१॥
द्वैताद्वैत ग्रासी ऐसे अग्नीचे स्वरूप ।
जेथे पा नुरलासे रामकृष्णी संकल्प ॥२॥
वारियाचा शद्ब तेथे वारियाचा नाद ।
त्याचाची पडसाद अभिन्न दासरामी गोविंद ॥३॥

## १०२९

वारे कधी प्रगटेल मनात ॥ध्रु॥
वायुमनाची गाठी होता । चित्ता नुरते काही चित्तता ।
चित्त चिदात्म्या येई ऐक्यता । नेटुनिया गगनात ॥१॥
संत त्याते भजती नेमी । त्याची हृदयी उठती ऊर्मी ।
दासराम हा जडला नामी । रंगुनिया ध्यानात ॥२॥

## १०३०

वारे भरलें या नयनात ॥ध्रु॥
नादश्रवणी तदाकारता । एकची अखिल जगात ॥१॥
मागे शून्य पुढती शून्य । आहे कोण तयात ॥२॥
लक्ष्यालक्ष्य गुणी तो जाला । नटला नामरूपात ॥३॥
दासरामी हा सगुण निर्गुण । संतांचे स्मरणात ॥४॥

## १०३१

वारा हा जगती भरला । उरला बोल खुंटला ॥१॥
सर्व पोकळिया विश्व । विश्वी पोकळी अपूर्व ॥२॥
बुद्धिगम्य ऐसा वारा । पहाणे निर्मिले चातुरा ॥३॥
वारियाच्या संगे भांडे । रहातील काय तोंडे ॥४॥
वारियाचा नवलाव । गुणागुण दावी ठेव ॥५॥
दासराम तया शरण । थोर तेची आचरण ॥६॥

१०३२

वारा पहाता जगी संचरला । बहुत शक्तीने स्वरूपी चमकला ॥१॥
चेत अचेता अस्ति भाति प्रिय । आकर्षण गुणी जगी उदेला ॥२॥
पहाता एकची परी, दोन दिसे । अघटित शक्ती अघटित लीला ॥३॥
शब्दगुणे आकाश दाविले । सगुण निर्गुण होऊनी ठेला ॥४॥
गगन जहाले चिद्‌गुणयोगे । निश्चळी चंचळ वायुच झाला ॥५॥
चंचळ जरी का स्थिरता पहाले । निश्चळ आत्मा संती आतुडला ॥६॥
आत्मरूपाची लाट वायू हा । अहंभाव हा जेथ बुडाला ॥७॥
दासराम हा निवांत करूनी । गुरु दाविती हा वायुच नटला ॥८॥

१०३३

वारा झालो । मग जगासी पाहुनी हसलो ॥ध्रु॥
वारा अवती भवती सगळा । सूर्यचंद्रही वायुच जहाला ।
अणु परमाणू पाणिही बनला । त्यात विरालो ॥१॥
बाह्य उठावणी सर्व वायूची । त्यावरी वसती सर्व जीवांची ।
त्यावाचुनी धडगती कुणाची । तिथेची धालो ॥२॥
मनबुद्धीचे भान त्यावरी । बुद्धीगती आकुंठित नातरी ।
त्या विवरी आत्म्याची अंतरी । निश्चळ झालो ॥३॥
निश्चळी चंचळ लाट पसरली । वायुलहरी ही आत्मी वितरली ।
द्वैत दावुनी अद्वयची मुळी । तिथूनची आलो ॥४॥
ख्रिश्चन मुस्लीम हिंदुही सारे । मुळी पहाता एकची वारे ।
शेवटी तेची येई हाता रे । अद्वयी झालो ॥५॥
दुभागिलें पाणी ते पाणी । एकी एकची जाय मिळोनी ।
जावे कोठे त्याविण म्हणुनी । तेथ मिळालो ॥६॥
कोणी कुणाशी जगी भांडावे । कोणी मरूनी कुणी जगावे ।
कोणी जगी या सुखी नांदावे । गुरुपदी धालो ॥७॥
ढकले तेवढे ढकलुनी द्यावे । लाटेने लाटे परतावे ।
नातरी उगाची स्वस्थ रहावे । म्हणुनी ठेलो ॥८॥
जीवभाव हा स्वार्थी ऐसी । सांगितली जरी कहाणी ।
बहुत मजा ती आत्म्याचे गुणी । तेथ पहालो ॥९॥
जीव मारूनी सद्‌गुरु जीवविती । धन्य तेची स्वानंदाधिपती ।
गोविंदसुताचे ते श्रीपती । तेथ निवालो ॥१०॥

१०३४

धन्य आम्ही वायुपंथी । सहज साधनाची भक्ती ।
सहज नाम सहज चित्ती । सहजाची सहज प्राप्ती ॥१॥
चिदाकाशी जे निगुती । रामकृष्णी उर्ध्व गती ।
महाभक्त जेथ रमती । सहज स्थिती साधुसंती ॥२॥
वायुसंगती हे मन । उभे दोनी कर जोडुन ।
तेथची हे स्वात्मार्पण । इंद्रियवटि हे प्रकृती ॥३॥
प्रकृत जे सहजाकृती । तेची इंद्रियासी कृती ।
निसर्ग प्रतिगाम स्थिती । जनापरी होय रीती ॥४॥
पवाडेल कोण मती । आचरिता हे सुनीती ।
शांत होय चित्तवृत्ती । उघड उघड आत्मदीप्ती ॥५॥
दासराम वायुभक्त । तेणेची तो मुद्रित ।
नाम गाई हनुमंत । सहजासन अविकृती॥६॥

१०३५

अवचित नभी या वारा । दिव्य सारा भव उतारा ॥१॥
विद्युत्कण तो विश्वाकारा । अवयव भवने बहुती ।
आदी अंती व्याप्त सारा ॥२॥
रामकृष्णी हा चिद्‌गुण वारा । अचिद निराळा वाहे ।
गगनी वाहे चातुरा ॥३॥
तेज आप धृती परमाणु बरा ।
दासरामी जो तो हा आत्मगेहा रे उदारा ॥४॥

१०३६

हा वारा हा मुक्त करी त्वरितची क्षणी ।
जो साक्षित्वे सतत राही तेथ साधुनी ॥१॥
नित्य सदा रंगे जो परिसुनी ध्वनी ।
श्रवणे या श्रवणरूप नामगायनी ।
द्विशून्या एकवटुनी उलट करोनी ।
अलक्ष्याते लक्ष्य भिडवी शब्द चिद्‌गुणी ॥२॥
शब्दशून्य ग्रासुनिया शून्य साधुनी ।
ग्रासुनिया अशब्दा शून्य होवुनी ।

जीवभाव नयनातुनी श्रवणी आणोनी ।
श्रवण नमन करूनी सदा नामी रंगुनी ॥३॥
दासरामी जाण नेण जाय हारपुनी ।
आत्म शुद्ध संकल्पी धन्य ते मुनी ।
धन्य संत त्यांचिया पायी लागुनी ।
हा जीवात्मा शंभुरूप जाय होऊनी ॥४॥

१०३७

स्मरतो बा तुजला हो वायो ॥ध्रु॥
तुलाची प्रार्थीन तुलाची ध्यायीन । अर्पियले चित्त हे तुला ॥१॥
दासराम हा चरणी विनटला । संतसंग लाभला भला ॥२॥

१०३८

थांबला दृष्टीचा चाळा । घातला मनाला आळा ॥ध्रु॥
मन झाले वेडयावाणी । वारियाची कैसी करणी ॥१॥
विस्तार पावली शून्य । ती स्वरूपीं जहाली अनन्य ॥
जीवभाव उरला नान्य । दासराम तेथ पहाला ॥२॥

१०३९

हे वारे जगी पसरे आत्म्याचा मोद भरे ।
हरिगुणी जन हृदी विचरे । क्षण क्षण क्षण ध्वनी विकिरे ॥१॥
आत्मत्वे हरी सारे रक्षी हरिगुण गुण । जनी रे हरिभक्ती मनी बहरे ।
दासराम अंतरी रे ॥२॥

१०४०

या गारा पाहू जरा । पावती निरआकारा ॥ध्रु॥
जेथुनिया या आल्या । त्यातची विरूनी गेल्या ॥
भासती ज्या नासती ज्या । पावू मुळी तो थारा ॥१॥
शीतपणे घन होती । उष्णची मिळवी नीरा ॥
नीर मिसळे जइ नीरा । पहावे केवी आकारा ॥२॥

शीत रूपे वायुची हा । उष्म ही तोची उबारा ।।
द्रवबिंदू जे झाले । त्याचे मूळ हा वारा ।।३।।
ते होऊ गमतीने । जेथुनी जीव पसारा ।।
जीवन ते जीवसृष्टी । दाखवी सार असारा ।।४।।
चराचर व्यापक हा । अवघा एकची सारा ।
धन्य हा हरी माझा । दासरामी विस्तारा ।।५।।

१०४१

वारा हा खुळा किती वारा हा खुळा ।
पालवी फुलवी पाणी पाजोनी मुळा ।।१।।
देह पालवीच्या आत । देव दिसतो देहात ।
म्हणती तुकोबा समर्थ । भाव ये तुला ।।२।।
दासराम तेथे जडला । त्याचा ध्यास लागुनी ठेला ।
अंतर्बाह्य तोची झाला । भरलासे डोळा ।।३।।

१०४२

निखाऱ्यावरी हा वारा राख उठवितो भराभरा ।
दृष्टी टाकुनी पहा जरा । अनुभव येईल खरा खरा ।।१।।
फुलवी निखारा हा वारा राख राखिते उबारा ।
राख उडाली गोळा होऊनी प्रकाश देई प्रतिद्वारा ।।२।।
प्रकाशेची दृश्याभास जीव आणिला भानास ।
ज्ञान देवुनी त्या जीवा सुखसवेदन देई जरा ।।३।।
राख उडाली तरी ज्योती । बेभानची ते जीवस्थिती ।
जीवशिवाची गाठी घालुनी। निरोधनी देई थारा ।।४।।
संतांचा अनुभव पुरा । जरी साधिला हा वारा ।
दासराम हा शरण तया अंकित होऊनी राही बरा ।।५।।

१०४३

चैतन्याच्या वाऱ्या तुला माझा नमस्कार ।
तुझा नाद प्रकाश हाची आम्हा साक्षात्कार ।।१।।

तुझे स्फुरण सदा हाची अनुग्रहो निर्धार ।
तेथे तादात्म्यता हाचि भक्तिचा बडिवार ॥२॥
तुझा ध्वनी कानी घुमे तोची जयजयकार ।
मनाची शुद्धता हाची मोठा चमत्कार ॥३॥
सकल देव धर्म पंथ तूची आम्हा साचार ।
मायबाप गुरु दासरामी तू साकार ॥४॥

१०४४

तूची मला सोड वायू तूची मला सोड रे ॥ध्रु॥
तुझी माझी कइची भेटी । जई जीवन नव्हते सृष्टी ।
गगन बुडबुडा तव पोटी । नवल तुझे कोड रे ॥१॥
तू मी दोनी एकची असता । काय दाविसी अहंता ।
फजीतची झालो पुरता । होऊनी गेलो रोड रे ॥२॥
तू मी मिसळू एकात । संपवोनी सारे द्वैत ।
जीवन हे करू अद्वैत । तेची वाटे गोड रे ॥३॥
माझी एक विनवणी । कवाड हे दे उघडोनी ।
नेई निरंजनी म्हणे । दासराम झोंड रे ॥४॥

१०४५

श्वेत श्याम दोनी । चिद्गुणे या निरंजनी ॥१॥
एक उष्ण एक थंड । दावी द्वैताचे कवाड ॥२॥
वारियाचा खेळ । वाहे निश्चळी चंचळ ॥३॥
चैतन्याची प्रभा । घन निश्चळी स्वयंभा ॥४॥
दासरामी हा सिद्धांत । अवघा आत्माराम संथ ॥५॥

१०४६

हंकाराचा शोध करी । अहंकार हा चराचरी ॥१॥
जीवदशा ही जेथे तेथे । रेणूपासूनी व्योमी व्यापते ।
आत्मरूपी या रे लहरी । चंचळगुण हा पहा तरी ॥२॥

पाथरवट जरी या दगडासी । आला फोडाया त्यापासी ।
कंप सुटे दगडा भारी । जीव नव्हे का त्यासी परी ।।३।।
तीच गोष्ट या लतापल्लवी । त्यात वासही करी गुण दैवी ।
गगनचुंबी वा काटेरी । त्याही भावना याची परी ।।४।।
तेची परी या पशुपक्ष्यांची । दावी भावना सुखदुःखाची ।
एकची कमती ज्ञान परी । झाडोऱ्याहुनी श्रेष्ठ जरी ।।५।।
विकासुनी आत्मा जगी भरला । पूर्ण विकासा मानवी आला ।
पशुपक्ष्याहूनी तो उपरी । कारण त्यासी ज्ञान परी ।।६।।
परिपूर्णत्वे प्रभू जगी नटला । निःशद्वाने तो आतुडला ।
शद्वरूप प्रकृती सारी । दासरामी हरि कृष्ण हरी ।।७।।

१०४७

तेजाचा बंबाळ झगटला तेजाचा बंबाळ ।
पीतप्रभा ही अग्नीच विखुरे पसरे इंदु ज्वाळ ।।१।।
पीत धवळले श्यामची जहाले शीतल बहु तेजाळ ।
श्यामापासुनी श्वेत निघाले सप्तकिरण बहु ढाळ ।।२।।
शीत उष्ण हो आभा पसरली नभासी व्यापी रसाळ ।
जीवनरस हा जेथुनी ओते नभी आत्माची दयाळ ।।३।।
वायू गतिगुणे नामरूपाचे विस्तारले जंजाळ ।
चंचळ गुण हा शद्वापासुनी नादरहित मवाळ ।।४।।
निश्चळ आत्मा डहळुनी गगना आलासे कनवाळ ।
वायुरूपाने तोची प्रगटला थोर महत्तम काळ ।।५।।
तेथ लावुनी वृत्ती राहू सगुणची वंदू सुभाळ ।
प्रकाशवी जो तिही लोका करोनिया प्रतिपाळ ।।६।।
दासराम हा तेथ विनटला खपुष्प हा तेजाळ ।
कृपा करील तरी बुद्धी प्रकाशवी धन्यची तो गोपाळ ।।७।।

१०४८

विश्व मालिकेचा ठसा अणू हाची काय ।
नादभरे गाजे आत्मा पवनात काय ।।१।।
अहा फिरती विद्युत्कण हे वायूमध्ये काय ।
तया केवी गती झाली चंचळ हे काय ।।२।।

पूर्ण ब्रह्म शून्यरूप विकासले काय ।
चिदांशु हा पूर्ण स्वरूपी परिपूर्ण काय ॥३॥
सदानंद ते उत्क्रांती जीवनात काय ।
पूर्ण जगज्जीवन वायू गगनात काय ॥४॥
तेज आप विभक्ती करणे वायू दावी काय ।
उष्ण शीत तोची झाला मूळ शांत काय ॥५॥
गगन हे जेथुनी जाले निश्चळ ते काय ।
निश्चळीच चंचळ लाटे अणु रेणु काय ॥६॥
अणु रेणु अंतश्चक्षू दावी हेची काय ।
अणु रेणू जीवनी झाले जीवनात काय ॥७॥
जीवन हे अणूचे ठायी चक्षुरूप काय ।
दासरामी पहाता तेथे हरिरूप काय ॥८॥

१०४९

मन चोर हरी या शरीरी वास जो करी ।
नट रंग करूनी दावी परी बहु तयापरी ॥१॥
या जगिया भरूनी उरी खेळी तरी ।
सत्ता ही नवल परी येईना सरी ।
हेमची गुण नामरूपा जेवी अकारी ।
तै आत्मा हा विकसित तनु उपरी अंबरी ॥२॥
परमाणूपासूनिया व्याप्त अंतरी ।
चिद्‌गुण हा चाळवी जो या दिगंतरी ।
नरनारी होवुनिया खेळ जो करी ।
या आवडीने भेद करुनी स्वस्थ श्रीहरी ॥३॥
भेद कुठे आत्मरूपी पहाता तरी ।
भेद जसा लाटेपरी पाणियावरी ।
एकतत्त्व चैतन्यची बीज अंकुरी ।
जे विकसुनिया आणि फळा सत्य माधुरी ॥४॥
सत्वर ही मती विचारी गुंग जो करी ।
निर्विकारी वेड लावी सत्य अंतरी ।
निर्गुण गुण या लहरी आत्मसागरी ।
हा दासराम आत्मरूप सदयता जरी ॥५॥

१०५०

रामकृष्ण शून्य जीवाची उपाधी । जेथ चिद्‌गुणाची नुरली रे सांदी ।
नाद आटला विराली त्रिशुद्धी । जेथ पावली सहज समाधी गा ॥१॥
रामकृष्ण हरी रामकृष्ण हरी । गोविंद मुरारी रामकृष्ण ॥ध्रु.॥
उष्ण शीत रूप वाचा रामकृष्ण । एक श्वेत दुजे श्याम रूप गहन ।
जेथ नादघोष जहाला चिद्‌गुण । तोही विराम म्हणता नारायण गा ॥२॥
जेथिचिया तेथे जहाली विश्रांती । नामरूप धाले आपुलिया चित्ती ।
दासरामी गुरुकृपा रूप होती । हस्त ठेवोनी मस्तकी बोधिती गा ॥३॥

१०५१

मी वारा तू वारा । वारा बघ बघ वारा ॥ध्रु.॥
अस्तिगुणे व्यापक मी । अनंत एकची सारा ।
भातिगुणे बहुरंगी दाखवी सार असारा ॥१॥
कणाहुनी विकासूनी । पूर्ण मी एक अपारा ।
प्रियाप्रिया गाठी जरी आनंद जगभर सारा ॥२॥
सूर्यही मी चंद्रही मी । आकाश शब्द पसारा ।
जड वायू अचिदपणे । तो मी नीरसमुद्रा ॥३॥
अनंत तो एकची मी । परी हा द्वैत पसारा ।
द्वैत वरी अद्वयची । दासरामी हृदी सारा ॥४॥

१०५२

पाहू कोठे येते लाट । बिनबोभाट ।
लाट ही केवढी भाई काठोकाठ ॥१॥
जीवभाव दडपे माझा आडवाट ॥२॥
साठ हे सांडूनी शोधू एकसष्ट ।
निवळले जीवन पहाता जे निघोट ॥३॥
तेथची साधूया मनीची एकवट । हरिठायी दासराम हा विनट ॥४॥

१०५३

आपुला सांगाती असता पाठीशी । चिंता कासयासी करणे लागे ॥१॥
वारा मागे जरी वाटचाल सुखे । पुढे जरी ठाके वाट बंद ॥२॥
वारियाची कृपा प्रवास सुखाचा । दासरामी केचा सिद्धांत हा ॥३॥

## १०५४

आत बाहेर वाहे वारे । नामरूपा आले सारे ॥१॥
वारे मिळाले वारिया । डहुळ ते जाय विलया ॥२॥
साभिमाने भेडसावी । निरभिमाने वेड लावी ॥३॥
कृष्ण विष्णू नारायण । दासरामी समाधान ॥४ ॥

## १०५५

हरिभक्तीला शरण जाऊनी । हरिरंगी या नाचू रंगूनी ॥१॥
विजयपताका हाती धरूनी । धर्म घोषणा भरवू कानी ।
दुमदुमवू हा हरिनामध्वनी । सत्य जयाची धरू ही कासणी ॥२॥
चंचळ माया देखू निरंजनी । वारा शद्वगुणाते ग्रासूनी ।
चिद्‌गुणी द्वय हे ऐसे जाणूनी । पहाता मुळी जे अद्वयची क्षणी ॥३॥
संतवाणी ही हृदयी कोरूनी । श्रुतिवचनाते पेरुनी श्रवणी ।
हरीचा जयजयकार करोनी । निर्भर हर्षभराने होऊनी ॥४॥
मृदंग लावुनी टाळ गर्जुनी । सूर सुरामाजी हा मिसळुनी ।
वीणा वाद्ये मन हे स्फुरवूनी । नामब्रह्म हे प्रगटवू वाणी ॥५॥
सुखरूप टाकू करूनी ही अवनी । अद्वय साम्राज्याते स्थापूनी ।
आनंदासी उधळू गगनी । दासराम हा विनट निरंजनी ॥६॥

## १०५६

इवलीशी अशी लाट आदळते जरी माझे हृदयी ।
काय गर्जना मध्य पुरामधी जगी मानव देही ॥१॥
खळबळ मनीची सांगू कुणाही परिसे भगवंता ।
सर्वव्यापी हरी तूची असूनी द्वैत रूचे चित्ता ॥२॥
भोज्य भोग भोक्ता ही त्रिपुटी उकलेना मजला ।
बहुरंगासी दाविसी एक तू हरी तुझी ही लीला ॥३॥
तू मोठा तव कीर्तीही मोठी कैचे ध्यान धरू ।
अहंपणाचे शिरता वारे चित्त घडे बधिरू ॥४॥
अहंपणाने तव रूप मला न कळे दीनअनाथा ।
अहंकार हा हृदयी शिरता भय वाटे चित्ता ॥५॥
तूची निरंजन पूर्ण दयाघन भक्तांकित मद्रूपा ।
दासराम हा विनट तव पदी भक्तीबळे तू सोपा ॥६॥

१०५७

कोण छेडी सूर मनीचे कोण छेडी सूर मनीचे कोण छेडी सूर ।
शून्य दृष्टी साक्षिरूपे कोण राही दूर ॥१॥
निरंजनी भेद कैचा केवी होय पूर ।
सुखदुःख आनंदाने केवी भरे ऊर ॥२॥
विचारेची चूर होई विचारेची चूर ।
निर्विचार होवोनिया जीव हा आतुर ॥३॥
अहंकार मदाने या मुखी चढे नूर ।
काम क्रोध अज्ञानाचा लोटतसे धूर ॥४॥
पूर्ण ब्रह्म परमेश्वरू लावी हुरहुर जीवा ।
संत मुनी तये ठाई होती मने चूर ॥५॥
जीवशिव हे काहूर उचंबळे पूर ।
दासराम शरण त्यासी काढो दिव्य सूर ॥६॥

१०५८

वारा उखळोनी उगळिले विश्व । रामकृष्णी झाला हरी वासुदेव ।
शब्दरूपी कैची निःशब्दाची ठेव । माया आवडी गिळुनी ते स्थितो अपूर्व गा ॥१॥
रामकृष्ण हरी रामकृष्ण हरी । रामकृष्ण हरी नारायणा ॥ध्रु॥
अवघाची नटला पूर्ण नारायण । तेथे पहाता आणि पहाणेस कोण ।
जेथे आटले माये पहाणे पहाणेपण । दासरामी पहाता अवघे निरंजन ॥२॥

१०५९

वायुलहरी या होऊनी ठेल्या वायुस्वरूपाकार ।
तरी गा तेची स्मरण त्यांचे वायूचा झणकार ॥१॥
वायू दावितो नानापरी ते दृष्टिविकार आकार ।
विश्वपसारा त्याचे ठायी जन्ममरण अपार ॥२॥
नानाज्ञाना तोची कारण चालवितो व्यवहार ।
परमार्थाचे अधिष्ठान तो तेची सारासार ॥३॥
हलके आणि जड उष्ण थंड ते खरखरीत मऊ फार ।
तिखट आंबट खारट तुरट गोड वाची परपार ॥४॥
सकळ संतही त्याची कृपे परम भक्ती अनिवार ।
हृदयी खेळतो दासरामी अनस्यूत अकवार ॥५॥

१०६०

वारा वारा वारा जगी सारा जीवाधारा पोरा ।।ध्रु।।
आत्मा निश्चळ वारा । चिदाचिदातू पसारा ।
पावे निर्गुण विस्तारा ।।१।।
रामकृष्ण हरी गाजे । दुर्लभ सुरलोका जे ।
मस्तकी बुद्धी विराजे जे ।।२।।
निर्गुणी झाले सगुण । रामकृष्णी हे गगन ।
दासरामी चिद्घन पूर्ण ।।३।।

१०६१

वारा माझा मी वाऱ्याचा । तोची देवही देवांचा ।।१।।
वारा माझियात आहे । आत बाही तोची वाहे ।।२।।
जेथे उदेले मीपण । तयाहोनी आन कोण ।।३।।
कोण देव कोण भक्त । दासराम शरणागत ।।४।।

१०६२

ध्यास लागला वाऱ्याचा । ग्रास जाहला गगनाचा ।।ध्रु।।
वाऱ्यापोटी हे गगन । सांडूनी भेटे आपण ।।
वायु डहुळला । गगनी आला ।
नादरूप अनुभव त्याचा ।।१।।
गगनी व्यापिला नादगुण । तेथ दाविले द्वैतपण ।
उगम जाहला द्वैताचा ।।२।।
बहुता शक्ती वाऱ्याअंगी । नामरुपगुण दावित संगी ।
देई मोद हा आत्म्याचा । दासराम लंपट त्याचा ।।३।।

१०६३

पुरे पुरे तुझा लपंडाव की रे ।।ध्रु।।
सर्वव्यापी गा तू हरी । नवल तुझे कोणेपरी ।
पहावे कोणीतरी । तुला न कळे रे ।।१।।
मूळ निरंजन तू वारा । चराचरा तूची भारा ।
तुजवीण खरा । कुणी नाही की रे ।।२।।

अहंकार अंगराख । घातियेला तू विषेख ।
तुझे नामी सुख । पहाता आहे खरे ॥३॥
शब्दरूप अलंकार । तेणे जाले चराचर ।
मुख अरूवार । तुझे उघडेची रे ॥४॥
उघडाची माझा राम । पहाणे बुडाले संभ्रम ।
कोण दासराम । तेथ वेगळा की रे ॥५॥

१०६४

अंतरी या बसुनी कोण मनीचे छेडी बहुविध सूर ॥ध्रु॥
नवल कैसे होय सारे । काय हृदयी भरत वारे ।
साक्षिरूपे देखुनी दिव्य पसारे । राहीं आपणची दूर ॥१॥
निरंजनी हा भेद कैचा । पूर लोटे हरतऱ्हेचा ।
सुखीदुःखी सवडी आनंदाने । भरते सहजची ऊर ॥२॥
विचारे या चूर करितो । निर्विचारे गुंग होतो ।
कोण करी ही ऐसी नवी नवलाई । जीव करी आतुर ॥३॥
कोण दावी अहंकार । कोण करितो निर्विकार ।
मीपण हे सांडुनी जडता तेथे । दृष्टांताचा पूर ॥४॥
आत्मरूपी लहरी उठली । तेची विश्वाकार झाली ।
जीव शिव हे तेथची वितरूनी पुढती । जीवन करी काहूर ॥५॥
संतमुनी हे तेथ रमले । आत्मरूपाकार झाले ।
त्या शरण होऊनी रहाता वाटे दासरामी हुरहुर ॥६॥

१०६५

वारा पहिला कोणी वारा पाहिला ।
विश्वव्यापी पहाया त्या कोण वेगळा ॥१॥
लवलवीत पालवीतूनी कुठे सुटला ।
जीवनात जीवन वाहे जीवी जागला ॥२॥
मायबाप या जगताचा जीवना आला ।
समाधान दे चित्ताला रिझवी मनाला ॥३॥
विचारात जो का लपला दावी मनाला ।
तोची मरणी शांती देई मोदवी तुला ॥४॥

नामरूपी गोवी नटला भाव वेगळा ।
सहज करी स्थिरता पहाला वृत्ति निराळा ॥५॥
हाची धर्मपंथ आमुचा एक एकला ।
आतवरी एकी एकची एकी मिसळला ॥६॥
दासराम या दैवता शरण रिघाला ।
शिरावरी तेणे माझा भार घेतला ॥७॥

१०६६

सळ सळ सळ झाडीतुनी । भर भर भर गगनी ।
थर थर थर करी अवनी । चिंचिणी चिद्गगनी ॥१॥
खळ खळ नाद करी पाणी । चळ चळ चळती फणी ।
घड गड गड गड मेघातुनी । नाद भरे श्रवणी ॥२॥
चंचळपण हे धरुनी । भरभरला त्रिगुणी ।
दासरामी तो आत्मा । नेई कसा तरुनी ॥३॥



# स्मरणपंचक : ३३

१०६७

श्री. गणेश धोंडो कानिटकर यांचे शंकेचे निरसनार्थ स्मरणपंचक केले.
मार्गशीर्ष शुद्ध दशमी शके १८६१

नित्याची जे गती नित्याचे स्मरण । याते अनुसंधान बोलताती ॥१॥
सूक्ष्म देही देखे पवन विजय । दशमद्वारी सोय ऊर्ध्व मार्ग ॥२॥
प्रेमभाव मिळवी आवडी ते जीवी । संतसंगे ठावी पाडी खूण ॥३॥
संतांचे चरण तेथे करी स्नान । मेळवी हे मन हृदयामाजी ॥४॥
गुरुभक्ता ऐके दासराम बोल । संदेह निरसेल येणे योगे ॥५॥

१०६८

सद्रूपाचा ठसा परेचिया पैल । तेथे घननीळ चरणांबुज ।१॥
कंठस्थानी ओळखी प्राणाचे स्वरूप । अग्निदेव दीप धुराविणे ॥२॥
अज्ञानाचा धूर नुरेल बा जेथे । हकारापरते सूक्ष्म बीज ॥३॥
आकर्ष प्रकर्ष हृदयाचे कार्य । तेथोनिया होय कंठावरूता ॥४॥
पंचभूत मूस जडत्व आटणी । तेथे देखे खाणी सूक्ष्मदेह ॥५॥
ऐके गुरुभक्ता दासराम वचन । राजयोग खूण संतजनी ॥६॥

१०६९

श्वेतरुप दर्शन मना समाधान । संदेह निरसन जेथे होय ॥१॥
संकल्प विकल्प होती नामरूप । तेथे लागे अपाप तंद्री तुझी ॥२॥
आलंबाचा मार्ग वाणी ते मध्यमा । शून्याभास उत्तमा देखे सत्य ॥३॥
प्रणवाचे नाम तिनीची मिळणी । अमृताची खाणी प्राणयोग ॥४॥
अमृतकळेने दशमद्वारा उपरी । जाईजे निर्धारी गुरुकृपे ॥५॥
दासराम म्हणे ऐसा गुरुबोध । जाणिजे हृद्गद गुरुभक्ता ॥६॥

१०७०

जैसी आहे गती तैसी ठेवी स्थिती । सुमनाची कांती लाहिजे का ॥१॥
मनाची निवळी करिजे निश्चळ । मानसीचा बोल मने ऐकी ॥२॥
बोधरूप मन पावे समाधान । ऐसे हे श्रवण साधिजे का ॥३॥
मनाचे मनत्व हारोनिया ध्यान । लावी निरंजन भ्रुकुटीमाजी ॥४॥
त्रिनेत्रासी मिळवी आपुली हे दृष्टी । चिन्मयासी भेटी होय जेणे ॥५॥
गतीवरी मन मनावरी गती । तेथे ऐक्यस्थिती गूजभाव ॥६॥
दासराम सांगे साराचे हे सार । करावा विचार याची मार्गे ॥७॥

१०७१

हकार सकारी मिळालिया जाण । होय समाधान समतेचे ॥१॥
प्राणी जरी मग होय ऊर्ध्वमुख । तरी पावे सुख अंतरींचे ॥२॥
अंतरीचा वारा अंतरीच वाहे । तेथे एकिताहे मंजुळ नाद ॥३॥
जहाला मस्तकी कैचा हा उबारा । स्त्रवते शर्करा मुखामाजी ॥४॥
दासराम सांगे साधनाचे गुह्य । भक्तलागी सोय देवाजीची ॥५॥



# दीनदयाळ पाठ : ३४

१०७२

आदी अनादी विठ्ठल । परम दयाळ संतासी ॥१॥
रामकृष्ण तयापोटी । देखे दिठी अवकाशी ॥२॥
आकाशी ते अवकाश । वाहे सुरस परेतूनी ॥३॥
प्रणव श्रीरामापासून । स्वरुप सगुण विठ्ठल ॥४॥
सगुण ते दृश्या आले । मूळ वहिले अदृश्य ॥५॥
दृश्यादृश्य शून्य आटणी । तेथे स्वरुपाची पहाणी ॥६॥
ऐसी दाविती सद्‌गुरु कळा । दासराम देखे डोळा ॥७॥

१०७३

शून्यालागी आहे गती । त्यात प्राणाची प्रचीती ॥१॥
अणू जेथे पावे लोप । गहन संकल्प अवकाशू ॥२॥
ऐसा संकल्प निरसिता । देव वसे तया चित्ता ॥३॥
दासराम म्हणे ऐसे । कळता भक्ता लागे पिसे ॥४॥

१०७४

हरिकीर्तनाची ठेव । भक्ता देती सद्‌गुरु देव ॥१॥
धन्य धन्य हनुमंत । स्वयें देत गोविंदा ॥२॥
सीताराम हनुमान । कैसे आले गा धाऊन ॥३॥
विठ्ठलाने प्रसाद दिला । ज्ञानाईचा वर भला ॥४॥
झोपी असता गुरूदत्त । उठोनिया कीर्तन परीसत ॥५॥
भगवान विष्णू डोले । विठोबाची कांती उजळे ॥६॥
नाचला जेथे गजानन । धन्य धन्य ते कीर्तन ॥७॥
धन्य हनुमंत सद्‌गुरू । दावी नवल साक्षात्कारू ॥८॥
स्वये प्रगटल्या पादुका । प्रसादाच्या आल्या देखा ॥९॥
संत रंगले हरिगजरी । सिद्ध करिती कवतुक भारी ॥१०॥
ऐसी असे गुरूची थोरी । दासराम ताल धरी ॥११॥

१०७५

तेजामाजी खेळे मासा । त्याचे नेत्रामाजी ससा ॥१॥
त्याचे डोळियात गगन । देखे आत्म्याचे लोचन ॥२॥
तयाआतु सर्व दृष्टी । नाही राहिली त्रिपुटी ॥३॥
द्रष्टा दृष्टीलागी भेटी । तेथे देवभक्ता गाठी ॥४॥
दृष्टीलागी पहाली दृष्टी । पहाण्याची नुरली दिठी ॥५॥
तेथे ओतिली विश्रांती । दासरामा हृदयी चित्ती ॥६॥

१०७६

हरी तो बोलता जहाला कीर्तनी । ऐकिजे श्रवणी बालका रे ॥१॥
कासयासी तुज पाहिजे बा साथ । शद्ध तो घुमवीत माझी वाणी ॥२॥
शद्ध तो आकाशी बोल अबोलोनी । अर्थाचिये खाणी चिदानंदी ॥३॥
कासयासी तुज ठेक्याचे कारण । नाही अवसान कुणा हाती ॥४॥
अवसानी ठेका वाजतो आपण । तेथे रममाण संतजन ॥५॥
कासयासी तुज पाहिजे मृदंग । अवघाची रंग माझे हाती ॥६॥
श्रोतयांचे कर्णी घुमवोन नाद । नाचेन आनंदरूपे पुढा ॥७॥
कासयासी तुज चिपळीचे कारण । पुसिले कारण द्वयाद्वय ॥८॥
कासयासी तुज पाहिजे बुक्का । कर्मावरी मेखा रेख पुसे ॥९॥
कासयासी तुजलागी दिवाबत्ती । एके ठायी दिपती सूर्यचंद्र ॥१०॥
रामकृष्णहरी हा माझा प्रसाद । ओळखितो वेध आहे कोणा ॥११॥
जहाल्या आरती नव्हेची परती । उजळली ज्योती साधी वेगी ॥१२॥
ऐके दासराम बोले भगवान । हृदयी चरण साठले वो ॥१३॥

१०७७

राम कृष्ण हरी गोविंद माधव । विठ्ठल केशव पाठ बरा ॥१॥
हरीचिया नामे उजळला दीप । फिटले अपाप पुण्यपाप ॥२॥
कृपेची ही वाणी हनुमंतपदी । अर्पी प्रेमानंदी दासराम ॥३॥

१०७८

दीनांचा दयाळू स्नेहाळू कृपाळू । प्रेमळू आगळू विश्वपाळू ॥१॥
ऐसा माझा देव ऐसा माझा देव । सद्‌गुरूनी भाव प्रगट केला ॥२॥
आपुलाची ऐसा केला गुरूनाथे । दाखविले चित्ते चैतन्यासी ॥३॥
दासराम याचा केला अंगिकार । धन्य धन्य उदार हनुमंत ॥४॥

१०७९

श्रीराम हनुमंत कृपेचा प्रसाद । बोल बोले छंद बोलण्याचे ॥१॥
दीनानाथ स्वामी करी कवतूक । घालीतसे भीक आनंदाची ॥२॥
साधु संत सज्जन उच्छिष्टाचे सार । दिले सुखकर संतराये ॥३॥
दासराम लोळे श्रीगुरूपदासी । ईच्छा नुरे त्यासी अन्य दुजी ॥४॥

१०८०

आला बाई जोगी आला बाई जोगी । स्वानंदसुखा जो भोगी ॥१॥
भव्य मूर्ती ही दिगंत कीर्ती । शिवहर शिवहर निशिदिनी गाती
जटाजूट शिरी त्रिशूळ हाती । भला बैरागी ॥२॥
भगवी कफनी पायी पादुका । दिव्य दृष्टी ही देखवी सुखा ।
दुर्घट दर्शन जे सुटलो का । क्षमा ज्या (शांती ही) अंगी ॥३॥
हास्य वदनी जे तेज फाकले । कोटी मदन हे जेथ लाजले ।
रूद्राक्ष माळ कंठीही रूळे । रंगती रंगी ॥४॥
दासराम हा शरण जहाला । सद्गुरु रेवणसिद्धपदाला ।
बोलविती श्रीसद्गुरु भोला । हरिहर संगी ॥५॥

१०८१

विटेवरी उभा हरी विटेवरी उभा । फाकलीसे प्रभा त्याची फाकलीसे प्रभा ॥१॥
माझा मायबाप हरी माझा मायबाप । मनीचे ते ताप हारवी मनीचे ते ताप ॥२॥
राम लागे तेथे दासराम लागे तेथे । दिला सद्गुरुनाथे ठाव दिला सद्गुरूनाथे ॥३॥

१०८२

दयासिंधू हा समर्थ आला गगनापासुनी नीट गे ।
पीतांबराचा शेला झळके टकीसी टक लागली गे ॥१॥
शब्दावरी जो आरूढ जाहला निःशब्दा जो गिळी गे ।
बावन्ना ते ठाव नाही निराकारी जो आसमी गे ॥२॥
निराकाश ते निराकार हा अनुभव घेई देही गे ।
सद्गुरु दाविती ते जन देखती अंतरीची नवलाई गे ॥३॥
दासराम हा शरण जाहला हनुमत्सद्गुरुचरणी गे ।
हनुमंताते हृदयी साठवुनी रामी देखिला आराम आराम गे ॥४॥

१०८३

पांडुरंग रुक्मिणीसी । भेटी अंतरी निश्चयेसी ।।१।।
राधा कृष्णा घडे भेटी । परी सरेना त्रिपुटी ।।२।।
अर्जुन देखे विश्वरूप । परी तुटेना संकल्प ।।३।।
निर्विकल्पी हे घडेना । देव भक्त बोलवेना ।।४।।
दासराम म्हणे । अर्थ घ्यावा सद्‌गुरूखुणे ।।५।।

१०८४

देव भक्ता नाही भेटी । नाही तुटी त्रिवाचा ।।१।।
भेटी तुटी पैल गाठी । नुरवी दिठी मुळीची गा ।।२।।
भाविकासी देव भेटी । परी त्रिपुटी निरसेना ।।३।।
दासरामा दीनदयाळ । हृदयी रसाळ गोविंद ।।४।।

१०८५

दीनांचा दयाळ स्वामी सकळा उपरी हरी ।
नुरवी चतुरी कुसरी प्राणाभीतरी नाम भरी ।।१।।
नाम हरी आत्मा भक्ता भेटे अखंड ।
पुरवी कोड मनीचे सकळा वाड बहु गोड ।।२।।
नामी राम रामी नाम हेची वर्म बरे ।
वेदशास्त्र सद्‌गुरुविचारे साधनी अनुभवी का रे ।।३।।
विभक्तपण सांडूनी आता होई श्रीहरि-भक्त रे ।
एकरुपची होऊनी जाता तेथे कैंची कोणा भेटी ।।४।।
भेटीविरहित गाठी तेथे सरली आघवी त्रिपुटी रे ।
अखंडपणे वसती तेथे अखंड जडली प्रीती रे ।।५।।
सद्‌गुरुनाथा स्वामी समर्था सततची दे विश्रांती रे ।
वर्म सोडुनी रहाता पहाता दुणावती श्रम माझे रे ।।६।।

१०८६

दीनदयाळ आजी माझा भेटला माये ।
भक्तीपणाते जागृत ठेऊनी पहाले तयासी पाहे ।।१।।
बोले त्याची वाचा मी तो बोलू कासयासी ।
साक्षात्कार हाची थोर नामधारकासी ।।२।।

दासराम लागे हरीभक्ताचे पायी ।
ब्रह्मादिका वंद्य चरणी ठेवितो डोई ॥३॥

१०८७

एकची बोलणे नाम गाऊ आता । होवोनिया स्वता श्रोता वक्ता ॥१॥
करू हे कीर्तन गोविंद गोपाळ । शद्वा शद्व टाळ हरिवीणा ॥२॥
रामकृष्ण चिपळी पंचप्राण आरती । शिवनाम चित्ती बुका भाळी ॥३॥
स्वयंतेज ज्योती न लगे दिवाबत्ती । गुरूनाम गीती प्रसाद तो ॥४॥
निराभासी कीर्तन करी नारायण । मस्तकी चरण दासरामा ॥५॥

१०८८

परमार्थ आकळे उलटिया क्षणी । लागे जो चरणी भक्तांचिया ॥१॥
भक्तांचे हे भक्त प्रिय फार देवा । वाटे ज्यांचा हेवा ब्रह्मादिका ॥२॥
परम पवित्र संत पायधूळी । लाविती कपाळी नित्य नित्य ॥३॥
अखंड सोहळा हरीचे कीर्तन । विसरे आपण आपणासी ॥४॥
देव तो आपण विसरे आपणा । काय महिमाना वानू आता ॥५॥
सद्‌गुरु श्रीहरी कृपा जयावरी । तीही लोकी थोरी असे ज्याची ॥६॥
दासराम लोळे भक्तांचे चरणी । प्रेम ते म्हणोनी देवाचित्ती ॥७॥

१०८९

नमनाचे अंगी असे बहू शक्ती । आशिर्वाद देती संतजन ॥१॥
त्यांचे आशिर्वादे होय ब्रह्मानंद । प्रेम ते गोविंद हृदयी वसे ॥२॥
आपुलाची ऐसा वाटतो देवासी । जोडतो तयासी भावरूपे ॥३॥
दासरामा मौन जहाले अंतरी । संती केले भारी कवतूक ॥४॥

१०९०

दीनदयाळ हा पाठ तो गाईला । किरण फेंकिला ओघरूपे ॥१॥
निःशब्दाची ठेव शब्दातु ओविली । दीप्ती चकाकली जीवनकळा ॥२॥
अर्थे समाधान अर्थे समाधान । वचन प्रमाण सद्‌गुरूंचे ॥३॥
कृपेची हे वाणी हनुमंतचरणी । अर्पी लोटांगणी दासराम ॥४॥

# हरीपाठ महात्म्य : ३५

१०९१

सोपीया शद्वात धर्मभागवत । ज्ञानेश सांगत भाविकासी ।।१।।
तो हा हरिपाठ ग्रंथ असे सोपा । कंठी धरिता पापा रीघ नाही ।।२।।
नामाचे महत्व सांगते माऊली । कृपेची साऊली मूढ जना ।।३।।
भागवत धर्म असे सर्वश्रेष्ठ । सदाचार वरिष्ठ हरीपाठ ।।४।।
दासराम प्रेमे नाचे आणि गाये । विरोनिया जाये हरीपाठी ।।५।।

१०९२

मोह आणि शोक वारी ऐसे ज्ञान । गीतेमाजी पूर्ण सांगितले ।।१।।
परी तो अर्जुन तेथींचा चतुर । चोजविले सार देवे त्यासी ।।२।।
तेथीचा उकल कैसा होय जीवा । म्हणोनिया गावा हरीपाठ ।।३।।
ऐसेचि वाटले ज्ञानीया साचार । काढीले जे सार हरीपाठी ।।४।।
गीतेऐसा श्रेष्ठ ग्रंथ हरींपाठ । दासराम तुष्ट झाला तेथे ।।५।।

१०९३

सामान्याही परी पोचविले लोण । ऐसे हे निधान हरींपाठी ।।१।।
धन्य भागवत गाती हरींपाठ । हाता ये वैकुंठ सदा सुख ।।२।।
हरीपाठी जाय देहभाव लया । उद्धार प्राणीया अनायासे ।।३।।
महत्व आगळे असे या ग्रंथासी । गाय अहर्नीशी दासराम ।।४।।

१०९४

वृत्तीवरी नाही म्हणोनि निवृत्ती । तेही प्रेमे गाती हरीपाठ ।।१।।
नामी प्रगटे देव म्हणुनी नामदेव । गाती स्वयमेव हरीपाठ ।।२।।
एकचि ज्या नाथ ऐसे एकनाथ । हरीपाठ गात सर्वकाळ ।।३।।
जयासी तुकला स्वये आत्माराम । गाती तुकाराम हरीपाठ ।।४।।
दासराम पुसे काय हे महत्व । जाणीतला भाव हरींपाठी ।।५।।

१०९५

शिवदासा स्फुरे येणे शिवपाठ । गाती गुरुपाठ गुरुदास ॥१॥
आमुचे मामा गाती प्रेमे रामपाठ । कैसा हरीपाठ स्फुरद्रूप ॥२॥
हरीपाठावरीं मामांचे कीर्तन । अखंड जीवन हरीपाठ ॥३॥
एकेक अक्षर वाचिताची नर । होतसे ईश्वर जिताची तो ॥४॥
साधुसंत प्रेमे गाती हरीपाठ । दासराम विनट तया चरणी ॥५॥

१०९६

भागवत धर्मी जहाले कळस । ऐसे महापुरूष तुकाराम ॥१॥
एक लाख केली पारायणे त्यानी । स्थीरावला जीवनी हरीपाठ ॥२॥
विदेह मुक्ती ज्या लाधलें वैकुंठ । तेथे नित्यपाठ प्रगटला ॥३॥
गुरूलिंगजंगम गाती नित्यनेम । ऐसा हा उगम पहा तरी ॥४॥
स्वर्गीहोनी गंगा आणिली भूतळी । अमृतपाने झाली तृप्ती जीवा ॥५॥
जीव असंख्यात जाहले जे तृप्त । तया शरणागत दासराम ॥६॥

१०९७

वैकुंठासी शिडी ऐसा हरीपाठ । अभंग ते स्पष्ट अठ्ठावीस ॥१॥
सोळा आणि बारा मिळुनी अठ्ठावीस । अभंग सुरस हरीपाठी ॥२॥
जाणिती हे वर्म साधुसंतजन । प्रचीत घेऊन सुखावले ॥३॥
आळशी मंदमती तरेचिना येथे । सांगती भक्ताते ज्ञानेश्वर ॥४॥
काय हा अभंग पहावा शोधून । तरी समाधान दासरामी ॥५॥

१०९८

समाधी संजीवन असे ज्ञानाईची । तेथे अमृताची वाणी स्फुरे ॥१॥
घुमला जो नाद ऐकीला श्रवणी । महती ते वाणी काय सांगो ॥२॥
चिमडमहाराज घेती अनुभव । तो हा नवलाव हरीपाठ ॥३॥
हरीपाठ ऐसे माऊलीचे जीवन । शद्व ही गहन आरूता राहे ॥४॥
ऐसीया ग्रंथाचे महत्त्व आगळे । दासराम लोळे त्यापदी ॥५॥

## १०९९

ज्ञानराज धन्य योग्यांची माऊली । जेणे अमृतवल्ली प्रगटविली ॥१॥
अमृताहुनी गोड असे हरीपाठ । आनंद निघोट चैतन्याचा ॥२॥
क्षर नाही ऐसे अक्षर तेथीचे । म्हणती जे वाचे तेची धन्य ॥३॥
धन्य हरीपाठ धन्य इंद्रायणी । धन्य अमृतवाणी माऊलीची ॥४॥
भावेचि गाऊनी पवित्रचीं होऊ । आनंदेचीं राहू सर्वकाळ ॥५॥
माऊली देखोनीं रेखिले मामांनीं । तेचि ते पाहोनी आम्ही धन्य ॥६॥
हनुमंतालागी जाहले दर्शन । तयांचे चरण वंदी माथा ॥७॥
दासरामावरी वोळली ज्ञानाई । दावीयली सोई हरींपाठीं ॥८॥

## ११००

हरीपाठाचे हे महात्म्य जे ऐसे । वदविले कैसे ज्ञानदेवे ॥१॥
जाहला आनंद मना समाधान । हेचि ते दर्शन ज्ञानाईचे ॥२॥
आठवीत राहे मनी वारंवार । हाचि साक्षात्कार अक्षराचा ॥३॥
अंतरी उदेला राहे हरीपाठ । भाव हा उत्कट मनी दाटे ॥४॥
दासरामा मनीं नवल हे ऐसे । वाचीतसे सोसे हरीपाठ ॥५॥

## ११०१

हरीपाठ महात्म्य अभंग आकरा । येणे चुके फेरा चौऱ्यांशीचा ॥१॥
हरीपाठ गाता हरीच प्रगटे । सकलही आटे दृश्य सारे ॥२॥
दृश्या होय अंत तोचि तो दृष्टांत । सांगती समर्थ ज्ञानेश्वर ॥३॥
ज्ञानेश्वरकृपे घडो नित्यनेम । चित्ती या सप्रेम हरीपाठ ॥४॥
दासराम विनवी माऊलीचे चरणी । जाय लोटांगणी पुनः पुनः ॥५॥

## ११०२

कार्तीक वद्य त्रयोदशी सोमवारी । शके या निर्धारी सत्याण्णवी ॥१॥
हरीपाठाचे हे महात्म्य अक्षरी । आलेसे आकारी नवलावे ॥२॥
जन्मसप्तशताब्दीचा तो सोहळा । जाहला आगळा ज्ञानाईचा ॥३॥
त्रिखंडी या गाजे कीर्ती निरंतर । मना वाटे फार सेवा व्हावी ॥४॥
माऊलीने ऐसी घेतलीसे सेवा । दासरामा जीवा सुख झाले ॥५॥

# सांप्रदाय बोध : ३६

११०३

प्राणाचीया फेरी चाले जया द्वारी । वास करी हरी तया वरी ॥१॥
आकाशात आत्मा ऐशी बोले श्रुती । तयासी प्रचीती कैसी घ्यावी ॥२॥
प्राणाचा हा खेळ आकाशाचे स्थानी । संगती वचनी संतांचीये ॥३॥
देऊळाभोवती घिरटचा घालोनी । मेळवीला कोणी हरी सांगा ॥४॥
प्राणाच्या संसारी घेता हरी नाम । होतसे विश्राम दासरामा ॥५॥

११०४

जयाचेनी ज्ञान जयाचेनी भान । ऐसा तो चिद्घन आत्माराम ॥१॥
नामाचे साधनी प्रगटची होत। । मार्गचि पुढता दिसो लागे ॥२॥
चारी वाचेलागी कैसा स्फुरवीत । आणि वीराजत षडचक्री ॥३॥
जीव शिव ऐसे उठती तरंग । सिंधु तो अथांग दासरामी ॥४॥

११०५

पंचमहाभूती खेळते चैतन्य । तेणेची चलन पंचभूता ॥१॥
साधू संत हेची जाणताती वर्म । जेणे कर्म धर्म सुफल होय ॥२॥
मनालागी असे विषयांची ओढी । म्हणोनी ते गोडी कल्पनेची ॥३॥
दासराम ध्याई रामकृष्णहरी । तया कृपा करी हनुमंत ॥४॥

११०६

अस्ति गुणधर्म होतसे जाणीव । ज्ञानाची राणीव तेथ असे ॥१॥
भाती गुणे कैचा होत असे भास । प्रकाशे प्रकाश साकारले ॥२॥
संयोगीच योग वियोगाने कळे । योगेचि आकळे भक्तीभाव ॥३॥
देही अनासक्त ऐसे हरी भक्त । थोर हेचि मात संती केली ॥४॥
दासराम त्यांचे वंदितो चरण । सदा कृपादान ज्यानी केले ॥५॥

## ११०७

ऐसा कोण विधी जयाने ही सिद्धी । होतसे समृद्धी जीवनाची ।।१।।
रिद्धी सिद्धी संतीं दूरची ठेवीली । एकांती साधिली जीवनकळा ।।२।।
साक्षात्काराहोनी थोर चमत्कार । मानीतीं साचार जनलोक ।।३।।
साक्षात्कारे झाला विश्व चमत्कार । चमत्कारी भर चमत्कृती ।।४।।
चमत्कार करी तोचि जगी थोर । वाटे चमत्कार हाचि संता ।।५।।
विश्वासी प्रेरणा काय असे शक्ती । दासराम महती थोर तेची ।।६।।

## ११०८

जेणे या विश्वाचा होत असे बोध । तयाचाचि शोध संती केला ।।१।।
शोधक तो कोण पाही विचारून । कोण तयावीण शोध करी ।।२।।
जयाने प्रचीती तयाची प्रचीती । हेचि भली चित्ती वाटतसे ।।३।।
प्रचीतीने घेता प्रचीतीचा ठाव । तेचि ते सदैव दासरामी ।।४।।

## ११०९

संगतीसी आले म्हणोनीं आपुले । ऐसे कैसे भले वाटे जीवा ।।१।।
जेणे घडवीली ऐसी हे संगती । तयाची संगती का न व्हावी ।।२।।
देहाचे संगती जे लागे संगती । त्याची विसंगती कोण करी ।।३।।
तया नाही ठाव ऐसा काय भाव । हा कोण उपाव सुखालागी ।।४।।
ऐशा संगतीची लागता संगती । तेचि ते संगती दासरामी ।।५।।

## १११०

सदा नामजप करी तरी कोण । सांगा निवडोन मायबाप ।।१।।
तेथे जरी लक्ष कोण ठेवी सदा । मग तो का कदा जप करी ।।२।।
सदोदीत जप हेचि थोर तप । जेणे अनुताप विषयासी ।।३।।
जपी तपी ऐसे जगी जे का झाले । तयासीं लाधले आत्मरूप ।।४।।
आत्मरूपाकार स्वये साधुसंत । दावियली मात दासरामी ।।५।।

## ११११

तीर्था जावोनीया आठवले ब्रह्म । तेथे काय काम आम्हा तरी ।।१।।
ब्रह्म आठवणे हे तो खरे नव्हे । परी जगी व्हावे ब्रह्मरूप ।।२।।

ऐसा तो उपाव सांगा संतजन । जेणे वर्म खूण ठायी पडे ॥३॥
दासरामा लागी नामाचा उपाय । जेणे तरणोपाय जड जीवा ॥४॥

१११२

पंचभूतांची तो झाली झडपण । काय ते स्मरण होवो लागे ॥१॥
काय ते स्मरण होत असे काय । तेथे तरी काय आहे माझे ॥२॥
रामाचे भूताचे असेची वाकडे । हेचि एक कोडे वाटे जीवा ॥३॥
जयाची सुटका तयाची सुटका । ऐसाभाव निका संतजनी ॥४॥
साधिलिया वर्म घडे जे स्मरण । तेचि नामस्मरण दासरामी ॥५॥

१११३

दुजेपणी भ्रांती ते काय वसती । म्हणोनिया शांती स्वरूपीया ॥१॥
गुरुलिंगजंगम निमज्जोनिमग्न । व्हावे जी निमग्न आत्मरूपी ॥२॥
वैकुंठाहोनिया आले हे अमृत । सेविताचि तृप्त होय जीव ॥३॥
दासरामालागी हनुमंत कृपा । तेणे मार्ग सोपा चिन्मयाचा ॥४॥

१११४

कल्पना सरता होय निर्विकल्प । कल्पक अपाप भेटो येई ॥१॥
कल्पक पाहता कल्पना ओसरे । घुमो लागे वारे चैतन्याचे ॥२॥
भरता हे वारे होय तदाकार । मग देहाकार नाठवेची ॥३॥
देहाकार जाता नुरे अहंकार । तोचि साक्षात्कार संतजनी ॥४॥
ऐसा जरी झाला एक साक्षात्कार । आनंदे निर्भर दासराम ॥५॥

१११५

एकांती लोकांती देहांतीही नाम । प्रचीती उत्तम स्वये देती ॥१॥
ऐसे ते गोविंद माझे पितृदेव । थवक झाला जीव देखोनीया ॥२॥
हनुमंती गोविंद पूर्ण तो आनंद । जहाले अभेद अद्वैतची ॥३॥
अंतरीया खेळे माझा रेवणसिद्ध । सांप्रदाय बोध दासरामा ॥४॥

# श्रीगुरूपाठ : ३७।१

## ११११६

आता एक मज जहाले श्रीगुरू । त्यानी चराचरू व्यापियेले ॥१॥
जेथे जेथे भाव तेथे तेथे देव । ऐसा नवलाव कैचा झाला ॥२॥
हृदयी पाऊले दिसती गोजिरी । कवतूक भारी गुरूनी केले ॥३॥
दासरामा एक दैवत श्रीगुरू । तेणे सर्वेश्वरू धाविन्नला ॥४॥

## १११७

ब्रह्ममूर्ती संत सद्‌गुरू अनंत । रक्षिताती भक्त साधकाते ॥१॥
आम्हा बालकासी तारावयासाठी । किती श्रम घेती कोटी परी ॥२॥
गुरुपुत्रा वतत हरीचे कीर्तन । अधिकार पूर्ण हरिभक्ति ॥३॥
दासरामा उत्तम श्रीगुरूचा पाठ । तेणेची अवीट ब्रह्म जोडे ॥४॥

## १११८

सद्‌गुरू दयाळ सद्‌गुरू दयाळ । देती सर्वकाळ आठवण ॥१॥
सद्‌गुरू कृपाळ सद्‌गुरू कृपाळ । सुबोध रसाळ करिती बोधू ॥२॥
सद्‌गुरू मवाळ सद्‌गुरू मवाळ । पाहता निर्मळ भक्त होय ॥३॥
सद्‌गुरू तेजाळ सद्‌गुरू तेजाळ । दासरामा विमल रूप तेची ॥४॥

## १११९

ब्रह्मपूर्ण संत ब्रह्माते दाविती । त्यांची चरण-माती माझे भाळी ॥१॥
अंगी ते विभूती चर्चिली सुंदर । भक्त धुरंधर श्रीरामाचे ॥२॥
हृदयी धरली सद्‌गुरूंची मूर्ती । नाचतो हे गीती गात स्वये ॥३॥
दासराम लोळे संतांचे चरणी । अघटित करणी त्यांची असे ॥४॥

## ११२०

सद्‌गुरूघरीचे जरी आले श्वान । तयाते नमन असो आधी ॥१॥
सद्‌गुरूघरीचा आला जरी वारा । तयासी सामोरा नमस्कारू ॥२॥

सद्‌गुरुसेवक भेटलिया कोणी । जाईन लोटांगणी एकदाची ॥३॥
सद्‌गुरूंचेपाशी दासराम उभा । पहातसे शोभा चैतन्याची ॥४॥

११२१

सद्‌गुरू सद्‌गुरू करिता गजरू । नाचे विश्वंभरू मागे पुढे ॥१॥
स्मरणाचे ध्यासे अंगे होय ब्रह्म । पावेल विश्राम सकळासीं ॥२॥
भाव भक्ती देखे स्मरणाचीं गोडी । संतसंग आवडी भजनाची ॥३॥
त्रिकुटाचे माथा सद्‌गुरूंचे पाय । दासरामा सोय त्यांचे कृपे ॥४॥

११२२

आता जेथे जेथे जैसे धावे मन । तेथे तेथे चरण सद्‌गुरूंचे ॥१॥
नमन ते भक्ती नामीच विश्रांती । ईक्षणाची स्थिती समाधी हे ॥२॥
त्रिवेणी संगम देहीं या प्रचीती । होत आहे मुक्ती पुण्यपापा ॥३॥
दासरामा आता नामाची आवडी । गुरुनाथा गोडी सद्रूपाची ॥४॥

११२३

सद्‌गुरूनीं केले उघडे अंतर । विचार सागर प्रगट झाला ॥१॥
आनंद जोडिला आनंद जोडिला । अविनाश आला हातीं ठेवा ॥२॥
काय माझीं सेवा काय माझा भाव । परी सद्‌गुरुराव संतोषला ॥३॥
देवाजीचीं मात कळेचिना कोणा । दासराम चरणा हनुमंतांचे ॥४॥

११२४

हनुमंत सद्‌गुरू सुखाचे निधान । अविनाश धनराशी देहीं ॥१॥
अमतसागर प्रकाशाची कळा । भक्तीचा जिव्हाळा हनुमंत ॥२॥
ज्ञानियांचा राजा हनुमंतराय । जगताचे मायबाप धनी ॥३॥
ऐसे ते सद्‌गुरू कसेनी बोळले । अबोल बोलविले दासरामा ॥४॥

११२५

किती कनवाळू नारायणराव । पाहोनिया भाव हृदयीचा ॥१॥
धावोनिया आलें भक्ताचिया घरी । बोधामृत सत्वरी पाजियेले ॥२॥

ब्रह्मतन्मयता करोनि दिधली । अलोट दाविली तेजोराशी ।।३।।
अनंता जन्मीचे जोडिले सुकृत । दासरामा हेत सुफळ झाला ।।४।।

११२६

श्रीगुरू श्रीगुरू देही जयजयकारू । होतसे उद्धारू परिसता ।।१।।
चिमड ते क्षेत्र करिते पुनीत । जेथे विराजीत साधुराय ।।२।।
धन्य रामचंद्र सद्‌गुरू माऊली । करिती साऊली भाविकासी ।।३।।
धन्य लक्ष्मीअक्का मोक्षसुख देई । तये ठायी लाही समाधान ।।४।।
काडसिद्धराज शोभती त्या स्थानी । तेथे लोटांगणी दासराम ।।५।।

११२७

श्रीगुरूंचा पाठ हनुमंत गुरूनी । वदविला वदनी बालकाच्या ।।१।।
जयांचे सेवक पिताजी गोविंद । दिला ब्रह्मानंद कीर्तनी या ।।२।।
ऐशा हनुमंते बालाचे कवतूक । केलेची विशेख सत्यसत्य ।।३।।
अज्ञानिया मुखे बोलविले ज्ञान । साक्षात्कार काय आन सांगू ।।४।।
१८६१ (अठराशे एकसष्ट) पौष शुद्ध दशमी । सद्‌गुरूचे नामी दंग झालो ।।५।।
हनुमंत सद्‌गुरू दाविती विचारू । ग्रंथ हा साधारू वर्णविला ।।६।।
नामाचा आनंद श्रीगुरूपाठ । ब्रह्म ते निघोट सत्य सत्य ।।७।।
विश्वास धरोनि कृपेची उत्तरे । बोलिलो सादरे सज्जन हो ।।८।।
तुम्हा संताप्रती करितो वंदन । जनी जनार्दन व्यापियेला ।।९।।
श्रोता आणि वक्ता धन्य हरिरूप । देखतो स्वरूप गुरुकृपे ।।१०।।
श्रीगुरूपाठ हनुमंत चरणी । अर्पी लोटांगणी दासराम ।।११।।



# गुरूपाठ : ३७।२

## ११२८

गुरू जगी थोर बोलतसे श्रुती । गुरु कोण चित्ती उमगेना ॥१॥
ऐसा गुरूपाठ विचारेचि घ्यावा । विचारे शोधावा गुरुबोध ॥२॥
गुरू जगीं एक बोले गुरुगीता । परी तया अर्था जाणती ना ॥३॥
सद्रूपी ओळख करी तो सद्‌गुरू । येर ते गुरगुरू करिताती ॥४॥
गुप्तरूप जेणे प्रगटची दिसे । ऐसा गुरू वसे दासरामी ॥५॥

## ११२९

गुरूत्व तो गुरू गुरूत्व तो गुरू । परी हा निर्धारू कैसा व्हावा ॥१॥
गुरूत्व पाहता कळते लघुत्व । लघुत्वे गुरूत्व प्रत्यया ये ॥२॥
गुरूत्वे लघुत्व लघुत्वे गुरुत्व । जेणे परतत्व स्पर्शू होये ॥३॥
गुरूत्वे जाणीव गुरूत्वे राणीव । गुरूत्वे बरव जाणीव नुरे ॥४॥
म्हणोनिया गुरू गुरूचे समान । सर्वासी समान समत्वेची ॥५॥
दासरामी ऐसा गुरू आकळींला । गुरूरूप झाला ब्रह्मगोळ ॥६॥

## ११३०

गुरूत्वाकर्षण विश्वा आकर्षण । शोधिती गहन संतजन ॥१॥
आकर्षं प्रकर्षं प्रकर्षे आकर्षं । याचेनी सौरस विश्व दिसे ॥२॥
ऐसे आकर्षण दावीं संकर्षण । याचेनी भ्रमण विश्वासी या ॥३॥
अणू रेणू यांची खेच आकर्षण । चलन वलन याचि गुणे ॥४॥
श्वासोश्वासी हेंचि दिसो येई सत्य । आणिक ते मिथ्य दासरामी ॥५॥

## ११३१

गुरूत्वमध्य तो जीवनाचा मध्य । ताले तोले साध्य साधतसे ॥१॥
तेचि एक असे जीवनी माध्यम । येर ते मध्यम दुय्यमची ॥२॥

दुजे पाहता गौण हे एक प्रधान । जेणे संप्रदान जीवनाचे ॥३॥
जीवना जीवन होत जे प्रदान । तेचि ते जीवन दासरामी ॥४॥

११३२

गुरुत्वमध्य तो दावी विश्वमध्य । तयाचा जो मध्य मध्यबिंदू ॥१॥
विश्वाचा पहाता जो का मध्यबिंदू । तेथेचि हा सिंधू अथांगची ॥२॥
बिंदूने परीघ परीघाने बिंदू । परीघात बिंदू सहजेची ॥३॥
बिंदूबिंदूने जो अफाट सागर । बिंदूविणे तर तेथे काय ? ॥४॥
गुरुत्वमध्य तो जीवनाचे साध्य । साधिल्या असाध्य नोहे काही ॥५॥
सर्व विश्वामाजी असे जे सामान्य । तेचि असामान्य दासरामी ॥६॥

११३३

व्यासाने परीघ परीघाने व्यास । तयाचा हव्यास जीवालागी ॥१॥
व्यास कळलीया खरा कळे व्यास । महर्षी ते व्यास सर्वा गुरू ॥२॥
तरी येथे त्रिज्या साधिली पाहिजे । मग हे सहजे उकलो लागे ॥३॥
त्रिज्या साधिताची कळती तीन रेषा । तेचि खरी रेषा आयुष्याची ॥४॥
मग ते जीवन येई पूर्णतेला । दासराम झाला शरणागत ॥५॥

११३४

गुरू दावी गोल गोल दावी गुरू । तोची कल्पतरू पूर्णकाम ॥१॥
वर्तुळात त्रिज्या त्रिज्येने वर्तुळ । जेणे ब्रह्मगोल साधतसे ॥२॥
परी ऐसी त्रिज्या कैसी विस्तारली । बिंदूनेच झाली सत्य पहा ॥३॥
ऐसी हे भूमिती जाणोनिया घ्यावी । तरीच पावावी मुक्त दशा ॥४॥
भू आणि मनाची जेणे होय मिती । तयाचिये मिती कोण करी ॥५॥
ब्रह्म पूर्ण जेणे आनंद भू मन । तेचि रे उन्मन दासरामी ॥६॥

११३५

पौर्णीमा ते व्यास व्यास ते पौर्णीमा । म्हणोनी पौर्णीमा व्यासाचिये ॥१॥
व्यास कळला व्यास, व्यास कळे त्यास । तया जीवनास पूर्णता ये ॥२॥
व्यास तेथे ज्ञान, ज्ञान तेथे व्यास । न जाणे तयास अज्ञानची ॥३॥
व्यासाची पौर्णीमा जाणोनी घ्यावी । तरीच पदवी परमार्थी ॥४॥
ऐसी हे पदवी जेणे संपादिली । दासराम धूळी तयाचिये ॥५॥

## ११३६

ज्यास कळे व्यास विरे पंचत्वास । दास म्हणती त्यास संतजन ॥१॥
ऐशीया दासांचा दास करी देवा । आशिर्वाद द्यावा हाचि मज ॥२॥
दास होता होय गुरूचे पूजन । दासरामा खूण गवसली ॥३॥

## ११३७

सद्गुरूसमान नाही कोणी जगी । व्यासरूप अंगी सदा असे ॥१॥
तोचि एक व्यास जया नाही नाश । दिक् काल आकाश जयाचेनी ॥२॥
जयाचेनि देव दानव मानव । ऐसा तो सदैव ओळखावा ॥३॥
ज्यास कळे व्यास सर्व कळे त्यास । सर्व तोचि व्यास व्यास सर्व ॥४॥
ऐशा व्यासालागी सदाची नमन । तेणे समाधान दासरामा ॥५॥

## ११३८

गुरु ध्येय ध्यान गुरू संध्या स्नान । त्याचे अनुसंधान तेची भक्ती ॥१॥
तेथे अविनाश जोडिले जयाने । तया काय उणे जगामाजी ॥२॥
गुरु थोर सान सुखाचे निधान । संत करिती गान सद्गुरूंचे ॥३॥
गुरु कृपा करी तया कोण मारी । गुरु जै संहारी कोण राखी ॥४॥
गुरू हाचि देव संत महानुभाव । तयापायी भाव दासरामी ॥५॥

## ११३९

गुरूलागी जेणे लावियेला गुणा । तया काय खुणा प्राप्त होती ॥१॥
सदा अंगी क्रिया दावितसे गुरू । तोचि परात्परू महाराजा ॥२॥
तेचि क्रिया ज्याची आपुली जहाली । ज्योती झळकली परब्रह्मी ॥३॥
मंडलाकार हे जेणे चराचर । अखंड परपार तोचि गुरू ॥४॥
दासरामालागी हा गुरू पावला । तयाच्या हाकेला सदा धावे ॥५॥

## ११४०

गुरू एक ग्रह ऐसा ज्याचा ग्रह । तया अनुग्रह काय करी ॥१॥
गुरू नि:संदेह तेथे हा संदेह । मग पापग्रह उफाळती ॥२॥
गुरू हा पाहता न धरी आग्रह । करी तो विग्रह समासाचा ॥३॥
ज्याची कुंडलीनी जागृतीसी आली । तयाची फिरली कुंडली हे ॥४॥

कुंडलीनी जरी घेईल विश्रांती । स्थापकता स्थिती राहीचना ॥५॥
कुंडलीनी जेथे राहिली जागृत । तेथे जो जागृत जागृतीते ॥६॥
गुरू हा तो करी सहजे निग्रह । तेथे निःसंदेह जीव होय ॥७॥
संदेह तो गेला मंदेह वारिला । अर्घ्य समयाला गुरूपदी ॥८॥
निर्विकल्प होये ऐसी फलश्रुती । ऐसी बोले श्रुती गुरूगीता ॥९॥
देव तरी भेटे जनीं आणि वनी । ऐसी बोले वाणी तुकयाची ॥१०॥
परी ते घडावे सद्‌गुरुभजन । तुकोबा हे खूण बोधितसती ॥११॥
पवनात्मज तो सोऽहंरूप गुरू । माथा कृपाकरू ठेवियेला ॥१२॥
चित्ताचिया समता समत्वे प्रसाद । अंतरी आनंद केला जेणे ॥१३॥
गुरूपाठ करी गुरूपाठ करी । गुरूंऽग वरी कृपाछत्र ॥१४॥
गुरूपदी ऐसी प्रेम सुमनांजली । प्रेमे समर्पिली दासरामे ॥१५॥

११४१

संच साधोनीया मंचकी संचले । आणि बरसले आशिर्वाद ॥१॥
वसुदेवी पहाता जो का वासुदेव । स्वरूपी सद्‌भाव ठसावला ॥२॥
सदा जे संचले तेचि ते संचले । यावीण संचले काय सांगा ॥३॥
संचले ते चळे चळे ते संचले । चळे ते चळवळे उपाधी या ॥४॥
भक्तीं तरी कलेकलेने वाढावी । पौर्णीमा ते व्हावीं भक्तीचिया ॥५॥
शिवाचे मस्तकी सोळावी ते कळा । तयासीं चित्‌कळा बोलताती ॥६॥
पौर्णीमेचा चंद्र तुका पूर्ण झाला । तुकयाचे बोला विचारावे ॥७॥
ऐसी तरी व्हावी सदावी पौर्णीमा । तयासीं उपमा नाही जगी ॥८॥
आनंदी आनंद गोविंदी गोविंद । संवादू विनोद पूर्णतेचा ॥९॥
चैतन्य ते ब्रह्म ब्रह्म ते चैतन्य । तेथेंची अनन्य जीवन हे ॥१०॥
दासराम म्हणे ऐसी ते पौर्णीमा । ते गुरुपौर्णीमा मनी घ्यावी ॥११॥



# संजीवन पाठ : ३८

११४२

कृष्ण तोचि राम राम तोचि कृष्ण । तेचि रामकृष्ण ओळखावे ॥१॥
रामकृष्ण जरी हंसस्थिती आले । परमहंस झाले रामकृष्ण ॥२॥
ऐसे स्वामी रामकृष्ण परमहंस । जडले मानस तये ठायी ॥३॥
काली माता प्रगट रामकृष्णे केली । भलीच माऊली रामकृष्ण ॥४॥
विवेक आनंद ते विवेकानंद । लाभे सिद्धानंद दासरामा ॥५॥

११४३

चैतन्य चैतन्या पडे जरी खेव । तरी अनुभव येत असे ॥१॥
रामकृष्ण तेचि भगिनी निवेदिता । तैसी निवेदिता रामकृष्ण ॥२॥
जीव शीव दोनी एकरूप होती । ऐसी हे प्रचीती संती आली ॥३॥
गुरूलिंगनाथे नवल दाविले । प्रगट पाऊले दासरामी ॥४॥

११४४

शामल रूपडे । विटेवरी ठाके पुढे ॥१॥
दिससी तू शामला । तुझा रंग यावा मला ॥२॥
माझे रूप तुला यावे । स्वरूप देखोन बरवे ॥३॥
तुझेमुळे माझा ढंग । तव ठायी झालो दंग ॥४॥
माझा रंग तुझे गुणी । ऐसी बोलीयेली जनी ॥५॥
अखंड प्रीती रस । दासरामी या सुरस ॥६॥

११४५

होती हातवारे । त्यांत तुझे भरो वारे ॥१॥
एकची हे वारे । त्यात आले काही सारे ॥२॥
त्यातील गेले वारे । त्यात काय उरले वारे ॥३॥
ऐसे एक वारे । तेणे जग फिरे सारे ॥४॥
जया मागे वारे । तेथे भक्ती काय खरे ॥५॥
वाऱ्यावरी दृष्टी खिळे । दासराम पायी लोळे ॥६॥

## ११४६

ज्यात काही हालचाल । तरी काही हालचाल ॥१॥
वारियाची बदलें चाल । तरी होती फार हाल ॥२॥
ज्यात काही राम आहे । त्यात काही राम आहे ॥३॥
ज्यांत काही रस नाही । त्यांत काही रस नाही ॥४॥
दासराम बोले । ऐकुनिया सद्गुरू डोले ॥५॥

## ११४७

शामलांग तुझे ऐसी आठवण । आहे बहुदीन माझे मनीं ॥१॥
पारदर्शक हे जसे काही भिंग । तसे तुझे अंग वायुदेवा ॥२॥
वाय हाचि देव वायु हाची देव । ऐसा माझा भाव वायुवरी ॥३॥
असाल तैसे असा माझे ठायी आता । शरण समर्था दासराम ॥४॥

## ११४८

पहाता हे सर्वांग । शामलांग कोमलांग ॥१॥
नाही कळले अंग । काय अध्यात्माचे अंग ॥२॥
आत्मयाचे अंग । पारदर्शक जैसे भिंग ॥३॥
जे का असे परपार । जयालागीं नाही पार ॥४॥
तेचि करी परपार । अुपकार ते अपार ॥५॥
दासरामा त्याचा ध्यास । नाम घेई अहर्निश ॥६॥

## ११४९

वारे शिरले नयनांत । तेथे जाहला एकांत ॥१॥
वीज सळसळोनी गेली । चित्तवृत्ती तल्लीन झाली ॥२॥
अनुग्रहाची हे पीडा । बंद पिंगला आणि इडा ॥३॥
दासरामा हनुमंत । गुज सांगे परमार्थ ॥४॥

## ११५०

महाथोर तरी मृत्युपंथे गेले । इतर जन्मले आणि मेले ॥१॥
मज याचा अर्थ सांगा हो समर्थ । मग हो किमर्थ चिंता नुरे ॥२॥
आकाशमार्गी चिन्मयाचा पंथ । जाणती समर्थ गुप्तपणे ॥३॥
गुप्त ते अलिप्त अलिप्त ते गुप्त । दासरामी हेत गुरुनाम ॥४॥

११५१

आजी हा अुजेड आला माझे नयनी । पाहू तरी कोणी काय सांगे ॥१॥
अुजेडात नाही अंधाराची वार्ता । ऐसी असे कथा भूगोलाची ॥२॥
अंधार अुजेड अुजेड अंधार । भरे धुंधुकार आत्मतेज ॥३॥
दासरामी झाला आनंद बघा । तोचि तो सेवावा सर्वकाळ ॥४॥

११५२

सावल्यांचा खेळ सावल्या खेळती । परी कोणा चित्ती उमगेना ॥१॥
विश्वपट सारा प्रकाशाने दिसे । प्रकाश गवसे कोण्यापरी ॥२॥
अंधारात पहाता दिसतो उजेड । जया नाही जोड जगामाजी ॥३॥
चंद्रसूर्य लुप्त होता साक्षात्कार । दावी गुरुवर दासरामा ॥४॥

११५३

चतुराक्षरी हा असे गुरूमंत्र । परी त्याचे तंत्र ओळखावे ॥१॥
जो का परतंत्र त्यासी नाकळे । स्वतंत्र आकळे होता चित्ते ॥२॥
सकारी हकार हकारी सकार । भरले साचार सर्वघटी ॥३॥
दासराम तेथे होताची निमग्न । उरला पवन पवनेची ॥४॥

११५४

करूनी दावी तरी । त्याचे पाय जीवी धरी ॥१॥
सांगताती तुकाराम । त्याचे ओळखावे वर्म ॥२॥
बोले तसे चाले । यात सर्व काही आले ॥३॥
चाले तसे बोले । हेचि मनी घ्यावे भले ॥४॥
दासरामी खूण । दावीतसे हनुमान ॥५॥

११५५

काना मात्रा असे । केशव तो सर्वां दिसे ॥१॥
काना मात्रा वजा जाता । मग शव येई हाता ॥२॥
दासरामी नाम । मग नुरेचि संभ्रम ॥३॥

## ११५६

खरे बोले तरी । सहजेची जोडे हरी ॥१॥
खरे खरे खरे । नाम देवाजीचे बरे ॥२॥
दासरामा नाम । पूर्ण आनंदाचे धाम ॥३॥

## ११५७

स्वरूपानंद रामानंद । ब्रह्मानंद नामानंद ॥१॥
प्रणवानंद ध्यानानंद । ऐसे पहाता आनंद ॥२॥
मनी याचा घेता बोध । दासरामी या आनंद ॥३॥

## ११५८

रूप बैसे दृष्टी । चित्त पायी घाली मिठी ॥१॥
एक होता मनोमन । पूर्ण झाले समाधान ॥२॥
चार चार आठ । प्रेमे ओलांडिली वाट ॥३॥
एकनाथ दावी खूण । आचरोनी होती धन्य ॥४॥
दासराम म्हणे । सर्व सुखाचे ठेवणे ॥५॥

## ११५९

श्वासोश्वासामाजी पाहतसे वाट । म्हणोनी बोभाट केला असे ॥१॥
तूचि रामकृष्ण अगा नारायणा । जीवीच्या जीवना जीवी राहे ॥२॥
नाही तरी काय हवे दासरामा । अगा मेघश्यामा सीताकांता ॥३॥

## ११६०

सोडलेची नाही तरी घेसी काई । सोडोनिया राही देहभाव ॥१॥
मग तुजलागी मिळे आत्मरूप । होसी निर्विकल्प एकदाची ॥२॥
निर्विकल्प पाहे समाधी अवस्था । ऐसी हे व्यवस्था दासरामी ॥३॥

## ११६१

समजीवन हे असे संजीवन । देहासी सुटून राही या ॥१॥
संजीवन स्थिती समाधीसी गेले । समाधी राहिले संजीवन ॥२॥
तेचि ज्ञानेश्वर गोविंदा भेटले । वंदिली पाऊले दासरामे ॥३॥

## ११६२

राजहंसालागी मोतीयाचा चार । यात आला सारा परमार्थ ॥१॥
हंसरूप दावी स्वये हनुमंत । धन्य सद्‌गुरुनाथ वायुरूप ॥२॥
सत्य श्रीसमर्थ गुरुलिंगनाथ । त्यांचे कृपांकित थोर थोर ॥३॥
स्वरूप लोपले तेचि ते दाविले । दासराम लोळे गुरुपायी ॥४॥

## ११६३

अमृताचा स्वाद मजला मिळाला । अवीट तयाला वीट नाही ॥१॥
अमृताचे तळे वरोनी पाझरे । मुखात पसरे शिरे पोटी ॥२॥
हापूस आंबा तो लागलीसा ओठीं । कोण घेई पोटी रायवळ ॥३॥
दासरामी कैचा अनुभव दिला । गुरुलिंग बोलला निजकृपे ॥४॥

## ११६४

आज तरी असे बुद्धाची जयंती । मना मिळे शांती निजरूपी ॥१॥
ऐसे हे पाहता कळले दासरामा । देवा तुझा प्रेमा नित्य नवा ॥२॥
प्रेमची सप्रेम होऊनि ठाकले । प्रेमची संचले प्रेमामाजी ॥३॥
प्रेमस्वरूपाचा घडला साक्षात्कार । प्रेमेची निर्भर दासराम ॥४॥

## ११६५

माझा जो ईश्वर बुद्ध पैगंबर । ख्रिस्त, झरतुष्ट्र बसवेश्वर ॥१॥
परी हे प्रथम पाहिले पाहिजे । परमेष्ठी लाहिजे परमामृत ॥२॥
जे असे प्रथम ते असे उत्तम । अरूप, अनाम अद्वैत गा ॥३॥
दासराम तेथे राहतो निवांत । जेथ होय चित्त हरिमय ॥४॥

## ११६६

पहाता खनाळ नुरे खळखळ । बैसता खनाळ काय नोहे ॥१॥
काय नोहे तेथे उरले ते काय । नोहे तोचि होय चतुर्देहवीण ॥२॥
चतुर्देहवीण असे तरी कोण । तयासी शरण दासराम ॥३॥

११६७

महावीर तेथे आला वीरपणा । दया, क्षमा खुणा उमटल्या ॥१॥
शांती सागर ते आचार्य शंकर । अद्वैत निर्झर जगामाजी ॥२॥
चैतन्य मुक्त ते आत्मतत्व श्रेष्ठ । गुरुलिंग वरीष्ठ दासरामी ॥३॥



# निवृत्तीपाठ : ३९

११८६

दृष्टीमाजी चक्रे फिरती व्योमाकार । जेथें गरागर फिरतीं प्राणी ॥१॥
पंचभूत सृष्टी जेथे आकळिली । त्याआत देखिली ज्ञानकळा ॥२॥
तेथे होई अंतर्मुख उफराटा । जाशील वैकुंठा सहजेची ॥३॥
अनंत हा काळ भासे एक क्षण । चित्ती नारायण गती तेची ॥४॥
उफराटा मंत्र उफराटी गती । दासरामा विश्रांती निवृत्तींची ॥५॥

११६९

देखण्याची कळा प्रवृत्ति विस्तार । त्यांचे अंतर निवृत्ती ते ॥१॥
दृश्य आणि अदृश्य दवडोनी प्रवृत्ती । धरी सकळा अंती नामठसा ॥२॥
नाम दावी दृष्टी तुज जगजेठी । सद्गुरू हे कोटी दावितातीं ॥३॥
दासरामा कळले सद्गुरूंचे ज्ञान । दाविली जीं खूण निजकृपे ॥४॥

११७०

प्रणवाचे पोटी अक्षरासी गाठी । तेथे ग्रासी दृष्टी देखण्याची ॥१॥
तयाचिये उपरी हेतूचे अंतरी । देखिजे कुसरी ब्रह्मकळा ॥२॥
कुनाम हे द्वैत प्रवृत्तीचा पंथ । रज तम हेत बुडवी सर्वा ॥३॥
दासराम ऐके श्रीगुरुंचा बोध । जेणे हा आनंद चित्तापंल ॥४॥

११७१

प्रवृत्ती जाणीव शून्य ते नेणीव । तयापैल भाव निवृत्तीचा ॥१॥
आकार प्रवृत्ती निराकार शून्य । तयावरी धन्य निवृत्ती ते ॥२॥
निवृत्तीचा पंथ सहज ते वाट । भक्ती हा बोभाट संतजनी ॥३॥
हरीचे कीर्तन हरवी भूक तान । दासरामा खूण श्रवणाची ॥४॥

११७२

कोणता हा भक्त कोणता हा देव । कुठे ठावो ठाव सकळासी ॥१॥
मनाचा जो मेरू पवनाचा वारू । आनंदसागरू चैतन्याचा ॥२॥

तयाचे उपरी निवृत्ती उन्मनी । तयाआत पहाणी ब्रह्मसिंधू ॥३॥
अनिर्वाच्य वाणी त्याचा झाला डोळा । पाहे ब्रह्मगोळा आपुले ठायी ॥४॥
देखणे देखणे भाव आटविला । उरला तो डोळा सत्पदीचा ॥५॥
दासराम म्हणे अवघा नारायण । तेथे करी कोण हरिकथा ॥६॥

११७३

वृत्तीचिया पैल निवृत्तीची कथा । शिकविती संथा साधुसंत ॥१॥
अढळ जे नाम उठेना बैसेना । तेथे निरंजना मेळ साधी ॥२॥
ऐसी ते समाधी नुरवी उपाधी । साक्षात्कार सिद्धी साधनी या ॥३॥
नुरे भेदाभेद आनंदीच धुंद । गती होय मंद निरालंबी ॥४॥
दासरामा ऐसी निवृत्तीची खूण । सिद्ध संतजन दाविताती ॥५॥

११७४

मुक्ती ते मोकळी मनाची बो कळी । सुगंध दरवळी सुमनाचा ॥१॥
सुमन उन्मन संत समाधान । दावी निरंजन प्रसादू गा ॥२॥
अखंड विश्रांती मना निजशांती । चित्कळा हे चित्ती ठसे पूर्ण ॥३॥
अमृताचे आत सुवर्णाची कांती । कैचे झळके मोती लखलखीत ॥४॥
तयाआत माणिक पूर्ण ते निवृत्ती । कैची सुखस्थिती दासरामा ॥५॥

११७५

मुक्तीवरी भक्ती दान मागे संती । उद्धवे विनंती केली जे का ॥१॥
मन हे प्रसन्न सेवा घडे पूर्ण । रहाते संधान अनुवृत्ती ॥२॥
सद्‌गुरूंचे इतुकी गुरूसेवा वाड । नामामृत गोड सर्वाहोनी ॥३॥
चरणा वंदन झाले सर्वाठायी । भरली गुरूमाई सर्वाघटी ॥४॥
दासरामाचा काल सार्थक हे नाम । निवृत्तीचे धाम कैवल्य ते ॥५॥

१ ७६

वंदन ते साधी स्मरणाची सिद्धी । रंगे परमानंदी संकीर्तनी ॥१॥
संत नामोच्चार संत करी भक्ता । दाखवी अनंता सत्य सत्य ॥२॥
अनंत मुखाने गाईला अनंत । आदिमध्य अंत विरहित जो ॥३॥
अनासक्त भक्ता निवृतीचा पाठ । दासरामा वैकुंठ विष्णू हाता ॥४॥

## ११७७

प्रवृत्ती बडबड शून्य वाचा मौन । करणी ते साधन निवृत्तीचे ॥१॥
प्रवृत्त प्रवृत्ती ।नवृत्त निवृत्ती । नामकळा शांती नामब्रह्म ॥२॥
शून्याचिये पैल साधन सुगम । आगम निगम राहे मागे ॥३॥
दासराम धरी सद्‌गुरूंची कास । ज्यानी अविनाश दाखविले ॥४॥

## ११७८

राम कृष्ण हरी नाम हे तिजोरी । तयाआत खरी स्वरूप ठेव ॥१॥
गुरूभक्ती वाड कुलूप घातिले । भक्ता उमगले निजवर्म ॥२॥
गुरूकिल्ली श्रीगुरू हनुमंतकृपा । होय जेणे सोपा निजठेवा ॥३॥
दासराम लोळे संतांचे चरणी । श्रीगुरूची वाणी धनराशी ॥४॥

## ११७९

पाचाआत पाच तया आत तो मी । त्याचे आत ऊर्मी गगनाची ॥१॥
देखणेचे भीतरी सहजाचा पंथ । जयेठायी संत रमुनी गेले ॥२॥
सहज साधन निवृत्ती सोज्वळ । सर्वांग शीतळ सुखरूप ॥३॥
शिवाचे मस्तकी वाहे गंगाजळ । बोल बोले बोल हरी हरी ॥४॥
दासराम म्हणे कृपेचे हे देणे । जाणे कोटिगुणे संतराव ॥५॥

## ११८०

निवृत्तीचे कृपे निवृत्ती लाधलो । क्षण विसरलो प्रवृत्तीसी ॥१॥
ज्ञानकळा बोधिली हनुमंतरायांनी । मार्ग निशीदिनी निरालंब ॥२॥
निरालंबावरी निवृत्तीची ज्योती । जेथे लाभे हाती प्रसाद्‌ गा ॥३॥
निवृत्ती प्रसाद तोची हा आनंद । दासरामा छंद गुरुकृपा ॥४॥

## ११८१

जीवाची साऊली निवृत्ती माऊली । देखे माझी गाऊली गुरुराव ॥१॥
अक्षराचा अर्थ तेथीचा प्रसाद । देताहे आनंद गुरुराव ॥२॥
शद्बे शद्बशून्य उडवोनी टाकिले । तरी हाता आले दोन शद्ब ॥३॥
शद्बाचा निःशद्ब करोनी राहिलो । कृतिमाजी आलो नामकरणी ॥४॥
तेथीचा प्रसाद वर्णवेना माये । उपमेसी काय देऊ सांगा ॥५॥

अविनाश अक्षर धन्य ब्रह्मानंद । तेथीचा प्रसाद कर्ण धाला ॥६॥
दासराम म्हणे सद्‌गुरू हनुमंत । त्यानी केली मात ऐसी देही ॥७॥

## ११८२

निवृत्ती प्रसाद करणीच जोडला । वर्षाव जहाला अमृताचा ॥१॥
अक्षर अमृत पिऊनी धाले मन । निवाले लोचन देखोनिया ॥२॥
कर्ण झाला कैचा दानशूर दाता । वाचा आली स्वता डोळियासी ॥३॥
वाणीने लुटिले नामाचे अमृत । प्रसाद अनंत आत्मयाचा ॥४॥
करणी ते निराळी शद्बाचे आगळी । दासरामा लागली गोडी तेथे ॥५॥

## ११८३

शद्ब देखे शून्य देखणे हे शून्य । तया अर्थशून्य ऐके ऐके ॥१॥
तेथोनी वरूता उफराटा मार्ग । गुरूकृपा योग सिद्धमार्ग ॥२॥
सिद्धमार्गे कैचे चाले हे जीवन । जीवनावाचून भाव शुद्ध ॥३॥
भाव भाव देवामाजी तो मिळाला । दासरामा लाधला राजयोग ॥४॥

## ११८४

निवर्तजे गती तेथोनी जा वरती । तेथे मिळे चित्ती नामयोगे ॥१॥
नामी पावे लय नामी पावे लय । जीवा तरणोपाय नाम एक ॥२॥
प्रथम साधन निवृत्तीची खूण । ब्रह्म सनातन निजरूप ॥३॥
शिखरीचा शंभू देखे याची देही । दासरामा लाही गुरूकृपा ॥४॥

## ११८५

गुरुनाम सिद्ध गुरुनाम सिद्ध । नुरे मना बंध संशयाचा ॥१॥
असोनी नसणे ऐसी खूण बाणे । साधने साधणे क्षण क्षण ॥२॥
बाणोनी जाणेना तेथीचे जाणणे । नुरे न जाणणे तेथवाची ॥३॥
परंज्योतीरूप विमल निर्मल । बिंदुमात्र केवल दासरामा ॥४॥

## ११८६

नामसंकीर्तन शाश्वताची खूण । हरिभक्ता गहन हरि पुढती ॥१॥
कोटी कुळे होती भक्ताची पुनीत । साधतसे हित सकळांचे ॥२॥
गाजतसे कीर्ती साधन निवृत्ती । प्रचीती हे संती स्वरूपाची ॥३॥
नाचतो श्रीरंग पसरे आनंद । आघवी गोविंद वृत्ती झाली ॥४॥
संतवचनी या धरोनी विश्वास । बोले आपणास दासराम ॥५॥

## ११८७

निवृत्तीचे वेड भक्तीचिये छंदे । रघुनाथ गोविंदे लावियेले ॥१॥
नामसंकीर्तने झाले समाधान । जहाले प्रसन्न सिद्ध संत ॥२॥
मार्ग हा बरवा मार्ग हा बरवा । होय बहुत जीवा नित्य लाभ ॥३॥
नित्याचे फुकाचे नवे जे विज्ञान । सापडली खूण निकी सत्य ॥४॥
दासराम भावे घाली लोटांगण । करितो वंदन साधुसंता ॥५॥

## ११८८

कीर्तनी आनंद लुटिती गोविंद । दासरामा छंद तालठेका ॥१॥
हनुमंतराये हरीचे कीर्तन । गोविंदरायालागून दिले कंचे ॥२॥
साधुसंतांचे हे जुनाट वतन । प्रसन्न भगवान सगुणरूपे ॥३॥
निवृत्ती उजळे आनंदाचे मेळे । दासराम बोले गुजगोष्टी ॥४॥

## ११८९

भृकुटीची गती भृभंगाचेस्थान । विलास तो पूर्ण पवनाचा ॥१॥
वायूची लहरी गती ते उलटी । कारण ते दृष्टी आलंबाचे ॥२॥
दासरामा येथे नामाचे साधन । देखिजे बा खूण अंतर्यामी ॥३॥

## ११९०

बुद्धीचा विकास आत्म्याचे दर्शन । आपणा आपण ओळखावे ॥१॥
आपण ते अंशमात्र ब्रह्मरूप । आपुले निष्पाप मूळरूप ॥२॥
बिंदुरूप जाणुनी पूर्णासी मिळता । पूर्ण येई हाता ब्रह्मरूप ॥३॥
तेथे मिळालिया कळे सारासार । पूर्ण तो विचार निवृत्तीचा ॥४॥
मी कोण कळता देव कोण कळे । दासराम बोले रामकृष्ण ॥५॥

## ११९१

राम तोची हरी हरी तोची राम । महावाक्य वर्म निवृत्तींचे ॥१॥
प्रकृती प्रवृत्ति स्थितो शून्य स्थिती । देखिजे ते गती आवलंबी ॥२॥
सहज स्वरूप रूपारूपापैल । निवृत्ती सोज्वळ गगनगाभा ॥३॥
जीवनाचा धागा निवृत्तीचा बोल । रामकृष्ण केवळ भक्तिरूप ॥४॥
चित्कळा वेगळी करिता वायूतोनीं । राहिला गगनी जीवनपाट ॥५॥
चिदानंदापैल सद्रूप अढळ । दासरामा बोल मौनावला ॥६॥

## ११९२

अंगारा तो अंगो लाविला सिद्धानी । मुद्रा ते नयनीं उमटली ॥१॥
मस्तकी लाविली रूपाची विभूती । तेथे सर्वाभूती नम्र झालो ॥२॥
रेवणसिद्धानी केली ऐसी कळा । जाणे तो आगळा भक्तराव ॥३॥
पौष शुद्ध प्रतिपदेचे दिवशी । केली ऐसीं मात सिद्धानी या ॥४॥
दासरामा हृदयी सिद्धांची वसतीं । सापडले चित्ती पाय त्यांचे ॥५॥

## ११९३

हनुमंतराये निवृत्तीचा पाठ । वदविला स्पष्ट बालकाकरवी ॥१॥
निवृत्तीचा पाठ काडसिद्धस्थानी । ऐकिजे श्रवणी भावयुक्त ॥२॥
अज्ञानी या दिली अबोलाची वाचा । अधिकार त्यांचा थोर असे ॥३॥
कृपेची हे वाणी हनुमंतचरणी । अर्पी लोटांगणी दासराम ॥४॥



# श्रुतिपाठ : ४०

## ११९४

श्रुतीचे पठण आणि अध्ययन । करी तो ब्राह्मण वेदवेत्ता ॥१॥
वेदाची अक्षरे सकळा प्रमाण । देखे मूळ स्थान सकळांचे ॥२॥
धन्य ऋषिवर्य केले ते जतन । धर्म सनातन धन्य धन्य ॥३॥
पाचवा तो वेद चारींचिया पैल । अबोल जो बोल नेती नेती ॥४॥
कृतिरूप बोला दासराम शरण । लाधलो ते खूण संतजनी ॥५॥

## ११९५

ब्रह्माचा हुंकार वेदाची अक्षरे । सत्य साच खरे नादघोष ॥१॥
अक्षरे अक्षर कृतिरूप अंगी । देखण्याचे संगी प्रसवली ॥२॥
देखण्याचे पैल ब्रह्म ते विमल । जेथे देखे केवळ देखणे ते ॥३॥
अबोलाचा बोल तेथे झाला हेतू । जेथे द्वैताद्वैतू निर्मियेले ॥४॥
हेतू झाला शब्द शब्दे झाला नाद । तेणे केला भेद अद्वयाचा ॥५॥
उच्छ्वास हुंकार मायिक विस्तार । जेथे ही चत्वार शून्ये झाली ॥६॥
देखणे ते देखे शून्य पोकळिया । अनिर्वाच्य नामा स्फुरण आले ॥७॥
तेची देखे वेद निःशब्द अगाध । ग्रासोनिया नाद अक्षरीचा ॥८॥
नादाचेरहित शब्द ते गगन । दासरामा मौन वेदाठायी ॥९॥

## ११९६

वेद हे विज्ञान अबोल अगाध । कृतिरूप बोध हरि ॐ ऐसा ॥१॥
वेदाचा उच्चार नव्हे ते बोलणे । ज्ञानरूप होणे श्रवणेची ॥२॥
ज्ञानरूप झाल्या अर्थासी पावणे । मुद्दल गाठणे सिद्धांताचे ॥३॥
सिद्धांती प्रसाद सिद्धांती प्रसाद । नेति नेति शब्द उदय झाला ॥४॥
मीपणाचे लोपे आत्म्याचे दर्शन । संतजनी खूण दासरामा ॥५॥

## ११९७

शब्दे ग्रासी शद्व उरवी त्याचा नाद । घेई त्याचा छंद मागुता तो ॥१॥
नादाते ग्रासोनी उरवी आकाश । जेथे चिदाभास दृश्य झाले ॥२॥
दृश्य आणि अदृश्य त्यापैल अबोल । उकली जे खोळ चौदेहाची ॥३॥
देखणेची शद्व शद्व झाला कर्ण । चार मार्ग पूर्ण चार शद्व ॥४॥
शद्व कृतिरूप करी महावाक्ये । दासरामा ऐक्ये सुख झाले ॥५॥

## ११९८

गगनी जो नाद करी त्याचा कर्ण । महावाक्य कर्ण श्रुतिरूप ॥१॥
पवनाचे वरी श्रुति शद्व नाद । नि:शद्व अभेद अखंडित ॥२॥
श्रवण ते श्रुती श्रवण ते श्रुती । वेद गुह्यस्थिती प्राप्त वस्तू ॥३॥
करणीचा डोळा अलक्ष्य ग्रासोनी । हकार जाळोनी तेज देखे ॥४॥
नेती नेती शद्व दावी अनुभव । जेथे नुरे ठाव मीपणासी ॥५॥
वेदाचे अक्षर दासराम घोकी । याची देही सुखी गुरुकृपे ॥६॥

## ११९९

बावन्न अक्षरे ग्रासिताती दोन । दोन तेची तीन नुरवी दोन ॥१॥
तीन ही अक्षरे महाशब्द ग्रासी । रज तम नाशी सहजकळा ॥२॥
महाशब्द लय गुरूनामी होय । देखण्याची सोय नामकळा ॥३॥
श्रुतीचा हा पाठ निरालंबी वाट । दासरामा अवीट बोधरूप ॥४॥

## १२००

नामाचे साधन अखंड स्मरण । नुरवी जे मौन आणि बोल ॥१॥
बोल अबोलणे गिळोनिया दोनी । येईजे साधनी नरदेही ॥२॥
प्रवृत्ती सांडोनी होई अंतर्मुख । पुढे ऊर्ध्वमुख होई प्राण्या ॥३॥
वेद ही अक्षरे ब्रह्माचे उच्छिष्ट । आनंद निघोट शुद्धरूप ॥४॥
महावाक्य उमज गुरुकृपा वर्म । दासरामा धाम कैवल्याचे ॥५॥

## १२०१

मज प्राकृतासी संस्कृत दाविले । संती बोधियेले वेदाक्षर ॥१॥
ब्रह्मांड व्यापिले तेची या प्रकृती । श्रुतिवचन संती जागविले ॥२॥

संस्कृताची ठेव लुटिली प्रकृती । अनुभवस्थिती संतजनी ॥३॥
वेदार्थ अनुभव लाहिजे या देही । न कळे जो पाही शब्दकोशे ॥४॥
कोशातीत ज्ञान अनुभव सिद्ध । दासरामा बोध पूर्व पुण्ये ॥५॥

१२०२

अर्थ देखे तत्त्वामाजी तत्त्वरूप । देखणा अपाप देखे जेथे ॥१॥
ॐकार हे गती वायूची प्रचीती । निजखूण जाणती महाभक्त ॥२॥
ज्ञानाज्ञानापैल विज्ञानसागर । स्वरूप अक्षर गुह्यभाग ॥३॥
पांच भौतिकासी दुर्गम हे ज्ञान । दासरामा प्रमाण अध्यात्म हे ॥४॥

१२०३

महर्षी करिती श्रवण वेदांचे । येई आनंदाचे भरते त्यासी ॥१॥
नादभरे कैचा होत आहे घोष । ऐकताची दोष उरती ना ॥२॥
पापही सरले पुण्यही सरले । श्रीमूर्ती भेटले गुरुराव ॥३॥
दासराम झाला तेथे लोटांगणी । ठसावला गगनी आत्माराम ॥४॥

१२०४

वैकुंठ निघोट केला त्याचा घोट । तेथेची अवीट रस वाहे ॥१॥
अक्षर सुरस अक्षर सुरस । वाहे अविनाश जीवनकळा ॥२॥
सर्व रस एकवटले बा जेथे । रसालागी येते रसपण ॥३॥
डोळियाचा रस कानाने प्राशिला । नाद तो सेविला अक्षरीचा ॥४॥
दासराम शरण हनुमंतचरणी । हेतू हा आटोनी श्रवण केले ॥५॥

१२०५

हेतूचिया पैल वृत्ति होय मौनी । जडले ते मुनी देव झाले ॥१॥
सकळही भाग्य आले त्यांचे हाता । टाळ आणि कंथा जोडिली जेणे ॥२॥
चढला तो स्वर मृदंगाचे नादे । घोष चाले छंदे धन्य धन्य ॥३॥
संती विदेहता काया ब्रह्मरूप । वेदाचे स्वरूप हरी जाणे ॥४॥
रामकृष्ण हरी वेदाचे माहेर । साराचेही सार दासरामा ॥५॥

१२०६

रामकृष्णहरी मेळुणी ॐकार । श्रुतीचे आगर शद्बब्रह्म ॥१॥
सकळहीं शद्व जेथोनी उदेले । जयात निमाले एकाएकी ॥२॥
वेदामाजी प्रणव श्रीकृष्णस्वरूप । अदृश्य अमूप देखणे जे ॥३॥
दृश्य ते सांडोनी अदृश्य देखणे । दासराम जाणे नेणीवेने ॥४॥

१२०७

नेणीवेनी जाणिली जाणीवेची कळा । नेती नेती बोला रामकृष्ण ॥१॥
तेथेची दाटले हरीचे स्वरूप । निष्काम अमूप निरंजन ॥२॥
जाणीवेने प्राप्त नेणीव विकळा । विकळेने कळा कळो आली ॥३॥
अकळ कळले जरी शद्बज्ञाने । विकळा ते खुणे प्रगट झाली ॥४॥
साठ ते विकळा त्यात दोन कळा । दासरामा उमाळा जिव्हाळ्याचा ॥५॥

१२०८

वेदांचे वचन शास्त्रासी प्रमाण । पुराणासी मान्य स्मृतीलागी ॥१॥
ज्ञानाचाही अंत सिद्ध जो सिद्धांत । तोची हा वेदांत सिद्धजनी ॥२॥
सिद्धांचा सुपंथ संतीं आचरिला । अर्थ प्रगट केला वेदाचा तो ॥३॥
श्रुती अर्थगाभा दाविला स्वयंभा । करोनिया नभा ग्रास देही ॥४॥
दासराम करी मस्तक ठेंगणा । लागतो चरणा संतांचिया ॥५॥

१२०९

धन्य ते शंकराचार्य जगद्गुरू । ओतिला सागरू वेदांतीचा ॥१॥
धन्य ज्ञानाई ते विष्णूची सुजाण । सगुण निधान वेदांताचे ॥२॥
नाथ नामदेव तुकाराम थोर । निळोबा साचार ब्रह्ममूर्ती ॥३॥
कबीरादी संत समर्थ विख्यात । धन्य हनुमंत अवतारी ॥४॥
धन्य रामकृष्ण परमहंस संत । सुगम वेदांत कथिला ज्यानी ॥५॥
दासराम लोळे ऐसीयांचे पायी । रामकृष्ण हृदयी हरिरूप ॥६॥

१२१०

अहं ब्रह्म ऐसे वेदाचे वचन । पूर्ण समाधान बोधरूप ॥१॥
हकाराचा अंत तेथीचा सिद्धांत । खंडण ते होत द्वैतवाद ॥२॥

देहीच प्रत्यय श्रीहरीचे पाय । हाची तरणोपाय गुरुभक्ता ॥३॥
देखण्याचा अंत करितो देखणा । होत असे राणा रंक तेथे ॥४॥
स्वधर्म चोखट साधकाकारणे । दासरामा खूण संतसंगे ॥५॥

## १२११

तत्वमसि ऐसे ऐके महावाक्य । जेथे होय ऐक्य देवभक्ता ॥१॥
ब्रह्मांडी व पिंडी एकची अनुभव । जेथे तेथे देव ठसावला ॥२॥
गगनी तो नाही मीपणासी ठाव । देखिले अपूर्व रूप बरवे ॥३॥
देहभाव तेथे जातसे विलया । म्हणोनी ते काया ब्रह्मरूप ॥४॥
आपुल्याच रूपी आपुलाच खेळ । संशयकल्लोळ जीवभाव ॥५॥
दासरामा एक क्षणाचा आनंद । क्षण तो गोविंद काल ग्रासी ॥६॥

## १२१२

देहभावे जीव भ्रांतिरूप झाला । कैचा हा गोविला बंधनात ॥१॥
हाची ब्रह्मरूप वस्तूता पहाता । आत्मरूपी सत्ता त्याची असे ॥२॥
निरसोनी अज्ञान पाही तू स्वतासी । आत्माची आहेसी आत्मरूप ॥३॥
पंचतत्त्वाआत आत्मयाची गाठी । चिदानंदी भेटी सद्रूपाची ॥४॥
मानिले आपुले ते ते टाकी वेगी । राहे उगाउगी स्वस्थचित्त ॥५॥
निज ते आपण अयमात्मा ब्रह्म । महावाक्य वर्म दासरामा ॥६॥

## १२१३

महावाक्य गुज निजाचेही निज । निमाले सहज जीव शिव ॥१॥
सकळही झाले ब्रह्मरूप त्यासी । देखणा हा ग्रासी देखणेची ॥२॥
असोनी नसोनी सारिखे देखणे । जाण नेण नेणे विज्ञान ते ॥३॥
सर्व ब्रह्म ऐसा परियेसी घोष । दासरामा हर्ष पोटी झाला ॥४॥

## १२१४

पोट हे गगन पाठ हे गगन । देखणे ग्रासून संत ठेले ॥१॥
देखणे हे आहे हे तू विसरला । तयाहाती आला वेदघोष ॥२॥
ब्रह्मरूप वेद ब्रह्मीच उदेले । अज्ञान ते भले ब्रह्मरूप ॥३॥

पांचवा हा वेद देही स्वयंसिद्ध । विराला अगाध हेतू जेथे ॥४॥
ब्रह्म हे अगाध हेतूही अगाध । देखणे अगाध मुळीचे ते ॥५॥
सद्‌गुरूंचा बोध देखिजे अगाध । नाम हे हृद्‌गद दासरामा ॥६॥

### १२१५

पंचम आलाप पाचवा जो स्वर । तेथीचा उच्चार श्रीगुरूंचा ॥१॥
गुरुलिंगजंगम सिद्ध बोधी बोध । पाचवा हा वेद गुरुभक्ता ॥२॥
रामचंद्ररायें गाईले भजन । श्रुतींचे वचन अभंग ते ॥३॥
हनुमंतमायें केली जी कविता । प्रगटिले अर्था श्रुतीचिया ॥४॥
माऊली रेणाई स्वये गाय गीत । काडसिद्ध बोधीत पद्यरूप ॥५॥
पाचवा हा वेंद पाचवा हा वेद । चिन्मय प्रसिद्ध दासरामा ॥६॥

### १२१६

गीता ज्ञानेश्वरी आणि भागवत । दासबोध ग्रंथ संतवचने ॥१॥
ज्ञानेश्वर गाथा नामदेव गाथा । एकनाथ गाथा वेदरूप ॥२॥
तुकाराम गाथा निळोबांची गाथा । देखिजे ही संथा वेदाक्षरे ॥३॥
पाचवा हा वेद श्रीकृष्ण गाईला । दासरामा कथिला हनुमंते ॥४॥

### १२१७

ब्रह्मनिष्ठ कोणी धन्य तो ब्राह्मण । पूजनीय धन्य हरिभक्त ॥१॥
तयांचे प्रसादे होईल आनंद । लागलिया छंद गोविंदाचा ॥२॥
स्वये नित्य वदे ज्याची वेदवाणी । हरीचे कीर्तनी तन्मयता ॥३॥
कर्मपरायण नित्य उपासन । वसे तेथे ज्ञान गुरूभक्ता ॥४॥
नामनिष्ठ अंगी गुरुकृपा पूर्ण । दासराम शरण शरण त्यासी ॥५॥

### १२१८

हरिनामसार वेदाचे अक्षर । गाईला अपार महिमा संती ॥१॥
विठोबासी शरण जावे । निजनिष्ठे नाम घ्यावे ।
कथिले स्वभावे तुकोबानी ॥२॥

वेदाचे हे सार श्रुतींचा विचार । पुराणी निर्धार नाम एक ॥३॥
गोविंदरायानी नामाचे महिमान । अभंगी वचन साठविले ॥४॥
नामामाजी रामनामाचा महिमा । तयाचा ओनामा स्फुरे देही ॥५॥
दासरामा नाम महावाक्य वर्म । दाविले सुगम गुरुमाते ॥६॥

## १२१९

श्रुति नाम आणि प्रेमाची मिळणी । साधिला संतांनी तिळगूळ ॥१॥
तोची तिळगूळ संक्रमणदिनी । अलक्ष्य दावोनी हाता दिला ॥२॥
आनंद जहाला आनंद जहाला । बरवा भेटला संतराय ॥३॥
सेविलिया पुनः पहाता तो उरे । पूर्ण ते न सरे सत्य सत्य ॥४॥
सद्गुरुआज्ञेने वाटितो तिळगूळ । दासरामा रसाळ वेदवाणी ॥५॥

## १२२०

मतिमंद परी घडले नवल । वदविला बोल वेदघोष ॥१॥
रेडियाचे परी मत्त ते वैखरी । होतो अहंकारी काय सांगू ॥२॥
कैचा श्रुतिपाठ माझिये वदनी । हनुमंतरायानी वदविला ॥३॥
अठराशे एकसष्ट (१८६१) संक्रमणदिन । पौष शुद्ध जाण चतुर्थीसी ॥४॥
श्रुतीचा हा पाठ निरंजनस्थानी । ऐकोजे श्रवणी गुरुमुखे ॥५॥
कृपेची हे वाणी हनुमंतचरणी । अर्पी लोटांगणी दासराम ॥६॥

## १२२१

डोळियाचीं वाणी तेची वेदाक्षरे । पुरोपुर भरे कर्णामाजी ॥१॥
कर्णाने व्यापिली कैचीं दिननिशी । तेथेची काळासी ठाव झाला ॥२॥
देही देखे सूत्र करिजे विचार । अर्थ घेई सार पदस्थानी ॥३॥
दासरामा गुह्य भाग हा बोधिला । जाणे तो आगळा योगिराव ॥४॥



# स्तुतिपाठ : ४१

## १२२२

हरीचिये स्तुती अपार अनंत । मौन ते धरीत महाज्ञानी ॥१॥
वेदशास्त्र आणि पुराणे अपुरी । जहाली माघारी स्तुती करिता ॥२॥
नाम हे अनंत अनंताएवढे । तयामाजी जोडें देवदेव ॥३॥
दासराम नामी रमोनीच ठेला । तेणे हाता आला स्तुतिपाठ ॥४॥

## १२२३

हरी हरी हरी श्रीहरीची स्तुती । नामाची महती सर्वश्रेष्ठ ॥१॥
नाम तेची ब्रह्म नाम तेची ब्रह्म । करणी ते सुगम बोलापैल ॥२॥
करणीचे पैल परब्रह्म कळा । अघटित डोळा देखे का रे ॥३॥
स्तुतीचा हा गाभा व्यापियेला नभा । दासराम शोभा देखे दे ही ॥४॥

## १२२४

आम्ही स्तुतिपाठ देवा गाऊ गीती । जेणे हा श्रीपती तुष्टे सदा ॥१॥
भाव भक्तिप्रिय असे हा भगवान । सकळा कारण एकची तो ॥२॥
निर्गुण सगुण जेथोनी उदेले । देखताची झाले एक दोनी ॥३॥
देखणे हे एक नव्हेची अनेक । शून्यापोटी देख शून्य सर्व ॥४॥
दासराम लीन श्रीरंगासी झाला । जेथे रंगा आला रंग माझा ॥५॥

## १२२५

निर्गुण सगुण रूप एकीएक । दावितो कौतुक हरी माझा ॥१॥
घट्ट आणि पातळ जरी झाले धृत । तरी काय म्हणत तयालागी ॥२॥
गुणरहित हे निर्गुणाचे रूप । सगुण स्वरूप कैचे झाले ॥३॥
शून्यभावामाजी शून्यगुण झाला । तोचि प्रसवला त्रिगुणासी ॥४॥
म्हणोनिया झाले रूप हे सगुण । अकळ भगवान कळो आला ॥५॥
दासराम गाई नाम श्रीरंगाचे । हनुमंत कैचे बोळले बो ॥६॥

## १२२६

सगुण हे भक्ती निर्गुणाचा पंथ । निर्गुण शोभत अव्यक्त ते ॥१॥
निर्गुणाची भक्ती निरालंब मार्ग । परमात्मयोग त्याचे पुढे ॥२॥
दृश्य आणि अदृश्य सगुण निर्गुण । ऐसी वर्मखूण ओळखा गा ॥३॥
दासरामा सुलभ हरिभक्ती पंथ । गुरूनिष्ठे प्राप्त गुरुकृपा ॥४॥

## १२२७

चालता बोलता देव संतराव । पूर्ण स्वयमेव सत्यरूप ॥१॥
देहीच विदेही अनासक्त भाव । गोडी ते अपूर्व देवाजीची ॥२॥
जगाचा उद्धार धन्य अवतार । अनंत भांडार दातयाचे ॥३॥
नामसंकीर्तन भजनाची भक्ती । लीन सर्वाभूती शुद्ध भावे ॥४॥
ज्ञानदीप लावी हरीचे कीर्तनी । सद्‌गुरुवचनी साक्षात्कार ॥५॥
दासराम त्यांचे चरणावरी लोळे । भक्तिभाव न कळे याविना त्या ॥६॥

## १२२८

आगमानिगमापैल जो श्रीहरी । वर्णिताची चारी शिणली वाचा ॥१॥
परी हा सुलभ गुरूंचिया बळे । संतसंग मेळे कळो येई ॥२॥
अबोलाचे बोले वानिता रूपासी । येई ते हातासी रूप देवा ॥३॥
कृतिरूप देखे अबोलाचा बोल । उकले जो खोळ चौदेहाची ॥४॥
सद्‌गुरुरायानी केले हे नवल । दासरामा अबोल वदविला ॥५॥

## १२२९

सगुण हे भक्ती देही दावी मुक्ती । अनिर्वाच्य स्थिती सहज देई ॥१॥
सगुणावाचोनी अकळ निर्गुण । सुलभ ते खूण सगुणाची ॥२॥
संतपदी निष्ठा होता परिपूर्ण । सद्‌गुरुवचन भक्ती शुद्ध ॥३॥
सद्‌गुरुची वाणी श्रुती ज्या प्रमाण । तयाते निर्गुण लक्षिता ये ॥४॥
संतासी आवडे रामनाम सेवा । दासरामा ठेवा गुरूबोध ॥५॥

## १२३०

संतपदी घेणे अंगेची लोळण । तरी भगवान कृपा करी ॥१॥
संतचणरधूळी लाविताची माथा । आशिर्वाद स्वता देई देव ॥२॥

संताचे पायासी घालिताची मिठी । होय उठाउठी लाभ बरवा ॥३॥
संत सगुण मूर्ती गाता ध्याता चित्ती । प्रसाद हा हाती लाभे त्यांचा ॥४॥
नामी गोडी तोची सत्य शुद्ध भाव । निर्गुणाचा ठाव लाधे त्यासी ॥५॥
निर्गुण लक्षिता निर्गुणाचे सुख । होय एकीएक अलक्ष्यता ॥६॥
अलक्ष्य लक्षूनी ठावी पाडी वस्तू । दासरामा किंतू उरला नाही ॥७॥

१२३१

हेतु भाव लय तेथे हरीचे पाय । दावियेली सोय समर्थानी ॥१॥
नामलययोग नामलययोग । अभेदाचा संग भेदरहित ॥२॥
निर्धार हे वर्म निर्धार हे वर्म । गुरुमार्ग सुगम साधन सिद्ध ॥३॥
दासराम स्तुतिपाठ तो अखंड । करणी ते वाड गगनाची ॥४॥

१२३२

श्रीहरीचे द्वारी देखे अहोरात्री । घस्त घाली फेरी चहू कोनी ॥१॥
वैष्णव ते भक्त करिती नामघोष । टाळघोळ सुरस मंजुळ नाद ॥२॥
मृदंगाचा ध्वनी नामाचा गजर । कैंचे महाद्वार भरले नादे ॥३॥
दासराम म्हणे यासी वानू किती । अनंत ते कीर्ती देवाजीची ॥४॥

१२३३

देवाचिये द्वारी भजनाचा थाट । करिती बोभाट रामनाम ॥१॥
महावैष्णवांचा तेथे असे मान । जेथे भक्तजन जमले भारी ॥२॥
आनंद सोहळा आनंदाचा गाभा । आनंदाची शोभा अनिर्वाच्य ॥३॥
दासराम म्हणे वर्णू आता काय । नरदेही सोय गुरुकृपे ॥४॥

१२३४

श्रीहरिमंदिरी हरीचे कीर्तन । हरिभक्ता मान हरिपुढती ॥१॥
सिद्ध सनकादिक रंगले बा जेथे । परमात्मा तेथे स्वये नाचे ॥२॥
महागुरुभक्त करिती कीर्तन । गुरुकृपा पूर्ण ज्यांचेवरी ॥३॥
श्रोता आणि वक्ता होय ब्रह्मरूप । शोभा ते अमूप निरंजनी ॥४॥
दासराम तेथे नाचते लेकरू । प्रेमे ताल धरू मायबापा ॥५॥

## १२३५

निरंजनपीठा गेली नीट वाट । तेथे भक्त भाट गान करिती ॥१॥
नामाचे धारक हरिनाम गाती । समाधान चित्ती पूर्ण जया ॥२॥
रूपाची कोवळी प्रभा ते फाकली । दृष्टी पुंजाळली नामनिष्ठ ॥३॥
गुरूभक्त नामी रंगोनिया जाती । दासराम गीती हरी गाय ॥४॥

## १२३६

आम्ही झालो कैचे श्रीहरीचे भाट । करितो बोभाट कीर्तनाचा ॥१॥
हरी गाऊ गीती हरी गाऊ गीती । धरोनिया चित्ती गुरूनाम ॥२॥
गुरूरूप ध्यानी गुरुरुप मनी । बोलू गुरुवाणी गुरुदेव ॥३॥
सद्‌गुरू तो देव सद्‌गुरू तो देव । दासराम भाव धरी तेथे ॥४॥

## १२३७

धन्य हनुमंत सद्‌गुरु दातार । सखा रघुवीर ज्यांचा झाला ॥१॥
सद्‌गुरु जयांचे धन्य रामचंद्र । कृपा झाली थोर सदगुरुंची ॥२॥
हरीचे कीर्तन हनुमंता दिले । प्रचीतीसी आले ब्रह्मरूप ॥३॥
कीर्तन करिता होती देहातीत । आनंद तो नित्य उजळावा ॥४॥
सद्‌गुरुपीठाचे आज्ञे जगदोद्धार । केलासे अपार गुरुमाये ॥५॥
हनुमंतराये ऐसे हे कीर्तन । गोविंदरायालागून दिले असे ॥६॥
हनुमंतराये केली कृपा पूर्ण । परंपरा धन्य हरिभक्ती ॥७॥
रघुनाथराया केली कृपा पूर्ण । दिधले कीर्तन गुरुपुत्रा ॥८॥
दासरामा झाला ऐसा स्तुतिपाठ । संतोषे वैकुंठ हरी माझा ॥९॥

## १२३८

कोणे करावी हे देवा तुझी स्तुती । कैसी खुंटे गती सुमनाची ॥१॥
रामकृष्णहरी हाची तुझा स्तव । बोल हा अपूर्व अंतरीचा ॥२॥
कोण्या सुरामाजी आणि कोण्या स्वरी । आळवू श्रीहरी सांग मला ॥३॥
दासराम म्हणे रामनामी सुख । वाटते विशेख भक्तिरसी ॥४॥

१२३९

हनुमंतराये स्तुतिपाठ-वाणी । वदविली वदनी बालकाच्या ॥१॥
स्तुति करायाचा अधिकार कोणा । ठाव तो चरणावरी माथा ॥२॥
स्तुतिपाठ ऐके शिवाचिये स्थानी । रामनाम वाणी समतेची ॥३॥
पौष शुद्ध द्वितीया अठराशे एकसष्ट (१८६१) । झालासे अवीट स्तुतिपाठ ॥४॥
हनुमंतसद्गुरुराजया चरणी । अर्पितो हा जाणी स्तुतिपाठ ॥५॥
दासराम ठेवी चरणावरी माथा । रामनाम गाता आनंद तो ॥६॥



# सिद्धपाठ : ४२

१२४०

पाताळ भूलोक स्वर्ग ओलांडोनी । वैकुंठभुवनी गमन केले ॥१॥
तेथे हारपले जन्म आणि मरण । रंगले हे क्षण रामनामी ॥२॥
क्षणक्षणा पावे प्राणी जन्ममरण । देही घेई खूण संतसंगे ॥३॥
सिद्धकृपे सिद्धपाठी बंध–नाश । तेथे अविनाश कळा अंगी ॥४॥
देही दावी नवल हनुमंतराय । सेवीतसे पाय दासराम ॥५॥

१२४१

वारियाने उघडिला गगनाचा डोळा ।
तेजामाजी कैंचे झाले ब्रह्मांड हे गोळा ॥१॥
वारियाने गिळिले हो आपणा आपण ।
निःशब्दाचा शब्द करूनी केला त्याचा नयन ॥२॥
तेथे हारपली कैंची भूक आणि तहान ।
घनानंद परमात्मा नुरवी जीवपण ॥३॥
हनुमंत सद्‌गुरुराये दाविली हे कळा ।
दासराम देखे ऐसी अघटित लीला ॥४॥

१२४२

तेजोबिंदू ऊर्ध्वगामी चाले वरीवरी ।
भीतरी जो पाहे मौज तयासी अंबरी ॥१॥
पूर्ण ते मिसळे पूर्णरुपा माझारी ।
काष्ठवत देह ज्याचा प्राण तो कुसरी ॥२॥
देखणे ते देखे देखणेपणानें ।
लिप्तालिप्त स्थिती नाही राहे शून्यपणे ॥३॥
सिद्धरूपी निजांगाते चैतन्याची कांती ।
दासरामा गुरुकृपे घडेल ही स्थिती ॥४॥

## १२४३

चुना कात मिश्रीत होता । लाल रंग येईल हाता ॥१॥
वाणीमाजी प्रगटे ज्योती । चढे तेथे लाल कांती ॥२॥
श्याम सुनील आटणी । तेथे लावण्याची खाणी ॥३॥
रामनाम भरला रंग । कंठी दाटला श्रीरंग ॥४॥
सगुण निर्गुण ऐक्यस्थिती । धगधगीत स्वरूप प्रीती ॥५॥
नामरूप होता वाणी । देव भरला चहू कोनी ॥६॥
सद्‌गुरूंची भावज्योती । भक्तिवंतासी प्रचीती ॥७॥
स्वरूपाचा झाला तारा । सद्‌गुरूंच्या धरिलें करा ॥८॥
गुरुलिंगजंगम देव । दासराम तोचि ठाव ॥९॥

## १२४४

अग्नी घातिला पदरात । कैंचा झालासे प्रदीप्त ॥१॥
ऐसा असे परमार्थ । जाणतों हे नवल संत ॥२॥
अग्नीनारायण देव । मूळरूपीं त्याचा ठाव ॥३॥
दासराम लोटांगणी । येतो संतांचे चरणी ॥४॥

## १२४५

वदविला बोल माझिये वदनीं । पान्हा दिला स्तनी गुरुमाये ॥१॥
दाविली अकळ वाणी गुरूनाथे । तयाचे आतौते स्वयंतेज ॥२॥
रक्त श्वेत श्याम सुनील आटणी । तेथे रंगे वाणी पूर्णपणे ॥३॥
अपूर्णाते पूर्ण मागोनी ते करी । रंग उडे भारी परेतोनी ॥४॥
माया ब्रह्म ऐक्य लाल रंग देख । जेथोनी विशेख मौज झाली ॥५॥
पंचभूत सृष्टी येथे विस्तारली । मुळीं ते देखिली स्वयंज्योतीं ॥६॥
स्वयंतेजरूपी तेजरूप झाला । ब्रह्मरूप शोभला गुरुराव ॥७॥
बोधिली श्रीगुरु येथे आत्मकळा । दावोनि जिव्हाळा प्रणवाचा ॥८॥
दासराम तेथे घाली लोटांगण । लाधले अंजन डोळियात ॥९॥

## १२४६

स्वयंतेज कैंचे नयेची सांगता । विसरतो स्वता देखताची ॥१॥
ब्रह्मांडाचे वरी वीज चमकली । प्रभा ते फाकली गगनामाजी ॥२॥

गतीमान बिजली विराम पावली । पूर्णरूप धाली निरंजनी ॥३॥
दाविली हे कळा सद्‌गुरूदातारे । जेथे झाले सारे अणूरेणू ॥४॥
दासराम म्हणे बोलवेना माते । पतिता गूज ते सापडले ॥५॥

१२४७

दिले वर्म हाता हनुमंतराये । दावियले पाय निरंजनी ॥१॥
कासया रे माझी वाणी बोले बोल । न कळे अकळ गुण तिचा ॥२॥
हरीचे कीर्तनी नेत्रीची बाहुली । बहू वाड झाली गुण गाता ॥३॥
तयामाजी निज तेज हे साठले । शद्ब ते निमाले गतिमाजी ॥४॥
दासरामा कैचे जहाले ते गूढ । मती झाली मूढ काय करू ॥५॥

१२४८

प्रेमभावे देखे श्रीहरीचे ठायी । तेचि आदिमायी आदिशक्ती ॥१॥
देखणे तो देखे नीट प्रेमभाव । जेथे हा उद्भव ब्रह्मांडाचा ॥२॥
देखणे हे दावी कैचे द्वैताद्वैत । जैसा असे हेत तैसे होय ॥३॥
देखण्याचे पैल केवळ ते ब्रह्म । दासराम विश्राम पावे तेथे ॥४॥

१२४९

बावन्न तै परा अपरा जहाली । तेजे पुंजाळली कैंची गती ॥१॥
चित्तवृत्ती धाली चित्तवृत्ती धाली । ठाईच निमाली कंठापैल ॥२॥
प्राणरूप उजळे प्राणरूप उजळे । अलंकारी शोभले बुद्धिरूप ॥३॥
दासराम म्हणे निवाले लोचन । झाले समाधान गुरूकृपे ॥४॥

१२५०

दृष्टी हे निवाली दृष्टी हे निवाली । आस ते चढली उत्कर्षासी ॥१॥
प्रवृत्तीसी कोणी न विचारी माये । गीत एक गाये निवृत्तीचे ॥२॥
गुरूलिंगजंगम बोळले संपूर्ण । प्रकाशले ज्ञान अमृतत्वे ॥३॥
हनुमंत सद्‌गुरूराये कृपा केली । पदो विनटली कैंची बुद्धी ॥४॥
दासराम झाला सत्पदी शरण । मौजेचा भगवान मौजरूप ॥५॥

## २५१

श्याम नीळ मुद्रा चेपिली संतांनी । रंग हा तेथोनी उवंबळला ॥१॥
रंग तो श्रीरंग श्रीरंग तो रंग । कळे संतसंग घडता बरवा ॥२॥
पंचरंगालागी कारण हा रंग । जयामुळे संग शरीराचा ॥३॥
दासराम म्हणे देही देखे मौज । जेणे पळे फौज नाशिवंत ॥४॥

## १२५२

आरक्त ते माया पीत ते उन्मनी । स्वयंतेज खाणी ब्रह्मरूप ॥१॥
सद्गुरुप्रसादे पाहिजे ते पाय । अर्थरूप होय शब्दाचेनी ॥२॥
शब्द झाला कर्णी शब्द झाला करणी । कृपेची ती वाणी अनिर्वाच्य ॥३॥
दासराम लीन हनुमंत चरणी । उदय निशिदिनी जेणे योगे ॥४॥

## १२५३

सिद्धरूप देखे सिद्धांचिये स्थानी । देखे सिद्धासनी सिद्धमुद्रा ॥१॥
पंचभूत माया शुद्ध सत माया । जाताचि विलया सिद्धरूप ॥२॥
विलय पावता देखणे उरते । देखिजे बीज ते सकळाचे ॥३॥
शुद्ध सत्त्व माया हेतूचे देखणे । दासराम खुणे बोलियेला ॥४॥

## १२५४

हेतूचे देखणे तेथोनी उद्भव । जेथोनी प्रणव उदया आला ॥१॥
तेथोनी उदेले पंचभूत भाव । पंचप्राण अपूर्व पसरले ॥२॥
देखे नवलाव देखे नवलाव । व्यापियेला देव मौजरूप ॥३॥
अशुद्धात्म माया पंचभूत सृष्टी । विस्तारली कोटी गगनी या ॥४॥
दासरामा सकळा पैल सिद्धरूप । देखिजे अपाप सिद्धपाठे ॥५॥

## १२५५

सिद्धांचा प्रसाद तोचि हा आनंद । स्फुरतसे नाद वाणीमाजी ॥१॥
कृपेची अक्षरे ऐसी ती उत्तरे । श्रवणी पाझरे नामामृत ॥२॥
उच्छिष्ट ते अन्न सेवोनिया धालो । विराम पावलो एक क्षण ॥३॥
प्रभू रेवणसिद्ध शिव भोलानाथ । उद्धरिला पतित दर्शनेची ॥४॥

मरुळसिद्ध काडसिद्ध ते समर्थ । विभूति लावीत चिद्रूपाची ॥५॥
डोळा बोले बोल ऐसा अनुभव । सिद्धांचा प्रभाव सिद्धस्थानी ॥६॥
डोळिया फुटली जिव्हा ते आगळी । सिद्धे वदविली शद्बवाणी ॥७॥
दासराम पामर सिद्ध त्या आधार । सद्रूप ते सार योगियांचे ॥८॥

१२५६

सिद्धपाठ सिद्धवाणी सिद्धपदी । गाईला आनंदी सिद्धकृपे ॥१॥
त्रयोदश अक्षरे शिवाचे हृदय । होय तरणोपाय हरीवाचे ॥२॥
गुरुनाम सिद्ध गुरूनाम सिद्ध । देखिजे अगाध करणो पैल ॥३॥
चतुर्दशस्थानी देखे सिद्धराज । दीपावली मौज स्वयंदीप ॥४॥
हनुमंतराये वदविले सार । गाईले आदरे सत्य सत्य ॥५॥
प्रसाद उच्छिष्ट आनंद निघोट । अपूर्व हा पट सुकृताचा ॥६॥
रेणाईचे स्थानी उच्चारी हा पाठ । उद्धरती स्पष्ट कोटी कुळे ॥७॥
मार्गशीर्ष वद्य सप्तमी सुफल । तोषले केवळ साधुराज ॥८॥
शक १८६१ (अठराशे एकसष्टा) माझारी । बोलिली वैखरी सिद्धपाठ ॥९॥
हनुमंत कृपा वाणी हनुमंता । दासराम अर्पिता होय पदी ॥१०॥



# संतचरित्रपाठ : ४३

१२५७

तिरुपन्नवर अंत्यज । नामनिष्ठ भक्तराज ।
कंठाआतू नामतेज । हृदय सहज सप्रेम ॥१॥
श्रीरंगम्पट्टण देव । त्याचे ठायी पूर्ण भाव ।
निजकर्मी ज्या सद्भाव । नित्य कळस देखावा ॥२॥
अंत्यजासी देवालयी । पूर्वी जाता न ये पाही ।
गेल्या दंड होई । प्रायश्चित तयासी ॥३॥
कडक ते देवस्थान । तेणे मन होय उद्विग्न ।
करुनी अंतःकरण प्रसन्न । समाधानी असावे ॥४॥
बैसोनिया वृक्षानिकट । भजन करावे चोखट ।
भक्ती विश्वास बळकट । देव नेईल पायासी ॥५॥
राजालागी त्वरित । देवे दिलासे दृष्टांत ।
घेवोनिया येथ यावे त्वरित । अंत्यजा ॥६॥
पुजाऱ्यासी राजापरीस । आज्ञा झाली स्वप्नी खास ।
आज्ञेपरी विचारास । केले सर्व ते वेळी ॥७॥
पालखीतोनी अंत्यजा । आणीतसे महाराजा ।
प्रगटोनी चारी भुजा । देव कवळी भक्तासी ॥८॥
तव तेथे दिव्य विमान । आले श्रीवैकुंठाहून ।
घंटानाद गेला भरून । झळकल्या पताका ॥९॥
नवलप्रकाश दाटला । महाभक्त आरूढला ।
स्वये चक्रपाणी झाला । विष्णुदूते धरियेला ॥१०॥
मुजरा करिती विष्णुदूत । राजा झाला शोकग्रस्त ।
सर्व जन लोळण घेत । आप्त इष्ट मूर्च्छित ॥११॥
रामनाम तरणोपाय । सांगितली सकळा सोय ।
नामगीत गात जाय । भक्तराय वैकुंठा ॥१२॥
दासराम लागे चरणा । धन्य धन्य भक्तराणा ।
ऐकावी हे विज्ञापना । दावा चरणा देवाच्या ॥१३॥

## १२५८

राका कुंभार श्रीभक्त । आतमस्वरूपी अनुरक्त ॥१॥
सदा मुखी नामावळी । नेत्री वसे वनमाळी ॥२॥
पिले मांजरीची । मडक्यामाजी होती साचीं ॥३॥
मडके गेले ते आव्यात । राका झाले चिंताग्रस्त ॥४॥
मांजरी ते घिरटी घाली । शोकाकुल कैंची झाली ॥५॥
राका करिती प्रार्थना । आळवोनी देवराणा ॥६॥
वाहीन संसार । तुळशी ठेवोनीं घरावर ॥७॥
तव नवल झाले कैंचे । आव्यातील मडके कच्चे ॥८॥
त्यात सुरक्षित पिले । श्रीहरीने कौतुक केले ॥९॥
बोलापरी भले । सर्व घरदार लुटिले ॥१०॥
दासराम त्यांचे चरणी । प्रेमे जाय लोटांगणी ॥११॥

## १२५९

सुवर्णकंकणी मन नाही ज्यांचे भुलले ।
वनी भटकता तया दृष्टोसी जे आले ।
रूक्मिणी मातेच्या कसोटींसी जे टिकले ।
संसार जाळोनी श्रीहरिचरणी रतले ॥१॥
धन्य धन्य राका महाभक्त संतराव ।
जया एक चित्ती पंढरपूरचा बडा देव ॥ध्रु॥
उदरनिर्वाह जळण काटुकावरी । सर्व भार ज्यांचा एक परमेश्वरावरी ।
महा पतिव्रता पत्नी वंका माऊली बरी ।
धन्य धन्य कन्या बंका परम अधिकारी ॥२॥
धन्य धन्य बंका सोने माती जीं ते सम ।
जिचे मुखीं सदा श्रीविठ्ठलाचे नाम । सकळही संता झाला आनंद परम ।
संतोष वाढला प्रगट झाले सगुण ब्रह्म ॥३॥
नामदेव रुक्मिणी माता विठ्ठल बोळले । संत देव भक्त एकमेका आलिंगिले ।
वंदुनी चरणरजा भक्तिप्रेम भोगिले ।
भगवंताचे चरणी राका नामदेव लोळे ॥४॥
रुक्मिणी मातेसी राका घाली प्रणिपात । नामदेव आदी संत घालिती दंडवत ।
सुखाचेही सुख श्रीहरिनामी ते लुटत ।
दासराम विनटे तेथे जडवोनी चित्त ॥५॥

१२६०

जनाबाईसवे स्वये भगवान । दळितो दळण भक्तिप्रेमे ॥१॥
दळीतया गाणे गाई तो एकांती । मंजुळ प्रभाती सुस्वरेसी ॥२॥
दुजा पडसाद ऐकिला बहुतीं । दोषी ठरविती जनाईसी ॥३॥
दळण ते जनी देई दुजियासी । थोडे फार ऐसी खोडी केली ॥४॥
कागाळी ऐकोनी बोलती नामदेव । जनीचा सद्भाव न करी ऐसे ॥५॥
गोणाई राजाई मुळीच ऐकेना । संशय सरेना बहुतांचा ॥६॥
नामदेवे सर्वा दावियेली खुणा । दळींतसे राणा वैकुंठींचा ॥७॥
कासे कासिला शेला झळके पितांबर । तेज अनावर दाटलेसे ॥८॥
नामदेवालागी आश्चर्य वाटले । चकित जहाले सर्व जन ॥९॥
धन्य धन्य ऐसी जनाई माऊली । जियेवरी साऊली श्रीहरीची ॥१०॥
दासराम प्रार्थी ऐसा हा सोहळा । लागलासे लळा म्हणुनी दावा ॥११॥

१२६१

बोधल्याचे पानगे विठ्ठल जेविला । स्वयंपाक केला रुक्मिणीने ॥१॥
धन्य ऐसे माणकोजी संतराव । जया मनी देव पंढरीचा ॥२॥
द्वादशीचा दिन भोजना ब्राह्मण । मिळेल का कोण ऐसे वाटे ॥३॥
सकळा प्रार्थिले कोणी नाही आले । चिंतातुर झाले माणकोजी ॥४॥
मानवरूपाने देव प्रगटले । सप्रेमे तोषले भक्ताचिये ॥५॥
रुक्मिणी विठ्ठल दंपत्य जेवीले । समाधान पावले प्रेमरसे ॥६॥
भोजन करोनी अदृश्य ते झाले । भक्ता आलिंगिले निर्गुणरूपे ॥७॥
दासराम तया अन्ना लाचावला । मागतो सखाला ब्रह्मान्नाचे ॥८॥

१२६२

अक्कलकोट स्वामी दत्ताचे अवतार । कंठीं रघुवीर धन्य धन्य ॥१॥
भाग्य ते अपार भरले भांडार । भक्ति बडिवार वाढविला ॥२॥
चोळाप्पा भाविक शीलवान भक्त । चिंती त्याचे चित्त द्रव्यलाभ ॥३॥
जंगलामाझारी नाग होते भारी । तयाचे पदरी बांधिलासे ॥४॥
घरी जावोनीया पहाता चंद्रहार । नवल चमत्कार ऐसा झाला ॥५॥
अशक्य ते शक्य होवोनिया गेले । भक्ताचे आणिले उदया भाग्य ॥६॥
चरणी लागता कृपा केली बरी । नामाचे उच्चारी भाग्य दिले ॥७॥
दासराम गाय कथा हे साजिरी । वंदोनी सत्वरी पाय त्यांचे ॥८॥

## १२६३

धन्य धन्य वेणूअक्का । पावल्या श्री ब्रह्मसुखा ॥१॥
होता हनुमंत दर्शन । आक्का झाल्या अचेतन ॥२॥
नित्य नैवेद्य ग्रहण । करी प्रगटोनी हनुमान ॥३॥
समर्थांचे महिमान । एकांती हे उभे ध्यान ॥४॥
पाहता चोरून । सरले वेणुअक्कांचे भान ॥५॥
समर्थांनी नवल केले । वृत्तीवरी आणियेले ॥६॥
आक्का धरिती प्रभूचे चरण । दासराम करी स्मरण ॥७॥

## १२६४

मुक्ताईने कथिले ज्ञानराजयासी । माते इच्छा ऐसी मांडे खावे ॥१॥
मांडे कैसे खाती चारितो मी मांडे । विसोबाचे तोंडे शद्ब आले ॥२॥
विसोबा सावकार आला बाजारास । सांगतो सर्वांस कुंभारासी ॥३॥
मुक्ताई आलिया न द्यावे गाडगे । दिल्या उगे घर करीन साफ ॥४॥
ज्ञानदेव संमतीं मुक्ताई निघाली । बाजारात आली घेऊनी पैसा ॥५॥
गाडगे मिळेना निराशा जहाली । घरी रडू लागली येवोनिया ॥६॥
ज्ञानदेवालागी तिचे दुःख जाचले । तियेसी बोधिले दुःख न करीं ॥७॥
योगाग्नीने त्यानी पाठ केली तप्त । मुक्ताईने त्वरित मांडे केले ॥८॥
भावंडे बसली भोजना सत्वर । विसोबा खेचर पहाता झाला ॥९॥
उडी घालोनिया तये ठायीं शेखी । घातिला स्वमुखी ग्रास तेणे ॥१०॥
उच्छिष्ट प्रसादे कैसी ब्रह्मी धाले । धन्य धन्य झाले विसोबा ते ॥११॥
विसोबा खेचरू पावले अधिकारू । जहाले सद्‌गुरू नामयाचे ॥१२॥
नामदेवा हरी पाठवितो तेथ । केवढे महत्त्व प्राप्त झाले ॥१३॥
ज्ञानेश्वरकृपाप्रसादे खेचर । जहाले साचार सिद्धरूप ॥१४॥
दासरामा त्यांचा पूर्ण आशिर्वाद । म्हणोनिया छंद मनी त्यांचा ॥१५॥

## १२६५

भगवन्नारायण गुरूलिंगजंगम । सद्‌गुरू परम सिद्धराज ॥१॥
निंबरगीसी रानी एकांती साधन । करिती आपण धन्य धन्य ॥२॥
मेंढरे शेतात चरायाच्या मिसे । लटकले पिसे हरिनामी ॥३॥
रामकृष्ण शिव वाचेचा उच्चार । जना निरंतर लाविती गोडी ॥४॥
दासरामा ऐसी प्रेमाची माऊली । कृपेची साऊली आवडीची ॥५॥

१२६६

दासकाम सद्गुरुराय हनुमंत । परम रामभक्त धन्य धन्य ॥१॥
सुखोल्हासकारी रामराय सद्गुरु । परम आवडे वेदिले ॥२॥
भोजनासी झाले ऐसी गडबड । आणि दीनदयाळ आत्माराम ॥३॥
शिष्यांचिये घरी भोजना सत्वरी । रामराय निघोनि आले प्रेमे ॥४॥
भोजन झालिया महिन्याचा पगार । महाराजा सत्वर अर्पिलासे ॥५॥
सर्वस्व अर्पिले सिद्धपुरुषासी । जाणिली हे ऐसी निष्ठा गुरुनी ॥६॥
बावीस रुपये पगार दिधला । विचार न केला चरितार्थाचा ॥७॥
रामचंद्ररायें हनुमंतालागून । दिले रुपये दोन अविनाशी ॥८॥
बापूमहाराजांचा दिलासे प्रसाद । पूर्ण कृपाशिर्वाद बोलियेले ॥९॥
प्रपंच परमार्थ साधेल संपूर्ण । होसी कीर्तिमान दिगंतरी ॥१०॥
सद्गुरुवचन झाले परिपूर्ण । स्वये हनुमान रामरूप ॥११॥
भगवंत राम हनुमंत राम । तेथे दासराम जडला माये ॥१२॥

१२६७

हरिभजनी नाचता भजनी तन्मय जी झाली ।
ऐसी धन्य मीराबाई कृष्णरूपी धाली ॥१॥
मीराबाई राजकन्या झाली सासुरवासी ।
परी ऐसी सासुरवाडी नावडे तिसी ॥२॥
हरीपुढे नाच करिता नावडे कोणा ।
सासु सासरियानी धाडिली माहेरासी जाणा ॥३॥
माहेरीचा आली म्हणोनी दोषी ठरवोनी ।
वंश बुडविला इने म्हणोनी विष दिले जाणी ॥४॥
विष पिताना हसू लागली त्याचे अमृत झाले ।
सर्व लोक देखुनी मनीच्या मनी चकित झाले ॥५॥
आता तिसी कृष्णमंदिरी कोंडुनी ठेविले ।
पहारेकरी ठेऊनी बंदोबस्त बहुत केले ॥६॥
परी नाचणे खेळणे बोलणे कासे ऐकू आले ।
पहारेकरियानी राजा राणीसी ऐकविले ॥७॥
इतुक्या बंदीतुनी कोण कैसे आत जाई ।
परपुरुषाशी रंगुनी गेली कैसी मीराबाई ॥८॥
कुलूप काढुनी त्याने मग हा दरवाजा उघडिला ।
शिरच्छेद करण्यासी राजा प्रवृत्तची झाला ॥९॥

पट्टा काढूनी आत धावता मीरेने देखिले ।
कृष्ण मीरा हे दोनी गाभाऱ्यात पळुनी गेले ॥१०॥
कृष्णस्वरूपी मीरा कैची कृष्णरूप जहाली ।
मनासारिखा पती मिळोनी आवडी पूर्णची झाली ॥११॥
राजा राणी वेडावली मीराबाईसाठी ।
दृश्यादृश्यामाजी मीरा पडेचिना दृष्टी ॥१२॥
दासराम हा लीन जहाला मीराबाई पायी ।
कृष्णरूपी या कसे मिळावे दाविली नवलाई ॥१३॥

१२६८

एकनाथ धन्य संत । होतीं कीर्तनी देहातीत ॥१॥
ऐसा एक होता कोणी । कधी न गेला जो कीर्तनी ॥२॥
कोणी मित्र विनवणी । करी येई या कीर्तनी ॥३॥
येऊ येऊ ऐसे बोले । बहुत दिवस लोटले ॥४॥
एक दिवस कीर्तनी येता । कर्णी पडिली अमृतसरिता ॥५॥
नामामृत सेवन होता । गृही गेला तो तत्त्वता ॥६॥
झाला नामपरायण । एकनाथ कृपा पूर्ण ॥७॥
दासराम लागे पायी । हाची वर असो देही ॥८॥

१२६९

दगडाचा गणोबा केला ज्यानी सोनियाचा ।
अद्भुत सामर्थ्य ऐसा अधिकार ज्यांचा ॥१॥
धन्य धन्य धन्य नामदेव शिंपी संत ।
व्यापार तो केला जेणे जोडे भगवंत ॥२॥
सर्वही कापड ज्यानी दिधले दगड गणोबासी ।
माळावरी जाऊनी काय भाव भक्ती ऐसी ॥३॥
दामाशेटी पुसे पैसे सांगे नामदेव ।
उदार व्यापार देईन बाजारी भाव ॥४॥
ऐसे होता होता बाजार दिवस बहुत गेले ।
तगादा लाविता गणोबासी घेऊनी आले ॥५॥
नवल चमत्कार गणोबा झाला सोन्याचा ।
ऐसा प्रकार पहाता मोह सुटला सर्वांचा ॥६॥

दामाशेटी सांगे आत नेऊनिया ठेव ।
तव काय बोले महाभक्त नामदेव ॥७॥
जेवढा पैसा तुमचा तेवढा येईल हा भाव ।
त्याचे मोल घेता पूर्वरूप त्याचा ठाव ॥८॥
सकळही लोक आले नामदेवा शरण ।
महावैष्णव ते दासराम धरी चरण ॥९॥

१२७०

वासनेचे ज्यानी काढियेले धिंडवडे ।
दया क्षमा शांती पूर्ण विरक्ती ज्या जोडे ॥१॥
धन्य मायबाप ऐसे संत तुकाराम ।
हरिनाम स्वरूपी पूर्ण सत्य स्वयंब्रह्म ॥२॥
शिवछत्रपती पाठवी दिवटचा अबदागिरि पालखी ।
अलंकार मोत्यांचे भरजरी प्रावरणे आणखी ॥३॥
ऐशी रिद्धी सिद्धी चालूनि येता लाथाडिली ।
व्यापाराची कागदपत्रे इंद्रायणी बुडविली ॥४॥
लक्षाधीशही असुनी नाही आशा गुंतविली ।
स्वानंदाधिप होऊनी त्यांनी स्वरूपसंपदा लुटिली ॥५॥
दासराम हा याचक पाहुनी भांडारा उघडिले ।
सत्यार्थागर खुले करूनी वाटाया बोधिले ॥६॥

१२७१

धन्य संत आग्रदास । जया ध्यानी तो सर्वेश ॥१॥
एके दिवशी ध्याना नये । तव वदती असे काय ॥२॥
तव नाभाजी गुरुभक्त । परिसोनिया बोलत ॥३॥
जहाज सागरी उलटले । भक्तावरी संकट आले ॥४॥
तेव्हा बोले तो नवस । विनवी वाचवा श्रीप्रभूस ॥५॥
जहाज नेण्या पैलतीरी । गेला तेथेची श्रीहरी ॥६॥
कापडे ती प्रभूची ओली । जहाली, ऐसी साक्ष पटली ॥७॥
पाणी तयाचे खारट । हरीने कौतुक केले स्पष्ट ॥८॥

तव तेथे आला भक्त । निरसलिया संकट त्वरित ॥९॥
आणियेल्या धनराशी । खात्री जहाली सर्वांसी ॥१०॥
केला विनियोग मठासी । श्रीहरीची करणी ऐसी ॥११॥
झाले सद्‌गुरु प्रसन्न । शिष्य मागे सेवा जाण ॥१२॥
संतचरित्रे लिहिण्याची । आज्ञा झाली सद्‌गुरूंची ॥१३॥
नाभाजीनी सेवा केली । संतचरिते प्रगट झाली ॥१४॥
धन्य संत धन्य भक्त । दासराम त्या वंदित ॥१५॥

१२७२

पुरोडाश कैंचा शंभूने भक्षिला । केली अकळ लीला भक्तासाठी ॥१॥
धन्य धन्य निवृत्ती संत ब्रह्ममूर्ती । अंजन घालिती पंडितासी ॥२॥
मान तो मिळाला यज्ञाचे प्रसंगी । अग्रपूजा उगी संती केली । ३॥
पंडिता पसंत नव्हते पडिले । तेव्हा ते बोलिले प्रथम काय ॥४॥
हत्ती माळ जया घालील येवोनी । त्याची समारंभानी पूजा करा ॥५॥
हत्तीने निवृत्तिनाथा अवचित । माळ ते त्वरित घातियेले ॥६॥
पंडित म्हणाले पुनः एकवार । होऊ दे प्रकार ऐशापरी ॥७॥
परी तेची सत्य जहाले सर्वथा । पंडित बोलता पुनः तेची ॥८॥
परी तोची जाणा घडता प्रकार । पंडित विचार काय बोल ॥९॥
जयासी कळत नसेल पंचांग । तया कैसी चांग अग्रपूजा ॥१०॥
ऐकोनी हे वाणी बोले ज्ञानदेव । पंचांग अपूर्व असे याचे ॥११॥
वाडवडिलाना पंचांग कळेना । निवृत्तीची खुणा निवृत्ती जाणे ॥१२॥
महादेवे घ्यावा सत्य पुरोडाश । तरी हे आम्हास मान्य पडे ॥१३॥
निवृत्ती भाकेसी शंकर प्रसन्न । प्रगट होऊन नवल केले ॥१४॥
पुरोडाश घेऊनी कवतूक केले । महिमान दाविले निवृत्तीचे ॥१५॥
नामाचा महिमा वाढविला संती । दासरामा प्रीती त्यांचे पायी ॥१६॥

१२७३

तुकाराम तुकाराम । ऐसे बहू गोड नाम ॥१॥
नाही द्यावया उपमा । कर जोडुनी उभा ब्रह्मा ॥२॥
विष्णू होवोनी प्रसन्न । देई भक्तासी दर्शन ॥३॥
महादेव त्रिगुण जाळी । आपरूपाते कवळी ॥४॥

वाहे धारणा भगवंत । आता काय बोलू येथ ॥५॥
सिद्धांचिये जपे । महाकाळ तोही कापे ॥६॥
संकटासी रक्षी । देव सर्वभूता साक्षी ॥७॥
संतांचे चरणी । दासराम लोटांगणी ॥८॥



# चैतन्यपाठ : ४४

१२७४

चिदाकाशामाझारी चैतन्याचो परी । तेथे नाही परी दुजी काही ॥१॥
आनंद तो सूक्ष्म आनंद तो सूक्ष्म । जेथे प्रणव नाम ठसावले ॥२॥
चित्कळा ते शक्ती विजूचिया परी । अर्धनारी सुंदरी आदिमाया ॥३॥
जीवनाचे वोण जीवनाची कळा । चैतन्य उमाळा दासरामा ॥४॥

१२७५

सोनसळा वीज भासे एक क्षण । तैसे चिद्गगन नीलगाभा ॥१॥
भासे हा आभास दावी अवकाश । निराभासी भास उद्भवला ॥२॥
जीवना आधार देखिजे चित्कळा । समत्वे जिव्हाळा दावीतसे ॥३॥
प्रकोप पावोनी आटवी जीवन । प्रणवी गमन ज्योतीचे या ॥४॥
सद्गुरू बोधिती चैतन्याचा पाठ । दासराम अवीट ऐके बरवा ॥५॥

१२७६

देखणेची शद्ब जहाला अंबरी । चंचल लहरी उसळली ॥१॥
तेची आदिमाया तेचि आदिमाया । परतोनी ठाया जाई वेगी ॥२॥
वायू ते चित्कळा जहाली घर्षणे । देखे धुराविणे तेज शीत ॥३॥
शीत वायूचे वो जहाले जीवन । वायुरूप प्राण हृदयस्थ ॥४॥
वायू तो प्रणव वायू तो प्रणव । जीवाचाही भाव वायू देखे ॥५॥
चैतन्याचा आरसा ठसा परमात्मा । ऐके दासरामा ज्ञान गूढ ॥६॥

१२७७

देखे सोहंभाव कैचा वायुरूप । सद्गुरूस्वरूप सर्वाघटी ॥१॥
अग्निस्थानी मिळे चैतन्य चित्कळा । प्रकाश उजाळा ब्रह्मांडासी ॥२॥
निर्गुण प्रणव देखी नवलाव । चित्कळा ते भाव देखे बीज ॥३॥
अर्धमात्रास्थानी निर्गुणाचा छंद । ब्रह्मरंध्री धुंद आमोदाने ॥४॥
पुढे निरालंब निर्गुणीचा मार्ग । देखे राजयोग दासरामा ॥५॥

## १२७८

चित्त परिमाणू चैतन्य रूपाचे । चांदणे चित्ताचे पूर्णरूप ॥१॥
तेथे हे चित्कळा सतरावीची कोर । जेथे सूर्यचंद्र मावळती ॥२॥
अमर ते स्थान अमृत निधान । शिव भगवान एके ठायी ॥३॥
त्रिगुणाचे कारण ऐसे महिमान । पंचभूता कारण रजोगुण ॥४॥
दासरामा देती गुरूराव खूण । निर्विकल्प मन होय जेथे ॥५॥

## १२७९

संशय अज्ञान संशय अज्ञान । नुरवी ते ज्ञान विज्ञानाचे ॥१॥
विज्ञानाचा दीप दावितो प्रकाश । नुरवी तो लेश महापाप ॥२॥
उन्मन ते ज्योती उन्मन ते ज्योती । पाजळल्या वृत्ती मनोभाव ॥३॥
सद्गुरू दाविती सहज ते स्थिती । दासरामा चित्ती समाधान ॥४॥

## १२८०

सुषुप्तीचे देखे अधिष्ठान आत्मा । दावीतसे समा चित्कळा ते ॥१॥
सम ते चरण ऊर्ध्वगामी वाट । भिडलीसे नीट वैकुंठासी ॥२॥
त्याचे वरती भक्ती देव भक्तस्थिती । तयाचिये अंती परब्रह्म ॥३॥
दासराम ऐके चित्कळेचे ज्ञान । गुरुराजे खूण दिली निकी ॥४॥

## १२८१

डोळियाचे माजी चमके नीलबिंदू । विश्रामासी सिंधू चैतन्याचा ॥१॥
परब्रह्म डोळा अदृश्याचे बिंब । नीलबिंदू स्वयंभ गगनाचा ॥२॥
आगमनिगम ब्रह्मांड विस्तार । तेथे बडिवार चित्कळेचा ॥३॥
डोळियात साटले सारे त्रिभुवन । दासराम शरण तेथे झाला ॥४॥

## १२८२

चित्कळे दाविली कैची आदिशक्ती । जेथे दिनराती उरली नाही ॥१॥
अदृश्याचे वरी देखे आदिमाया । ओवरी सदया विश्रांतीची ॥२॥
स्वयंतेज माया शुद्धस्वरूपिणी । ओवरी ग्रासोनी देखे स्वयें ॥३॥
ओवरीत नाही दिवस ना रात । दासराम स्वस्थचित्त झाला ॥४॥

## १२८३

गगन प्रणवावरी महाशून्य ओवरी । निर्गुणाची सरी उपरी त्या ॥१॥
निरालंब आलंब जेथे नाही दोनी । मन आणि उन्मनी दिसती ना ॥२॥
अंधार अंधार केवळ अंधार । सुषुप्ती विवर बहू मोठे ॥३॥
आळंब अदृश्य निरालंब सौरस । त्यापैल सुरस परमात्मा ॥४॥
जेथे वाजताहे हरिनाम ढोल । देह ते निर्मूळ स्थूल सूक्ष्म ॥५॥
महाशून्य ओवरी दावीते चित्कळा । दासरामा जिव्हाळा चैतन्याचा ॥६॥

## १२८४

प्राणावरी कैसी राहिली चित्कळा । दावीते जिव्हाळा जीवनाचा ॥१॥
महाप्राण सर्वा ब्रह्मांडी भरिला । जीव तो बिंबला जीवनात ॥२॥
दावीते चित्कळा देही जीवभाव । महाशद्व अपूर्व प्राण पै गा ॥३॥
प्राण हा अदृश्य प्राण हा अदृश्य । नाम ते सुरस ओतियेले ॥४॥
शिव ज्ञानरूप दासरामा ऐके । सांगताती मुखें हनुमंत ॥५॥

## १२८५

चित्त देखे देही परमाणु प्रमाण । चैतन्य संपूर्ण रूप त्याचे ॥१॥
ब्रह्मरूपावरी चैतन्याची कोर । आनंदसागर बिंदुरूप ॥२॥
सत्य निजवस्तू निशद्व केवळ । पुढे ही चंचळ चित्कळा ते ॥३॥
चैतन्य हा मार्ग सत्पदी जाण्याचा । ठाव अव्यक्ताचा दावीतसे ॥४॥
चैतन्याचा पाठ देहीच शोधावा । गुरुकृपे घ्यावा बोध बरवा ॥५॥
दासराम गुरुभक्ताते शरण । जेणे निरंजन देखियेले ॥६॥

## १२८६

हनुमंतकृपे बोध हा मुराला । तेणेंची चित्कळा दाविली हे ॥१॥
रामचंद्रप्रभू वोळले समर्थ । ज्यांचे योगे हित होय पूर्ण ॥२॥
पूर्णामाजीं पूर्ण मेळविता पूर्ण । पूर्ण ते संपूर्ण रिते नोहे ॥३॥
चिन्मयाचे पदी दासराम जडला । उदय तो झाला आशिर्वादे ॥४॥

## १२८७

जेथे एक अग्र होय तुझे मन । जाणिजे सुजाण चित्त तेची ॥१॥
आदिशक्ती अंश आलिया हातास । दावितो सर्वेश एकदाची ॥२॥
सूक्ष्मदेही चित्त होय आकलन । परमार्थ खूण ऐशी असे ॥३॥
चित्तासी नामाची जोलई चढते । दासरामा घडते समाधान ॥४॥

## १२८८

संकल्प विकल्प चालिले चिंतन । ऐसे असे मन देहामाजी ॥१॥
पंचभूत अंश मन हे जाणिजे । कैचे ओळखिजे चंचळू रे ॥२॥
हातासी आलिया पवनाची सिद्धी । सहज समाधी रामनामी ॥३॥
दासराम म्हणे सद्गुरूंची कृपा । मार्ग हा सोपा वैष्णवासी ॥४॥

## १२८९

गुरुपदी विश्वास नामी चित्तशुद्धी । तेची दृढ बुद्धी दृढावृत्ती ॥१॥
नामची संकल्प नामची चिंतन । नामची दमन इंद्रियांचे ॥२॥
नामी पंचप्राण जडले संपूर्ण । मनोनिग्रहण निर्धारू गा ॥३॥
ज्ञानमुसेमाजी मनाची आटणी । देखिजे उन्मनी बुद्धिरूप ॥४॥
निश्चयात्मवृत्ति बुद्धीचे स्वरूप । तिचे पूर्णरूप उन्मनता ॥५॥
मनोन्मन होण्या चित्कळा कारण । दासराम शरण तेथे झाला ॥६॥

## १२९०

चित्कळा देखिल्या नुरे देहभान । आटले गगन नामामाजी ॥१॥
नुरे भासाभास लाधले विज्ञान । रामनाम खूण मोठी असे ॥२॥
चैतन्याचा पाठ श्रीराम श्रीराम । गुरुदेव सुगम दावी दृष्टी ॥३॥
दासरामा सत्य लाधला आनंद । रघुनाथ गोविंद दाविताती ॥४॥

## १२९१

चित्कळा ते लाट चैतन्यसागरी । प्रकाशाभीतरी कोर देखे ॥१॥
मनाचा आलट वृत्तीचा पालट । साधनाने नीट साधी वेगी ॥२॥
संतांचे संगती देखे निजगती । जाणीव ते चित्ती सांडिजे पा ॥३॥
दासरामालागी जाहला प्रसाद । तेची हे हवगद साधुसंती ॥४॥

१२९२

चित्कळा ते देखे शिवाचे मस्तकी । आदिशक्ती मुखी होय जेथे ॥१॥
सिद्धसनकादिका लावियेले वेड । सुरस ते कुंड जीवनाचे ॥२॥
त्रिनेत्राउपरी लाहिजे अनुभव । धन्य योगिराव खूण जाणे ॥३॥
दासराम जडला सिद्धांचे पदासी । जेथे निवृत्तीसी गाठी आली ॥४॥

१२९३

देखे दृश्यरूप प्राण सूक्ष्मदेही । नियंत्रण पाही हृदयीचे ॥१॥
पाताळ स्वर्गासी कवळी हृदय । वैकुंठ ते माय त्याचेवरी ॥२॥
गगनाची वाट वैकुंठाचे पैल । देखे तेथे विमल रामरूप ॥३॥
बोधिती सद्गुरू दासरामा कळा । दाविती जिव्हाळा नरदेही ॥४॥

१२९४

चैतन्य शीतल चैतन्य विमल । चैतन्य तेजाळ समबीज ॥१॥
द्वयाद्वय गाठ घातिली जयाने । दृश्य आणि देखणे मिश्र झाले ॥२॥
माया ब्रह्म भेटी चैतन्याची दिठी । जहाली त्रिपुटी एकाएकी ॥३॥
चैतन्याचा धागा प्रणवामाझारी । दासराम विवरी गुरूकृपे ॥४॥

१२९५

रक्त श्वेत श्याम सुनील आटणी । पीतवर्ण खाणी चैतन्य ते ॥१॥
शुद्ध सत्व माया ब्रह्मासी मिळणी । निर्विकार खाणी अनिर्वाच्य ॥२॥
तेथे जो हुंकार झाली शब्दवाणी । देखिजे नयनी उपाधी ते ॥३॥
नीळियाची खाण कैची विस्तारली । पीतप्रभा ओतिली चैतन्यता ॥४॥
धन्य ते चैतन्य धन्य ते चैतन्य । दासरामा अन्यपण नुरे ॥५॥

## १२९६

पंचप्राणकळा मेळणी चित्कळा । जाणे तो आगळा संतराव ।।१।।
चिदानंद गुह्य चैतन्याचा पाठ । ऐकिजे अवीट नामकळा ।।२।।
हनुमंतराये माझिये वदनी । वदविली वाणी चैतन्याची ।।३।।
रामचंद्र सद्गुरू आनंदले भारी । समाधान परी दिली बाला ।।४।।
हनुमंत सद्‌गुरूरायांचा प्रसाद । नित्य हा आनंद माहेरीचा ।।५।।
हनुमंत सद्‌गुरूरायांचे जीवन । अर्पी त्यालागून दासराम ।।६।।



## चिन्मय सिद्धांत दर्शन : ४५

१२९७

नव्हते ते दिसू लागले । दृश्य नासिले ते उगें ॥१॥
कोण भक्त कोण देव । शून्यालागी कोठे ठाव ॥२॥
मीतूपणाची उपाधी । दृश्यादृश्य शद्घाशद्घी ॥३॥
नामी नाही शद्घाशद्घ । दासराम हा निःशद्घ ॥४॥

१२९८

कैची भक्ती कैचा भाव । जया नाही रूप नाव ॥१॥
शून्याठायी जीवपण । चंचळता परिपूर्ण ॥२॥
शून्य चंचळ चंचळ । आत ब्रह्म ते निश्चळ ॥३॥
विभक्तता अहंपणी । निजत्वाचे विस्मरणी ॥४॥
निजस्मरणी होय भक्त । जेथे नाही द्वैताद्वैत ॥५॥
दासराम नामब्रह्मी । सुखी संतसमागमी ॥६॥

१२९९

रूप पहाले नयनी । स्वयंप्रकाशू स्मरणी ॥१॥
हे तो संतीं नवल कळा । होता त्रिपुटीवेगळा ॥२॥
अवघाचि झाला चक्षू । आत्मा आत्मपणे लक्षू ॥३॥
जेथे जाऊ तेथे आपण । दासरामीं सुखस्थान ॥४॥

१३००

जे जे परत्र साधन । दुःखमूळ सुख कारण ॥१॥
जे जे परतत्व हेत । ते ते द्वैत नाशिवंत ॥२॥
परावीया जो प्रकाश । देखणे ते भासाभास ॥३॥
आपुले ठायी आत्मरूप । दासराम निर्विकल्प ॥४॥

## १३०१

डोळियाने पाहिला डोळा । चिदानंदाचा सोहळा ॥१॥
पहाणे नाहीं आदिअंती । कल्पनेची द्वैत स्थिती ॥२॥
एकची प्रकृती । निःशद्वातू आत्मज्योती ॥३॥
स्मरण दावी भेदाभेद । दासरामी निजानंद ॥४॥

## १३०२

परत्र ते नाशिवंत । रूपे धरीत बहुतांची ॥१॥
कायेवीण भासे माया । रंगछाया श्रीहरीची ॥२॥
निःशद्व ते शद्वा आले । केले चंचळे कवतूक ॥३॥
दासरामी शद्वाठायी । नाम गाई हरिमुखे ॥४॥

## १३०३

अभिनय भाव नानाविध जना । दावी नृत्यांगना जैशापरी ॥१॥
नाचे उडे माया कैशी कवतूके । चांचल्ये अनेके भासवोनी ॥२॥
नवल गारूड जहाले अद्भुत । नटले अनंत एकपणे ॥३॥
परिमाण एक जरी हे अनेक । सर्वाघटी देख निरंजनू ॥४॥
दासरामी सजला अनादी पुरुष । स्मरणे पुरीष चालवी जो ॥५॥

## १३०४

घन ते न दिसे विरळ ते नासे । आकारेची भासे नानापरी ॥१॥
आपुली आपण ओळख सांडोनी । स्वतालागी दोनी म्हणितसो ॥२॥
दृष्टी आतवरी आत्माची विवरी । घनानंद कुसरी भरला माये ॥३॥
दासराम तेथे कोण त्यावेगळा । अवघाची डोळा आत्मारामी ॥४॥

## १३०५

लोचनी हे पहाणे । पहाता आटले आत्मपणे ॥१॥
पर प्रकाश निमाला । अंधार हा उजेडला ॥२॥
घनानंद पहाला माये । वाचेपैल निज आहे ॥३॥
निजरूप परिपूर्ण । तेथे दासराम कवण ॥४॥

## १३०६

प्रकाश हे दावी द्वैत । पंचतत्त्वे उत्सारीत ॥१॥
गाढ अंधार निर्मिता । पर प्रकाश देखता ॥२॥
स्मरणाचा प्रकाश बरा । दावी अज्ञानांधःकारा ॥३॥
जेथें प्रकाश लोपला । अंधार हा मावळला ॥४॥
निजप्रकाश तो नामी । संतभक्त धाले प्रेमी ॥५॥
दासराम नामी दृढ । सद्‌गुरू दावी भावगूढ ॥६॥

## १३०७

पहाणे बुडाले निजत्वामाझारी । विश्व हे आकारी नये दिसो ॥१॥
घनानंद पूर्ण वाचेपैल आपण । बुद्धी परतोन फिरे मागे ॥२॥
निज ते पाहिले अद्वय जहाले । पहाणे पहाले पहाणीयासी ॥३॥
दासराम देखे अंतर्बाह्य दृष्टी । साधोनो समष्टी क्षण एक ॥४॥

## १३०८

हरिनामाचा प्रकाश । ज्ञानाज्ञानाचा निरास ॥१॥
तेथे विज्ञानाचे काम । विज्ञानी तो भक्तोत्तम ॥२॥
कोटी कुळे ती पुनीत । शास्त्रवचन सिद्धांत ॥३॥
दासराम तया शरण । सेवा करी रातंदिन ॥४॥

## १३०९

पहाणे ते कैचे वोखटे सरले । मीतूपण गेले अंतरीचे ॥१॥
अवघेचि झाले अखंड पहाणे । नामी आत्मपणे अद्वयत्वे ॥२॥
संतराव कैचा निजानंदी धाला । दासराम झाला शरण त्यासी ॥३॥

## १३१०

डोळ्यासी पहाता ऐसा नाही कोणी । आत्मा आत्मपणी अद्वयचि ॥१॥
पहाणे ते काय पहाणे ते काय । निजत्वाची सोय सर्वाघटी ॥२॥
निज ते आपण आपण ते निज । सर्वाठायी गूज हेचि देखे ॥३॥
घनानंद न दिसे आकार तो नासे । अंतर्बाह्य प्रकाशे डोळा वस्तू ॥४॥
अखंड अद्वैती पहाणे आपणा । तयाते म्हणेना पहाणे कोणी ॥५॥
द्वयाते ग्रासोनी निजत्व लक्षिता । दासराम पहाता आत्मारामू ॥६॥

## १३११

आकार पहाणे द्वैताचे देखणे । विसरोनी रहाणे आपणासी ॥१॥
आपणा पहाता आकार उरेना । बोलाया राहेना पहाता कोणी ॥२॥
दासराम गूज लाधले सहज । कृपा महाराजे पूर्ण केली ॥३॥

## १३१२

ब्रह्म नाही ठावे कोणे केली माया । ब्रह्म ते पहाया ब्रह्म झाले ॥१॥
कासया हे जीव जहाले पतित । जाणेना अनंत काही केल्या ॥२॥
चंचळ लहरी उठती बा जेथे । आकार हे तेथे प्राप्त झाले ॥३॥
स्वसुख चाखाया रूपे धरी दोन । नर नारी होऊन क्रीडा करी ॥४॥
संत हे राहिले अद्वय पातळी । दासरामा मेळी दोन नाही ॥५॥

## १३१३

डोळा डोळयासी न पाहे । आत्मा आत्मरूप आहे ॥१॥
डोळा न पाहे आत्मया । आत्मा पहातो डोळिया ॥२॥
तेथे पाही कवणा कोण । काहे माजविले दोन ॥३॥
वोखटे हे द्वैत । आप आपणू विलसत ॥४॥
पूर्ण आत्मानंद घन । दासराम उरला कोण ॥५॥

## १३१४

डोळा मिळे दोही डोळा । तेथें चैतन्य उमाळा ॥१॥
डोळा मिळाला डोळिया । पहाणे जहाले आत्मया ॥२॥
अवघाचि झाला डोळा । घनानंदाचा सोहळा ॥३॥
दासरामी घनानंद । तेथे सरले भेदाभेद ॥४॥

## १३१५

डोळा तोची झाला कान । नादभरे झाला गुण ॥१॥
पुढे झाली चारी वाचा । भोगी आनंद स्वताचा ॥२॥
चक्षू मिळोनिया राहे । देखणे ते देखे स्वये ॥३॥
दासरामा नामगूढ । झाले महावाक्य दृढ ॥४॥

## १३१६

स्वतपासुनी जाली सृष्टी । जाणी अंतरी समष्टी ॥१॥
समष्टीने केली व्यष्टी । पाही आपुलिये दृष्टी ॥२॥
नाम गाता उठाउठी । आप आपणासी गाठी ॥३॥
कैची नासिली त्रिपुटी । दासरामा आनंद पोटी ॥४॥

## १३१७

डोळा तो गगन नाद तोचि कान । शद्वाचे स्फुरण जिव्हारूप ॥१॥
चंचळ ते माया शद्वाचे कारण । नादानुसंधान वायू जेथे ॥२॥
शद्व तो संकल्प तरंग विकल्प । तेचि मनोरूप त्रिगुण जालें ॥३॥
निश्चळ ते पूर्णरूप निरंजन । दासरामी गुण आला कैचा ॥४॥

## १३१८

घन ते लघु घन तैं लघु । सर्वांगूहि व्यापक ॥१॥
लघु होऊनी लघूसी मिळता । ऐक्यता ये घनानंदी ॥२॥
घन आनंद सादृश । संत मिळाले तयास ॥३॥
दासराम लघु झाला । गुरूस्वरूपी नटला ॥४॥

## १३१९

घन ते पूर्ण घन ते पूर्ण । भाग सहन न साहे ॥१॥
भासरूप भासे भेद । रूप अगाध चांचल्ये ॥२॥
वाटे वाड परी ते सूक्ष्म । नुरे अनाम हे जेथे ॥३॥
सम पातळी घनू ठायी । कोठे नाही आकारू ॥४॥
दासरामी आकार हा । नाहीं पहा ब्रह्मत्वे ॥५॥

## १३२०

प्रकृती हे खोटी । आकारेची भासे दृष्टी ॥१॥
आकार हा नाशिवंत । मूळ शाश्वत अनंतू ॥२॥
सर्वाठायी ब्रह्म घन । अधिष्ठान तत्त्वांचे ॥३॥
अव्यय अभेद । अस्तित्व ते घनानंद ॥४॥
नाम आकार हे खोटे । तत्त्वी घनानंद भेटे ॥५॥
निःशद्व ते ब्रह्म । शद्व कैचा दासराम ॥६॥

## १३२१

चंचळ ते झाले घनी । नोहे वेगळे तेथोनी ॥१॥
पहाण्यातू आत्मचलन । तेचि चैतन्य स्मरण ॥२॥
परमात्मा निश्चळ पूर्ण । आत्मा भासे गतिमान ॥३॥
निश्चळातु जे चलन । आपणातु मुळीच आपण ॥४॥
तेथे नोहेचि भेसळ । शद्बे केली जे केवळ ॥५॥
आरोपीत उपाधीने । म्हणूनी आत्मा गतिमान ॥६॥
उपाधी तो भास । कारण तया आहे नाश ॥७॥
उपाधीचे अधिष्ठान । दासरामी निरंजन ॥८॥

## १३२२

निश्चळ ते पूर्ण घन । परब्रह्म निरंजन ॥१॥
तेथे शद्ब हा चंचळ । दृश्य तत्त्वांचे हे मूळ ॥२॥
शून्याठायी जाला शद्ब । शून्य चंचळ प्रसिद्ध ॥३॥
तेथे जहाले पहाणे । आपणासी द्वैतपणे ॥४॥
दासरामी हा विचार । दृश्यादृश्य परमेश्वर ॥५॥

## १३२३

आत्मसिद्धांत हा अभंग विवरी । बोलती कुसरी रामानंद ॥१॥
राम सांगे काय तया साधुप्रतीं । आशीर्वाद प्रीती असो माते ॥२॥
हनुमंत सद्‌गुरू माऊलीचे कृपे । अशक्य अपापे सहज घडे ॥३॥
हनुमंतराय कृपेची हे वाणी । बोलिला वदनी बोल बरा ॥४॥
दासराम उभा दोनी कर जोडून । सद्‌गुरूवचन लेणे लेई ॥५॥

## १३२४

सिद्धांतपंचक । अबोलाचे बोल सुख ॥१॥
उपाधी अनेक । सर्वाघटी आत्मा एक ॥२॥
कोठे गेलो तरी । मीच सर्वत्र निर्धारी ॥३॥
मजवाचुनी अनुभव नाही । इंद्रिय दृश्य असुनी कायी ॥४॥

संत आनंदाचे स्वामी । कृपा करिती भक्तप्रेमी ॥५॥
आत्मरूपी सर्वानंद । निरूपाधी स्वतःसिद्ध ॥६॥
कृपेची ही वाणी । समर्पितो हनुमंत्‌चरणी ॥७॥
हरिनामे दासराम । संतपदी घे आराम ॥८॥



# अलख निरंजन दर्शन : ४६

१३२५

परिणामी केंचे आणिले ते लक्ष्य ।
लक्षी (=पहाणे) दृश्यादृश्य लक्ष्याने वो ॥१॥
निश्चळी जे लक्ष्य (=डोळा) ब्रह्म ते अलक्ष्य ।
जेथे जाले लक्ष्य चंचळेची ॥२॥
लक्ष्यत्वाने जाला लक्ष्याचा उबारा ।
(=डोळा, प्रकृती) अलक्ष्याचा वारा तयाआतू ॥३॥
(=प्रकाशाचे, उबाऱ्याचे मूळरूप)
शीत उष्ण आभा आकारिला नभा ।
दासरामी गाभा आत्माराम ॥४॥

१३२६

लक्ष्याचा हा खेळ लक्ष्येची जाणावा । लक्ष्येची भजावा आत्माराम ॥१॥
लक्ष्य ते चिद्रूप सदानंदी गाठी । अखंड जे भेटी उलट मार्गे ॥२॥
निश्चळ जे लक्ष्य शून्य आटाआटी । नासिली त्रिपुटी एकाएकी ॥३॥
अलक्ष्य ते लक्षी दासरामी साक्षी । पहाणे परीक्षी मूळपणे ॥४॥

१३२७

अलख निरंजन संतांचे दर्शन । जेथे निवे मन लक्ष्यासहित ॥१॥
लक्ष्य सुखावले अलक्ष्याचे भेटी । अलक्ष्य संपुष्टी हरिनामी ॥२॥
हरी स्वये देखे लक्ष्यालक्ष्यावेगळा । अलक्ष्य हा डोळा नामब्रह्मी ॥३॥
अलक्ष्य ते केंचे सार विश्वबीज । अनुभवाचे तेज लक्ष्यापैल ॥४॥
दाविले अलक्ष्य हनुमंतमाये । दासराम गाये जैसा तैसा ॥५॥

१३२८

अनुभव मुराला अलक्ष्याचे पैल । देखणा विमल सत्स्वरूप ॥१॥
परिपूर्ण गुण आकारावेगळा । सकळा आगळा रंगातीत ॥२॥

चंचळे चिद्‌गुण अवकाशे आकार । रंगाचे प्रकार भासवी जो ॥३॥
निश्चळ होवोनी निश्चळ पहाता । दासराम पुढता निश्चळ हरी ॥४॥

१३२९

सिद्ध संतजन कृपेचे महिमान । जनी जनार्दन सारिखाची ॥१॥
सगुण निर्गुण सारिखा श्रीहरी । चिद्‌गुणे आकारी आकारिला ॥२॥
बहुरूपी बहुगुणी बहुरंगी केला । भक्ती आकळिला भाविकासी ॥३॥
पाहील तयासी जेथे तेथे आहे । तयावीण नोहे दुजें काही ॥४॥
हनुमंतराये दाविली हे खूण । धरिले चरण दासरामे ॥५॥

१३३०

लक्ष्य ते सुनील अलक्ष्य ते श्याम । शून्यापैल नाम निजरूप ॥१॥
त्रिपुटी निरास निजत्व प्रकाश । जेथे चिदाकाश आकारिले ॥२॥
अलक्ष्य ते चक्षी आत्माराम साक्षी । संत ते निरीक्षी सहजपणे ॥३॥
निजबोध भाग्ये उजेड जहाला । उजेडासी आला आत्माराम ॥४॥
मावळले दृश्य शद्ब तो निःशेष । दासरामी सुरस नामकळा ॥५॥

१३३१

शून्य ते चंचळ माया रे विशाल । पैल ते विमल निजरूप ॥१॥
आपणा पहाता आकार उरेना । जेथे पहाणेपणा पहाणे आले ॥२॥
शून्याचा हा खेळ शून्याचा विस्तार । आत्मा निरंतर जैसा तैसा ॥३॥
तैसेची होवोनी ठेले संत भक्त । दासरामा देत वरदान ॥४॥

१३३२

लक्ष्यामाजी नीलबिंदूचे दर्शन । अलक्ष्यी गगन बुडले माये ॥१॥
दिव्य तेजोराशी नवल ते प्रभा । दिपविले नभा स्वप्रकाशे ॥२॥
चंचळेची लक्ष्य आकारिला नभा । चिदाकाश गाभा शोभिवंत ॥३॥
पहाता पहाणे तेची स्वये होणे । दासरामी लेणे लक्ष्यरूप ॥४॥

## १३३३

अलक्ष्यासी जाता लक्ष्येची मिळाया । लक्ष्य ते विलया गेले कैचे ॥१॥
चिद्रूपी मुक्तांचा सागर जहाला । देखता मुराला अनुभव ॥२॥
अनुभवाची गती अनुभूत्या घरी । प्रकाश ओवरी अलक्ष्यातू ॥३॥
संतांनी हे द्वैत ओखटेची केले । दासरामे धरिले पाय निके ॥४॥

## १३३४

शून्याचे विवरी दृष्टीचे जे अग्र । तेचीं महाद्वार नवापैल ॥१॥
असे जो शोधकू विवेके विवेकू । तयासी बोधकू बोध करी ॥२॥
तेथे चाले नित्य हरीचे कीर्तन । करिता श्रवण ब्रह्मप्राप्ती ॥३॥
हनुमंतराज रघुनाथ गोविंद । दाविती आनंद दासरामा ॥४॥

## १३३५

लक्ष्यामाजी ठसा सुनील हा घन । सदानंद पूर्ण हरी माझा ॥१॥
चंचळाचे आत भरले निश्चळ । चंचळ विशाल गुणाकारे ॥२॥
लक्ष्ये लक्षू तया सर्वी भरोनिया । पावोनी विलया तेची होऊ ॥३॥
दासरामा एक सुचित्ताचे काम । मुखी गाऊ रामकृष्णहरी ॥४॥

## १३३६

हनुमंतराय कृपेचा हा नाद । आनंद आस्वाद नामछंदी ॥१॥
हरिनामकीर्तनी मन मेळविले । संत ज्या भुलले अखंडची ॥२॥
संतवचनाचे बोलिजे हृद्‌गद । माते रामानंद सांगितले ॥३॥
सद्‌गुरूची कृपा हरीचा प्रसाद । पूर्ण आशिर्वाद संतांचे या ॥४॥
थोरांचा संतोष बालकाची आस । केले कौतुकास सिद्धानंदे ॥५॥
हनुमंतराजे बोलविले वाणी । दासराम चरणी विनटला ॥६॥

१३३७

लक्ष्ये वस्तू कैंची जहाली प्रगट । देखिला हा पट जैसा तैसा ॥१॥
जैसा तैसा झाला आपणाची ऐसा । अलक्ष्यासरिसा देखणी या ॥२॥
निश्चळ जे ब्रह्म पूर्ण निराकार । अव्यक्त अपार निर्गुण पैरा ॥३॥
दासरामा ठायी घनू लक्ष्य आले । द्वैत भासविले चंचळत्वे ॥४॥



# साधनाचे अभंग : ४७

## १३३८

सूर्यस्वर मंद वाहे । तरी साधे साध्य पाहे ॥१॥
जयजयकार नादघोष । नाम देही ते सुरस ॥२॥
सांडी जाण नेण ओझे । देखे मग रूप तुझे ॥३॥
दासराम वंदी चरण । करी स्मरण नित्य त्यांचे ॥४॥

## १३३९

तुझा तूची घेई ठाव । नाही तरी सर्व वाव ॥१॥
शाश्वतीचे शोधी घर । तेथे राहे निरंतर ॥२॥
ब्रह्म अन्न सेवी कारे । अमृतही तुच्छ सारे ॥३॥
पांघरोनी काळी घोंगडी । राही नित्य पैलथडी ॥४॥
आपआपणा शोधोनी । सत्य होईजे विज्ञानी ॥५॥
करी साधनाचा पाठ । दासरामा सोपी वाट ॥६॥

## १३४०

रामानंदमहाराज बोधिती माते । करी अभंग ते साधनाचे ॥१॥
हनुमंत सद्गुरूराये नवल केले । अबोल वदविले निजकृपे ॥२॥
तुकाराम वाणी स्वप्नात येवोनी । आनंद देवोनी गेले मज ॥३॥
नागाप्पाण्णा करिती कवतूक । दिली प्रेमे भीक संतोषाची ॥४॥
सिद्धांचा प्रसाद गोडी ते अगाध । दासरामा बोध साधनाचा ॥५॥

## १३४१

अकारीचा घाट जागृती निघोट । जेथे राहे स्पष्ट ब्रह्मदेव ॥१॥
रजोगुण ज्याचा बोले संतवाचा । रक्तवर्ण साचा स्थूलदेहीं ॥२॥
नेत्रस्थानी देखे अज्ञानाचा मेरू । ओलांडोनी सत्वरू जाई पुढे ॥३॥
दासराम लीन संतांचे चरणी । गाय निशीदिनी नाम एक ॥४॥

## १३४२

उकारीचा घाट देखे स्वप्नस्थानी । देखिजे हे करणी सूक्ष्मस्थानी ॥१॥
श्वेतवर्ण ज्याचा कंठाचिये स्थानी । सत्त्वगुण जाणी ज्याचा असे ॥२॥
मानवांचा लोक विष्णु देवस्थान । जेथे होय ज्ञान अंतरीचे ॥३॥
निवृत्तिप्रसाद देखिजे अगाध । हनुमंत हृद्गद बोधिताती ॥४॥
दासराम लोळे संतांचे पायासी । मागे तो तयासी आशिर्वाद ॥५॥

## १३४३

मकारीचा घाट गतीचे माझारी । सुषुप्तीचे विवरी प्रत्यया ये ॥१॥
तेथे शिवभाव जाणीवेचे स्थानी । अगाध करणी देवाजीची ॥२॥
तमोगुण स्थान देखे भैरवगण । सुप्तरूपे मीपण जागृत असे ॥३॥
अघोर हा घाट ओलांडुनी जाई । संतकृपे होई यापरता ॥४॥
श्यामवर्ण ज्याचा देखिजे बा दृष्टी । त्यापैल हिंपुटी नाही नाही ॥५॥
निवृत्तिनाथानी येवोनिया कानी । पेरिले श्रवणी ज्ञान नादे ॥६॥
हनुमंत सद्गुरू प्रेमेची वोळले । अपारची केले कवतुक ॥७॥
कारण देहीची ऐसी आहे कळा । जाणे तो निराळा तीन देही ॥८॥
दासराम धरी चरण संतांचे । घेवोनिया वाचे नाम एक ॥९॥

## १३४४

अर्धमात्रीचा तो घाट देखे डोळा । महाकारण लीळा परमात्म्याची ॥१॥
उन्मनी माझारी तुर्येचे अंतरी । देखे आदी नारी नीलवर्ण ॥२॥
शुद्ध सत्त्व माया रूप ते सुंदर । जेथे वेद चार मूक होती ॥३॥
निर्गुणाचे स्थान निर्गुणी देखणे । साक्षात्कार पहाणे आपुले डोळा ॥४॥
ब्रह्मरंध्रापैल अनिर्वाच्य स्थान । जेथे संतजन वास करिती ॥५॥
नेणीव उरेल जाणीव सरोनी । त्याचेपैल होवोनी देखे वस्तू ॥६॥
अर्धमात्रेपैल वस्तू ते केवळ । निवृत्ती सोज्वळ रूप देखे ॥७॥
निरालंब स्थानी अलक्ष्य सांडोनी । गुरूकृपे विज्ञानी होसी का रे ॥८॥
दासराम संतभक्तांचा पायीक । दाविताती सुख संत त्याते ॥९॥

## १३४५

नेत्राचा परेचा संबंध जाणावा । अकार पहावा तयेठायी ॥१॥
अकार ते मूळ स्थूलाचे केवळ । उकार सोज्वळ सूक्ष्माचा तो ॥२॥

मकार ते मूळ गतीचे निर्मळ । जाणावे प्रांजळ गुरुकृपे ॥३॥
इकार एंकार अर्धमात्रा मूळ । निःशद्ब तेजाळ ब्रह्माचे ते ॥४॥
निवृत्तीने वदविले अबोलाचे बोल । कळेल अकळ भवित्तपंथ ॥५॥
उकलोनी आता चौदेहाची खोळ । दासराम विमलरूपी धाला ॥६॥

१३४६

अ उ मची मिळणी रामकृष्णमाला । दावी घननीळा ऊर्ध्वगामी ॥१॥
ॐकारीची गती चौदेहाचे पैल । दावीतसे कळ स्वरूपाची ॥२॥
अंतर्मुख होवोनी ऊर्ध्वगामी मार्गे । साधी राजयोगे ब्रह्मरूप ॥३॥
दासराम बोले निवृत्तीचे छंदे । दाविली गोविंदे गोडी कैसी ॥४॥

१३४७

कर्णीचा तो शद्ब आकाशी मिळाला । शद्बघोष झाला अवकाशी ॥१॥
आकाशाचे गुणे स्फुरे हरिवाणी । आकाशाचे नयनी रूप देखे ॥२॥
पिंडाकाश कैसे मिळे ब्रह्मांडासी । कर्णीचे आकाशी डोळा मिळे ॥३॥
शद्बामाजी लय दृष्टीचा करोनी । जाय आत्मस्थानी आत्म-रूपे ॥४॥
श्रवणीचा नयन करोनिया देही । निःशद्बेसी लाही आत्मरूप ॥५॥
वायूचा मनाचा खेळ चैतन्याचा । दासराम त्याचा मोद सेवी ॥६॥

१३४८

शब्द स्पर्श रूप रस आणि गंध । तयांचा आनंद एक केला ॥१॥
त्याचा हार केला संतानी प्रसिद्ध । घातिला अभेद आत्मराजा ॥२॥
अवघा आनंद अद्वैती भरला । पूर्ण तो सेविला हनुमंते ॥३॥
दासराम पावे संतोष देखोनी । आमोद घेवोनी तृप्त झाला ॥४॥

१३४९

महाप्राणामाजी मेळवोनी प्राण । प्राणीपरी चैतन्य पाहे स्वयें ॥१॥
महाप्राण जाणी शब्द निर्विकल्प । जेथे लागे अपाप तंद्री तुझी ॥२॥
स्पर्श गंध आणि शब्द[ तेजरूप । तरवांची अपाप मिळणी जेथे ॥३॥

ऐसी नाडी जोडी जे ऊर्ध्वगामिनी । तेथे मन मिळवोनी स्वस्थ राहे ॥४॥
भीमस्वरूपिणी धारणा उमगोनी । नेत्रांतरी जावोनी मिसळे तेथे ॥५॥
कफ वात पित्त नाडचा त्या बहुत । साधोनी एकांत मुळीच येई ॥६॥
रामकृष्ण नाडी उमजोनी देही । साधोनिया घेई साधन वेगी ॥७॥
निरालंब स्थान आलंबाचे मूळ । दासरामा केवळ ब्रह्मरूप ॥८॥

१३५०

शून्याचिये पोटी शून्यरूप सृष्टी । शून्य हे त्रिपुटी देखे बरवी ॥१॥
त्यापरते सत्य तेथे हा आभास । असे हा सायास शक्तीचा गा ॥२॥
निःशद्वाचे पोटी शद्व शून्य सृष्टी । शून्याचे शेवटी परमात्मा ॥३॥
दासरामा सद्‌गुरू दाविती नवल । ब्रह्म जें सोज्वळ आदिअंती ॥४॥

१३५१

नेत्राविण देखे श्रोत्राविण ऐके । रसनेविण चाखे तें निजवस्तू ॥१॥
पायावीण चाले मुखावीण बोले । अंगावीण खेळे ते निजवस्तू ॥२॥
तृप्ती पाण्यावीण जेवी नसता अन्न । व्यवहारी धन नसता काही ॥३॥
करावीण सर्व करी तो व्यापार । करितो संसार नारी नसता ॥४॥
अरूप निर्गुण निर्विकार पूर्ण । ऐसी निरंजन वस्तू आहे ॥५॥
काही नसता तेथें खेळतो हा खेळ । दावितो नवल दासरामा ॥६॥

१३५२

महामाया बोलण्याची । आत्मवस्तू देखण्याची ॥१॥
माया म्हणुनी काही नाही । परी नवल दिसो येई ॥२॥
आत्मवस्तू मूळरूप । प्रथम तत्त्व निर्विकल्प ॥३॥
दासराम देखे डोळा । देही सद्‌गुरू देती कळा ॥४॥



# प्रसादाचे अभंग : ४८

१३५३

श्याम सुंदर विटेवरी । मूर्ती हरीची साजिरी ॥१॥
सावळी ते अंगकांती । तों हा जीवीचीं विश्रांती ॥२॥
कटेवरी कर ठेऊन । मौन धरिले रातंदिन ॥३॥
एकमेका भेदू मुके । दासराम पायी सुखे ॥४॥

१३५४

निःशब्द ते शब्दा आले । संती केलें कवतूक ॥१॥
शब्दे दाविला निःशब्द । घनानंद अभेदू ॥२॥
पहाणे गिळिता उठाउठी । हरी हा दृष्टी पूर्णत्वे ॥३॥
रामकृष्ण हरीं सार । दृश्य अपार चिद्रूप ॥४॥
दासरामी समाधान । गुरूने खूण चोजविली ॥५॥

१३५५

सर्व ब्रह्म ते निःशब्द । भेदाभेद चिदानंद ॥१॥
जाला शब्दाचा कल्लोळ । विश्व ब्रह्मांड कल्लोळ ॥२॥
पहाणियातु दृश्यादृश्य । नामरूपी चिदाकाश ॥३॥
संती रामकृष्णहरी । दासरामी कृपा करी ॥४॥

१३५६

ज्ञानाज्ञान जे अव्यक्त । विज्ञान ते होय व्यक्त ॥१॥
अद्वयातू स्वयंसिद्ध । स्वानुभवाचा स्वानंद ॥२॥
चिदाकाशी चिदाभास । जरी का झाला समरस ॥३॥
तरीच सद्रूपाची गाठी । दासरामी निश्चळ भेटी ॥४॥

१३५७

निःशब्द ते निश्चळ घन । पूर्ण स्मरण अभेदू ।।१।।
शब्द शून्यत्वे चिद्रूप । संकल्प हा दृश्यमूल ।।२।।
वाढे विकल्प हा द्वैती । पडे गुंती चांचल्ये ।।३।।
राम कृष्ण हरी गोविंद । ऐसा आनंद दासरामी ।।४।।

१३५८

जीवदशा बुद्धिरूपा । ज्ञानाज्ञाने करी रेवणा ।।१।।
विज्ञानीया आत्मज्ञान । देखे आपणा आपण ।।२।।
निःशब्द ते हरिस्मरण । पूर्णरूप निरंजन ।।३।।
शब्दरूप चराचरीं । दासरामी या विस्तारी ।।४।।

१३५९

ऐक्य दुभागणी । दावी चैतन्याची खाणी ।।१।।
जीव शिव दोनी । एक तत्त्वी निरंजनी ।।२।।
तीनी आतू दोनी । व्याप्त झाले त्रिभुवनी ।।३।।
संतकृपेचा दिनमणी । दासराम लागे चरणी ।।४।।

१३६०

आदी मध्य अंत । एकसूत्री तो अनंत ।।१।।
घनत्वी आकारू नासे । एकतत्त्वी गुण निरासे ।।२।।
चिद्रूपाची आटाआटी । सद्रूपासी पडे गाठी ।।३।।
बुद्धिगम्य हरी । दासरामी हृन्मंदिरी ।।४।।

१३६१

चिद्घनू गगन । पूर्ण शून्यत्वे चैतन्य ।।१।।
चिदाकाशीं त्रिगुण गाठी । महानादे शब्दसृष्टी ।।२।।
नामी रूप रूपी नाम । जाला दुर्गमू आतमाराम ।।३।।
करी तत्त्वांचा पसारा । आत खेळे हरीचा वारा ।।४।।
स्वयंनाम निरंजनी । दासराम त्याचे चरणी ।।५।।

## १३६२

जीवदशा जे अव्यक्त । बुद्धिठायी जाली व्यक्त ॥१॥
चिदाकाशी मन बुद्धी । सद्रूपी या पूर्ण शुद्धी ॥२॥
स्वयंसिद्ध पूर्णानंद । राम कृष्ण हरी गोविंद ॥३॥
नामब्रह्मी जीवा ठाव । कैचा दासरामी भाव ॥४॥

## १३६३

ज्ञानाची जे परिणती । बुद्धी शब्दरूप स्थिती ॥१॥
जेथे नोहे पा विश्रांती । सुखी दुःखी पडे गुंती ॥२॥
माया चंचळ चंचळ । शीत उष्ण ते तेजाळ ॥३॥
निःशब्दात् जे निवांत । घनानंद् सदोदित ॥४॥
दासरामी नामब्रह्म । जेथे नुरे कर्माकर्म ॥५॥

## १३६४

चिदाचिदाचा पसारा । खेळे शून्याआत् वारा ॥१॥
चिदाचिद नोहे जीव । परब्रह्मी स्वयमेव ॥२॥
चिद्रूपी या वाढे द्वैत । सुखदुःख हेताहेत ॥३॥
दासरामी निश्चळ हरी । नामब्रह्म सर्वांतरी ॥४॥

## १३६५

हनुमंत सद्गुरूमूर्ती । विश्रांतीची जे विश्रांती ॥१॥
धन्य धन्य परमेश्वरू । कृपे दावी अगोचरू ॥२॥
केला अभंगी प्रसाद । पावे सेविल्या आनंद ॥३॥
दासरामाचा स्वानंद । पूर्ण ब्रह्म रेवणसिद्ध ॥४॥



# सद्बोधदशक : ४९

१३६६

काडसिद्ध गुरूंचा बोध । देई जीवा ब्रह्मानंद ॥१॥
देव आमुचा मायबाप । हारवी जो त्रिविध ताप ॥२॥ ध्रु ॥
जे त्या विसरती अज्ञाने । व्यर्थ सर्व त्यांचे जिणे ॥३॥
जन्ममरण त्या न सुटती । जे का आशाबद्ध होती ॥४॥
गेले द्वंदे जखडून । भोगिती ते दुःख शीण ॥५॥
अज्ञानाची जाणा माया । जे का विसरवी देवा या ॥६॥
छंदे घेता त्याचे नाम । जीव होय देवोत्तम ॥७॥
सर्व रचना जेथोनी । धन्य धन्य त्याची करणी ॥८॥
देवाविना काही नाही । त्याचे सत्ते सर्व होई ॥९॥
नरदेह मुक्तिद्वार । येथे भेटे रघुवीर ॥१०॥
भक्तिपंथ आक्रमण । करी जाऊनी गुरूसी शरण ॥११॥
सत्यासत्याचा निवाडा । करोनिया हरीसी जोडा ॥१२॥
दासरामा बोधियेले । मनीचे अज्ञान नासिले ॥१३॥

१३६७

गुरू नारायणे केला असे बोध । करावया शोध देवाजीचा ॥१॥
वस्तुता आपण देवाची लेकुरे । अज्ञपणे सारे दुःखी झालो ॥२॥
मायेमुळे जन्ममरण दुःख शीण । दुरी नारायण रहातसे ॥३॥
जेणे मायेलागी निर्मियेले पाही । त्याचा भक्त होई खरे खरे ॥४॥
मायबाप देव होण्या आकलन । गुरूसी शरण जाता बरे ॥५॥
पथ्य सांभाळावे नाम मुखी घ्यावे । मायेसी जाळावे सुखालागी ॥६॥
परस्त्री परधन नको आणू मनी । पाही चापपाणी येची देही ॥७॥
पाहता संतांचा बोध कळवळ्याचा । सुरस भक्तीचा प्रेमयुक्त ॥८॥
दासरामाचिये मनी केला बोध । उकलोनी हृद्गद दावियेले ॥९॥

## १३६८

विश्वबंधुत्व समता । आवडे रे भगवंता ॥१॥
सर्वाघटी राम एक । जगाचा जो प्रतिपालक ॥२॥
करिजे रघुवीर चिंतन । जेणे नासेल अज्ञान ॥३॥
जेव्हा होसील पावन । तुटे मायेचे बंधन ॥४॥
वैराग्यावाचून । कैसा होशील पावन ॥५॥
जाई सद्‌गुरूसी शरण । माया घेई ओळखून ॥६॥
साधुराजे बोधियेले । आचरिता होय भले ॥६॥
दासराम आला शरण । तेणे जाहला पावन ॥८॥

## १३६९

रामचंद्र गुरूंचा बोध । देई जीवा ब्रह्मानंद ॥१॥
गुरूभक्ती करोनिया । धन्य व्हावें रे चांगया ॥२॥
जये मार्गी संत गेले । त्याच मार्गी जाता भले ॥३॥
जाळी जाळी दुरभिमान । करी अखंड साधन ॥४॥
सोडू नये सदाचरण । सोडू नये नामस्मरण ॥५॥
मायबाप देवालागी । विस्मरती ते अभागी ॥६॥
दासरामा बोध केला । बोधिल्याची तो बोधला ॥७॥

## १३७०

करितो वंदन विठ्ठलचरणा । तोचि सत्य जाणा मायबाप ॥१॥
देवाचे आज्ञेने (तयाचे) बोलितो मी ज्ञान । जेथे ब्रह्मज्ञान तुच्छ होय ॥२॥
अंतरी बाहेरी होवोनी निर्मळ । म्हणिजे विठ्ठल एकचित्ते ॥३॥
देव आहे एक नव्हेची अनेक । विठ्ठल राम देव दुजा नाही ॥४॥
उच्चारिता राम होईजे आराम । होसी पूर्णकाम हनुमत्कृपे गुरुकृपे ॥५॥
मायबाप राम जगासी आराम । विश्रामाचे धाम मूढ जीवा ॥६॥
बाळ रामा तूज सांगतो मी खूण । करिजे साधन एकनिष्ठे ॥७॥
देव नाही सोपा देव नाही सोपा । भेटिल्याची खेपा चुकतील ॥८॥
स्वप्नामाजी तुज अभंग प्रसाद । दिलासे आनंद नित्य सेवी ॥९॥
श्रद्धावंत जरी चिंतीती अभंग । तरी होय भंग दुष्ट माया ॥१०॥
आशिर्वाद बोले तुका भाविकासी । चिंतिती मानसी हरिनाम ॥११॥

१३७१

संतांचा प्रसाद कळवळ्याचा बोध । दिलेसे हृद्‌गद हनुमंते ॥१॥
मना राम पाया कदा तू न सोडी । धरी नित्य गोडी रामनामी ॥२॥
सद्‌गुरू परम धन्य राजाराम । तयासी सप्रेम भजिजे का ॥३॥
मायेमुळे दु:ख जे का आहे खोटी । जाणिजे नरोटी त्वरे सोडी ॥४॥
अहर्निशी सदा करिजे कीर्तन । करूनिया मन तदाकार ॥५॥
अखंड कीर्तने साह्य होय देव । घेईजे अनुभव सज्जना रे ॥६॥
दासराम तया हनुमंता शरण । अर्पुनिया धन देह मन ॥७॥

१३७२

रामदास गुरू समर्थ बोधिती । व्हावयासी प्राप्ती देवाजीची ॥१॥
रामभक्ती करा भवसिंधु तरा । पहा रघुवीरा रामनामी ॥२॥
भक्ती करावया शरीर सुदृढ । पाहिजे की दृढभाव अंगी ॥३॥
शरीरासी अन्न अन्नालागी धन । धनासी कारण देहकष्ट ॥४॥
तरी होय जाणा स्वधर्मरक्षण । बाणे अभिमान स्वधर्माचा ॥५॥
शुद्ध कर्मे शुद्ध प्राप्त होय अन्न । विवेकाचरण शुद्ध होय ॥६॥
विवेकाचरणे सद्‌गुरूंची प्राप्ती । तेथे भक्ती मुक्ती साह्य होय ॥७॥
रामरूप झाल्या स्वराज्य आपुले । अभेद उरले एकमेव ॥८॥
दासरामा बोध केला रामदासे । तोचि अनायासे स्थिरावला ॥९॥

१३७३

गोविंदरायानी केला असे बोध । पहाता हृद्‌गद कळो येई ॥१॥
देव तो आपुला येर मायाजाळ । महादु:खमूळ अज्ञानची ॥२॥
करा रामसेवा तरी होय सुख । उगीच विन्मुख होऊ नका ॥३॥
अंती न ये कोणी तयाचे वाचोनी । एक राम धणी सोडवील ॥४॥
करावा सुखाने आपुला संसार । परी रघुवीर आठवावा ॥५॥
असोनिया देव आपुला पाठीसी । का रे तू पहासी जनाकडे ॥६॥
मायबाप राम ऐसा केला बोध । जहाला आनंद दासरामा ॥७॥

१३७४

रामरूप व्हावे संपादोनी ज्ञान । सांगताती जाण धर्मगुरू ॥१॥
संसा जाळोनी साधावा परमार्थ । सांगती यथार्थ तुकाराम ॥२॥
गुरूखूण घ्यावी देवा ओळखाया । सांगती चांगया ज्ञानेश्वर ॥३॥
धर्माचे रक्षण खर्ची घाला प्राण । दिधलीसे खूण समर्थांनी ॥४॥
भक्तीचे योगाने आकळावा देव । सांगती अनुभव रामकृष्ण ॥५॥
सर्व साधोनिया आठवावा राम । सांगती परम नारायण ॥६॥
संसार साधोनी साधाया परमार्थ । बोलताती नित हनुमंत ॥७॥
म्हणे दासराम मार्ग ते अनेक । कळे वर्म एक गुरूकृपे ॥८॥

१३७५

सद्बोधदशक । चिंतिताची होय सुख ॥१॥
साधुसंती बोध केला । जगा मार्ग दावायाला ॥२॥
नासेल अज्ञान । कळे परमार्थ खूण ॥३॥
केल्या आचरण । नर होय नारायण ॥४॥
दासराम सांगे खूण । करा देवाचे चिंतन ॥५॥



# हरीपाठ-१ : ५०

१३७६

हरी हरी हरी नाम हे सुबोध । नुरे भवबंध द्वैतभाव ॥१॥
रामकृष्ण एक भाव दावी हरी । निर्गुणाची सरी शिवहृदय ॥२॥
जीवशिव ऐक्य श्रीहरीचे पाय । परमात्म्याची सोय तरणोपाये ॥३॥
दासराम लागे श्रीहरिचरणी । मन हे स्मरणी जडे जेणे ॥४॥

१३७७

हरीचे स्मरण नुरवी विस्मरण । रुक्मिणीरमण तुष्ट होय ॥१॥
हरिभक्ती परायण हे पदवी । कीर्तनेची घ्यावी अखंडू गा ॥२॥
देखोनी पात्रता हरिनाम कीर्तन । देती भगवान सद्‌गुरू आज्ञा ॥३॥
हरिनामी अणू परमाणू रंगला । गुरूकृपे भला भक्त बरवा ॥४॥
हरिनाम सार श्रेष्ठ परमार्थ । दासराम अंकित सद्‌गुरूंचा ॥५॥

१३७८

हरीचे कीर्तनी नुरे देहभान । विसरे आपण आपणाते ॥१॥
जेथे होय देह पूर्ण ब्रह्ममय । श्रीरंग ते माय नाचे जेथे ॥२॥
गुरूआज्ञा अधिकाराचे कीर्तन । गुरूकृपा महिमान नेणवे गा ॥३॥
कीर्तन बडिवार हरीचे दासांचा । संत सद्‌गुरूंचा लौकिक तो ॥४॥
नोहे पोटभरू विद्या हे कीर्तन । हरीचे वतन हरिभक्ती ॥५॥
श्रीहरीपुढती गावे नामगान । संतजनी मान भक्तांचा हा ॥६॥
अधिकारियासी देईल श्रीहरी । सांगती गजरी तुकाराम ॥७॥
निवे तन मन पावे समाधान । श्रवणे पावन पतित होती ॥८॥
दासराम झाला संतांचा पायीक । मागे प्रेमभीक नामामृत ॥९॥

१३७९

घेतलीसे हाती विजयाची पताक । नामाचे धारक झालो आम्ही ॥१॥
हरीचे कीर्तनी धरू आम्ही टाळ । बोलोनिया बोल रामकृष्ण ॥२॥
रंगी रंगोनिया वाजवू मृदंग । साधन हे चांग साधू वेगी ॥३॥

साधनाची कसणी झाल्या करू साथ । आळवू अनंत प्रभू माझा ॥४॥
सद्गुरू प्रसन्न झाल्या लावू वीणा । बोल नारायणाविण नाही ॥५॥
येईल तैसा बोलू रामकृष्णहरी । प्रसन्न श्रीहरी जेणे योगे ॥६॥
सुरामाजी नाद नादामाजी भेद । भेदामाजी अभेद रामनाम ॥७॥
तेथे घेऊ चित्ता अखंड प्रसादू । धरोनिया छंदू नाचू पुढे ॥८॥
छंदाने हारवू भूक आणि तान । करू या प्रसन्न गुरूदेव ॥९॥
गुरूदेवासंगती गुरूआज्ञे कीर्तन । दासरामा प्रमाण याची देही ॥१०॥

१३८०

हरीचे कीर्तनी एक ताल नाद । जेथे हा गोविंद नाचे स्वये ॥१॥
हनुमंतराय स्कंधावरी राम । धरोनी सप्रेम नाचताती ॥२॥
कैसी आहे शोभा संतसभेमाजी । देव होय राजी भक्तावरी ॥३॥
महाद्वारापुढे चालिले भजन । तेथे असे मान वैष्णवांचा ॥४॥
नामधारक ते करिती स्मरण । संतराज पूर्ण कृपा करिती ॥५॥
हरीभक्तालागी भगवंताचे पाय । दासरामा उपाय संतसंगे ॥६॥

१३८१

हरीचे कीर्तनी नाही धन मान । हरीभक्तालागून चाड नाही ॥१॥
भीकेचे सोहाळे न होती तयासी । शरण हरीसी गेले जे जे ॥२॥
हरीनाम कंठी गर्जावे स्वहिता । पळवी अहंता भूमीपैल ॥३॥
नम्र होवोनिया लागिजे भजनी । निंदास्तुती कानी दवडा वेगी ॥४॥
संतसेवकासी अंतरीचे गूज । दासराम सहज तेथे धाला ॥५॥

१३८२

श्रीहरिकीर्तनी मर्यादा राखिजे । नातरी जाईजे यमपुरी ॥१॥
परमात्मयाचे जेथे अधिष्ठान । न साहे अपमान देवाजी ते ॥२॥
न करी धांवल करिता भजन । न करी हेल कुचेष्टा ते ॥३॥
मांडीवरी मांडी घालोनी न बैसे । शिष्टाचार ऐसे सांडू नये ॥४॥
तुकोबारायानी घातिली मर्यादा । न करी अपराधा गुरूभक्ता ॥५॥
नारदादी दत्तात्रेय आगमन । सिद्ध संतजन ज्ञानोबादी ॥६॥
नाथ नामदेव दांडाईत भक्त । निळोबा शोभत धन्य धन्य ॥७॥
दासराम तेथे महाद्वारी उभा । पहातसे शोभा अंतरीची ॥८॥

## १३८३

निळोबा निशाण कळसावरी जाण । शोभिवंत पूर्ण फडफड करी ॥१॥
तुकोबा कळस जहाले सुरस । जया जगदीश कृपा करी ॥२॥
तुकोबारायानी निळोबालागून । दिधले कीर्तन विजयाचे ॥३॥
सद्‌गुरूप्रसाद कृपा होता पूर्ण । दिले आलिंगन पांडुरंगे ॥४॥
तुकोबारायानी साक्षात्कार दिला । अखंड लाधला सौख्य ठेवा ॥५॥
दासराम लीन संतांचे पायासी । जेथे विश्रांतीसी ठाव लाधे ॥६॥

## १३८४

ज्ञानदेव हरिकीर्तनी भगवान । स्वयमेव पूर्ण जहाले जे ॥१॥
भगवंतानी टाळ नाथांचे कीर्तनी । सगुणरूपे येवोनी धरिलासे ॥२॥
नाचे पांडुरंग नामदेव कीर्तनी । तुकारामा वदनी देव बोले ॥३॥
हनुमंतराय करिती कीर्तन । नाचे भगवान रेवणसिद्ध ॥४॥
दासराम उभा हरीचे कीर्तनी । देखतो नयनी घननीळ ॥५॥

## १३८५

हरिभक्ता वंद्य निरंजनपीठ । त्यापुढे वैकुंठ तुच्छ त्याते ॥१॥
रघुनाथराया गोविंद पितया । केली कृपाछाया हनुमंते ॥२॥
दिली परंपरा नामसंकीर्तन । जुनाट वतन साधुसंती ॥३॥
अखंड रंगावे नाचावे कीर्तनी । दासराम चरणी लीन झाला ॥४॥

## १३८६

कान झाला वडवानळ । दिशा तेजःपुंज विशाल ॥१॥
जेथे विजा चमकती । उष्ण वायू वरीवरी फिरती ॥२॥
लोहचुंबक आकर्षण । जेथें होय ज्ञानाज्ञान ॥३॥
दासराम सांगे निके । सद्‌गुरू जे दाविती सुखे ॥४॥

## १३८७

आता एक दिशा उरली आम्हासी । सुखसंतोषासी भेटी झाली ॥१॥
सूत्राते धरोनी जावे वरीवरी । टाळघोळ गजरी नादभरे ॥२॥
सिद्धमार्गे गेले संत सखे सज्जन । जेणे नारायण कृपा करी ॥३॥
दासराम तेथे घेतसे लोळण । श्रीहरी आपण संतोषे तो ॥४॥

## १३८८

प्रथम घेईजे तुळशीची माळ । करिजे कल्लोळ वैखरीचा ॥१॥
नंतर लाहिजे हृदयीची माळ । परीयेसी बोल रामकृष्ण ॥२॥
मागोनी मिळवी हरिनाममाला । देखिजे जिव्हाळा भक्तिरस ॥३॥
स्मरणाची माळ अखंड केवळ । मेळसी तात्काळ परेपैल ॥४॥
परेमाजी देखे नाममाळा उत्तम । करी तेथे राम संकल्प तो ॥५॥
अनिर्वाच्यमाळा देखे ब्रह्मस्थानी । दासरामा करणी अघटित ॥६॥

## १३८९

कूर्मगतीपाठी भवाचा सागर । आटवी ते नीर भाव शुद्ध ॥१॥
देखे निळा पाट ब्रह्मांडी विस्तारी । जातसे विवरी निरंजनी ॥२॥
तेथे देखे एक नवलाची परी । मुंगी ते निर्धारी ससा ग्रासी ॥३॥
तुकोबारायानी केले हे सूचित । दासराम सुचित्त ऐके स्वये ॥४॥

## १३९०

वैकुंठी न राहे भगवान हरी । कीर्तनगजरी देखे स्वये ॥१॥
नारदा दिधली परंपरा हाती । हरिनामकीर्ती त्रिभुवनी ॥२॥
रेवणसिद्धादी हरिरूप झाले । महिमान भले सत्य सत्य ॥३॥
दासराम लागे तयांचे पदासी । आला तो हातासी ज्ञानदीप ॥४॥

## १३९१

नाकी मी माझे हे भाव वोसंडले । चक्राकार झाले मेरुपरी ॥१॥
परी ते निमाले हरिनामसागरी । हृदयमंदिरी अंतर्मुख ॥२॥
ध्वनिलाटा भारी उसळती अंबरी । आनंदलहरी वायूच्या त्या ॥३॥
आनंदाचा वायू वायूचा आनंद । दासराम मोद नित्य सेवी ॥४॥

## १३९२

जीवभावा आत देखे विज्ञानात्मा । त्यापैल शिवात्मा ज्ञानरूप ॥१॥
पैल प्रत्यगात्मा देखे हरी आत्मा । जेथे समविषमा आटणी झाली ॥२॥
पर परमात्मा निरंजन वस्तू । संशयरहितू दासराम ॥३॥

१३९३

श्रोता आणि वक्ता देखे निरंजन । नामे हे गगन गिळोनिया ।।१।।
हनुमंतराय दाविती आनंद । लागलिया छंद चरणाचा ।।२।।
एका चरणाचा उमज पडता । प्रसाद तो हाता पुरेपूर ।।३।।
दासराम तेथे गाये नाचे उडे । जेथे काही घडे लाभ बवा ।।४।।

१३९४

कानाला जिव्हा फुटली रे भाई वाणीच डोळा जहाली रे ।
नाम अमृत पिवोनी धाली शद्बाचे रूप देखिले रे ।।१।।
निःशद्बाची खाण प्रगटली माये परिमळ अवघा भरला रे ।
चिदानंद उजळला अंबरी निर्गुण साक्षात्कारू रे ।।२।।
पिंड आणि ब्रह्मांडाची गती आघवी एक रे ।
अणुपरमाणूचा चाळकू आत्मा द्वादश आंगुळ देही रे ।।३।।
ध्वनी आणि प्रकाश जीवन स्वस्वरूपाची कळा रे ।
कळ देखुनी अंतरी जाई देखे अबोल ब्रह्म रे ।।४।।
नेती नेती म्हणे जयासी वेदशास्त्र गोविंदू रे ।
काहीच नसता खेळ मांडिला आपण राहिला अलिप्तु रे ।।५।।
कार्यकारण काहीच नाही अवघे हे देखणे रे ।
दासराम हा शरण जाहला हनुमतसद्‌गुरू चरणी रे ।।६।।

१३९५

श्रवणाची जिव्हा कैसी तेजाळली । अवघीच धाली मनोवृत्ती ।।१।।
आटोनी जीवन वायू तो गगन । होवोनी घर्षण तेज झाले ।।२।।
प्रकाशाची झाली जीवनाची कळा । दावीतसे जिव्हाळा प्रणवाचा ।।३।।
प्रणवाचे मार्गे देखे सोहंरूप । जेथे होय अपाप तल्लीनता ।।४।।
दासरामा सद्‌गुरू बोधिताती खुणा । जे का निरंजना दावीतसे ।।५।।

१३९६

जिव्हा ते रसना रसना ते नाम । जेथे परब्रह्म ठसावले ।।१।।
मुंगी झाली वाणी अघटित करणी । देखिले नयनी साधुसंती ।।२।।
ग्रंथीपासोनिया स्रवते शर्करा । कंठी रघुवीरा मेळविती ।।३।।
अमृत लल्लाटी जावोनी उपरी । देखिजे सत्वरी साक्षात्कारू ।।४।।
दासरामा दाविती श्रीगुरू हनुमंत । धन्य रामभक्त संतराज ।।५।।

## १३९७

मुक्तरूप भरले कंठाचिये स्थानी । दृश्य ते नयनी सहस्रदळी ॥१॥
कंठामाजी देखे अनहत नाद । वरी तो आनंद तेजोरूप ॥२॥
ज्ञानकळा दावी निजबीज वर्म । निष्काम ते नाम घेता बरे ॥३॥
दासराम सांगे श्रीहरीचा पाठ । लाधले वैकुंठ बरवे जेथे ॥४॥

## १३९८

शून्यामाजी फिरती अभ्राची पटले । जयात साठले प्रतिबिंब ॥१॥
जीवनाचे माजी बिंबाची साऊली । एकत्वेंची आली उत्क्रांतीसी ॥२॥
मोक्षरेखेवरी हाता आला मोक्ष । गुरूराव साक्ष भाविकासी ॥३॥
दासराम घेई नाम सद्‌गुरूंचे । जेथे जाणीवेचे काम नाही ॥४॥

## १३९९

वृक्षाविण पुष्प बीजाविण संकल्प । निष्काम अमूप निरंजन ॥१॥
पुष्पावीण बीज बीजाविण सुवास । तेणेची तुऱ्यास गुंफियेले ॥२॥
माळियासी केले तुऱ्याने प्रसन्न । करोनी उन्मन शुद्ध भावे ॥३॥
दोरियाचे वीण सुईचे वाचून । परिमळ सुमन हार केला ॥४॥
दासराम वाही हार श्रीगुरूस । घेवोनी कृपेस पूर्णपणे ॥५॥

## १४००

माती चाळिली चाळून । आत पाहिले निरखून ॥१॥
शुद्ध भावाची चाळणी । पाच वेळ केली पहाणी ॥२॥
आत हीरियाची खाण । माती राहिली दडोन ॥३॥
जीवनाविण जीवन । धान्यावाचोनी ते अन्न ॥४॥
पैशावीण सावकारी । दासरामा तृप्ती खरी ॥५॥

## १४०१

स्वानंद साम्राज्य सुख छत्रधर । देखे धुरंधर हरिभक्त ॥१॥
सर्वाठायी सत्ता कथेचा बडिवार । गुरूकृपा थोर जयावरी ॥२॥
गुरूदेव जया बोळले संपूर्ण । लाधले निधान वैकुंठीचे ॥३॥
रामकृष्णनामी देखिजे श्रीहरी । तयाचे उपरी रामनाम ॥४॥
रामनामी सहजी होईजे निष्काम । दासरामा सुगम हरिपाठ ॥५॥

## १४०२

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताई । नाथ नामदेव तुकाराम जनाबाई ॥१॥
हरिरूप झाले श्रीहरीचे पाठी । सखा जगजेठी ज्यांचा झाला ॥२॥
त्यांची नामे गाता उद्धरती पतित । होती जीवनमुक्त सत्य सत्य ॥३॥
हनुमंत सद्‌गुरुपदी रममाण । दासराम लीन संतचरणी ॥४॥

## १४०३

महाशून्य मूस पंचभूत आटणी । वायुस्वरूपिणी हृदयामाजी ॥१॥
पृथ्वी आप तेज गेले ते ग्रासोनी । देखिजे नयनीं वायुरूप ॥२॥
ब्रह्मरंध्रामाजी वायू तो विरोन । देखिजे गगन केवळ ते ॥३॥
तेथोनिया देखे गगनाचा पंथ । तयाते अव्यक्त ग्रासीतसे ॥४॥
शून्ये शून्य उडवी परती वस्तू ठेवी । त्रिपुटी आटवी तये ठायी ॥५॥
दासरामा बोधिती संतराव निके । विज्ञान ते देखे योगियांचे ॥६॥

## १४०४

मार्ग हा शीर्षाचा अनादि सिद्धांचा । वेदगर्भ वाचा संतजनी ॥१॥
बरवी पाऊले बरवी पाऊले । जेथे मन निवळे एकाएकी ॥२॥
रामकृष्णहरी विठ्ठल मुरारी । देखे त्रिपुरारी एकरूप ॥३॥
देखिजे आधारी साजिरी गोजिरी । पाऊले ती बरी दासरामा ॥४॥

## १४०५

धन्य रेवणसिद्ध धन्य मरूळसिद्ध । धन्य काडसिद्ध भगवान ॥१॥
धन्य एकोराम पंडिताराध्येय । आरूढ सिद्धराय मुप्पीनस्वामी ॥२॥
गुरूलिंगजंगम रघुनाथप्रिय । साधु रामराय धन्य आक्का ॥३॥
धन्य संतराज हनुमंत सद्‌गुरू । जया तो ईश्वरू वश झाला ॥४॥
संतसद्‌गुरूंचे नाम घेता वाचे । कैवल्य ते नाचे हरिपाठी ॥५॥
भगवंत पावे सहज संतोष । सिद्धनाम सुरस दासरामा ॥६॥

## १४०६

अग्नीमधोनिया काढिता उष्णता । चिदाकाश हाता येत असे ॥१॥
ओतिले चैतन्य आकाशामाझारी । प्रकाशे निर्धारी प्रकाशू गा ॥२॥

गतीचे माझारी देखिजे अंतरी । भकाश वित्ररी प्राणगाठी ॥३॥
चिदानंद सत्य याचे पैल ब्रह्म । सत्ता ते परम समविषमी ॥४॥
आदिशक्तीपरते देखण्यावरते । दासरामा ते ते निजरूप ॥५॥

## १४०७

दृष्टी हे माघारी परतली जेथूनी । स्वरूपाची खाणीच भूमाजी ॥१॥
डोळीयाने गिळिले आघवे गगन । बुडाले त्रिभुवन दृश्याभास ॥२॥
सत्‌चिद्‌घनानंद प्रणवाचा डोळा । तेजाचा उमाळा स्वयंरूप ॥३॥
सत्य गतिरूप प्रकाश चैतन्य । घनश्याम पूर्ण बिंब गाभा ॥४॥
दृश्य ते नीलिमा आनंद ते ज्ञान । दासरामा खूण परियेसी ॥५॥

## १४०८

देखणे हे दृश्य द्रष्टयासी गाठी । तेथेची त्रिपुटी संभवली ॥१॥
देखणेची नाममात्राचा आभास । अंतरी अदृश्य महाशून्य ॥२॥
दृश्या दृश्याभासपैल तो श्रीहरी । करांगुळी साचारी सद्‌गुरू दावी ॥३॥
दासराम कीर्तन श्रीहरीचा पाठ । कृपाकर स्पष्ट सद्‌गुरूंचा ॥४॥

## १४०९

अदृश्यावरूता वायू घननीळ । आकाश पोकळ देखणे ते ॥१॥
महाशून्यामाजी शद्वाचा उद्भव । तेथेची संभव वारियाचा ॥२॥
निश्चळाचे अंगी उठले चंचळ । मांडिलासे खेळ बोलण्याचा ॥३॥
शून्यामाजी शून्य तया अर्थशून्य । पहाताची अन्य काही नाही ॥४॥
तीनापासोनिया पाचाची उत्पत्ती । दासरामा हाती गूज आले ॥५॥

## १४१०

दृश्यादृश्याभास घनशून्य निरास । तेथेची ब्रह्मास मिळे का रे ॥१॥
चार महाशून्ये पोटी प्रणवशून्य । तेथे चार शून्ये प्रसवली ॥२॥
तयापैल देखे स्वरूप अव्यक्त । निरूपाधी संत निरंजन ॥३॥
दासराम सांगे अव्यक्ताची कळा । घननीळ डोळा ठसावला ॥४॥

१४११

[illegible] ॥१॥
[illegible] ॥२॥
[illegible] ॥३॥
[illegible] ॥४॥

१४१२

[illegible] ॥१॥
[illegible] ॥२॥
[illegible] ॥३॥
[illegible] ॥४॥

१४१३

[illegible] ॥१॥
[illegible] ॥२॥
[illegible] ॥३॥
[illegible] ॥४॥

१४१४

[illegible] ॥१॥
[illegible] ॥२॥
[illegible] ॥३॥
[illegible] ॥४॥
[illegible] ॥५॥
[illegible] ॥६॥
[illegible] ॥७॥

# हरिपाठ-२ : ५१

१४१५

श्यामल रूपडे सुंदर अविटे । कर ठेवुनी कटे विटेवरी ॥१॥
डोळिया डोळुला काळिया काळुला । पैलाडू सावळा गगनातू ॥२॥
ऐलाडू प्रकाश तिमिर निरास । आली मिळणीस दोन शून्ये ॥३॥
पहाणे बुझाले पहाता निजतेजा । ऐसा विठू माझा रामकृष्णी ॥४॥
मुक्तपणे झाली मुक्यासवे भेटी । विसावली त्रिपुटी दासरामी ॥५॥

१४१६

प्राणपृथवकरणी महाप्राणघर्षणी । हरिठायी दोनी रामकृष्ण ॥१॥
अवघा श्रीहरी पहाता निःशब्द । घनदाट अभेद भेदरहितू ॥२॥
वायूचा प्रकाश हरीचा उल्हास । जेथे चिदाभास उफाळला ॥३॥
रामकृष्ण दावी भेदाभेद दोनी । रहाता गिळुनी हरी आत्मा ॥४॥
रामकृष्णनाद चिद्‌गुणे उमटे । वारियाने प्रगटे विश्व कैचे ॥५॥
उष्ण शीत आभा आकारिला नभा । चैतन्यू हा गाभा गतिमान ॥६॥
गतीचेपासोनी जहाली जे गती । वाऱ्याची प्रचीती नादरूप ॥७॥
पहाणे विस्तरे दोनी दृश्यादृश्य । भरले चिदाकाश नामरूपी ॥८॥
साधुसंती एक रामकृष्णहरी । दिली खूण बरी दासरामा ॥९॥

१४१७

रामकृष्णनामी प्रगट श्रीहरी । करणी कुसरी संतांचिया ॥१॥
पवनात जैसे भरले आकाश । तैसा हरी प्रत्यक्ष रामकृष्णी ॥२॥
गगन पहाता वायूलागी ठाव । गगनी उद्भव वारियाचा ॥३॥
रामकृष्ण झाले हरिठायी तैसे । अवघेची प्रकाशे पूर्णरूपी ॥४॥
पूर्ण घट तोची हरी जेथ नादे । दासराम गोविंदे नामी धाला ॥५॥

१४१८

रामकृष्ण हरि नामी जे अव्यक्त । परिपूर्ण व्यक्त विज्ञान ते ॥१॥
हरी अद्वयात्मा पहाता स्वयंसिद्ध । स्वानुभवानंद श्रीगुरूमार्गे ॥२॥

रामकृष्ण चिदाकाशी चिदाभास । जाला समरस हरिनामे ।।३।।
तरी पडे गाठी सद्रूप आत्मया । नामी दासरामी या निश्चळपणे ।।४।।

## १४१९

वैकुंठ श्रीहरी सद्रूपी या घन । निश्चळ स्मरण पूर्णभेदू ।।१।।
शद्ब गतिमान न दावी जे नाद । लहरीवाचुनी नाद केवी उमटे ।।२।।
वायूची लहरी ध्वनी रामकृष्ण । मूळ पहाता शून्य शद्बापैल ।।३।।
संकल्प दृश्याचे मूळ ते पहाता । विकल्प वाढता चंचळत्वे ।।४।।
गुंती पडे गुंती विकल्पी आत्मया । दासराम सुखिया नामाठायी ।।५।।

## १४२०

बुद्धिगामी जीवदशा रामकृष्णी । शिव आत्मवाणी रामनामी ।।१।।
ज्ञानाज्ञानयोगे करी जीव खेपा । साधुसंगे सोपा आत्माराम ।।२।।
विज्ञानी या धाले पूर्ण आत्मज्ञान । आपणा आपण पहाणे जाले ।।३।।
निःशद्ब पहाता नाम निरंजन । कळसूत्र पूर्ण घनू ठायी ।।४।।
शद्ब गुणरूपे जाले चराचरी । पहाणे विस्तारी दासरामी ।।५।।

## १४२१

जीव शिव ऐक्य आणि दुभागणी । दावी निरंजनी रामकृष्णी ।।१।।
सत्वरजतमाआतू रामकृष्ण । भावरूप भिन्न चिद्‌गुणे या ।।२।।
चौदेहाची खोळ खोलुनी पहाता । गुणातीत हाता रामकृष्ण ।।३।।
संत हे दयेचे थोर दिनमणी । दासराम चरणी विनटला ।।४।।

## १४२२

आदी मध्य अंती तो हा एकसूत्री । वासुदेव हरी श्रीअनंत ।।१।।
घनूठायी पहाता आकारू निरासे । एकतळी नासे गुणागुण ।।२।।
रामकृष्ण निर्गुणी गुणरूप वारा । सगुण पसारा वाच्यरूप ।।३।।
खेळ चिद्रूपाचा शून्य रामकृष्णी । महाशून्य मौनी हरिरूपी ।।४।।
गुणागुण शून्य जेथे आटाआटी । तेथे पडे गाठी सद्रूपाची ।।५।।
आनंदा जहाला आनंद बरवा । बुद्धिगम्य पहावा हरी हृदयी ।।६।।
दासराम गुरूपायी विसावला । थोर लाभ झाला निजगूजा ।।७।।

१४२३

सद्रूप हे घन रामकृष्णी गगन । नाद हा गिळोन गेला जेथे ॥१॥
एसिया परीने लहरी उठती । नादाची प्रचीती येवो नये ॥२॥
सूक्ष्म जे लहरी अबोल कुसरी । नाद तेज परी दावीचना ॥३॥
शून्याठायी जाली चैतन्य दाटणी । गतीचेपासोनी वायू झाला ॥४॥
नाद तेज वाहक मनाचा पूरक । आकाशीचे मुख चोजवी जो ॥५॥
दासरामा संती दिली निकी खूण । पंथ रामकृष्ण सहजाचा ॥६॥

१४२४

हरिठायी रामकृष्णी या चंचळ । चैतन्य शीतळ उष्ण प्रभा ॥१॥
चिदाकाशी जाली त्रिगुणाची गाठी । पुढे शद्वसृष्टी महानादे ॥२॥
नामाठायी रूप रूपाठायी नाम । परीविण दुर्गम आत्माराम ॥३॥
शून्यामाजी जाला तत्त्वांचा पसारा । आत खेळे वारा श्रीहरीचा ॥४॥
स्वयंनाम संथ सिद्ध निरंजनी । दासराम चरणी लोलिंगला ॥५॥

१४२५

जीवदशा पहाता होती जे अव्यक्त । रामकृष्णी व्यक्त बुद्धीठायी ॥१॥
जीवासी पहाता शिव कळो येई । दोनीठायी देही हरी आत्मा ॥२॥
रामकृष्णी उगम पहाता मन बुद्धी । परिपूर्ण शुद्धी सद्रूपातू ॥३॥
हरिनाम ब्रह्मी जीवालागी ठाव । दासरामी भाव तेथे कैचा ॥४॥

१४२६

ज्ञानाचिया झाली जेथे परिणती । शद्वरूप स्थिती बुद्धी तेथे ॥१॥
तये ठायी नाही नाही रे विश्रांती । सुखी दुःखी गुंती पडे कैसी ॥२॥
पहाता उगम स्थिती लय शद्वी । अनुभव बुद्धी शद्वरूप ॥३॥
शद्वातू अशद्व अशद्वातू शून्य । तवातू गहन निःशद्व ते ॥४॥
पैल निरंजन नामब्रह्म ठेव । स्वरूपानुभव गूढ स्थिती ॥५॥
माया ही पहाता चंचळ चंचळ । शीत उष्ण तेजाळ गतिमान ॥६॥
घनानंद ब्रह्म निःशब्दू निवांत । कर्माकर्मरहित दासरामी ॥७॥

## १४२७

चिदाचिदाचा हा पहाता पसारा । शून्याआतू वारा विस्तारिला ॥१॥
नाना रूप वर्ण धर्म भाव शक्ती । नाना गुण प्रचीती वायुठायी ॥२॥
चिदाचिद पहाता नोहे काही जीव । हरी स्वयमेव विकासला ॥३॥
चिदांशू अचिद् अचिद् पूर्णचिद । विकासे गोविंद शून्यभावे ॥४॥
अचिदाचा भाव शून्यरूप जीव । परिपूर्ण ठाव चिदाकाशी ॥५॥
चिद्रूपामाझारी वाढे द्वैताद्वैत । सुखदुःख हेत ब्रह्मीं कैचा ॥६॥
दासरामी पहाता निश्चळ श्रीहरी । सकळा अंतरी नामब्रह्म ॥७॥

## १४२८

हनुमंतराय धन्य गुरूमूर्ती । जीवाची विश्रांती परिपूर्ण ॥१॥
नाम धर्म पंथ बरवा दाविला । अंतरी उदेला विश्वास हा ॥२॥
करोनी ठेविला अभंगी प्रसाद । सेविल्या आनंद पावे भक्ता ॥३॥
दासरामावरी बोळली रेणाई । हरिपाठ लाही सहज कृपे ॥४॥



# स्वधर्मपाठ : ५२

१४२९

स्वधर्माचा पाठ धर्मनिष्ठ जाणे । जाणत्याचे खुणे जाण नेणे ॥१॥
आपुला तो धर्म ओळखोनी घ्यावा । जेणे होय जीवा समाधान ॥२॥
गुरुलिंगजंगम ब्रह्मनारायण । बोधियेली खूण स्वधर्माची ॥३॥
दासराम लोळे परात्पर गुरुपदी । जेणे परमानंदी मन मिळे ॥४॥

१४३०

ब्रह्म ज्ञानखुणे ज्ञान सनातन । पूर्ण समाधान ब्राह्मणधर्म ॥१॥
सर्व विष्णुरूप वैष्णवांचा धर्म । ब्रह्मार्पण कर्म ब्रह्मरूप ॥२॥
नाना पंथ नाना मते नाना धर्म । तयात उत्तम निजधर्म ॥३॥
अढळ ते पद देताहे श्रीहरी । दासराम स्मरी नित्य त्याते ॥४॥

१४३१

परमात्मा श्रीकृष्ण अर्जुना बोलिला । धर्म तो आगळा परम सत्य ॥१॥
जितक्या प्रकृती तितुक्या विकृती । भावाभाव स्थिती तैसा धर्म ॥२॥
अढळ जे सत्य त्रिकालाबाधित । तत्त्वरूप अर्थ तोची धर्म ॥३॥
सकळही धर्म टाकोनिया माते । सांडोनी अहंते शरण येई ॥४॥
ऐसा बोधियेला धर्म तो अर्जुना । दासराम चरणा लागे तेथे ॥५॥

१४३२

अहंता सांडोनी कृष्णपदी जडता । सर्व कर्म तत्त्वता ब्रह्मरूपा ॥१॥
तेथे भेटी होय परमात्मरूपा । नुरी विकल्पा अनुभव ॥२॥
शब्द ते गगन शब्द ते गगन । नि:शब्द भगवान मूळरूप ॥३॥
हकाराच्या नाशे आनंदासी गाठी । होय आटाआटी चरवारीची ॥४॥
दासराम म्हणे धर्माचे वर्म । देवाजीचे नाम हृदयामाजी ॥५॥

१४३३

आकर्षण कृष्ण शद्ब तो हुंकार । कारण जे चार शून्यालागी ॥१॥
शद्ब तो निमाला गतीचिये पैल । अबोलाचा बोल आकळला ॥२॥
अर्धमात्रेउपरी गगनाचे वरी । अहंतेची उरी उरली नाही ॥३॥
जाणीव नेणीव ज्ञानाज्ञान आटले । पापपुण्य सरले दासरामा ॥४॥

१४३४

कळेचे हे धर्म अकळेचे धर्म । भावाभाव वर्म सांडी पैरा ॥१॥
तरीं तुज लाधे चोखट स्वधर्म । शद्बाशद्ब नाम ग्रासीतसे ॥२॥
प्रणवाचे वर्म तीनीची मिळणी । त्या आत नयनी नाम देखे ॥३॥
गगनाचा उलटा डोळा देखे नाम । नुरवी नामानाम दृश्यादृश्य ॥४॥
देखणे देखणे सांडोनिया पैल । देखिजे सोज्वळ नामब्रह्म ॥५॥
दासरामा सद्‌गुरू दाविती हे वर्म । अंतरी त्या रामकृष्णहरी ॥६॥

१४३५

अवघाची चक्षूरूप आत्मा । स्वंयतेज परम तोही लोकी ॥१॥
सूर्य चंद्र अग्नी होय जेथे लय । देखण्याची सोय झाली जेथे ॥२॥
देखणे न लागे करावे निर्माण । असोनी नसोन सारिखेची ॥३॥
दिसते म्हणोनी उदेले म्हणावे । नाथिले जाणावे प्रलय झाला ॥४॥
चक्षुरूप हरीं तोची निजधर्म । तेथे दासराम मौनावला ॥५॥

१४३६

नामाचिये अंगी देखण्याची कळा । कवतूक डोळा दावी हरी ॥१॥
वस्तूचे देखणे मधे निज नाम । आगम निगम दावीना जे ॥२॥
उत्पत्ति लया कारण ते नाम । दावी सम विषम लय करी ॥३॥
द्वैताद्वैत भासवी नाचवी उडवी । निज डोळा दावी ब्रह्मरूप ॥४॥
धारणा तो धर्म ब्रह्म तेची नाम । नाम तेची ब्रह्म दासरामा ॥५॥

१४३७

नाम हा प्रकाश अज्ञान निरास । दावी भासाभास सारासार ॥१॥
मीपण मारोनी दावी निजवस्तू । सांडी हेताहेतू तद्रूपता ॥२॥

अंशरूप जीव म्हणूनी तेथ मिळे । ब्रह्म ते आगळे समरस ॥३॥
चित्कळा आनंद ओलांडोनी देही । दासरामा होई ब्रह्मरूप ॥४॥

१४३८

शून्याते सारिता उरे एकीएक । अनुभव सुख अनुभवे ॥१॥
ते सुख सांगाया सांगणारा नुरे । देही विदेही रे साक्षिरूप ॥२॥
त्याचे सुख त्याते अनुभव संती । तया आदिअंती ब्रह्मरूप ॥३॥
दासरामा ऐसा स्वधर्म श्रीराम । सर्वाघटी नाम ब्रह्मठसा ॥४॥

१४३९

देहाची धारणा जयाने वो झाली । धर्माची माऊली राम माता ॥१॥
प्राणाचे जीवन मनाचे मनत्व । जयायोगे स्वत्व प्राणिया ये ॥२॥
आपुले ते काय ओळखावे देही । खरे प्रेम पाही कोठे आहे ॥३॥
अढळ अखंड सत्यरूप धर्म । दासरामा सुगम गुरूकृपे ॥४॥

१४४०

प्राण आणि देह यावरी धारणा । रहाते जीवना जीवनाची ॥१॥
जेणे योगे राहे मनाचे स्मरण । तेची जाण खूण स्वधर्माची ॥२॥
पवनाचे जेणे योगे कार्य चाले । संवेदना बळे नियंत्रण ॥३॥
जीवना जीवनकळा देई पूर्ण । दासरामा प्रमाण तोची धर्म ॥४॥

१४४१

अन्नावाचूनिया तगते जीवन । राहे काही दिन प्राणी तैसा ॥१॥
जीवनावाचोनी तगते जीवन । राहे काही दिन प्राणी तैसा ॥२॥
विचारावाचोनी तगते जीवन । राहे काही दिन प्राणी तैसा ॥३॥
आनंदावाचून तगते जीवन । राहे काही दिन प्राणी तैसा ॥४॥
तेजाचेवाचूनी तगते जीवन । राहे काही दिन प्राणी तैसा ॥५॥
कफ वात पित्त प्रकोप जी पूर्ण । तेथेची संपूर्ण नाश प्राण्या ॥६॥
कफ अंधकार अज्ञानाचा मेरू । जीव पडे घोरू दुःखदायी ॥७॥
शद्बावरी गती गतीवरी स्थिती । शद्बात प्रचीती आत्मयाची ॥८॥
आत्मयावाचून तगेना जीवन । दासरामा खूण स्वधर्मची ॥९॥

१४४२

आत्म्याची गेलिया शरीरामधून । कैंचे ते जीवन राहू पाहे ॥१॥
काय करी तेथे अन्न आणि पाणी । गेलिया निघोनी उबारा तो ॥२॥
वायु आणि वन्ही देही या मिळणी । जहाली वाणी आत्मयाची ॥३॥
आत्मयाचे सत्ते देही राहे वारा । शरीरा उबारा ध्वनिघोष ॥४॥
प्राण गेलियाची कैंची शुद्ध हवा । न पडेची ठावा आत्माराम ॥५॥
नाही आता ठाव नाही आता नाव । हेतुपरी भाव सर्व पुढे ॥६॥
काय येते जाते कोणाचिया सत्ते । पूर्वी कोठे होते गती काय ॥७॥
दासरामा गतीपैल निजधर्म । महावाक्य कर्म ब्रह्मरूप ॥८॥

१४४३

धर्म नये सांगता बोलता दाविता । अनुभव चित्ता गतीपैल ॥१॥
नरदेह गती पैल त्या प्रचीती । अंतरीचीं स्थिती साधुसंती ॥२॥
अदृश्य तो आत्मा शरीरी येऊन । चलनवलन करीतसे ॥३॥
दृश्यरूप स्थिती देहीच प्रचीती । कंठी या वसती त्याची असे ॥४॥
प्राण घोटाळी या कंठाचिये स्थानी । अदृश्य होवोनी जात असे ॥५॥
सूक्ष्म देह गतिरूप जाय अंती । तेची घेई गती धारणेची ॥६॥
मनोमय कोशे हेतूनें उपाधी । शोधी जैसी बुद्धी अवधीपरी ॥७॥
पुण्यपापापरी होताहे वासना । देहाची धारणा दृश्यरूप ॥८॥
स्वधर्म जाणता नुरे पुण्यपाप । तेथे सिद्धरूप महाभक्त ॥९॥
दासरामालागी स्वधर्मचि वेड । रामनाम गोड त्याचे मुखी ॥१०॥

१४४४

देही देखे क्षणक्षणा जन्ममरण । चेतनाचेतन सकळ भाव ॥१॥
संधान जोडणी प्राणापानगती । मनालागी मती द्वैतभाव ॥२॥
विचार निर्माण होऊनी विलीन । होती घेई खूण गुरूभक्ता ॥३॥
वासनात्म प्राण घेताहे धारणा । दासराम खुणा सूक्ष्मरूप ॥४॥

## १४४५

दैनिक जनन दैनिक मरण । देही घेई खूण गुरुभक्ता ॥१॥
सुषुप्तीचा काळ जीवाचा प्रलय । मना नुरे ठाय अज्ञानाने ॥२॥
वासनात्म देह वावरतो स्वप्नी । सुषुप्तीमधोनी आक्रमितो ॥३॥
जन्म आणि मरण दोनी संक्रमण । पालटाची खूण क्रांतिवाद ॥४॥
चेतना विसावा षड्विकार भाव । नाशरूप ठेव प्रकृतीची ॥५॥
कफ वात पित्त नाडियांचा जोर । गती वाजे घोररूप तेथे ॥६॥
ज्ञानमयी निद्रा तेची गा उन्मनी । दासरामा धणी आत्माराम ॥७॥

## १४४६

सर्वाघटी प्रणव दावो जीवभाव । मनाचे मनत्व जयावरी ॥१॥
गतिमाजी येई शब्दाची प्रचीती । जेथे एक होती पंचमात्रा ॥२॥
जेथोनिया पंचभूतांचा पसारा । चिखलाचा गारा स्थूल देह ॥३॥
दासरामा तोची निजधर्म भाव । जेथे सर्व भाव उदया आले ॥४॥

## १४४७

चित्कळेचेमूळे प्राणिया ये स्वत्व । देखिजे हा भाव देहामाजी ॥१॥
प्रणावापासोनी जहाली चित्कळा । जाणे तो आगळा योगिराव ॥२॥
आपुले ते काय देहामाजी शोधी । तरी होय बुद्धी दृढ वृत्ती ॥३॥
चित्कळेचे वरी मनाची धारणा । दासराम खुणा संतसंगे ॥४॥

## १४४८

आपुले ते काय घेइजे शोधोनी । वस्ती निरंजनी स्वरूपाची ॥१॥
आपुले ते नोहे बा रे नाशिवंत । सत्य जे शाश्वत आपुले ते ॥२॥
प्रवासी तो राहे धर्मशाळेतूनी । गावोगाव हिंडूनी पुढे जाये ॥३॥
मूळ घरी आल्या नाही येणे जाणे । अढळ ते स्थान सत्तेचे गा ॥४॥
आपुली ये सत्ता आपुलिया घरी । आपुल्या शरीरी कवण स्थान ॥५॥
निरंजनस्थान देखे बिंदुरूप । तेथे निर्विकल्प आपुले घर ॥६॥
ब्रह्मांडाउपरी दासराम स्थिर । येर ते असार सर्व देही ॥७॥

१४४९

आधाराचे खाली देखिजे पाताळ । भूलोक केवळ विशाल ते ।।१।।
कंठाचे उपरी देखे स्वर्गगती । वैकुंठप्रचीती मस्तकी या ।।२।।
ब्रह्मांड विशाल नासिके उपरी । साधन चतुरी राजयोग ।।३।।
पिंड ब्रह्मांडाची गती या शरीरी । दासराम विवरी गुरूकृपे ।।४।।

१४५०

शरीरासी जावे लागते टाकून । तरी ते आपण नव्हेची गा ।।१।।
मनावरी आपुले असे नियंत्रण । तरी नव्हे मन आपण गा ।।२।।
मनापरी चित्त करिते चिंतन । तरी नव्हे आपण चित्त काही ।।३।।
बुद्धीचा निश्चय करितो आपण । तरी ते आपण बुद्धी नोहे ।।४।।
आपुलिये इच्छे घोटाळतो प्राण । तरी भिन्न जाण आपण गा ।।५।।
मी कोण पहाता सर्व अर्थशून्य । तयापैल ज्ञान तेही शून्य ।।६।।
ज्ञानाज्ञाना ऐसी शून्य आणि शून्य । तयापैल पूर्ण निजरूप ।।७।।
तेथे उरेचिना हंकार प्रवृत्ती । दासराम निवृत्ती उन्मनता ।।८।।

१४५१

स्वरूप अखंड कर्म ते अखंड । शून्य ते बडबड कृतिशून्य ।।१।।
शून्याचा उद्भव तया अर्थशून्य । तयापैल अन्यपण नुरे ।।२।।
येथे देखे काम श्रीगुरूभक्तांचे । येरा मानवांचे न चले काही ।।३।।
दासराम शरण ऐशा निजधर्मा । ओळखोनी वर्मा गुरूकृपे ।।४।।

१४५२

आतुले ते प्रेम आपुल्याच ठायी । देखे चिरस्थायी निजरूप ।।१।।
आपण ते पूर्ण आपण ते पूर्ण । पूर्ण ते आपण देवरूप ।।२।।
आपुलिया ऐसी आहे कोठे ममता । सर्व काही स्वतासाठी आहे ।।३।।
दासराम म्हणे ऐसा निजधर्म । प्रेमभाव परम नाम गोड ।।४।।

१४५३

प्रेमभाव दावी एक मुकेपण । बोलाबोल पूर्ण सरती जेथे ।।१।।
तोची निज भाव अखंड खंडेना । जेथे शून्यपणा शून्यता ये ।।२।।

परक्याचे वस्तूवरी प्रेम कोण । करेल आपण सांगा बरे ॥३॥
नाशिवंत गाठी असारा शेवटी । आत्मयाची भेटी निजठाव ॥४॥
आपुल्याकरिता सकळासी प्रेम । जाणावा उत्तम लौकिक तो ॥५॥
आपणा जाणोनी असाराचा भेद । दासरामा छंद देवाजीचा ॥६॥

१४५४

सर्वाघटी देखे आत्मरूप निके । ओतप्रोत सारिखे सदोदित ॥१॥
आले आणि गेले ऐसे नाही झाले । परी आरोपिलें उपाधीने ॥२॥
जया नाही गुण नाही ज्या अवगुण । जयावरी प्राण तगुनी राहे ॥३॥
अस्तित्व अभाव नाही ज्या संभव । पूर्ण स्वयमेव स्वत:सिद्ध ॥४॥
विकृतिरहित चोखट स्वधर्म । तेथे दासराम जडुनी ठेला ॥५॥

१४५५

धन्य धन्य धन्य हनुमंत सद्‌गुरू । तेणे हा विस्तारू बोध केला ॥१॥
रामचंद्र माऊली परमची गुरू । स्थापियेला भारू निजधर्म ॥२॥
चिन्मयाचा धर्म देवाजीचे नाम । सकळा सुगम धर्मपाठ ॥३॥
रघुनाथप्रिय साधू भगवान । तेणे दिली खूण रामचंद्रा ॥४॥
गुरूलिंगजंगम रघुनाथप्रिया । बोधिती सदया निजधर्म ॥५॥
काडसिद्ध वोळले गुरूलिंगजंगमा । दाविले ते वर्मा पूर्ण कृपे ॥६॥
मरूळसिद्धानी काडसिद्धा बोधिले । मरूळसिद्धा दाविले रेणाईने ॥७॥
शिवापासोनिया आली परंपरा । केलेसे विस्तारा हनुमंते ॥८॥
धन्य रघुनाथ धन्य ते गोविंद । कीर्तनी आनंद स्वधर्माचा ॥९॥
गुरूलिंगजंगमे लावियेले रोप । दाविले स्वरूप सत्य सत्य ॥१०॥
ऐकोनी पडसाद लिहिली अक्षरे । दासराम सत्वरे शरण झाला ॥११॥

१४५६

रज तम हेत संहारोनी द्वैत । संत ते सुस्नात रत्नाकरी ॥१॥
सोळा आणि बारा यांचे जेथे मीलन । संधिकाली साधन संध्या तेची ॥२॥
अग्निरूपामाजी अर्पण स्वकर्म । तोचि देखे होम नित्य देही ॥३॥
मनाचे मनत्व गेलिया बिलया । नमन त्या ठाया पूर्ण झाले ॥४॥
लुटिताहे ज्ञान नामब्रह्म अन्न । झाले समाधान आत्मारामा ॥५॥
दासरामा सर्व ब्रह्मार्पण कर्म । उपासना नेम रामकृष्ण ॥६॥

१४५७

स्वधर्माचा पाठ हनुमंतराये । वदविला माये बालाकरवी ॥१॥
प्रसाद उच्छिष्ट आनंद निघोट । परम अवीट सत्यरूप ॥२॥
शिवाचिये स्थानी करिजे श्रवण । तरी नारायण तुष्ट होय ॥३॥
पौष शुद्ध तृतीया अठराशे एकसष्ट (१८६१) । निजधर्म पाठ सांग झाला ॥४॥
कृपेची हे वाणी हनुमंतचरणी । अर्पी लोटांगणी दासराम ॥५॥



# नित्यपाठ : ५३

१४५८

हरिनामसार जपलिया ओठी । प्रगट किरीटी लवलाहे ॥१॥
अनंता जन्मीची पापे निरसती । जे का न वजती महातपे ॥२॥
चिद्‌गुणेची लक्ष्य चिद्‌गुणेची दृश्य । चिद्‌गुणें मनास भिन्न भाव ॥३॥
दासरामी सार रामकृष्णहरी । शून्याचे ओवरी पैल गर्जे ॥४॥

१४५९

हरिनामी कैचे अलक्ष्यदर्शन । नयनी नयन समरस ॥१॥
निश्चळिया झाले निश्चळ स्मरण । मनीचे भाव भिन्न आटले माये ॥२॥
वस्तुरूप होता नुरे गुणाकार । चिद्‌गुणे प्रकार पहाणी आले ॥३॥
दासरामी कैचा सद्‌गुरू बोळला । प्रसाद दिधला रेणाईने ॥४॥

१४६०

लक्ष्य आणि लक्ष्य मिळोनी दर्शन । जेथे हे पहाणे पैसावले ॥१॥
आतमरूपी झाली दृश्याची लावणी । चिद्‌गुणाची खाणी प्रसवली ॥२॥
चैतन्य चंचळ आनंद निर्मळ । सद्रूप केवळ निश्चळचीं ॥३॥
निशब्दातू नामब्रह्म निरंजन । दासरामी खूण गुरूबोधू ॥४॥

१४६१

हरिनामी लक्ष्य जे का स्थिरावले । सुनीळ दाटले नेत्रपाती ॥१॥
नीळियाची खाण कैची प्रकाशली । लक्ष्यरूप झाली अलक्ष्य वस्तू ॥२॥
उष्ण शीत आभा आकारिला नभा । गगनाचा गाभा आत्माराम ॥३॥
नाना गुणाकार जहाले चंचळे । मीतूपणे खेळे साक्षी माझा ॥४॥
पहाणे ते कैचे आले पहाणेपणा । आपणू आपणा देखे स्वयें ॥५॥
दासराम नामसुखे सुखावला । आशिर्वाद दिधला संतजनी ॥६॥

## १४६२

कंचे बिंदूमाजी साठले वो तेज । निज गुजागूज प्रकाशाचे ॥१॥
जयामाजी गेले विरोनी गगन । पूर्ण समाधान शद्वातीत ॥२॥
पहाणें ते कंचे माये विसावले । सदा सुखावले निश्चळेची ॥३॥
देखियेली संती आत्मयाची शोभा । दासराम स्वयंभा चक्षी लक्षी ॥४॥

## १४६३

नामब्रह्म सांगे स्वयंनाद बोलू । तयाते कळू श्रीगुरूकृपे ॥१॥
ॐकारादी नामावळी गाऊ मुखे । आत्माराम सुखे नाचू हृदयी ॥२॥
श्रोत्र वाणी चक्षू यांचे पैल नाम । आगम निगम दावीना जे ॥३॥
शद्व जो राहिला नादाते गिळोन । दासरामी गगन शून्यरूप ॥४॥

## १४६४

निजाठायी शून्य चिद्रूप सहज । दृश्यादृश्य गूज पडे गाठी ॥१॥
आत्मारामी चित्कळा जीवन प्रकाश । लक्षी का अलक्ष्य स्मरण लक्ष्ये ॥२॥
सिद्धमार्गे जाता होशील तू सिद्ध । नुरे भवबंध पहाता दिठी ॥३॥
कृष्ण विष्णू हरी माधव गोविंद । दासरामी आनंद या नामाचा ॥४॥

## १४६५

नीलबिंदूमाजी निजत्वाचे तेज । चित्कळेचे गूज त्याचे ठायी ॥१॥
चित्कळा प्रकाशे अलक्ष्य लक्षवी । लक्ष्य लक्ष्ये दावी अलक्ष्यासी ॥२॥
दृष्टि शून्यद्वारी पहाती स्वयंपुरूष । धन्य ते विशेष संतजन ॥३॥
तया देखताची नुरे जन्ममरण । दासरामी स्मरण अढळची ॥४॥

## १४६६

आत्मारामी अलक्ष्य कंचे लक्ष्या आले । पहाणे नाथिले पहाणे पे ॥१॥
सद्रूपी या जाली चैतन्य आटणी । घनानंद गगनी अघवा आत्मा ॥२॥
घन ते निःशद्व निश्चळ अद्वैत । निरहेत अव्यक्त निजत्वेची ॥३॥
चंचळे आकार गुणांचे प्रकार । दासरामी सार पहाणे झाले ॥४॥

१४६७

पहाणेची अनुभव पहाणेची अनुभव । पहाणे स्वयमेव पाहिले पां ॥१॥
पहाणे ते काय पहाणे ते काय । निजत्वाची सोय सर्वांघटीं ॥२॥
पहाता पहाणे अवघेची सरले । निजाते भेटले निजदृष्टीं ॥३॥
पहाता पहाता अनुभव मुराला । दासराम पहाला आत्मरूप ॥४॥

१४६८

पहाणी या चंचळे दृश्यादृश्य जाले । निश्चळी पावले निजरूप ॥१॥
श्रवणाचा संती केलासे नयन । तेणे गुरूखूण प्राप्त झाली ॥२॥
ज्ञानेश्वर संतराजांचे महाराज । तयांचे सहज मनी आले ॥३॥
कार्तिक वद्याची त्रयोदशी सुफळ । तोषले प्रेमळ स्वप्नामाजी ॥४॥
हनुमंतसद्‌गुरूराये कृपा केली । ज्योतीं प्रकाशली कैवल्याची ॥५॥
दिधला प्रसाद दासराम यासी । दाविला तयासी नामानंद ॥६॥

१४६९

हरिनाम मुद्रांकित । नामी धाले साधुसंत ॥१॥
झाला अवघा आनंद । आत बाहेरी गोविंद ॥२॥
होवोनिया श्रोत्र वक्त्र । जपे हरिनामाचा मंत्र ॥३॥
हरिकथा हरी गाय । दासराम वंदी पाय ॥४॥

१४७०

रामकृष्ण वासुदेव । नामी ज्यांचा दृढ भाव ॥१॥
नामी नुरे देहभान । सहजानंद समाधान ॥२॥
संती चोखाळिली वाटा । देखे अद्वय सुभटा ॥३॥
नाम जयांचे तारण । परंधाम नारायण ॥४॥
धन्य तेची संतराय । दासराम वंदी पाय ॥५॥



# चिन्मयपाठ : ५४

१४७१

चिन्मयाचे पंथी उजळले ज्ञान । करिती कृपा पूर्ण रेवणसिद्ध ॥१॥
अनादी शंकरापासोनी हे ज्ञान । विस्तारले धन्य चोहींकडे ॥२॥
देखत्यासी लाधे दातयाकडोनी । दाविती नयनीं ब्रह्मरूप ॥३॥
हनुमंत सद्‌गुरूराज या दातारे । चोजविले सारे दासरामा ॥४॥

१४७२

नीलवर्ण बिंदूमाजी आहे मोती । येईल ते हाती गुरूपुत्रा ॥१॥
तयाचे दर्शने चुके जन्ममरण । विसरेल भान देहीचे या ॥२॥
देहात विदेही जहाले बा संत । ऐसी याची मात भक्त जाणे ॥३॥
दासराम धरी तयांचे चरण । मागे कृपादान एवढेची ॥४॥

१४७३

आता न बोलूची काही । साठवू साठवू या देही ॥१॥
प्रेम देई भगवंता । हेची मागणे तुज आता ॥२॥
येवो हृदयी भरते । न हो उतार चढते ॥३॥
दासरामा वर । देई मायेचा भ्रतार ॥४॥

१४७४

माझे बोल ते सरले । अबोल हे मौनावले ॥१॥
आता काय बोलू देवा । सांगा न पडेची ठावा ॥२॥
कळले ऐसे वर्म । नामी आले सकळधर्म ॥३॥
बोबडयाचे बोल । तूची घेसी याते डोल ॥४॥
तूची करिसी कवतूक । हेची देई मज भीक ॥५॥
आणिक नको मजला काही । सकळ तृप्ती यात होई ॥६॥
तुझाची प्रसाद । वदविसी तू मतिमंद ॥७॥
किती वर्णू गूण तुझे । गोड करिसी शद्व माझे ॥८॥
बालकाचे साठी । किती श्रमतोसी जगजेठी ॥९॥
दासराम लेकरू तुझे । सर्व त्याचे तुजसी ओझे ॥१०॥

१४७५

हृदयाकाशी ऐके पंचमातृकांचा ध्वनी ।
सोळा बारा एकीकरणे करोनी मिळणी ॥१॥
हृदय हे वेद म्हणती घेई उमगोनी ।
हृदयस्थ परमात्मा देखिजे नयनी ॥२॥
जयामाजी विवर वास करी ईश्वर ।
मोहमद सोडुनी गुंगे सुमन भ्रमर ॥३॥
समचरण स्थिर जेथे विटेवरी साजिरी ।
मूर्ती दिसे महादेवाची मुळी जे गोजिरी ॥४॥
मनाचा आल्ट पालट नसेची गे माये ।
प्राणज्योती जये ठायी स्थिर सत्य होये ॥५॥
सप्तचक्रे ओलांडोनी घ्यावा अनुभव ।
करोनी संगम भाव जीव शीव यांचा ॥६॥
तेरा ओलांडोनी चौदाविया स्थानी ।
देखे मोक्षदानी सहस्त्रदळी ॥७॥
सहस्त्र पुरूष सहस्त्रपाद विराट स्वरूप ।
वेदशास्त्र वचनापरी देखिजे अपाप ॥८॥
बिंदूमाजी त्रिभुवन त्रिभुवनी बिंदू ।
बिंदू आणि सिंधू एकची लाही ॥९॥
सद्‌गुरू सांगती अकळ अनुभव ।
दासराम भाव देऊनी ऐके ॥१०॥

१४७६

तेरामाजी सोहंसूत्र । तया आत परमेश्वर ॥१॥
तेरा कमळांची माळ । देही देखावी सोज्वळ ॥२॥
तेरापैल जगजेठी । देखे हरिहर भेटी ॥३॥
जप चाल्ले रामकृष्ण । त्याचे पैल ते निर्गुण ॥४॥
संत चाखिती त्याची गोडी । दासरामा ते आवडी ॥५॥

१४७७

कमळातुनी आले देठ । आकाशाचे फाडिले पोट ॥१॥
आकाशाचे पैल गेले । आप आपणासी वाहिले ॥२॥
ठेले सकळाते व्यापोनी । आपरूपाते भेटोनी ॥३॥

आपापासुनी आधारकमळ । देठ वाढले विशाल ॥४॥
खाली कमळ वरी देठ । गगनी वाहे जीवनपाट ॥५॥
सद्गुरू म्हणती देखे नभा । दासराम पाहे शोभा ॥६॥

१४७८

गोविंदरायांचे कीर्तनी । स्वरूप वोसंडे नयनी ॥१॥
घडे त्रिवेणी संगम । नामी प्रगटे आत्माराम ॥२॥
संतप्रेमी आशिर्वाद । भक्ती उपजे अगाध ॥३॥
हनुमंतराय कृपा । दासरामा पंथ सोपा ॥४॥

१४७९

विज्ञानाचे श्वासी देखिजे स्वरूप । होवोनी तद्रूप गुरुकृपे ॥१॥
गुरू नाममंत्र श्रवणी तारक । लाधे सिद्धसुख सहजनिष्ठे ॥२॥
प्राणाचे स्वरूप मुळीच जाणोनी । आणि वेगी ध्यानी निजगूज ॥३॥
दासराम सांगे साधनाचे गुह्य । वंदोनिया पाय सद्गुरूंचे ॥४॥

१४८०

नभामाजी देखे पाणी । फिरे आधारावाचोनी ॥१॥
सूक्ष्म देही देखे कळा । जाणे भक्त तो आगळा ॥२॥
विस्ताराचे आदी बीज । ज्याचे मूळ श्याम तेज ॥३॥
रक्त श्वेत गाठी होता । श्यामरूप वसे चित्ता ॥४॥
त्याचे पैल आदी शक्ती । महद्भूताची प्रकृती ॥५॥
प्रकृतीचे पैल पुरूष । संत पावती विसाव्यास ॥६॥
दासराम तेची मागे । भक्तिभावे सानुरागे ॥७॥

१४८१

बीज तेची फळ फळ तेची बीज । वेगी ओळखी गूज माऊलीये ॥१॥
संतांचिये संगे उकले वेदांत । जेणे भगवंत तुष्ट होय ॥२॥
हरीचे नामाचे पाठाची धारणा । दावी निजखुणा स्मरणमात्रे ॥३॥
दासरामा लाधे नामी हा संतोष । प्राशी भक्तिरस हरिकीर्तनी ॥४॥

## १४८२

रंगी रंगो दे हे मन । रंग लुटती संतजन ॥१॥
धन्य महामुनी नारद । महाभक्त श्रीप्रल्हाद ॥२॥
ज्ञानेश्वर एकनाथ । तुकाराम सिद्ध संत ॥३॥
नामदेव निळोबाराय । हरिभक्ती तरणोपाय ॥४॥
भगवान रेवणसिद्ध । हनुमंत गुरू प्रसिद्ध ॥५॥
ऐसे संत लुटिती रंग । दासरामा त्यांचा संग ॥६॥

## १४८३

स्फटिकाचे परी स्वरूपाची परी । जाणती अंतरी संतजन ॥१॥
त्यांचे आशिर्वादे होईल आनंद । लागलिया छंद चरणाचा ॥२॥
धरिले अंतरी संतांचे चरण । सहज स्मरण करोनिया ॥३॥
दासराम वाहे चरणाची धूळी । लावितो कपाळी तेची नित्य ॥४॥

## १४८४

आनंदू जहाला आनंदू जहाला । बरवा भेटला संतराव ॥१॥
अनंता जन्मीचे साचले सुकृत । त्याचे फळ चित्त पायी धाले ॥२॥
आवडी लागली संतभजनाची । सुख संतोषाची भेटी झाली ॥३॥
दासरामा कृपाकर माथा दिला । म्हणोनी बोळला मायबाप ॥४॥

## १४८५

देव भुलला नामासी । खेळ शद्वाचा चौऱ्यांशी ॥१॥
गुरूपदी लाभ बरा । होय सदानंदू खरा ॥२॥
गुरू देती आपुलेपण । तनखा संतांचे वतन ॥३॥
करिती मीपणावेगळा । दावितातो देव डोळा ॥४॥
संतामाजी गौरविती । मान श्रीहरीपुढती ॥५॥
नामज्योती दावी पाय । दासरामा नामी सोय ॥६॥

१४८६

शद्धाशद्ध ग्रासी नाम । नि:शद्धही नुरवी भ्रम ॥१॥
नाम मंगल मंगल । हरिभक्तासी नवल ॥२॥
सद्गुरू हे देती पदवी । हरिप्रसाद देववी ॥३॥
दासरामा हा प्रसाद । सर्व व्यापक ब्रह्मानंद ॥४॥

१४८७

सरस्वतीचे लाल करिती कविता । परी त्यांचे हाता प्रसाद न ये ॥१॥
छंदोबद्ध अनुप्रास येणे रीति । बोल गाती गीती काव्यमय ॥२॥
येईल तैसा बोलू रामकृष्णहरी । ऐसी आहे परी संतांचिया ॥३॥
भगवंताचे लाल करिती कवित्व । देई अभंगत्व भगवंत ॥४॥
संतजन देती अभंगी प्रसाद । तोची हा आनंद हरिभक्तांचा ॥५॥
आरती परती कळेचिना स्फूर्ति । केव्हा येती जाती कोठुनी कोठे ॥६॥
दासराम देखा सद्गुरूंचा लाल । कोण बोले बोल न कळे त्याते ॥७॥

१४८८

अग्नीमाजी मेळविली रक्षा । काय झाले पुढे लक्षा ॥१॥
देखे प्रभा लखलखीत । अंधकार जेथे दडत ॥२॥
नभी वायूची घासणी । जरी होये कंठस्थानी ॥३॥
सूर्य चंद्र अग्नी । उदरामाजी होय मिळणी ॥४॥
लय होती अग्निस्थानी । हरिवाणी मिळे वन्ही ॥५॥
स्वयंसिद्ध हरिवाणी । मिळे आकाशालागोनी ॥६॥
ज्ञानाज्ञानापैल । स्वयंतेज ते निर्मळ ॥७॥
परोक्ष अपरोक्ष ज्ञान । दासरामा देही खूण ॥८॥

१४८९

स्वयं ज्योतीवरी कोळी । त्याची विस्तारली जाळी ॥१॥
तया सारोनी बाजूते । देखे निज प्रकाशाते ॥२॥
कोळी नाही गेला जरी । उपयोग नाही तरी ॥३॥
फिरकीलागी देऊनी गिरकी । ज्योत न दिसेची शेखी ॥४॥
प्राणवृत्तीचा निरास । तेथे आत्म्याचा प्रकाश ॥५॥
त्याची धग निर्जीवाते । चालवी आपुलिया सत्ते ॥६॥
दासराम त्यासी शरण । करोनिया सहज स्मरण ॥७॥

## १४९०

वासंतिक ज्ञान दावी वसंताते । परी भगवंता ते भेंटवीना ॥१॥
परमेश्वरी ज्ञान दाखवी ईश्वरा । पोचता आधारा संतसंगे ॥२॥
सहस्त्रदळीचा किरण दृष्टीसी । भिडता ते नाशी अंधवृत्ती ॥३॥
ज्योती पेटविली सद्‌गुरूरायानीं । वदविले वदनी दासरामा ॥४॥

## १४९१

सप्त समुद्राचे पैल । देखे आत्मा घन नीळ ॥१॥
नामदेवे कथिले सत्य । जगी उभारोनी हात ॥२॥
श्याम सुनीळ आटणी । तेथे अध्यात्माची खाणी ॥३॥
अमृतत्वाचे परते । देखे सद्‌गुरूचे हस्ते ॥४॥
दासरामा संतवचनी । समाधान होय मनी ॥५॥

## १४९२

देखिला कळस आजी ते नयनी । फिटली पारणी लोचनाची ॥१॥
अक्षर साठले चिन्मयाचे पाठी । तोषला धूर्जटी रेवणसिद्ध ॥२॥
निमाली इंद्रिये पूर्ण धाले मन । पावलीसे खूण प्राप्तीची गा ॥३॥
ब्रह्मविद्या सदन गुरू नारायण । दिले कृपादान भक्तालागी ॥४॥
चिन्मयाचे पाठी चिन्मयदर्शन । कैवल्यनिधान दासरामा ॥५॥

## १४९३

हनुमंतरायकृपेची उत्तरे । तेचीं ही अक्षरे चिन्मयपाठ ॥१॥
तयांचा प्रसाद विश्वाचा आनंद । सुखाचा सुखकंद आशिर्वाद ॥२॥
हनुमंतचरणी विनटले मन । अर्पितो जीवन त्यांचे त्यास ॥३॥
कैवल्याचे धामी चिन्मयाचा पाठ । दासराम अवीट छंद जडला ॥४॥

# कैवल्यपाठ : ५५

१४९४

कैवल्याचा पाठ काय बोलू देवा । सांगा जी केशवा मायबापा ॥१॥
करोनी स्मरण हनुमंतरायांचे । पाय धरिले त्यांचे प्रेमभावे ॥२॥
दोघे वर देती सुप्रसन्न वदने । त्यांचे कृपादाने उमजे पाठ ॥३॥
देवाचे शेजारी होईल आनंद । अद्वये अभेद दासरामा ॥४॥

१४९५

जागृतीमाझारी स्थूल देहाभीतरी । राजा वास करी मनोरूप ॥१॥
स्वप्नाचे माझारी सूक्ष्म देहाअंतरी । राजा वास करी वायुरूप ॥२॥
सुषुप्तीमाझारी कारण शरीरी । जीवराजा विवरी भावरूप ॥३॥
तुरीयेपाशी साचारी महाकारणांतरी । शिवराजा सत्वरी देखे डोळा ॥४॥
सोहंराव त्याचे पैल महाराणा । दावी आतमखुणा दासरामा ॥५॥

१४९६

प्रणवामाजो अहंध्वनी । प्राणरूप देखे नयनी ॥१॥
लिंगदेह ओळखी प्राण । जो का अंगुष्ठ प्रमाण ॥२॥
ओळखितो जो प्राणासी । तोचि आवडे देवासी ॥३॥
जीवभाव रामकृष्ण । शिवाचे जे अनुसंधान ॥४॥
त्याचे विवरी प्राण देखे । आत्मरूप परते निके ॥५॥
रामजप शिवाचा प्राण । पाहे सद्‌गुरूंचे ज्ञान ॥६॥
दासराम सांगे खूण । गुरुभक्तांचे निजधन ॥७॥

१४९७

रामबाणे तीन पुरे उडविली । मोक्षमार्गा आली आड जी का ॥१॥
काय सांगू आता संतांची हे थोरी । त्रिगुण निर्धारी भस्म केले ॥२॥
ज्यावरी अनादी शंकर प्रसन्न । धन्य संतजन तीही लोकी ॥३॥
अंधाराचे पैल दाटला प्रकाश । जेथे अवकाश नाही उरले ॥४॥
कैवल्याचा पाठ गुरूकृपाबळे । दासरामा आकळे संतसंगे ॥५॥

१४९८

प्रणवाचे पोटी प्रकाशिले तेज । मूळशक्ती बीज जीवनकळा ॥१॥
उदो शद्वापासोनी उदेला प्रणव । उदय अपूर्व त्याचेपैल ॥२॥
नि:शद्व परमात्मा माया पोकळीमा । ग्रासी सम-विषमा आदी शून्य ॥३॥
तेची मूळ प्रकृती चराचरा कारण । त्याचे पैल पूर्ण ब्रह्म देख ॥४॥
महाशद्व तेथे उदेला प्रणव । तेथोनी अपूर्व सृष्टिरचना ॥५॥
शून्यापासोनिया अवघे शून्य झाले । शून्ये उडविले शून्यालागी ॥६॥
आकाशात आत्मा दावी तो प्रणव । ग्रासोनी अपूर्व शद्वजाळ ॥७॥
तेज ते अबोल संतांनी देखिले । दासरामा केले मौनरूप ॥८॥

१४९९

लो लो ऐसा मूळ शद्व । आत्मरूपाचा अगाध ॥१॥
शून्यामाजी उदो शद्व । कैचा घुमतसे नाद ॥२॥
मन पवन जीव शिव । पैल ब्रह्मांडी अनुभव ॥३॥
ऐके लो लो ध्वनी साचा । नाद होय घण् घण् कैचा ॥४॥
नाद घुमतसे मंजुळ । त्याचेपरता घननीळ ॥५॥
घंटानाद मेघनाद । जेथे घुमतसे प्रसिद्ध ॥६॥
त्याचे परौता नि:शद्व । संत सेविती आनंद ॥७॥
दासराम पदी लीन । आनंदाचा तोची क्षण ॥८॥

१५००

स्थूल देही प्रत्यय बावन्न अक्षरे । तेथे अविचारे जडुनी जाता ॥१॥
विचारेची सोहंशब्दामाजी येई । बा रे सूक्ष्म देही प्रवेशोनी ॥२॥
स्यामागुता आई ऐसा ऐके ध्वनी । प्रेमेसी जावोनी कारणदेही ॥३॥
देव आणि भक्त ऐशा स्थिती राहे । सर्व भार पाही देवापायी ॥४॥
महाकारण देही ऐकिजे प्रणव । त्रिशून्या अपूर्व ग्रासोनिया ॥५॥
तेथे कैचा ताल वाजतो ते पाहे । त्याचे पैल लाहे निजवस्तू ॥६॥
तया तालावरी खेळे कोल्हाटीण । मायेचे अवसान त्याचेवरी ॥७॥
सोहंसोहं ढोल वाजे तया ठेक्यावरी । सकार हकार तुरे नाद ब्रह्मगजरी ॥८॥
सद्‌गुरू दाविती दासरामा कळा । धन्य तो सोहळा अनुपम ॥९॥

## १५०१

रूणझुणु रूणुझुणु ऐसा ऐके ध्वनी । नाभि कमलस्थानी येवोनिया ॥१॥
भगवंताचे पदीचे वाजती घुंगूर । जेथे सप्त स्वर ओढवती ॥२॥
धडल् धडल् धडल् धडल् हृदयमंदिरी । परियेसी अंतरी महाध्वनी ॥३॥
पड्घुम् पड्घुम ऐसा ध्वनी परीयेसी कानी ।
हरी माझा रंगुनी गेला अखंड कीर्तनी ॥४॥
भगवंताचा प्रसाद मिळे शीर्षस्थानी । ऐके मेघध्वनी गडगडाट ॥५॥
अवघेचि ध्वनी उसळले अंबरी । विद्युल्लता भारी चमकती ॥६॥
नरदेही ठेविली मुक्तीची बा कळा । जाणे तो आगळा संतराव ॥७॥
हनुमंत सद्गुरू बोधिती माते । लाधले ते पाय दासरामा ॥८॥

## १५०२

स्थूलदेहा-भीतरी ऐके चार ठेके । जेथे तुझे निके अज्ञान गा ॥१॥
सूक्ष्म देहाभीतरी वाजतो त्रिताल । स्वरामाजी मेळ साधियेला ॥२॥
कारणाचे देही वाजतसे टाळी । प्रसन्न वनमाळी पांडुरंग ॥३॥
ऐके दोन ठोके सुषुप्तीचे स्थानी । जागृत राहोनी जाणीवेने ॥४॥
महाकारणदेही अखंड स्मरण । अद्वय भजन हरिकथा ॥५॥
ऐके एक ठेका एकत्वभजनी । आता गावे कोणी कोणालागी ॥६॥
परिसावे कोणी हेही बा कळेना । नेणीवेची खूणा ऐसी असे ॥७॥
कान झाला डोळा देखणे उरले । चरण धरिले दासरामे ॥८॥

## १५०३

महाकारणाचे पैल ते जावोनी । देखिली संतांनी मौज देही ॥१॥
बिंदुमाजी देखिले निजरूप आपुले । ज्यात साठविले त्रिभुवन ॥२॥
देखे स्वयंज्योती जाण नेण सारूनी । अलक्ष्याचे स्थानी लावी लक्ष्य ॥३॥
अक्षर केवळ अबोलाचा ध्वनी । ताल हा ग्रासोनी जाय वेगी ॥४॥
चौशून्यापरते स्वयंसिद्ध रूप । तेथे मौनरूप संतजन ॥५॥
जयाते लक्षिता लक्ष्यत्व उरेना । दासरामा खुणा बोधियेली ॥६॥

## १५०४

निश्चळ ते ब्रह्म चंचळ ते माया । बोधिती मना या संत साधू ॥१॥
निश्चळ ते घन चंचळ पोकळ । जया अंतराळ बोलिताती ॥२॥
निश्चळ निःशब्द चंचळ तो शब्द । दासराम स्तब्ध होता कळे ॥३॥

१५०५

वायूने धावती शद्ब या शरीरी । देखिजे अंतरी संवेदना ॥१।
वऱ्ही आणि जीवन मेळणी तो प्राण । प्रणव तो पूर्ण भीमरूप ॥२॥
नाद आणि प्रकाश अमृताची कळा । पाहिजे जिव्हाळा प्रणवापोटी ॥३॥
सकार हकार गिळे जरी प्रणव । तरी होय देव तोची स्वये ॥४॥
जेथोनिया देव जन्मा आले तीन । सत्ता ज्यांची पूर्ण त्रिगुणावरी ॥५॥
ऐसा हा प्रणव सर्वाआदी मूळ । जेथे ब्रह्मगोळ उदया आला ॥६॥
दासराम झाला सद्‌गुरूसी शरण । म्हणोनी हे खूण कळो आली ॥७॥

१५०६

मूळ ब्रह्मरूपी निघाला हुंकार । तेथें झाली थोर मूळमाया ॥१॥
चंचळता झाली वायुरूप माया । तेथे आला उदया प्रणव गा ॥२॥
शद्बाचिया पोटी जहाली त्रिपुटी । हरी हा संतुष्टी राहिलासे ॥३॥
शद्ब हा असोनी नसोनि सारिखा । देखणेचे देखा दृश्य झाले ॥४॥
दृश्य हे देखणे परते काही नेणे । मुळीच पहाणे ब्रह्मरूप ॥५॥
ब्रह्म ते अरूप माया मिथ्या विकल्प । मूळ निर्विकल्प रूप तुझे ॥६॥
मुळी नाही माया बोल शद्ब केवळ । अबोलाचा बोल नवल दावी ॥७॥
बोल्ले सारी बोल होईजे अबोल । उकलोनी खोळ चौशून्याची ॥८॥
शून्याते ग्रासाया नामी राहे उभी । दासराम वेगी स्वस्थ झाला ॥९॥

१५०७

जाणी जो काळ अक्षर । सुफळ तयाचा संसार ॥१॥
दोन शून्यांची उत्पत्ती । झाली जेथोनीं प्रकृती ॥२॥
अबोलाचा बोल पहा । चारी वाचेपैल तो हा ॥३॥
चंचळाचे वरी निश्चळ । जेथे वसे बिंदु सुनीळ ॥४॥
जेथे उरली तटस्थता । पैल खंब्रह्माचे हाता ॥५॥
नामरूप एक जेथे । बोलावया काही न उरते ॥६॥
नामी उदेले अनाम । विषमता केवळ भ्रम ॥७॥
दासराम शरण तेथे । बोल बोलियेला सत्ते ॥८॥

## १५०८

खऱ्यापासुनी खोटे निघे । ऐके सिद्धांत हा उगे ॥१॥
झाला चंचळाचा भास । म्हणुनी आहे तया नाश ॥२॥
झोत वाहीला वायूचा । तोची कारण सर्वांचा ॥३॥
मनपवनाची लाही । तेथे आत्मरूप लाही ॥४॥
सदानंद चित्स्वरूप । स्मरण जे निर्विकल्प ॥५॥
तेथे घडले सकळ कर्म । दासरामा तोची धर्म ॥६॥

## १५०९

नाही संभव अज्ञानाचा । अस्तितवाचा अभावाचा ॥१॥
घडणे येणे जाणे नाही । दृश्य शद्बरूप पाही ॥२॥
शद्बापासोनी उद्भब । तेथे शद्बाचा अनुभव ॥३॥
बोल चौदेही उठतो । त्याचे पैल तो साक्षी तो ॥४॥
आले आणि गेले । संभ्भवरहित जहाले ॥५॥
संसरण हाची बोल । मुळी पहाता विश्वनीळ ॥६॥
ब्रह्म सर्वत्र संचले । आगम निगम त्या न बोले ॥७॥
दासरामा ऐसे गूढ । येर सर्व होती मूढ ॥८॥

## १५१०

स्मरणातुनी उठला बोल । स्मरणस्वरूप ते विमल ॥१॥
म्हणुनी नामी प्रगटे देव । स्वरूपाची मुळी ठेव ॥२॥
आठवात साठवी हरी । हृदयमंदिरी अंतरी ॥३॥
स्मरण सहजी स्मरणा आले । अनुभवे जे संचले ॥४॥
स्मरण कर्म स्मरण धर्म । दासरामाचे ते वर्म ॥५॥

## १५११

स्मरणी निघाला उच्चार । तेथे ध्वनी उठला घोर ॥१॥
जेथे उदेला हकार । प्रणव तोची गा ॐकार ॥२॥
काय देवाजीची लीळा । दावी स्वस्वरूपाची कळा ॥३॥
पातालात तारस्वरूप । स्वर्गामाजी मंद्ररूप ॥४॥
ऐसा नटला ॐकार । कैसा भगवंत चतुर ॥५॥
दासरामा घडला बोध । म्हणुनी कळले हे हृद्‌गद ॥६॥

१५१२

कोठवरी आहे स्मरणाची मजल । परब्रह्म सोज्वळ जेथे आहे ॥१॥
शद्धाशद्धपैल स्मरण केवळ । निर्विकल्प मूळरूप जेथे ॥२॥
सिद्ध सनकादिका लाविलीसे गोडी । हरिभक्ता परवडी साधनाची ॥३॥
अखंड स्मरण चळेना ढळेना । दासरामा खुणा बोधिती श्रीगुरू ॥४॥

१५१३

भागा येता मन होतसे उन्मन । अखंड कीर्तन चाले देही ॥१॥
रामकृष्णहरी चालीले कीर्तन । बोले भगवान नित्य नवे ॥२॥
होय नटनाच तेजस्वरूपाचा । विसर देहाचा पडे जेथे ॥३॥
निमाली इंद्रिये ऐकोनिया शद्ध । असे जो अभेद अविनाश ॥४॥
चिदानंद प्राण मूळशक्ती जाण । यांचे जेथे मीलन प्रणव तो ॥५॥
त्याचे आत देखे आत्मा तो विठ्ठल । रूक्मिणी तेजाळ आदिशक्ती ॥६॥
मृदंगाचा नादघोष होय कर्णी । एक ताल घुमुनी जाय वेगी ॥७॥
आपणा आपण देव करी साथ । जेथे सिद्ध संत जमती भारी ॥८॥
चाले ठेका मंद त्याचा जडला छंद । जेथे ब्रह्मानंद रंगतसे ॥९॥
इंद्रियांच्या वृत्ती होताती विलीन । प्रसादू ते ज्ञान देई स्वये ॥१०॥
प्रसाद उच्छिष्ट घेता भरे पोट । तृप्ती घेता घोट अमृताचा ॥११॥
नाम आणि देव एकरूप देखे । भोगी राज्य सुखे आत्मयाचे ॥१२॥
दासराम म्हणे काय सांगू आता । देखावी हरिकथा ऐसी देही ॥१३॥

१५१४

प्रणवाचे पोटी देखिजें सुनीळ । सुगंध परिमळ पुष्पाविणे ॥१॥
पुष्प नसताचि गुंफियेला तुरा । वाहिला हरिहरा संतांनी या ॥२॥
स्वयंसिद्ध ज्योती तेज निरंजन । प्रसाद हा पूर्ण विज्ञानाचा ॥३॥
आधाराचेविण बांधिले देऊळ । पाया तो सबळ वरी ज्याचा ॥४॥
खाली तो कळस ज्यात वाहे सुरस । ऐशा स्थानी जगदीश नांदतसे ॥५॥
धो धो धो धो नौबदी वाजतो चौघडा । वाजतसे पुढा महाद्वारी ॥६॥
घण घण घंटानाद होतसे अंबरी । मेघनाद भारी होय तेथे ॥७॥
आत्मयाचे घर बिंदुल्याएवढे । तेथे काय घडे देखा आता ॥८॥
प्रकाश स्वरूपी देऊळामाझारी । उंबरठ्याचे अंतरी सुवास गा ॥९॥
दिव्य तेजोमय आत्मराव जाणी । दृश्य ते रूक्मिणी माता सत्य ॥१०॥
दासरामा नाद आत्मयाचा छंद । जेथे हा गोविंद तुष्टी पावे ॥११॥

## १५१५

नादामाजी ध्वनी । दृष्टिमाजी पहाणी । श्रवण ते कर्णी प्रणव गा ॥१॥
प्रणवस्वरूप देखे चराचरी । त्याचे पैल श्रीहरी परमात्मा ॥२॥
वाच्यांश हा सरे प्रणवामाझारी । अनुभव भीतरी घ्यावा याचा ॥३॥
गुणांचा हा स्वामी निर्गुणाचे धामी । घेतसे आरामी अखंडित ॥४॥
वाच्यांश लक्ष्यांश सांडिताची करणी । आत्माची नयनी भरे अवघा ॥५॥
बाहेरी अंतरी स्वरूप केवळ । जेथे नुरे ताल नाद काही ॥६॥
पूर्ण ब्रह्म ज्योती नाही दिनराती । शिंपेवीण मोती देखे बरवे ॥७॥
दासराम लीन सद्‌गुरूपदासी । मागे अहर्निशी हेची दान ॥८॥

## १५१६

प्रणवची कारण मनो अधिष्ठान । तयावरी मन व्यवहारी ॥१॥
सुषुप्तीमाझारी मन हे निर्धारी । हृदय – विवरी जाय वेगी ॥२॥
हृदयामाझारी प्रणवाची वसती । प्राणापान-गती तेथोनिया ॥३॥
बीजभूत तेथे प्रणवाचे विवर । तयाचा विस्तार प्राणापान ॥४॥
पंचप्राण झाले प्रणवापासोनी । अगाध हे करणी जीवनाची ॥५॥
प्रणवात नाम रामकृष्णहरी । तयाचे भीतरी ब्रह्मरूप ॥६॥
सकार हकार पैल जो प्रणव । आदी शक्ती भाव तेजोरूप ॥७॥
तयामाजी देखे आनंदाचा कंदू । धन्य कृपासिंधू आत्माराम ॥८॥
साधुसंत धाले तया स्वरूपासी । दासराम पदासी विनटला ॥९॥

## १५१७

प्रणवाचे स्थानी ऐकिजे त्रिताल । नादब्रह्म कल्लोळ उसळले ॥१॥
प्रणव पंढरी आत्म–विठ्ठलाची । केवलता त्याची तेची द्वार ॥२॥
चार देहामाजी नटला ॐकार । शून्य ते साचार त्याचे रूप ॥३॥
शून्यामाजी गर्जे अनुहत ढोल । तया शून्यापैल हरी आत्मा ॥४॥
ध्वनी शून्य तेज जीवनाची मिळणी । प्रणवाची खाणी शक्ती ब्रह्म ॥५॥
आकाशाचे परते देखे आत्मरूप । अनाम अरूप निर्विकल्प ॥६॥
प्रणवदर्शन तेथे नुरे भाव । संदेह–निरसन उन्मनता ॥७॥
एक आणि दोन त्याचे मध्ये शून्य । ग्रासोनिया दोन एक करी ॥८॥
सद्‌गुरू बोधिती दासरामा नवल । अकळाची कळ देहामाजी ॥९॥

१५१८

अनुहत ध्वनी नामाविण असुनी । नव्हे ते करणी स्वहिताची ॥१॥
येर देही नाही रामनाम कळा । असोनी जिव्हाळा अनुहताचा ॥२॥
म्हणोनिया नाही तयालागी मुक्ती । तेथे ज्ञानास्थिती ठेविली नाही ॥३॥
विज्ञानाची कळा नरदेही थोर । म्हणवोनी द्वार मोक्षाचे ॥४॥
संतजनी महिमा गाईलासे याचा । दासराम त्यांचा सेवक जहाला ॥५॥

१५१९

शद्वाचा निरास आकाशाचा ग्रास । तेथेची ब्रह्मास मिळणी झाली ॥१॥
अनिर्वाच्य ब्रह्म अनिर्वाच्य ब्रह्म । सम आणि विषम नाही जेथे ॥२॥
म्हणोनिया नाम परियेसी वेगी । राहोनिया उगी स्वस्थचित्त ॥३॥
सद्‌गुरूमुखाने करावा विचार । देव विश्वंभर भेटी येई ॥४॥
नामामाजी रामनामाचा महिमा । पावले विश्रामा संतजन ॥५॥
दासराम झाला तयांचा किंकर । गुरुराव थोर पाठिराखा ॥६॥

१५२०

रामनाम डंका गाजे तिही लोकी । गुरूपुत्र विलोकी नरदेही ॥१॥
हनुमान देव कृपेची माऊली । करिते साऊली रामभक्ता ॥२॥
रामराये केले चिरंजीव तया । प्राण तो सखया श्रीरामाचा ॥३॥
रामरूप दिसे हनुमान देव । नाही दुजा भाव रामभक्ता ॥४॥
भक्त संरक्षणा राहिला भूतली । हरीकथेकाळी नाचतसे ॥५॥
रामायण जेथे होय पारायण । तेथे अधिष्ठान मारुतीचे ॥६॥
दासराम तया भक्तांचा किंकर । दिला कृपाकर प्रेमे माथा ॥७॥

१५२१

दोन तारे स्थूलामाजी चमकती । तेथे मिळे गती चत्वारीची ॥१॥
अंतर्मुख होई तेथोनी अंतरी । जाईजे वैखरीपासोनिया ॥२॥
परेचे अंतरी भोगिजे आनंद । मेळसी निगंध आकाशासी ॥३॥
दासरामा कथिले राजयोगसार । सद्‌गुरूदातार दाविती मात ॥४॥

## १५२२

रामनाम कैवल्यपाठ तो ऐकोनी । तोषलें ते मनी रामचंद्र ॥१॥
संत सद्गुरूंच्या प्राणाचा जो प्राण । केले कृपादान भक्तालागी ॥२॥
कोड पुरवोनी केले कवतुक । घातलोसे भीक भक्तिभाव ॥३॥
संतांचे सरदार गुरू नारायण । भाक दिली पूर्ण रामचंद्रा ॥४॥
तयांचे कृपेने बोळे कृपाघन । दासराम चिंतन करी त्याचे ॥५॥

## १५२३

प्राण खेळे प्रणवातोनी । जीवनतत्व बोलती वाणी ॥१॥
जीवाभास ज्यात होय । प्रवृत्तीने चुकला सोय ॥२॥
तेजामुळे जीवन राहे । प्रतिबिंब बिंबे पाहे ॥३॥
वायूमुळे राहे तेज । तेची प्रणवाचे गूज ॥४॥
सर्वा शून्यची कारण । म्हणुनी जींव तोही शून्य ॥५॥
शून्याभास शून्याकार । पाहे पाहे प्रत्यंतर ॥६॥
शून्ये शून्याते ग्रासावे । त्याचे पैल ब्रह्म पावे ॥७॥
दासराम छंद चित्ती । याचे कारण निवृत्ती ॥८॥

## १५२४

धन्य ते कैवल्य । जेथे उरेना चांचल्य ॥१॥
निजधर्म हा चोखडा । नाम गाये जिव्हे मूढा ॥२॥
कर्म उपासना ज्ञान । कृष्ण विष्णू नारायण ॥३॥
दासराम नामब्रह्मी । धाला संतसमागमी ॥४॥

## १५२५

तुमचे हे बोल अमृताचे साठे । पाय ते गोमटे तुझे देवा ॥१॥
यात सर्व सुख लाधले बरवे । येथें ओवाळावे मोक्षसुख ॥२॥
आधार संतांचा बोल बोले वाचा । हाची कैवल्याचा पाठ बरवा ॥३॥
तुम्ही वदविले माझिये वैखरी । सर्वांची वैखरी तुमची ते ॥४॥
दासराम तुम्हा आला शरणागत । त्याचे आता हित करा स्वामी ॥५॥

## १५२६

सोळा बारा मिळणी विश्रांती सुखास । गाईले सुरस कैवल्य ते ॥१॥
कैवल्याचा पाठ भेटवी देवासी । परियेसी मानसी निश्चयेसी ॥२॥
प्रभु रामराय रेवणसिद्ध माय । बोळली गुरूमाय हनुमंत ॥३॥
तयांचे कृपेने संतांचे प्रसादे । बोल आले छंदे आशिर्वादे ॥४॥
नारायणराव सद्‌गुरू समर्थ । बोलविला सिद्धांत कैवल्याचा ॥५॥
कैवल्याचा पाठ चिन्मयाचे स्थानी । परीयेसी कानी गुरूपुत्रा ॥६॥
हनुमंतराय – कृपेची अक्षरे । दासराम सत्वरे अर्पी त्यासी ॥७॥

## १५२७

योगिराव स्वप्नामाजी प्रगटला । भक्तावरी बोळला पूर्णपणे ॥१॥
हनुमंत सद्‌गुरूरायांचे वचन । आलेती म्हणोन स्वप्नामाजी ॥२॥
माझिये कपाळी विभूती लाविली । पूर्ण खूण दिली योगियाने ॥३॥
आता ते राहिली करणीची कळा । सिद्ध तो तोषला कृपावंत ॥४॥
कैवल्यपाठाचे केले कवतूक । घातलीसे भीक आनंदाची ॥५॥
भव्य तेजोमयी कैची सिद्ध मूर्ती । दासराम चित्ती प्रसन्न झाला ॥६॥



# श्रीनामदीपसार पाठ : ५६

१५२८

नामी समाधान । आनंद तो भगवान ॥१॥
तेथे जडुनी झालो भक्त । आम्ही गुरूचे मुद्रांकित ॥२॥
बालभक्त लेकुरे आम्ही । नामप्रेमी सर्वदा ॥३॥
दासरामा हरिकीर्तन । नारायण गोविंद ॥४॥

१५२९

सुमनोद्दीपक हरी माझा । असे राजा वृत्तींचा ॥१॥
हरिभक्तांचे हृदयी । ठाव होई कीर्तनी ॥२॥
हृदयी बैसुनी करीन सेवा । महादेवा आवडे जे ॥३॥
निराभासी दृष्टी होय । पूर्ण सोय भक्तीची ॥४॥
आम्ही हरिनामप्रेमी । दासरामी पदवी हे ॥५॥

१५३०

हरिनामप्रेमी हे आम्हा भूषण । किंकर हे धन्य राघोबाचे ॥१॥
देवाचे म्हणवू गाजवूनी कीर्ती । करू हरीभक्ती गुरूआज्ञे ॥२॥
गुरूवचन ते अखंड साधन । पूर्ण समाधान भजनी पावे ॥३॥
दासरामा सुख सभाग्य ते नामी । गीत गाता धामी राघोबाचे ॥४॥

१५३१

हरिकीर्तन पदस्थ । करी आम्हा सद्‌गुरूनाथ ॥१॥
आम्ही दासांचे किंकर । बडिवार तिही लोका ॥२॥
रामनाम आमुचे हाता । संती संथा दिली हो ॥३॥
दासराम कीर्ती घोकी । राघवमुखी हास्य ते ॥४॥

## १५३२

जो जो उठे बोल । ते ते सखोल हरिवाणी ॥१॥
अध्यात्माचे गुह्य सार । उच्चार हा नामाचा ॥२॥
धन्य धन्य सद्‌गुरूमुख । देई सुख आगळे ॥३॥
दासरामा राम । वर्म सुगम सर्वदा ॥४॥

## १५३३

गीती गाता बोल । आला डोल आकाशी ॥१॥
हे तो अनुभवाची गोष्टी । संतभेटी कळेल ॥२॥
एक दोन तीन चार । ऐसा प्रकार शब्दांचा ॥३॥
दासराम म्हणे । समाधान पावे खुणे ॥४॥

## १५३४

तुझे अंतरीचे करी तू दयाळा । देखोनी जिव्हाळा कृपाळू बा ॥१॥
भक्ती भाव मज कळेचिना काही । काय कळत नाही हेही न कळे ॥२॥
तुझा कारभार तुझा हा व्यवहार । तुझा हा संसार तुज लाभो ॥३॥
आमुचे अज्ञान आम्हापाशी असो । मीपण हे पुसो दोनीपैल ॥४॥
अज्ञान व ज्ञान विज्ञानही नुरे । सर्व भाव दूरे ऐसे असो ॥५॥
भावविरहीत अभावाचा हेत । निरहंभाव चित्त शून्यापैल ॥६॥
सकळ हे ज्ञान होय जेथे गौण । ऐसे ते अज्ञान असो माझे ॥७॥
दासराम ऐसा पतित स्वरूपी । नसे पुण्यपापी कदाकाळी ॥८॥

## १५३५

कासयाचे व्हावे ब्रह्म । स्वतःसिद्ध जे उत्तम ॥१॥
दूर होता वृत्तिभ्रम । कोठे रूप कोठे नाम ॥२॥
प्रपंच हा नारायण । डोळा देखती संतजन ॥३॥
दासराम निर्विकार । वाहे भक्तिप्रेमधार ॥४॥

## १५३६

सद्रूप हे पिंडी । देखे ब्रह्मांडी चिद्रूप ॥१॥
आनंद तो दोनी पैल । भक्ती ओल नामाची ॥२॥
नामनिष्ठ नामप्रेमी । तया नामी विसावा ॥३॥
अधिकार त्या कीर्तनी । शिरोमणी भक्तांचा ॥४॥
गुरूआज्ञा हरिप्रसाद । भोगी आनंद स्वरूपाचा ॥५॥
दासरामा गोडी । आवडी ते संतांची ॥६॥

## १५३७

नाम देव नाम देव । नामाठायी उपजे भाव ॥१॥
दृढ भावे स्वरूप गाठी । देखे दिठी अवकाशी ॥२॥
नवल तेजाचा बंबाळा । जेथे नुरल्या तीन कळा ॥३॥
नुरूनी उरल्या नेणीवरूपे । ग्रासिले त्या सोहंरूपे ॥४॥
हंसगतिवरी सद्‌गुरू । अधिष्ठित हा दातारू ॥५॥
त्याचे हृदयी परमात्मा । वर्णवेना जो निगमा ॥६॥
दासराम तेथे धाला । नामी सिद्धेश्वरू भरला ॥७॥

## १५३८

नामी उरेना त्रिपुटी । विश्वभाव जगजेठी ॥१॥
गंगा मिळाली सागरा । नित्य मिळे धरूनी धारा ॥२॥
साराचेही सार बीज । संती नाम ते सहज ॥३॥
नामाकार होऊनी ठेला । नुरे दृश्यादृश्य त्याला ॥४॥
दासराम लीन तेथे । कृपा केली हनुमंते ॥५॥

## १५३९

नामी जहाला कल्लोळ । कर्णी नाद ब्रह्मघोळ ॥१॥
सूर्यचंद्र दचकले । अमृतजीवन थबकले ॥२॥
शून्यामाजी पांच नुरले । ब्रह्मरूपी भक्त मेळे ॥३॥
दासरामा ते ते सार । सद्‌गुरूनाथांचा प्रकार ॥४॥

## १५४०

पृथ्वी जहाली दुभंग । खेळे जीवनाचा ओघ ॥१॥
पृथ्वी कालविली जेथे । आप चढे गगनपंथे ॥२॥
तेजामाजी आप आटले । तेज वायूने उजळे ॥३॥
तेज लोपले वायूत । वायु आकाशी घुमघुमत ॥४॥
तयापैल सर्वब्रह्म । मौनावला दासराम ॥५॥

## १५४१

नाम नामासरिसे देखे । नाम नामासरिसे ऐके ।
नामासरिसे घोके । नाम वाचे आगळे ॥१॥
चार वाणी ते सांडोनी । सगुण निर्गुण ओलांडुनी ।
शून्याते दवडोनी । शबल निर्मळ विसरावे ॥२॥
ऐसे गुरूखुणेचे वर्म । हातोहाती लाभ ब्रह्म ।
सर्वार्पण कर्म । शब्द ब्रह्मी निराळा ॥३॥
सर्वाठायी गति नाद । भेदाभेदापैल सिद्ध ।
स्वरूपी आनंद । दासराम बोलेना ॥४॥

## १५४२

संकल्प हे प्रणव नामी । उठती आगम निगमी ॥१॥
तयाआतु पुरूषोत्तमी । गगनापैल नामग्रामी ॥२॥
तेथे साक्षात्कार सिद्धी । भक्तराव पूर्णानंदी ॥३॥
खंब्रह्मी हे ठसले नाम । दासरामा नामब्रह्म ॥४॥

## १५४३

आपणची भेडसावी । आपणची वेड लावी ॥१॥
कळली कळली तुझी माया । गुंतविली का हे काया ॥२॥
अरे अरे गा मद्रूपा । चिदानंद सत्स्वरूपा ॥३॥
अहंकार भेद लावी । त्यासी यमदंड दावी ॥४॥
माते ठाव तुझे पायी । लटपट करूनी कायी ॥५॥
दासराम वेडावला । नामरंगी सुखावला ॥६॥

## १५४४

वस्तूपाशी ते देखणे । मुळी आहे आहेपणे ॥१॥
विज्ञानी वो झाले शून्य । पुढे अन्य काळोख ॥२॥
अदृश्यात शून्य झाले । तेथे उदेले अक्षर ॥३॥
ललकारी तो गा ॐकार । महाद्वार विठूचे ॥४॥
उन्मनीचे जाता आत । अक्षर साक्षात्कार होत ॥५॥
दासरामा गुजगोष्टी । स्वरूपी राहिना त्रिपुटी ॥६॥

## १५४५

सुवर्णाचे माजी दिन हा बुडाला । व्योमाकार झाला ब्रह्मांडासी ॥१॥
चुरा तो आकाशी भरोनी राहिला । त्यात झळकला आत्मगाभा ॥२॥
स्वरूप सुंदर सावळे सुकुमार । धनुर्धारी अंबर हाती ज्याचे ॥३॥
मूर्तिमंत शोभा सुनील ज्या प्रभा । नटविले नभा बहुरंगी ॥४॥
दासराम हृदयी साठवी चरण । मागतो हे दान कल्याणाचे ॥५॥

## १५४६

दिन बुडाला रातीत । रात बुडाली दिनात ॥१॥
ऐसे नित्य चाले देही । परी आजी घडले कायी ॥२॥
रात झाली अंगे दिन । दिन तो हा गतिमान ॥३॥
गती जहालीसे दिक्-रूप । दिशा नुरवी निर्विकल्प ॥४॥
तेथे सांग सुर्वणदिन । महाद्वारी एक क्षण ॥५॥
दासराम लोळे तेथे । मात बोलिली हनुमंते ॥६॥

## १५४७

केला भक्ताचा गौरव । असा माझा पंढरीराव ॥१॥
सकळ संतजन । ज्याचे वर्णिती बहुगुण ॥२॥
कृपेचे हे बोल । ऐकुनी त्याते आत्मडोल ॥३॥
दासराम लीन । आशिर्वाद मौन खूण ॥४॥

## १५४८

डोळियाचा देखे डोळा । ऐसा गुरूपुत्र विरळा ॥१॥
देखे डोळियाचे मूळ । धन्य धन्य त्याचे कुळ ॥२॥
देखे डोळियात पुरूष । स्वये देव तो प्रत्यक्ष ॥३॥
दासराम शरण । धन्य सद्‌गुरूनिधान ॥४॥

## १५४९

गगनापासूनी वाहे झरा । ओघ सैरा विमल बरा ॥१॥
तेथे झळके निज तेज । ऐसे साधनाचे गूज ॥२॥
गोडीचीही सरली गोडी । दिली दडी लज्जेनें ॥३॥
दासराम म्हणे । संतखुणे शोधा रे ॥४॥

## १५५०

भगवन्नामी सर्व ज्ञान । ब्रह्मज्ञान काय पुढे ॥१॥
धन्य धन्य ते वैष्णव । नामनिष्ठ नामी भाव ॥२॥
तया स्वानंदाचे लेणे । भूषणे ती संतोषी ॥३॥
नामी परब्रह्म । संत परम सेविती ॥४॥
हरिभक्त हरिकीर्तनी । मुक्त वाणी गाती त्या ॥५॥
दासराम सेवक त्यांचा । झाला फुकाचा पायीक ॥६॥

## १५५१

नाम नवल प्रकाशू । दावी भक्ता भासाभासू ॥१॥
नाम साठले अक्षरी । अक्षर प्रणवाचे भीतरी ॥२॥
नाम गहन निःशद्व । ग्रासी जे का शद्वाशद्व ॥३॥
धन्य शून्यामाजी नाम । तयाआतु पुरूषोत्तम ॥४॥
क्षरामाजी शद्वोच्चार । तयामाजी ते अक्षर ॥५॥
नाम उद्धरी तिही लोका । दासराम पावे सुखा ॥६॥

## १५५२

रामकृष्णहरी मार्ग हा बरवा । धरोनी सद्भावा जावे नीट ॥१॥
नामदीप कैंचा तेवतो अखंड । प्रकाश तो वाड गगनाहोनी ॥२॥
भक्त जे भेटती जीवनमुक्त होती । उजळती ज्योती हृदयी त्यांच्या ॥३॥
नाम हा जीवनप्रकाशाचा झरा । प्राशिता संसारा नाही येणे ॥४॥
आत्मरूपी संती भक्त निरंजनी । धन्य त्रिभुवनी कीर्तीमान ॥५॥
दासरामी नाम नामी दासराम । जहाले परम नवल देही ॥६॥

## १५५३

श्रीराम जयराम जय जय राम । बरवा उत्तम पाठ हा ॥१॥
ब्रह्मानंदी नामछंदे । व्हावे अभेदे परिपूर्ण ॥२॥
शून्यामाजी शून्य मिळवी । तरी पदवी शून्याची ॥३॥
दासराम अबोलोनी । सेवा करी स्वस्थपणी ॥४॥

## १५५४

रामभक्त हनुमंत । धन्य संत तिही लोकी ॥१॥
त्यांचे शिष्य ते गोविंद । निजपद पावती ॥२॥
तयापोटी जन्म माझा । झालो तुझा अंकित ॥३॥
कीर्तनाची परंपरा । आली घरा दासरामी ॥४॥

## १५५५

हस्तकी या अमृतकळा । वाहे खळाळा तो झरा ॥१॥
कंठावरी अनुभव गोठी । संत दृष्टी न्याहळिती ॥२॥
देह धारणा ज्यावरी । दशमद्वारी अमृतपान ॥३॥
दासरामा नामी रस । वाहे सुरस अवीट ॥४॥

## १५५६

नावरे रसना मागुनी राहीना । तहानुली जीवना जीवेविण ॥१॥
ऐसी जया स्थिती धन्य ते गुरुभक्त । जयांचा अंकित स्वामीराजा ॥२॥
वाचेविण तहान पाण्यावाचुनी जीवन । साठवी आपण ओंझळी नसता ॥३॥
जिव्हेविण प्याल्या पूर्ण समाधान । दासरामा खूण संताघरची ॥४॥

## १५५७

देही या नटले कैचे शुद्ध मन । संकल्प ते भिन्न तयावरी ॥१॥
वारा एक परी तेथें पंचप्राण । शद्व सप्रमाण झाला ज्याचा ॥२॥
अक्षर ते एक परी शद्व दोन । अगाध महिमान स्वामीयाचे ॥३॥
तृप्ती एक परी चवी त्या अनेक । दृष्टी मुळी चोख भिन्न दृश्य ॥४॥
एकची श्रवण लहरी नाद भिन्न । एक नामगान स्वर बहू ॥५॥
एक तो चरण परी गती तीन । एक समाधान मार्ग दुजें ॥६॥
हस्तकी ते टाळी तेथे नाना भाव । नादघोष अपूर्व एकरूप ॥७॥
दासराम म्हणे अनेकी ते एक । एकची अनेक तत्त्वरूपे ॥८॥

## १५५८

पोटाविण कैची भूक । भुकेवाचूनी कैसे सुख ॥१॥
भूक खादिली हे कैसी । हेची संती तत्त्वमसी ॥२॥
पोटाअंती सुखदुःख । तयापैल आत्मा एक ॥३॥
संता भक्ता कळला डोळा । खूण जाणे पुरूष विरळा ॥४॥
आकाशाचे पोट । दासरामी या निघोट ॥५॥

## १५५९

परमानंदी सतचिद् । जरी उरला नाही शद्व ॥१॥
दृश्य डोळियासी मिळे । दृश्यामाजी डोळा खिळे ॥२॥
डोळयामाजी आत्मरूप । भक्त तेथे निर्विकल्प ॥३॥
पहाणे सरले । दासराम स्वरूपी उजळे ॥४॥

## १५६०

कर्णी घुमती अक्षरे । बुद्धी उजळे आत्मविचारे ॥१॥
आपेआप उठती बोल । नामी रसना रसाळ ॥२॥
गुरूकृपेचे वैभव । करिती हेवा देवदेव ॥३॥
साधुसंत घेती डोल । हाती आले दृष्टिमूळ ॥४॥
दासरामा साक्षात्कार । ब्रह्मानंदाचे माहेर ॥५॥

## १५६१

नामी द्वयाद्वय भासाभास ब्रह्म । सगुणी उत्तम निर्गुण वस्तू ॥१॥
नामी ब्रह्मानंद नामेची अभेद । नामेची गोविंद तुष्टे सदा ॥२॥
नामापरते नाही आन दुजे सार । नाम हे माहेर सकळांचे ॥३॥
सकळही भक्ता नामीच विश्रांती । नामापाशी मुक्ति भक्तीप्रेम ॥४॥
नामीच विसाऊ पावले हे संत । चैतन्य ही तेथ सुख पावे ॥५॥
नामाठायी सत्य भरोनी राहिले । नामामाजी खेळे ब्रह्मरूप ॥६॥
नाम हे अनादी नामी सकळ सिद्धी । नामरूपी बुद्धी स्थिर होय ॥७॥
सिद्धनाम गुरूकृपेवीण अकळ । धन्य जे ते जाळ विश्वरूप ॥८॥
हरिभक्त तया गाती हरिकीर्तनी । दासराम चरणी नटला माये ॥९॥

## १५६२

अमल अलमोंकार ध्यान ते सुंदर । धारणा विचार प्रगट करी ॥१॥
नामपाठ कीर्ती नामपाठी कळे । चित्त ते उजळे तिही लोकी ॥२॥
देही या प्रत्यय साधनाची सोय । नामालागी होय सुख नामी ॥३॥
नामपाठे नाम सुखावले आनंदे । बोले ब्रह्मानंदे नाम उठवी ॥४॥
दासराम तया ठायी शरणागत । तयालागी प्राप्त ब्रह्मानंद ॥५॥

## १५६३

साधन ते नाम साध्य तेही नाम । विचार परम गुह्यभाग ॥१॥
नाम नामी पाया नामची कळस । नाम ते सुरस नाम देव ॥२॥
परेचिया पैल आनंदाची खूण । तेथे रममाण दासराम ॥३॥

## १५६४

नाम कैंचे ब्रह्म गूढ हे उत्तम । नामी हे अनाम जाले कैंचे ॥१॥
नामी नाम गूढ जरी भाव दृढ । हाती येई वाड निजवस्तू ॥२॥
शब्दामाजी अशब्द त्यामाजी अक्षर । निःशब्दी उच्चार सिद्धनाम ॥३॥
सिद्धनामी गुरूभक्ता साक्षात्कार । साधनाचे सार नामकळा ॥४॥
दासरामा दाविती पाठ हनुमंत । एकांती घुमत महदाक्षरे ॥५॥

१५६५

नामदीपपाठ आदरे गाईला । तयातु ओविला सर्वेश्वरू ॥१॥
अक्षराचे लेणे अक्षरी साठले । अक्षरे दाविले निजाक्षर ॥२॥
नामी परमात्मा नामी संत भक्त । द्वयाद्वय तेथ नाही नामी ॥३॥
गोविंदराय कीर्तनी उजळला दीप । ओतिले स्वरूप ठशामाजी ॥४॥
साधुमहाराजांचे आराधन दिनी । उमटे चरणी बोल कैचा ॥५॥
कृपेची ही वाणी हनुमंतचरणी । अर्पी लोटांगणी दासराम ॥६॥



# निरंजनपाठ : ५७

१५६६

गुरूभक्ता पायी लोळे । त्यांची वंदितो पाऊले ॥१॥
हरिभक्तांचा किंकर । करू सेवा लाऊ स्वर ॥२॥
सुरामाजी मिळुनी जाऊ । त्रैमूर्तीचे दर्शन घेऊ ॥३॥
त्रिगुणाचिये उपरी । दासराम चरण धरी ॥४॥

१५६७

चेइलिया स्वप्न नाथिले गगन । डोळसा संपूर्ण ब्रह्म लाहो ॥१॥
मीपणा उपरी स्वरूपाची परी । शून्याची ओवरी गिळिली माये ॥२॥
पाण्यावीण मेघ मेघावीण वीज । जीवनाविण सहज पूर आला ॥३॥
नीरावाचून धान्य धान्य नसता अन्न । अन्नावाचुनी प्राण तगुनी राहे ॥४॥
धरणीविना घर प्रजेविणा गाव । अवघाची ठाव मालकाचा ॥५॥
राणीविण राजा करितो संसार । तेणे भासे नार ज्ञानियासी ॥६॥
नर पहाता नार नारी पहाता नर । ऐसा हा विचार सिद्धांताचा ॥७॥
माया ही असोनी नसोनी सारखी । ग्रासिती जे शेखी एकमेका ॥८॥
तयापैल सत्य स्वरुप विमल । दासराम अकळ कळ नासी ॥९॥

१५६८

मेरूदंडावरी महीची धारणा । जेथे पंचप्राणा मेळ झाला ॥१॥
मंडलाचे आतू साठले जीवन । जेणे जीवपण शरीरासी ॥२॥
पीत वर्ण कांती सूर्याची धारणा । अग्निनारायणापासोनिया ॥३॥
साधनाच्या यत्ने देही अनुभव । दासराम भाव ठेवी संती ॥४॥

१५६९

अग्नीचेपासोनी पंचतत्त्वे झाली । नाही उमजली संतावीण ॥१॥
संतानी मारिले जाणनेणपण । तेथेची विज्ञान बाणले त्या ॥२॥
सप्तविध धातूसी तेज हे कारण । रोकडे हे ज्ञान आतवरी ॥३॥
दासरामा नवल अध्यात्माची मात । ब्रह्मरूप संत ब्रह्माठायी ॥४॥

## १५७०

अग्निरूप चक्षू नाम नादू आत्मा । कारण जे समा विषमासी ॥१॥
अग्नि तो निराळा पंचभूतावेगळा । जेथे ही चित्कळा आटली माये ॥२॥
चित्कळा चेतवी नवले प्रकाशू । सूर्य चंद्र भासू सत्य दावी ॥३॥
दृश्यादृश्य आटवी महाशून्य गिळवी । पाडीतसे ठावी आत्मरूप ॥४॥
दासराम लागे संतांचे पायासी । सद्‌गुरू निरसी शब्दज्ञान ॥५॥

## १५७१

सप्त समुद्राचे माझारी वो अग्नी । संत हे नयनी देखताती ॥१॥
प्रलयाग्नी देखती निशिदिनी चित्ती । प्रकोपू जो अंती पावतसे ॥२॥
अन्नरस करी ऐसा जठराग्नी । गुरूभक्त पहाणी करिती नित्य ॥३॥
कंठामाजी अग्नी देखे दीपस्तंभ । दावी जो स्वयंभ सिद्धपंथ ॥४॥
स्वयंज्योती अग्नी स्वरूपाची ठेव । जेथे संतराव मीनले बहू ॥५॥
दासराम संत ज्ञानिया शरण । हनुमंत चरण मस्तकी ज्या ॥६॥

## १५७२

अग्निआत रक्षा रक्षेवरी अग्नी । धूर तो अस्मानी दाटलासे ॥१॥
धूरातेपासोनी झाली पंचभूते । धूराचे वरते देखणेची ॥२॥
धूर नासी पिंड ब्रह्मांडरचना । किंवा दावी जना सृष्टी सारी ॥३॥
दासराम म्हणे संतालागो ठावे । आश्वीच पुसावे चरण धरूनी ॥४॥

## १५७३

अग्निज्वाळी कोळी विस्तारली जाळी । पंचभूत मेळी चराचर ॥१॥
पंचप्राण कैंचे चेतविती प्राणी । तया निरंजनी ठावो नाही ॥२॥
संतांचे विश्राम सुखाचे माहेर । आपुले ते घर निरंजन ॥३॥
सूर्य चंद्र अंधकार मावळला । प्रकाश आथिला दासरामा ॥४॥

## १५७४

महाराजांची आम्ही लेकुरे । नाचू कीर्तनी वडिवारे ॥१॥
हरिकथेचा अधिकारू । असे थोरू संतांचा ॥२॥
जयजयकारे कवतुक । लाहू सुख आगळे ॥३॥
बोल बोलू उफराटे । सेवू चरण गोमटे ॥४॥
सद्‌गुरू आज्ञा हरिप्रसादू । संती आनंदू कीर्तन ॥५॥
दासराम हा किंकर । करी गजर नामाचा ॥६॥

## १५७५

धन्य धन्य गुरूपुत्र । सत्ता ज्यांची संतावर ॥१॥
नवल तयांचे वैभव । ब्रह्मादिका न कळे माव ॥२॥
तेथे वसे गुरूभक्ती । जया चित्ती सद्‌गुरूमूर्ती ॥३॥
श्रीहरीची पूर्ण कृपा । चुकती दर्शनेची खेपा ॥४॥
हनुमंत सद्‌गुरूंचे । छत्र अखंड कल्याणाचे ॥५॥
धन्य रघुनाथराय । गुरूबंधू गोविंदराय ॥६॥
दासराम चरणी जडे । तेणे निजरूप सापडे ॥७॥

## १५७६

शुद्ध आणि कृष्ण ऐसे दोन पक्ष या काला ।
त्याचे वाचेमाजी हरिकीर्तीचा उमाळा ॥१॥
नवल हे झाले कैसे देही या माये ।
हरी हरी बोल येती बोलता जे नये ॥२॥
अनंत रूपडे शेष झालासे मुका ।
देही अनुभव घेई शुद्ध रूप तू का ॥३॥
दासराम लोळे तेथे संतचरणा गाठी ।
ब्रह्मानंदू होता साठवेना या पोटी ॥४॥

## १५७७

तेची निरंजन निरामय पूर्ण । ब्रह्म सनातन गुरूघरचे ॥१॥
गुरूनामी देखे साधका प्रत्यय । सिद्धलिंग माय शिवरूप ॥२॥
उत्कंठी लाभ संतसमागमे । तेथे दासरामे दिली मिठी ॥३॥

१५७८

बीजावीण फूल तेथे नाही बीज । तेथे केवी सहज वृक्ष झाला ॥१॥
वृक्षाचा आभासु म्हणूनी बीजाभासू । भासे परी नाशू आहे जया ॥२॥
गगन हे मूळ शद्बची केवळ । तेथे शद्बजाळ विस्तारले ॥३॥
शद्वाचा हा भास शद्वेची निरास । गुरू उपदेश कारण या ॥४॥
अग्निनारायण पूर्णरूप पुष्प । निरंजन दीप दासरामा ॥५॥

१५७९

विश्वाचा निरासू करी जो प्रकाशू । तो चिदाकाशू पूर्ण तेज ॥१॥
सिद्धलिंग बरवे देखे निरंजनी । नाही त्रिभुवनी गोचरू जे ॥२॥
सुवर्ण तळपे स्वये जे आतपे । सिद्ध स्त्रयंदीपे दीपू झाले ॥३॥
सोन्याचा कळस घेई जे दर्शन । विश्रामाचे स्थान संतजनी ॥४॥
आधी तो कळस वरी ते कुसर । उपरी सुंदर पाया दिसे ॥५॥
कळस देखिल्या मना नुरे मन । दासरामा दर्शन देवो पुढे ॥६॥

१५८०

कोणो दीप कोणा लावियेला संती । पेटता या ज्योती बोलता नये ॥१॥
दीपे दीप लाविता दीपमाळ झाली । परंपरा नुरली कारणाची ॥२॥
आवघेची दीप प्रकाश उजळे । कोणी कोणा केले आपणापरी ॥३॥
तैसा एकुलाची एकू नारायण । सर्व संतजन रूप एक ॥४॥
सकळी सारिखे भरले हे ज्ञान । अनुभव खूण संतापायी ॥५॥
थोर सान कोणी म्हणो नये कोणा । दासराम चरणा सद्गुरूंच्या ॥६॥

१५८१

शद्वाचा उच्चार वेगळा काढिला । निरूच्चार झाला तेधवाची ॥१॥
निरूच्चार ग्रास एकाएकी केला । तयेठायी झाला अनिरूच्चार ॥२॥
आनंदी आनंद वर्णवेना माये । स्वयंदीप स्वयें कळो आला ॥३॥
त्रिपुटी नासिता दीप उजळला । भक्तराव झाला दीपाकार ॥४॥
सद्गुरुकृपेचे ऐसे येती बोल । दासरामा डोल त्यांचे पायी ॥५॥

## १५८२

प्रकाशात हेतू मावळोनीं गेला । तेथोनी उठला नादघोष ॥१॥
तेथे गुरूनाम होईल श्रवण । कृपे ते विज्ञान कळा संती ॥२॥
नामची प्रकाश नामची प्रकाश । नाम नादघोष स्वयंरूप ॥३॥
दासरामा न कळे कोण बोले बोल । हनुमंत अकळ बोलविती ॥४॥

## १५८३

रेवणसिद्धानी उभारोनी हात । दावियेला पंथ स्वरूपाचा ॥१॥
रोकडे हे ज्ञान रोकडी प्रचीती । अनुभव स्थिती संतजनी ॥२॥
परंपरा आली तेथोनिया निकी । गुरूभक्त सुखी तदाकारे ॥३॥
दासराम लोळे माऊलीचे चरणी । आशिर्वादे झणी तृप्त होय ॥४॥

## १५८४

आत्मस्वरूपाची धार । दृष्टी पैलाडू प्रकार ॥१॥
ब्रह्मानंदाचा सुकाळ । गदारोळ कथेचा ॥२॥
हनुमंतांचा प्रसाद । आनंद हा अखंडू ॥३॥
अखंडात जो जो गेला । दासरामा त्या जिव्हाळा ॥४॥

## १५८५

दृष्टी दावी भासाभासू । सर्वशू हा पैलीकडे ॥१॥
दृष्टी दावी कर्माकर्म । निजधर्म वेगळा ॥२॥
दृष्टी दावी तप श्रम । नामी वर्म निराळे ॥३॥
हरिनाम संकीर्तन । भगवान ते ठायी ॥४॥
दासरामा गुरूनाम । परम धाम विश्वाचे ॥५॥

## १५८६

दृष्टीलागी पंथ दृष्टीलागी हित । दृष्टीलागी चित्त चिंतनासी ॥१॥
दृष्टीलागी द्वैत दृष्टीसी अद्वैत । बहू हेत संकेत मतांतरे ॥२॥
दृष्टी हे विशाल उपाधींचा साठा । ब्रह्म उफराटा होवोनी देखे ॥३॥
संत बोलिताती ऐशा जीवन्मुक्त । गुरूपदी जडत दासराम ॥४॥

१५८७

दृष्टीची उपाधी असोनी नसोनी । सारिखेची दोनी सुखी दुःखी ॥१॥
संतांचे वचनी पूर्ण समाधान । मनाचे जीवन मना मिळे ॥२॥
नाशिवंता तुटी विकल्पा न भेटी । चिदानंद गाठी करिती संत ॥३॥
दासराम धरी चरण हृदयी । वंदितसे पायी वेळोवेळा ॥४॥

१५८८

सुखाचा संतोष दुःखाचा संताप । ज्ञान हे अपाप दृष्टी पूर्ण ॥१॥
उपाधी निरसिता होसी दृष्टीवेगळा । त्रिपुटी निराळा होसी वेगू ॥२॥
उपाधी कल्पना दृश्यादृश्य मात । प्रत्यक्ष त्वरित काय आहे ॥३॥
सुखदुःख राहे जेथिलिया तेथे । चित्त हे निगुते चिंतीतसे ॥४॥
मन हे कल्पना मन हे कल्पना । दृश्यादृश्य जाणा मुळी नाही ॥५॥
दासराम सांगे संतांचा अनुभव । तयालागी ठाव परमात्मा ॥६॥

१५८९

जेथोनी वाढले द्वैत दृष्टीपुढे । तेथेची आतुडे सौख्य म्हणी ॥१॥
संतसंगतीने आकळिजे वर्म । पावसी विश्राम सर्वकाळ ॥२॥
दासरामा न कळे नमनावाचून । तयाचे कारण देव जाणे ॥३॥

१५९०

हरीचे कीर्तनी भुते आली सव्वा तीन ।
मह द्भूत ग्रासिता नाचे कैचा नारायण ॥१॥
तीन भुतांचे अंग एकची बोले कीर्तन हरी ।
सगुण कीर्तनी ऐके बोले निरालंब कुसरी ॥२॥
श्रोता आणि वक्ता याते एकची चक्षू लाहे ।
शून्य स्थिती ही कंपित होता फुलोरा फुलताहे ॥३॥
फुलोऱ्याने निर्मियेला या जगती वारा ।
तयात देखे श्रुती शब्दाचा महानाद घुमारा ॥४॥
कर्मातीत स्थिती बुक्का लाविला भाळी ।
स्वयंज्योती आरती दासराम ओवाळी ॥५॥

## १५९१

शद्बातूनी निघे गती । पुढे वाऱ्याची प्रचीती ॥१॥
वाऱ्यातुनी झाला वारा । तेथे आवघाची उबारा ॥२॥
गती विगती झाली टाळी । नादघोष तो धुमाळी ॥३॥
निरालंबी हे आलंब । पंल ब्रह्म ते स्वयंभ ॥४॥
दासराम लोटांगणी । जाय संतांचे चरणी ॥५॥

## १५९२

निरंजन पाठ निरंजन वाणी । निरंजन स्थानी निरंजनू ॥१॥
हनुमंत गुरूमाये बोलविले । त्यांचे चरणी लोळे बालक हे ॥२॥
बोबड बोलाचे करिती कवतूक । घालती जे भीक प्रसादाची ॥३॥
सद्‌गुरूप्रसादे तुच्छ सर्वानंद । झाल्या आशिर्वाद कल्याणाचा ॥४॥
कृपेची उत्तरे हनुमंतापायी । दासराम वाही लोटांगणे ॥५॥



# चक्षुपाठ : ५८

## १५९३

बुबुळाचे पाठी डोळीयाची गाठीं । करी आटाआटी चत्वारीची ॥१॥
देखणे हे दावी कैंचा तो देखणा । सहज आपणा विसरवी ॥२॥
शद्बाचा हा खेळ मांडिला पसारा । घेईजे विचारा अंतरीया या ॥३॥
स्मरण हा देव शद्बाचिया पैल । दासरामा केवल साधन ते ॥४॥

## १५९४

दृष्टीसी हे बुबुळ दावी शून्याकार । जेथोनी विस्तार देखण्याचा ॥१॥
बुबुळीची बाहुली उलटी करोनी । देखिजे गगनी आपणासी ॥२॥
देहामाजी वर्म सद्‌गुरू दाविती । साधन एकांती साधी वेगी ॥३॥
दासरामा सहज पंथ हा सुलभ । होय पद्मनाभ आपुला तो ॥४॥

## १५९५

देखणे ऐकणे यामाजी अंतर । देखिजे चत्वार अंगुलीचे ॥१॥
देखण्याने केली ऐकण्याची कळा । दावीते जिव्हाळा देखण्याचा ॥२॥
नाद आणि तेच यांचे देही गुज । भक्तासी सहज प्राप्त होय ॥३॥
दासराम शरण सद्‌गुरू उदारा । उगवला तारा स्वरूपाचा ॥४॥

## १५९६

देखण्याचे पोटी प्रणवाची करणी । तेणे निशिदिनी नवल केले ॥१॥
दिशा कैंची तेणे पहा विस्तारली । खूण तो दाविली दृश्यादृश्य ॥२॥
अकल्पित दोरा कैंचा आला हाती । राम सीतापती संतोषला ॥३॥
वेध तो लागला वेध तो लागला । ठायीच निमाला दासराम ॥४॥

१५९७

नामाचे स्फुरण प्रणवामाझारी । नेई ते निर्धारी स्मरणापाशी ॥१॥
जेथे नाही गुण देखे ते निर्गुण । निरालंब खूण मार्ग ज्याचा ॥२॥
संतांचे संगती आकळे श्रीपती । गती आणि विगती नुरे जेथे ॥३॥
दासरामा लोभ आत्म्याचा प्रसाद । सद्गुरू आनंद कैवल्यची ॥४॥

१५९८

देखणा देखता स्वता नुरे ठाव । अवघाची देव जेथें तेथें ॥१॥
नये दाखवाया दुजे काही आता । सकळाचा आता लोप झाला ॥२॥
मौक्तिक सुवर्ण चांदी आटविली । त्रिपुटी सरली एकाएकी ॥३॥
दासराम संत भक्तांचा किंकर । गुरूबोध सागर हृदयी त्याचे ॥४॥

१५९९

देखणे बुडाले देखण्यामाझारी । जेथे निर्विकारी ठसली मुद्रा ॥१॥
निर्विचार कळा दावी निर्विकार । अंतरा अंतर गुरूभक्ता ॥२॥
गुरूभक्तचरण रजःकण धूळी । लागता कपाळी मोक्ष लाधे ॥३॥
अंतरीची शुद्धी होय दृढ बुद्धी । सहज समाधी दासरामा ॥४॥

१६००

दिव्य दृष्टी कैची दावी आत्मरूपा । मार्ग हा सोपा संतजनी ॥१॥
नाम ते रसना रसाळ सुरस । तेथें जगदीश ठसावला ॥२॥
सगुण निर्गुण झाले ब्रह्मरूप । रूप आणि अरूप तेची दोनी ॥३॥
सद्गुरू बोधिती दासरामा खूण । जेणे समाधान पूर्ण जोडे ॥४॥

१६०१

दृश्य आणि अदृश्य मुळीच निमाले । तेथें हाता आले पाहिजे ते ॥१॥
दृष्टीचे देखणे झाले ब्रह्मरूप । हेतूचा अपाप लय झाला ॥२॥
सद्गुरूंचे कृपे उमज हा पडे । सहजची घडे लाभ थोडा ॥३॥
थोकडाची लाभ ब्रह्मांडी या भारी । दासरामा वरी गोडी तेथें ॥४॥

## १६०२

अनुभवे घेई सहज अनुभव । गुरूकृपा अपूर्व संपादी गा ॥१॥
अधिष्ठानावरी होइजे आरूढ । साधन हे गूढ सत्य दावी ॥२॥
ब्रह्मांडाचे राज्य तुच्छ झाले संता । नित्य हरिकथा जया चित्ती ॥३॥
दासराम ऐशा संतांचा पायीक । म्हणोनी हे भीक दिली त्यासी ॥४॥

## १६०३

दृष्टीचे देखणे शून्य ते देखणे । मिळोनी देखणे देखण्याचे ॥१॥
तेथे सद्‌गुरू मनाते मारून । दिली ब्रह्मखूण भक्ता निकी ॥२॥
मौन मुद्रा माळ नामाचे साधन । जाय अभिमान सत्य सत्य ॥३॥
दासराम लीन सद्‌गुरूचरणी । धन्य ते करणी नरदेही ॥४॥

## १६०४

देही सद्‌गुरूनी काय केली खूण । जीवाते मारून जीवविले ॥१॥
अखंड जीवन अखंड स्मरण । जेथे जन्ममरण नाही नाही ॥२॥
सांदरीचा पाट गगनाते वेष्टिला । ग्रासोनिया झाला ब्रह्मरूप ॥३॥
दासरामा आता बोलवेना काही । अवघा बोल होई राम हरी ॥४॥

## १६०५

आत्म्याचे जीवन तेथेची धारणा । तुटता हे प्राणा दुःख देई ॥१॥
प्राण हा घोटाळी कंठाचिये स्थानी । राहिजे संधानी संधिकाळी ॥२॥
संताचिये कृपे पाविजे हे ज्ञान । तरीच दर्शन आत्मयाचे ॥३॥
रामकृष्णहरी रामकृष्णहरी । संतचरण धरी दासराम ॥४॥

## १६०६

श्वासाचा उदय कोठोनी बा होय । आणि पावे लय कोण्याठायी ॥१॥
तेथेची निर्गुण दाविते सगुण । त्याचे पैल मौन स्वयं ब्रह्म ॥२॥
स्वयंसिद्ध तेज आत्मयाचे गूज । जेथेची सहज समाधान ॥३॥
दासरामा गोड रामनाम सुगम । परम उत्तम धर्म वर्म ॥४॥

१६०७

अज्ञाननिरास ब्रह्मासी मिळणी । राहीजे गिळोनी गगनाते ॥१॥
नाद हा ग्रासिता शब्द पावे लय । दावीतसे सोय गुरूवाणी ॥२॥
देखणे जे राहे दावी ते देखणा । ऐक्य भाव खुणा देही देखे ॥३॥
दासरामावरी सद्गुरू बोळले । म्हणोनी हे आले गूज हाती ॥४॥

१६०८

संदेहरहित स्वरूप यथार्थ । दाविती हे मात संत देही ॥१॥
संशय हा नामी उरेना आरामी । जहाली निकामी कुवासना ॥२॥
दासरामा साधुपदाची आवडी । जेणे हा तातडी धावे विष्णू ॥३॥

१६०९

सगुणाचा ढोल निर्गुणाचा खेळ । त्यापैल विमल शुद्धरूप ॥१॥
उपमा त्या नाही उपमा त्या नाही । वेदशास्त्र ग्वाही संत देती ॥२॥
साधन साधोनी साधिजे जे साध्य । तरी तरणोपाय दासरामा ॥३॥

१६१०

वारिया विश्रांती तेची नेत्रपाती । जेथे होती जाती हरिहर ॥१॥
जयाचिया पोटी जहाले त्रिगुण । सगुण निर्गुण जये ठायी ॥२॥
अनंत ब्रह्मांडे जयाचे उदरी । तयाचे अंतरी परब्रह्म ॥३॥
ऐसी नेत्रपाती उघडिला डोळा । तेथीचा जिव्हाळा ब्रह्मरूप ॥४॥
आत्मयाचा डोळा आत्माची देखणे । आत्माची जाणणे दासरामा ॥५॥

१६११

चक्षूरूप आत्मा भरला सर्वाठायी । शून्य दृष्टी लाही शून्य झाली ॥१॥
दृष्टीठायी देखणे घेतसे विश्रांती । तेथे निजशांती सत्य सत्य ॥२॥
देखण्याचे देखणे शून्य हे देखणे । देखे आपुलेपणे देखण्याते ॥३॥
दासरामा ऐसा थोर राजयोग । दाविती सवेग सद्गुरूराव ॥४॥

१६१२

देखणे देखणे मिळोनी देखणे । प्रकाशली खाण निळीयाची ॥१॥
निराभासी भास पैल त्या स्वर्धेश । देखणे अवकाश चक्षूचे ते ॥२॥
तेथील आनंद वर्णवेना माये । बोलू आता काये कळेचिना ॥३॥
दासरामा सद्‌गुरू दाविती हे मात । देहीच प्रचीत साधनी या ॥४॥

१६१३

गगनरहितू आत्माची समर्थू । देखणे दावितु देखणा तो ॥१॥
तेथे प्रकृतीसी उरेचिना ठाव । पुरूष अपूर्व अक्षरीचा ॥२॥
काम तो वाढिला मत्सराच्या गुणे । म्हणोनी अज्ञान बोलिले हे ॥३॥
वाटे हेवा ऐसे जहाले हे दृश्य । परतोनी अदृश्य टाकी वेगी ॥४॥
दासरामा खूण दाविली समर्थे । धन्य हनुमंते गुरूराये ॥५॥

१६१४

अदृश्य हे कैचे दावीते ब्रह्मांडे । देहीच रोकडे साक्षात्कार ॥१॥
श्यामवर्ण कैचा दावितो प्रकाश । श्यामवर्ण खास अग्नी दावी ॥२॥
अग्निमाजी ठाव सकळालागून । तोची नारायणरूप देही ॥३॥
श्याम अविनाश रूप ते अंतरी । दासराम भीतरी ठाव माये ॥४॥

१६१५

वृत्तीचे सुमन तेथे समाधान । पहिले लक्षण चित्तशुद्धी ॥१॥
संकल्प विकल्प दोनीमाजी नाम । तरी हे उत्तम तयाहोनी ॥२॥
तेथे तद्रूपता हे तो सर्वोत्तम । पुढे महत्तम श्रवण हे ॥३॥
बोलाचिये स्थानी ठेविजे बा लक्ष्य । कळे तरी अलक्ष्य दासरामा ॥४॥

१६१६

वृत्तीचिये पैल देखे परावृत्ती । तयाचिये अंती साधनकळा ॥१॥
तेथे अनुभव अपरा वृत्तीचा । लागतो हरीचा छंद बरवा ॥२॥
म्हणोनी श्रीहरी वृत्ती ते बोलिली । हरणची केली दोन कळा ॥३॥
परा अपरेचा जेथे झाला ग्रास । नाम हे सुरस हरिवाणी ॥४॥
तयाचिये अंतरी देखिजे निवृत्ती । उन्मनता स्थिती विज्ञानी या ॥५॥
पूर्णता डोळिया पूर्णची अनुभव । तेथे पूर्ण ठाव पूर्णालागी ॥६॥
दासरामा सद्‌गुरू दाविती नवल । चक्षू तो सखोल अणुरूप ॥७॥

## १६१७

तम अहंकार रज जीवभाव । सत्त्व ते जाणीव शिवात्म्याची ॥१॥
तीनीचिया पैल परमात्म ठाव । जेथे तेथे भाव काय सांगो ॥२॥
सद्गुरूनाथानी बोधियेला बोध । तेणेंची आनंद चित्तासी या ॥३॥
दासराम जरी जाय शिखरस्थानी । तरी निरंजनी वस्ती होय ॥४॥

## १६१८

दृश्य आणि अदृश्य जाणिजे देखणे । शून्याचेपासून शून्य झाले ॥१॥
शून्य हे असोनी नसोनी सारिखे । देखसी कौतुके द्वैतभाव ॥२॥
देखणे देखोनी पावे समाधान । तरी हे बंधन उरेचिना ॥३॥
दासराम म्हणे ऐसे येथे गूज । दीप ब्रह्मराज ज्ञानियाचा ॥४॥

## १६१९

अज्ञानाचे मुखी बोलविला बोल । अनुभव खोल दिसतो हा ॥१॥
माझिये निजांगी मुराला हा रस । पुढे जगदीश उभा ठेला ॥२॥
निर्गुण दाविले माझिये दृष्टीत । पैल ते अव्यक्त बोला नये ॥३॥
अधिकारू नसता करासी धरोनी । नेती महास्थानी सद्गुरूराव ॥४॥
सकळ जगाचे राहिलो मी मागे । परी केले उगे कवतूक ॥५॥
सकळ भक्तांचे पादत्राण वंदी । आनंदे गोविंदी तदाकार ॥६॥
धन्य माय बाप देताहे आनंद । लावियेला छंद सद्गुरूंचा ॥७॥
हनुमंत सद्गुरूराया ऐसा दाता । धावलासे स्वता दासरामा ॥८॥

## १६२०

देखण्याचा ठेवा पहाणे पे लपाला । आनंद जोडिला दृष्टीने तो ॥१॥
दृष्टीचा प्रसाद दृष्टीसी लाधला । दृष्टीत मिळाला स्वरूपगाभा ॥२॥
उलट दृष्टीने ग्रासिली प्रवृत्ती । सांडिली निवृत्ती शून्यावस्था ॥३॥
दासरामा आनंद गुरूकृपे मिनला । घाले वारियाला दंडवत ॥४॥

## १६२१

दृष्टीचा हा बोल वाचेवीण बोले । आत्मरूप खेळे स्वयंनादे ॥१॥
नादाचा प्रकाश प्रकाशाचा नाद । स्वरूप अभेद चक्षूमाजी ॥२॥
चक्षूमाजी करी चत्वार निरास । उरे निराभास रूप तेथे ॥३॥
निराभासी चिदानंदाचे स्वरूप । पैल ब्रह्मरूप देखे डोळा ॥४॥
दृष्टीचा हा बोल कानावीण ऐके । परेवीण चाखे निजगोडी ॥५॥
चरणावीण गती करावीण खेळे । दासराम लोळे त्याचे पायी ॥६॥

१६२२

श्रवणाची झाली वाणी । पुढे चिदाकाश खाणी ॥१॥
श्रवणा आतौते निजब्रह्म । जेथे नुरे आगम निगम ॥२॥
दासरामा गुरूकृपा । नामी साक्षात्कार सोपा ॥३॥

१६२३

आत्मा व्यापियेला डोळा । शद्ब चांचल्यावेगळा ॥१॥
चक्षू पाही कवणाते । कोण पाही त्या चक्षूते ॥२॥
तो हा सत्य परमेश्वरू । पाहे स्वता चराचरू ॥३॥
दासराम तेथे धाला । शद्ब पहाणेपे बुडाला ॥४॥

१६२४

डोळा स्थिरावले स्मरण । पहाणे ते आपुलेपण ॥१॥
दृष्टी व्यापिली ब्रह्मांडा । करो द्वैताचा निवाडा ॥२॥
आत्माराम तो हा चक्षू । आत्मा आत्मपणे लक्षू ॥३॥
निजसुख चाखावया । दासरामी केली माया ॥४॥

१६२५

आदिमध्यांतरहितू । नाम श्रवणी गा अद्वैतू ॥१॥
श्रवण गिळोनी ठेले श्रवण । तेथे ब्रह्म साठवण ॥२॥
सुरापासोनी वेगळा । नाद काढिला निराळा ॥३॥
वायूपासोनी सुगंध । काढियेला ब्रह्मानंद ॥४॥
गुरूबोध नवल प्रकाश । वर्णवेना त्या वस्तूस ॥५॥
दासरामा ते ते वस्तू । ग्रासीतसे द्वैताद्वैतू ॥६॥

१६२६

श्रवण जो गुण तयामाजी नाम । प्रकाश परम ब्रह्मरूप ॥१॥
श्याम नील भेटी स्वरूपासी गाठी । उजळती कोटी पीतप्रभा ॥२॥
नयनीचा बोध श्रवणासी आला । प्रवाह वाहिला जीवनाचा ॥३॥
दासरामा बोध सद्गुरूनी केला । आनंद जोडिला निर्गुणाचा ॥४॥

## १६२७

पहाणीमाझारी परिसायाची परी । आत्माची कुसरी त्रिपुटीपैल ॥१॥
दृश्यादृश्या आतू गुणागुणापरतू । निर्गुण सांडितू हेतूपैल ॥२॥
श्रवणाचा पाठ नयनाने ऐके । नयनीचे देखे श्रवणी रूप ॥३॥
रूपामाजी नाम नामामाजी रूप । दासरामा अपाप गूढ झाले ॥४॥

## १६२८

पूर्व ते नासिका पश्चिम ते रंध्र । कर्ण ते उत्तर दक्षिणकाळ ॥१॥
नाम तेची काळ स्वरूप विमल । करिते निकाल पुण्यपापा ॥२॥
नामानुसंधानी रहाताची मुक्ती । पूर्ण ते विश्रांती स्वरूपात ॥३॥
एकक्षण नाममात्र काळ सम । देखसी उत्तम परेपैल ॥४॥
दक्षिण ते दावी गती अधोगती । दासरामा प्रीती रामनामी ॥५॥

## १६२९

देखण्यामधोनी श्रोत्र उणे केले । तरी काय उरले देखणेची ॥१॥
देखण्यामधोनी वाच्य घालविले । तरीं काय उरले देखणेची ॥२॥
देखण्यामधोनी देखणे काढिले । तरी काय उरले देखणेची ॥३॥
देखणे देखणे दोनी उडविले । मग ते राहिले चक्षुरूप ॥४॥
तयामाजी देखे तुझा निर्जबिंदू । त्याचे पैल सिंधू दासरामा ॥५॥

## १६३०

आकाशामधोनी घालविली दिशा । दिन आणि निशा वेगू जाण ॥१॥
तरी ते राहिले आकाश निराळे । अनुभवा आले संतजनी ॥२॥
आकाशामधोनी अग्नीं घालविला । तरी तो राहिला गगनगाभा ॥३॥
शून्य आणि शून्य मिळोनि आकाश । तोचि हा आभास दृश्यादृश्य ॥४॥
देखणे देखणे जहाली त्रिपुटी । पैल जगजेठी हरी आत्मा ॥५॥
शून्य आणि शून्य स्वयंरूपे दोनी । गिळिता नयनी ब्रह्मरूप ॥६॥
दासराम म्हणे देही आत्मज्योती । गगनाचे पंथी देखती संत ॥७॥

## १६३१

शब्द तो राहिला नादाते गिळोन । तेचि हे गगन देखे स्वये ॥१॥
शब्द उजळता दोन शून्ये झाली । तेथे आदळली एकमेकी ॥२॥
तेथे झाली टाळी द्वैताचा पसारा । जयात घुमारा प्रणवाचा ॥३॥
देखणेची दृश्य शब्दाचा अनुभव । सारिखाची भाव गूज ऐके ॥४॥
असोनी नसोनी सारिखेची दोनी । विपरीत करणी दासरामा ॥५॥

## १६३२

देखणेची शद्व शद्वे झाला नाद । तेणे केला भेद अद्वयाचा ॥१॥
म्हणोनिया तया बोलिजे चैतन्य । चित्कळा ते पूर्ण तेजोरूप ॥२॥
अबोलाचा बोल सत्य ते अढळ । आनंद केवळ चित्तापैल ॥३॥
चित्ताचे चांदणे आत्म्याचा प्रसाद । त्यापैल आनंद ब्रह्मयाचा ॥४॥
दासराम संतपदासी जडला । लाभ तो चांगला कल्याणाचा ॥५॥

## १६३३

अग्निनामामाजी समत्वाचा लय । साधिल्याची लय जासी तेथे ॥१॥
तेथे निजवस्तु नुरे द्वैताद्वैतू । स्वयंतेज जेथू प्रकाशते ॥२॥
दृश्यादृश्यपैल निर्विकार शून्य । पैल निरंजन पूर्णरूप ॥३॥
जया वेद श्रुति म्हणे नेती नेती । जेथे साधूसंती धरिले मौन ॥४॥
दासराम तया संतांचा पायीक । घालतील भीक ऐसी पुढे ॥५॥

## १६३४

अदृश्याचा अग्नी जठराचे पैल । दृश्य तो केवळ कंठावरूता ॥१॥
वाफेचे स्वरूप अदृश्य सोज्वळ । दृश्य ते केवळ मिश्ररूप ॥२॥
मनाते मारोनी चौ शून्ये सांडोनी । देखिजे नयनी गुप्त अग्नी ॥३॥
तयापैल निर्मळ शून्याचे अंतरी । दासरामा निर्धारी स्वयंरूप ॥४॥

१६३५

दृष्टीचा देखणू । पाहे आपणा आपणू ॥१॥
नवल माया दावी द्वैत । होवोनिया देवभक्त ॥२॥
आपुलिया सुखासाठी । चिद्रूपासी झाली गाठी ॥३॥
दासरामाचा स्वानंद । कृष्ण विष्णू हरी गोविंद ॥४॥

१६३६

आकारेची कंचे जहाले देखणे । आकोळला लेणे आत्माराम ॥१॥
सहाय्य तत्त्वाची निश्चळी मिळणी । विरोध तो गुणी आकारिला ॥२॥
निश्चळी निःशब्द निःशब्दातु नाम । जेथे निजब्रह्म ठसावले ॥३॥
दासराम याचा अंगीकार केला । भक्तासी मिळाला आत्माराम ॥४॥

१६३७

अष्टधा प्रकृती दृष्टी शून्य द्वार । देखे चराचर अपवा हरी ॥१॥
अकाळ देखणे द्वैतीचे पहाणे । अद्वयची होणे निजस्वातु ॥२॥
निज तेचि ब्रह्म निज तेचि ब्रह्म । नुरची अनाम रूप काही ॥३॥
डोळा ते आकार आतु निर्विकार । निश्चळी साचार अखंडता ॥४॥
दासरामा ऐसे वर्म हे साजिरे । गुरुकृपे खरे सापडिले ॥५॥

१६३८

हरि तो देखणा । पहाणे तयाचे आपणा ॥१॥
अती चपळ प्रकृती । चिद्गुणाकारे गुणवती ॥२॥
निश्चळ अभेद्य श्रीपती । दासरामाची विश्रांती ॥३॥

१६३९

वाचेपल कंचे निजाचेही निज । साक्षी आत्मराज पूर्णब्रह्म ॥१॥
डोळियाचे बीज वाचा ते उमज । यासी संतराज देती ग्वाही ॥२॥
कानियाचा पाट आत्मया मिळाला । श्रवणाचा झाला विज्ञान डोही ॥३॥
अहंकार लोपला संशयो फिटला । दासराम झाला निजगूजा ॥४॥

## १६४०

दुःख देवोनिया आपणासी हसे । वेगळा तो असे दृश्याहोनी ॥१॥
तोचि एक द्रष्टा चोखटू सुभटा । व्यापी सर्वघटा समभावे ॥२॥
द्वैती सुख दुःख देखोनि लटिके । आपणू कौतुके पाहे आपण ॥३॥
सेवाया आपुले सुख जाला दोन । कोठे भाव भिन्न दासरामी ॥४॥

## १६४१

परेचिया पैल शब्दातीत चक्षू । लक्षी ते अलक्षू सर्व काळ ॥१॥
डोळिया डोळुला काळिया काळुला । पैल हरी निळा गगनगाभा ॥२॥
निःशब्द नयनी देखे आत्मप्रभा । उष्ण शीत आभा आकारिला ॥३॥
चंचळाचे गुणे झाले हे देखणे । दासराम लेणे आत्मयाचे ॥४॥

## १६४२

चंचळ ते माया निश्चळ ते ब्रह्म । अंशभूत सम जीवरूप ॥१॥
स्मरणेची पावे स्वरूपी ऐक्यता । भेटणे अनंता अनंतत्वे ॥२॥
देखणे देखता नुरेचि सर्वथा । आत्माचि तत्त्वता आत्मपणे ॥३॥
जाले नाही ऐसे नाही ब्रह्मी झाले । मिथ्या संबोधिले दुजेपण ॥४॥
चंचळाचे गुणे जाले भिन्न भाव । परी नाही ठाव दुजेपणा ॥५॥
निर्मिती व नाश उगाची बोलणे । अवघेची देखणे द्रष्टयाचे ॥६॥
अस्तित्व अभाव उपाधीसी दोनी । पहाता निरंजनी निरंजन ॥७॥
दासराम नामी उगा स्थिरावला । बोल हा ग्रासिला मुकेपणे ॥८॥

## १६४३

हकारगामिनी धारणा सांडोनी । जीव हा ग्रासोनी राहे उगा ॥१॥
ज्ञान दृष्टी शिवभाव देखे डोळा । तेजाचा उमाळा लखलखीत ॥२॥
सकार हकार सारोनिया दोनी । ब्रह्मबिंदुस्थानी ब्रह्म होय ॥३॥
ब्रह्मची होवोनी ब्रह्मामाजी खेळे । द्वैतभाव चाळे उल्लंघोनी ॥४॥
द्वयाते सारोनी अलक्ष्य लक्षूनी । अद्वैत होवोनी राहे का रे ॥५॥
साक्षी शून्य दृष्टी नासोनी त्रिपुटी । निःशब्दाची दृष्टी होय आघवी ॥६॥
तेणे निजरूप देखे सर्वकाळ । मी तू पण बोल ग्रासोनिया ॥७॥
दासराम सांगे साक्षात्कार कळा । बोलवी तो आगळा स्वामी माझा ॥८॥

## १६४४

आकाशाचे पैल निःशब्दचि शब्द । शब्दाशब्द भेद दूरी राहे ॥१॥
बोलतो हे शब्द स्मरण अशब्द । निःशब्द अगाध अनुभव ॥२॥
वाणीचे मनाचे बोल जै सरती । अनिर्वाच्य स्थिती निःशब्द तो ॥३॥
ते ब्रह्म आगळे मीपणावेगळे । अहंकार मेळे नये दिसो ॥४॥
मीपणे देखेन कोणी म्हणे तया । श्रम शीण वाया शीर्षस्थानी ॥५॥
मीपण दवडोनी जाईल जो क्षण । निःशब्द करून प्रत्यया ये ॥६॥
आकाशाचे पैल एक क्षण जाता । त्याक्षणी देखता आत्माराम ॥७॥
जैसा काळ स्थिती वाढे येणे रीती । तैसी ये प्रचीती दास म्हणे ॥८॥

## १६४५

चंचळ आभास परी वाटे प्रत्यक्ष । दृश्यादृश्य सौरस दावी चक्षू ॥१॥
ऐसी आदीमाया नाना रंग दाविजे । तयापैल तुझे निजरूप ॥२॥
शद्ब साठवण तोचि दिव्य चक्षू । तेणेची अलक्ष्यू लक्षी का रे ॥३॥
शून्यामाजी शून्य मिळता विस्तार । असोनिया स्थिर ब्रह्म माया ॥४॥
नामाठायी शद्ब देखणे अगाध । दासरामा सिद्ध स्मरण ब्रह्म ॥५॥

## १६४६

शून्यची होवोनी शून्याते पहालो । शून्यरूप झालो निःशद्बातु ॥१॥
बोल तो आटला संशय फिटला । अनुभव बुडाला कृतिरूप ॥२॥
लक्ष्यालक्ष्य सरले अद्वय राहिले । पहाणे निमाले चित्तामाजी ॥३॥
अवघाची चक्षुरूप आत्माराम । तेथे दासराम स्थिरावला ॥४॥

## १६४७

कोठेही असलो तरी मीच आहे । गूज देखिले हे सद्‌गुरुकृपे ॥१॥
अभेद हे माझे मुळीचे निजरूप । संकल्प विकल्प तरंगातु ॥२॥
कार्य कारण कर्ता एक आत्माराम । उपाधीने भ्रम वाढविला ॥३॥
संकल्प आकाश विकल्प हा वायू । दृश्य देखे कार्यू चंचळाचे ॥४॥

लोपवी आभास ऐसा जो प्रकाश । व्यापिला चक्षूस द्रष्टेपणे ॥५॥
आपुल्यासी आत्मप्रकाशे आपण । पहाता समाधान आत्मयाचे ॥६॥
विश्वाभास उत्पत्ति प्रलयाचे कारण । पहाता आपण मूळरूप ॥७॥
कर्ता धर्ता हर्ता भोक्ता आत्माराम । वाऊगाची भ्रम संकल्पाचा ॥८॥
बाल भागवत दासराम स्वामी । देखताहे ऊर्मी चंचळाच्या ॥९॥

## १६४८

सर्वांचे आहेती सारखेच डोळे । परी आहे निराळे पहाणे गा ॥१॥
व्यवहारयुक्त डोळा सांगतो व्यवहार । तेणे परमेश्वर दिसेचिना ॥२॥
विद्यायुक्त डोळा सांगे बाह्य ज्ञान । परी आत्मखूण कळेचिना ॥३॥
गुरूराज म्हणे ज्ञानयुक्त डोळा । दावी घननीळा मेघश्यामा ॥४॥

## १६४९

हरी तुला पाहू कसा । जेथे तेथे तुझा ठसा ॥१॥
शुद्ध करोनी चिद्‌गुण । प्रगटे आपणिया आपण ॥२॥
पहाण्यात्‌ आत्मकळा । दावी आपुला निजडोळा ॥३॥
शुद्ध चिद्‌गुण निर्विकल्प । एकतत्त्वी भरले रूप ॥४॥
चिदाकाश ते अभेद । निरंजन स्वतःसिद्ध ॥५॥
दासरामी यः निश्चळ । खेळ खेळूनी हरी न ढळे ॥६॥

## १६५०

हनुमंतरापे कैचा चक्षुपाठ । वदविला स्पष्ट बालाकरवी ॥१॥
किंकरांत कैची जहाली सफळ । निळियात नीळ मिळुनी ठेले ॥२॥
अठराशे एकसष्ट (१८६१) शकामाजी देख । जहाले कौतुक भक्ताचे हे ॥३॥
कृपेची हे वाणी हनुमंतचरणी । अर्पी लोटांगणी दासराम ॥४॥

# भावार्थ हरीपाठ : ५९

१६५१

जीवनप्रकाश देवद्वारी उभा । मोक्षत्वे स्वयंभा पहाणे होय ॥१॥
हरी मूके म्हणा हरी मुखे म्हणा । कोण करी गणना पुण्याचिये ॥२॥
संसरणी असुनी जिव्हा वेगी आली । वेदशास्त्र उकली दो हाती जे ॥३॥
ज्ञानदेव भक्त बोले व्यास खुणा । द्वारकेचा राणा पंचप्राणी ॥४॥

१६५२

चत्वार देहाचे निश्वासी जे प्राण । षट्शास्त्राकारण पुराणी ते ॥१॥
जीवनाचे मंथनी घेईजे अनंता । एरव्ही वाया कथा मार्ग सांडी ॥२॥
जीवशिवासम एक हरी आत्मा । नातरी दुर्गमा मन नेदी ॥३॥
ज्ञानदेव भक्ता हरी वय कुंठ । तोची घनदाट भरला असे ॥४॥

१६५३

जीवनी जे रज अंधार निःसत्त्व । त्रिगुणाचा भाव असार जो ॥१॥
तयापैल गुण अगुण नीं शून्य । सगुण निर्गुण मार्ग ऐसा ॥२॥
हरिवीण मन तेची व्यर्थ होय । सारासार काय शोधुनी पाहे ॥३॥
चराचर प्रार्थी जेथोनी हरीसी । निराकार ऐसी अव्यक्तता ॥४॥
ज्ञानदेव भक्ता ध्यानी रामकृष्ण । अनंत जन्मोन पुण्य होय ॥५॥

१६५४

अस्ति-भावे भक्ती निरूपाधी मुक्ती । आत्मबळे शक्ती उपेगा ये ॥१॥
कसल्या दैवत प्रसन्न त्वरित । न शिणता निवांत उगो उगा ॥२॥
ऐसा कोण गुण हरीसी न भजसी । सायास दिननिशी प्रपंच तो ॥३॥
ज्ञानदेव भक्ता हरिजप करणे । तुटले खेवणे प्रपंचाचे ॥४॥

## १६५५

वायाची उपाधी कैचा दंभधर्म । विधाने संभ्रम योगयागे ॥१॥
अस्तित्वोची देव जो का निःसंदेह । गुरूकृपे अनुभव निश्चयेसी ॥२॥
तपाने दैवत दिधल्याने प्राप्त । गुज तेची हित अंतरीचे ॥३॥
ज्ञानदेव भक्ता दृश्याचा जो अंत । तरणोपाय दृष्टांत साधुसंगे ॥४॥

## १६५६

उपाधी निरसोनी साधुबोधे ठेला । ते ठायी मुराला अनुभव ॥१॥
चत्वार देहाची जीवन सूत्र वाती । उजळता ज्योती समाप्ती ते ॥२॥
मोक्षरेखा भाग्ये भाग्यवान झाला । साधूसी अंकिला हरिभक्त ॥३॥
ज्ञानदेव भक्ता गोडी सत्समगती । हरीची प्रचीती आत्मत्वेसी ॥४॥

## १६५७

परवत आत्मा पर्वताप्रमाणे । पातकाने होणे अभक्तची ॥१॥
भक्तिहीन तेची पतित अभक्त । दुर्दैवी न भजत हरीलागी ॥२॥
होवोनी वाचाळ बरळती बरळ । हरी दयाळ मूळ तया कैचा ॥३॥
ज्ञानदेव भक्ता आत्मा हाचि प्राण । एक परिपूर्ण सर्वाघटी ॥४॥

## १६५८

संतांचे समगती मनोमार्ग गती । आकळी तो श्रीपती याची पंथे ॥१॥
रामकृष्ण वाचा जीवा अस्तिभाव । शिवा आत्मभाव रामजप ॥२॥
एकत्व प्रचीती एकतत्वी नाम । साधिती परम अद्वैत जे ॥३॥
नामामृत गोडी वैष्णवी चाखिली । योग्यानी साधिली जीवनकळा ॥४॥
उत्‌चर उच्चार प्रल्हादी ठसला । उद्धवा जाहला कृष्ण सखा ॥५॥
सर्वत्र दुर्लभ तेणे जो निराळा । तो जाणे विरळा नाम एक ॥६॥
ज्ञानदेव भक्ता नाम हे सुलभ । होत असे लाभ भल्या जीवा ॥७॥

## १६५९

रामकृष्णतत्वी नाही ज्याचे मन । जप विष्णूविण ज्ञान व्यर्थ ॥१॥
उपजे तो करंटा नेणे अद्वयवाटा । रामकृष्णी सुभटा कैचा वसे ॥२॥

द्वैताचे रेचक म्हणे गुरूविण । कैंचे त्या कीर्तन नामी घडे ॥३॥
ज्ञानदेव भक्ता मौनें नामपाठ । ध्यान जे वरिष्ठ सगुणची ॥४॥

१६६०

इडा नी पिंगला सुषुम्नासंगमी । असुनी जीव भ्रमी नाना तीर्थे ॥१॥
नामाविण चित्त तरी सर्व व्यर्थ । पापी असमर्थ न सुटेची ॥२॥
नामविन्मुखता हेची थोर पाप । हरीविण ताप नुरवी कोण ॥३॥
पुराणी प्रसिद्ध वाल्मीकी बोलिले । नामे उद्धरिले लोक तीनी ॥४॥
ज्ञानदेव भक्ता नाम श्रीहरीचे । परंपरे त्याचे शुद्ध कूळ ॥५॥

१६६१

उत्‌चर उच्चारे हरिनाम ज्यासी । अनंत पापराशी जाती लया ॥१॥
सुषुम्नाग्नी मेळे जीवन मीनले । देह तृण उजळे नामे तेची ॥२॥
हरिउच्चारण मन तर अगाध । नसे भूतबाध पंचतत्वी ॥३॥
ज्ञानदेव भक्ता श्रीहरी समर्थ । उपनिषदाही अर्थ गिवसेना ॥४॥

१६६२

अस्तिभावेविण तीर्थव्रत सिद्धी । नेमाची उपाधी उपाधीतें ॥१॥
अस्तिभावे आकळे नातरी नाकळे । करतळी आवळे भक्ता हरी ॥२॥
चैतन्याचा रवा देहाचिये वरी । घेता परोपरी साधन ते ॥३॥
ज्ञानदेव भक्ता निर्गुण निवृत्ती । संपूर्ण ते हाती वृत्तीविण ॥४॥

१६६३

समत्व चित्ताचे हरीची समाधी । जेथे द्वैतबुद्धी उरेचिना ॥१॥
जन्म जे का दुजे नाही ऐसा भाव । बुद्धीचे वैभव केशिराज ॥२॥
सर्व हे उपाधी रिद्धी सिद्धी निधी । मन परमानंदी जव नाही ॥३॥
ज्ञानदेव भक्ता हरीच चिंतन । रम्य समाधान रमे जेथे ॥४॥

## १६६४

नित्य तेची सत्य सत्य तेची मित । कळि न पहात तया दृष्टी ॥१॥
रामकृष्णवाचा हेची महातप । पापालागी काप सुटे जेणे ॥२॥
सुषुम्नेसी हरी मंत्र तो शिवाचा । साधिलिया वाचा मोक्षप्राप्ती ॥३॥
ज्ञानदेव भक्ता नारायण नाम । पाविजे उत्तम उगमस्थान ॥४॥

## १६६५

एकची प्रचीती एकनाम हरी । द्वैतनाम दुरी दुरावले ॥१॥
कलाकुशल ते विरळा हरी जाणे । अद्वैत हे बाणे जयें ठायी ॥२॥
सम नाम सम बुद्धी सम गती । समान श्रीपती शमदमीं ॥३॥
देहादेही सर्व घटी राम एक । सूर्यप्रकाशक सहस्त्रदळी ॥४॥
ज्ञानदेव भक्ता हरिपाठ नेमा । गाठी झाली जन्ममरणाची ॥५॥

## १६६६

चौदेहाचा अंत ज्या बिंदूमाझारी । चमके निर्धारी तेथे कायी ॥१॥
तये बुद्धी हरी जपे तो दुर्लभ । रामकृष्ण सुलभ नाम वाचे ॥२॥
रामकृष्णगती उन्मनी साधिली । म्हणोनी लाधिली सकळ सिद्धी ॥३॥
सुषुम्नेचे पाठी सिद्धी बुद्धी धर्म । निमाले परम प्रपंचीं ते ॥४॥
ज्ञानदेव भक्ता रामकृष्णी ठसा । सत्संगे दशदिशा आत्मा एक ॥५॥

## १६६७

सुषुम्नेचा ध्वनी मूके जरी गाय । देह तोही होय पवित्रची ॥१॥
प्रकाशे प्रकर्षे सामर्थ्य अमूप । तपस्क तो कल्पकोटी नांदे ॥२॥
चतुर्भुज विष्णुस्वरूप ते गोत्र । चतुर्गती नर होऊनी ठेले ॥३॥
ज्ञानदेव भक्ता ज्ञानगूढ लाधले । निर्गत वृत्ती आले सहज हाती ॥४॥

## १६६८

शीर्षमार्ग हरिवंश ते पुराण । हरिनामकीर्तन आन नेणे ॥१॥
वैकुंठ जोडले ज्यासी हे लाधले । तीर्थाटण झाले सर्व त्याचे ॥२॥
मनपवनमार्गे गेला तो मुकला । धन्य तो स्थिरला हरिपाठी ॥३॥
ज्ञानदेव भक्ता रामकृष्णी आवडी । हरिनामाची जोडी जीवनी या ॥४॥

१६६९

निःश्वासी प्रमाण श्रवणी जे वचन । सार नारायण जप एक ॥१॥
तयाते नेणोनी जप तप धर्म । क्रिया नेमधर्म वाऊगेची ॥२॥
सुषुम्नजीवन निवांत ते ठेले । मन ते गुंतले भ्रमरगुंफे ॥३॥
ज्ञानदेव भक्ता हरिनाम शस्त्र । वर्जियेले गोत्र यमानेही ॥४॥

१६७०

नामातून नाम नामसंकीर्तन । जोडिती वैष्णवजन निष्पाप जे ॥१॥
अनंत निश्वासी प्रकाश नामाचा । जेथे एकत्वाचा अनुभव ॥२॥
ऐसे एक नाम तेची एक नाम । मार्ग तो सुगम हरिपाठ ॥३॥
हरिपाठी यागे याग सर्व क्रिया । धर्माधर्म माया लया जाती ॥४॥
ज्ञानदेव भक्ता यज्ञ याग धर्म । हरी हाची नेम नाही दुजा ॥५॥

१६७१

श्वासोच्छ्वासी वेळ तया ग्रासी काळ । तयाचिया पैल नाम आहे ॥१॥
म्हणोनी तयासी काळवेळ नाही । उद्धारची होई साधिलिया ॥२॥
रामकृष्णी नाम सर्व दोषाहरण । ऐक्ये हरी तारण जड जीवा ॥३॥
नामाची जे जिव्हा हरिनामसार । दैवा नाही पार हरिमुखी ॥४॥
मार्ग वैकुंठीचा पूर्वजा हा सोपा । येणे चुकती खेपा जन्मांतरीच्या ॥५॥
ज्ञानदेव भक्ता हरिपाठ सांग । सकाराचे अंग पूर्वजेसी ॥६॥

१६७२

नित्यामाजी नेम तोची नित्यनेम । साधिलिया परम दुर्लभ तो ॥१॥
तयाचिया जवळी लक्ष्मी वल्लभ । सुखरूप स्वयंभ नामयोगे ॥२॥
नारायण हरी नारायण हरी । जीवनी घरघरी चारी मुक्ती ॥३॥
हरीवाचोनिया श्वसन तो नरक । पाहुणा निःशंक यमाचा तो ॥४॥
ज्ञानदेव भक्ता श्रीनिवृत्ती चाड । नाम हेची वाड गगनाहोनी ॥५॥

१६७३

एकतत्त्वी कळा श्रीहरी जो डोळा । दावीतो सोहळा या दृश्याचा ॥१॥
सात पाच तीन दशकाचा मेळा । सहज हे लीळा श्रीहरीची ॥२॥
सर्व मार्गाहोनी नाम हे वरिष्ठ । जयालागी कष्ट न पडती ॥३॥
प्राण उलथलिया अजपा जपणे । निर्धारे रहाणे मनाचे ते ॥४॥
ज्ञानदेव भक्ता नामाविण व्यर्थ । रामकृष्णी पंथ जीवनाचा ॥५॥

१६७४

सर्वाघटी राम हाची शुद्ध भाव । तयासी सावेव जप तप ॥१॥
टाकणे संदेहो हाची धरणे भावो । रामकृष्णी टाहो फुटलिया ॥२॥
भावयुक्त भजन पहाता हे प्रमाण । आवश्य स्वजन गणगोता ॥३॥
ज्ञानदेव भक्ता रामकृष्ण मनी । वैकुंठभुवनी घरघर ॥४॥

१६७५

नामोच्चारी नाही जाणीव नेणीव । हाची मोक्षभाव सदा असे ॥१॥
नारायण हरी उच्चार हा वाचा । प्रवेश काळाचा तेथे नाही ॥२॥
प्रमाण जेथीचे न कळे वेदासी । कळे ते जीवासी काय सांगा ॥३॥
ज्ञानदेव भक्ता नारायणपाठ । सर्व हे वैकुंठ आत्मयाचे ॥४॥

१६७६

एक नाम घट्ट धरी मनालागी । मन काय संगी येई त्याच्या ॥१॥
नाम धरिताची धरी ते या मना । हरीसी करूणा येई जेणे ॥२॥
सोहंचे पालनी तेथ जे राखले । ते नाम शोभले जीवनी या ॥३॥
सद्‌गती सद्‌गद रामकृष्ण गोविंद । आनंदी आनंद जप हाची ॥४॥
नामाचिया परते नाही जे अन्यथा । वेगळिया पंथा जाशी म्हणी ॥५॥
ज्ञानदेव भक्ता जपमाळ अंतरी । मौनेची श्रीहरी जप सदा ॥६॥

१६७७

साही शास्त्री निवडी सर्व सुख गोडी । अवधी नाही थोडी अर्ध घडी ॥१॥
जीवनाची हरीविण येरझार । संसरणी व्यवहार लटिकाची ॥२॥
परिणामी लटिके म्हणोनी लटिके । येथे कोण टिके संसारी या ॥३॥

रामकृष्णी संकल्प कोटी जाय पाप । नाममंत्र जप आन नाही ॥४॥
इंद्रिया सवडी सर्व माया तोडी । न लपता काढी निजवृत्ती । ५॥
तीर्थी व्रती भाव धरीता करूणा । शांती दया पाहुणा हरी होय ॥६॥
ज्ञानदेव भक्ता निवृत्ति देव ज्ञान । हरिपाठ संजीवन समाधी ते ॥७॥

१६७८

सोळा बारा मिळणी मिळुनी अठ्ठावीस । विज्ञानाचे श्वास रचियेले ॥१॥
अभंग हरिपाठ म्हणुनी अठ्ठावीस । प्रगटविले विश्वासे ज्ञानदेवे ॥२॥
इंद्रायणीकाठी नित्यपाठ करी । होय अधिकारी परमार्थाचा ॥३॥
स्वस्थ जे असिजे तेथे एक मन । जीवी हे स्मरण उल्हासाचे ॥४॥
देहा होय अंत हा होय अनंत । संकटाची मात काय तेथे ॥५॥
अंतर्बाह्य तया श्रीहरी संभाळी । कैवारी ज्या बळी पांडुरंग ॥६॥
आळशी मंदमती रहाती ऐलतीरी । गेले पैलतीरी संतजन ॥७॥
निवृत्ती चैतन्य शब्द जो प्रेमळ । तोषले तत्काळ ज्ञानराज ॥८॥
ज्ञानदेव भक्त घाली लोटांगण । ज्ञानाईने कथन केला भाव ॥९॥
भावार्थ हरिपाठ आकळावा म्हणुनी । लागलो चरणी ज्ञानेशांचे ॥१०॥
ज्ञानाईने ठेला मस्तकी या कर । जाहले अंतर भावरूप ॥११॥
भावार्थ हरिपाठ येथ पूर्ण झाला । संध्या नेम भला पांथिकांचा ॥१२॥
निवृत्ती ज्ञानाई नाम बहू गोड । दासरामी आवड त्या नामाची ॥१३॥



# सदानंद पाठ : ६०

१६७९

" रूप पहाता लोचनी । सुख झाले हो साजणी ॥ "
ऐसी ज्ञानेशाची वाणी । वदे अधिकार वाणी ॥१॥
सदा रंगे जो कीर्तनी । भरे ब्रह्मानंदू नयनी ॥२॥
हरिनामी जो निवांत । धन्य धन्य हरिभक्त ॥३॥
दासराम तया शरण । रामरूप जन्ममरण ॥४॥

१६८०

हरिभक्तांकित हरिनामप्रेमी । आनंदाचे धामी आम्ही स्थिर ॥१॥
नाम हेची विश्व नाम हाचि भाव । नाम हाची ठाव श्रीहरीचा ॥२॥
नामी भक्त मीनले चित्कळेसी आले । सदानंदी धाले पूर्णत्वेसी ॥३॥
नाम परिपूर्ण येर सर्व शून्य । दासरामा अन्य कर्म नुरे ॥४॥

१६८१

अहंकारे भेडसावी । निरहंकारे वेड लावी ॥१॥
हे तो भगवंताची लीला । तेथे एकतत्वी कळा ॥२॥
नामकळी परब्रह्म । ऐसा परमार्थ सुगम ॥३॥
संतांच्या प्रसादे । दासराम हा स्वानंदे ॥४॥

१६८२

चित्ताचे देखणे चित्तेची जाणणे । दृश्यादृश्य खुणे लाहिजे का ॥१॥
जाण नेण पैल अध्यात्म अभ्यासू । करी विष्णुदासू तत्त्वता तो ॥२॥
चित्त अणुप्रमाण चैतन्य गहन । ब्रह्म परिपूर्ण नामामाजी ॥३॥
नामाचा उच्चार द्वैताद्वैत खंडन । अक्षर साधन ऐलीकडे ॥४॥
धन्य धन्य हनुमंत संतराय । दासराम पाय हृदयी ठेवी ॥५॥

१६८३

नाम अक्षराचे साठे । नामी द्वैताद्वैत नुठे ।
नामी देव भक्त भेटे । नाम प्रगटे हृदयातु ॥१॥
नाम सकळ विश्वबीज । नाम परमार्थाचे गूज ।
नामी समाधान सहज । ओजस्विता परिपूर्ण ॥२॥
नामपरायण संत । तया भगवंत अंकित ।
सहजानंद ते लुटत । दासराम सेवकू ॥३॥

१६८४

सर्व साधारण अठरा ते वीस । अंगुळे निश्वास गती वाहे ॥१॥
क्रोधाग्नी संतापे होता बेसुमार । छप्पन्नाचे वर गती वाहे ॥२॥
पंधरा अंगुळे निश्वास वहाता । तरी ये स्थिरता सहजेची ॥३॥
द्वादश अंगुळ साधनी निश्वास । समता चित्तास प्राप्त होय ॥४॥
एकादश अंगुळे जरी होय वहाती । तरी काव्यस्फूर्ती आत्मयाची ॥५॥
दशम अंगुळे निश्वास वहाता । अक्षरे देखता दृष्टीपुढे ॥६॥
नवांगुळापासुनी साधी अष्टसिद्धी । असे त्याचा अवधी द्वयांगुळी ॥७॥
एकची अंगुळ वहाता निश्वास । होय नादघोष सुस्वरेसी ॥८॥
जरी होय बंद ऐसा हा निश्वास । दरवळे सुवास चहूठायी ॥९॥
ऊर्ध्वमुख होता देखे साक्षात्कार । दासराम स्थिर अलक्ष्यातु ॥१०॥

१६८५

संधी साधावया साधे निज दृष्टी । तया होय भेटी आत्मयाची ॥१॥
नामी समाधान जोडे भगवान । जेथे संतजन जडूनी गेले ॥२॥
वावग्र सांडोनी तयापैल संथ । सांगे आत्महित तोचि संत ॥३॥
दासराम ऐशा संता शरण गेला । ठाव तो लाधला निरंजनी ॥४॥

१६८६

नाम हेची भक्ती नाम हेची मुक्ती । नामीच विरक्ती संतजनी ॥१॥
नामी होय ज्ञान सरे जाण नेण । आपुला आपण आपुले ठायी ॥२॥
दासरामांतरी प्रगटे नामब्रह्म । सद्गुरूनी परम दया केली ॥३॥

## १६८७

नाम हेची निजकर्म । नाम हाचि चोखट धर्म ॥१॥
नाम व्यापक व्यापक । ब्रह्मांडाचे कारण एक ॥२॥
या नामाच्या बहू कोटी । नाम प्रथम शेवटी ॥३॥
नामी अनंत तरंग । तरी त्यांचे नामची अंग ॥४॥
नामी श्रीरंगाची भेटी । नामाविना न पडे दृष्टी ॥५॥
सगुण निर्गुण दावी नाम । दोनी पैल नामब्रह्म ॥६॥
निःशद्ध हे अक्षर ब्रह्मी । दासराम हा आरामी ॥७॥

## १६८८

अणू आतवरी शून्य । त्यात शद्ध तो गहन ॥१॥
त्याचे करिता शोधन । सत्य पावे ब्रह्मखूण ॥२॥
शद्ध अवकाश । ब्रह्मी तयाचा निरास ॥३॥
शब्दापैल वेदरूप । शब्द ब्रह्म निर्विकल्प ॥४॥
तयापैल शून्य स्थिती । शब्द शून्याची निवृत्ती ॥५॥
पैल निःशब्दातु नाम । स्वयंप्रकाश सिद्ध ब्रह्म ॥६॥
दासरामा ते सद्गुरू । कर्णी बोधिती विचारू ॥७॥

## १६८९

नाम आदि अंती शून्य ते प्रकृती । गुणागुण स्थिती नाही नामी ॥१॥
शून्य ते चंचळ शद्धाचा आकार । निःशद्धाचे सार परब्रह्म ॥२॥
नाम तेची ब्रह्म नाम तेची ब्रह्म । कारण परम नाममात्र ॥३॥
वेदशास्त्र संत वचनाचा कळस । गुरूवाणी सुरस गोड गोड ॥४॥
साधन करोनी जहालिया डोळस । देखे ब्रह्म तेजस गुरूपुत्रा ॥५॥
दासराम कैचा संतशाळे गेला । ओनामा बोधिला श्रीगुरूनी ॥६॥

## १६९०

माया असेल तैशी असो । आम्ही पुसो ब्रह्मासी ॥१॥
सगुण होऊनी करी संसार । काय विचार आम्हासी ॥२॥
मूळ निर्विकल्प नाम । अहं निरहं ब्रह्मलीला ॥३॥
संत सद्गुरू दातार । आम्ही तयांचे किंकर ॥४॥
दासराम मागे दान । सनातन नामवतन ॥५॥

## १६९१

राम राम राम हे ब्रह्म गोविंद । ओते ब्रह्मानंद निजभक्ता ॥१॥
नाम परिपूर्ण विश्व परिपूर्ण । नामाचेपासून विश्व झाले ॥२॥
निःशब्द ते नाम शब्द ते प्रकृती । अक्षर अव्यक्ती कैसे झाले ॥३॥
शब्द शून्यापोटी चराचर सृष्टी । दासराम पाठी नामाचिये ॥४॥

## १६९२

साधन ते नाम साध्य तेंही नाम । साधकू ते नाम संत बोले ॥१॥
अहं सोहं निरहं नाही नामी गोष्टीं । पळाली त्रिपुटी कोणीकडे ॥२॥
दासरामा एक हरिनाम विश्रांती । नाही दिनराती बोलावया ॥३॥

## १६९३

मकारापासोनी आकाश लाघव । मकारासी ठाव चंचळभास ॥१॥
अकार ते शून्य दृश्यादृश्यापैल । तयातु तेजाळ ब्रह्मरूप ॥२॥
मकारी मकार नादाचा प्रकार । तेथोनी विस्तार ब्रह्मांडाचा ॥३॥
बाल भागवत दासराम नामी । देखतसे ऊर्मी चंचळाच्या ॥४॥

## १६९४

शद्वाची हे माया शद्वीच विरो दे । निःशद्वी राहो दे ऐसे करी ॥१॥
ऐसे करी आता बाप कृपावंता । आवडी समर्था पुरवीसी ॥२॥
पुरवीसी माझे मनीचे मनोरथ । चैतन्यातु चित्त मेळवीजे ॥३॥
मेळवीजे मज महाशून्यापैल । जे ठायी निरसेल अहं निरहं ॥४॥
अहं निरहं दोन साक्षी दावी कोणी । तेथे ठेवी म्हणी निरंजनी ॥५॥
निरंजनी ठेवी जेथे वसती संत । हरिभक्तांकित दासराम ॥६॥

## १६९५

वस्तू जवळी जवळी । झाली मीपणे निराळी ॥१॥
अहं निरहं दोन भेद । वस्तू दाखवी अभेद ॥२॥
शून्याठायी झाले द्वैत । शून्यालागी नाही अर्थ ॥३॥
शद्वाआतु अभेद गहन । दासराम निरंजन ॥४॥

१६९६

देवा आम्हालागी नको द्वैताद्वैत । प्रभू तू मी भक्त ऐसे करी ॥१॥
शून्य ते हे द्वैत अद्वैत अव्यक्त । परी महाभक्त नामी रमले ॥२॥
नाम परिपूर्ण स्वरूप गहन । ज्ञानाचे निधान भक्तिसिंधू ॥३॥
नको आम्हालागी विषयांचा भ्रम । तुझी भक्ती परम आवडो दे ॥४॥
अव्यक्त धरवेना डोळा देखवेना । दिसोनी असेना व्यक्त पै गा ॥५॥
व्यक्तामाजी कैचे होय रूपांतर । दोनीमाजी सार नाम तुझे ॥६॥
शब्दाशब्दामाजी सार नामब्रह्म । व्यक्ताव्यक्त अनाम रूपातीत ॥७॥
बाल भागवत दासराम प्रार्थी । नाम असो चित्ती सर्वकाळ ॥८॥

१६९७

हरिनाम हेची ब्रह्माचे दर्शन । प्रकाश जीवन अविनाश ॥१॥
व्यक्ताव्यक्तापैल पावे नामानंद । स्वरूप अभेद स्वत:सिद्ध ॥२॥
सदानंद पाठ उच्चार अवीट । समाधी निघोट संतालागी ॥३॥
बाल भागवत दासराम संती । नित्य मागे भक्ति भाव शुद्ध ॥४॥

१६९८

शब्द ते सगुण अशब्द निर्गुण । व्यक्ताव्यक्त शून्य प्रकृती ते ॥१॥
तयापैल पुरुष देखे जगदीश । नामी अपरोक्ष गुह्य ठेवा ॥२॥
निरपेक्ष निर्विकल्प अनासक्त । व्यापक तो भक्त सर्वाभूती ॥३॥
हनुमंतराये सार ऐसी वाणी । वदविले वाणी भक्ताचिया ॥४॥
कृपेची ही वाणी हनुमंतचरणी । अर्पी लोटांगणी दासराम ॥५॥

१६९९

निर्गुणाचा शब्द स्वयंतेज वाणी । निर्गुणाचा ध्वनिघोष जेथे ॥१॥
द्वैताची आटणी अद्वैताची खाणी । शून्य हे जेथोनी विस्तारले ॥२॥
द्वैत आणि शून्य अनिर्वाच्य वाणी । अर्धमात्रास्थानी निमालीसे ॥३॥
स्वयंतेज बिंदू वरुता अगाधू । देखे सदानंदू स्वयंसिद्ध ॥४॥
सदानंद चिद्गगन निर्गुण सगुण । दृश्यादृश्य कारण हेची दोनी ॥५॥
यापरते आगळे ब्रह्म ते निराळे । वेद श्रुती बोले नेती नेती ॥६॥
संतजन जेथे धरिताती मौन । दासराम शरण तेथे झाला ॥७॥

१७००

निजतत्वातू आत्मकळा । प्रगट बिंदू नाद कला ॥१॥
निःशब्दातू रूपी भेटू । सुखे सदानंद घोटू ॥२॥
नामरूप पहाता एक । चिदाभासाकार देख ॥३॥
चिदाचिद दावी । तेची नामरूप जीवी ॥४॥
आकार हा नाशिवंत । दासरामी दावी द्वैत ॥५॥

(टीपाः- शरीर–रूप नव्हे; नामरूप एक; शरीर-चिदाभास वस्तू झाकण्यास)

१७०१

हरी कृपा करी हरी भक्ता करी । हरीला श्रीहरी भेटलासे ॥१॥
अवघाची हरी व्यापक अंतरी । तयाची कुसरी नवल शोभा ॥२॥
दासरामी ऐसा सदानंदपाठ । हरीच निघोट अक्षररूप ॥३॥

१७०२

वेद शास्त्र पुराणांचे । सार हृद्‌गद संतांचे ॥१॥
तो हा सदानंदपाठ । गुरूकृपा जे चोखट ॥२॥
नाम जयाचे सर्वस्व । धन्य धन्य तो वैष्णव ॥३॥
ऐशा संतांचे संगती । जेंऊ अखंड पंगती ॥४॥
दासराम बोध सेवी । ब्रह्म अन्न मागे चवी ॥५॥



# साधन पाठ : ६१

१७०३

पंचतत्त्वयांचे जहाले शरीर । स्थूल देह साचार जाणिजे पा ॥१॥
वासनेचा देह तयाचे अंतरी । सूक्ष्म तो विवरी चाळकू गा ॥२॥
अज्ञान कारण-देह त्या भीतरी । जाणिले चतुरी भक्तजनी ॥३॥
महाकारण देह ज्ञानमयी पूर्ण । दासराम शरण त्याचे पैल ॥४॥

१७०४

अक्षर ळ मिळणी समत्वाची भरणी । साधोनी साधणी साधी वेगी ॥१॥
रामनामकळा जाणोनि जिव्हाळा । जाणिजे आगळा राजयोग ॥२॥
ब्रह्मा विष्णु महेश सांडोनिया तिनी । पावे ब्रह्मस्थानी गुरूकृपे ॥३॥
चिखलाचा गारा केला ब्रह्मदेवे । चैतन्य स्वभावे ओतियेले (मिळाले ते) ॥४॥
भावाभाव टिकवी चैतन्य ते पूर्ण । तोचि विष्णु जाण सत्वरूप ॥५॥
कफ वात पित्त पेटवोनि तिन्ही । शिव हा जाळोनि टाकी मही ॥६॥
त्रिगुणाची आटणी ब्रह्मासी मिळणी । हे तो संतजनी साधियेले ॥७॥
दासराम संतजनाते शरण । निर्लज्ज होऊन नाचे रंगी ॥८॥

१७०५

उदान तो कंठस्थानी । घोटी अन्न आणि पाणी ॥१॥
प्राण देखे हृदयस्थानी । भाता फुंकितो जेथुनी ॥२॥
करी जठराग्नी प्रदीप्त । अन्नाचा तो रस होत ॥३॥
व्यान देखे नाडीवाटे । वाहवी जीवनाचे पाट ॥४॥
सर्वाठायी टवटवी । रोम रोमाते हालवी ॥५॥
दूषित वायू बाहेर टाकी । अपानाची खूण देखी ॥६॥
अन्नरसाचे रेचक । लीला अघटीत निःशंक ॥७॥
समान तो नाभिस्थानी । राहे समता धरोनी ॥८॥
सर्व संधी वंस करी । सूत्र धरूनी नाचवी दोरी ॥९॥
हालवी जो हातपाय । जणे जीवा तरणोपाय ॥१०॥
दासराम संता शरण । त्यानी दिधले ऐसे ज्ञान ॥११॥

## १७०६

प्राणगती वारे वहाते बाहेरी । आत जाय वैखरी अपान तो ॥१॥
खूण तो जाणेल गुरूपुत्र केवळ । संशयकल्लोळ येरा मनी ॥२॥
प्राणापानामाजी मनाचे मीलन । परमार्थ पूर्ण तया ठाया ॥३॥
दासराम झाला अंतरी शरण । लाधले चरण सद्गुरूचे ॥४॥

## १७०७

पाच तत्त्वामाजी देखे पंचप्राण । देखे पांच गुण तयामाजी ॥१॥
पंच भावावरी पाच गुण झाले । पंचभाव उदेले पाचातोनी ॥२॥
पंच मातृकांचा जहाला प्रणव । विस्तारला अपूर्व पंचशून्ये ॥३॥
शून्यासी गुणिता अवघे येई शून्य । दासराम शून्य शून्यामाजी ॥४॥

## १७०८

तत्त्व गुण जोडी द्वैत भाव दावी । नाही कोणा ठावी संताविण ॥१॥
मन पवन जीव शिव आणि महदशून्य । तेथे खेळ मांडिलासे कारणाचे वीण ॥२॥
केवल अज्ञान केवल अज्ञान । कार्य आणि कारण कर्ता भाव धरी कोणे ॥३॥
शून्य प्रसवले तरी शून्य हाता । शून्याचे परता ठावो नाही ॥४॥
शून्यालागी नाही कारणबंधन । कर्ता कार्य कवण नलगे त्यासी ॥५॥
शून्य प्रसवाया नलगे कारण । महद्भूत पूर्ण देखे देखे ॥६॥
अवघे देखणे केवळ दृष्टीचे । देखे पैल त्याचे मूळरूप ॥७॥
अदृश्य जाणिजे महा महाशून्य । तेथे दृश्य शून्य उदया आले ॥८॥
शब्दाचे देखणे जहाले अंबरी । देखण्याच्या अंतरी शब्द झाला ॥९॥
शब्दाशब्दापैल रूप अभ्यंतरी । दासराम भीतरी ठाव मागे ॥१०॥

## १७०९

साठावरी अंतरी एकसष्टाची जोडी । लावीतसे गोडी खंब्रह्माची ॥१॥
आकाशाचा पाट हृदयीची वाट । भेदियेले स्पष्ट मन बुद्धी ॥२॥
निरालंब मार्ग जेथे न ये जीवन । तयाविण गमन स्वयंरूपे ॥३॥
सद्गुरूनाथाने दाविली हे कळा । जगासी जिव्हाळा सांगावया ॥४॥
कळवळ्याचा बोध कळवळे कळेल । कळवळा दावील कळवळ्याते ॥५॥
दासरामा हेची सद्गुरूंचे दान । अभय ते पूर्ण मागे त्यासी ॥६॥

१७१०

प्रणवाचे पैल आकाशाचा पंथ । चैतन्यासी चित्त मिळे जेथे ॥१॥
चित्कळा जीवन आटे अभ्यंतरी । जाणीवेची परी उरती ना ॥२॥
जीवनाचे बीण प्राण योगावरी । होतसे निर्धारी धारणा ते ॥३॥
गतीवरी स्थिती तेथेची प्रचीती । दासरामा संती सांगितले ॥४॥

१७११

चौशून्ये मिळाली जेथे बा गगनी । चौदेहाची वाणी खुंटे जेथे ॥१॥
केवळ तो वारा केवळ तो कारा । निमाला घुमारा गगनीच ॥२॥
वारियाने केली अघटित कळा । उघडीला डोळा गगनाचा ॥३॥
गगनाची दृष्टी चिन्मयासी भेटी । नुरलीसे दीठी देखण्याची ॥४॥
दासरामा केला सद्गुरूनी बोध । आनंदी आनंद हृद्गदाचा ॥५॥

१७१२

गगनाचे पोटी वारियाची सृष्टी । चित्कळेसी गाठी पडली जेथे ॥१॥
चित्कळा कारण लगण्या जीवन । मूळ जे कारण जडत्वाचे ॥२॥
अन्न प्राण मन आनंदवी ज्ञान । त्याचे पैल पूर्ण साक्षी आत्मा ॥३॥
तयाचे उपरी आकाशाचा पंथ । दासरामा संत बोधिताती ॥४॥

१७१३

आकाशाचा पंथ असे जो अभेद । येणे जाणे छंद नाही जेथे ॥१॥
मन होय पंगू हातपायावीण । जेथे नाही शीण आनंदू गा ॥२॥
प्रवृत्तीसी अंध डोळा उघडीला । आनंद जोडीला निवृत्तीचा ॥३॥
समसुख देखे समाधीची कळा । निर्गुण सोहळा अनूपम ॥४॥
हनुमंत सद्गुरूराजया दातारे । दासरामा सत्वरे सुख दिले ॥५॥

१७१४

नाही अध ऊर्ध्व गगनासी योग । निःशब्दाचा मार्ग लयरूप ॥१॥
दृष्टीचे देखणे आटेल बा जेथे । श्रवण आतौते तेज ब्रह्म ॥२॥
श्रोत्र चक्षू वाणी याचे पैल नाम । आगमनिगम दावीना ते ॥३॥
गुरुनामामाजी देखे सिद्धरूप । दासरामा अपाप गूढ झाले ॥४॥

१७१५

नामीच गगन गगनात नाम । निर्विकल्प ब्रह्म त्याचे परते ॥१॥
नाम ते अढळ उठेना बसेना । दावीतसे खुणा निरंजन ॥२॥
नामी जे अवकाश तेचि हे आकाश । जेथे चिदाभास दृश्य झाले ॥३॥
श्रोत्र हे आकाश दावि ते चक्षूस । जेथे नादवाचेस जन्म झाला ॥४॥
रामराय हनुमंत याच मार्गी गेले । निवांत राहिले निरंजनी ॥५॥
दासराम झाला तेथेचि शरण । धरोनिया चरण मस्तकी या ॥६॥

१७१६

अमृताची धारा जीवासी मारोनी । देती निजध्यानी गुरूराव ॥१॥
कानीयात देती पाट तो सोडोनी । तयाचा उन्मनी डोळा केला ॥२॥
गुरूकृपे कंचे उघडीले नयन । आटोनी जीवन गेले पहा ॥३॥
जीवनाचे विण बिंबें प्रतिबिंबें । अवघा स्वयंभ नारायण ॥४॥
दासरामा केले गुरूनी नवल । बोलविला बोल अबोलाचा ॥५॥

१७१७

वाच्य नामातोनी जहाले अनाम । द्वैतभाव विषम दावीतसे ॥१॥
वाच्य नाम सगुण तोनीची मिळणी । अनिर्वाच्य उन्मनी त्याचे पैल ॥२॥
वाच्य अनिर्वाच्य दृश्य आणि अदृश्य । त्यापैल सौरस ब्रह्म निके ॥३॥
अबोलाचा ध्वनी रामनाम माळी । स्वयंतेज उमाळा गगनी या ॥४॥
निर्विकल्प नामी सकळाचे निराळें । दासरामा आगळे निजरूप ॥५॥

१७१८

कैवल्याचे गगनी कैवल्याचे बीज । कैवल्य सहज त्याची फळे ॥१॥
नाम ते कैवल्य ब्रह्म ते कैवल्य । सद्गुरू कैवल्य ज्ञानदाता ॥२॥
भक्ती ते कैवल्य भाव तो कैवल्य । भजक कैवल्यरूप जेथे ॥३॥
मोक्ष ते कैवल्य दृश्य ते कैवल्य । अदृश्य कैवल्य दासरामा ॥४॥

१७१९

नाद बिंदु कला आणि स्वयंज्योती । देखियेली संती साधनी या ॥१॥
उन्मनीचे पोटी पाऊले गोमटी । हृदय संपुष्टी साठविली ॥२॥
साधनाची कळा पावे समाधान । देहासी हा शीण त्रिविध ताप ॥३॥
संतसंगे आकळे हृदयीची विश्रांती । दासरामा चित्ती नामठसा ॥४॥

## १७२०

गुरूलिंगजंगम सद्‌गुरू परम । दाविला सुगम साधनपाठ ॥१॥
गगनाचे वरी कैसे घालू आसन । लाऊ आता ध्यान कोणते ते ॥२॥
कैसी ठेऊ धारणा कैसे जपू नाम । कैसे ठेऊ वर्म डोळियात ॥३॥
कैसी लाऊ मुद्रा कैसी लाऊ तंद्री । कैसे अभ्यंतरी रूप धरू ॥४॥
अवघाचि होय जेथे नारायण । दासराम कवण उरला तो ॥५॥

## १७२१

साधनाचे गुह्य श्रीहरीचे पाय । कीर्तनेची सोय श्रीरंगाची ॥१॥
गंध रस रूप स्पर्शाचे उपरी । गगनाचा भारी पंथ बरवा ॥२॥
अंतर्मुख वृत्ती संशय निवृत्ती । येणे निरसती जन्ममरण ॥३॥
येचि देही देखे जन्म आणि मरण । तयाते दवडोन मोक्ष लाही ॥४॥
पुण्य आणि पाप जाळोनिया दोनी । होई ब्रह्मस्थानी ब्रह्मरूप ॥५॥
साधुमहाराजांचा घेईजे प्रसाद । स्वये ब्रह्मानंद भेटो येई ॥६॥
अरूप अनंत निरंजन लाही । दासराम लाही गुरूमुखे ॥७॥

## १७२२

साधनाचा पाठ हनुमंतमाये । वदवीला स्वये बालाकरवी ॥१॥
बाल ते लेकरू गीती नाचे आनंदू । प्रसादेची छंदू शीर्षस्थानी ॥२॥
साधनाचा पाठ निंबरगीसी गाय । तेणे स्वये होय परब्रह्म ॥३॥
रेवणसिद्धराज जहाले प्रसन्न । कैचा कृपाघन कोसळला ॥४॥
कृपेची उत्तरे धरोनिया प्रेम । अर्पी दासराम हनुमंता ॥५॥



# रेवणसिद्ध पाठ : ६२

१७२३

रेवणसिद्ध माझी कृपेची माऊली । दयेची साऊली सर्वकाळ ॥१॥
अनाथ्या उद्धारा धावोनिया आली । लेकरा कवळी प्रेमभरे ॥२॥
भक्तांची आवडी वाट पाहे कैसी । मूर्ती जे प्रेमाची ओतियेली ॥३॥
सिद्धरूप कैसे सिद्धासनी साजे । दासराम भजे हृदयातु ॥४॥

१७२४

बाळ हे खटपाळ आले तुजपाशी । परी तुझ्या प्रेमासी सीमा नाही ॥१॥
अवगुणी म्हणोनी नाही तू वंचिले । आपुलेची केले कैशापरी ॥२॥
सर्व विसरोनी माझी हीन कर्मे । हरीचिया नामे वेडे केले ॥३॥
किती तू उदार बाप रेवणसिद्धा । दिले परमानंदा दासरामा ॥४॥

१७२५

का न बोलसी आता सांग रेवणसिद्धा । देखोनी मतिमंदा कवणेपरी ॥१॥
काय तुझे मनी न कळेची माते । चुकले काय ते माझेकडे ॥२॥
काय करू आता सांगिजे ते तरी । स्तुती कोणेपरी करू तुझी ॥३॥
लेकरा न बोले माय ऐसे न घडे । दासरामा आवडे तुझे बोल ॥४॥

१७२६

कोण्याठायी आता मग्न तू झालासी । समाधी हे कैसी किती वेळ ॥१॥
कोण्या भक्ताकडे गेले तुझे मन । का पहासी मन माझे तरी ॥२॥
धावला का तुम्ही सद्गुरू हाकेसी । शिवानंद घोषी रमला का ॥३॥
प्रसन्नतेविण नाही समाधान । आता तुझे मन कळो माते ॥४॥
तुझे लक्ष लागो लाडक्या भक्तासी । दासराम ऐसी भीक मागे ॥५॥

## १७२७

कैचो माझो भक्ती कैचा माझा ध्यास । कैचा माझा सोस तुझ्याकडे ॥१॥
हेचो पहासी काय सांग रेवणसिद्धा । न घेई अगाधा चाचणी हे ॥२॥
काय करी भक्त धरिलिया मौन । पाहू नको मन माझे आता ॥३॥
धीर धरवेना क्षणैक रहावेना । पाहता लोचना समाधान ॥४॥
दासरामा हेचो नित्य घडो दर्शन । परी न धरी मौन बोले काही ॥५॥

## १७२८

दोन पामरासी तुझाचो आधार । न पडो विसर तुज याचा ॥१॥
हनुमंत सद्‌गुरू बोळले संपूर्ण । म्हणोनी चरण दर्शनाचे ॥२॥
तुझे वेड मज लावियेले त्यानी । परी तू निरंजनी गुंगलासी ॥३॥
काय करू आता मारोनिया हाका । त्रैलोक्यनायका बोल आता ॥४॥
हनुमंतसद्‌गुरू स्मरणी दर्शन । तरी का हे मौन सांग माये ॥५॥
दासराम आता लोळे तव पदी । राहतो आनंदी नामगजरे ॥६॥

## १७२९

तुझे द्वारी आम्ही होवोनिया श्वान । नाम भुंकू गहन पदोपदी ॥१॥
निरंजन स्वरूपी कोठे आहे भक्ती । तरी येसी वृत्तिवरी केव्हा ॥२॥
तेव्हा आम्ही देऊ तुज कडिये मिठी । सांगे गुजगोष्टी निरंजनीच्या ॥३॥
पुरविसी कोडकौतुक आपण । दयाघन पूर्ण रेवणसिद्धा ॥४॥
दासरास भक्त नाममुद्रांकित । वाट ते पहात कौतुकाची ॥५॥

## १७३०

केवल ईक्षणे पावते जे सुख । त्रैलोक्यनायक रेवणसिद्धा ॥१॥
ऐशा सुखापुढे तुच्छ हे ब्रह्मांड । अमृत बहु गोड विसरावे ॥२॥
दृश्यादृश्य ओवाळुनीया टाकावे । स्वर्गीचे सांडावे नंदनवन ॥३॥
मुखकमळाची शोभा ते अद्‌भुत । दासराम-चित्त धाले तेथे ॥४॥

## १७३१

आत्मरूपी झाली पहाण्याची आटणी । द्वैताची झाडणी निश्चळू गा ॥१॥
चंचळू लहरी कल्पना कूसरी । आपण श्रीहरी द्वैती आला ॥२॥
निश्चळी प्रकाशे गगनाचा गाभा । घनानंद स्वयंभा आत्मचक्षी ॥३॥
दासराम कैचा तेथे विनटला । लाभ बहू केला रेवणसिद्धे ॥४॥

## १७३२

भव्य सिद्धमूर्ती प्रसन्नता चिती । पहाताची शांती लाभे चित्ता ।।१।।
मन पराङमुख जहाले स्मरणी । देहभाव चरणी निमालें हो ।।२।।
सर्व सिद्धामाजी झळके रेवणसिद्ध । लाजे ब्रह्मानंद यासी पहाता ।।३।।
दासराम चरणी कैचा विनटला । रंगात रंगला सिद्धनामी ।।४।।

## १७३३

जगाचा नियंता सर्वाठायी सत्ता । विश्वाचा जनिता रेवणसिद्ध ।।१।।
करवीर क्षेत्री नव कोटी सिद्धासी । कारागृहवासी सोडविलें ।।२।।
रमकदेवी सुंदरी जहाली शरण । सामर्थ्य देखून सिद्धाचे या ।।३।।
तिने विष दिले कराया प्राशन । तव ते शिवार्पण जहाले वो ।।४।।
दासराम प्रभु ऐसा सत्ताधीश । परमार्थी आस सकळ पुरवी ।।५।।

## १७३४

मृत शरीरेही जेणे उठविली । ते माझी माऊली रेणाई वो ।।१।।
मरूळसिद्धा ज्यानी केले आपणा ऐसे । लावियेले पिसे संतजना ।।२।।
पुण्यवंत सज्जना देवोनी दर्शन । केलेची पावन निमिषमात्रे ।।३।।
दासराम लोळे मातेचिया पायी । मुखी नाम गाई रेणाईचे ।।४।।

## १७३५

नाभीकमलातोनी वाहे शुद्ध गंगा । चर्चियेली अंगा दिव्य विभूती ।।१।।
जटाजूट मस्तकी त्रिशूळ ते हाती । चरणी शोभती पादुका ते ।।२।।
एका हाती स्मरणी खांद्यावरी झोळी । तेजःपुंज उजळी नवलप्रभा ।।३।।
शिवनामी वाणी रंगोनिया गेली । कंठी ते आगळी रूद्राक्षमाळा ।।४।।
ऐसा माझा मायबाप रेवणसिद्ध । ब्रह्मानंदकंद दासरामा ।।५।।

## १७३६

जयरामपंतांसी देवोनी दर्शन । केलेसे पावन रेवणसिद्धे ।।१।।
पाठविले त्यानी सद्‌गुरू दावोनी । कृष्णदासाकडोनी उपदेशिले ।।२।।
जयरामस्वामी धन्य धन्य झाले । कृष्णदास भले गुरूभक्त ।।३।।
हनुमंतराया दर्शन देवोनी । रेवणसिद्धानी काय केले ।।४।।
आपरूप करूनी कीर्तिमान केले । दासरामा लाधले चरण गुरूचे ।।५।।

१७३७

धन्य रेवणसिद्ध धन्य मरूळसिद्ध । धन्य काडसिद्ध भगवान ॥१॥
एकोराम सिद्ध पंडिताराध्येय । धन्य सिद्धराय सिद्धजनी ॥२॥
गुरूलिंगजंगम सिद्ध ते परम । माऊली उत्तम लक्ष्मीआक्का ॥३॥
साधुमहाराज धन्य रामराय । धन्य संतराय ब्रह्मांडी या ॥४॥
धन्य ते सद्‌गुरू हनुमंतराय । दासराम पाय सेवी त्यांचे ॥५॥

१७३८

तुजकडे आम्ही सोपविली भक्ती । सर्व भार प्रीती वाहिलासे ॥१॥
तूचि करी आता सर्व हा व्यवहार । स्वताचा विसर पाडोनिया ॥२॥
शब्दाचिया पैल पूर्ण रूप तुझे । कैचे ते विराजे शून्यापैल ॥३॥
आथिले नाथिले सर्व हे तुझेनी । असोनी नसोनी सारिखेची ॥४॥
अवघाची सर्व माझा नारायण । दासराम कवण उरला तो ॥५॥

१७३९

रेणाईचे स्थान परम पावन । तेथे त्रिभुवन ओवाळावे ॥१॥
ब्रह्मा विष्णु रूद्र सुखावले जेथे । सुखराशी येथे एक झाली ॥२॥
सिद्धजन जया गाताती अपार । धन्य सर्वेश्वर रेवणसिद्ध ॥३॥
नवनाथ ज्यांचे येताती दर्शना । महाभक्त ध्याना आणती ज्या ॥४॥
संतांचिया सरिता मिळाल्या बा जेथ । सागर समर्थ रेवणसिद्ध ॥५॥
आद्य सद्‌गुरूनाथ कैलासीचा राणा । करी गुण-गाना प्रेमभरे ॥६॥
चिन्मयाचे पंथी भक्तासी हे वारी । दुःख हे निवारी सकळही ॥७॥
रेवणसिद्धासी पहाता डोळे भरून । नुरे देहभान चिन्मयासी ॥८॥
दासराम चिन्मयी चिन्मयासी धाला । चिन्मय देखिला रेवणसिद्ध ॥९॥

१७४०

रेणाई रेणाई करिता नामघोष । नातळती दोष सर्वथा ते ॥१॥
स्मरणमात्रेची चित्त होय शुद्ध । प्राणी जे का बद्ध मुक्त होती ॥२॥
पुण्य पाप दोनी ठायीच निमाले । अवघे नटले रेवणसिद्ध ॥३॥
चिन्मयाचे स्थानी सकळ चिन्मय । दासरामा सोय सिद्धपदी ॥४॥

## १७४१

रेणाईचा पाठ गाय मूढमती । कृपाकर माथी म्हणोनिया ॥१॥
नामाच्या गजरे नाचेन स्वानंदे । नाशिवंत छंदे नुरवोनी ॥२॥
अहंकार नाशी भेडसावी मनासी । भेद जो चित्तासी दाविताहे ॥३॥
रेवणसिद्ध बोले ऐके बाळ भक्ता । तुझी सर्व चिंता मज आहे ॥४॥
भक्त बोले देवा जे जे घडे ते ते । कल्याण आइते होत आहे ॥५॥
तरो अथवा बुडो तुझ्या गोड नामी । संतसमागमी निजकृपे ॥६॥
कृपेची हे वाणी हनुमंतचरणी । अर्पी लोटांगणी दासराम ॥७॥

## १७४२

चित्ताचा विकास आत्म्याचा प्रकाश । जेणे भासाभास दृष्टी पडे ॥१॥
रेवणसिद्धानो दिले आत्मज्ञान । ज्योत निरंजन पेटविली ॥२॥
होवोनी प्रसन्न दिला आशिर्वाद । दासराम आनंद स्वरूपी धाला ॥३॥

## १७४३

नामरस मज चाखवी गा देवा । उपजोनी हेवा प्रपंचाचा ॥१॥
रेणाई रेणाई धाव माझे आई । स्तनपान देई तहानुलिया ॥२॥
कवटाळी जैसी माय लेकरासी । प्रीती करी तैसी मजवरी ॥३॥
तुझियावाचून प्रेम कोण करी । कटीसी सत्वरी मिठी दिली ॥४॥
दासराम नामरसा लाचावला । प्रेमपान्हा दिला रेणाईने ॥५॥

## १७४४

आई आई गे रेणाई । येई येई झडकरी ॥१॥
नामी गातो तुझी कीर्ती । सकळ चित्ती संतोष ॥२॥
सिद्धनामी तुझी भेटी । आशा पोटी न राहे ॥३॥
दासरमावरा दान । समाधान तव नामी ॥४॥

# नारायण पाठ : ६३

१७४५

नाम नये सकामपणे । आलक्ष्याचे जे ठेवणे ॥१॥
आदिअंती एकू नाम । शून्याठायी समविषम ॥२॥
जीव मारूनी आत्मपणे । जीववोनी नामी रमणे ॥३॥
नामी नामाचे स्मरण । स्वयंनाम निरंजन ॥४॥
लक्ष्यालक्ष्यापैल नाम । मौनावला दासराम ॥५॥

१७४६

वज्रमुद्रेचे साधन । जेणे अकळे सहज खूण ॥१॥
सप्तमुद्रा ते आगळी । गुरूभक्ता उमगली ॥२॥
आलंबाचा प्रथम मार्ग । निरालंबी पुढे योग ॥३॥
तयावरी गुप्त वाट । आत्मस्वरूपानंद प्रगट ॥४॥
प्राण अंगुष्ठ अदृष्ट । ब्रह्मरूपता चोखट ॥५॥
दासराम सहज नामी । समाधाने धाला रामी ॥६॥

१७४७

लागली टक चरणासी । बहू सुख झाले चित्तासी ॥१॥
राजयोग गुरूकृपा । भक्ताजना मार्ग सोपा ॥२॥
कैचा लीन दासराम । मुखातु सद्‌गुरूचे नाम ॥३॥

१७४८

हरिकीर्तन परंपरित । भक्त नामानंदी रमत ॥१॥
स्वानंदाधिपती संत । नामी नुरे द्वैताद्वैत ॥२॥
कीर्तनभक्ति प्रवर्तक । नारदादी सनकादिक ॥३॥
प्रल्हाद ते तालधारी । नाम गर्जे दिगंतरी ॥४॥
दासराम वाहे टाळी । साधुसंतांचिया मेळी ॥५॥

१७४९

हरिकीर्तन भक्तिजनक । नारदादी सनकादिक ॥१॥
कीर्तनभक्ति प्रवर्तक । श्रीहरीचे जें कौतुक ॥२॥
ज्ञानदेव एकनाथ । तुका नामदेव संत ॥३॥
कीर्तनभक्ती पुरस्कर्ते । मार्गदर्शी ज्ञानदाते ॥४॥
रामचंद्र हनुमंत । धन्य महाभक्त संत ॥५॥
हरिकीर्तन परंपरित । धन्य गोविंद रघुनाथ ॥६॥
संतजनी ऐसा मान । देती सद्गुरू भगवान ॥७॥
दासराम ताल धरी । नाचे नामघोष गजरी ॥८॥

१७५०

नामाचिये स्थानी नामाचे स्मरण । नामी आपुलेपण ब्रह्मरूप ॥१॥
कोणे परी साधू आसन बंधन । लावू आता ध्यान कोणते ते ॥२॥
कैची लावू मुद्रा कैची लावू तंद्री । कैचे अभ्यंतरी रूप धरू ॥३॥
बोलू आता काय नामाचिये ठायी । रामी कोण पाही दासराम ॥४॥

१७५१

तुझा भार तुझें माथा । भक्ताहाती टाळ कथा ॥१॥
सुखदुःख तुझे तुज । येथे काय माझें मज ॥२॥
तुझी लाभो तुज माया । कासया मी शिणवू काया ॥३॥
तुझी उपाधी तुजला । दासराम हा मोकळा ॥४॥

१७५२

नम्रतेची ऐसा होवोनिया ठेलो । तुझा भक्त झालो एकाएकी ॥१॥
आथिले नाथिले नाही ऐसे झालें । बोल उडविले अबोलेची ॥२॥
बोल अबोलणे जीवेसी ग्रासिले । नामातू साठले आपुले रूप ॥३॥
दासराम आत्मा रामनामी धाला । संती आकळिला गगनगाभा ॥४॥

१७५३

संकल्प तो ब्रह्मदेव । देवांचाही बडा देव ॥१॥
निरहंभाव देखे विष्णू । आदिमाया ते देखणू ॥२॥
अहंकार रूद्र रूप । जीव शून्य ऐसा अल्प ॥३॥
निःशब्दांश तोची शिव । रामकृष्ण जीवभाव ॥४॥
दासराम शरण संती । कृपा केली तै एकांती ॥५॥

१७५४

देखणे हा साक्षात्कारू । दृश्यादृश्याचा विस्तारू ॥१॥
ऐसे स्वरूप अगाध । ज्याची सत्ता स्वयंसिद्ध ॥२॥
दृष्टी होता निर्विकल्प । दृष्टीआत् ब्रह्मरूप ॥३॥
दासरामा हाची छंद । जेणे जोडे ब्रह्मानंद ॥४॥

१७५५

आपुलिये ठायी आपुले आपण । केवल स्मरण अविनाश ॥१॥
आवडीचा घोटू करिता चोखटू । द्वैताद्वैत रहाटू स्थिर होय ॥२॥
आसाभास सत्य स्वरूपी निमाले । मुळीचे देखिले दिव्य संती ॥३॥
तत्त्ववेत्ते संत अंकित ते भक्त । दासरामे चित्त दिधले तेथे ॥४॥

१७५६

पद्ममुद्रा हंसमार्ग । वरिष्ठ हा राजयोग ॥१॥
हरिनामाचा सुपंथ । गगन हे नुरे जेथ ॥२॥
नामी स्वये ओळखण । आपुले ठायी ते आपण ॥३॥
दासराम स्थिरावला । बोले अबोलाच्या बोला ॥४॥

१७५७

मीतूपणाचे नाही काम । अवघा माझा राजाराम ॥१॥
हे तो भरंवशाचे बोल । पाठिराखा गुरूदयाळ ॥२॥
नामसंपन्न ते भक्त । तेणे दाविली हे मात ॥३॥
निःशद्बातू नामब्रह्म । मौनावला दासराम ॥४॥

१७५८

शब्दग्रास महाशब्दी । परी विरे तो अशब्दी ॥१॥
शब्दरूप चंचळ भास । प्रकृती ते दृश्यादृश्य ॥२॥
अशब्दाचे वरी शून्य । तया उपरी स्वयंस्मरण ॥३॥
स्मरणामाजी देखे नाम । निःशब्द जे पूर्ण ब्रह्म ॥४॥
दासरामा ऐसी खूण । दाविताती संतजन ॥५॥

१७५९

संतवचनाचे हृद्‌गद । बोले म्हणती रामानंद ॥१॥
ते हे अविनाश पाठ । गुरूकृपेचे चोखट ॥२॥
हनुमंत सद्‌गुरू देव । त्यानी दिधली निज ठेव ॥३॥
रामकृष्ण हरी गोविंद । हृद्‌गदाचे हे हृद्‌गद ॥४॥
दासरामा तोची छंद । सेवी संतवचनानंद ॥५॥

१७६०

सकळ उपाधी निरसोनी । पहाणे आपणा आपुलेपणी ॥१॥
हे तो अध्यात्माचे ज्ञान । निश्चळातू स्वयंपूर्ण ॥२॥
चंचळता हे निश्चळी । दृश्यादृश्य अंतराळी ॥३॥
शद्वापैल नामोच्चार । संती सुपंथ साचार ॥४॥
धन्य गुरूलिंगजंगम । दासरामा दाविती वर्म ॥५॥

१७६१

मूलाधार बंध आसनाने सिद्ध । उढीयाणा बंध निग्रहाने ॥१॥
कंठस्थानी लावोनिया हनुवटी । नासिकाग्र दृष्टी साधिलीया ॥२॥
तयेलागी म्हणती जालंधर बंध । राजयोग सिद्धनाथ पंथी ॥३॥
दासराम करी सिद्धजना नमन । कैची वर्मखूण साधनाची ॥४॥

१७६२

अलक्ष्यासी लक्षी डोळचापैल होवोनी । गगनी सहजासनी सहज दृष्टी ॥१॥
लक्ष्यालक्ष्य सारूनी होई स्वयंसिद्ध । ब्रह्म जे अगाध निरंजन ॥२॥
रेवणसिद्धानी दिली खूण निको । स्वानंदाचे सुखी संतजन ॥३॥
दासराम कैचा विनटला पदी । सहज समाधी सहज नामी ॥४॥

१७६३

त्रिगुणा उपरी दृष्टी । दिव्यपणे चिन्मय भेटी ॥१॥
दाविताती सद्‌गुरूनाथू । ठेवोनिया मस्तकी हस्तू ॥२॥
ब्रह्मकपाटी त्रिनेत्र । कृपा करितो सत्वर ॥३॥
नारायण दाविती वर्म । चरणी लोळे दासराम ॥४॥

१७६४

सगुण दृष्टी निर्गुण दृष्टी । शून्य दृष्टी दिव्य दृष्टी ॥१॥
त्याचे पैल सहज दृष्टी । गाठी पडे जगजेठी ॥२॥
सगुणामाजी तीन भेद । निर्गुण ते अभेद ॥३॥
दासराम सहज नामी । कृपावंत समर्थ स्वामी ॥४॥

१७६५

दृष्टी मिटलिया तामस ते दृष्टी । राजस ते दृष्टी नासिकाग्री ॥१॥
सात्त्विक ते दृष्टी भृकुटीमाझारी । तयाचे उपरी निर्गुण दृष्टी ॥२॥
शून्याचिये स्थानी लाविली जै दृष्टी । तिसी शून्य दृष्टी बोलताती ॥३॥
तयाचिये वरी सहज ते दृष्टी । दासरामा भेटी निरंजनी ॥४॥

१७६६

हरिभक्ति उत्पादक । महाभक्त पुंडलीक ॥१॥
कीर्तनभक्ति प्रसारक । निळोबादी संत देख ॥२॥
हरिकीर्तन भक्तिमंत । सखे सज्जन हरिभक्त ॥३॥
हरिकीर्तनी आनंदित । दासराम पायी जडत ॥४॥

१७६७

विचार ते शद्ब शद्ब ते विचार । शून्य निर्विकार त्याचे परते ॥१॥
तयावरी स्मरण पूर्ण नाम ब्रह्म । निःशद्बातू परम गगनगाभा ॥२॥
निश्चळी चंचळ विमली शबल । शद्ब अंतराळ भासमय ॥३॥
निळी खुलावट दिसे अंतराळी । शद्ब ते पोकळी चंचळ वायू ॥४॥
शून्यामाजी शून्य तया अर्थ शून्य । दासराम अनन्य हरिरूपी ॥५॥

१७६८

जीवरूपी तेची अहंकारी जे शिरले ।
शिवस्वरूप ते निरहंकारी उजळे ॥१॥
नामामाजी जैसे तैसे ते स्वरूप आपुले ।
मीतूपण नासे शब्दाशब्द जे सरले ॥२॥
असोनी नसोनी दृश्यादृश्य सम दोनी ।
शून्याकार शून्याकाश पूर्ण निरंजनी ॥३॥
दासराम नाहीपणे आत्मरूपी ठेला ।
जयाचा व्यापार त्याचे माथी अर्पियेला ॥४॥

१७६९

आम्ही श्रीहरिकीर्तनकार । नाचू देवाचे समोर ॥१॥
झालो संतांचे लाडके । त्यानी गौरविले कौतुके ॥२॥
बाल भागवत प्रल्हाद । संबोधिती रामानंद ॥३॥
धन्य रामानंद संत । जया भगवंत अंकित ॥४॥
दासराम संतापायी । प्रेम ठेवितसे डोई ॥५॥

१७७०

हृव्यवाहन मुद्रा लाधली या संती । सर्वेश्वर भक्ती भाव शुद्ध ॥१॥
कैचा साधे श्वसन समासन बंध । कटिशद्ध सिद्ध अद्वय नाम ॥२॥
केवलस्मरणी ब्रह्माचे दर्शन । शद्वाशद्व शून्य उरेचिना ॥३॥
अवघाची जेथे झाला नारायण । दासराम कवण उरला तो ॥४॥

१७७१

अस्तित्वाचा भाव स्मरण तो देव । निरंजन ठाव शून्यापैल ॥१॥
सहस्त्रदलाचे वरी शून्यस्थान । तयावरी शून्य शून्यत्वाचे ॥२॥
नामातू मिळाले सकळ संतजन । द्वैताद्वैत शून्य नाही जेथे ॥३॥
निःशद्वाची आभा दिपविले नभा । प्रगटली स्वयंभा निळी खाण ॥४॥
निळीयाची खाण शद्व तो गहन । चंचळत्व पूर्ण भासरूप ॥५॥
केवल स्मरणानंदू भगवान । कैचे निरंजन दासरामी ॥६॥

१७७२

हनुमंतकृपे नारायण पाठ । गाईला अवीट आदरेसी ॥१॥
प्रसादाची आली मुखात उत्तरे । स्मरणाचे झरे हृदयातू ॥२॥
विश्वास धरोनी राहाता निवांत । शुद्धमती भक्त होय कैचा ॥३॥
समाधान वाणी हनुमंतचरणी । अर्पी लोटांगणी दासराम ॥४॥



## जीवन पाठ : ६४

१७७३

निजांगोचे पोटी जन्मला भ्रतार । जहाला जोजार स्वतासी त्याग ॥१॥
असोनी भ्रतार आपणा विसरला । हुडकितो वहिला मायबापा ॥२॥
येथे कोण माय येथे कोण बाप । उगाच संताप भ्रताराचा ॥३॥
भ्रतारासी नाही नाही ठावोठाव । त्याचे रूप नाव ठावे त्यासी ॥४॥
दासरामा पोटी अनुभव गोठी । दाविती हातवटी सद्‌गुरूनाथ ॥५॥

१७७४

पहाण्याने कैंचे पहाणे पहाले । पहाणे पै जाले पहाणेंची ॥१॥
ऐसे हे विज्ञान गुरूनाम सखोल । हृदयातु ओल विश्वासाची ॥२॥
अबोल अकळ दाविती नवल । श्रीहरी दयाळ सद्‌गुरूनाथ ॥३॥
हनुमंतकृपा सदैव अगाध । दासरामा बोध हृद्‌मदाचा ॥४॥

१७७५

जीवनाची दसपट त्याची एकवट । हृदयाकाशी निघोट जीवन तेज ॥१॥
तयाआतु प्रकाश सूर्यचंद्र लोपवी । नादापैल ठावी पाडी वस्तू ॥२॥
कान आणि चक्षू यामध्ये ऐकणे । शद्वोच्चार गिळणे प्रणवातु ॥३॥
दासरामा कळ अंगुलिनिर्देश । दाविती सौरस सद्‌गुरूनाथ ॥४॥

१७७६

पहाणे ते कैंचे पहाणेपणा आले । पहाणे ओघळे पहाणीरा ॥१॥
पहाणे पोहले पहाणीपणा आले । पाणी होऊनी ठेले जीवनरूप ॥२॥
पहाणे लपाले उजेडासी आले । देवभक्त झाले दोन परी ॥३॥
देखणेचे पहाणे गिळोनी रहाणे । मग आपुलेपणे स्वरूप देखे ॥४॥
जेथे तेथे ठाण संत त्या शरण । दासराम चरण वंदी भाळी ॥५॥

## १७७७

पहाणे पहाता उगाचि सरले । पहाणे उरले निर्विकल्प ॥१॥
तेथे लागे तंद्री मुद्रा अगोचरी । परचेही परी नुरली माये ॥२॥
जीवनाचा पाठ दावी जगज्जीवन । जनी जनार्दन परमात्मा ॥३॥
दासरामा तेची उगलें निरंजन । सद्गुरू निधान हनुमंत ॥४॥

## १७७८

आलट पलट दृश्यादृश्य पहाणी । त्याची कमावणी तोची डोळा ॥१॥
डोळिया ग्रासोनी पाहिजे पहाणे । जेथोनी देखणे उदया आलें ॥२॥
पहाण्याचे बुडी स्वरूपाची पहाणी । जेथे निरंजनी ठाव दिला ॥३॥
पहाणे व्यापिले पहाणेपणाने । अविनाशपणे मुळीच ठेले ॥४॥
तेथोनिया ब्रह्मांडाची उभारणी । वस्तूसी हे करणी ठावी नाही ॥५॥
पहाण्याचेवीण पहाण्यासीं ठाव । वस्तूलागीं भाव ठावो नाही ॥६॥
पहाण्याचे परती निरंजन भेटी । दासरामा त्रिपुटी नाही जेथे ॥७॥

## १७७९

आकाशी ते गंगा निळी । कळा जीवनाची फुलली ॥१॥
भासे जहाला आभास । तयापैल तो सर्वेश ॥२॥
स्वप्नामाजी जाले स्वप्न । नाथिले जागृती गगन ॥३॥
दासराम सद्गुरूचरणी । ताल धरितो कीर्तनी ॥४॥

## १७८०

जीवनाचे मुळे वायु तो वाहिला । शब्दोच्चार झाला हेत्वर्थाचा ॥१॥
शब्द तो कारण शब्द तो कारण । अशब्द जीवन रूप देही ॥२॥
अमृता अमृतपण पैं गा पाले । गुरूनामी लपाले पावले कृपे ॥३॥
दासराम धरी चरण मस्तकी । तीनी गुण सुखी विसावोया ॥४॥

## १७८१

पृथ्वीतल आणि गगन बा एक । दृक् शब्द सम्यक् हुंकारीचा ॥१॥
दृश्यादृश्य अनुभव दावीतसे शब्द । भेद आणि अभेद दाखवी जो॥२॥
तीन भूते सांधिली त्रिगुणे बांधिली । जीवातु ओविली आत्मकळा ॥३॥
शब्दे हिताहित शब्दे नाना पंथ । शब्दाठायी संत दासराम ॥४॥

१७८२

अपरा आधार परेचा विचार । अगोचर सार दोनीपैल ॥१॥
गुह्य ते साचार हेतूची आटणी । पहाणीरा सांडोनी स्वरूप पहाणी ॥२॥
दृष्टीची पहाणी दृष्टीत राहिली । जाण नेण नुरली वृत्तीकळा ॥३॥
दासराम झाला तेथेची शरण । केलेसे ईक्षण संतजनी ॥४॥

१७८३

संतजनी प्रेम भक्तिभाव थोर । देही साक्षात्कार नवल हेची ॥१॥
मनाचा पालट गुणामाजी फेर । अध्यातम विचार नवल हेची ॥२॥
न घडे ते घडे हरिमुखी जडे । मन मेले उघडे नवल हेची ॥३॥
संत ते समर्थ सामर्थ्य अनंत । सद्गुरू हनुमंत दासरामा ॥४॥

१७८४

संतजनी कृपा कटाक्ष ईक्षण । आत आतमज्ञान तेज दाटे ॥१॥
वन्हीचा प्रकाश अर्थ भरे भारी । प्रसाद तो चारी वाचेमाजी ॥२॥
बरवे समाधान बरवे समाधान । चमत्कार आन कोणता तो ॥३॥
शद्वात अक्षर तत्त्वातीत ब्रह्म । सद्गुरू परम नवल दावी ॥४॥
दासरामा कैची साधनाची कळा । दाविताती डोळा याचि देही ॥५॥

१७८५

संतचरण धूळी वंदिताची भाळी । चिद्‌वृत्ती पुंजाळी चिद्‌गुणेची ॥१॥
चित्कळा जीवन आटवी गगन । जड जीव जीवन तेज नुरवी ॥२॥
तेजाचे वो पाणी झिरपले नयनी । ध्यान निरंजनी नित्य संती ॥३॥
आनंदाची भांग दृष्टीत चढली । वृत्ती आरूढली सत्पदी गा ॥४॥
तीनीचिया पैल परब्रह्म गाठी । शरण उठाउठी दासराम ॥५॥

१७८६

उठाउठीमाजी क्षण तो अनंत । पैल क्षणवत अनंत तो ॥१॥
जीवन ते दावी उठाउठी नवल । जरी झाली ओल संतकृपा ॥२॥
जीवनाचे ठायी क्षणात ब्रह्मांडे । होय घडामोड त्रिगुणीचे ॥३॥
चौथा गुण दावी जीवनाचा पाट । दासराम अवीट भक्तिरसी ॥४॥

१७८७

आदि मध्य अंती नाडी जेथे जडली । तेथेची वाहिली जीवनकळा ॥१॥
उफराटी गती साठाचिये वरी । उबारा शरीरी भरिला माये ॥२॥
तेजाचे जीवन भरिले अंबरी । प्राण तयावरी देही देखे ॥३॥
दासरामा केला सद्‌गुरूनी बोध । नुरलासे बंध संशयाचा ॥४॥

१७८८

दधि क्षीरामृत ओलांडोनी वरी । जाईजें निर्धारी देहामाजी ॥१॥
जीवनाची कळा दृश्यातु लाहिजे । समाधान पाविजे अंतरीचे ॥२॥
अर्धमात्रा स्थानी संती अनुभव । घेई बा तू ठाव गगनापैल॥३॥
दासरामा नवल नवलावे केले । अक्षरी पाजिले बोधामृत ॥४॥

१७८९

सतरावी जीवनकळा ते धरोनी । जाई जीवनस्थानी जीवनरूप ॥१॥
जीवना मारोनी उलटिया पंथे । जाई पा वरूते सहज मार्गे ॥२॥
जीवन प्राशोनी चिदानंद ग्रासुनी । राहे निरंजनी सत्कळेसी ॥३॥
जनार्दनी जीवन निर्गुणी सगुण । जेथे दुजेपण उरले नाही ॥४॥
दासराम सद्‌गुरू – पदी विनटला । मागतो तयाला पूर्ण ठाव ॥५॥

१७९०

नऊ रूपये अकरा आणे । येवढे होते देणे घेणे ॥१॥
तेवढी केली चुकती बाकी । शून्य राहिले बा शेखी ॥२॥
जमाखर्च शून्य झाले । मागणीदार लाजूनी गेले ॥३॥
धनराशी सद्‌गुरूनाथ । देऊनी करिती आपुला भक्त ॥४॥
झालो सद्‌गुरूचा अंकित । स्वानंदाची भीक देत ॥५॥
दासराम हरीचे पायी । हिशेब झाला करी सही ॥६॥

१७९१

म्हातारपणी लग्न केले । पुढे झाली पोरेबाळे ॥१॥
मागोनिया केली मुंज । भटजीसवे केली झुंज ॥२॥
सोडमुंजीचा सोहळा । पुढे बालत्वाच्या लीळा ॥३॥
मुखी घातिले अंगुष्ठ । माती खाई बाळ धीट ॥४॥

उभा न राहे चरणी । रांगतसे जो अंगणी ॥५॥
तो हा रहाताची उभा । दावियेली जगी शोभा ॥६॥
ऐसा कोण जगी झाला । देही ओळखी तयाला ॥७॥
गुरुभक्त हे जाणिजे । दासराम तया भजे ॥८॥

## १७९२

उघडची असोनी चोरूनी ठेले ब्रह्म गे माय ।
प्रगट असोनी दिसेचिना जे ब्रह्म गे माय ॥१॥
दिसावया ते ग्रासुनी ठेले ब्रह्म गे माय ।
शब्दातीत जे रंगुनी गेले ब्रह्म गे माय ॥२॥
सद्‌गुरूचे जे हृदयी शिरले ब्रह्म गे माय ।
चराचरा जे व्यापुनी उरले ब्रह्म गे माय ॥३॥
अबोल बोल जेणे वदविले ब्रह्म गे माय ।
शेष प्रसादानंद देई जे ब्रह्म गें माय ॥४॥
सद्‌गुरू बालक दासराम हा ब्रह्म गे माय ।
त्वंपद तत्पद आटले जेथे ब्रह्म गे माय ॥५॥

## १७९३

मेरूपर्वती कुत्री देखिली आपणाविण व्याली रे ।
आपुले दुग्ध आपणची प्राशुनी शद्रे आणिली कळा रे ॥१॥
शद्रापासुनी वांझ जन्मली मोहमायेची पुतळी रे ।
भ्रतार सोडुनी निजत्व विसरूनी दोन प्रसवली म्हैशी रे ॥२॥
दुसऱ्यापासुनी कैची जन्मा आली दोन पोरे रे ।
पोटी जन्मली पोटी वाढली पोटी तयांचा अंत रे ॥३॥
त्यातील एक अंध दुजिया आला टकीचा डोळा रे ।
सद्‌गुरूनाथे कवतूक केले देखे अघटित लीळा रे ॥४॥
दुजियापासुनी सहा टोणगे चरती देह-नगरी रे ।
मातेसी भांडुनी तियेसी फिरविती गावोगावी रे ॥५॥
हरिकीर्तनी काहीच नाही रंगला गोविंदू रे ।
गुरूभक्त हा अनुभव घेती डोल पावती ब्रह्मी रे ॥६॥
नव मायेचा बाजार दवडुनी गुरूकृपे निजधामी रे ।
निजत्व सकळापैल दावुनी दासराम हा रामी रे ॥७॥

१७९४

अक्षरे ती दोन परम । तया आत पुरूषोत्तम ।।१।।
एकमेक मिळुनी जाती । हरिवाणी उजळे ज्योती ।।२।।
पुढे ग्रासिती एकमेका । एकाठायी पावती सुखा ।।३।।
अक्षराचिये आटणी । निःशद्ब ते ब्रह्मवाणी ।।४।।
नामरूपा झाला मेळ । दासरामाचा कल्लोळ ।।५।।

१७९५

सूर्य चंद्र ग्रासुनी डोळा । कैचा दावी घननीळा ।।१।।
उजळला ब्रह्मानंद । हरिकीर्तनी प्रसाद ।।२।।
देव घरालागी येतो । आपुली आपण कथा करितो ।।३।।
दासराम सद्गुरूचरणी । जेथे शून्याची दाटणी ।।४।।

१७९६

शब्द निःशब्दाची सांगड कीर्तन । पावे समाधान गुरूकृपे ।।१।।
हरिचे कीर्तनी हरी श्रोता वक्ता । देव देऊन स्वता हरी झाला ।।२।।
नाद शब्द अर्थ बुका माळ आरती । प्रसाद तो चित्ती हरिरूप ।।३।।
दासरामा हरिनामाचा गजर । हरिरूप सार हरि हरि ।।४।।

१७९७

डोळियात रूप भरले । पहाता पहाणे नाही उरले ।।१।।
तेची पहाणे वस्तु जागा । आपुले ठायी राहे उगा ।।२।।
सर्व देखे आपुले ठायी । कीर्ती गजर नवलायी ।।३।।
आघवीच दृष्टी भली । तेथे वस्तू गा साठली ।।४।।
सद्गुरूनी घडविले । पदी दासराम लोळे ।।५।।

१७९८

नव्हतेची अंगे झालो । नाहीपणा ग्रासुनी ठेलो ।।१।।
नवलाचे नवल झाले । नवलावे कळो आले ।।२।।
टकी टक मिळुनी गेली । नभी दीप्ती चकाकली ।।३।।
हनुमंत सद्गुरू बोधी । दासराम नामानंदी ।।४।।

## १८०१

सोमेश्वर माऊली ये । सीताराम सिद्धेश्वरू ॥१॥
धाव पाव माझे आई । प्रसन्न होई माऊलिये ॥२॥
रेवणसिद्ध मरूळसिद्ध । काडसिद्ध माऊलीये ॥३॥
गुरूलिंगजंगम माय । रघुनाथप्रिय माऊलीये ॥४॥
रामराय हनुमंत । सद्‌गुरू समर्थ माऊलीये ॥५॥
दासराम धरी चरण । हरिकीर्तन माऊलीये ॥६॥

## १८०२

झाला कृपाळू विठोबा । समचरण विटेवरी बा ॥१॥
समाधाने दरूशन । वाहे उफराटे जीवन ॥२॥
स्वयंप्रकाशाची मिळणी । आदिमाता ते रूक्मिणी ॥३॥
हृदयामाजी ठेली मूर्ती । हृदयाकाशी सुख विश्रांती ॥४॥
त्यांचे मस्तकी शंकर । शिवस्वरूप अपार ॥५॥
शिव पिंडी शिव ब्रह्मांडी । रामनाम त्याचे तोंडी ॥६॥
तेथे स्वरूपाचे चरण । भरले डोळिया ग्रासून ॥७॥
नामामाजी राम । दावितातो सद्‌गुरू परम ॥८॥
केला अंगिकार ।दासराम हा किंकर ॥९॥

## १८०३

ज्योतीचे जीवन प्रकाशाचा झरा । कैचा वाहे सैरा ओघ वेगी ॥१॥
सापडला माये चिदानंदी थारा । वैखरी विचारा शुद्ध झाला ॥२॥
पंधरा त्या कळा दोन पक्षी मिळती । पहिली कळा निगुती मुळी देखे ॥३॥
सतरावी जीवनकळा ते सद्‌गुरू । साधका साचारू चोजविती ॥४॥
जीवनाचा पाठ हनुमंतकृपे । घडला अपापे पाटापरी ॥५॥
कृपेची हे वाणी हनुमंतपदी । अर्पितो आनंदी दासराम ॥६॥



# प्रार्थना | मागणे : ६५

१८०४

तूची बैस सभारंगी । आम्ही नाचू तुझे रंगी ॥१॥
तूची चेतवी या मना । गाऊ तुला नारायणा ॥२॥
तूची श्रोता तूची वक्ता । तुझी तूच करी कथा ॥३॥
तूची जनी जनार्दन । दासरामी दयाघन ॥४॥

१८०५

जगाचा तोडी या तटका । तरी तुझा लागे मज चटका ॥१॥
संकटे आदळोत पुढती । तरी तुझे नाम रमे चित्ती ।
आवडे संतबोध घुटका ॥२॥
नको मज मान दंभ चेष्टा । विनवितो तुजला रे श्रेष्ठा ।
मारी रे षड्रिपूला फटका ॥३॥
सर्वदा घडो तुझे स्मरण । नुरो या देहाचे भान ।
करी रे द्वंद्वातूनी सुटका ॥४॥
तुझेची रूप सदा आवडो । हरी तुझे दार मला उघडो ।
करी जो दासराम लटका ॥५॥

१८०६

तूची देवा माझे करिसी कवतूक । येर ते लौकिक वेगळाले ॥१॥
तुझी मज भक्ती माझी तुज प्रीती । करी हे श्रीपती ऐसे आता ॥२॥
तुझे नामी चित्त रंगो सर्वकाळ । सरोनी पाल्हाळ बोलण्याचा ॥३॥
दासराम तुज हेची मागे दान । सदा समाधान कृपेचे या ॥४॥

१८०७

जप करी तो भगवंत । आम्हा साधणे एकान्त ॥१॥
हरिकथा करिती संत । आम्ही होऊ तेथे संथ ॥२॥

पुराण पुरूष सांगे पुराण । आम्ही होऊ ते उन्मन ॥३॥
पंचप्राण करिती आरती । तेथे सारू दिनरीती ॥४॥
अवघाची नारायण । तेथे दासराम कवण ॥५॥

१८०८

शद्वाठायी देखे प्राण । दिला निशद्वी विरवोन ॥१॥
धन्य धन्य संतजन । दिला आनंद चिद्घन ॥२॥
आम्ही नामामंदी डोलू । येर नये काही बोलू ॥३॥
दासरामा हाची ठेवा । देई सदानंद देवा ॥४॥

१८०९

राजारामी प्रीत रे सीतारामी प्रीत रे ।
उमगता सकळ कळले शोधी तयाचा अर्थ रे ॥१॥
सद्गुरू हे बोधिती रे गुरूभक्त ध्याती रे ।
श्रीहरीचे कीर्तनी आले ब्रह्मानंदा चित्ती रे ॥२॥
दासराम गाये रे वंदितसे पाय रे ।
अनुभव देही काय सांग मज आधी रे ॥३॥

१८१०

अरे अरे प्रभुराया । आवरी आवरी तुझी माया ॥१॥
तुज आलो मी शरण । अर्पियेले पंचप्राण ॥२॥
अतिशय ही दुस्तर । पाडी तुझाची विसर ॥३॥
हिने व्यापिले ब्रह्मांड । तुजलागी केले आड ॥४॥
गुरूराज म्हणे आता । दर्शन देई आपुल्या भक्ता ॥५॥

१८११

माझिये अंतरी उपजो सद्भावना । कुतर्क हे नाना गांजिताती ॥१॥
संतांचिये कृपे राहो अढळवृत्ती । हरी वसो चित्ती हरिनामी ॥२॥
सद्रूप चिद्रूपी आनंदसागर । तेथे येरझार सदा घडो ॥३॥
दासरामा थोर भक्तीची आवडी । मनोरथ कोडी पुरवीसी ॥४॥

## १८१२

होवो नामाचे श्रवण । सदा राहो अनुसंधान ॥१॥
नामकथा कानी पडो । नामाठायी चित्त जडो ॥२॥
चालो नामाचे चिंतन । हरिनामी रंगो मन ॥३॥
देवाजीचे दार उघडो । दासरामा हरी सापडो ॥४॥

## १८१३

आपुलिया प्रसादवचना । नित्य गातो नारायणा ॥१॥
हीच सेवा जन्मोजन्मी । घ्यावी दासाकरवी स्वामी ॥२॥
आपुले दारी द्यावे स्थान । हेची मागतसे दान ॥३॥
आपुले द्वारी करीन सेवा । सत्य सत्य सद्‍गुरूदेवा ॥४॥
दासराम तुमचा झाला । समाधाना बोधे आला ॥५॥

टीप :– दासरामास गुरूलिंगगीता प्रसाद मिळाला. त्याला अनुसरून हा अभंग लिहीला आहे.

## १८१४

कृतीवरी क्रिया क्रियेवरी साधन । त्यावरी अवलंबून मन असे ॥१॥
मनावरी चित्त चित्तावरी प्राण । प्राणोपरी चैतन्य कळो आले ॥२॥
गुरूकृपा संतसंग प्राप्त होता । गुह्य येई हाता आपेआप ॥३॥
दासराम बोले सद्‍गुरू समर्था । साधन सर्वथा नित्य घडो ॥४॥

## १८१५

देवा तुजवरी भारू । तू तो कृपेचा सागरू ॥१॥
तुझे हाती नौका । तूची मायबाप सखा ॥२॥
तारी दीनानाथा । नाही तरी बुडतो आता ॥३॥
दासराम तुझे पायी । प्रेमभावे ठेवी डोई ॥४॥

## १८१६

आलो तुझे हाती । कृपा करी गा श्रीपती ॥१॥
करिसी संभाळ । आम्ही तुझे लडिवाळ ॥२॥
आळवितो पांडुरंगा । प्रेम जावो नेदी भंगा ॥३॥
देई देई भेटी । हेचो आवडी मज मोठी ॥४॥
तूची छत्रपती राजा । दास दीन सेवक तुझा ॥५॥

## १८१७

हरिदासांचा हा दास करी देवा । तरी करी हेवा इंद्र माझा ॥१॥
तुच्छ वाटे मज इंद्र ऐरावत । चरण उचित तुझे देवा ॥२॥
वस्त्र देई मज शीत निवारणा । भुकेलिया अन्न देई देवा ॥३॥
आन नको काही सुख ते पोकळ । नाम हे रसाळ वाचे येवो ॥४॥
हेची मागतसे तुज वरचेवरी । पहा तू अंतरी काय आहे ॥५॥
दासराम म्हणे देवा तुझे सुख । ओळखियेले सुख सत्य साच ॥६॥

## १८१८

माया असेल तैशी असो । आम्ही पुसो ब्रह्मासी ॥१॥
सगुण होऊनी करी संसार । काय विचार आम्हासी ॥२॥
मूळ निर्विकल्प नाम । अहं निरहं ब्रह्मलीला ॥३॥
संत सद्‌गुरू दातार । आम्ही तयांचे किंकर ॥४॥
दासराम मागे दान । सनातन नामवतन ॥५॥

## १८१९

जरी मी तो हीन दीन । तुवा केले मज पावन ॥१॥
जरी तू प्रसन्न समर्था । हेची मज देई आता ॥२॥
नित्य घडो भजन सेवा । तुझा जो का प्रसाद मेवा ॥३॥
दासरामा त्याची गोडी । सदा राहो दे आवडी ॥४॥

## १८२०

तारावया हा मतिमंद । अवतार सिद्धानंद ॥१॥
काय होऊ उतराई । तुझी सेवा आन नाही ॥२॥
आपुला हा प्रसादमेवा । अखंडची मज द्यावा ॥३॥
हनुमंते केली मात । दासराम हे मागत ॥४॥

टीप : गुरूलिंगगीतेला अनुसरून हा अभंग लिहीला आहे.

## १८२१

हेची आवडी माझ्या मना । माझी पुरवावी वासना ॥१॥
व्रत घडो एकादशी । नाम राहो दे मानसी ॥२॥
कर्णी पडो हरिकथा । कृपाकर पडो माथा ॥३॥
नित्य नाचो हरिरंगी । साधुसंतांचिया संगी ॥४॥
दासरामा जन्मोजन्मीं । तुमचे भजन घडो स्वामी ॥५॥

## १८२२

मज दास करी त्यांचा । सकळही गुरूभक्तांचा ॥१॥
वंश त्यांचे वंदनीय । आम्ही वंदू त्यांचे पाय ॥२॥
जरी ते करिती अशिर्वाद । अखंडची ब्रह्मानंद ॥३॥
हेची देई देवा । दासरामा तुझी सेवा ॥४॥

## १८२३

सदा घडो सत्संगती । जेणे माझी शुद्ध मती ॥१॥
मुखी रामकृष्ण नाम । अंगी राहो तुझे प्रेम ॥२॥
तुझे माझे एक मन । व्हावे ऐसे कृपादान ॥३॥
दासराम शरणागत । हरिभक्तांचा अंकित ॥४॥

## १८२४

नको धन मान । परी चालो दे कीर्तन ॥१॥
सांगितली संती सेवा । हर्ष वाटे माझ्या जीवा ॥२॥
दासराम प्रेमभरे । नाचे कीर्तनगजरे ॥३॥

## १८२५

तुम्ही संतसंगे संगे । रंगतसा हरीच्या रंगे ॥१॥
तैसे करी मज दीना । अगा पतितांच्या पावना ॥२॥
आजोचिया हरिकीर्तना । रंग कीजे नारायणा ॥३॥
दासराम सेवा करी । गुरूचिया वचनापरी ॥४॥

## १८२६

एकांतीची सेवा । तुम्हा आवडते देवा ॥१॥
म्हणुनी आलो तुजपाशी । प्रेम धरोनी मानसी ॥२॥
प्रेम करी नारायणा । नको अव्हेरू या दीना ॥३॥
होवोनी कृपाळ । तूची माझे मुखे बोल ॥४॥
दासराम हरी एकला । श्रवणपुरी मुखिया धाला ॥५॥

## १८२७

काय करू नारायणा । कैसे बोलू या कीर्तना ॥१॥
कैसा धरू ताल ठेका । काय गाऊ कवणे मुखा ॥२॥
बुका माळ निरंजन । रामकृष्णहरी संपूर्ण ॥३॥
समाधान तो प्रसाद । संतजनांचा आनंद ॥४॥
न होनी अंतरी । दासराम चरण धरी ॥५॥

## १८२८

अहंकाराचा घालुनी डगला । हरी भिववू नको आम्हाला ॥१॥
निरहंभाव हा धरून । मज टाकू नको दीन करून ॥२॥
ठेवी मला जैसा तैसा । जीवभाव दवडुनी कैसा ॥३॥
ठाव दे दासरामाला । करूनिया नामी ऐक्याला ॥४॥

## १८२९

तळमळ मनी होत आहे । भेटी हरी देसी ॥ध्रु॥
प्राण झुरे वृत्ती मुरे । हृदयी कधी येसी ॥१॥
दासराम शरण येई । अभय देसी त्यासी ॥२॥

१८३०

काय करू माझी कथा । तुझ्यापुढे मी अनंता ॥१॥
करी कीर्तन तूची तुझे । लाविसी का मी हे माझे ॥२॥
तूची बोले तूची ऐके । पूर्ण आनंदू कवतूके ॥३॥
करी हा लटिका भक्त । दासरामी तू समस्त ॥४॥

१८३१

तुझे कीर्तन तूची करी । आम्ही सुखे ऐको हरी ॥१॥
तूची गाये तूची नाचे । होऊ निवांत दैवाचे ॥२॥
दासराम हा आनंदे । सदा रंगो याची छंदे ॥३॥

१८३२

तुझ्या नावे देतो हाका । धाव त्रैलोक्यनायका ।
धाव धाव यदुनायका । प्रिय जो तू भक्तलोका ॥१॥
तुजवाचुनी नाही सखा । पावे निर्वाणी जो फुका ॥२॥
तुवा तारिले अनेका । तारी मारी करी काही का ॥३॥
तुझे भक्त बहुत जरी का । एक देवची मजला परि का ॥४॥
दासराम सेवी जरी का । दवडीसी ना तरी का ॥५॥

१८३३

तुटली प्रपंचाची बेडी । झाली मी पण वावडी ॥१॥
परमार्थ आला हाता । लागलोसे भक्तिपंथा ॥२॥
थोर संतांचा आधार । मुखी नामाचा उच्चार ॥३॥
पाखांड हे खंडी । देवा उपजो आवडी ॥४॥
दास म्हणे घडो सेवा । साठो नामाचा हा ठेवा ॥५॥

१८३४

उमगलो देवा । तुजवीण कोणी नाही ।
तूची खरा उपयोगी । भेट देई गा माधवा ॥१॥
कळले गुरूकृपे सार । व्यर्थ आहे हा संसार ।
यात काही नाही सार । भेट देई गा केशवा ॥२॥

तूचि सखा कनवाळू । तूचि दयाळ कृपाळु ।
तूचि खरा जिवलग । सत्य साच तू मवाळू ॥३॥
रामराया दास तुझा । तुजवरी भार माझा ।
रक्षी या भक्तकाजा । पापी आपुला समजा ॥४॥

## १८३५

माझे अपराध देवा घाली पोटी । अन्यायाच्या कोटि केल्या बहू ॥१॥
नको कोप करू नको जाऊ दुरू । नको बा विसरू पापियासी ॥२॥
दास म्हणे तुझे फार उपकार । झाले मजवर न फेडवें ॥३॥

## १८३६

देवा वहातो तुझी आण । न करी विषय–सेवन ॥१॥
धरीन तो मार्ग चांग । वाईटासी न करी लाग ॥२॥
तुझे पायी हा विश्वास । तुझ्या चरणाची आस ॥३॥
देह धन मन तुझे । माझे तुम्हावरी ओझे ॥४॥
मी तो तुमचे अधीन । तुम्ही मायबाप जाण ॥५॥
कोणी करो स्तुति निंदा । आम्हा स्वहिताचा धंदा ॥६॥
दास म्हणे हा निश्चय । तुझे पायी ठेवीन डोय ॥७॥

## १८३७

नातू आणि पणतू परमार्थी व्हावी । हेच असे जीवी माझ्या देवा ॥१॥
मागणे मागतो तुजलागी देवा । केशवा माधवा नारायणा ॥२॥
दासरामाचे हे ऐकोनी वचन । जाहले प्रसन्न पितृदेव ॥३॥

## १८३८

मायेमाजी नको ठेऊ । नको मोहाने भुलवू ॥१॥
भूल न पडो या मनीं । हेची माझी विनवणी ॥२॥
पाडी भक्तीची भुरळ । ठेवी नामी या अढळ ॥३॥
परिसा परिसा चापपाणी । दासराम लागे चरणी ॥४॥

## १८३९

हाती करिता काम वाणी जपो राम । तेणेची विश्राम होय स्वयें ॥१॥
म्हणोनीया माझा सरो भेदाभेद । मीतूपण छंद नाशिवंत ॥२॥
नाम ते आगळे मीपणावेगळे । अहंकार मेळे न ये दिसो ॥३॥
श्रोत्र-वाणी-चक्षू-पैल तुझे नाम । तेथे दासराम स्थिरावो दे ॥४॥

## १८४०

देवा आता मज दाखवी निवृत्ती । नुरवी प्रवृत्ती पुनरपि ॥१॥
निवृत्त करोनी ठेवी मज आता । सांडोनिया स्वताठायी वृत्ती ॥२॥
वृत्तिशून्य वृत्ती नुरवी ते स्थिती । निरंजन चित्ती ठसावो दे ॥३॥
पडो दे वळण निजत्वे उगमी । तरी नाम ऊर्मी दासरामा ॥४॥

## १८४१

मनाचा निश्चय काहीच होईना । धर तो टिकेना काही केल्या ॥१॥
देवराया तुम्ही दाखवावी वाट । प्रकाशे निघोट बुद्धीठायी ॥२॥
तूची मात तात बंधू गणगोत । सखे जन आप्त कारण कर्ता ॥३॥
देवोनिया प्रेम करिसी निष्काम । तरी दासराम तुझे पायी ॥४॥

## १८४२

धणी धाव सख्या मम देवा । प्राणसखा तू जीवची प्यारा ।
भाव तुला मम ठावा ॥१॥
भारची माझा तुजवरी सारा । मजला दे हा विसावा ॥२॥
दासराम हा अनन्य होऊनी । सदा करीतसे धावा ॥३॥

## १८४३

होई देवा तू सगुण । द्वंद्व भीती हारवून ॥१॥
भेद नासी या द्वैताचा । खेळ मोडी या मनाचा ॥२॥
माझे लक्ष्य तुझे पदी । ऐसे करी करूणानिधी ॥३॥
दासराम देखे तुज । तुझ्या तेजे झाले निज ॥४॥

## १८४४

उसने सुख नको देवा । करी सेवा आमुचा जे ॥१॥
आपुले सुख आपुल्या ठाई । वाहे डोई अखंड ॥२॥
ऐसे [सुख दुजियापाशी । निश्चयेसी नाही पा ॥३॥
सद्‌गुरूनी दिले दान । आळशी देखून दयेने ॥४॥
दासराम पूर्ण आळशी । मिळे त्यासी गुरुसंग ॥५॥

## १८४५

आवडी बैसोनी गाईन तुझे गान । नको दंभ मान मज देवा ॥१॥
बोलविसी जे तू रामनाम वाणी । तरीच वदनी येईल माझ्या ॥२॥
तुझी कृपा हेची भाग्य खरे मोठे । अभागी करंटे वाया जाती ॥३॥
राम म्हणे काही घडो तुझी सेवा । तरी माझ्या देवा पार नाही ॥४॥



# भक्तपर : ६६

१८४६

विठ्ठलवाडी ही स्थापियेली ज्यानी । केलीसे मेदिनी वैकुंठ ते ॥१॥
विठ्ठल रुक्मीणी धावोनिया आली । कलीमाजी झाली मात ऐसी ॥२॥
नाथपथांचा तो झेंडा मिरवला । बळवंत धरिला स्वये हाती ॥३॥
मंदीरे बांधिली भक्ती वाढविली । थोर सत्ता भली असे ज्यांची ॥४॥
सामर्थ्य हे फार केले चमत्कार । वानिले अपार भागवत ॥५॥
संतासी भूषण हे सिद्धपुरूष । आले आकारास निळकंठ ॥६॥
दासरामावरी प्रेमाचा वर्षाव । संती नवलाव झाला असे ॥७॥

१८४७

नामसप्ताहाचा शुभारंभ झाला । आनंद वाटला शिरोळात ॥१॥
निंबर्गी निर्वाण शताब्धीचे वर्ष । प्रगट पुरूष गुरूलिंग ॥२॥
उभा विणा केला पारायण सोहळा । बोलीलो समयाला चार शब्द ॥३॥
फुलाचिया परी बर्गे यानी नेले । दर्शन जहाले तेलीयांचे ॥४॥
निंबरगीमहाराजे योग हा आणिला । पुढे उभा केला नाथपंथ ॥५॥
घेवारे यांची इच्छा पूर्ण झाली । प्रेमे संतोषली संतमाता ॥६॥
तात्यामहाराजे दिलीसे सुपारी । प्रेमे धरली करे दासरामे ॥७॥

१८४८

सरस्वतीबापू आणि वालदास । आले कीर्तनास प्रेमभरे ॥१॥
कुमारस्वामीजी थोर डोंगरेजी । कीर्तना सहजी प्रेमे आले ॥२॥
ज्ञानेश दर्शने तया समाधान । कवतूक पूर्ण बहू केले ॥३॥
दासराम त्यांचे आठवतो गुण । संतांचिये खूण वेगळीच ॥४॥

## १८४९

सिद्धगिरी स्वामी सिद्धांचेही राणे । पीठ ते विराजे सिद्धगिरी ॥१॥
मल्लिकार्जुनही तेवी थोर संत । तैसेचि सांप्रत थोर तेली ॥२॥
शिरोळ ग्रामासी वास असे त्यांचा । केलासे प्रेमाचा वर्षावची ॥३॥
दासराम प्रेमे आठवितो गुण । धरितो चरण भक्तिभावे ॥४॥

## १८५०

गाडगेबाबा मज वाटती विठोबा । कीर्तनी विठोबा नाचतसे ॥१॥
त्यागी विरागी हे जीवन अद्‌भुत । भोजन करीत काम करूनी ॥२॥
किती विद्यालये आणि धर्मशाळा । आठवोनी गोपाळा उभारती ॥३॥
बालपणी त्यांचे ऐकिले कीर्तन । दासराम गूज आठवतो ॥४॥

## १८५१

कैकाडीमहाराज सूरदासा म्हणती । सांगलीची महती वेगळीच ॥१॥
गाडगेबाबांचे कैकाडीबाबांचे । वचन प्रेमाचे कथेकाळी ॥२॥
कैकाडी बोलती सूरदासा ते दिनी । सांगलीसी कीर्तने बोल आले ॥३॥
दासराम वदे ऐसे न देखीले । ऐकोनी जहाले चकीत जन ॥४॥

## १८५२

ज्ञानेश्वर माऊली करी ज्या साऊली । ऐसी ती माऊली दामले ताई ॥१॥
कृष्णा मातेलागी लुगडी नेसवोनी । देत सुवासिनी लागोनिया ॥२॥
ज्ञानेश्वरी जया परिपूर्ण पाठ । तेची वृत्तीपाठ ज्यांचा झाला ॥३॥
भजनीकाकू तेवी जाहल्या प्रसिद्ध । भजनी आनंद जयालागी ॥४॥
हरीपाठ तया होय वृत्तीपाठ । नसेची बोभाट परमार्थाचा ॥५॥
सिद्धारूढ करी जयासी साऊली । ऐसी ती माऊली कलावती ॥६॥
कलावती देवी म्हणोनी प्रसिद्ध । जया सिद्धबोध सहजेची ॥७॥
पायालागी हात न घेती लावोनी । निर्वाणीही त्यानी साक्ष दिली ॥८॥
ऐशा तीनी माता आल्या आमुचे घरी । प्रवचने भारी झाली त्यांचे ॥९॥
प्रपंच परमार्थ केलासे सुबोध । तयाचा आनंद दासरामा ॥१०॥

# निर्याणाचे अभंग : ६७

१८५३

## प. पू. श्री. गोपाळरावजी दीक्षित महाराज मुधोळ यांचे निर्याण

आश्विन वद्य ११ शके १८१४

शालीवाहन शके अठराशे चौदात । आश्विन वद्यात एकादशी ॥१॥
गोपाळराव दीक्षित प्रयाण करीती । द्वितीय प्रहर रात्री पहिले तासी ॥२॥
चिमडमहाराजांचे कल्याण म्हणोनी । गौरवीत जनी लक्ष्मीआक्का ॥३॥
सांगलीसी देह ठेविता प्रचीती । चिमडी कर्पुरज्योती निमालीसे ॥४॥
गुरु रामरुपी मिळोनिया गेले । हनुमंते देखीले नवल हे ॥५॥
नाही केला मठ नाही शिष्य केले । कीर्तीरूपे उरले दासापाशी ॥६॥

१८५४

## प. पू. श्रीबाबासाहेबमहाराज मुजुमदार यांचे निर्याण

मार्गशीर्ष वद्य १ शके १८१७

शालीवाहन शके अठराशे सतरात । मार्गशीर्ष वद्यात प्रतीपदा ॥१॥
बाबासाहेबानी ठेवीयला देह । झाला नवलाव संतजनी ॥२॥
गुरूपाद पूजा प्राणांताही वरी । तैसेची आचरी साधन हे ॥३॥
अक्कलकोट स्वामीं जैसे आज्ञापिले । रामरूप झाले तैशा परी ॥४॥
रामरूपी तेवी मिळोनिया गेले । कीर्तिरूपे उरले दासापाशी ॥५॥

१८५५

## प. पू. श्रीगजानन महाराज, शेगाव यांचे निर्याण

भाद्रपद शुद्ध ५ शके १८३२

शालिवाहन शके अठराशे बत्तीस । भाद्रपद पंचमीस शुद्धामाजी ॥१॥
गजाननमहाराजे केलेसे निर्याण । प्रथम प्रहरी जाण प्रातःकाळी ॥२॥
घालोनी आसन केलेसे भजन । भक्तजना सांगून बह्मी धाले ॥३॥
गजानन तेचि गजानन झाले । कीर्तिरूपे उरले दासापाशी ॥४॥

## १८५६

### श्री सद्‌गुरू ब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर यांचे निर्याण
### मार्गशीर्ष वद्य १० शके १८३५

ब्रह्मचैतन्य हे ब्रह्माचा आकार । चैतन्य साकार गोंदवल्यासी ॥१॥
नामासाठी आले नामीच राहिले । नाम गरजले त्रैलोक्यात ॥२॥
सांगती सकळा करावे भजन । घातले आसन आपण ते ॥३॥
श्रीराम श्रीराम त्रिवार उच्चार । करोनिया स्थिर रामी झाले ॥४॥
शालिवाहन शके अठराशे पस्तीस । वद्य दशमीस मार्गशीर्षी ॥५॥
प्रथम प्रहरी सोमवार दिनी । श्रीराम होऊनी अमर झाले ॥६॥
ब्रह्मचैतन्य ते ब्रह्मरूप ठेले । कीर्तिरूपे उरले दासापाशी ॥७॥

## १८५७

### प. पू. श्री गुंडूबुवामहाराज बुधगाव, यांचे निर्याण
### चैत्र शुद्ध १ शके १८६४

शालिवाहन शके अठरा चौसष्ठात । चैत्र महिन्यात उत्तरायण ॥१॥
गुढीपाडव्यासी गुढी उभवोनी । अदृश्यचि झणी गुंडुबुवा ॥२॥
पहाता पहाता अदृश्यचि झाले । वेडचि लाविले भक्तजना ॥३॥
तुकारामापरि नवल हे झाले । कीर्तीरूपे उरले दासापाशी ॥४॥

## १८५८

### श्री गोविंदपंतमहाराज घोसरवाडकर, घोसरवाड यांचे निर्याण
### जेष्ठ शुद्ध ३ शके १८६५

शालिवाहन शके अठराशे पासष्ठ । तृतीया ते जेष्ठ शुद्धाचियें ॥१॥
गोविंदपंतानी केलेसे निर्याण । दोन प्रहरी तीन झाले जेव्हा ॥२॥
गरजलें तीन ऐकती ते कान । तुळशीचे पान कानी ठेवी ॥३॥
घातले आसन केले निरोधन । झाले ब्रह्मी विलीन तीन म्हणता ॥४॥
ऐसे हे नवल करोनी दाविले । कीर्तिरूपे उरलें दासापाशी ॥५॥

१८५९

भगवान रमणमहर्षि अरूणाचल यांचे निर्याण
दिनांक १४-४-१९५० चैत्र शके १८७२
शालिवाहन शके अठराशे बहात्तर । विकृति संवत्सर उत्तरायण ॥१॥
चैत्र मासामाजी होता शुक्रवार । रात्रौ प्रथम प्रहर तिसरे तासी ॥२॥
जाईन मी कोठे मी तर आहे इथे । सांगती सर्वांते अरूणाचली ॥३॥
भगवान रमण महर्षि हे धाले । आत्मरूप झाले पहाता स्थिर ॥४॥
रमण महर्षि स्वरूपाकार झाले । कीर्तिरूपे उरले दासापाशी ॥५॥

१८६०

श्रीरामरावमहाराज तिकोटेकर, तिकोटे यांचे निर्याण
आषाढ वद्य ४ शके १८७२
शालिवाहन शके अठराशे बहात्तर । विकृती संवत्सर दक्षिणायन ॥१॥
रामरावमहाराजानी ठेवियेला देह । आषाढ वद्य पाहे संकष्टीसी ॥२॥
सोलापूरी विठ्ठल मंदिरी निर्वाण । स्वरूपी तल्लीन ऐक्य झाले ॥३॥
ऐक्य झाले तेणे दिवस गोड झाला । सद्‌गुरू जोडला भाऊराव ॥४॥
भाऊरावरूपी मिळोनीया गेले । कीर्तिरूपे उरले दासापाशी ॥५॥

१८६१

श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर, निंबरगी यांचे निर्याण
श्रावण वद्य २ शके १८७५
शालिवाहन शके अठराशे पंचाहत्तर । विजयनाम संवत्सर दक्षिणायन ॥१॥
नागाप्पाण्णामहाराजानी ठेवियेला देह । श्रावण वद्य द्वितीये बुधवारी ॥२॥
दिवसा प्रथम प्रहरी तृतीय तासी निर्याण । नारायणी तल्लीन ऐक्य झाले ॥३॥
ऐक्य सहज साधने दिवस गोड झाला । भक्तजना दिधला सिद्धानंद ॥४॥
गुरूलिंगगीता स्वरूपी मिळाले । किर्तिरूपे उरले दासापाशी ॥५॥

१८६२

श्री गोविंद अनंत ऊर्फ बापूरावजी केळकर (मामा) सांगली यांचे निर्याण
माघ शुद्ध ९ शके १८८३
शालिवाहन शके अठराशे त्र्याऐंशीत । प्लव संवत्सरात उत्तरायण ॥१॥
माघ शुद्ध नवमी आणि सोमवार । रात्रौ द्वितीय प्रहर तिसरे तासी ॥२॥

गोविंदरायानी केलेसे निर्याण । अखंड कीर्तन सत्य केले ।।३।।
एकांती लोकांती देहांतीही नाम । प्रचीती उत्तम स्वये दिली ।।४।।
श्रीराम जयराम जय जय राम । संदेश परम निर्वाणीचा ।।५।।
हनुमंतरूपी मिळोनिया गेले । कीर्तिरूपे उरले दासरामी ।।६।।

## १८६३

### ती. मातोश्री इंदिराबाई केळकर सांगली, यांचे निर्याण
### माघ शुद्ध ४ शके १८८४

शालिवाहन शके अठराशे चौऱ्याऐंशीत । शुभकृन्नाम संवत्सरात उत्तरायण ।।१।।
माघ शुद्ध चतुर्थी आणि सोमवार । दिवसा चतुर्थ प्रहर पहिले तासी ।।२।।
इंदिरामातेने केले हो निर्याण । अभंगी तल्लीन ऐक्य झाले ।।३।।
तुकोबारायाचे अभंग जे बारा । नित्य पाठ पूरा केला नेमे ।।४।।
अंतरात्मरूपी मिळोनिया गेल्या । कीर्तिरूपे उरल्या दासरामी ।।५।।

## १८६४

### श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर सांगली, यांचे निर्याण
### मार्गशीर्ष वद्य १४ शके १८८६

शालिवाहन शके अठरा शहाऐंशीत । क्रोधी संवत्सरात उत्तरायण ।।१।।
मार्गशीर्ष वद्य चतुर्दशी दिसी । भृगुवासरेसी मध्यरात्री ।।२।।
स्वये पांडुरंग सांगली जे आले । पांडुरंग झाले पांडुरंग ।।३।।
संतांची महती संतची जाणती । घेतली प्रचिती संतजनी ।।४।।
पांडुरंग पंतस्वरूपी मिळाले । कीर्तिरूपे उरले दासापाशी ।।५।।

## १८६५

### श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर (चिमड) यांचे निर्याण
### माघ शुद्ध १० शके १८८७

शालिवाहन शके अठराशे सत्याऐंशी । विश्वावसु संवत्सर उत्तरायण ।।१।।
माघ शुद्ध दशमी आणि सोमवार । रात्रौ प्रथम प्रहरी दुसरे तासी ।।२।।
नारायणरावानी केले हो निर्याण । साधनी निमग्न ऐक्य झाले ।।३।।
साधूदेवालय कळस वंदून । सोडियेले प्राण निजसत्ते ।।४।।
परब्रह्मरूपी मिळोनीया गेले । कीर्तिरूपे उरले दासापासी ।।५।।

१८६६

न्यायरत्न श्रीधुंडिराजशास्त्री विनोदमहाराज यांचे निर्याण

रविवार आषाढ वद्य १४ शके १८९१

शालिवाहन शके अठराशे एक्याण्णवात । सौम्य संवत्सरात दक्षिणायन ॥१॥
धुंडीराज यांनी ठेवियला देह । आषाढ वद्य पाहे चतुर्दशी ॥२॥
होता रविवार तेज ते प्रखर । रात्री द्वितीय प्रहर तिसरे तासी । ३॥
विवेकानंदची पुनरपि आले । ज्ञानकार्य केले तैशापरी ॥४॥
परब्रह्मरूपी मिळोनीया गेले । कीर्तिरूपे उरले दासापाशी ॥५॥

१८६७

श्रीधरस्वामी वरदहळी, यांचे निर्याण

चैत्र वद्य २ शके १८९५

शालिवाहन शके अठरा पंच्याण्णवात । प्रमाथि संवत्सरात उत्तरायण ॥१॥
चैत्र वद्य द्वितीया आणि गुरुवार । दिवसा द्वितीय प्रहर पहिले तासी॥२॥
श्रीधरस्वामींनी केलेसे निर्याण । जेणे महामौन साधियेले ॥३॥
समर्थस्वरूपी मिळोनिया गेले । कीर्तिरूपे उरले दासापाशी ॥४॥

१८६८

प. पू. श्रीरघुनाथ हणमंत ऊर्फ बाबूरावजी कोटणीस महाराज, (बाबासाहेब)

सांगली, यांचे निर्याण

भाद्रपद शुद्ध ६ शके १८९५

शालिवाहन शके अठराशे पंचाण्णवात । प्रमाथी संवत्सरात दक्षिणायन ॥१॥
भाद्रपद शुद्ध षष्ठी रविवार । प्रथम प्रहर दुसरे तासी ॥२॥
रघुनाथरायें केलेसे निर्याण । स्वरूपी तल्लीन ऐक्य झाले ॥३॥
ऐक्य झाले तेणे दिवस गोड झाला । जनी या जोडला नारायण ॥४॥
हनुमंतरूपी मिळोनिया गेले । कीर्तिरूपे उरले दासापाशी ॥५॥

१८६९

प. पू. योगिराज श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज, यांचे निर्याण

पौष वद्य ८ शके १८९५

शालिवाहन शके अठरा पंचाण्णवात । प्रमाथी संवत्सरात उत्तरायण ॥१॥
पौष वद्य अष्टमी मंगळवासर । दिवसा तृतीय प्रहर पहिले तासी ॥२॥

शक्तिपात दिक्षा अधिकारी वामन । झालेसे आपण दत्तरूप ॥३॥
संध्या साधियेली प्राणांताहीवरी । गुरूआज्ञा खरी आचरिली ॥४॥
दत्तरूप वामन संतांनी देखीलें । कीर्तिरूपे उरले दासापाशी ॥५॥

१८७०

प. पू. स्वामी श्रीस्वरूपानंद, पावस यांचे निर्याण
श्रावण वद्य १२ शके १८९६

शालिवाहन शके अठरा शहाण्णवात । आनंद संवत्सरात दक्षिणायन ॥१॥
श्रावण वद्य द्वादशी आणि गुरुवार । दिवसा प्रथम प्रहर तिसरे तासी ॥२॥
योग साधियेला गुरुपुष्यामृत । झाले समाधिस्थ स्वरूपानंद ॥३॥
हृदयामाजी उठे सोऽहं सोऽहं नाद । ऐसे स्वतःसिद्ध स्वामीराव ॥४॥
सोऽहंस्वरूप जे स्वरूपासी आले । सोऽहंरूप झाले सोऽहं नादे ॥५॥
स्वामी स्वरूपानंद स्वरूपाकार झाले । कीर्तिरुपे उरले दासापाशी ॥६॥

१८७१

प. पू. डॉ. गोविंदमहाराज उपळेकर फलटण, यांचे निर्याण
भाद्रपद वद्य ८ शके १८९६

शालिवाहन शके अठरा शहाण्णवात । आनंद संवत्सरात दक्षिणायन ॥१॥
भाद्रपद वद्य अष्टमींचा दिस । प्रथम प्रहरास प्रातःकाळी ॥२॥
ज्ञानेश्वर दर्शन घेवोनिया आले । सांगोनी मिळाले आत्मरूपी ॥३॥
साधू उपळेकर ब्रह्मरूप झाले । कीर्तिरूपे उरले दासापाशी ॥४॥

१८७२

प. पू. श्रीशंकरमामा शिपूरकर, कोल्हापूर, यांचे निर्याण
भाद्रपद शुद्ध ३ शके १९०२

शालिवाहन शके एकोणीसशे दोनित । भाद्रपद शुद्धात तृतीयेसी ॥१॥
रुद्रशंकर हे रौद्र संवत्सरेसी । झाले नाथवासी दक्षिणायनी ॥२॥
याचा घेता शोध मनी होय बोध । भेटी झाली सिद्ध वेवभवता ॥३॥
गोविंदस्वरूपी मिळोनीया गेले । कीर्तिरूपे उरले दासापाशी ॥४॥

## १८७३

### प. पू. श्रीमहादबा पाटीलमहाराज धुळगांवकर, धुळगांव यांचे निर्याण
### जेष्ठ शुद्ध १५ शके १९०४

शालिवाहन शके एकोणिसशे चारात । पौर्णीमा जेष्ठात शुक्लपक्षी ॥१॥
पाटीलमहाराजे केलेसे प्रयाण । प्रभाकर पूर्ण प्रगटता ॥२॥
प्रती पौर्णीमेसी वाडी क्षेत्री वास । झाले अविनाश तेची ठायी ॥३॥
देवाचे सन्निधी घेतली समाधी । बैसले आनंदी चमत्कारे ॥४॥
रामानंदे केला जयाप्रती बोध । स्वये झाले सिद्ध प्रसिद्धची ॥५॥
मुकुंदराज पंथ जगी होय थोर । केलासे विस्तार भक्ती भावें ॥६॥
पाटील महाराज प्रभू दत्त झाले । प्रेमेची वंदीले दासरामे ॥६॥

## १८७४

### परमपूज्य श्रीनिळकंठ महाराज, विठ्ठलवाडी (जि. सातारा) यांचे निर्याण
### कार्तीक शुद्ध ११ शके १९०५

शालिवाहन शके एकोणीसशे पांच । रुधिरोद्गारी साच संवत्सर ॥१॥
कार्तीक एकादशी आणि बुधवारी । दिवसा तृतीय प्रहरी तिसरे तासी ॥२॥
वीज चमकावी जैशी तैशापरी । निळकंठ स्वारी समाधिस्थ ॥३॥
प्रियशिष्या गिरिजा पाहे डोळेभरी । तया भाग्या सरी नाही जगी ॥४॥
विठ्ठलवाडीसी समाधि सोहळा । अपूर्व देखिला संतजनी ॥५॥
पांडुरंगरूप होवोनि राहीले । कीर्तिरूपे उरले दासरामी ॥६॥

## १८७५

### गुरुभक्ती परायण श्री. गंगाधर रघुनाथ दिक्षीत यांचे निर्याणाचा अभंग

शालिवाहन शके एकोणीसशे नवात । प्रभव संवत्सरात काय झाले ॥१॥
गंगाधररावांनी केलेसे निर्याण । समाधी पाहुन नवल केले ॥२॥
कार्तिक वद्याची एकादश तिथी । प्रथम प्रहर रात्री मात केली ॥३॥
हनुमंतपदी जावूनी बैसले । नामेची उरले नामबळे ॥४॥

# सूची


| | |
|---|---|
| अ उ म ची मिळणी | ३७१ |
| अकार स्थिरत्वे | ५१ |
| अकारापासोनी | ३० |
| अकारीचा घाट | ३६९ |
| अक्कलकोट स्वामी | ३४५ |
| अग्निआत रक्षा | ४३१ |
| अग्निचिये पोटी | २९ |
| अग्निज्वाळी कोळी | ४३१ |
| अग्निनामामाजी | ४४५ |
| अग्निरूप चक्षू | ४३१ |
| अग्नी घातिला | ३३९ |
| अग्नीचेपासोनी | ४३० |
| अग्नीमधोनिया | ३८६ |
| अग्नीमाजी मेळविली | ४०८ |
| अघटित माया | ३३ |
| अचिदातू जीव | २१ |
| अठ्ठावीस युगे | १२० |
| अढळ स्मरण | १३ |
| अणू आतवरी | ४५९ |
| अदृश्यदर्पणी | ३८८ |
| अदृश्य हे कैचे | ४[illegible]१ |
| अदृश्याचा अग्नी | ४४५ |
| अदृश्यावरूता | ३८७ |
| अनुग्रहाची जहाली | २११ |
| अनुपम हातोटी | ६ |
| अनुभव मुराला | ३६५ |
| अनुभवे घेई | ४३९ |
| अनुहत ध्वनी | ४१७ |
| अनेक जीवांचे | १७१ |
| अनंत अपराधी | १५९ |
| अनंत आत्माराम | ७० |
| अन्नावाचूनिया | ३९५ |
| अपरा आग्रार | ४८२ |
| अपूर्व हा सेवा- | १५७ |
| अबोलाचा बोल | १८५ |
| अभिनय भाव | ३५९ |
| अभेद जाणुनी | ६५ |
| अभ्र जं वितळे | ७० |
| अभ्र जं वितळे | २५८ |
| अमल अलमोंकार | ४२८ |
| अमृताचा स्वाद | ३१८ |
| अमृताची धारा | ६४ |
| अमृताची धारा | ४६६ |
| अयोग्य तो पर | ४१ |
| अरे अरे प्रभु | ४८९ |
| अरे ज्याचे अन्न | ९६ |
| अरे तुझे हे | १०० |
| अर्थ देखे तत्त्वा- | ३२८ |
| अर्धमात्रीचा तो | ३७० |
| अलख निरंजन | ३६५ |
| अलक्ष्यासी जाता | ३६७ |
| अलक्ष्यासी लक्षी | ४७६ |
| अवघाची चक्षू- | ३९४ |
| अवघा तूची | २८ |
| अवघे हरीचे | १५२ |
| अवचित नभी | २८२ |
| अवसानापाशी | ४९ |
| अव्यक्त ते दावी | १६८ |
| अव्यक्त ते नाम | १७० |
| अशब्द हा सिंधू | २२ |
| अशब्द हा सिंधू | २९५ |

| | | | |
|---|---|---|---|
| अष्टधा प्रकृती | ४४६ | आकर्षणे प्रकर्ष | ५७ |
| अष्टधेचे ज्ञान | २६४ | आकार पहाणे | ३६१ |
| असत्य भिकारी | २५२ | आकार विकार | २४ |
| असारीही सार | २१९ | आकार हा कैचा | ८ |
| असिपद तेची | २८ | आकारेची कैंचे | ४४६ |
| असोनिया जीव | ९४ | आकारेची पाहू | ५९ |
| असंगाशी संग | १२९ | आकाश ते पहाणे | १४८ |
| अस्ति गुणधर्म | ३०४ | आकाश मिळता | ५० |
| अस्तित्वाचा भाव | ४७८ | आकाशाचा गाभा | ५७ |
| अस्तिभावे भक्ती | ४५० | आकाशाचा पंथ | ४६५ |
| अस्तिभावेविण | ४५२ | आकाशाचे पैल | ४४८ |
| अहो अनुभवाचे | ३७ | आकाशाचे पोटी | ७९ |
| अहो जैसा का | ३२ | आकाशातून | १७ |
| अहो रहस्याची | २४८ | आकाशा मधोनी | ४४४ |
| अहो हा काळ | २४७ | आकाशीचा नीळिमा | १४६ |
| अहंकार त्यागी | १०९ | आकाशी ते गंगा | ८८ |
| अहंकार निरहं | ७२ | आकाशी ते गंगा | ४८१ |
| अहंकाराचा | ४९३ | आगमानिगमा– | ३३४ |
| अहंकारे भेडसावी | ४५७ | आज तरी असे | ३१८ |
| अहंता सांडोनी | ३९३ | आजवरी होता | २०२ |
| अहं निरहं | १५ | आजी हा उजेड | ३१६ |
| अहं ब्रह्म ऐसे | ३२९ | आत नसता | २४६ |
| अक्षर ळ मिळणी | ४६३ | आत बाहेर | २८९ |
| अक्षरे ती दोन | ४८५ | आत राम बाहेर | १२६ |
| अज्ञान डोहो | २४७ | आता एक दिशा | ३८२ |
| अज्ञाननिरास | ४४० | आता एक मज | ३०७ |
| अज्ञानाचे मुखी | ४४२ | आता कोठे गंध | २१२ |
| अंगारा तो अंगी | ३२५ | आता जेथे जेथे | ३०८ |
| अंतरात नाद | ६४ | आता न बोलूची | ४०४ |
| अंतरीचा काम | ५० | आत्मबोध कैंचा | ५ |
| अंतरी या बसुनी | २९२ | आत्मयाचे अंग | १४७ |
| | | आत्मयोग झाल्या | ७३ |
| आई आई गे | ४७२ | आत्मरूप तेची | १०१ |
| आईबापाविण | २४६ | आत्मरूप भोगी | ४२ |
| आकर्षण कृष्ण | ३९४ | आत्मरूपी झाली | ४६९ |

| | |
|---|---|
| आत्मसिद्धांत | ३६३ |
| आत्मस्वरूपाची | ४३४ |
| आत्माची गेलिया | ३९६ |
| आत्मा जागो आत्म- | १६८ |
| आत्मा तो निवांत | ८ |
| आत्माराम धाला | ७३ |
| आत्माराम माझा | १६७ |
| आत्माराम हा | १४७ |
| आत्मारामी अलक्ष्य | ४०२ |
| आत्मा व्यापियेला | ४४३ |
| आत्म्याचे जीवन | ४३९ |
| आदळे कोठुनी | ७१ |
| आदिनाथे केला | १३२ |
| आदि मध्य अंती | ४८३ |
| आदिमध्यांत- | ४४३ |
| आदिशक्ती सीता | ११८ |
| आदी अनादी | २९६ |
| आदी मध्य अंत | ३७४ |
| आदी मध्य अंतो | ३९० |
| आदी वारे अंतीही | २७८ |
| अद्वैताचे सुख | १११ |
| आधारचक्राचे | ८४ |
| आधाराचे खाली | ३९८ |
| आधी वृत्तीचा | ८५ |
| आधी वंदू आद्य | ६२ |
| आधी होते सत्य | ९८ |
| आधी होतो मी | ८३ |
| आनंदाच्या भरा- | ५७ |
| आनंदाच्या भरा- | १४५ |
| आनंदू जहाला | ४०७ |
| आपण असोनी | १७ |
| आपण असोनी | ९५ |
| आपणची भेडसावी | ४२३ |
| आपण देवाची | १११ |
| आपण वर्णिले | २०५ |
| आपुला सांगाती | २८८ |
| आपुलिया आपण | ९ |
| आपुलिया घरी | २१९ |
| आपुलिया प्रसाद | ४९० |
| आपुलिये ठायी | ४७५ |
| आपुले कीर्तन | २०२ |
| आपुले घर | २०९ |
| आपुले ते काय | ३९७ |
| आपुले ते प्रेम | ३९८ |
| आपोआप येते | ९८ |
| आम्हा असे एकची | २१३ |
| आम्ही जन्मा आलो | १५४ |
| आम्ही जाणत | ३५ |
| आम्ही जातो | २४२ |
| आम्ही जावे कोठे | ५९ |
| आम्ही झालो कैचे | ३३६ |
| आम्ही देवाची | २५७ |
| आम्ही देवा तुझ्या | १५७ |
| आम्ही नावाचे | १०१ |
| आम्ही नाही भिन्न | ९४ |
| आम्ही श्रीहरि- | ४७८ |
| आम्ही स्तुतिपाठ | ३३३ |
| आम्ही हरिनाम- | ४६ |
| आम्ही हरिनामाचे | २०० |
| आम्ही हरीचे | १६५ |
| आरक्त ते माया | ३४१ |
| आरक्ताचा लय | ६६ |
| आरसा दृष्टीचा | ८ |
| आलट पलट | ४८१ |
| आला बाई जोगी | २९८ |
| आलो तुझ्या हाती | ४९१ |
| आल्हादचक्रस्थानी | १५ |

आल्हादचक्रस्थानी ७७
आवड ते एक- १७२
आवडी बैसोनी ४९७
आशा ती संपेना ४८
आश्विन शुद्ध २२०
आषाढ शुद्ध २२६
आसन घालुनी ४९
आहे अहंकाराचे ९८
आहे ते खोटे १२
आहे ते सांडिती २६२
आहे नाही लटिके ९०
आहे नाही लटिके २६७

इडा नी पिंगला ४५२
इडेमाजी कृष्ण १६७
इतमाम ज्याचा ८९
इवलीशी अशी २८९
इंद्रिया लगाम ४४
ईश्वरपुरामाजी १३६

उकारीचा घाट ३७०
उघडची असोनी ४८४
उघडिया डोळा २७६
उजळणी करू २५९
उठाउठीमाजी ४८२
उत्चर उच्चारे ४५२
उत्पत्ती व लय ६५
उदान तो कंठ- ४६३
उपाधी निरसोनी ४५१
उभा साधुराज १९०
उभे कीर्तना २०१
उभे कीर्तना २०१
उमगलो देवा ४९४
उसने सुख ४९७

एकची प्रचीती ४५३
एकची बोलणे ३००
एक जाणा वायु- ५३
एकतत्त्वी कळा ४५५
एकदा माझिये २०६
एक दिस मन ४
एक ध्यानी ज्याचे २६१
एकनाथ धन्य ३४८
एकनाथ वैष्णव १३४
एक नाम घट्ट ४५५
एक प्राणी ८०
एकरूपची ३९
एकरूप सत् २५३
एक स्वप्न २५२
एक होता गुरू- ९५
एक होते तेथे २९
एक होते परी ११
एकाकालीच २५
एकापासुनी २७
एकामाजी एक १०९
एकांतीची सेवा ४९३
एकांती लोकांती ३०६
एकांती साधन ४९
ऐका गुरूपरंपरा १८१
ऐक्य दुभागणी ३७४
ऐसा कोण विधी ३०५
ऐसा मी देखिला ७८
ऐसे कैसे विश्व २४६
ऐसे कैसे हे १६
ऐसे कैसे हे ९७
ऐसे कैसे हे ९९
ऐसे कैसे हे २४६

ओळखोनी वर्म १०४

| | |
|---|---|
| औदुंबर कल्प- | २१९ |
| औदुंबराचे ते | २२० |
| औदुंबरी दत्त | २१८ |
| ओं शिवचरणी | ९० |
| | |
| कमळातुनी | ४०५ |
| कबीरासारखी | २०५ |
| करणी करी | २६२ |
| करणीचा पाठ | ७२ |
| करणीत देव | ३६ |
| करा निवडानिवड | १०२ |
| करिती दासबोध | २५७ |
| करिती ज्ञानोबा | ४८६ |
| करितो वंदन | ३७७ |
| करितो हमाली | २४९ |
| करी गोविंद | २०१ |
| करी रामनाम | ४३ |
| करील हरीच | ७१ |
| करी व्यवहार | १०३ |
| करू उत्सव | १३५ |
| करू उत्सव | १९७ |
| करूनी दावी | ३१६ |
| करू या चहा | २४७ |
| कर्णामाजी पंच- | ७३ |
| कर्णी घुमती | ४२७ |
| कर्णीचा तो शद्व | ३७१ |
| कर्ममार्गे जाणा | ११० |
| कलियुगी कपि- | १७५ |
| कलियुगी नाम | ३१ |
| कलियुगे केले | २४८ |
| कल्पना सरता | ३०६ |
| कल्याणची हा | २३१ |
| कशी गत झाली | ४७ |
| कशी मोहनी | ४ |

| | |
|---|---|
| कळेचे हे धर्म | ३९४ |
| काकीमुखातोनी | ५९ |
| काडसिद्ध गुरूंचा | ३७६ |
| कागवाडक्षेत्री | २०० |
| क.डसिद्ध गुरूंचा | ३७६ |
| काढले दिवाळे | २९४ |
| काढिला निराळा | ६१ |
| कान झाला वड | ३८२ |
| कानडी अभंग | १९६ |
| कानड्याने बोध | २६२ |
| का न बोलसी | ४६८ |
| काना मात्रा असे | ३१६ |
| कानाला जिव्हा | ३८४ |
| कापुरीचा दर्प | ५५ |
| काय करू | ४९३ |
| काय करू | ४९४ |
| काय मागू मी | १२५ |
| काय वर्णू आत | १२२ |
| काय वानू मी | १२८ |
| काय स्वप्न वाड | १६१ |
| काया वाचा मनो- | ९२ |
| कार्तीक वद्य | ३०३ |
| कार्य नोहे कर्त्या- | १६ |
| कासयाचे व्हावे | ४२१ |
| काही आता होवो | ६२ |
| काही नाही सुख | ४३ |
| काही मौन धरी | १२१ |
| किती कनवाळू | ३०८ |
| कीर्तन करिती | १८७ |
| कीर्तन करिती | १८८ |
| कीर्तन करिती | १८९ |
| कीर्तन करिती | २०१ |
| कीर्तन करिती | २२९ |
| कीर्तनकाळी | १७८ |
| कीर्तनकाळी | २५८ |

| | |
|---|---|
| कीर्तनाची परंपरा | १५५ |
| कीर्तनाची परंपरा | १५६ |
| कीर्तनाचे पीठ | २१४ |
| कीर्तनाचे रंगी | १५८ |
| कीर्तनी आनंद | ३२४ |
| कीर्तनी या नाचू | २६१ |
| कुडीतून प्राण | १०२ |
| कुरूंदवाड घाटा – | २२५ |
| कुंडलिनिचा | ५५ |
| कुंभारस्वामींनी | १३७ |
| कूर्मगतीपाठी | ३८३ |
| कृतीवरी क्रिया | ४९० |
| कृपणाचा ठेवा | ९२ |
| कृपाघन कैचा | १८२ |
| कृष्ण तोचि राम | ३१४ |
| कृष्ण विष्णू | ७२ |
| कृष्णातीरी ही | २१० |
| केला चरका (चटका) | ७ |
| केला भक्ताचा | ४२४ |
| केला महाराजांनी | १६५ |
| केवल ईक्षणे | ४६९ |
| केवळ आनंद | २७३ |
| केवी आले दास | १३३ |
| केळकरांचे | २१२ |
| कैकाडीमहाराज | ४९९ |
| कैची भक्ती कैचा | ३५८ |
| कैची माझी भक्ती | ४६९ |
| कैचे बिंदूमाजी | ४०२ |
| कैवल्याचा पाठ | ४१० |
| कैवल्याचे गगनी | ४६६ |
| कैसा गुंतलासी | ९५ |
| कैसी रासक्रीडा | २५० |
| कैसी हे चांदणी | ८७ |
| कोठवरी आहे | ४१५ |
| कोठे गेला काम | ५४ |
| कोठे बा राहिले | ३८ |
| कोठेही असलो | ४४८ |
| कोठेही जावोनी | १७१ |
| कोण छेडी सूर | २९० |
| कोणता हा भक्त | ३२० |
| कोणत्या पंथाचे | २०४ |
| कोणा जीवा न | २१६ |
| कोणी करावे | ५६ |
| कोणी कैसे | २१६ |
| कोणी दीप कोणा | ४३३ |
| कोणे करावी | ३३६ |
| कोणे ठायी | २५७ |
| कोण्याठायी आता | ४६८ |
| कोऱ्यावरी काळे | ९ |
| कोल्हापूर ग्रामी | १३७ |
| कंठगत नाम | ४४ |
| कंठासी निरोध | ६२ |
| खटाटोप करोनिया | १०८ |
| खरे बोले तरी | ३१७ |
| खऱ्यापासुनी | ४१४ |
| गगन प्रणवा | ३५४ |
| गगनरहितू | ४४१ |
| गगनाचा गाभा | ८ |
| गगनाचे पाठी | ७३ |
| गगनाचे पोटी | ४६५ |
| गगनाचेहोनी | ७ |
| गगनापासूनी | ४२५ |
| गगनी जो नाद | ३२७ |
| गगनी भासले | ६६ |
| गत ग मिळाला | ११० |

गाऊ नाचू हरीचे १६६
गाडगे बाबा ४९१
गीता ज्ञानेश्वरी ३३१
गीती गाता बोल ४२१
गुणतत्त्वांचा जो २२
गुरूआज्ञा ते १५४
गुरूकृपा सद्बुद्धी ९४
गुरूचा चटका २
गुरूचा पंखा २
गुरूचे नाम २
गुरुतृतीया १९७
गुरुतृतीया २५९
गुरूदेव रानडे १३८
गुरू ध्येय ध्यान ३१२
गुरूनाथ ध्यान ५
गुरूनाम सर्वा ५
गुरूनाम सिद्ध ३२३
गुरू नारायणे १८६
गुरू नारायणे ३७६
गुरूनी शिष्या २१६
गुरूने नवलाव १०५
गुरूपदा विश्वास ३५५
गुरूभक्ता पायी ४३०
गुरू माझा सखा ४
गुरूराजे कृपा ६
गुरूराजे खूण ६१
गुरूरायाचा ५
गुरुराया शरण ९०
गुरुलिंगजंगम १८५
गुरुलिंगजंगम २१४
गुरुलिंगजंगम ४६७
गुरू हृदयी १५९
गुरू एक ग्रह ३१२
गुरू जगी थोर ३१०
गुरूत्व तो गुरू ३१०
गुरूत्वमध्य ३१०
गुरूत्वमध्य ३११
गुरूत्वाकर्षण ३१०
गुरू दावी गोळ ३११
गुरुनामाचे २१३
गुरूलागी जेणे ३१२
गुरू विसरे २१६
गुहेमाजी नारायणे १६७
गुंडुबुवा जेथे २०१
गुंतागुंतीचे १०३
गेले गेले परी १३५
गेले गेले परी १८३
गोपाळबुवा १३१
गोपी सांगे ११९
गोविंद पीताजींना २२९
गोविंदराय २२८
गोविंदरायांचे ४०६
गोविंदरायांनी ३७८
गोविंदाचे रूप २०८
गोविंदा तुम्ही १७७
ग्रासीलिया बुद्धी १४९

घन ते न दिसे २६६
घन ते न दिसे ३५९
घन ते पूर्ण ३६१
घन ते लघु ३६२
घननीळ डोळा ३८८
घननीळ भरला ६३
घनूठायी हे १५०
घालशील जरी १६५
घेतलीसे हाती ३८०
घोटूनी मातीचा १०७
घ्यावी हाती कंथा ९०

| | |
|---|---|
| चर्णं खावें | १०६ |
| चतुराक्षरी | ३१६ |
| चतुर्थ अक्षरी | ३१ |
| चत्वार देहाचें | ४५० |
| चर्मचक्षूने हो | ९१ |
| चला अयोध्येसी | २४२ |
| चला काशीयात्रे | २४२ |
| चला जाऊ | २४२ |
| चला जाऊ | २४३ |
| चलो मछिंदर | २५२ |
| चक्षूरूप आत्मा | ४४० |
| चाखावया आपुले | २७० |
| चामड्याच्या मुखे | ९६ |
| चार मंडलाचे | ६० |
| चार शून्याआत | ११६ |
| चालता बोलता | ३३४ |
| चित्कळा ते देखे | ३५६ |
| चित्कळा ते लाट | ३५५ |
| चित्कळा देखिल्या | ३५५ |
| चित्कळेचेमुळे | ३९७ |
| चित्कळे दाविली | ३५३ |
| चित्त देखे देही | ३५४ |
| चित्त परिमाणू | ३५३ |
| चित्ताचा विकास | ४७२ |
| चित्ताचे देखणे | ४५७ |
| चिदचिदग्रंथी | १० |
| चिदाकाशामाझारी | ३५२ |
| चिदाचिद हे | २१ |
| चिदाचिदाचा | ३७५ |
| चिदाचिदाचा | ३९२ |
| चिदानंद वस्तू | ७४ |
| चिद्गुणी या | २६ |
| चिद्घनू गगन | ३७४ |
| चिन्मय वृक्षाचे | १७७ |
| चिन्मयाचे पंथी | ४०४ |
| चिमडग्रामी | १७८ |
| चिमडपंथाची | २११ |
| चिंचेच्या झाडाला | ३८८ |
| चुकलिया माता | २०६ |
| चुकविजे जन्म- | ११० |
| चुना कात | ३३९ |
| चेइलिया स्वप्न | ४३० |
| चेईलिया | १५१ |
| चैतन्य चैतन्या | ३१४ |
| चैतन्य शीतल | ३५६ |
| चैतन्याच्या वाऱ्या | २८४ |
| चौदेहाचा अंत | ४५३ |
| चौशून्ये मिळाली | ४६५ |
| चंचळ आभास | ४४८ |
| चंचळ ते झाले | ३६३ |
| चंचळ ते माया | ४४७ |
| चंचळत्वाची | ६२ |
| चंचळी आकार | १६८ |
| चांगदेव योगी | १३१ |
| चांदणी लपाली | ८८ |
| छंद लागला | २६३ |
| जगात्पिता गुरु- | २३७ |
| जगाचा तोडी | ४८८ |
| जगाचा नियंता | ४७० |
| जगी मार्गदर्शी | ११९ |
| जड पावे लय | २७ |
| जन सर्व चाले | १०९ |
| जनाबाई सवे | ३४५ |
| जनामाजी वनी | ९० |
| जन्ममरणाचे | १० |
| जन्ममरणाचे | १३० |

| | |
|---|---|
| जन्माचे सार्थक | ९४ |
| जन्मा येऊनी | १६१ |
| जप करी तो | ४८८ |
| जय रघुनाथा | १७६ |
| जयरामपंतासी | ४७० |
| जया अधिष्ठाने | १४९ |
| जयाचिये पोटी | १३० |
| जयाचेनी ज्ञान | ३०४ |
| जयालागी जैसे | २६० |
| जया हाव तो | २५१ |
| जरी काय भाव | १७ |
| जरी का वायू | १२३ |
| जरी घ्याल झोप | ३७ |
| जरी मी तो | ४९१ |
| जवळ असोनिया | १०४ |
| जाऊ दिवाळीला | १९६ |
| जागृतीमाझारी | ४१० |
| जागृती स्वप्न | ७ |
| जाणी जो काळ | ४१३ |
| जाता संतांच्या | १२७ |
| जाले चिद्गुणे | २२ |
| जिव्हा ते रसना | ३८४ |
| जीवदशा जै | ३७५ |
| जीवदशा पहाता | ३११ |
| जीवदशा बुद्धि- | ३७४ |
| जीवनप्रकाश | ४५० |
| जीवनाची दस – | ४८० |
| जीवनाचेमुळे | ४८१ |
| जीवनातू जीव | २३ |
| जीवनी जे रज | ४५० |
| जीवभावा आत | ३८३ |
| जीवरूपी तेची | ४७८ |
| जीव शिव ऐक्य | ३९० |
| जीवाची साऊली | ३२२ |
| जीवाजग्ळी | १९ |
| जू घेई मानेवरी | ८९ |
| जे जे परत्र | ३५८ |
| जे जे भक्तीसी | १७० |
| जेणे या विश्वाचा | ३०५ |
| जेणे योगे नडे | २४४ |
| जेणे योगे होय | २४४ |
| जेथे एक अग्र | ३५५ |
| जेथे पाहे तेथे | २१५ |
| जेथे सुषुप्तिया | १५२ |
| जेथोनी वाढले | ४३५ |
| जैसी आहे गती | २९५ |
| जैसे तैसे आम्ही | ५९ |
| जैसे पहावे | १४३ |
| जैसे बीज तैसे | २३३ |
| जो का वदे एक | ३१ |
| जो जो उठे | ४२१ |
| ज्याचा तोची करी | ७१ |
| ज्याची आहे पहा | ४० |
| ज्याची चांग असे | ३२ |
| ज्याची चांग दृष्टी | ९१ |
| ज्याचे गावी | १०१ |
| ज्याचे गावी | १०७ |
| ज्याचे चाले सत्य | ५६ |
| ज्याचे मनी आहे | १०६ |
| ज्यात काही हाल- | ३१५ |
| ज्यास कळे व्यास | ३१२ |
| ज्योतीचे जीवन | ४८७ |
| झणी धाव सख्या | ४९६ |
| झाला कृपाळू | ४८७ |
| झाला पहाण्याचा | ७६ |
| झालो हरिभक्तांचा | १५६ |

टाकोनिया देह – ३९
टाळूचिये उपरी ७५
टेंबेस्वामी तरी १३८

डाव्या डोळ्यामाजी २६४
डोई घेवोनी २५२
डोळा आकाश १५१
डोळा उडाला २६४
डोळा डोळ्यासी ३६१
डोळा ते प्रकृती २७०
डोळा तो गगन ३६२
डोळा तोची झाला ३६१
डोळा नाही ठावे २६७
डोळा मिळे दोही ३६१
डोळा स्थिरावले ४४३
डोळियाचा देखे ४२५
डोळियाची वाणी ३३२
डोळियाचे माजी ३५३
डोळियाचे श्रोत्र ५२
डोळियात रूप ४८५
डोळियात स्वरूप १४८
डोळियाने पाहिला ३५९
डोळिया भाव १५२
डोळ्यामाजी कँचा १४०
डोळ्यासी पहाता ३६०

तत्त्व गुण जोडी ४६४
तत्त्वता पहाता १६
तत्त्वता हे जग ९६
तत्त्वमसि ऐसे ३३०
तत्त्वमसि सोहं २६१
तत्त्वे तत्त्वाते ६०
तबला ना पेटी ६०
तम अहंकार ४४२
तळमळ मना ६९
तळमळ मनी ४९३
ताकाचेपासोनी ७४
तारावया हा ४१२
तासगावी असे १३६
तिरूपश्वर ३४३
तीनीने बांधिले १२
तीर्था जावोनीया ३०५
तुकाराम धन्य १३४
तुकाराम ३५०
तुजकडे आम्ही ४७१
तुजवीण कोणा १२४
तुझाची प्रसाद ७४
तुझा तूची घेई ३६९
तुझा भार तुझे ४७४
तुझी माया हें २६८
तुझे अंतरीचे ४२१
तुझे कीर्तन ४९४
तुझे कुळामध्ये १५९
तुझे द्वारी आम्ही ४६९
तुझे द्वारी उभा १५७
तुझ्या नामाचे १६७
तुझ्या नावे देतो ४९४
तुटली प्रपंचाची ४९४
तुमचा धर्म २१५
तुमचा हा १६४
तुमचिया नामाचा २१७
तुमची आमुची २०७
तुमचे कीर्तन २०४
तुमचे चिंतन २०७
तुमचे प्रेमो २०७
तुमचे हे बोल ४१८
तुमच्या पादुका २०३
तुमच्या रस्त्यावरी १५६

| | |
|---|---|
| तुमारे रामरस | ९२ |
| तुम्हा संतांचे | १६१ |
| तुम्ही आम्हासी | २१७ |
| तुम्ही संतसंगे | ४९३ |
| तूची देव तूची | २७१ |
| तूची देवा माझे | ४८८ |
| तूची बैस सभा- | ४८८ |
| तूची मला सोड | २८५ |
| तूप थिजले | ७ |
| तेचि सत्य ज्ञान | ५५ |
| तेची निरंजन | ४३२ |
| तेजाचा बंबाळ | २८६ |
| तेजामाजी खेळे | २९७ |
| तेजोबिंदू ऊर्ध्व | ३३८ |
| तेरामाजी सोहं | ४०५ |
| तोचि जाणावा | ४१ |
| तोचि धन्य झाला | ९८ |
| त्यजोनिया कनक | ९३ |
| त्याचे सत्ते वारा | १२२ |
| त्याचे होईल | ४० |
| त्रयोदशाक्षरी | २०७ |
| त्रिकुटाची ताटी | ६७ |
| त्रिकुटी जो वाहे | ५८ |
| त्रिगुणा उपरी | ४७७ |
| त्रिभुवनी करी | ५६ |
| थांबला दृष्टीचा | २८३ |
| थोर आद्य गणपती | ११८ |
| थोर चिन्मय | १८६ |
| थोर देव आम्हा | १२१ |
| दगडाचा गणोबा | ३४८ |
| दत्तात्रय माऊली | १२५ |
| दधिमाजी लोणी | २४७ |
| दधि क्षीरामृत | ४८३ |
| दयासिंधू हा | २९८ |
| दरिद्रयासी नोहे | ४२ |
| दरिद्रयासी नोहे | १०६ |
| दर्शन हे झाले | १३६ |
| दशमद्वार | ६५ |
| दाटला प्रकाश | ६३ |
| दावी ज्योतिचिये | ७६ |
| दावी रूप नाम | १४ |
| दासगणू साधु | १३८ |
| दासरामा रामानंद | १६४ |
| दिन आणि निशी | ८२ |
| दिन बुडाला | ४२४ |
| दिले वर्म हाता | ३४० |
| दिवस हे गेले | २०७ |
| दिव्य दृष्टी कैची | ४३८ |
| दिसो आला जैसा | १५० |
| दीनदयाळ | २९९ |
| दीनदयाळ | ३०० |
| दीन पामरासी | ४६९ |
| दीनांचा दयाळ | २९९ |
| दीनांचा दयाळू | २९७ |
| दुःख देवोनिया | ४४७ |
| दुजेपणी भ्रांती | ३०६ |
| दुरूनी आलो | २१८ |
| दृश्य आणि अदृश्य | ४३८ |
| दृश्य आणि अदृश्य | ४४२ |
| दृश्य ते चंचळ | ३६ |
| दृश्यादृश्याभास | ३८७ |
| दृष्टीचा देखणू | ४४६ |
| दृष्टीचा हा बोल | ४४२ |
| दृष्टीची उपाधी | ४३५ |
| दृष्टीची बाहुली | ६० |
| दृष्टीचे देखणे | ४३९ |
| दृष्टी दावी भासा- | ४३४ |
| दृष्टीबंधनाने | ६७ |

| | |
|---|---|
| दृष्टीमाजी चक्रें | ३२० |
| दृष्टीमाजी वाहे | १३ |
| दृष्टी मिटलिया | ४७७ |
| दृष्टीलागी पंथ | ४३४ |
| दृष्टीसी हे बुबुळ | ४३७ |
| दृष्टी हे निवाली | ३४० |
| दृष्टी हे माघारी | ३८७ |
| देखणा देखता | ४३८ |
| देखणा हा जेव्हा | ७६ |
| देखणे ऐकणे | ४३७ |
| देखणेची शद्ध | ३५२ |
| देखणेची शद्ध | ४४५ |
| देखणे देखणे | ४४१ |
| देखणे बुडाले | ४३८ |
| देखणे हा | ४७५ |
| देखणे हे आहे | १४५ |
| देखणे हे दृश्य | ३८७ |
| देखण्याचा ठेवा | ४४२ |
| देखण्याची कळा | ३२० |
| देखण्याचे पोटी | ४३७ |
| देखण्यामधोनी | ४४४ |
| देखिला कळस | ४०९ |
| देखे दृश्यरूप | ३५६ |
| देखे सोहंभाव | ३५२ |
| देव आला माझा | १२५ |
| देव आहे | ३८ |
| देव करी सर्क | १२० |
| देव गजानन | १३२ |
| देव दाऊ डोळा | २५४ |
| देव भक्ता नाही | २९९ |
| देव भुलला | ४०७ |
| देव भेटे जो- | ८९ |
| देव लहरी | २१७ |
| देवसत्ता ओत- | १२३ |
| देवा आता मज | ४९६ |
| देवा आम्हालागी | ४६१ |
| देवाचिये द्वारी | ३३५ |
| देवा तुजवरी | ४९० |
| देवा वहातो | ४९५ |
| देहभाव लया | १९८ |
| देहभावे जीव | ३३० |
| देहाचिये मध्ये | २० |
| देहाची धारणा | ३९५ |
| देहालागी कोण | ९८ |
| देही जे का प्रेम | ९७ |
| देही देखे क्षण- | ३९६ |
| देही भरला नाद | ९६ |
| देही या नटले | ४२७ |
| देही सद्गुरूनी | ४३१ |
| दैनिक जनन | ३९७ |
| दोन तारे स्थूला- | ४१७ |
| द्रष्टया हे पहाणे | १५० |
| द्विपाद तो दिसे | ७९ |
| द्वैत पहाणे | १४१ |
| द्वैत मीतूपण | १४८ |
| धन्य आका लक्ष्मी | १७९ |
| धन्य आम्ही वायु- | २८२ |
| धन्य कीर्तनानंद | २०८ |
| धन्य कैवल्याचे | २२० |
| धन्य गोंदवलेकर | १३२ |
| धन्य ते कैवल्य | ४१८ |
| धन्य ते शंकराचार्य | ३२९ |
| धन्य तोचि दिन | ९९ |
| धन्य धन्य गुरु | २६० |
| धन्य धन्य गुरु- | ४३२ |
| धन्य धन्य चोखा | १३४ |
| धन्य धन्य धन्य | ३०९ |
| धन्य धन्य माझे | १९९ |
| धन्य धन्य माझे | १९९ |

धन्य धन्य माझे १९९
धन्य धन्य माझे २२४
धन्य धन्य रघु- १९१
धन्य धन्य रामा- १६७
धन्य धन्य वेणु- ३४६
धन्य नारायण १८०
धन्य मस्तक- १०८
धन्य रघुनाथ १९१
धन्य रेवणसिद्ध ३८६
धन्य रेवणसिद्ध ४७१
धन्य सद्गुरू १७९
धन्य सद्गुरू १९५
धन्य समाधि- २१८
धन्य संत ३४९
धन्य हनुमंत १८९
धन्य हनुमंत ३३६
धन्य हरिनामाचे २५३
धरू नको ताठा १०८
धरूनी अभिमानाचे १०९
धर्म नये सांगता ३९६
धर्मासी जाणोनी २४५
ध्यास लागला २९१
ध्वनी आणि नाद १६९

नऊ रुपये ४८३
नको धन मान ४९२
न बोलावे काही ६८
नभाचा हा गाभा १२९
नभामाजी देखे ४०६
नमन गुरुवरा ३४
नमनाचे अंगी ३००
नमो धन्य धन्य १८५
नमो मातृदेवा २१०
नव्हतेची अंगे ४८५
नव्हतेची ऐसा ४७४
नव्हते ते दिसू ३५८
नसते वाढवुनी ४१
नसे तेची दिसो २६
नाकी मी माझे ३८३
नागाचे हे विष ८१
नागाप्पाण्णा गुरु- १८७
नागाप्पाण्णा बोलियेले १६४
नागाप्पाण्णामहाराज १६२
नागाप्पांचे वचना १९५
नातू आणि पणतू ४९५
नाद बिंदु कला ४६६
नाद हे मुक्तिद्वार ९७
नादामाजी ध्वनी ४१६
नानापरी दिसे २१५
नाभिचिया पैल ५८
नाभीकमलातोनी ४७०
नाम अक्षराचे ४५८
नाम आदि अंती ४५९
नाम कर्म नाम ४२
नाम कैचे ब्रह्म ४२८
नामघोष जेथे ५१
नामची जीवन २०८
नाम जे सप्रेम २०५
नाम ते न घेता ४१
नाम थोर हे ३६
नामदीपपाठ ४२९
नाम देऊनी ३५
नाम देव नाम ४२२
नामदेवमंदिरात २००
नाम नये सकाम- ४९३
नाम नवल ४२५
नाम नामासरिसे ४२३
नाम ब्रह्म सांगे ४०२
नामब्रह्मी धाले १७०
नामरस मज ४७२

| | |
|---|---|
| नामरूप ऐक्य | ६१ |
| नामरूप भिन्न | १९ |
| नामसप्ताहाचा | ४९८ |
| नामसंकीर्तन | ३२४ |
| नाम हा प्रकाश | ३९४ |
| नाम हेची निज- | ४५९ |
| नाम हेची भक्ती | १६९ |
| नाम हेची भक्ती | ४५८ |
| नाम हेची विद्या | ४३ |
| नामाचा बिंदू | ११५ |
| नामाचिये अंगी | ३९४ |
| नामाचिये ठायी | १७२ |
| नामाचिये स्थानी | ४७४ |
| नामाचे साधन | ३२७ |
| नामाचे स्फुरण | ४३८ |
| नामाच्या साधने | ४५ |
| नामाठायी सर्व | १७० |
| नामातून नाम | ४५४ |
| नामानंदू भरला | २३९ |
| नामापाशी देव | २१६ |
| नामामाजी ज्यानी | १३० |
| नामामाजी राम | ३६ |
| नामी अंतरी | ३८ |
| नामी आले | ४१ |
| नामी उरेना | ४२२ |
| नामीच गगन | ४६६ |
| नामी जहाला | ४२२ |
| नामी दृश्यादृश्य | १६८ |
| नामी द्वयाद्वय | ४२८ |
| नामी धाले मन | १७१ |
| नामी निवेदना | १३१ |
| नामी समाधान | १६९ |
| नामी समाधान | ४२० |
| नामी साधे खरे | १६९ |
| नामोच्चारी नाही | ४५५ |
| नारायणा भेटी | १८० |
| नावरे रसना | ४२६ |
| नाही अध ऊर्ध्व | ४६५ |
| नाही कोणाचा | २१७ |
| नाही गाठी धन | २०३ |
| नाही गुप्त ना | १५० |
| नाही घेतले | २११ |
| नाही तबला | ७२ |
| नाही मीतूपण | २७० |
| नाही संभव | ४१४ |
| निखाऱ्यावरी | २८४ |
| निजत्वातू आत्म- | ४६२ |
| निजरूप पडता | १५० |
| निजस्मरणा | २६९ |
| निजाचाही जो | १४१ |
| निजाठायी शून्य | ४०२ |
| निजांगीचे पोटी | ४८० |
| नित्य करितो | १६१ |
| नित्य कीर्तनाची | २०३ |
| नित्य तेची सत्य | ४५३ |
| नित्य नैमित्तिक | २०४ |
| नित्याची जे गती | २३४ |
| नित्यामाजी नेम | ४५४ |
| निमित्ते रचिले | ६३ |
| निरंजनपाठ | ४३६ |
| निरंजनपीठा | ३३६ |
| निराकाराचे | १४९ |
| निराकारू तेचि | ९ |
| निर्गुण सगुण | ३३३ |
| निर्गुणाचा शब्द | ४६१ |
| निर्गुणाचे पोटी | ११५ |
| निर्गुणीचा प्रणव | ११५ |
| निर्माल्य घेईन | २०९ |
| निवर्तजे गती | ३२३ |
| निवांत बुद्धीचा | २८ |
| निवृत्तीचे कृपे | ३२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| निवृत्तीचे वेड | ३२४ | परमात्मरूपी | १४२ |
| निवृत्ती प्रसाद | ३९३ | परमात्मा निश्चळ | २८ |
| निवृत्ती ज्ञान– | ३८६ | परमात्मा श्रीकृष्ण | ३९३ |
| निश्चळ ते पूर्ण | ३६३ | परमानंदी सत् | ४२७ |
| निश्चळ ते ब्रह्म | ११ | परमार्थ आकळे | ३०० |
| निश्चळ ते ब्रह्म | ४१२ | परमार्थ हा | १०७ |
| निश्चळी चंचळ | २९ | परमेश्वर | १७ |
| निश्चळी वर्तुळ | २५ | परमेश्वर | ९१ |
| नि:शब्द अशब्द | १४ | परवत आत्मा | ४५१ |
| नि:शब्द ते निश्चळ | ३७४ | पराङ्मुख होता | १०१ |
| नि:शब्द ते शब्दा | ३७३ | पराविया नारी | २४९ |
| नि:शब्दी घा | २२ | परिणामी कैचे | ३६५ |
| नि:श्वासी प्रमाण | ४५४ | परेचिया पैल | ४४७ |
| निष्क्रिय प्रक्रिया | ५० | पवित्र स्वर्गंगा | ५२ |
| निळोबा निशाण | ३८२ | पहाणीमाझारी | ४४४ |
| निळोबाचा अवतार | १९१ | पहाणी या चंचळे | ४०३ |
| निंबरगीकरांना | १७८ | पहाणे आकारिले | १४९ |
| नीच होय उंचा | ८८ | पहाणे आदी | १४० |
| नीलबिंदूचिया | १४५ | पहाणे आले | १४८ |
| नीलबिंदूमाजी | ४०२ | पहाणे उरवोनि | १४८ |
| नीलवर्ण बिंदू | ४०४ | पहाणे उलट | १४३ |
| नेणीवेनी जाणिली | ३२९ | पहाणे केला | १४२ |
| नेत्र कंठ गती | ११६ | पहाणेची अनुभवे | १४३ |
| नेत्र मिटलिया | ६४ | पहाणेची अनुभव | ४०३ |
| नेत्र व उमाळा | ५० | पहाणेची दर्शन | २७० |
| नेत्रस्थानी पंच – | ८७ | पहाणे जहालिया | १५३ |
| नेत्राचा परेचा | ३७० | पहाणे जे वस्तु– | १५१ |
| नेत्रविण देखे | ३७२ | पहाणे ते कैचे | ३६० |
| | | पहाणे ते कैचे | ४८० |
| पटवर्धन कुळी | १३५ | पहाणे निश्चळे | १४३ |
| पती हा जन्मला | ८० | पहाणे परतले | १४० |
| परीद बांधुनी | १०२ | पहाणे पसरे | १४० |
| पदरी बांधूनी | ९७ | पहाणे पहाता | ४८१ |
| पद्ममुद्रा हस | ४७५ | पहाणे पहाले | १४१ |
| पद्ममुद्रे वे | ४७३ | पहाणे पूर्णता | १४२ |
| परत्र ते नाशिवंत | ३५९ | | |

| | | | |
|---|---|---|---|
| पहाण पे प्रगट | १५३ | पुरी तळताना | १०४ |
| पहाणे बुडाले | ३६० | पुरे पुरे तुझा | २९१ |
| पहाण्याचा जाला | १५१ | पुरोडाश कैचा | ३५० |
| पहाण्याची आटा- | ६३ | पूर्ण ब्रह्म | १२४ |
| पहाण्यातु आत्म- | १५१ | पूर्णस्वरूपी | ६० |
| पहाण्याने कैचे | ४८० | पूर्णस्वरूपी | २७१ |
| पहाण्यापासुनी | १४४ | पूर्व ते नासिका | ४४४ |
| पहाण्यापासुनी | १५२ | पूर्व पश्चिम | २५४ |
| पहाण्यालागी आत्म- | ९९ | पूर्व पाट तो | ६४ |
| पहाता खनाळ | ३१८ | पृथ्वी आप तेज | ७४ |
| पहाता हे सर्वांग | ३१५ | पृथ्वी जहाली | ४२३ |
| पहाता ब्रह्म हे | १९ | पृथ्वीतल आणि | ४८१ |
| पहावे आपण | २० | पेठ वसविली | १७४ |
| पाच तत्त्वामाजी | ४६४ | पेण गावाहोनी | १३८ |
| पाचा आत पाच | ३२२ | पैल मेरूशिखरी | ५० |
| पाडवा पाडवा | २३९ | पोट हे गगन | ३३० |
| पाण्यामाजी | ३७ | पोटापाठीमागे | ६५ |
| पाण्यामाजी | ७९ | पोटावरी बांधुनी | १०५ |
| पाण्यामाजी | ८१ | पोटाविण कैची | ४२७ |
| पाण्यावरील | १६ | पोपटपंखाने | १०५ |
| पाताळ भूलोक | ३३८ | पोहत्यावरी पोहे | ७८ |
| पालटला कैचा | १६० | पोर्णिमेसी झाला | २४० |
| पाल लागली | ८१ | पोर्णिमा ते | ३११ |
| पावन दिन | १९७ | पंचतत्त्वयांचे | ४६३ |
| पाहू कोठे येते | २८८ | पंचप्राणकळा | ३५७ |
| पाहे दृष्टी शून्य | १५३ | पंचभूतांची | ३०६ |
| पांडवा रक्षिले | १२० | पंचम आलाप | ३३१ |
| पांडुरंग | १३९ | पंच तत्ते | २३ |
| पांडुरंग | २१८ | पंच महाभूती | ३०४ |
| पांडुरग | २९९ | पंचवीस तत्त्वांची | ८७ |
| पिंजऱ्यात बैसुनी | ८३ | प्रकाश हे दावी | ३६० |
| पीत आत्मा शून्य | २७४ | प्रकाशात हेतू | ४३४ |
| पीत ब्रह्मीचे | २७४ | प्रकृती हे खोटी | ३६२ |
| पीताचे पासोनी | २८ | प्रणव आदि | ११३ |
| पुत्रापरी प्रेम | २०४ | प्रणव उदेला | ११४ |

प्रणवची कारण ४१६
प्रणव तो देव ११४
णवाची गाठ ११४
प्रणवाची बीज ११३
प्रणवाचे आत ११५
प्रणवाचे पैल ४६५
प्रणवाचे पोटी ३२०
प्रणवाचे पोटी ४११
प्रणवाचे पोटी ४१५
प्रणवाचे स्थानी ४१६
प्रणवामाजी ४१०
प्रथम प्रमाण २२
प्रत्यक्ष घेईजे ३८३
प्रभूचिये सत्ते १२२
प्रवृत्ती जाणीव ३२०
प्रवृत्ती बडबड ३२२
प्रल्हादची ऐसा २६०
प्राण आणि देह ३९५
प्राण खेळे प्रणवा– ४१८
प्राणगती धावे ४८
प्राणगती वारे ४६४
प्राणपृथक्करणी ३८९
प्राण हा ॐकारी ५१
प्राणाचा मनाचा ५८
प्राणाचीया फेरी ३०४
प्राणाचे जे नाथ १३३
प्राणावरी कैसी ३५४
प्राणियाची कांती १०२
प्रेम देई नारायणा १६८
प्रेमभाव दावी ३९८
प्रेमभावे देखे ३४०

फिरली गुरुकिल्ली ४
फळे रसाळ ३३

बहू नामरूप २६६
बापुराव केळकर २२०
बा मना साधना ९३
बारे नामरसा– ३३
बालकाचे दोष ६८
बावन्न अक्षरे ३२७
बावन्न ते पदा ३४०
बाहुलीचे माजी ७५
बाळ हे खटचाळ ४६८
बाह्य साधने २६२
बिंदुठायी झाले ११६
बीज तेची फळ ४०९
बीजाविण फूल ४३३
बुद्धिगामी जीव- ३९०
बुद्धिशून्या आतू १२४
बुद्धिचा विकास ३२४
बुबुळाचे पाठी ४३७
बेचाळीस वर्षे २२०
बैले व्यापिला ७९
बोधल्याचे पानगे ३४५
बोधिती श्रीगुरू ७४
बोलता चालता २७
ब्रह्म चैतन्य ५०१
ब्रह्म ते अलक्ष्य १४४
ब्रह्म ते अविभाज्य २३
ब्रह्मनाळक्षेत्री २२९
ब्रह्मनिष्ठ कोणी ३३१
ब्रह्म पहाता १४१
ब्रह्म पूर्ण संत ३०७
ब्रह्ममूर्ती संत ३०७
ब्रह्मरूपी मारा १०१
ब्रह्मस्वरूपाचा १२२
ब्रह्म ज्ञानखुणे ३९३
ब्रह्माचा तो भास २०
ब्रह्माचा हुंकार ३२६

| | |
|---|---|
| ब्रह्मा नाहीं ठावें | ३६१ |
| ब्रह्मावरी आली | १६ |
| ब्रम्हासी पहाणे | १५३ |
| ब्राह्मणांचे हे | २५९ |
| | |
| भक्ताचे पालन | ३३ |
| भक्तिपंथे चाल | ८९ |
| भगवन्नामी सर्व | ४२५ |
| भगवन्नारायण | ३४६ |
| भगवान सद्गुरु– | ३४७ |
| भरिला सागर | २४९ |
| भव्य सिद्धमूर्ति | ४७० |
| भाऊसाहेब | १३९ |
| भागवतधर्मी | ३०२ |
| भागा येता मन | ४१५ |
| भाताची परीक्षा | १०७ |
| भाव धरी देवा– | ९० |
| भूषण परमार्था | ९० |
| भृकुटीची गती | ३२४ |
| भेटू या रामा | ७० |
| भ्रमन ज्ञाने सारा | ९३ |
| | |
| मकारापासोनी | ४६० |
| मकारीचा घाट | ३७० |
| मज दास करी | ४९२ |
| मज प्राकृतासी | ३२७ |
| मठ नाही बांधिला | १८४ |
| मतिमंद परी | ३३२ |
| मन चित्त बुद्धी | ४२ |
| मन चोर हरी | २८७ |
| मन ते जाणावे | १५ |
| मनाअधीन | २६१ |
| मनाचा निश्चय | ४९६ |
| मनाचिये एक– | २६१ |
| मनामाजी ऐके | ११४ |
| मरुळसिद्ध | १८० |
| मर्जी तुमची | २१२ |
| महद्ब्रह्मी देखें | ११४ |
| महर्षी करिती | ३२८ |
| महाकारणाचे | ४१२ |
| महाघोर तरी | ३१५ |
| महा नारद | २५५ |
| महाप्राणामाजी | ३७१ |
| महामाया बोल- | ३७२ |
| महाराजांची | १५७ |
| महाराजांची | ४३२ |
| महावाक्य गुज | ३३० |
| महावीर तेथे | ३१९ |
| महाशून्य मूस | ३८६ |
| महेश्वर कोठे | ११९ |
| माऊली ते | १२९ |
| माझा जो ईश्वर | ३१८ |
| माझा सखा हरी | १०० |
| माझिये अंतरी | ४८९ |
| माझी तुझी एक | ६९ |
| माझे अपराध | ४९५ |
| माझे बोल ते | ४०४ |
| माझे मजसी | २६७ |
| माझ्या मायबापा | १२४ |
| माती चाळिली | ३८५ |
| मामा तुम्हालागी | २०२ |
| मामा तुम्हासारिसा | २१४ |
| मामा तुम्ही गेला | २०५ |
| मामा तुम्ही गेला | २०६ |
| मामा मामा मामा | २०५ |
| माय पोकळीमा | २४१ |
| मायबाप गण | २५७ |
| मायबाप देव | १२६ |
| मायबापांच्या | १२८ |
| माया असेल | ४९१ |

| | | | |
|---|---|---|---|
| मायेचे उदरी | ११ | मूलाधार बंध | ४७६ |
| मायेतोनी पैल | २४० | मूळ ब्रह्मरूपी | ४१३ |
| मायेमाजी नको | ४९५ | मृत शरीरेही | ४७० |
| मार भरारी हंसा- | ९३ | मेरू दंडावरी | ४३० |
| मारुतीने गिळीला | २५० | मेरूपर्वती | ४८४ |
| मार्ग हा शीर्षाचा | ३८६ | मेरूसी मुंगीने | ८४ |
| मालकासी खूष | ४० | मेल्यावीण स्वर्ग | १०५ |
| मासोळीचे पोटी | ८२ | मैना बोले ज्ञान | ८५ |
| मांजरी ते बसली | ८१ | मोठे संत | ४ |
| मिरवू कवतुक | २४५ | मोत्यावरी शिंपला | ८० |
| मिळायाचे ते | ६१ | मोह आणि शोक | ३०१ |
| मी तू आहे खोटे | १०६ | म्हणताती विश्व | १९ |
| मीतूपण दृश्य | १४१ | म्हणती माझे | ३८ |
| मीतूपण भास | १९ | म्हातारपणी | ४८३ |
| मीतूपणाचे | ४७५ | | |
| मीतूपणा साक्षी | १४१ | या मारा पाहू | २८३ |
| मीतूपणे बुझ | ७१ | यांत्रिक युगी | १९० |
| मीपण सांडोनी | ११० | येची देही मुक्त | ११२ |
| मीपणे तुजसी | १३ | येथ आपुली | २१५ |
| मी वारा तू | २८८ | योगिराव स्वप्ना- | ४१९ |
| मुक्त असोनिया | ९५ | योगी तोची जाणा | २५३ |
| मुक्तरूप भरले | ३८५ | | |
| मुक्त व्हावे तरी | ३७ | रक्त श्वेत श्याम | ३५६ |
| मुक्ताईने कथिले | ३४६ | रज तम हेत | ३९९ |
| मुक्तीचे चांदणे | ३८ | रमोनिया व्यवहारी | ४५ |
| मुक्ती ते मोकळी | ३२१ | राका कुंभार | ३४४ |
| मुक्तीवरी भक्ती | ३२१ | राघू पक्षियाचे | ८६ |
| मुळी शून्यरुप | २१ | राजयोगी असोमी | १३६ |
| मुंगीचिये वरी | ८५ | राजहंसालागी | ३१८ |
| मुंगीचे ये मुखी | ८२ | राजारामी प्रीत | ४८९ |
| मुंगीचे स्वरूप | ८७ | रामकृष्णतत्त्वी | ४५१ |
| मुंगी जहालीसे | ८५ | रामकृष्णनामी | ३८९ |
| मुंगी झाली मीन | ८४ | रामकृष्ण वासुदेव | ४०३ |
| मुंगीवरी ओझे | १५९ | रामकृष्ण शून्य | २८८ |
| मूर्ख मूळ रूपा | ९४ | रामकृष्णहरि | ३८९ |

| | |
|---|---|
| रामकृष्णहरी | २५ |
| रामकृष्णहरी | १२९ |
| रामकृष्णहरी | २६७ |
| राम कृष्ण हरी | २९७ |
| रामकृष्णहरी | ३२२ |
| रामकृष्णहरी | ३२९ |
| रामकृष्णहरी | ४२६ |
| रामकृष्णी मन | २७५ |
| रामकृष्णी विस्तारले | १४४ |
| रामकृष्णी शून्य | २७५ |
| रामचंद्र गुरूंचा | ३७७ |
| रामचंद्र सद्गुरू | १८४ |
| राम तोची हरी | ३२५ |
| रामदास गुरू | ३७८ |
| रामनाम कैवल्य | ४१८ |
| रामनाम गाणे | ४० |
| रामनाम घेता | ४० |
| रामनाम डंका | ४१७ |
| रामनाम तारू | ३२ |
| रामनाम संपत्ती | ४५ |
| रामनामाचे | ३२ |
| रामनामी तुकता | १३३ |
| रामनामी लागो | ४४ |
| राम निज कृष्ण | २६ |
| रामबाणे तीन | ४१० |
| रामभक्त हनुमंत | ४२६ |
| राम राम राम | ४३ |
| राम राम राम | ४५ |
| राम राम राम | ४५ |
| राम राम राम | ४६० |
| राम राहो मुखी | १७२ |
| रामरूप जगी | ३६ |
| रामरूप व्हावे | ३७९ |
| राम वदावा | ३१ |
| राम सर्वत्र | ११९ |
| राम सर्वात | १२३ |
| राम होवोनिया | १०९ |
| रामाचिये सत्ते | १२२ |
| रामाच्या साहाय्याने | २०४ |
| रामाच्या स्पर्शाने | २५९ |
| रामा तूचि प्राण | ११७ |
| रामानंदमहाराज | ३६९ |
| राष्ट्राचे करी | २५७ |
| रुण झुणु रुणु | ४१२ |
| रूप पहाता | ४५७ |
| रूप पहाले | २७१ |
| रूप पहाले | ३५८ |
| रूप बैसे दृष्टी | ३१७ |
| रेडियाचे मुखे | १२९ |
| रेणाईचा पाठ | ४७२ |
| रेणाईचे स्थान | ४७१ |
| रेणाई माऊली | १८३ |
| रेणाई रेणाई | ४७१ |
| रेवणसिद्ध | १ |
| रेवणसिद्ध | १९२ |
| रेवणसिद्ध | १९२ |
| रेवणसिद्ध | १९३ |
| रेवणसिद्ध | ४६८ |
| रेवणसिद्धांनी | ४३४ |
| रेवणांचे कर- | १७९ |
| रंगलासे आत्मा | २३९ |
| रंगी रंगो | ४०३ |
| लख् प्रकाशात | ५४ |
| लटिका भक्त | ७२ |
| लपसी छपसी | ७० |
| लक्ष्य आणि लक्ष्य | ४०१ |
| लक्ष्य तेची भक्ती | १४२ |
| लक्ष्य ते सुनील | ३६६ |
| लक्ष्य दावीते | २६ |

| | |
|---|---|
| लक्ष्याचा हा खेळ | ३६५ |
| लक्ष्यामाजी ठसा | ३६७ |
| लक्ष्यामाजी नील- | ३६६ |
| लक्ष्ये वस्तू कैची | ३६८ |
| लागला हृदयीच | २७७ |
| लागली टक | ४७३ |
| लाभाविण प्रीती | २०३ |
| लिहिता देव | १२४ |
| लेकुरानी काय | २१४ |
| लोचनी हे पहाणे | ३५९ |
| लो लो ऐसा | ४११ |
| | |
| वजीरबाबांचिया | १३५ |
| वदनी एक | २५४ |
| वदविला बोल | ३३९ |
| वर्तुळ आकृती | २६८ |
| वस्तू जवळी | ४३० |
| वस्तू डोळियांचा | ७७ |
| वस्तूपाशी ते | ४२४ |
| वाचेपैल कैचे | ४४६ |
| वाच्य नामातोनी | ४६६ |
| वाढता धारणा | ४४ |
| वायाची उपाधी | ४५१ |
| वायुघर्षणी | २७३ |
| वायु चक्राकार | ५८ |
| वायुरूपा निरंजना | २७३ |
| वायुलहरी | २९० |
| वायूची घासणी | ५२ |
| वायू निरोधिता | ५५ |
| वायूने धावती | ४१३ |
| वायो प्रसन्न | २७९ |
| वारा उखळोनी | २९० |
| वाराची देव | २७९ |
| वारा झालो मग | २८१ |
| वारा डोळुला | २७८ |
| वारा पहाता | २८१ |
| वारा पाहिला | २९२ |
| वारा माझा मी | २९१ |
| वारा वारा वारा | २९१ |
| वारा हा खुळा | २८४ |
| वारा हा जगती | २८० |
| वारा हा प्राण- | २७९ |
| वारियाची मौज | २७७ |
| वारियाने उधडिला | ३३८ |
| वारियाने वारा | २८० |
| वारिया मिळाले | २७५ |
| वारिया विश्रांती | ४४० |
| वारे कधी प्रगटेल | २८० |
| वारे भरले | २८० |
| वारे शिरले | ३१५ |
| वाऱ्याने उडविला | २६४ |
| वाऱ्यावरी लागली | २७६ |
| वासनेचे ज्याली | ३४९ |
| वासंतिक ज्ञान | ४०९ |
| विकास पूर्ण | २४ |
| विकृती आहे | १०४ |
| विकृती ही | २३ |
| विचार ते शुद्ध | ४७७ |
| विजेच्या प्रकाशे | ६१ |
| विटेवरी उभा | २९८ |
| विठोबासी शरण | ११८ |
| विठ्ठलवाडी | ४९८ |
| विठ्ठल विठ्ठल | १२१ |
| विरोधेचि झाला | ८ |
| विशुद्ध आणि | ५७ |
| विश्वची झाला | १०३ |
| विश्व परब्रह्मी | ९८ |
| विश्वबंधुत्व | ३७७ |
| विश्वमालिकेचा | २८६ |

विश्वसार म्हणोनी २४४
विश्व हे असार १७
विश्वाचा जो माय – १००
विश्वाचा निरास ४३३
विश्वी भरला ६९
विष्णु करी सर्व ११८
विसरू नको २४८
विज्ञान आटलें २७३
विज्ञानाचे श्वासी ४०६
वृत्ती चांचल्ये १४३
वृत्तीचिया पैल ३२१
वृत्तीचिये पैल ४४१
वृत्तीचे सुमन ४४१
वृत्तीवरी नाही ३०१
वृक्ष आणि छाया ६२
वृक्ष देखोनिया १०५
वृक्षाविण पुष्प ३८५
वेगू ठायी कैचे ९
वेडियाचा गाव ९४
वेदशास्त्र पुराणांचे ४६२
वेदशास्त्र संत – ४३
वेद हे विज्ञान ३२६
वेदाचिये वेली २६०
वेदानी संतांनी ३९
वेदांचे वचन ३२९
वैलांटी धरोनी ४८
वैकुंठासी शिडी ३०२
वैकुंठी न राहे ३८३
वैकुंठ निघोट ३२८
वैकुंठ श्रीहरी ३९०
वैराग्याचाचोनि ३५
वंदन करितो १८३
वंदन करी १६६
वंदन ते साधी ३२१
व्यासाचिया मनी १३३
व्यासाने परोंघ ३१९
शक्ती भेटवीते १२
शब्द आकारिले २७६
शब्द कैचा उठे १३
शब्द गतिमान १४
शब्दगुणे २४
शब्दग्रास महा – ४७६
शब्द चंचळ १४५
शब्द तेज मिळणी ११३
शब्द ते सगुण ६९
शब्द ते सगुण ४६१
शब्द तो राहिला ४४५
शब्द देखे शून्य ३२३
शब्द निःशब्दाची ४८५
शब्दब्रह्म प्रगट १५
शब्दयोगे भासे १७०
शब्द स्पर्श रूप ३७१
शब्दाठायी देखे ४८९
शब्दाचा उच्चार ४३३
शब्दाचा निरास ४१७
शब्दाचा निःशब्द ६५
शब्दाची हे माया ४६०
शब्दाचे उपरी १३३
शब्दातूनी निघे ४३६
शब्दामाजी साठला १४
शब्दाशब्द ग्रासी ४०८
शब्दे ग्रासी शब्द ३२७
शरीरासी जावे ३१८
शशी आणि शशि– ६९
शामल रूपडे ३१४
शामलांग तुझे ३१५
शालिवाहन ५००
शालिवाहन ५०१
शालिवाहन ५०१
शालिवाहन ५०२

| | |
|---|---|
| शालिवाहन | ५०२ |
| शालिवाहन | ५०२ |
| शालिवाहन | ५०२ |
| शालिवाहन | ५०३ |
| शालिवाहन | ५०३ |
| शालिवाहन | ५०३ |
| शालिवाहन | ५०४ |
| शालिवाहन | ५०४ |
| शालिवाहन | ५०४ |
| शालिवाहन | ५०४ |
| शालिवाहन | ५०५ |
| शालिवाहन | ५०५ |
| शालिवाहन | ५०५ |
| शालिवाहन | ५०६ |
| शालिवाहन | ५०६ |
| शालिवाहन | ५०६ |
| शालीवाहन | ५०० |
| शालीवाहन | ५०० |
| शिव आत्मा तो | २७४ |
| शिवदासा स्फुरे | ३०२ |
| शिवपिंडीपासुनिया | १७९ |
| शिपेवरी जैसा | १८ |
| शीत उष्ण आभा | १४२ |
| शीर्षमार्ग हरि – | ४५३ |
| शुद्ध आणि कृष्ण | ४३२ |
| शुद्धं ब्रह्म परं | १९४ |
| शुद्धं ब्रह्म परं | १९४ |
| शून्यची होवोनी | ४४८ |
| शून्य ते चंचळ | ३६६ |
| शून्यरूप पहाणे | १४४ |
| शून्य शून्ये | १४४ |
| शून्याचा हा खेळ | १३ |
| शून्याचिये पोटी | ३९२ |
| शून्याची लहरी | २७५ |
| शून्याचे विवरी | ३६७ |
| शून्याचे शेवटी | १२ |
| शून्याते सारिता | ३९५ |
| शून्यामाजी फिरती | ३८५ |
| शून्यामाजी शून्य | ५२ |
| शून्यामाजी शून्य | १११ |
| शून्यालागी आहे | २९६ |
| शेषावरी देह – | ५६ |
| शंकरमहाराज | १३७ |
| शाम नीळ मुद्रा | ३४१ |
| श्यामल रूपडे | ३८९ |
| श्यामसुंदर | ३७३ |
| श्रवण जो गुण | ४४३ |
| श्रवणाची जिव्हा | ३८४ |
| श्रवणाची झाली | ४४३ |
| श्रवणातोनी नयनी | १५२ |
| श्रीगणेश पाही | ११७ |
| श्रीगुरु माऊली | ६ |
| श्रीगुरूराया | १७४ |
| श्रीगुरू श्रीगुरू | ३०९ |
| श्रीगुरूंचा पाठ | ३०९ |
| श्रीराम जयराम | १८० |
| श्रीराम जयराम | ४२६ |
| श्रीराम हनुमंत | २९८ |
| श्रीरामाचे असती | १२० |
| श्रीहरिकीर्तनी | ३८१ |
| श्रीहरिमंदिरी | ३३५ |
| श्रीहरीचे द्वारी | ३३५ |
| श्रुति नाम आणि | ३३२ |
| श्रुतीचे पठण | ३२६ |
| श्रेष्ठ वागती | २१७ |
| श्रोता आणि वक्ता | ३८४ |
| श्रोता वक्ता एकची | १६६ |
| श्रोत्र वाणी चक्षू | ४२ |

| | |
|---|---|
| श्वासाचा उदय | ४३९ |
| श्वासोच्छवासी वेळ | ४५४ |
| श्वासोश्वासामाजी | ३१७ |
| श्वेतरुप दर्शन | २९४ |
| श्वेत श्याम दोनी | २८५ |
| सकळ उपाधी | ४७६ |
| सकळ जगाचा | १०० |
| सगुण दृष्टी | ४७७ |
| सगुण हे भक्ती | ३३४ |
| सगुण हे भक्ती | ३३४ |
| सगुणाचा ढोल | ४४० |
| सतरावी जीवन – | ४८३ |
| सत्य हे खंबीर | ३७ |
| सत्यावरी जे का | १८ |
| सत्यावरी होय | १८ |
| सदा घडो | ४९२ |
| सदा नामजप | ३०५ |
| सद्गुरू आज्ञेने | १५६ |
| सद्गुरू उदार | ६३ |
| सद्गुरूंची थोर | १२७ |
| सद्गुरू देव | ३ |
| सद्गुरूपदस्थ | १८२ |
| सद्गुरुराजाने | २ |
| सद्गुरुराय | ३३ |
| सद्गुरूत्राचोनी | ३ |
| सद्गुरू सद्गुरू | ३ |
| सद्गुरु सद्गुरु | २६५ |
| सद्गुरुंचे स्थान | ३ |
| सद्गुरुघरीचे | ३०७ |
| सद्गुरूचरणी | २४८ |
| सद्गुरू दयाळ | ३०७ |
| सद्गुरूंनी केले | ३०८ |
| सद्गुरूला स्तवू | १७६ |
| सद्गुरू सद्गुरू | ३०८ |
| सद्गुरुसमान | ३११ |
| सद्बोधदशक | ३७९ |
| सद्रूप हे घन | ३९१ |
| सद्रूप हे पिंडी | ४२२ |
| सद्रूपाचा ठसा | २९४ |
| सधनासी दरिद्र | १८ |
| सप्त समुद्राचे | ४०९ |
| सप्त समुद्राचे | ४३१ |
| समकृती साधावया | १० |
| समचरण | १११ |
| समजीवन | ३१७ |
| समत्व चित्ताचे | ४५२ |
| समत्वाचे सुखी | ६७ |
| समाधिमंदिरी | २०२ |
| समाधी संजीवन | ३०२ |
| सरस्वतीचे | ४०८ |
| सरस्वती बापू | ४९८ |
| सर्व काही देव | २७ |
| सर्व गुप्त ज्ञान | १०० |
| सर्वची आहे | १०८ |
| सर्व जाणावे | २४४ |
| सर्व तंतुजाल | ४८ |
| सर्व दृश्य हे | १०४ |
| सर्व पहाता | १२३ |
| सर्व ब्रह्म ते | ३७३ |
| सर्व वेदांताचे | ९७ |
| सर्वसाधारण | ४५८ |
| सर्वाघटी देखे | ३९९ |
| सर्वाघटी प्रणव | ३९७ |
| सर्वाघटी राम | ४५५ |
| सर्वांगी देखे | १४० |
| सर्वांचे अंतरी | २४४ |
| सर्वांचे आहेती | ४४९ |

सलिलाचिये ३४
ससा देखुनी ८१
सहज चिंतन २५१
सहजाचे आसन ५२
सहजासन २४१
सहस्रदल ५४
सहस्त्रदल ८४
सळ सळ सळ २९३
साखर गोडी ३४
साठावरी अंतरी ४६४
साधन ते नाम ४२८
साधन ते नाम ४६०
साधनाचा पाठ ४६७
साधनाचे अभंग १६०
साधनाचे गुह्य ४६७
साधिलिया कळ १२६
साधी साधी साधी ९२
साधुराज माऊली १८९
साधुराज माऊली १९१
साधुराय ब्रह्म- १७८
साधुसंत येती २३९
सामान्याही परी ३०१
सार ता विचार १७२
सारासार विचार ३५
सावल्यांचा खेळ ३१६
साही शास्त्री निवडी ४५५
सांगा सांगा गुरू – २५३
सिद्धगिरी ४९९
सिद्धपाठ सिद्ध ३४२
सिद्धरूप देखे ३४१
सिद्ध संतजन ३६६
सिद्धानंद बोध- १९६
सिद्धांचाप्रसाद ३४१
सिद्धांतपंचक २७२
सिद्धांतपंचक ३६३
सिंहासनावरी २०९
सीताराम सिद्धेश्वरू १८३
सुखदु:खासी २३
सुख न मिळे १७१
सुखाचा संतोष ४३५
सुमनोद्दीपक ४२०
सुवर्णकंकणी ३४४
सुवर्णपात्री १०३
सुर्वणाचे माजी ४२४
सुषुप्तीचे देखे ३५३
सुषुम्नेचा ध्वनी ४५३
सूत्र धरोनिया ४७
सूर्यअस्त होता ४९
सूर्य चंद्र ७५
सूर्यचंद्र ७६
सूर्य चंद्र ७८
सूर्य चंद्र ४८५
सूर्यस्वर ३६९
सेवा करू १५७
सोडलेची नाही ३१७
सोडू नको राम – ९२
सोनसळा बीज ३५२
सोपीया शब्दांत ३०१
सोमेश्वर माऊली ४८७
सोय ती धरी ९१
सोहंसूत्र बीज २०
सोऽहं सोऽहं ध्वनी ९५
सोळा बारा ३८८
सोळा बारा ४१९
सोळा बारा ४५६
संकल्प तो ४७५
संकल्प मारोनी ४८

| | |
|---|---|
| संकल्प विकल्प | ८८ |
| संकल्प विकल्प | ३५५ |
| संकल्प हे प्रणव | ४२३ |
| संक्रातीचा तिळ – | २४० |
| संगतीसी आले | ३०५ |
| संगमातु श्वासो- | १५ |
| संच साधोनिया | ३१३ |
| संतकृपा होता | १०३ |
| संतकृपेचा | १८२ |
| संतचरण | १८४ |
| संतचरण | ४८२ |
| संतजनी कृपा | ४८२ |
| संतजनी प्रेम | ४८२ |
| संत तो अद्वैती | १३२ |
| संतपदी घेणे | ३३४ |
| संतवचनाचे | ४७६ |
| संत विश्रांतीचे | १२८ |
| संत संतोषती | ३४ |
| संतांचा आनंद | १५९ |
| संतांचा प्रसाद | १६० |
| संतांचा प्रसाद | १६२ |
| संतांचा प्रसाद | ३७८ |
| संतांचा महिमा | १२७ |
| संताचिया संगे | ९६ |
| संतांचे घरीचा | १५५ |
| संतांचे समगती | ४५१ |
| संती बोलियेला | १०२ |
| संती सांगितली | १६४ |
| संती सांगितले | ३९ |
| संदेहरहित | ४४० |
| संधी साधावया | ४५८ |
| संशय अज्ञान | ३५३ |
| संसार म्हणजे | ९६ |
| संसारसागरी | १२८ |
| संसाराचे बंध | १०६ |
| सः अहं अहं | २१९ |
| स्थूलदेहाभीतरी | ४१२ |
| स्थूल देही | ४११ |
| स्फटिकाचे | ४०७ |
| स्मरणातुनी | ४१४ |
| स्मरणी निघाला | ४१४ |
| स्मरतो बा | २८३ |
| स्मर मना गुरु | ११८ |
| स्वता असोनी | १०६ |
| स्वतापासुनी | ३६२ |
| स्वतालाची विसरसी | ९९ |
| स्वधर्माचा पाठ | ३९३ |
| स्वधर्माचा पाठ | ४०० |
| स्वप्न जैसे वाटे | १८ |
| स्वप्नामाजी तुज | १६६ |
| स्वये निर्मियेले | २१ |
| स्वयंज्योतीवरी | ४०८ |
| स्वयंतेज कैचे | ३३९ |
| स्वरूप अखंड | ३९८ |
| स्वरूप विमल | २७१ |
| स्वरूप संप्रदायी | २५४ |
| स्वरूपाचा आनंद | १३९ |
| स्वरूपानंद | ३१७ |
| स्वसुख चाखाया | ११ |
| स्वात्मतरंग सार | १७३ |
| स्वात्मसुखी रमले | ५४ |
| स्वानंद साम्राज्य | ३८५ |
| हकार उद्भव | २१ |
| हकारगामिनी | ४४७ |
| हकार विज्ञानी | ९ |
| हकार सकारी | ६८ |
| हकार सकारी | २९५ |
| हत्तीचा चरण | ८६ |
| हनुमंतकृपे | ३५४ |
| हनुमंतकृपे | ४७९ |

हनुमंत गुरू १८९
हनुमंतचरित्र २१२
हनुमंत पादुका २०९
हनुमंतप्रभू २१४
हनुमंत माऊली १९४
हनुमंत माऊली २१०
हनुमंतराय ६८
हनुमंतराय ७३
हनुमंतराय १५५
हनुमंतराय १७५
हनुमंतराय १७६
हनुमंतराय ३६७
हनुमंतराय ३९२
हनुमंतराय ४०९
हनुमंतरायासी १८२
हनुमंतराये ३२५
हनुमंतराये ३३७
हनुमंतराये ४४९
हनुमंत सद्‌गुरू १४७
हनुमंत सद्‌गुरू – २१९
हनुमंत सद्‌गुरू – ३७५
हनुमंत सद्‌गुरू ३०८
हनुमंत समर्थ १८८
हनुमंते कृपा १९६
हनुमंते कृपा २७६
हनुमंते तोषविला १८६
हरिकीर्तन ४२०
हरिकीर्तन ४७३
हरिकीर्तन ४७४
हरिकीर्तनाची २९६
हरिकीर्तनी ७०
हरिठायी राम– ३९१
हरि तो देखणा ४४६
हरिदासांचा ४९१
हरिदासांचिये १६२
हरिनाम ज्याचे १३१
हरिनाम ते १५४
हरिनामदास १५८
हरिनामप्रेमी ४२०
हरिनाम बरवे १५४
हरिनाम मुद्रांकित ४०३
हरिनामसार ३३१
हरिनामसार ४०१
हरिनाम हेची ४६१
हरिनामाचा ७६
हरिनामाचा ३६०
हरिनामी १४७
हरिनामी १५३
हरिनामी ४०१
हरिनामी ४०१
हरिभक्त कीर्तन– १६३
हरिभक्ता एकची २६३
हरिभक्ता वंद्य ३८२
हरिभक्तांकित १५८
हरिभक्तांकित १६३
हरिभक्तांकित ४५७
हरिभक्ति ४७७
हरिभक्तीचे १३०
हरिभक्तीचे १६५
हरिभक्तीला २८९
हरिभजनी ३४७
हरि राम कृष्ण १७२
हरी कृपा करी ४६२
हरी गुरु जहाला १२३
हरीचिये स्तुती ३३३
हरीचे कीर्तनी १५८
हरीचे कीर्तनी ३८०
हरीचे कीर्तनी ३८१
हरीचे कीर्तनी ३८१

| | | | |
|---|---|---|---|
| हरीचे कीर्तनी | ४३५ | हेतु भाव लय | ३३५ |
| हरीचे भक्तांच्या | १२८ | हेतूचिया पैल | ३२८ |
| हरीचे स्मरण | ३८० | हेतूचे देखणे | ३४२ |
| हरी तुला पाहू | ४४९ | हे वारे जगी | २८३ |
| हरी तो बोलता | २९७ | हेही नाही तेही | ४६ |
| हरीने संसार | २७ | होई देवा तू | ४२६ |
| हरीपाठ महात्म्य | ३०३ | होई होई रे | ९९ |
| हरीपाठाचे | ३०३ | होऊनी लेक | ७७ |
| हरी हरी हरी | ३३३ | होती हातवारे | ३१४ |
| हरी हरी हरी | ३८० | होवो नामाचे | ४९० |
| हरी हा फुकाचा | १२ | हुंकाराचा शोध | २८५ |
| हव्यवाहन | ४७८ | | |
| हस्तकी या अमृत- | ४२६ | क्षराक्षर दोनी | १४५ |
| हाती करिता | ४१६ | | |
| हाची आपुला | १९५ | ज्ञानदेव हरि- | ३८२ |
| हा प्राण आटला | २७७ | ज्ञानदेवादी | २७९ |
| हा वारा हा | २८२ | ज्ञानराज धन्य | ३०३ |
| हिरियाची कोठे | १०७ | ज्ञानाचिया झाळी | ३११ |
| हीच एक हो | २३९ | ज्ञानाची जे | ३७५ |
| हृत्पटली देखिले | ६६ | ज्ञानाज्ञान जे | ३७३ |
| हृदयस्थ नारायणे | १९५ | ज्ञानी आणि | ४८६ |
| हृदयस्थ पर- | १६९ | ज्ञानेश्वर माऊली | १३४ |
| हृदयाकाशी | ४०५ | ज्ञानेश्वर माऊली | ४९९ |
| हेची आवडी | ४९२ | ज्ञानोदय होता | ४७ |
| हेची सेवा | १६५ | | |




प. पू. श्रीसद्‌गुरू मामामहाराज केळकर (दासरामाचे वडील) यांची महात्मा गांधींवर अतोनात श्रद्धा होती. मामामहाराज हे कानपूर, नागपूर, अहमदाबाद व बेळगाव याठिकाणी काँग्रेसला स्वयंसेवक म्हणून गेले होते. तशीच श्रद्धा त्यांच्या घराण्यात आहे. महात्माजींवर हे पद दासरामास स्फुरले. ते खाली उद्‌धृत केले आहे.

## पद

महात्मा हिंदभूमीचा । पिताजी सर्व जगताचा ।। ध्रु ।।

सर्वही देवाची बाळे । गाती जरी त्याते लडिवाळे ।

मार्ग हा थोर लाभाचा ।।१।।

सर्व सांडोनि परवशता । स्थापिली काय मानवता ।

स्तंभ हा काय स्वर्गीचा ।।२।।



## साधकोपयोगी ग्रंथ

१) मनोहर विनायक मंगळवेढेकर (यांचे ओवीबद्ध चरित्र)
२) श्रीज्ञानदेव तेहत्तिशी सानंद टीकेसह व तात्पर्यार्थासह श्रीज्ञानेश्वर-महाराजांचा हरिपाठ
३) श्रीज्ञानदेव मुद्राप्रकाश, साधनमुद्रा टीकेसह आणि श्रीज्ञानेश्वरी सार
४) वायुलहरी व ज्ञानदेव आज्ञापत्र (याचा ओवीबद्ध भावार्थ)
५) श्रीज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति-श्रीदत्तस्तुतिप्रसाद (ओवीबद्ध)
६) श्रीज्ञानदेवकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह
७) श्रीनारायणरावमहाराज यरगट्टीकर चरितामृत
८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र
९) श्रीज्ञानेश्वरीचिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तनस्तोत्र
१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र
११) सिद्धस्तुति
१२) अमृतानुभव-मंगलाचरण, मंगलप्रसादटीकेसह
१३) तात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र
१४) गुरुपाठ
१५) सांप्रदायबोध
१६) रामपाठामृत
१७) श्रीगुरुलिंगगीता
१८) नित्यपाठामृत
१९) परमार्थ-प्रकाश अर्थात् श्रीदासराम व वचनामृत
२०) सांगली महात्म्य